[ भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-ग्रंथमाला पुस्तक २५ वें ]

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

# सप्तम-संमेलनवृत्त

शके १८४१

संपादक व प्रकाशक

दत्तो वा[illegible]दार बी. ए.

गंगाधरराव नारायणराव मुजुमदार.

( चिटणीस भा. इ. सं. मंडळ, [illegible] )

[ सर्व हक्क राखून ठेविले आहेत. ]

किंमत [illegible] १।।१८४४.

PUNE

श्री

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ पुणें

[ पुणें--सदाशिवपेठ ३१४ जुन्या मुरलीधराचे मागें शिवाजीमंदिराजवळीं ]

( स्थापना शके १८३२ )

सन १८६० च्या २१ व्या ॲ० सोसायटीज् रेजिस्ट्रेशन ॲक्टान्वयें नोंदलेलें

**स्थापना:**--सुमारें चाळीस वर्षे महाराष्ट्रांत स्वेतिहास खटपट फुकळ एतद्देशीय विद्वानांनीं आपापल्यापरी केलेली अ... कामगिरी बिनमोल झाली यांविषयीं वाद नाहीं. परंतु बारीक विचारें तर झालेलें काम राईएवढें तर व्हावयाचें काम डोंगराएवढें, असें म्हण... खचित अतिशयोक्ती नाहीं. अर्थात्, एकेकटा सुटा संशोधक म्हणजे आटवूं पहाणाऱ्या टिटवीप्रमाणें भासूं लागतो. यामुळें 'संघे शक्तिः कलौ' हा न्याय अनुसरून सर्व इतिहासप्रेमी व इतिहाससंशोधक मंडळींची संस्था च स्थापावी असा विचार होऊन शके १८३२ सालीं 'भारत-इति... संशोधक-मंडळ या नावाची संस्था स्थापन झाली. प्रसिद्ध पंडित कै... ब. गणेश व्यंकटेश जोशी हे या मं... हिले अध्यक्ष होत. त्य... रा. ब. काशिनाथ नारायण साने यांची अध्यक्षस्थानीं योजना झाली व आजतागायत या स्थानीं कायम आहेत.

**उद्देश:**--कांहीं वर्षे काम केल्यावर संस्था शके १८३८ सालीं सो... आक्टाप्रमाणें नोंदण्यांत आली त्यावेळीं संस्थेचे उद्देश येणेंप्रमाणें ठरविले...

( श्री ) भारतवर्षासंबंधीं ऐतिहासिक साधनें म्हणजे काग... ऐवज, बखरी, कैफियती, शिलालेख, जुने हस्तलेख, ... चे सारस्वत ग्रंथ, कलाकुसरीचीं कामें, नाणीं, ताम्रप... शिल्पकृत्यें, चित्रें आणि इतर हरतऱ्हेच्या ऐतिहासिक ... त्वाच्या वस्तू जमा करणें व संरक्षिणें.

( ग ) असलीं सर्व साधनें संरक्षिण्याकरितां व प्रदर्शिण्याकरितां या... इमारती उभारणें.

( णे ) अशीं साधनें प्रसिद्ध करणें, त्याचप्रमाणें ऐतिहासिक संशोध... ...कार्य जोरावण्याजोगे इतर ग्रंथ प्रसिद्ध करणें व भारत... ...तिहासिक ग्रंथ व लेख प्रसिद्ध करणें.

...संबंधीं संशोधन व त्याचा चिकित्सा...

# सप्तमसंमेलनवृत्त


## ( १८४१ )

## निबंधानुक्रमणिका


| नांव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|
| ( १ ) पाटिलबावांचें राजकारण (हप्ता २ व ३ रा) | रा. द. वि. आपटे, बी. ए. | १–४८ |
| ( २ ) फार जुनीं मोडी पत्रें ( शिवपूर्वकालीन ) | रा. द. वा. पोतदार बी. ए. | ४९–५३ |
| ( ३ ) सहस्त्री | रा. वा. द्वा. मुंडले | ५३–५४ |
| ( ४ ) एका महार वीराचा पराक्रम | रा. शं. न. जोशी | ५४–५७ |
| ( ५ ) पंताजी गोपिनाथ बोकील | रा. पां. न. पटवर्धन | ५७–६५ |
| ( ६ ) भांबोरेकर राजे भोसले यांचे घराण्याची हकीकत | श्री. भि. बा. भोसले राजे | ६५–७७ |
| ( ७ ) परिंड्याचे जाधवराव | रा. वा. सी. बेंद्रे | ७७–८३ |
| ( ८ ) उज्जयिनी येथील टांकसाळ | रा. का. कृ. लेले बी.ए. | ८३–९० |
| ( ९ ) चार मुसलमानी नाणीं | रा. स. मा० दिवेकर | ९२–९३ |
| ( १० ) कांहीं मुसुलमानी नाणीं | रा. वा. सी. बेंद्रे | ९३–९५ |
| ( ११ ) बाळाजी विश्वनाथ यांचे हातचीं कांहीं पत्रें | श्री. गं. ना. मुजुमदार | ९६–९७ |
| ( १२ ) शक १८४० तील संशोधनवृत्त | रा. पां. मा. चांदोरकर | ९७–१२१ |
| ( १३ ) माझें संशोधनवृत्त | मिया शिकंदरलाल आतार | १२१–१२४ |
| ( १४ ) बाळाजी विश्वनाथाचीं आणखी कांहीं पत्रें | रा. पां. न. पटवर्धन | १२५–१२८ |
| ( १५ ) ब्राह्मणकालीन जातिभेद | प्रो. वै. का. राजवाडे एम्. ए | १६१–१६२<br>१२८–१४१ |
| ( १६ ) मानभावी वचनपाठ | रा. पां. मा. चांदोरकर | १४१–१५४ |
| ( १७ ) महानुभाव पंथ | महंत दत्तराज कवीश्वर | १५४–१५५ |

| नाव | लेखक | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| ( १८ ) अपभ्रंश भाषेंतील वाङ्मय | –डॉ. पां. डा. गुणे एम्. ए. पी एच डी. | –१५५–१६१ |
| ( १९ ) एक जुना मराठी शिलालेख (ठशासह) | –रा. द. वा. पोतदार, बी. ए. | १६१-१६२ |
| ( २० ) संस्कृत फारसी कोश | –महंत दत्तराज महानुभाव | –१६२ |
| ( २१ ) सप्तमसंमेलन व मंदिरोद्घाटन समारंभ | – ( १८४१ ) | १६३–१८९ |
| श्री. बाबासाहेब सचिव यांचें भाषण | – | १६५–१७३ |
| शके १८४० चा अहवाल | – | १७४–१८१ |
| ( २२ ) कालिदासांचा कालनिर्णय-अन्यमतखंडन | –रा. चिं. वि. वैद्य | १९०–१९२ |
| ( २३ ) फार जुनीं मोडी पत्रें ( पुनर्वाचन ) | –रा. आबा चांदोरकर | १९३–१९८ |
| ( २४ ) पांजी–नवस | –श्री. गं. ना. मुजुमदार | १९९–२०० |
| ( २५ ) सूची | –रा. त्र्यं. रा. शेजवलकर बी. ए. | २०१–२०९ |

---



पृ. १६१।१६२ वरील जुन्या मराठी लेखाचा ठसा. फोटोब्लॉक नसल्यामुळें अगदीं तंतोतंत बरोबर नाहीं. पण साधारण कल्पना होण्यास पुरेल.

( चित्रशाळेकडून–आभार. )

# सप्तमसंमेलनवृत्त

## चिटणिसांचें निवेदन

शके १८४१ सालच्या सातव्या संमेलनाचा वृत्तांत व निबंध शके १८४४ त प्रसिद्ध होत आहेत. असा उशीर होण्यास काय अडचणी कारण झाल्या त्या आजपर्यंत सालोसालच्या अहवालांत कळविल्या आहेतच असा उशीर होऊं नये अशी तीव्र इच्छा आहे ती पुरी होण्याचा योग येऊं लागेल तो सुदिन !

या वृत्तांत संमेलनांत वाचलेल्यांपैकीं कित्येक निबंध आले नाहींत ते यथानियम अन्यत्र प्रसिद्ध होतील.

सप्तमसंमेलनवृत्ताची सूची आपल्या मंडळाचे व्यासंगी सभासद रा. त्र्यं. रा. शेजवलकर बी. ए. यांनी तयार करून दिली याबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे.

सदर वृत्त शके १८४१ च्या सर्व सभासदांस यथानियम द्यावयाचें असा ठराव कारभारी मंडळानें केला आहे. आतां संमेलनवृत्तें कोणचीं हि छापावयाचीं बाकी उरलीं नाहींत. शके १८३९ पासूनचीं इतिवृत्तें राहिलीं आहेत. पैशाची हल्लीं अगदींच टंचाई आहे तेव्हां ती सोय होतांच तीं पुस्तकें प्रसिद्ध करूं.

कार्तिक शु० ५।१८४४
पुणें

दत्तो वामन पोतदार
गंगाधरराव नारायणराव मुजुमदार
चिटणीस भा. इ. स. मं.

भा. इ. सं. मं. पुणें

# सप्तम-संमेलन-वृत्त

## पाटीलबावांचें राजकारण हप्ता नंबर २

गेल्या संमेलनांत पाटीलबावांनीं दिल्ली येथील पहिलीं चार वर्षें कशीं घालविलीं याचें वर्णन मीं वाचलें होतें. त्यानंतर पुढच्या चार वर्षांची हकीगत यंदा यावयास पाहिजे होती. परंतु अनेक कारणांमुळें मला तसें करतां आलें नाहीं. फक्त दोन वर्षांची हकीगत मी आजच्या निबंधांत देणार आहे. पाटिलबावांच्या दिल्ली येथील शेवटच्या चार वर्षांचा विचार कालदृष्टया करण्यापेक्षां विषयदृष्टया म्हणजे प्रकरणशः करणें अधिक सोईचें आहे. या अवधींत गुलामकादर, अनुपगारे गोसावी व तुकोजी होळकर अशा तीन असामींशीं पाटिलबावांचा संबंध आला. त्याचें वर्णन तीन भागांत स्वतंत्रपणें यावयास पाहिजे. पैकीं गुलामकादर प्रकर्ण सबंध मी आज वाचणार आहें. या शिवाय गोसावीप्रकर्ण अर्धें तयार केलें आहे. गोसावी प्रकरणाचा उत्तरार्ध व तुकोजी होळकरांचें प्रकर्ण मी यंदा लिहिण्यास घेतलें नाहीं. त्याचें कारण असें:- येथें वाचावयाचे निबंध होतां होईतोंवर अस्सल पत्रांच्यां आधारावरून लिहिले पाहिजेत. तेव्हां गुलामकादर प्रकरणाची माहिती 'दिल्ली येथील मराठ्यांचीं राजकारणें' या इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांतील अस्सल व समकालीन पत्रांच्या साहाय्यानें लिहितां आली. त्याच प्रमाणें गोसावी प्रकरणाच्या मुळाशीं असलेला अलीबहादर यानें नाना फडणीसास पाठविलेलीं व त्याजकडून उत्तरादाखल आलेलीं पत्रें इतिहाससंग्रहांत छापलेलीं असल्यामुळें तें हि लिहितां आलें. आतां या पुढचा भाग रा. दिवेकर यांना अलिबहादरचा आणखी पत्रव्यवहार सांपडला आहे तो पाहिल्यावांचून लिहिणें योग्य नाहीं. त्याचप्रमाणें तुकोजी होळकराची माहिती स्वतः त्याच्याच तोंडून ऐकण्याची संधि आपणास मिळण्याजोगी आहे. होळकरांचे दिवाण चंद्रचूड यांचे हजारों कागदपत्र असलेलें व राजकारणांनीं भरलेलें प्रचंड दप्तर मंडळाच्या ताब्यांत आहे त्यांत तुकोजीनें लिहिलेलीं शेंकडों पत्रें आहेत. तीं व्यवस्थितपणें लाऊन तुकोजीस आपली हकीकत सांगावयास लावतां येईल. त्या दप्तरांतील हजार बाराशें पत्रें मीं लावलींही आहेत; तथापि या विषयासंबंधीं संपूर्ण माहिती मिळविण्याचें साधन असून त्याचा मनाजोगा परिष्कार न करतां या प्रकरणास हात घालणें बरोबर नाहीं असें समजून तें मीं पुढच्या वर्षाकरतां राखून ठेवलें आहे.

येथें दिलेली हकीगत अस्सल पत्रांच्या आधारें लिहिली आ . पुष्कळ ठिकाणीं त्यांतील साक्षात अवतरणें घेतलीं आहेत. जेथें असें केल्यास प ार पाल्हाळ होईल असें वाटलें तेथें पत्रांतील माहिती संक्षेपानें सांगितली आहे. प-i अस करतांना देखील मुळांतले वाक्यांश किंवा महत्त्वाचे शब्द मीं ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच प्रमाणें येथें दिलेलीं संभाषणें देखील मी कल्पनेनें दिलेलीं नसून तत्कालीन जबाबदार मनुष्यांनी पाठविलेल्या रिपोर्टांच्या आधारें दिलीं आहेत. तीं देण्यांत माझा हेतु असा आहे कीं, पेशवाईच्या उत्तरार्धांत महाराष्ट्रांत जीं कर्तीं माणसें होतीं त्यांची यथार्थ कल्पना आम्हांस मिळाली पाहिजे. त्यांचे विचार, आचार, भाषा, धर्मसमजुती परस्परांशीं व शत्रूशीं वर्तन कोणत्या प्रकारचें होतें हें आपणास मुख्यतः पहावयाचें आहे आणि याच हेतूनें मी ही दोन वर्षांची हकीकत तयार केली आहे.

ही तयार करीत असतांना मागें सांगितल्या प्रकरणाखेरीज भारतवर्षांत छापून गेलेलीं ८।१० पत्रें मला फार उपयोगी पडलीं. या शिवाय ऐतिहासिक टिपणें, जिवबा-दादा बक्षी यांचें चरित्र या पुस्तकांतील पत्रांचा आधार क्वचित घेतला आहे. इंग्रजी पुस्तकांत यासंबंधीं फारच त्रोटक व विसंगत हकीगती दिल्या आहेत; या करितां त्यांचा विचार येथें मुळींच केला नाहीं. तथापि इंग्रजांचा साक्षात संबंध आला त्यावेळीं त्यांनीं लिहिलेल्या रोजनिशींतील नोंदी विचारांत घेण्याजोग्या आहेत. हें काम पुढें एखादे वेळीं सावकाशीनें करण्यास हरकत नाहीं. पहिल्या चार वर्षांअखेर पाटिल-बावांचा लालसोट येथें पुरा पराभव झाला. या युद्धापासून मला यंदा हकीगत सांगा-वयाची आहे. तेव्हां मागल्या हकीकतीचा सारांश आधीं थोडक्यांत सांगून नंतर युद्धाचें वर्णन देणें बरें. असा सारांश देण्यास एक उत्तम साधन आपणाजवळ आहे. पाटिलबावा दिल्लीकडील मुलूख एकसारखा जिंकीत जात आहेत पण त्यांची 'खर्चाची नेहमीं ओढ असते. ' असें कळल्यावरून त्यांच्या धोरणाबद्दल जबरदस्त शंका उत्पन्न झाली. तेव्हां नानांनी सदाशिव दिनकर नांवाच्या गृहस्थास उत्तर हिंदुस्थानांत हिंडून व सर्व चौकशाकरून रिपोर्ट तयार करण्यास सांगितलें होतें. त्या रिपोर्टांत विहंगम-दृष्ट्या पाटिलबावांच्या कारभाराचें अवलोकन केलेलें असून भावी अनर्थाची स्पष्ट इशारत दिली आहे. त्याच्या रिपोर्टाचा सारांश असा आहे:—

आधीं जमेस ठिकाण असावें, नंतर खर्चास बंद असावा, नियत नीट असावी हे तीन विचार प्रथम कायम असावे तेणें करून चालते. तूर्त दहा लक्ष यांस आले. यांत खर्चाचा तपशील ऐकता आश्चर्य वाटतें. फौजखर्चांत देशचे फौजेस पावतीचा विचार अगोदर विनविलाच आहे. देशचे मराठे यांचे हाल पाहतां बेहद आहेत. घोडीं विकूनही सावकाराचे कर्जापासून सुटत नाहींत. दहा रुपये नानाशाही दर रावतास दरमहा पावत असेल नसेल ! मग त्याची स्थित कशानें राहावी ? ( पाटीलबावा ) पलटणें म्हणजे पायदळ शिबंदीवर फार संतुष्ट होते त्यास

रुपया पुष्कळ दिला. ग्वालेर–गोहद प्रांतीं कामें पायदळांनींच केलीं अशी समज आहे. मराठे जागांजागां गढ्यांवर खासे खासेच + शेकडों मेले असतां नाकारे झाले आणि पायदळ पलटण मोठीं पतंत ठरून त्यास रुपया दिला ! त्याची तरी चौकशी, हाजरी गणती, लिहिण्याचा बंद (पाहिजे [illegible]) ? रुपया दिला तो यथापद्धत ज्याचा त्यास, जमादारास [illegible] ला असें तरी कोठें आहे ? ब्रह्मघोळ ! तोफखान्याचा [illegible] खर्च. बारगीर आतां उठउठून देशास गेले. वरंगळखर्च बेबंदच. मोताद्च नाहीं. यास [illegible] ना म्हणावयास वरती लिहिलीच आहे. बाकी कर्जे साहुकारांचीं. त्यांत आचा[illegible] [illegible], तीस लक्ष गातात. इतर साहुकार, सोरटी, व गद्रे आदिकरून, व बाजारचे सावकार रांगडे गुजराथी निराळे त्यांच्या बेरजाची माहितगारी कोठली ? श्रमी आहेत. लाखोच सांगतात. सरंजाम पेस्तर तेस्तरसाल ती देखील खर्ची पडले म्हणतात. कांहीं खासगी वीस पंचवीस लक्ष केली ती देखील खर्ची पडली म्हणतात ! आधीं चार वर्षे इकडे अतिवृष्टि. अंमलदार हमदावीजलाद त्यानें मातबर व गरीब यांच्या अंगास चिरगुटें लपेटून, वर तेल घालून अग्नि लाऊन उभीं माणसें जाळून रुपया घेतला. तो अमलदार झाल्यावर त्या मुलखाची दशा अवादी वैराणीची काय पाहावी ? दुष्काळांत रय्यत तमाम हिंदुस्थानातील गेली. लावणी बुडाली. कांहीं जुजबी लावणीचा वसूल जुंयांनीं नेला. पाटिलबावांच्या कारकीर्दी अगोदर आफती एकतर अनावृष्टीमुळें रय्यत झाडून येथवर मेली कीं येकला गांव निमाणसीं झाला. एके घरचीं माणसें जी दहा वीस असतील तीं झाडून घरांत मेलीं.प्रेतें उचलावयास कोणी राहिलें नाहीं. हाडाचें घरांत सांपळे तसेच पडून राहिले. ही गती चमेलपासून सरहद्द लाहोर काश्मीर पर्यंत. असा लोक मेला फार ! वाचले ते आधिर होऊन लौकर देशांतरास गेले. हजारों हजारोंच्या झुंडी एकामागें एक जात होत्या. थोरली आफत. कांहीं वस्तीस राहिले त्यास अंमलदार मुसलमान सख्त मिळाले त्यांनीं लोक लुटून फस्त केले. या दोन्ही आफती भारीच पडल्या. यानंतर पाटिलबावांचे अंमलदार मुलखात गेले, तेही जलाद. सतत मुसलमान कमी नाहींत. सख्ती करावयास चुकले नाहींत. जमा मात्र सख्तीने बांधल्या. वसुल घेण्यास कोताई केली नाहीं. (परंतु) रुपया मिळाला नाहीं. राजवाड्याच्या खंडण्या म्हणावयास जेपूरची वीस एकवीस लक्ष बेरीज मात्र ठरविली. वसुलाच ठराव दोनलक्ष नख्त व दो लक्षाचे जवाहीर तो वसूल मुदतीनें आला. बाकी १६–१७ राहिली ते मुलखातून वसूल करून घ्यावे असा तपशील खंडणीचे वेळेसच करारांत आला. त्याबद्दल फौज हजार दोन हजार जेपूर प्रांतांत रवाना केली. त्यास पैका मिळत नाहीं. ही दशा एका खंडणीची. दुसरी खंडणीच झाली नाहीं. बादशाहाचा खर्च पाटीलबावांना पदरचा द्यावा लागतो. फौजेचा खर्च जातीवर कर्जावर चालतो. कर्ज मिळाले ते घेतलें. पदरी खासगी होती तीही खर्ची पडली. शेष राहिले असेल तर ज्याचे त्यास ठाऊक. कमविसदारकरून इकडील महालावर रसदा मागतात. तर दक्षणी यांची हिंमत कशी होते ? आधीं माहीत नाहींत.

दुसरें टिकून या मुलखांत फौज राहील कीं नाहीं असे अंदेशे. यांत हिंमत कोण करतो ? साहुकाराचे तलाशांत आहेत कीं त्याजकडे महालचे कमावीसदारे लाऊन द्यावे. त्या साहुकारानें बादशाहाचा खर्च दरमाहाचे दरमाहा देत जावा असा साहुकार कोण मिळतो ? त्यानीं आपले येथील साहुकार आधीच खालीं करून ठेविले. यांत शक्ति राहिलीच नाहीं. हें वर्तमान येथील आहे. खरें आहे. ऐकिलें वर्तमान. खरा वहिवाट पाहतां कांहीं अंतर असिलें तरी किती तफावत पडेल ? वर्तमानाची जात असी आहे. मुख्य पक्षीं धनी, साहुकार व फौज राजी; व रयत आबाद असी नियत असावी. ती नसल्यास परिणाम काय ? त्याचा वाली ईश्वरच आहे. त्याच्या इच्छेनें घडेल तें खरें.

या सारांशावरून पाटीलबावाची सांपत्तिक स्थिती किती निकृष्ट प्रकारची होती हें दिसून येईल. तथापि लष्करी विजय मिळाल्यामुळें भावी अनर्थाची कल्पना पाटीलबावांना आली नाहीं. जैपूर, जोधपूर येथील मारवाडी राजे व दिल्ली येथील मुसलमानी सरदार, कारभार मराठ्यांच्या ताब्यांत गेलेला पाहून मनांतून जळफळत होते. परंतु उघड युद्ध देण्याचें काम त्यांना करतां येईना. तेव्हां त्यानीं कपटाचा आश्रय करून पाटीलबावांच्या सैन्यांतच शिंगें मोडून प्रवेश केला. तेथें गुप्तपणें फितुरीचें काम करून जेव्हां त्यांची खात्री झाली कीं पाटीलबावांचा आपल्यावर विश्वास बसला, सैन्याचीं सूत्रें आपल्या हातीं आलीं, दक्षिणी मराठे लोक अधिकारभ्रष्ट झाले, मराठी सैन्याचें आधिपत्य देसील नौबतराय खत्री नांवाच्या हिंदुस्थानी रांगड्याकडे आलें तेव्हां जैपूरकरांनीं कुरापत काढून पाटीलबावांना सैन्यासुद्धां जैपूरनजीक लालसोट येथें आणलें. तेथें प्रथम ज्या चकमकी झडल्या त्यांत मराठ्यांचा जय झाला. पण फितुरी लोकांची घडी बसतांच त्यानीं एकदम आपलें खरें स्वरूप प्रकट करून मराठी सैन्याची सर्वस्वी धांदल उडवून त्यास जीव घेऊन पळावयास लावलें. या युद्धाची इत्थंभूत माहिती भारतवर्षांतील एका पत्रांत फारच खुलासेवार आली आहे ती अशीं. ही लढाई १२ सवाल शनवारीं म्हणजे शके १७०९ अधिक श्रावण शु. १४ ( १७८७ जुलै २८ ) रोजीं झाली. पाटीलबावांच्या बाजूस डिभाई, अंबाजी इंगळे, खंडेराव हरी, शिवाजी विठ्ठल, राजाजी पाटील वगैरे प्रमुख लोक असून विरुद्ध पक्षास जैपूरचा राजा प्रतापसिंग, जोधपूरचा सेनापती भीमसिंग राठोड व महमदबेग हमदानी वगैरे रजपूत व मुसलमान एकदिलानें लढत होते. प्रथम राठोडांनीं अंबाजी इंगळ्यावर चाल केली; व अशा रीतीनें युद्धास प्रारंभ होतांच शिवाजी विठ्ठल, खंडेराव हरी आणि रायाजी पाटील पांचसात हजार स्वारानिशीं राठोडावर चालून गेले; आणि त्यांचा पराभव केला. सोभाराम भंडारी व भीमसिंग राठोडाचा मेहुणा आणि १५।२० मोठे जमादार रणांगणांत पडले आणि या शिवाय ५।६ शें लोक जखमी व ठार झाले. यामुळें रजपुतांच्या सैन्याचा धीर खचून तें परत फिरलें. या हल्ल्यांत शिवाजी विठ्ठलाच्या पथकानें पुढाकार घेतला होता. मराठ्यांचा

जय झाल्यामुळें त्यांनी रजपुतांचा पाठलाग करण्यास प्रारंभ केला. राठोडांचा मोड झाल्याची बातमी महमदबेग हमदानी यास लागली तेव्हां तो जैपूरच्या राजाच्या डाव्या बाजूस उभा होता. तेथून तो एकदम या परत फिरणाऱ्या राठोडांच्या मदतीस धांऊन आला.

इकडे राठोडांचा पुरा मोड करण्यासाठीं मराठे उत्साहानें चालले होते. परंतु संध्याकाळची वेळ आणि तशांत एकदम पावसास सुरुवात झाली. यामुळें वाटेंत असलेले ओढे, नाले व खळया अंधारांतून ओलांडून जाणें धोक्याचें आहे असें ठरवून मराठ्यांनीं तोफांचा मारा चालू ठेवला. विरुद्धपक्षानें देखील तोफांचा चांगला भडिमार केला. त्यांत विशेषतः जैपूरकरानीं दोन तीन तोफा लागू करून पुष्कळ गोळे टाकले. या गोळ्यांचा रोख राणेखानभाईवर होता; आसपासचीं शेंपन्नास माणसें ठार व जखमी झालीं, जवळचा मनुष्यहि गोळ्यानीं ठार झाला व भाईच्या तरवारीच्या कबजाची वाटी उडाली. तरी भाई ठिकाण सोडून अलीकडे पलीकडे जाहला नाहीं किंवा त्याला गोळा लागला नाहीं. अर्थात् 'ईश्वरें भाईस कुशळ केलें' हें वर्णन बरोबर आहे. ही तोफांची मारगिरी पहाटेपर्यंत चालली होती. नंतर दोघांनीही मारा बंद केला व आपापल्या तळाकडे विसावा घेण्यासाठीं सैन्यें गेलीं. तथापि राठोडांचा मोड झाला, आणि मराठ्यांना ईर्षा चढली व एक दोन दिवसांत आणखी एखादी जोराची लढाई व्हावी अशीही त्यांची इच्छा होती. परंतु मराठ्यांच्या सैन्यांत मराठे लोक थोडे व फितुरी हिंदुस्थानी फार यामुळें एवढ्याहि विजयाचा उपयोग कांहीं एक झाला नाहीं. पाटिलबावांच्या पलटणांतील लोकांत फितूर करून राठोडानीं मोठा व्यूह रचला होता. खासा पाटिलबावा व भाई वगैरे लोकांस दगा करून ठार मारावें आणि हें न साधलें तरी परस्परांची मारगिरी सुरू होऊन राठोड पाटिलबावांच्या सैन्यास येऊन भिडतांच फितुरी लोकांनीं त्यास सामील होऊन एकदम मराठ्यांवर उलटावें असा त्यांचा बेत होता. परंतु शनवारच्या लढाईत राठोड मराठी सैन्याशीं येऊन भिडण्यापूर्वीं च त्यांचा पराभव झाल्यामुळें फितुरी लोक जागच्या जागीं च राहिले. त्यांना राठोडास सामील होतां आलें नाहीं. इकडे राणेखानभाईनें गोलंदाजांना तोफा डागण्याचा हुकूम दिला त्याप्रमाणें त्यांनीं डागल्या. परंतु शेंकडो गोळे सुटत असून राठोड जागच्या जागींच उभे आणि त्यांचे गोळे मात्र नेमके भाईच्या अंगावर येत होते. यामुळें भाईनें राठोडाच्या सैन्यापर्यंत बातमीदार पाठवून माहिती आणविली तेव्हां त्यास कळलें कीं तोफांचे गोळे तेथवर पोंचतच नाहींत! भाईनें असें होण्याचें कारण गोलंदाजास विचारलें तेव्हां ते म्हणाले 'तोफा लहान असल्यामुळें गोळा तेथवर पोचत नाहीं.' तेव्हां त्यानें मोठ्या दोन तोफा आणवून मारगिरी सुरू केली. यापैकीं एक गोळा हमदानीस लागून तो ठार झाल्याची बातमी आली. हा हमदानी मोठा कसलेला योद्धा असून त्याच्यावर रजपुतांची फार भिस्त होत. या शिवाय भाईनें स्वतः उभें राहून गोळे सोडविल्यामुळें राठोडांचे पांचचारशें लोक ठार झाले व दुसरे दिवशीं

रविवारीं देखील तोफा सोडविल्यामुळें राठोड जवळ येऊं शकले नाहींत. अशा रीतीनें फितुरी लोकांची निराशा झाली. तरी शत्रुपक्षासाठीं कळवळ्यानें काम करणारे लोक पाटिलबावांच्या पलटणींत असल्यामुळें त्यानीं राठोडांची वाट न पाहतां आपणच कांहीं खुसपट काढण्याचें ठरविलें. आणि सोमवारीं पलटणाचे सात हजार लोक संप करून अडून बसले. "आमची सात आठ महिन्यांची बाकी राहिली आहे ती चुकवा" असा त्यानीं हट्ट धरला; व इतर लोक देखील पगाराबद्दल तक्रार करूं लागले. पाटिलबावांनीं मध्यस्तामार्फत तडजोड करण्याचा प्रयत्न केला. परंतु हें प्रकरण मिटण्याचा रंग दिसेना. शेवटीं बायकांच्या अंगावरील दागिने व कांहीं रोख रकम देऊन तीन रोजमऱ्यांचा ऐवज भागवितो आणि वरकड हिशोब लढाईनंतर देतों असें सांगितलें. या निर्वाणीच्या उत्तरानें इतर पलटणींचें समाधान झालें. परंतु जे सात हजार लोक एके जागीं जुटीनें उभे होते व ज्यांना विरुद्धपक्षाचें लोक म्होरके मिळाले होते.त्यांनी ही तडजोड मान्य केली नाहीं त्यांच्याजवळ सवाशें तोफा व त्यांच्या 'जिन्मे'स पुरेसा दारुगोळा व छरेसुद्धां सामुग्री होती. या लोकांनीं तलब चुकवून द्या नाहींतर आम्ही तोफा घेऊन जातों असा आग्रह धरला. पाटिलबावानीं नानाप्रकारच्या तडजोडी सुचविल्या. परंतु त्यांचा उपयोग झाला नाहीं. शेवटीं मंगळवारीं तिसरे प्रहरीं गाडीवान सवाशें तोफा, दारूगोळा, गोलंदाजसुद्धां घेऊन चालले. या शिवाय यांना मिळण्याकरितां जैपुरकराची चारपांच हजार फौज तयार होऊन येत आहे अशी बातमी मराठ्यांना समजली. तेव्हां पाटील-बावानीं शिवाजीपंत, रावराजा वगैरे सर्व सरदारांना बोलावून 'आपल्या तोफा व सात हजार बंदुक घेऊन चालले तेव्हां पुढे काय करावें' असा प्रश्न केला. यावेळीं सर्वांच्या विचारें असें ठरलें कीं 'लष्करांत फितूर झाला. नकळे हिंदुस्थानी कोणकोण फितुरांत मिळाले आहेत. साऱ्याच पलटणांनीं तलबेचा तगादा केला होता; पैकीं इतर लोकांची तडजोड झाली, व सात हजार मात्र निघून जात आहेत. परंतु राहिलेल्या कंपूंत देखील हिंदुस्थानी व मोगले लोक पुष्कळ. त्यांचा तरी विश्वास कसा धरावा ? अशा-वेळीं लढाई घेणें बरोबर नाहीं. आपले कोण व पारखे कोण याची खात्री करून न घेतां लढाई केल्यास 'पाणिपत' होईल. कंपूंत तोफा घेऊन जातो त्याला जाऊं द्यावा.' याप्रमाणें ठरून सर्व सरदार व पाटीलबावा घडत असलेला प्रकार पहात उभे होते. कंपू कूच करून दीडकोसावर गेला; व जैपूरकराच्या सैन्यांत सामीलही झाला. इतक्यांत सूर्यास्ताची वेळ होऊन रजपूत आपणावर चालून येणार असें निश्चितपणें दिसूं लागलें. तेव्हां युद्धाची तयारी करण्यावाचून गत्यंतर नाहीं असें पाहून पाटिलबा-वानींहि सिद्धता केली. यावेळीं शिलेदार उपाशी होते तरी राणेखानभाईबरोबर सर्व सरदार फौजसुद्धां येऊन उभे राहिले पुढे चारपांच घटकांनंतर कंपूनें तोफांची एक शिलक केली. तेव्हां मराठ्यांची खात्रीच झाली कीं फितूरीलोक व जैपूरचें सैन्य आपल्यावर चालून येणार तेव्हां पाटिलबावानीं आपलें चिलखत आणविलें, आणि 'शत्रू अंगावर चालून

आला म्हणजे आपण त्यांच्यावर हल्ला करावा, मग ईश्वरानें नेमलें असेल तसें होईल' असा निश्चय केला. इतक्यांत बातमी समजली कीं शत्रू रात्रीं चाल करून न येतां माघारीं विश्रांति घेण्यासाठीं गेला व फक्त तोफखान्याजवळ हजार पांचशे स्वार ठेवले आहेत. तेव्हां चौकीसाठीं कांहीं लोक ठेऊन राणेखान पाटिलबावाकडें गोटांत आला थोड्याच वेळानें शिवाजीपंत बापू तेथे आला; आणि बापू, पाटिलबावा आणि भाई या तिघांनीं एकंदर परीस्थितीचा खल केला. शिवाजीपंत म्हणालो " समय पाणिपतासारखा प्राप्त झाला. आज रात्रीसच ते चालून येते म्हणजे मरणें प्राप्त उद्यां प्रातःकाळी कच्छे व राठोड तमाम यांच्या फौजा चालून येणार. आपलीं फलटणें तोफा त्यांजकडे गेल्यानें त्यास हुशारी येऊन हावभरी जाहले. आपले फौजेची हुशारी मंदावली. फौजेंत पलटणें व मोंगले व रांगडे हिंदुस्थानी आहेत. त्यांचा विश्वास नाहीं. परिच्छिन्न ते लढाईचे समयीं घालवितील. अजून परीक्षा पहावयाची बाकी राहिली नाहीं. दक्षिणी फौज किती आहे ती आपली आपल्या ध्यानांत आहे. चार शेराची धारण. बाहेरून रसद येत नाहीं. शिलेदार उपासानें मेले. घोडीं मेलीं, राहिली त्यांत सामर्थ्य नाहीं वैरणीचा काळ. लढाई कशाचे बळावर घेणार ? येवेळेस चार दिवस येथून निघावे. मसलतीस टाळा द्यावा. पुढें पाहून घेऊं ." हा शिवाजीपंताचा सल्ला पाटीलबावा व भाई यांस पसंत पडला. व आपण तळावर राहून व शत्रूच्या तोंडावर सडी फौज ठेवून बाजार बुणग्याचे लोक माघारे पाठविले. याशिवाय चारपांच कोसांवर लालसोटानजीक थोरले बुणगे होते त्यांतील लोकांनाही निघून जाण्याबद्दल निरोप पाठविला. दोनही बुणगे एकत्र होऊन पहाटेच्या वेळीं सामानसुमान लादण्याचे गडबडींत लोक होते. इतक्यांत मोठी तोफ उडाल्या प्रमाणें जंगी आवाज झाला व सर्व दारूचे पेटारे पेटले. बाणाच्या गाड्या तेथें होत्या त्यांस मात्र सुदैवानें बत्ती जाऊन पोंचली नाहीं. कारण बाणांस बत्ती पोहचती म्हणजे लष्कर त्याच दिवशीं बुडालें असतें. हा दारूचा भडका आपोआप झाला किंवा कोणी फितुरी मनुष्यानें मुद्दाम केला तें कळण्यास मार्ग नाहीं. परंतु आपल्याच पलटणीच्या लोकांनीं तोफा मराठी लष्करावर फिरविल्या असाव्या असा बुणग्यांचा समज झाला; व लोक वाट फुटेल तिकडे पळूं लागले. "वस्तभाव लादालाद ज्यांची झाली होती ते घेऊन निघाले. ज्यांची राहिली त्यांनी कार्याकारण घेऊन बरकड तसेंच टाकून पळाले. फारकरून बाजारकऱ्यांचा दाणादुणा, कापड, कोणाची राहुटी, कोणाची पालें, खाशा पाटिलबावांच्या स्वयपाकांचीं भांडीं, फरासखान्यांतील ओझीं, वगैरे तळावर तशींच राहून लोक जीव घेऊन पळतात तशासारखे पळूं लागले." या वर्णनांत 'जीव घेऊन पळतात तशासारखे पळूं लागले' हे शब्द लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. कारण जीव घेऊन पळत सुटण्यासारखा कोणताच प्रसंग यावेळीं या लोकांवर ओढवला नव्हता. शत्रूचे लोक अंगावर आले नसून फक्त दारूचे संदुखास आग लागून त्यांचा भडका

झाला होता. अशा वेळीं भांडीकुंडीं व सामानसुमान टाकून पळण्याचें प्रयोजन नव्हतें. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें मराठी फौजेची 'हुशारी' या वेळीं 'मंदावली' होती. यामुळें लहानसहान गोष्टींनीं देखील बाजारबुणग्याची धांदल उडून गेल्यास नवल नाहीं.

अशा रीतीनें विनालढाई एकच गर्दी चहूंकडून विलगतऱ्हेची होऊन बुणगे तेथून निघाले. सोद्यांनीं व पेंढाऱ्यांनीं लष्करच्या बाजाराची लुटालूट केली. पाटिल-बावांच्या आश्रयास राहिलेली अफरासियाबखानाची बायकापोरें या लष्करांत होतीं; त्यांची हि लूट या लोकांनीं केली. इतक्यांत ५।६ घटकांनीं पाटिलबावा तळावर आले. आणि पाहतात तों आपल्या लष्कराची धांदल उडालेली दिसली. तेव्हां तेथें उभे राहून खाशा मुदबकाची भांडीं, फरासखान्याची, ओझीं उंटावरह घालून रवाना केलीं; आणि आपल्या लोकांस सांगितलें कीं "तळावरील तुमचे उपयोगी असेल तें घ्या वरकड जमा करून फुंकून द्या." अफरासियाबखानाची बायको व पोर यांची दुर्दुर्दशा पाहून त्यांचीं ओझीं पाटीलबावांनीं हत्तीवर लादून मार्गस्त केली; आणि आपण चार घटका तळावर बसून सामान जमवून त्यास आग दिली. ते दिवशीं पिंपळाईस येऊन तिसरा प्रहरीं मुक्काम झाला. त्या दिवशीं बुणग्यात बारा कोसांची व सड्या स्वारीचे लोकांस सोळा सत्रा कोसांची मजल मारावी लागली. संध्याकाळच्या सुमारास पाटीलबावा बुणग्यांत आले. यानंतर चार सहा घटका रात्रीस भाई वगैरे फौजा तोफखाना संभाळून घेऊन गोटांत आले.

भाई पाटिलबावांच्या मागून आला याचें कारण थोडेसें चमत्कारिक आहे. दोघेही सैन्यासुद्धां येत असतां दयाराम पुरभयाची दोन पलटणें मध्येंच अडून उभीं राहिलीं. त्यांच्या जवळ दहापंध्रा तोफा असून 'आमची तलब द्या, नाहींतर आम्हीं येत नाहीं" असा त्यानीं हट्ट धरला. पाटिलबावांनीं समजूत पाडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. तेव्हां भाई पाटीलबावांना म्हणाला "याशीं बोलून पाहतों; आले तर उत्तम, नाहींतर हीं दोन्ही पलटणें कापून काढून तोफा आपल्या घेऊन येतों. आपण पुढें जावें. भाई तेथें उभे राहून पलटणाशीं सख्त रीतीनें बोलून तोफा पलटणें लष्करांत घेऊन आले. दुसरे दिवशीं पूर्वीप्रमाणेंच बुणगे पुढें घालून आपण पाठीमागें राहून आठ कोसांवर मुक्काम केला. याप्रमाणें व्यवस्थेनें हटत सैन्य डीग येथें येऊन पोंचलें. रांगड्यांची फौज मराठ्यांचा पाठलाग करीत पिंपळाई पावेतों आली होती. तेथून परत गेली.

हा सर्व घोंटाळा होण्याची कारणें तोफखाना व पलटणें मराठ्यांच्या ताब्यांत ठेवलीं नाहींत व नौबतराव नांवाच्या रांगड्यावर आपण फाजील विश्वास ठेवला, हीं आहेत असें पाटिलबावांच्या लक्षांत आलें. इतका फितूर आठ दहा दिवसांत झाला नसून दोन चार महिने तरी हें फितुरीचें काम चाललें असलें पाहिजे हें सर्वानुमतें ठरलें. रात्रंदिवस नौबतराय तेथें असतां त्याला न समजतां हा प्रकार झाला

किंवा त्यांत हा सामील आहे याचा संशय आपल्या मनास आला इतकें पाटील-बावांनीं बोलून दाखविलें. इतर सरदारांना तर नौबतराय दगाबाज आहे अशी खात्रीच वाटत होती. तथापि त्यास एकदम कैद न करतां त्यांजवर बाहेरून स्वारांची चौकी बसविली व चौकशीस सुरुवात झाली.

नौबतरायावर व रांगड्यांवर विश्वास ठेवून मराठ्यांची संख्या सैन्यांत फार कमी होऊं लागली हें पाहून पाटिलबावांना त्यांच्या सरदारांनी व पुण्याहून मुद्दाम मनुष्य पाठवून नानांनी देखील इषारा दिला होता. परंतु त्यांनी त्यावेळीं या इषाऱ्याकडे दुर्लक्ष केलें. 'येविशीचा बंदोबस्त आहे. काळजी न करावी' असें मोघम अश्वासन दिलें. शेवटीं लालसोटच्या या लढाईत अनुभव आल्यापासून, 'हिंदुस्थानियाचे विश्वासावर गेलों, त्याचें फळ पावलों " असें पाटिलबावा वारंवार म्हणूं लागले. हिंदुस्थानी माणूस आर्जवी फार; तऱ्हेतऱ्हेनें आर्जवून कामकाज करून दाखऊन मेळवून घ्यावें. ' समयास बनेल तशी वर्तणूक करावी अशी चाल आहे, ' ही गोष्ट पाटिलबावास मान्य झाली.

लालसोटच्या लढाईचें वर्तमान ताबडतोब चोहींकडे पसरलें. दिल्लीच्या आसपास मराठ्यांचा दरारा एकदम नाहीसा झाला. दिल्लीपर्यंत अंमल बसवांत जातांना पाटील बावानीं एक मोठी चूक केली होती ती अशी कीं अधिकाराच्या जागेवर आपल्या जिव्हाळ्याचे मराठे लोक ठेवण्या ऐवजी त्यानीं मुसलमानी व रांगडे लोकांवर फाजील विश्वास ठेवला होता. या धोरणाच्या समर्थनार्थ ते दोन मुद्दे पुढें करीत असत. पहिला हा कीं सदाशिवरावभाऊंनी ज्याप्रमाणें दिल्ली जिंकून मराठ्यांचा अंमल प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला तसा प्रकार आपला नसून बादशहांनीं वजीरीचें काम आपणाकडे सोंपविलें आहे; अर्थात मुसलमानी दरबारांत आपणास वजीरी मिळाली आहे एवढें लक्षांत ठेऊन इतर मुसलमान सरदारांना होतां होई तोंवर न दुखविणें शहाणपणाचें आहे; दुसरा मुद्दा असा कीं तेथील रांगडे व हिंदुस्थानी लोकांची वस्ती फार मोठी व त्यांचा स्वभाव दंगेखोर. यामुळें त्यांना सैन्यांत नोकरीवर न ठेवल्यास ते अनेक दंगेधोपे व उपद्व्याप केल्यावांचून राहणार नाहींत. हे दोन मुद्दे खरे होते. आणि ध्येयाच्या दृष्टीनें ते रास्त होतें. परंतु त्यांची अंमलबजावणी कालांतरानें व्हावयास पाहिजे होती. तत्काल त्याप्रमाणें वागणूक करणें बरोबर नव्हतें. शिंद्यांच्या घराण्यासंबंधीं विशेषतः रजपत व मुसलमान यांच्या मनांत पिढिजाद वैमनस्य होतें. दत्ताजी, जनकोजी, जयाप्पा वगैरे शिंदे घराण्यांतील पुरुषांनी १७५० पासून जें धोरण स्वीकारलें होतें त्याची पूर्तता पाटीलबावांनीं करून दाखविली. अर्थात् ३५ वर्षांनी आपला हेतू सफल झाला तेव्हां आपण उदारपणें वागण्यास हरकत नाहीं असें म्हणण्यास शिंद्यांना हरकत नव्हती. पण पराभूत मुसलमान व रजपूत सरदारांना व राजांना हा पराजय मान्य होणें शक्य नव्हतें. ' याचा सूड उगवलाच पाहिजे असें त्यांना

अगदीं स्वाभाविक होतें. पूर्ण पराभव झाल्यावेळीं च सूड घेण्याची बुद्धि जास्तींत जास्त प्रज्वलित होतें हें पाटिलबावांच्या लक्षांत आलें नाहीं. पण त्यांचा किंबहुना त्यांच्या घराण्याचा स्वभाव च असा दिलदार होता कीं अपमान होत असेल तर प्राण देण्यास देखील मागें पुढें पहावयाचें नाहीं पण पराभूत शत्रूशीं नेहमीं उदारपणें वागावयाचें. पाटिलबावांचा स्वभाव विकारवश होता. यामुळें गोड कल्पना दिसली कीं ती अमलांत आणण्यापूर्वीं तिची व्यवहार्यता पहाण्यांत ते फारसें लक्ष घालीत नसत.

याशिवाय पाटीलबावांचें बस्तान दिल्लीस बसूं देणें मुसलमान व रजपूत सरदारांच्या हितास प्रत्यक्ष विघातक होतें. दिल्लीस नामधारी बादशहा होता तोंपर्यंत नामधारी खंडणी भरून स्वातंत्र्य उपभोगण्यास यांना सांपडत होतें पण पाटिलबावा आल्यापासून त्यांनीं सारीकडे हिशेबाचा तगादा लाऊन खंडणी पाठविण्याबद्दल निकड लावली; आणि ती न मानावी तर पाटीलबावांचें सैन्य आपल्यापासून जबरदस्तीनें खंडणी वसूल करील असें दिसूं लागलें. यामुळें मुसलमान व रजपूत यांना एकदिलानें मराठ्यांचा अंमल दिल्लींतून उठविणें भाग होतें. एकंदरींत मराठ्यांचा अंमल कायम होण्यास फार मोठ्या अडचणी होत्या. त्या लक्षांत बाळगून पाटिलबावांनीं वागणूक ठेवलेली दिसत नाहीं.

उलटपक्षीं आणखी एका अडचणीची आपणास कल्पना करतां येण्याजोगी आहे. महाराष्ट्रांत त्यावेळीं स्वराज्य असून शहाण्या व कर्त्या लोकांना तेथें पूर्णपणें वाव मिळण्याजोगा होता; कारण मराठी राज्यावर चोहीकडून इतकीं संकटें येत होतीं कीं पहिल्या प्रतीचीं बुद्धिवान् व कर्तीं माणसें स्वराज्यांतच पाहिजे होतीं. त्यांना दुसरीकडे न्यावयाचें तर त्यांना मोह पडण्याजोगा पगार तरी द्यावयास पाहिजे किंवा मान मरातब तरी पाहिजे. परंतु पाटिलबावांचा पलटणीकडे बराच खर्च होत होता. यामुळें इतर कामास त्यांजवळ फारसा पैसा रहात नसे; आणि त्यांचा साधारण कल दक्षिणीलोकांचें महत्व वाढूं नये या गोष्टीकडे आहे असा समज असल्यामुळें मानाचीही लालूच लोकांस वाटत नव्हती. यामुळें पहिल्या प्रतीचे लोक महाराष्ट्र सोडून दूरवर दिल्ली प्रांतीं जाऊन राहण्यास उत्सुक नसत. दहाबारा लष्करी सरदारांचीं नांवें वगळलीं असतां पाटिलबावांबरोबर जे लोक गेले होते त्यांत धोरणी, अगर लोकांची अंतःकरणें आपल्याकडे ओढून घेणारा किंवा वसुली पद्धतींत विशेष मुरलेला असा मनुष्य कोणी आढळत नाहीं.

पाटीलबावा डिगेस आले; त्यानंतर दिल्लीकडे बादशहाच्या भेटीस जाण्याचा त्यांचा बेत होता, परंतु लालसोटच्या पराभवामुळें मराठ्यांचा दरारा एकदम नाहींसा झाला. चोहींकडे लोक मराठ्यांच्या विरुद्ध उठूं लागले. खुद्द दिल्ली शहरांत लाडोजी देशमुखाच्या हाताखालीं दोन पलटणें बादशाच्या संरक्षणार्थ पाटीलबावांनी ठेविलीं होतीं

त्या पलटणांतील लोकांनी 'सहा महिन्याचा पगार तुंबला आहे तो देऊन टाका'. अशा सबबीवर एकदम दंगा केला. लाडोजी देशमुखास जीव वांचाविण्यासाठीं हवेली दरवाजे लाऊन राहाणें भाग पडलें. शेवटीं त्या पलटणींतील लोकांना अंतर्वेदींत गणपतराव रुग्ग याच्या तैनातीस जाण्याविषयी सांगितलें. ते गेल्यावर बादशहाचा कारभारी शहानिजामुद्दी यानें दोन हजार लोक ठेऊन शहराचा बंदोबस्त केला.

ही गोष्ट प्रथम किरकोळशी भासली. परंतु तिचे परिणाम फार दूरवर झाले. दिल्लीशहर व त्याजबरोबरच बादशाहा एव्हांपासून लाडोजी देशमुखाच्या म्हणजे मराठ्यांच्या ताब्यांतून जाऊन विरुद्धपक्षाच्या लोकांस दिल्लींत प्रवेश करण्यास सोपें झालें; कारण लाडोजी तर सैन्याच्या अभावीं पंगु बनला होता आणि पाटिलबावांचा पक्षपाती शहानिजामुद्दी याच्या अंगांत कर्तबगारी मुळींच नव्हती. लौकरच गुलामकादरानें अंतर्वेदींतील मराठ्यांचा अंमल उठवून व मेरठ ताब्यांत घेऊन दिल्लीकडे चाल केली. तेव्हां ही बातमी ऐकतां च लाडोजी व निजामुद्दी दोघेहि बादशहास न विचारतां रात्रीं दिल्लीहून पळून गेले. इकडे दिल्लीच्या सोयांनीं लाडोजीच्या घरचीं वस्तभाव लुटून नेली आणि निजामुद्दीच्या घरावर बादशहानें जप्ती बसविली. गुलाम कादरानें सैन्यासुद्धा यमुना उतरून व दिल्लीस येऊन मीरबक्षीगिरीचीं वस्त्रें आपणास मिळावीं 'असा बादशहाजवळ आग्रह चालविला. गुलाम कादराचे 'नेत्र आरक्त, बेबदल पाहून' बादशहा घाबरला व त्यानें मीरबक्षीगिरी त्याजकडे देण्याचें कबूल केलें. गुलाम या पदास लायख नाहीं असें दरबारांतील कांहीं लोक म्हणूं लागले. तेव्हां "दिल्लीहून बलाय कशी तरी काढून द्यावी इतकाच मात्र विचार आहे. नाहींतर रोहिल्यानें शहरावर हात घातला, तर येथें संभाळणार कोण आहे ? याजकरितां यास येथून काढून द्यावें. याचा संतोष राखावा हें च सलाह आहे" असें म्हणून बादशहानें वस्त्रें देऊन गुलामास, विदा केलें. गुलाम यमुनेच्या पलीकडे शहादरियापाशीं गेला. इतक्यांत बादशहाची धाकटी बहीण खैरुन्निसा हिनें गुलामाकडे असा निरोप पाठविला कीं "मजपासून बारा लक्ष रुपयें ध्यावे. आणि माझे भाऊ आणीक पांचजण आहेत त्यांतून एकास पातशहा करावें." देवडी-वरील दोन प्यादे होते त्यांच्या मार्फत हा जाबसाल चालला होता. त्यांतून एक प्यादा फुटून गुलाम कादरखान याची चिठी आली होती तीच त्यानें बादशहापाशीं दिली. त्यामुळें सर्व कट उघडकीस आला. आणि बादशहा व गुलाम एकमेकाशीं लढण्यासाठीं सैन्याची तयारी करूं लागले. रोहिल्याजवळ स्वारप्यादा मिळून दहा हजार फौज होती व बाद-शहाकडे हि तेवढी जमली होती. रोहिला यमुनेअलीकडे येईल तर त्याच्याशीं लढावें आणि न येईल तर पंचवीस तीस हजार फौज जमवून नंतर यमुना उतरून गुलामाशीं लढाई द्यावी असा बादशहानें बेत केला. ही हकीकत बादशहानें पाटीबावास लिहून

'तुम्हींच दिल्लीस या नाहींतर सैन्य तरी पाठवा ' असें कळविलें. परंतु यांतून एक हि प्रकार पाटीलबावांस करतां आला नाहीं. कारण डिगेस येतांच त्यांनीं आपला सर्व कबीला व माणसें ग्वाल्हेरीस पाठविलीं. हें पाहून सर्व हिंदुस्थानी सैन्य त्यांना सोडून गेलें. स्वतः पाटिलबावा अलवार येथें गेले. तेथील रावराजानें एक लक्ष रुपये खर्चास व रहावयास किल्ला दिला. तेव्हां पाटिलबावा व अंबाजी इंगळे तेथें राहिले. या वेळीं बादशहाच्या मदतीस सैन्य पाठविण्याजोगी त्यांची स्थिति नव्हती; हें पाहून बादशहानें नजबनकुलीखान, इस्माइलबेग, अनुपगीर गोसावी व इंग्रज यांकडे मदत मागितली; आणि दिल्ली येथील मराठ्यांच्या वकीलामार्फत पुण्याकडे नवीन फौजेची मागणी केली.

यानंतर एक महिन्यानें पाटिलबावांनी रेवडीपाटोदीहून अंबाजी इंगळ्यामार्फत बादशहास कळविलें कीं, " गुलाम कादरखान यांनीं बेदाई केली म्हणोन यांचे पारपत्यास आम्ही आला आहात. त्यास जैसी मर्जी असेल तैसी वर्तणूक करूं. " बादशहांनी असें उत्तर दिलें कीं " जुवाबख्त पातशहाजादा व अनुपगीर गोसावी व इस्माइलबेग व मलक महमदखा व राजे जयपूरकर वगैरे दिल्लीचे मोंगलिये ऐसे एक विचारे झाले आहेत. त्याचें मानस कीं तुम्ही दिल्लीस न यावें हे तुम्हांसी सर्व दिक आहेत व फिरले आहेत. जर तुम्ही जबरदस्तीनें याल, तर तुम्हापासी फौज थोडी व हे झुंजावयास सिद्ध आहेत. याजकरिता चार दिवस तुम्ही रेवडी पातोडीचे मैदानांत असावें. व पातशाहाजादा वृंदावनास मथुरेस आहे. त्यास म्यां बोलाविलें आहे. तो मजपासीं दाखल जालियावर मग तुम्हांस लिहून पाठवूं. त्या अन्वयें करावें."

या ठिकाणीं दिल्ली दरबारांतील कारभारी मंडळीची थोडीशी माहिती देणें अवश्यक आहे. बादशहानें कळविल्याप्रमाणें दरबारांत दोन तट झाले होते. पैकीं पाटिलबावास अनुकूल पक्ष म्हणजे फक्त स्वतः बादशहाचा; आणि इतर सर्व मुत्सद्दी पाटिलबावांच्या विरुद्ध होते. मागें अंबाजी इंगळ्यामार्फत बादशहाशीं जे बोलणें झालें ते वस्तुतः बादशहाशीं नसून नाझर मंजूर अलीखान नांवाच्या कारभाऱ्याशीं चाललें होतें आणि तें हि स्वतः इंगळे करीत नसून शामराव आपाजी नांवाच्या इसमानें चालविलें होतें. शामरावानें आणभाक, वचनेप्रमाण, बेलभंडार देऊन नाजरजीची खातरजमा करण्याचा प्रयत्न केला. परंतु नाजर म्हणाला "राजश्री पाटीलबावा दगाबाज आहेत. राघोगडकर राजास व गोहदकरास व फरोकाबादवाले खानसामा व मुजादिखान व सुजातखान वगैरे लोकाशी आणभास कौलकरार करून बेलभंडार देऊन, दंगा करून, कैद करून मारून टाकलें. याजकरिता आम्हांस भरंवसा पुरवत नाहीं. " या उत्तरामुळें शामरावाचा उपाय चालला नाहीं. तथापि 'सलतनतीचें काम आटोपील ऐसा राजश्री पाटिलबावांचून दुसरा माणूस नाहीं'

असा बादशाहाचा अभिप्राय असल्यामुळें त्यानें मागें सांगितलेला निरोप पाटिलबा कडे पाठविला होता. या शिवाय पातशहाजादा जुवाबख्त याचीहि गडबड चालली होती. त्यानें इंग्रजांकडे मदत मागितली. तो दिल्लीस येणार होता तेव्हां त्याचा सल्ला न घेता पाटिलबावास दिल्लीस बोलवावें तर जुवाबख्त कदाचित नाखुष होईल व अनुपगीर गोसावी इस्माइलबेग व जैपूरकर वगैरे विरुद्धपक्षाचे लोक जुवाबक्षावरच छत्र धरून आग्र्यांत त्यास बादशाहा करतील आणि मग त्यांच्याशीं झुंजणें प्राप्त होईल. तेव्हां 'एक गुलाम कादरखान पाचसात हजार फौजेचा सरदार आहे तो मतीं बिघडून किल्ल्यांत गोळे टाकिता. त्याचें परिपत्य आमच्यानें होत नाहीं! तेव्हां २०।२५ हजार स्वार प्यादा समागमें आणि पातशाहजादा धणी 'तेव्हां असें होईल त्यासी कोणी झुंझावें!' अशी अडचण बादशहास पडली होती.

हा शहाजादा जवानबख्त बरेच दिवस औधच्या वजीराच्या आश्रयास होता. याच्यां मनांतून दिल्लींतून मराठ्यांचा अंमल पार नाहींसा करावा असें होतें. त्यानें इंग्रजांची मदत याकामीं मागितली. परंतु ती त्यांनीं तेव्हां दिली नाहीं. यामुळें दिल्लीस गेला. परंतु पितापुत्रांचें जमलें नाहीं, तेव्हां पुनः लखनौस वजीराकडे गेला। तेव्हां त्यानें विचारलें 'जाण्यांचें प्रयोजन काय होतें। गेल्यास यावयाची जरूरी काय आहे. आमचे वस्तु खर्चवेंच चालवत नाहीं.' नंतर हा शाहाजादा काशीस इंग्रजाच्या आश्रयास राहिला तेथें लॉर्ड कार्नवालीसनें त्याची एकवेळ भेट घेतली. औपचारिक मानसन्मान काय करावयाचा तो केला. परंतु मराठ्यांच्या विरुद्ध दिल्ली प्रकरणांत मदत पाहिजे असें बोलणें शहाजाद्यानें काढतांच 'आमच्या हातून हें व्हावयाचें नाहीं' असें साफ उत्तर दिलें. शेवटीं हा शहाजादा १ जून १७८८ रोजीं पोटांत कांहीं विकार होऊन काशीस अकस्मात मरण पावलां.

या वेळच्या परिस्थितीचें वर्णन गोविंदराव पुरुषोत्तम ( पेशव्यांचा दिल्लीदरबारांतील वकील ) यानें असें केलें आहे:--

पातशहाची मर्जी कीं पोटास मात्र लक्ष दीडलक्ष रुपये दरमहा देत जावा. वरकड राजकारभारांशीं व दौलतीसीं यांस गरज नाहीं ऐसी यांची प्रकृती आहे. यांचे पुत्र वगैरे शहाजादे मिळून शेंदीडशें आसामी आहे. परंतु त्यांतही कोणी जुरतवाला व दैववान दिसत नाहीं कीं पातशाहीस आळा घालून दौलत आटोपील. श्रीमंत राजेश्री रावसाहेब प्रारब्धवान् प्रतापवंत आहेत. यांचें दैवेकडून पातशहाचें घरची मुखत्यारी पदरीं पडली आहे. यांजकरितां दाहा हजार फौज सडी चांगली व सरदार मातबर व कारभारी राजश्रि त्रिंबकराव मामा व विसाजीपंत बिनीवाले यांचे प्रतीचा शहाणा माणूस इकडे रवाना जालियास, जितके हिंदुस्थानी लहान थोर आहेत त्यांस पोटासी धरून, कांहीं दिवस त्यांचें पालिमर्दण करून, दौलत हाताखाले घालून, जैसे साता-

त्याचें संस्थान आपले स्वाधीन आहे, तैसें दिल्लीचें संस्थान आपले स्वाधीन राहे ऐसा समय आहे. या दौलतीस दोन रोग आहेत. एक अबदाली व एक इंग्रज. त्यास अबदाली तर दूर, व त्यास त्या प्रांतीं पायबंदी भारी. त्याचे येणें इकडे होत नाहीं. बाकी इंग्रज समीप आहेत; व ते शहाणे, बुद्धिवान् आहेत. परंतु तूर्त दिल्लीचे कामांत मुखत्यारीचा हात घालावा ऐसी वडे साहेबाची मर्जी नाहीं. ... इंग्रेजांचा पाय दिल्लींत शिरला म्हणजे मग आपले हातचें हिंदुस्थान गेलें. जों पावेतों त्यांचा पाय दिल्लींत शिरला नाहीं तों पावेतों ...... मर्जीस येईल त्याप्रमाणें बंदोबस्त करावा. जर हें संस्थान आपल्या काबूत व हातांत असलें तर बंगाला आदिकरून इंग्रेजांचे दौलतीवर देखील मालकियत व खाविंदी राहील. त्यास इकडे मुलूक बहुत. परंतु तीन वर्षें काळ पडला; पांच सा सेर अन्न विकलें. याजकरितां तमाम दुनियेचे लोक रयत मृत्यु पावले. उजाडी जाली आहे. कांहीं दिवस सुरळीत बंदोबस्त जालियावर करोडो रुपये आमदानी आहे. पैक्यास कमी नाहीं. तूर्त फौजहि पाहिजे व कांहीं थोडाबहुत पैका हि पाहिजे. तेव्हां जो येथें राहील त्याची अब्रू राहून, बंदोबस्त होऊन, पातशहात श्रीमंताचे घरांत राहील. ऐसा समय पुढें येणार नाहीं."

"जितके हिंदुस्थानी मोंगलिये व राजे जैपूरकर व जोतपूरकर या सर्वांचें मानस कीं राजश्री पाटीलबावास अवघे एकच होऊन चमलेपार करून द्यावें व निदान बनल्यास व मऊ लागल्यास ग्वालेर प्रांत देखील खाली करून घ्यावा ऐसी सर्वांची मसलत आहे. व राजश्री पाटीलबावा यांचे मानस कीं सर्वस्वी वेंचावें, परंतु जैपुरकरांचें व जोतपुरकरांचें पारिपत्य करावें व पातशाहाचे घरची मुखत्यारी करावी ऐसें यांचें मानस. समागमे फौज राजश्री शिवाजी विठ्ठल आदिकरून पागनीस व अंबाजी इंगळे व पागे व शिलेदार वगैरे मुत्सद्दी हे सर्व नामाफकत. कोणाची हि चित्तशुद्धता नाहीं. सर्व दाबाखाले व मर्जीनुरूप आचरण करून आहेत. याचें कारण हें च कीं खुद्द पसंतीनें आजपावेतों जो कारभार करणें तो केला. व पुढें हि खुद्दपसंतीनें करतात. कोणाची सल्लामसलत पसंत पडत नाहीं. म्हणोन मंडळी मनोमन खिन्न आहेत."

पाटिलबावानीं दिल्लीस येऊं नये असें पातशहांनीं कळविल्याचें मागें सांगितलें आहे. त्याप्रमाणें ते न आल्यामुळें बादशहास कोणाचाहि तरी हात धरणें प्राप्त च होतें. याप्रमाणें त्यानें कांहीं दिवस जैपूरचा राजा प्रतापसिंग व जोधपूरचा विजेसींग यांच्या संमतीनें चालण्याचा निश्चय केला. हे रजपूत राजे यवेळीं मोठ्या पेचांत आले होते. त्यांना धड हिंदुत्वाचा हि अभिमान नव्हता आणि धड मुसलमानी धर्म हि पसंत नव्हता. दिल्ली दरबारांत आपलें वजन राहावें ही या दोघांची इच्छा. परंतु पाटिलबावांपुढें त्यांचे तेज पडेना. तेव्हां त्यांनी यास तीन उपाय योजले. इंग्रजांकडे,

काबूलकडे आणि पुणें दरबाराकडे वकीलमार्फत त्यांनी पाटीलबावांची नालस्ती करण्याचें काम चालू केलें. जैपूरकरांचा वकील नंदराम हळदिया व जोधपूरचा वकील बुधसिंग काईत हे या कामांत प्रामुख्यानें वावरत. इंग्रजाकडीलही रजपुताची मसलत घ्याणून पाडण्यासाठीं पाटिलबावांनी सदाशिव मल्हार यांस पाठविलें; आणि आपल्या मदतीस सैन्य पाठवावें अशी त्यांनी मागणी केली. तेव्हां शेवटीं इंग्रजांनी उत्तर दिलें कीं " कोणी एक मसलत करावयास सांप्रत आमचें सामर्थ्य राहिलें नाहीं. यास्तव आम्ही उभयतांकडेहि बोलत नाहीं."

तैमूरशहा अबदार्ली यांजकडे पाठविलेल्या वकीलातीचा परिणाम देखील जवळ जवळ असाच झाला. हिंदुस्थानच्या बादशाहींत कांहीं जोर राहिला नाहीं. मराठ्यांचा अंमल दिल्लीकडे बसत चालला, याकरितां तुम्ही हिंदुस्थानास यावें. निदान आपल्या शाहाजाद्यास तरी पाठवावें. म्हणजे आम्ही दक्षिणियांस नर्मदापार करून देतों असें रजपुतांच्या वकिलाचें म्हणणें होतें. परंतु 'आमच्या मुलखांत बंडेबखेडे आहेत. यामुळें इकडे मुलूख रिकामा टाकून तिकडे आम्हांस येणें होत नाहीं.' असें तैमूरशाहानें उत्तर दिलें.

पुणे दरबाराशीं चाललेल्या वाटाघाटीपासून कांहीं निष्पन्न होणार नाहीं हें उघड दिसत होतें तरी लांबलचक पत्रें पाठवून व कांहींसा धाक दाखवून पुणे दरबारानें पाटीलबावांना परत बोलवावें या हेतूनें जैपूर व जोधपूरकांची खटपट सुरु होती. हा विषय महत्वाचा असल्यामुळें जोधपूरच्या राजानें पुण्याकडे पाठविलेल्या पत्राचा सारांश येथें देतों. ( ऐति. टिपणें. भाग ६ पृ. २५ )

" ही गोष्ट आपणास जाहीर असेल कीं हिंदुस्थानांतील तमाम हिंदु सरदार चित्तापासून श्रीमंतांचा दाब इच्छितात. त्याजकडोन जो कोणी इकडील बंदोबस्तास येतो सर्व प्रकारें सर्व काल त्याचे रजामंदींत ( आज्ञेंत ) सादर राहतात. कारण कीं इकडील सरदार श्रीमंतांचा असल्यानें हिंदुधर्माचा चिराग ( दिवा ) रोषण राहील ( प्रकाश पाडील ). जे समयीं तिकडोन पाटील हिंदुस्थानांत मामूर जाले, त्याच्या मदत व कुमकेविशीं कोणा एकाकडून कसूर जाला नाहीं. लेकिन पाटलानीं दाक्षिणच्या सरदाराची वाट सोडोन बहुतांची खानखराबी करून, शेवटीं जयनगरच्या दरपे जाले व आपलें काम आपल्या हातें खराब केलें. हल्लीं इंग्रजासी साजीश करून कुमकेस आणावें या इरार्यांत आहेत. त्यास हिंदुस्थानांतील सरदारास या गोष्टीचा अंदेशा नाहीं. तमाम उमदे सरदार मुत्तफिक व एकादिल जाले आहेत. हें आपणासही जड पडेल. सबब पाटलास चार गोष्टी चांगल्या त्याहाव्या. ही आग भडकली तर चिनगन्या ( ठिणग्या ) दक्षणेपावेतों जातील. अखेरीस याचें विझणें आपणासहि कठीण पडेल. श्रीमंतासी व आम्हासी दोस्ती कदीपासून. श्रीमंत व आपण हिंदुधर्माचे संरक्षक, सबब हा इषारा करण्यांत आला."

या पत्रांत पाटीलबावांचा दोष दाखवून मराठ्यांशीं दोस्ती ठेवण्याची इच्छा दाखविली आहे; तरी ही आग भडकली तर 'चिनगन्या' दक्षणे पावेतों जातील अशी दहशत दाखविण्याचा जोधपूरकरांचा इरादा दिसतो. या पत्राचें उत्तर नाना फडणीसानीं पाठविलें आहे तें फार बहारीचें आहे. त्यांत प्रथम पाटीलबावांचा दिल्लीस अंमल सुरू झाल्यापासून हिंदुस्थानांतील हिंदुधर्माची आबताब ( वजन ) पाहिजे तशी राहिली, सर्वत्र दंगाधोपा मोडला व लोकांचें जीवित व अब्रू यांस सुरक्षितपणा आणला; शेवटीं जैपूरकरांनीं कुरापत काढल्यामुळें त्यांच्यावर स्वारी करणें पाटील-बावांना भाग पडलें वगैरे मजकूर असून पुण्याकडे गोडीगुलाबीच्या गोष्टी लिहून पाठवून जोधपूरकरांनीं अजमीर बळकावली या गोष्टीची आठवण दिली आहे. आगी-च्या चिनगन्या दक्षिणे पावेतों पोंचण्याची जी दहशत जोधपूरकरानें घातली होती तिच्या संबंधानें नाना लिहितात—

"ज्या आजियुबान पर्वतावर अफजाल इलाहीच्या मेघाची वृष्टि सर्वकाल सदोदित अशी कीं ज्या उदकापासून कित्येक दर्या होऊन आलमांत मुहीत जाले, या उमदा पर्वतास फितने, अंगेजीच्या चिनगारियानें काय व्हावयाचें हें आपणासहि समजत आहे; व हमेश दक्षणेकडोनच प्रताप समुद्राचे लोट व तरंग चहूंकडे, अकसर हिंदुस्थानांत असे पोंहोचत गेले कीं, शायद ( साक्षात ) फितन व फिसादाची आग कोठें राहिली नसावी. आइंदा नेक नियती व रास्तरवी म्हणजे दोस्तानबाजी व दुष्मन-गुदाजी सरकारचा स्वभाव आहे. त्याच्या बरकतीनें सर्व चीजा खुबीनें जहुरांत येतील. हिंदुस्थानांतील तमाम सरदारांचा आपल्यांत इत्यफाक अगर निफाक याची बारीकी सरकारांत पुर्तेपणीं समजली आहे. याचा अंदेशा सरकारांतही नाहीं."

यानंतर इंग्रजांशीं दोस्तीचा तह झाला असल्यामुळें त्याची मदत घेतली म्हणून पाटीलबावांनीं कांहीं गैर केलें नाहीं असें सांगून अखेर या उपर योग्य दिसेल तें आपण कराल असें म्हणून हें पत्र संपविलें आहे.

जैपूर व जोधपूर येथील राजे अलीकडे पाटिलबावाविरुद्ध पुणे दरबारापर्यंत तक्रार पोंचविण्याची व सरकारांतून दुसरा सरदार आला तर त्याची ताबेदारी करूं असें तिकडे कळविण्याची खबरदारी घेत होते. याचें कारण तुकोजी व अलीबहादर मोठ्या सैन्यानिशीं येत आहेत ही बातमी त्यांना कळली होती हें होय. नवीन येणारें व पाटिलबावांच्या हाताखालचें जुनें सैन्य एकत्र झालें म्हणजे त्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं हें या राजांना कळून चुकलें यामुळें ते आपला बचाव कसा करावा या विचारास लागले होते. याशिवाय दुसरें एक कारण अलीकडे घडून आलें होतें. पातशहाजवळ नाजर मंजूर अली । , रामरतन मोदी आणि सीतलदास नांवाचे तीन उलाढाली कारभारी होते. यांच्या अंगीं कर्तृत्व कांहींच नव्हतें; परंतु त्यांच्या मनांतून

दिल्लीस गुलाम कादराचा अंमल बसावा असें मनापासून होतें; याच्या उलट पुण्याहून एखादा नवीन कर्ता सरदार दिल्लीस यावा व तें न जमल्यास पाटीलबावा आले तरी चालतील; पण कांहीं हि झालें तरी गुलामकादर आपणाजवळ नको अशी बादशाहाची इच्छा होती. पण हा बादशहा म्हणजे, हिंगण्यांनीं एका पत्रांत म्हटल्या प्रमाणें, ' मेणाचें नाक ' होता. जो जबरदस्त असेल त्यानें त्याला कसें हि वागवावें अशी त्याची स्थिती होती. तथापि हें मेणाचें नाक देखील वागवून घेण्याइतकी कर्तबगारी नाजर व रामरतन यांच्या अंगीं नव्हती. गुलामकादराविषयीं बादशहाच्या मनांत अढी आहे असें पाहतांच जैपूर व जोधपूर येथील राजांनीं बादशाही कारभार पहावा असा या कारभाऱ्यांनीं घाट घातला. दोघांना हि थापा मारून त्यांनी त्यांस एका ठिकाणीं आणलें. बादशहास त्यांनीं असें भासविलें कीं " तुम्ही दिलीहून रेवाडीपर्यंत याल तर जैपुर व जोधपूरचे राजे तुम्हांस दोन चार लाख रुपये देण्यास व आपल्या सैन्यानीशीं तुम्हांस सामील होण्यास तयार आहेत. त्यांच्या साहायानें स्वतःचा पैसा खर्च न करतां आपणास मुलूखगिरी करून पैसा मिळविता येईल. " हें बादशहास खरें वाटून तो रेवाडीपर्यंत आला. इकडे त्या रजपूत राजांना नाजर व रामरतन यांनी सांगून पाठविलें कीं, 'पाटिलबावासीं तुम्हांसी विपट पडलें आहे. तेव्हां मागें पुढें दक्षणी फौजा येऊन तुमचें पारिपत्य च करतील याजकरिता पातशहास सामील करून त्यांजला समागमें घेऊन पुरतें दक्षण्यांचें पारिपत्य करावें.' हा विचार त्यांना हि पसंत पडला. प्रतापसिंग व बादशहा यांच्या भेटी रेवाडीस झाल्या. वस्त्रें देणें–घेण्याचा समारंभ मानसन्मान व मुजरा वगैरे सर्व यथास्थित झाले. पण दोन चार दिवसांत बादशहा खर्चास मागू लागला. तेव्हां वजीर पदवीवर आरूढ होऊं इच्छिणारे हे राजे जागे झाले. भीड धरण्याची ही वेळ नव्हे असें ओळखूण त्यांनीं स्पष्ट उत्तर दिले कीं "आम्हांस राजश्री पाटीलबावानीं खराब केलें आहे. त्यानीं आमचे घरीं कांहीं बाकी ठेविली नाहीं." या उत्तरानें पातशहाची निराशा झाली. तथापि त्यानें कारभाऱ्यांच्या आग्रहावरून प्रतापसिंगास पागोटें, दुशाला, गोषवारा वगैरे वस्त्रें देऊन त्याचा मान केला. तेव्हां लोकलज्जेस्तव प्रतापसिंहास हि उलट कांहीं आहेर करणें भाग होतें. त्यानें कापड व नख्त मिळून सरासरी पन्नास हजाराचें वित्त बादशहास दिलें; आणि त्याजकडून आलवारच्या किल्याची सनद करून घेतली. यानंतर दुसरे दिवशीं तो जयपुराकडे निघून गेला. तेथें बीजेसिंगानें आपली नात त्याला देऊ केली व हें लग्न फाल्गुन वद्य ५ स पुष्कर येथें झालें. यानंतर अलीबहादर व तुकोजी होळकर यांजकडे वकील पाठवून ' सलूक ' करण्याचा प्रयत्न करावा आणि तें न जमल्यास दोन्ही राज्यांत मिळून दोन लाख रजपूत आहेत इतके मरतील तेव्हां मराठ्यांचें पाऊल जेपुरांत पडेल अशी त्यांनीं प्रतिज्ञा केली. जोतपुरकरांचा सेनापती भीमसिंग यानें दिल्ली येथील पेशव्यांच्या वकीलाकडे जाऊन सांगितलें कीं " आम्ही पातशहास व यवनाचे राजास राजी नाहीं. यांची अधर्माची वर्तणूक. हे आमचे राजास माफकत

पडत नाहीं. याजकरितां श्रीमंत पांच रुपये अधिक उणे आम्हांपासून खंडणी घेतील तें आम्हांस पुरवेल. परंतु यवनाची सेवा पुरवत नाहीं. आम्हांस कोणी राज्यभ्रष्ट च करील आणि आमची जमीन हिराऊन घेईल, तर आम्हांस मरणें प्राप्त आहे." सारांश रजपूत या वेळीं नम्रपणाचीं भाषणें करूं लागले होते.

पादशाहास मात्र या संधीस मोठा पेच पडला होता. त्याचा ओढा मराठ्यांकडे होता. पण ज्यांच्या सहवासांत त्याला दिवस काढावे लागत होते ते कारभारी त्याच्या विरुद्ध होते. पाटीलबावांचा लालसोट येथें पराभव झाल्यापासून दिल्लीच्या आसपास तिघांनीं डोकें वर काढलें होतें. गुलामकादर रामगडाचा बंदोबस्त करून दिल्लीवर चालून येण्याच्या विचारांत होता; इस्माइल बेगानें पांच हजार स्वार जमवून आग्र्यास वेढा देण्याची तयारी चालविली होती; आणि नजबकुलीखान, पांच सहा हजार स्वार प्यादे जमवून बादशहा उतरला होता त्याच्या जवळचेच रेवाडी, पाटोदी वगैरे महाल दाबून बसला होता. त्याचें शासन करणें देखील बादशहाच्या हातून होईना. तेव्हां नवीन येणाऱ्या मराठी सैन्याकडे त्याचे डोळे लागले होते. तो पेशव्यांच्या वकीलास रोज एकदोन वेळा "तुकोजी होळकर व अलीबहादर कोठपर्यंत आले" म्हणून विचारीत असे! 'लौकरच हजर होतील' असे आश्वासन देऊन हा वकील वेळ मारून नेत असे. पण एके दिवशीं 'येथें पाटीलबावांचें सैन्य आहे, तें सर्व बंदोबस्त करील नव्या सैन्याचें एवढें महत्त्व तें काय?' असा वकीलानें उलट प्रश्न केला. तेव्हां बादशहा निराशेनें म्हणाला "बाबा, या फौजेनें कांहीं होणार नाहीं. नवी फौज येईल ते काय करील तें करो." सारांश पाटीलबावाच्या कर्तबगारीसंबंधानें बादशहाच्या मनांत फारच अविश्वास उत्पन्न झाला होता.

तथापि होळकर व अलीबहादर येईपर्यंत जबरदस्त भेटेल त्याच्या मताप्रमाणें नाचणें बादशहास प्राप्त होतें. जैपूरकराच्या नादीं लागून त्यानें दोन महिने घालविले. त्यानंतर नजबकुलीखान व राजे हिंमतबहादर, अनुपगीर गोसावी अशा दोन व्यक्ति बादशहास नाचविण्यास पुढे आल्या. पैकीं नजबकुलीखान बादशहाच्या भेटीस देखील न येतां रेवाडी, गोकुळगड वगैरे बादशहाच्या खास अमलांतलेच किल्ले दाबून बसला होता; यामुळें त्याची सल्ला बादशहास मानवण्याजोगी नव्हती. परंतु हिंमतबहादुराची गोष्ट तशी नव्हती. तो आंतून गुलामकादराशीं संधान बांधीत असला तरी वरून पाटीलबावा व अलीबहादर यांचा पक्षपाती असल्यामुळें बादशहाची त्याच्यावर मर्जी बसली होती. हा हिंमतबहादर मोठा उलाढाली स्वभावाचा असून पाटील बावांच्या चरित्राशीं त्याचा निकट संबंध येतो. यामुळें त्याचें नांव चांगलें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. उत्तर हिंदुस्थानांतील सर्व पसारा टाकून वैतागानें पाटीलबावास यानंतर तीन वर्षांनीं पुण्याकडे जाण्याची बुद्धी होण्यास जे पुरुष कारणीभूत झाले त्यांत हिंमतबहादराचें नांव प्रथम घालावें लागेल. तथापि आपणास ज्या वेळची हकीकत सध्या

सांगावयाची आहे त्या सुमारास म्हणजे १७८८ च्या मार्च महिन्यांत तो मराठ्यांचा पक्षपाती या नात्यानें बादशहाजवळ वावरत होता.

आतां बादशहास सोडून पाटीलबावा या वेळीं काय करीत होते तें पाहूं. लाल-सोट येथें पराभव झाल्यानंतर त्यांनीं आपला सर्व कबीला ग्वाल्हेरीस रवाना केला आणि ते दिल्लीस जाण्याच्या विचारांत होते. परंतु बादशहानें अनेक सबबी सांगून इतक्यांत इकडे येऊं नका असें सांगून पाठविल्यामुळें त्यांनीं दिल्लीचा नाद सोडला. त्यांचे बरेंच सैन्य आग्र्यास होतें व त्याच्या आसपास इस्माइल बेग यानें आपलें सैन्य जमवून किल्ला वेढण्याचा विचार चालविला होता. यामुळें पाटिलबावा आग्र्याकडे वळले. परंतु इस्माइल बेगाजवळ सैन्य मोठें व त्याच्या मदतीस जैपूरकर येणार अशी बातमी आली. यामुळें २१ डिसेंबर १७८७ रोजीं लढाईचा विचार सोडून पाटिलबावा ग्वाल्हेरीजवळ कुवारी नदीच्या तीरावर जाऊन राहिले. या पिछेहाटीमुळें शत्रूस फार अवसान आलें. चमेलीच्या उत्तरेकडील बहुतेक किल्ले मराठ्यांच्या हातून गेले. अजमीर विजेसिंगानें घेतला. डीग येथें पाटील-बावांच्या संमतीनें रंजितसिंग जाटाचें ठाणें पडलें. गोकुळगड नजफकुलीखानानें घेतला. व फेरोजाबाद अनुपगीर गोसाव्यानें बळकावला. फक्त रामगड व आग्रा हे दोन किल्ले मराठ्यांच्या ताब्यांत राहिले. पैकीं रामगडास गुलामकादरानें वेढा देऊन तो बहुतेक जेर केला होता. व आग्र्याभोंवतीं इस्माइल बेगानें वेढा घातला. परंतु तेथें लखबादादा आपल्या मराठ्यांना धीर देत किल्ला मोठ्या शौर्यानें लढवीत होता. या आणीबाणीच्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत मराठ्यांचें नांव कायम राहण्यास लखबादादाच्या पराक्रमाचा चांगला उपयोग झाला. इतर सर्व किल्ले आज मराठ्यांच्या ताब्यांत तर उद्यां मुसलमानांच्या, असा घोटाळा एकसारखा चालला होता. पण या सर्व घालमेलींत आग्र्याच्या किल्ल्यावर मात्र भगवें निशाण एक सारखें फडकत होतें. मुसलमानांनीं त्या किल्ल्याभोंवतीं मोठें सैन्य आणून अनेक वार हल्ले केले. परंतु किल्ल्यांतील लोकांचें धैर्य केव्हां हि खचलें नाहीं; त्यांनीं शेवट-पर्यंत सर्व हल्ले परतविले आणि अगदीं उपासमार होण्याची वेळ आली हें तेव्हां त्यांच्या सुदैवानें पाटिलबावांचा जम परत बसत चालला होता व त्यांना किल्ल्यांत मदत पोंचविण्याच्या कामीं यश आलें.

पाटीलबावा ग्वाल्हेरीकडे परत गेल्यावर त्यांनीं देवजी गवळी, रायाजी पाटील व राणेखानभाई यांना इस्माइलबेगाशीं युद्ध करण्याकरतां रवाना केलें. इस्माइलबेग आग्र्या-हून ढवळपुरास आला. तेथें दोन्ही सैन्यांची गांठ पडून साधारण चकमक झडली. परंतु कोणत्या च पक्षास जय मिळाला नाहीं; तेव्हां राणेखान व रायाजी पाटील आग्र्याकडे निघाले. या वेळीं आग्र्याचा किल्ला मराठ्यांच्या ताब्यांत व शहर मुसलमानांच्या ताब्यांत होतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. इस्माइलबेग ढवळपुराकडे गेला तरी त्याचा बाप व उमरा-

वगीर गोसावी मोठ्या सैन्यानिशीं आग्रा शहरांत होते. त्यांच्याशीं राणेखान व रायाजी पाटील यांनीं लढाई घेतली. त्यांत मराठ्यांना जय मिळाला. उमरावगीर जखमी होऊन मराठ्यांच्या हातीं लागला. त्यास त्यांनीं कैद करून पाटीलबावाकडे रवाना केलें.

ही पराभावाची बातमी ऐकतांच इस्माइलबेग ढवळपुराहून आग्र्यास परत आला व त्यानें गुलामकादराशीं सख्य करून त्याचें हि सैन्य मदतीस आणविलें. या जमावापुढें रायाजीस टिकाव धरवला नाहीं. तो पळून भरतपुरास गेला. इकडे इस्माइल बेगानें आपला राग आग्र्यांतील लोकांवर काढला. तेथील सराफापासून पस्तीस हजार रुपये दंड घेतला व पाटिल बावांचा माजी कारभारी नौबतराय खत्री याचा वाडा खणून दोन लाखांचें वित्त मिळविलें. अशा रीतीनें सारा गांव लुटून जो पैसा मिळाला त्याच्या जोरावर तमाम फौज ताजी करून आग्रा किल्ल्यावर जोराचा मारा सुरू केला.

यावेळा गुलाम कादर व इस्माइलबेग यांच्या जवळ बारा तेरा हजार फौज, पंचवीस हजार प्यादे व शेंसवाशें तोफा असा जमाव होता. पाटिल बावा जवळ देखील स्वारप्यादगान मिळून वीस पंचवीस हजार जमाव असून दोन अडीचशें तोफा होत्या. या खेरीज रंजितसिंग जाट पंचवीस तीस हजार स्वारप्याद्यांनिशी मराठ्यांच्या मदतीस येण्यास तयार होता. मोंगली फौज मराठी फौजेनें अनेक वेळां मारलेली. परंतु यावेळीं स्वतः पाटिलबावा चमेलपार कुवारी नदीवर व रंजितसिंग भरतपुराजवळ होते. दोघांकडील फौजा मात्र गुलामकादर व इस्माइलबेग यांच्या सैन्यापासून आठ दहा कोसांच्या अंतरावर राहून छापा घालण्याचा आव आणीत, परंतु मांड धरून झुंजत नसत. यामुळें यवनाचे फौजेचा दाब पाटिलबावा व रंजितसिंग यांच्या फौजेवर आहे असा समज चोहींकडे झाला होता.

यावेळीं गुलामानें बादशहाकडे पत्र पाठवून 'तुम्ही मराठ्यांचें शासन करण्याकरितां आग्र्यास यावें' असा आग्रह चालविला. परंतु बादशहाचा ओढा मराठ्यांकडे व कारभाऱ्यांचा गुलामाकडे होता. तथापि हिंगण्याच्या म्हणण्या प्रमाणें सासूच्या हाताखालीं सून जशी नमून वागते त्याप्रमाणें बादशहा म्हणजे कारभाऱ्यांच्या हातातलें बाहुलें झालें होतें. तरी त्यानें 'या गरमीच्या दिवसांत आमचें दिल्ली बाहेर निघणें घडत नाहीं' असें लिहिण्याचें धाडस केलें. आधींच बादशहा व गुलामकादर यांचें फार दिवसापासून वांकडें होतें. त्यांत आणीबाणीच्या वेळीं तो आपल्या मदतीस येत नाहीं असें पाहून गुलामाचें पित्त खवळलें. तरी रंजितसिंग व पाटिलबावा यांचा समाचार घेतल्या वांचून बादशहास हात लावणें बरोबर नाहीं अशा विचारानें गुलाम व इस्माइलबेग आग्र्याहून भरतपुरास गेले व तेथें रंजितसिंगाशी त्यांची गांठ पडली. परंतु यांचे च दोन तीन हजार लोक मेल्यामुळें ते निराश होऊन कुंभेरीस आले आणि तें शहर लुटून पुढें डीग किल्ल्यास वेढा दिला. या किल्ल्यांत देखील रंजितसिंगाचे लोक होते.

ते बाहेर पडले व पाटिलबावांकडील राणेखान व रायाजी पाटील वगैरे सेनापति त्यांना मिळाले. यामुळें मुसलमानांचें दोन तीन हजार सैन्य मारलें जाऊन गुलामास परत आग्र्याकडे जाणें भाग पडलें.

यावेळीं मराठे हिंमत धरून शत्रूवर हल्ला करीत नाहींत तर केवळ बचावाचें धोरण स्वीकारून अंगावरच पडेल तर शत्रूशीं लढतात याबद्दल सामान्य लोक पाटीलबावांना दोष देत. परंतु हें बचावाचें धोरण च शहाणपणाचें होतें असें दिसतें. गुलाम व इस्माइलबेग हे केवळ लूट मिळविण्याच्या हेतूनें लढत होते, बादशाहाचा त्यांच्याकडे ओढा नव्हता; व आपल्या मूर्खपणाच्या कृतीनें ते लोकांस नकोसे होत होते. व सर्वांत महत्वाची गोष्ट ही कीं तुकोजी होळकर व अलीबहादर मोठ्या सैन्यानिशी महाराष्ट्रांतून निघाले असून एकेक दिवस लोटेल तसें मराठ्यांचें बळ वाढत असे व मोंगल्यांचें कमी होत असे.

यावेळीं तुकोजी होळकर रामपुऱ्यापर्यंत आला होता. त्याला लौकर येण्याबद्दल पाटीलबावांनीं पत्रें पाठविलीं. ते यऊन पोंचले म्हणजे सर्व कारभार नवाब अलीबहादूर व होळकर यांच्या स्वाधीन करून व अंबाजी इंगळ्यास दहा पंधरा हजार फौजे निशी त्यांच्या तैनातीस ठेऊन आपण छावणीस उज्जनीस जावें असा त्यांचा हेतु होता. या वेळीं मृग लागण्याचा सुमार असल्यामुळें चांगलें छावणीचें ठाणें पाहून मुक्काम करणें बरें या विचारानेंच उज्जनीची निवड त्यांनी केली असेल. पण येथें आणखी एक शंका घेतां येण्याजोगी आहे. ती अशी कीं, तुकोजीच्या मनांतून पाटिलबावांच्या हाताखालीं वागण्याची इच्छा नव्हती; आपण स्वतंत्रपणें वागणार असा त्याचा निश्चय झाला असल्यामुळें दिल्लीपर्यंत येण्यास तो टाळाटाळी करील असा संशय पाटिलबावांना आला होता. तेव्हां या रीतीनें मसलतीचा बिघाड होण्याचा संभव राहू नये म्हणून बहुधा त्यानीं तुकोजी व अलीबहादूर यांजकडे सर्व काम सोपविण्याचा विचार केला असावा.

या विचाराची योग्यायोग्यता ठरविण्यास आंपणास थोडेसें मागें वळून पाहिलें पाहिजे. बऱ्याच वर्षांत नाना व महादजी यांची प्रत्यक्ष भेट नसल्यामुळें व एकें-मेकांत मतभेद उत्पन्न करणारे अनेक प्रश्न उपस्थित झाल्यामुळें मनांत थोडा विकल्प उत्पन्न झाला होता. पाटिलबावांनीं इंग्रजाशीं स्वतंत्र तह केला व सालबाईच्या तहाच्या वेळीं देखील त्यांनीं बरीच घाई केली याबद्दल नानांस बरें वाटलें नाहीं; उलट इंग्रजांचा वकील मॅलेट स्वतंत्रपणें पुण्यास राहूं लागला म्हणून पाटील-बावांच्या मनांत वैषम्य उत्पन्न झालें. व कांहीं वसूलाच्या कामानिमित्त पाटिल-बावांच्या जावयाच्या भावास पुणें दरबाराकडून शिक्षा झाल्यामुळें त्याची अप्रतिष्ठा झाली. या शिवाय अशींच आणखी कित्येक प्रकरणें घडलीं होतीं. परंतु या प्रकरणा-मुळें किती हि विकल्प आले तरी आणीबाणीच्या वेळीं एकमेक एकमेकाच्या मदतीस

धाऊन येतील अशी परस्परांची खात्री होती. यामुळें लालसोट येथें झालेल्या पराभवाची बातमी कळतांच नानांनी मदतीस सैन्य पाठविण्याची शक्य तितकी निकड केली. तुकोजी व अलीबहाद्दर यांना तिकडे जाण्याबद्दल एकदम हुकूम पाठविले. परंतु सहा महिने झाले तरी सैन्य पोंचेना. तेव्हां पाटिलबावानीं रामजी पाटील जाधव यास पुण्याकडे पाठविलें. त्यांची वाटेंत अलीबहादूरांशीं गांठ पडली. त्यानें विचारलें "सहा महिने निघाला आहां, अद्याप पोहोंचला नाहीं. उभयतांची मर्जी कशी आहे ?" तेव्हां "पाटीलबावाशीं दुसरा विचार नाहीं. म्हणून आम्हांस मदतीस पाठविलें" असें अलीबहादुरानें उत्तर दिलें; व महेश्वरास येऊन तुकोजीस लौकर निघण्याबद्दल घाई लावली. नानांनीं देखील एकसारखीं पत्रें पाठवून निघण्याची निकड लावली होतीच. शेवटीं एकांतीं बोलणें सुरू झालें तेव्हां तुकोजीनें अलीबहाद्दरास स्पष्ट सांगितलें कीं "आपण पुढें व्हावें. बापू होळकर बरोबर देतों, इंदूरापर्यंत चालावें किंबहुना उज्जनीपावेतों चालावें, आमावास्या जाल्यावर दोहों चहूं रोजीं निघोन आम्ही येतों. तेथें राजश्री महादजी शिंदे यांजकडून जाबसाल खुरळीतपणें चालावयाचे आले तरी तिकडे जाऊं. नाहीं तरी आम्ही जैपूर अथवा मारवाडचे रोखें जाऊं. **त्यांचे हाताखालीं चालावयासी त्यांचे लष्करांत येणार नाहीं.** यांचें पत्र पूर्वीं गेलें होतें. त्याचें उत्तर ठीक जाबस्वालाचें कांहीं येत नाहीं. त्यानीं लिहिलें होतें कीं तुम्ही निघून येता म्हणून लिहिलें तें कळलें; बरें आहे. परंतु जाबसाल एकहि नाहीं." हें अवतरण अलीबहाद्दरानें नानास लिहिलेल्या पत्रांतलें आहे. तेव्हां यावेळीं तुकोजी निघण्याविषयीं मागें पुढें करीत होता याबद्दल संशय घेण्यास जागा च रहात नाहीं. अलीबहाद्दर घाईनें जाण्यास तयार होता, पण त्याच्याजवळ फक्त हजार दीड हजार सैन्य जमलें होतें. त्यांतून हि तो निघूं लागला 'तेव्हां तुम्ही आम्ही बरोबर जाऊं. आम्हांसही जाणें जरूर आठचार दिवसांत खर्चाची तरतूद करून दर मजल जाऊ. तुम्हीं पुढें न जावें' असा तुकोजीनें आग्रह चालविला. इतक्यांत पाटिलबावाकडून अंबाजी इंगळे आला. त्याचे म्हणणें देखील दोघानीं बरोबर च निघावें असें केल्यानें च दाब मोठा पडून मसलत सिद्धीस जाईल असें पडलें. परंतु अलीबहाद्दरानें जेव्हां 'त्यांचें येणें लौकर होत नाहीं' असें सांगितलें तेव्हां इंगळें म्हणाला 'होळकर यांस आम्ही निकड करितों, येत नसेल तर मग जावें.' शेवटीं होळकर व इंगळे यानीं एकविचारानें असें अलीबहाद्दरास सांगितलें कीं "तुम्हीं आम्ही मेवाडाहून जैपूरचे सुमारे नीट च जाऊ. तुम्ही भेलशाकडून जावयाचा मनसुबा केला आहे; त्यास साठ सत्तर कोसांचा फेर पडतो. नद्या बहुत व चिखल हि त्या मार्गे बहुत. याकरितां पर्जन्यकाळीं वाट चालतां कठीण. हा मार्ग जवळ. लौकर जाऊन पोहोंचून एखादें काम करूं." हि मसलत पसंत पडून जैपूरची मोहीम आधीं उरकून घेण्याचें ठरलें. व अलीबहाद्दर मेवाडकडे निघाले.

परंतु नाना फडणीसांना अलीबहाद्दराचें हें करणें आवडलें नाहीं. "मेवाडांतून जाता. तेव्हां जैपूर व जोधपूरकर राजे आपापले ठिकाणीं स्वस्थ आहेत; त्यांचें मुल-

खान गेल्यावर त्यास उपद्रव होईल. तेव्हां ते व गुलाम कादर एक होतील. मसलत भारी पडेल. यास्तव, आधीं शिंदे यांजकडील मसलत समेटून मग जें करणें तें एक विचारें करावें. तुकोजी होळकर यांस कांहीं दिवसगत लागल्यास तुम्हीं निरोप घेऊन जावें." त्याप्रमाणें बहादुराचें निघण्याचें ठरलें.

इतकें होईतोंवर आश्वीन महिना आला.

तुकोजीच्या मनांतून यावेळीं रजपुतांना बुडवावयाचें नव्हतें असें दिसतें. मारवाडकराचे वकील तुकोजीकडे आले. त्यानीं स्पष्ट सांगितलें कीं "आमचें व पाटीलबावांचें वांकडे आहे. त्यास तुमचा आमचा बेलभंडार, आणशपथ जाली पाहिजे. तुम्ही आम्हांस सामील असावें." ही गोष्ट मान्य करावी अशी तुकोजी व त्याचे सल्लागार पाराशरपंत यांची इच्छा होती. परंतु नारो गणेश मात्र या मसलतीस विरुद्ध होता. वस्तुतः नारो गणेश म्हणजे नेहमीं कळ लावणारा इसम. परंतु तो अनुभवानें शहाणा झाला होता. तथापि पाटिलबावाचा पक्ष घेतल्याबद्दल तुकोजीनें शेवटीं या नारो गणेशाची जी अप्रतिष्ठा केली तिला सीमा च नव्हती. तवे तापवून पुढें टाकले व गळ्यांत हत्तीचा साखळदंड घातला. अंगास जामग्या लाविल्या. मिरच्यांची धुरी दिली. राखेचा तोबरा दिला. तेव्हां तो तीस लाख रुपये देण्यास कबूल झाला. तितका वसूल करून शिवाय घराची जप्ती केली. अंगावर एक वस्त्र मात्र ठेवलें. तेव्हां बायकोनें सांगितलें कीं 'कां अप्रतिष्ठा करून घेता ? जें काय असेल तें द्यावें. भीक मागून खाऊं.' त्यानें ती गोष्ट मान्य करून 'लेकास हातीं धरून यमुनेंत जातों. जें असेल तें देतों. मला संन्यास घावा' अशी तुकोजीकडे मागणी केली. तेव्हां पन्नास लाखांवर तडजोड ठरली. ही बातमी ऐकून पाटीलबावांनीं तुकोजीकडे राणेखानास पाठवून 'इतकी अब्रू नारो गणेशाची घ्यावयाची नव्हती' असें कळविलें. परंतु तुकोजीनें रागाऊन 'तुम्हास आमचे घरांत बोलावयास कारण काय ?' वगैरे प्रश्न करून राणेखानास धुडकावून लावले.

होळकर व शिंदे यांचा मतभेद नानासाहेब पेशव्यांच्या वेळेपासूनचा होता. रजपुतांना जिंकावें ही शिंद्यांची इच्छा; त्यांना राखावें हा होळकराचा कृतसंकल्प. पाटिलबावा व तुकोजी दोघेही विकारवश होते. दोघे हि परंपरागत धोरण चालविण्यासाठीं झटत. पाटिलबावा दिल्लीकडे आले ते च मुळीं दिल्लीचें तख्त काबीज करणें व रजपुतांना जिंकणें या पाणिपतपूर्वकालीन शिंदे घराण्यांतील ध्येय सिद्धीस नेण्याकरितां आले. आणि कितीहि अडथळे आले तरी तें त्यांना पार पाडतां आले असते. पण तुकोजी आल्यापासून आपलें ध्येय साधण्यासाठीं आपसांत यादवी मजण्याचा प्रसंग दिसूं लागला. तेव्हां ध्येय सोडावें किंवा यादवी पत्करावी अशा पेचांत पाटिलबावा पडले. प्रथम कांहीं दिवस तडजोड करण्याचा त्यानीं प्रयत्न केला. परंतु तो सिद्धीस न गेल्यामुळें व अलीबहादुराशीं देखील वितुष्ट वाढल्यामुळें शेवटीं दिल्लीकडील कारभार सोडून ते पुण्यास निघून गेले. होळकर व अलीबहादुर यांची मदत येणार हें ऐकल्यापासून

पाटीलबावांच्या मनांत कोणते विचार घोळत असले पाहिजेत याची कल्पना येण्या-साठीं ही हकीकत सांगतां सांगतां आपण बरेच पुढे पोचलों आहों. आतां पुनः दिल्ली-कडील हकीकत पाहूं.

डीग येथें पराभव झाल्यावर गुलाम व इस्मइलबेग आग्र्यास आले. तो किल्ला हस्तगत केल्यावांचून आपला दाब मराठ्यांवर बसत नाहीं असें पाहून त्यांनीं आग्र्या वर निकराचा हल्ला करण्याचें ठरविलें. व किल्ला पडण्याच्या बेतांत आला. कारण आंतील धान्यसामुग्री संपत आली होती. हें पाहून राणेखान, रायाजी पाटील, जिवबा-बक्षी वगैरे पाटीलबावांचे सरदार यानीं रंजितसिंग जाटाचें सैन्य मदतीस घेऊन गुलामकादराच्या महाबन येथील पिछाडीच्या ठाण्यावर घेरा देऊन दोन पलटणें कापून काढलीं. तेव्हां तिकडे कांहीं सैन्य पाठविणें गुलामकादरास भाग पडलें. ही बातमी राखून या मदतीस येणाऱ्या सैन्यावर राणेखानानें अकस्मात जोराचा हल्ला करून शत्रूच्या फौजेचा मोड केला.

अशा रीतीनें मराठे चिडून जोरानें येत आहेत हें पाहतांच इस्माइल बेगानें गुलामाचा पक्ष सोडून जाण्याचें ठरविलें. तो उठून वजीराच्या मुलखांत आश्रयास गेला व "आमची मदत या समयीं आपण करावी" अशी त्यास विनंति केली. या वेळीं दामोदर देवराव हा मराठ्यांचा वकील वजीरास नजरेचा सरंजाम गुजरावयासाठीं गेला होता. त्याच्या खटपटीमुळें वजीरानें इस्माइल बेगास आपल्या प्रांतांतून निघून जाण्यास सांगितलें. शेवटीं निरुपाय होऊन त्यानें गुलामकादरास पत्र पाठवून वचनप्रमाण क्रिया आणविली आणि त्याच्या भेटीस रामगडास गेला. भेटींत असें ठरलें कीं गुलामानें आग्र्यावर हल्ला करावा आणि इस्माइल बेगानें दिल्लीस जाऊन 'बादशाहापाशीं राहून मराठ्यांकडील जाबसाल उडवून यावा.' याप्रमाणें तो दिल्लीस गेला. नाजर मंजूर अलीखान वगैरे कारभाऱ्यांच्या मनांतून बेगाचें बस्तान दिल्लीस बसावें असें होतें. परंतु बादशहानें यावेळीं मनाचा धीर करून 'निमकहरामाचें आम्ही दर्शन घेत नाहीं. त्यानीं शहरांतून निघून जावें' असें स्पष्ट सांगितलें. तेव्हां तो निराश होऊन परत गेला. इकडे गुलामकादराच्या सैन्यास देखील धीर पुरेनासा झाला होता. स्वतः पाटील बावा बऱ्याच महिन्यांपासून ग्वालेरीजवळ होते ते आतां चंबेळ उतरून आग्र्यापासून आठ कोसांवर येऊन राहिले. जिवबा बक्षी पांच हजार फौजे निशीं दिल्लीकडे निघाला. अशा रीतीनें चोहींकडून आशातंतु तुटून सभोंवार मराठ्यांचा वेढा पडत चाललेला पाहून गुलामानें आग्र्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. तेव्हां मात्र आंतील मरा-ठ्यांचा सेनापति लखबा यानें पाटीलबावास निरोप पाठविला कीं 'किल्ल्यांत भक्षाव-यास नाहीं. आतां आमच्यानें किल्ला राखवत नाहीं.' तेव्हां किल्ल्यांत मदत पोचविणें हें पहिलें काम आहे असें सर्वानुमतें ठरलें. हें काम रंजितसिंग जाटाकडे पाटीलबावानीं सोंपवून राणेखान व रायाजी पाटील या सरदारांना या कामीं मदत करण्याचा

हुकूम दिला. रंजितसिंगानें तीनशे उंट व हजार दोन हजार बैल भरून गल्ला आपली फौज समागमें देऊन आग्र्यास रवाना केला. 'हा गल्ला किल्ल्यांत दाखल करून देणें. जर इस्माइल बेगाचे हातास गेला तरी ठीक नाहीं' असें पाटीलबावांनीं राणेखान व रायाजी यांस निक्षून लिहिलें होतें. त्याप्रमाणें त्यानीं आपल्या व जाटाच्या फौजेचे मिळून चार गोल केले. एक गोल श्रीयमुनापार उतरला. बैलावरून गल्ला आणविला होता तो नावा भरून यमुनेंतून किल्ल्यांत दाखल केला. ही बातमी लागतांच इस्माइल बेग व गुलामकादर यांनीं असा विचार केला कीं एकानें यमुना उतरून पलीकडे राहावें व एकानें अलीकडे राहावें म्हणजे किल्ल्यांत मदत पोंचणार नाहीं. याप्रमाणें गुलाम यमुनापार गेला. दुसरे दिवशीं राणेखान व रायाजी यांनीं तीनशें उंट पुढें घालून जाटाकडील फौज समागमें घेऊन एक फौजेचा गोल उंटासमागमें देऊन, किल्ल्यांत उंट दाखल करविले; आणि फौजेचे दोन गोल इस्माइलबेगाचे फौजेबरोबर झुंजास उभे राहिले. ' त्यांसीं यासीं गोळा गोळी होतांच, मराठियांनीं व जाटांनीं मोठी छाती करून त्यांचे फौजेंत घोडे घातले. दोन घटका तरवार चालली. निदान ( शेवटीं ) इस्माइल बेगास तीन जखमा जाल्या. बेताल होऊन सात रावतानसीं पळून यमुनेंत घोडे घातले. या पैकीं तीन स्वार यमुनेंत बुडाले. चौ स्वारांनसीं पळून गुलाम कादरखानाचें फौजेंत दाखल जाले ' गुलामानें सामोरा येऊन पालखी देऊन सन्मान करून बेगास आपल्याजवळ ठेवलें. या युद्धांत मराठ्यांनीं दाखविलेल्या शौर्यामुळें त्यांचा दरारा पुनः प्रस्थपित झाला. बादशहानें उघडपणें गुलामाचा पक्ष सोडून पाटीलबावांचें अभिनंदन करण्यासाठीं मुखत्यारीचीं वस्त्रें, सात पारचांचा खिलत, पागोटें, शिरपेंच, मोत्यांची कंठी, ढाल, तरवार, हत्ती, घोडा वगैरे सरंजाम पाठविला. याशिवाय इस्माइल बेगाकडील शेसवाशें तोफा, हत्ती, घोडे वगैरे पुष्कळ लूट मराठ्यांना मिळाली. आणि लालसोटच्या लढाईंत ज्या पलटणांनीं पाटीलबावास दगा दिला होता, व जीं जैपूरकरांकडून इस्माइल बेगाकडे आलीं होतीं तीं पलटणें फोडण्यासाठीं पाटीलबावांनीं आपला एक खिजमतगार आठदहा दिवसापूर्वीं इस्माइलाच्या सैन्यांत पाठविला होता, तीं पलटणें देखील झुंजाचे समयीं तोफखान्यासुद्धां उठोन राणेखान व रायाजी पाटील यांजपाशीं येऊन दाखल जालीं. सारांश या वेळीं गुलामाचा पक्ष सर्वस्वी पराभूत होऊन पाटिलबावांचा दरारा पूर्ववत कायम होणार असें निश्चितपणें सर्वांना वाटू लागले. पाटीलबावांनीं आग्र्याचा बंदोबस्त करून मथुरेस छावणी केली. व बादशहाचा बंदोबस्त करण्यासाठीं अबदुल आहदखान व लाडोजी देशमुख यांना दिल्लीस पाठविण्याचें ठरविलें. म्हणजे दिल्लीतून हकालपट्टी झाल्यापासून ११ महिन्यांनीं लाडोजी पुनः तेथें जाण्याचा वेळ आली.

अशा रीतीनें चोहीकडे जम बसला असें वाटू लागलें होतें तोंच एका लहानशा चुकीमुळें सर्व घडी विघडून मोठा अनर्थ घडला. गुलाम कादर व इस्माइल बेग आग्र्याचा नाद सोडून दिल्लीस बादशहाकडे गेले. तेथें गांवातील लोकापासून जबर-

दस्तीनें पांचचार लाख रुपये घेऊन बादशहास भीति दाखवून आपल्या बाजूस वळवून घेण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. "हजरतांनीं दीनचा पक्ष सोडून मऱ्हाठियांचा पक्ष धरला आहे, हे गोष्ट मुसलमानीस ठीक नाहीं." असा निरोप दोनचार काजी व मुलाणे यांजबरोबर बादशहाकडे पाठविला. परंतु तो यावेळीं जोरांत होता. "मुसलमानास सोयन यावी, दीनचा डंका ठेवावा हें ठीकच आहे. परंतु आज दाहा महिने जाले, तुम्हीं दरोबस्त मुलूक व किल्ले आटोपिले, पैका उत्पन्न केला, त्यांपैकीं मजला काय दिल्हे! व मसी सलूख काय केला! उ‌ल्टें आमचे किल्ल्यास व रंगमहालास गोळे मारिले. जितकी शोकी करावयाची तितकी केली! आता तुमची आमची संगत नाहीं" असें त्यानें स्पष्ट उत्तर गुलामास दिलें. तेव्हां गुलाम व बेग यांनीं युद्धाची तयारी केली. मराठ्यांशी एक जोराची धडकी द्यावी मग जें व्हावयाचें तें होईल असा त्यांनीं विचार केला. त्यामुळें बादशहा पुनः घाबरला. "मातबर फौज व सरदार पाठऊन याल तरी दिल्लीची स्थीत राहेल. नाहीं तरी रोहिला दिल्लीत दाखल जालियावर आग्र्याचे शहराची खराबी केली, त्याप्रमाणें दिल्लीची अवस्था होईल" असे निरोपावर निरोप गेले. तेव्हां पाटीलबावाकडून खंडोजी शिंदे व भगीरथजी शिंदे दोन हजार राउतांनशीं बादशहाच्या भेटीस आले. हिंमतबहाद्दर गोसांव्याच्या मध्यस्तीनें बादशहानें शिंद्यांची भेट घेतली. त्यांचें उमेदीचे बोलणें चालणें पाहून बादशहास अवसान आलें. या वेळीं गुलामाचा पक्ष खास बुडणार तेव्हां आपण हि एखादी लढाई मारावी असें त्यास वाटू लागले. तो आपलें मोगली सैन्य, खंडोजी व भगीरथजी शिंदे आणि हिंमतबहाद्दर गोसावी यांची फौज घेऊन यमुना उतरून गेला. इकडे नाजरास देखील आतां गुलामाचा पक्ष विजयी होईल असें वाटत नव्हते; पाटीलबावांचा अंमल दिल्लीस सुरू झाला कीं आपली धडगत नाहीं, आपण त्यांना विश्वासघातकी असें म्हटलें होते, त्याचा ते सूड घेतील असा विचार करून नाजरानें कुराण पाठवून 'पाटीलबावांनीं आम्हांविशीं स्वच्छ असावें' असें बोलणें लावलें. रामरतन व शीतळदास यांनीं देखील गंगाजळी पाठवून याच मार्गाचें अवलंबन केलें. परंतु पाटीलबावांचे उत्तर लौकर येईना. तेव्हां रामरतन उठून पाटीलबावाकडे मथुरेस गेला व राणेखानामार्फत भेट घेण्याचा प्रयत्न करूं लागला.

अशा रीतीनें बादशहाजवळ गुलामाच्या बतीचा कोणी राहिला नाहीं, तेव्हां तो उघडपणें गुलामावर चालून गेला. परंतु युद्धास प्रारंभ होतां च बादशहाच्या खास पथकाचे मोगली सैन्य दगा देऊन गुलामास जाऊन मिळाले. हें पाहून हिंमत बहाद्दर, खंडोजी व भगीरथजी यांना तोंडघशीं पडल्यासारखें झालें. ते मुकाट्यानें उठून बादशहास न विचारतां रातोरात फरीदाबादेस गेले. बादशहाची तर गाळण च उडाली. तो परत दिल्लीच्या किल्यांत गेला. गुलामानें त्याचा पाठलाग करण्याचें ठरविलें. प्रथम शहराचा बंदोबस्त करून तो बादशहाच्या भेटीस गेला. तेथें नाजर मंजूर अलीखान वगैरे होते च. त्यानीं बादशहाची व गुलामाची गांठ घालून दिली. बादशहानें गुलाम

म्हणेल तें मान्य करण्याचें व्रत स्वीकारलें. सिलेमा सिकी नांवाच्या शाहाजाद्यास गुलामाबरोबर यावें व त्यानीं फरीदाबादेस जमलेल्या मराठी फौजेवर हल्ला करावा असें ठरलें. पाटीलबावा मथुरेस होते. त्यानीं हें ऐकतांच राणेखानास खंडोजी शिंदे याच्या मदतीस फरीदाबादेस पाठविलें. परंतु गुलामकादारास यावेळीं आशेस जागा राहिली नव्हती. आग्रा, डींग वगैरे ठिकाणीं त्यानें गेल्या दहा महिन्यांत मराठ्यांचा पराभव करण्यासाठीं प्रयत्नाची पराकाष्ठा केली होती. त्याचा उपयोग न होता उलट त्यांचा चोहींकडून गराडा पडत चालला. हें पाहून त्याची हिंमत खचत चालली. फरीदाबादेस जाऊन लढण्याचें सोडून दिल्लींतील श्रीमंत आसामी पाहून त्यानें धराधर सुरु केली. तेव्हां बादशाहा म्हणाला शहरचे लोकांस उपद्रव देणें ठीक नाहीं. तुम्ही आज्ञा घेतली, शाहाजादा घेतला, आतां जाऊन हरीफासी ( = शत्रूसी ) मुकाबला करावे." तेव्हां गुलाम व इस्माइल बेग बादशहावर च उलटून म्हणाले "शहर लुटावयास मना करितां तर पैका जवळून देवावा." इतकी बोलाचाली झाल्यानंतर शके १७१० आषाढ वद्य १४ (= १७८८ जुलै ३१) रोजीं हे दोघे निराश व बेफाम झालेले इसम दोन हजार शिपायास बरोबर घेऊन किल्याच्या दरवाजांशी आले. शिपाई दरवाजाशी ठेऊन आपण एकटे बादशहाच्या भेटीस जाण्याचा त्यांचा रोजचा शिरस्ता होता; परंतु नाजराशीं संगनमत करून आज ते शिपायासुद्धां आंत गेले. त्याबरोबर तरवार चालली. तेव्हां वीसपंचवीस माणूस कापून दरवाजाचा बंदोबस्त करून पुढे महालांत जाऊन गुलामानें पादशाहास धरलें. अठरा साहेबजादे व कुटुंबसुद्धां पातशाहास कैद केलें. दुसरे दिवशीं नवा बादशाहा बसविला. जुन्या बादशहांचें डोळे फोडले. बेगमांचा झाडा घेतला. उन्हांत गच्चीवर उभ्या करून त्यांना मार दिला व अतोनात लूट मिळवून ती गोसगडाकडे रवाना केली. गुलाम कादरानें केलेल्या अत्याचारांचें सविस्तर वर्णन येथें देण्याचें कारण नाहीं. तें दुसरीकडे अनेक ठिकाणीं दिलेलें आहे; आणि या अत्याचाराच्या बारीकसारीक माहितींचें ऐतिहासिक दृष्ट्या फारसें महत्व नाहीं. गुलाम कादर यावेळीं बेफाम झाला होता, माणुसकीचा किंवा सारासार विचाराचा अंश त्याच्या डोक्यांत राहिला नव्हता; एवढें ध्यानांत ठेऊन आपण पुढील हकीकतीकडे वळूं.

गुलामाच्या अत्याचारामुळें इसमाइलबेगाचें मन विटलें; शिवाय किल्ल्यांत मिळालेली लूट गुलाम परस्पर गोसगडाकडे रवाना करूं लागला; बेगाला त्यांतली वाटणी मिळण्याचें चिन्ह दिसेना; यामुळें दोघांत भांडण सुरु झालें. तेव्हां गुलाम शाहाजादा व जडजवाहीर बरोबर घेऊन नदी उतरून गोसगडाकडे गेला. इसमाइल बेगानें राणेखानामार्फत पाटीलबावांकडे संधान बांधलें. हें पाहून गुलाम स्वतः इस्माइलाच्या भेटीस गेला. त्याच्याशी गोडगोड बोलत किल्ल्याकडे आणावें आणि वाटेंत मारेकऱ्यानीं त्यास मारून टाकावा अशी त्यानें व्यवस्था केली होती. याप्रमाणें दोघे हत्तीवर बसून येत असतां बेगास, गुलामाच्या दगाबाजीसंबंधानें, एकदम संशय उत्पन्न

झाला; व तो हत्तीखालीं उडी टाकून पळून गेला. नंतर बेगाचें पाटीलबावाशीं हिंमतबहाद्दरामार्फत बोलणें चाललें त्यांत 'कांट्यानें कांटा काढावा' या न्यायानें पाटीलबावांनीं गुलामास धरण्याचें काम त्यांजकडे दिलें. इसमाइल बेगाच्या बापानें एक वेळ त्याला ' तुम्ही गाफील आहां; तुमचे कंपूचे लोक फुटोन पाटीलबावाकडे मिळाले. तुम्हांपाशी कोणती जमीयत राहिली ?' असा प्रश्न केला. तेव्हां त्यानें उत्तर दिलें ' जें आमचे नशीबांत होणार तें जालें. परंतु आम्ही पाटीलबावाचे रफीक आहों. " तात्पर्य गुलामानें दहा बारा कोटींचें वित्त मिळविलें असून बेग कंपूचा पगार देण्यास देखील असमर्थ होता ! यामुळें तो मराठ्याकडे आला. तेव्हां दिल्लीचा किल्ला खाली करून व जें सामान नेतां आलें नाहीं त्यास आग देऊन गुलाम निघून गेला व त्या शहरांत पुनः मराठ्यांचें ठाणें पडलें.

यानंतर गुलामकादरास पकडून त्याचें शासन करणें हेंच मराठ्यांचें मुख्य काम होऊन बसलें. त्याला वेढण्यासाठीं मराठे सरदार मोठ्या हिमतीनें सैन्याची हालचाल करीत होते कंपूच्या लोकांचा फितुरी स्वभाव व पैशाचीं अडचण या दोन गोष्टी त्यांना पदोपदी नडत होत्या. तथापि ते आतां अनुभवानें शहाणे झाले होते व मनाजोगा बंदोबस्त झाल्यावांचून पुढे पाऊल टाकण्यांत अर्थ नाहीं हें त्यांना पटलें होतें. मोठ्या अडचणीशीं तोंड देतांना जे गुण दिसावयास पाहिजेत ते या वेळीं पाटिलबावांच्या अनेक सरदारांनीं दाखविले. गुलामाचे पारपत्य करण्यास चार दिवस अधीक लागले तरी त्याच्याशी सहानुभूती बाळगणारे कोणी राहिले नसल्यामुळें आपण अखेरीस त्यास धरणार अशी त्यांना उमेद वाटत होती. पण त्यांना या हि वेळीं सावधपणें वागण्याची इषारत देणारा एक चमत्कारिक प्रसंग घडला. तो असा.

बादशहाचा व त्याच्या कुटुंबाचा अमानुषपणें छळ करून गुलाम निघून गेला, तेव्हां त्याचें योग्य शासन करण्यासाठीं सर्वांची खटपट चालली होती. दिल्लीचा किल्ला हिंमतबहाद्दर गोसावी आणि रवळोजी शिंदे यानीं ताब्यांत घेतला; आणि आंधळ्या शहाअलमास भेटून " तुम्ही च पातशाहीवर असावें; तुमचे लेक, गुलामाचे पारपत्य करून आणू, तेव्हां अकबरशहास तख्तावर बसवू " असें आश्वासन दिलें. ही बातमी गुलामास कळतां च पूर्वी बेदरशहा पातशहा केला होता त्यास त्यानें कैद केलें व अकबरशाहास पातशाहा करून दिल्लीस आंधळ्यास सांगून पाठविलें कीं "तुमचे लेंकास पातशाहा केलें आहे. घोडीं हत्ती वगैरे सरंजाम दरोबस्त देतों. माझी तकसीर (अपराध) माफ करावी. " हा निरोप पाठविण्याचें धाडस केल्याबद्दल बादशहास राग आला असेल असें सहज च वाटण्याचा संभव आहे. परंतु चमत्कार हा कीं ज्यानें आपले डोळे फोडले, आपल्या उरावर बसून, आपणास लाथा मारल्या, आपलें सर्वस्व लुटून नेलें आणि आपल्या बायकापोरांची उघड उघड अब्रू घेतली त्या गुलामाचे अपराध माफ करावे असे या आंधळ्याच्या मनांत आले ! आणि ते कशाकरिता तर " अकबरशाहास पातशाहा केलें. आपण शिक्कागज पाठवून द्यावा व शहरांत वगैरे सर्वत्र शिक्का यांचा

जारी करावा" असें पत्र आलें होतें म्हणून. गुलामाचें पत्र पाहून बादशहास आनंद झाला व त्या भरांत त्यानें तें पत्र राणेखानाकडे पाठवून दिलें, आणि बरोबर खुशीचा निरोप हि पाठविला. तो ऐकून राणेखानास अतिशय राग आला व तो म्हणाला 'आंधळे जाले. परंतु बट्टेबाजी अद्यापि गेली नाहीं. अकबरशाहास गुलामांनीं पातशाहा केलें तें प्रमाण नाहीं. आम्ही पारपत्य करून शाहाजाद्यांस आणून पातशाहा करूं, तेव्हां प्रमाण आहे.' हें उत्तर ऐकून बादशाहा उगाच राहिला.* यानंतर राणेखान बादशहास नजर वगैरे शिष्टाचार करून म्हणाला "आपण दिवाणखासांत गादीवर बसावें. व जुवांबख्त तुमचा नातू आहे त्यास पुढें घेऊन बसावें. दरबार शिरस्त्याप्रमाणें करीत जावें." इतकें सांगून जोशास मुहूर्त पाहण्यास ताकीद दिली. तेव्हां आंधळा म्हणाला "तुम्ही येथें बंदोबस्त करतां हें वर्तमान गुलामानें ऐकून—शाहाजादे त्याच्या कैदेंत आहेत-त्यासी बदसलूखी केल्यास उपाय काय?" राणेखानास बादशहाच्या या प्रश्नाबद्दल अतिशय संताप आला. परंतु वाद न वाढवितां गुलामाचें पारिपत्य करण्याचा त्यानें निश्चय केला.

यानंतर गुलामानें हिंमतबहाद्दरामार्फत निरोप पाठविला कीं "पातशाही गारत केली, ते सर्व नाजर व आणीक कितेक लोकांचीं पत्रें येविशीं आम्हांस आलीं होतीं, ते पाहावीं. त्यावरून मी तेथें जाऊन त्याप्रमाणें बंदोबस्त केला. व नाजराचें हि पारपत्य केलें. तात्पर्य पातशाहाचे जन्मांतरीं ऐसें च होतें. त्यास जो सरंजाम व नगदी वगैरे बमोजीब यादीप्रमाणें आम्हांकडे आला असेल तो तुम्ही माघारा घ्यावा......शोध करून पाहावा. मजकडे अन्याय नाहीं. सर्वांचें अनुमतें होणें तें जालें. बदनामीचा मात्र टिका आमचे दैवीं आला." हा निरोप पाटीलबावांना पटणें शक्य नव्हतें. त्यानीं "गुलामास जिवंत धरून आणलें पाहिजे" असें ठरवून त्याप्रमाणें हुकूम सोडले.

गुलामकादरास पकडण्याच्या कामीं अलीबहाद्दराच्या सैन्यानें बरीच मदत केली. तुकोजीस न जुमानता अलीबहाद्दर एकदम पाटीलबावाकडे जाण्यास निघाला येथवर हकीकत मागें सांगितलीच आहे. पाटीलबावानीं आंबोजी इंगळयास मुद्दाम या कामाकीरतां पाठविलें होते. त्यानें तुकोजीकडे बरीच खटपट केली. अलीबहाद्दर आणि तुकोजी यानीं एकदम पाटीलबावांच्या मदतीस जावें असें इंगळयानें सांगून पाहिलें. परंतु जैपूराकडेच तुकोजी राहणार हें स्पष्ट दिसूं लागलें तेव्हां अलीबहाद्दरानें तुकोजीचा नाद सोडून पाटीलबावाकडे जाण्याचें ठरविलें. परंतु जैपूरकर आपल्या राज्यांतून वाट देईनात. राज्यांतून जाल तर आम्ही घाट अडवू असा त्यानीं निरोप पाठविला; तेव्हां आलीबहाद्दरानें आंबाजीस व इतर सरदारास काय करावें याबद्दल सल्ला विचारला. जयपूराच्या राज्यांतून न जातां इंद्रगडावरून चमेलच्या घाटानें जावें असाच इतर सरदारानीं सल्ला दिला. परंतु, अंबाजीचें म्हणणें असें पडलें कीं, 'बरोबर श्रीमंताची फौज असून हा भारी सरंजाम जैपूरच्या

कांकडांवरून परत नेऊन घोरचगेलच्या (!) घाटावर जावें तर बदनक्ष होतो. रांगडे आधीच सेर झाले आहेत. आतां त्याहून अधीक सेर होतील. यामुळें माघारा जातां ठीक नाहीं. सरदारापासोन अलीबहाद्दर रुसवा करून आले तेव्हां माघारे जाणें ठीक नाहीं. नक्षावर दृष्ट देऊन जबरदस्तीनें जावें.' याप्रमाणें जैपूरच्या राज्यातून तीन कूच केले. परंतु महागाई फार; रसद पोचेना. तेव्हां बुंदीकराचे दोन गांव (हा बुंदीकर मराठ्यांना अनुकूल होता) व जैपूरचे चार गांव मोडून रसद भरविली. तेव्हां लोकांस धीर आला. परंतु कदाचित ही दांडगाई खपणार नाहीं असें वाटून पुन: वाद निघाला कीं 'जैपुरकरांनीं भांडण उपस्थित केलें तर त्याची जबाबदारी कोण घेणार'? तेव्हां अलीबहाद्दुरानीं अंबोजी इंगळ्यास बोलाऊन सांगितलें कीं, 'मी राजश्री तुकोजीबाबा पासोन रुसोन आलों कीं मी राजश्री पाटीलबाबाकडे जातों. आणि आतां माघारे जावें तर ठीक नाहीं. नीट जावें तों रांगडे जबरदस्त लोक. तुम्हांस म्हणतात कीं निमित्याचे धनी तुम्ही होणें. त्याजमुळें हा हि अंदेशा करता; तरी तो न करावा. लोकांची खातरजमा करून सामदंडभेद करून कळेल तैसे करून नीट मार्गानें चालावें.' तेव्हां भगवंतगड, मल्हारण्य, खुशालगड, हिंडोण या वाटेनें जाण्याचा सल्ला अंबोजीनें दिला. जैपूरकरानीं भगवंतगडचा व बनासचा घाट अडविण्याबद्दल गंगारामशेटास सांगितलें होतें. परंतु अंबोजीनें गंगारामास भेटीस बोलाऊन व गोडीगुलाबीचें भाषण करून त्याला च घेऊन तो भगवंतगडास व पुढें मल्हारण्यास देखील गेला. ही सर्व दांडगाई अंबोजीच्या सल्ल्यानें अलीबहाद्दरानें केली व ती पचली; तथापि तुकोजी त्यामुळें चिडूं नये म्हणून त्याच्याशीं अंबोजीनें सिद्धसाधकपणाचें बोलणें चालूं ठेवलें होतें. अलीबहाद्दर पुढें गेला तरी त्याचा वकील तुकोजीजवळ होता. त्याच्यामार्फत अंबाजीनें निरोप पाठविला कीं "चार महिने याजला आज उद्यां चालावें ऐसें करून ठेवलें आणि ते न पुसत जातात. पुढें जैपूरचें रान. आपला त्याचा बिघाड. त्यास मुख्य तरी आपण च चालावें नाहींतर काशीराव व बापू दोघांपैकीं एकास हजार पांच शे स्वार बरोबर देऊन त्याजपासीं पाठवावें. पुढें चालतील. मागाहून आपण यावें.' या रदबदलीचा उपयोग एवढाच झाला कीं तुकोजी मनांतून रागावला असला तरी बाहेरून त्यानें राग दाखविला नाहीं. एक कारकून व थोडे लोक अलीबहाद्दराबरोबर पाठवून दिले. यामुळें 'तुकोजी व अलीबहाद्दर यांत भांडण तंटा होऊन अलीबहाद्दर निघाला' असा जो लोकांत बोभाटा झाला होता तो कमी झाला.

अलीबहाद्दर डींगेस रणजितसिंगाची भेट घेऊन मथुरेस पोचल्यावर पाटीलबावांनीं त्यांजकडे गुलामकादराचें पारपत्य करण्याचें काम सोंपविलें. राणेखानभाई व अलीबहाद्दर यांच्या सैन्यानें गुलामास मेरट येथें वेढून वठणीस आणलें. या स्वारीवर अलीबहाद्दरास पाठविण्याचें कारण एका पत्रांत असें दिलें आहे—

"बाबाची ( म्ह. अलीबहाद्दुराची ) रवानगी हेंच जाणून लौकर केली कीं यांचे हातून पारिपत्य करावें. म्हणजे सरकारनक्ष वाढून याचा दाब राजेरजवाडे वगैरे यांजवर चहूंकडे पडेल असें बाबाचें ( म्ह. पाटिलबावांचें ) मतें आहे." यानंतर तुकोजी मारवाडांतून लौकर दिल्लीकडे येण्याचा रंग दिसत नाहीं व अलीबहाद्दुरांनीं इकडील सर्व कारभार अटपाव असें सुचवून पाटीलबावांचें म्हणणें या लेखकानें नाना फडणीसास या शब्दांत कळविलें आहे. "आम्हांस इकडे बहुत दिवस जाले, लोकांचा गवगवा फारच आहे. यामुळें तूर्त उज्जनीस जाऊं. आमचा तों इरादा हाच आहे कीं श्रीमंतांचे प्रतापेंकरून मुलुख आहे त्याचा त्यांनीं आपले स्वाधीन करून घ्यावा. आमचा तों कोणे गोष्टीचा आग्रह नाहीं. परंतु सरकारनक्ष राहे अशी गोष्ट असेल ती करावी इतकें मात्र आमचें म्हणणें आहे. बाबास (गुलामाचें पारपत्य केल्याचें) यश यावें म्हणजे यांचा लौकिक चहूंकडे होऊन दाब पडेल. होळकर देशीहून इकडे येण्यास निघाले त्यापासून आम्ही सुरळीतपणाचीं पत्रें पाठविलें; व राजश्री आंबोजी इंगळे यांस हि महेश्वराचे मुक्कामीं पाठविलें कीं, तुम्ही व अलीबहादर या भांतीं लौकर येऊन, त्रिवर्ग फौजा एकत्र होऊन शत्रूचें पारपत्य करूं. त्यास तेहि श्रीमंतांचे प्रतापेकरून आमचे हातून गोष्ट घडल्यानंतर हि लिहीत गेलों, कीं इकडील बखेडा मोडण्यांत आला; परंतु तुम्ही इकडे येऊन बंदोबस्त करावा व आपली वांटणी हि घ्यावी. कोणे गोष्टीचा खिलाफ आमचे तर्फेनें नाहीं. मुद्याच्या गोष्टी इंगळे यांजपासी बोलिले, त्याप्रमाणें मान्य करून निखालसपणें त्यांस पत्रें आजपर्यंत लिहीत गेलों. परंतु आम्ही लिहितों हे कांहींच गोष्ट त्यांचे चित्तास नाहीं. आतां लिहिण्याची पराकाष्टा राहिली नाहीं. व पुण्यास हि याप्रमाणें च लिहिवीत गेलों कीं त्यांनीं लौकर येऊन इकडील बंदोबस्त राखावा. आमचे लोकांस बहुत दिवस जाले; अतःपर राहाणें लोकांमुळें इकडे होत नाहीं.......उदेपूरचे संस्थान ( आजपर्यंत ) जयपूर व जोधपूर वाले या उभयतांचे मिळणीखेरीज होते. इतके दिवस सरकारक्षानें आम्ही व ( उदेपूरचे ) राणाजी चालिले. त्याचें फळ हेंच प्राप्त जालें कीं राणाजीसी जे कारभारी द्वेषी होते व शत्रु मारवाडी त्यांचे स्वाधीन त्यास ( होळकर ) करणार. परंतु करणारानीं हि पुढें आपला विचार पाहावयाचा होता. कोटेवाले हरकसे करून आपला बचाव करून राहतील; अथवा दबाव पडल्यानें त्यांत च मिळतील. परंतु तिन्ही संस्थानें एक जाल्यावर गोष्ट भारी च पडेल. सरकारलक्षानें जे आजपर्यंत चालत आले त्यांजवर होळकरांनीं हा विचार आचरण करावा ही गोष्ट उत्तम नाहीं. कां कीं आजपर्यंत रांगड्याचीं पारपत्यें आंतचे आंत फूट पाडून च होत गेलीं. आतां होळकरांनीं तिन्ही संस्थानें एक करून यावी व कोटेवाले त्यांचे मिळणींत मेळवावे हें केलें आहे. यांत आपला हि परिणाम त्यांनीं काय पाहिला असेल, तो न कळे. रांगड्यांचा हि इरादा आंतून हा च आहे कीं दोन्ही संस्थानें आपले मिळणींत आल्यावर दक्षिणीयासि जाय याचा, परंतु हें होळकरांचे चित्तांत कांहीं च येत नाहीं आणि मार-

वाडी सांगतात त्यांप्रमाणें च करीत जातात. .... आमचें लक्ष हें च आहे कीं, ज्यांत सरकार काम घडोन येई ती गोष्ट सर्वांनीं मिळून अचारण करावी; आपसांत फूट दुसरेयास समजूं न यावी. याकरितां आम्ही वारंवार लिहीत गेलों कीं तुम्ही इकडे यावें; इकडील बंदोबस्त आजपर्यंत आम्ही राखिला; आतां तुम्ही राखावा. परंतु हें त्यांचे ध्यानांत च नाहीं त्यापक्षीं लिहून हि इतःपर फळ नाहीं. आमचे लोक इकडे आम्हांस राहू देत नाहींत. इकडील सर्व खिलाफ श्रीमंतांचे प्रतापेकरून मोडण्यांत येऊन दिल्लीचें संस्थान सातान्याप्रमाणें जालें आहे. याचा बंदोबस्त करावा. अलीबहाद्दूर इकडे आले आहेत. त्यांचे च अंगावर आज आम्ही टाकून उठून जातों असें हि नव्हे. परंतु लोकांस बहुत दिवस जाले व पैशाची वोढ. यामुळें आम्ही लोकांचे स्वाधीन. लोक आम्हांस राहू देत नाहींत. तेव्हां माळव्यांत जाऊन लोकांचा उलगडा पाडूं. सारांश होळकर इकडे आल्यानें फूट न दिसतां, हिंदुस्थानी दबून इकडील बंदोबस्त राहील व रांगडे हि सहज दबळे जाऊन सर्व राजकारणास ठीक पडेल."

नानानीं पाटीलबावांच्या धोरणास दुजोरा देण्यासाठीं तुकोजीस लिहिलेल्या पत्रांत शत्रूची दुही कायम ठेवण्याबद्दल स्पष्ट लिहिलें आहे. ते म्हणतात:-

हल्लीं परस्परें ऐकण्यांत आलें कीं आपणाकडे त्यांचे ( जैपूर व जोधपूरचे ) वकील आले आहेत, आपणास मिळवून घेऊन पाटीलबावास उधळून द्यावें असे बोलतात; व उदेपूरकर व कोटेकर हे पहिल्यापासून सरकारलक्षांत. त्यांचे व जयपूरकर यांचे विरुद्ध होते; तें सरकारउपयोगी होतें. परस्परें राजेरजवाडे यांत फूट असल्यानें यांत सरकारउपयोग असें आहे. हल्लीं उदेपूरकरांचें व उभयतांचें ऐक्य करून दिलें; व कोटेकराचे मुलखांत उभयतां कडील फौज व कांहीं आपलेकडील जाऊन उपद्रव होत आहे, व त्यांची उभयतांची एकी करून द्यावी असें होणार म्हणून ऐकिलें. त्यांत सारे राजे एक हें ठीक नाहीं. दिल्लीचा बंदोबस्त जो करील त्यास हे सारे एक असल्यानें ठीक पडणार नाहीं. कोणेसमयीं काम करितील हा भरंवसा नाहीं. यांत फूट असल्यानें चांगलें, असें आहे. आपण पहिल्यापासून यांचे रीतीस व चालीस माहीत च आहेत. त्याहावें असें नाहीं. व आपण असें करणार हि नाहींत. परंतु गोष्ट ऐकली याजकरितां लिहिलें आहे. तर कोटेकर यास उपद्रव लागूं नये व उदेपूरकर व कोटेकर यांचीं एकी असूं नये असें करावें. ......तिकडे पाटिलबावावर मसलत. फौजेचे बळाखेरीज त्यानीं तरी काय करावें ? आपण व ते एक होऊन फौजेचा जमाव होऊन सर्वांवर दाब बसोन कामच होईल. बखेडा लौकर मोडेल. सरकारचा नक्ष राहील. यांजकरतां लौकर जाण्याचें करावें. या उपर दिवसगत लागल्यानें सरकार काम बिघडेल.

पाटीलबावांचा दिल्लींत निर्वेधपणें अंमल प्रस्थापित झाला व इकडे टिपूच्या मोहिमेवर इंग्रजांच्या मदतीस जाण्याचा करार मराठ्यांनीं या च वेळीं केला. तेव्हां अशा अनुकूल

संधींत हिंदुधर्माच्या दृष्टीनें एक काम उरकून घेण्याचा नानांनीं प्रयत्न केला. त्यांनीं अलीबहादूराचा दिवाण भिकाजी नारायण यास एका पत्रांत लिहिलें आहे:-

"श्रीकाशींत श्रीविश्वेश्वराचे देवालय हजार वर्षांचे सर्वांस ठाऊक आहे. त्यास अलीकडे पातशाईत कोणी काय समजाऊन मसीद केली. त्यास विश्वेश्वराचें स्थळ मोकळें होऊन पूर्ववत देवालय व देवस्थापना व्हावी हें हिंदुधर्मास योग्य आहे. ह्या कालीं पातशाहाजवळ उद्योग केलियास होईल असें आहे. त्यास ऐसी गोष्ट जाहली कीं फिरोन दावा न राहे. पूर्वापर मजकूर पातशाहास समजाऊन कधीं कोणास उपद्रव न होयसें पत्र करून घ्यावें. या गोष्टीचा उद्योग जरूर करावा. सांप्रत कालीं काशींत इंग्रजांचा अंमल आहे. ते कोणाचे धर्मास अडथळा करीत नाहींत. येविसीं त्यासी बोलतां येईल. विश्वेश्वराचे स्थळीं वस्ती असल्यास त्याचे इमल्याचा पैका देविला जाईल. परंतु पातशहाची परवानगी निर्वेधपणें जाहली पाहिजे." परंतु पाटीलबावास ही गोष्ट पसंत नव्हती. "ही गोष्ट केल्यानें सर्वा यवनांस वांकडें वाटेल. अस्फद्दौला (औधचा वजीर) व इंग्रज एक आहेत. त्यापक्षीं त्यांचींही इंग्रजास भीड पडेल." असें पाटिलबावांनीं लिहिलें.

आतां आपण परत गुलाम कादराकडे जाऊं. अलीबहादर व राणाखान यानीं वेढा दिल्यामुळें गुलाम मेरठेंत अडकला. तो घाबरून भेटीस आला. पण प्रत्यक्ष मराठ्यांच्या सैन्यांत न येतां बाणाचे खाच्याच्या मोरचाजवळ उभा राहिला. तेथें देवजी गौळयानें जाऊन "पुढें रायाजी पाटलांस भेटण्यास चला" असें सुचविलें. तेव्हां 'रायाजी पाटील एकटे आले तर मी भेटेन, नाहींतर माघारा जाईन' असें त्यानें उत्तर दिलें. इतकें होईतोंवर संध्याकाळ झाली व तो परत किल्ल्यांत गेला.

या वेळच्या परिस्थितीसंबंधानें अलीबहादूर म्हणतो "कची हकीकत समजण्यांत येत नाहीं; त्यांचीं त्यांचीं काय खलबतें होतात, यांचे वकील तेथें जातात, व त्यांचे येथें येतात, मजकूर गुप्त आहे. सारांश द्रव्याचें कार्य आहे. कळ सान्यास च लागली आहे. याकरितां सरकारांत समजावयास मानस दुसऱ्याचें होत नाहीं. जरबेनें विचारावें तर ज्याची जमीयत अधीक तो जबरदस्त. राजश्री तुकोजी बावांजवळ होतों तेव्हां हि हीच अवस्था जाहाली. आंतूनच खंडण्या करीत. सरकारांत एक पैसा देसील दिल्हा नाहीं. मुख्य ज्याची फौज फार तो जबरदस्त." आपसांत अशी कुरबूर चालली असतां व पंधा दिवस गोळागोळी चालूं असतां गुलाम कादर एके दिवशीं फौजसुद्धा ठाणें सोडून चालला. तेव्हां मराठी सैन्यानें त्याच्या सैन्याचा पाठलाग केला. हें पाहून गुलामकादर सैन्य सोडून एकटा च पळून गेला. नंतर दुसरे दिवशीं दहा बारा कोसांवर एका गढींत बसला आहे अशी बातमी आली व अलीबहादुरानें कृष्णराव हरी यांचे पथकास गुलामास पकडण्याची कामगिरी दिसेंबर १७८८ त सांगितली. त्यानें त्यास धरून आणून अलीबहादुराच्या स्वाधीन केलें, त्यानें त्याची रवानगी पाटीलबावाकडे केली; आणि

शेवटीं त्यांनीं गुलामाचे डोळे, नाक काढून दिल्लीस मार्च १७८९ त पातशहाकडे पाठविलें व तेथें 'विपत्य' करून मारविला.

गुलामास धरल्यावर जोधपूर जयपूरची मसलत करावी अशी अलीबहादूराची सूचना होती. परंतु पाटीलबाबांनीं लिहिलें कीं, 'गुलामाची आई पळाली आहे, तिणें पातशाही असबाब बराबर नेली आहे, तिजला धरवावी' अलीबहादूराचें म्हणणें असें कीं 'ही मसलत सध्या हलकी दिसते; पण पुढें जड जाईल. कां कीं, ती शिखांत गेली आणि त्यांचा पाठलाग करावा तर पैका लाभणें कठीण च आहे, व मसलत लांबेल. शिखांचा भरणा फार आहे.' परंतु कसें हि करून तिला हस्तगत केली च पाहिजे असा पाटीलबावांचा आग्रह पडल्यामुळें अलीबहादूर गोसगडास आला. तेथून आपलें सैन्य व रायाजी पाटील यांची फौज पुढें पाठवून तो स्वतः कुंजपुऱ्यास आला. इतक्यांत पाटीलबावांचें पत्र आलें कीं 'आपले कारभारी, फौज व आम्हां-कडील फौज तेथें ठेऊन आपण सडे दोन तीन शें स्वारांनसी येथें मथुरेस यावें. आपलें आमचें येथें बोलणें होऊन मुलूख आपला आटोपावा.' परंतु अलीबहादूराच्या मनां-तून नाना फडणिसाकडून उत्तर येईपर्यंत उत्तरेकडील कारभार आपल्या अंगावर घ्यावयाचा नसल्यामुळें त्यानें अनेक सबबी पुढें करून उत्तर लिहिलें तें असें 'आम्ही येथें मोहीमसीर आलों. मागें उलटोन सडे यावें तर फौजेंत आंदेशा पडेल. कां कीं, शिखाची फौज चाळीस हजार पावेतों तीस चाळीस कोसांवर राहिली आहे. त्यांत आपली फौज उपाशी. रोजमुरा देखील मिळत नाहीं. गवगवा आहे... ... हल्लीं गुलामाचे आईचा बंदोबस्त करून लौकर येतों."

यानंतर नाना फडणीसाच्या पत्रास उत्तर लिहितांना अलीबहादूर म्हणतो "आपले पत्राचे अन्वयें इकडील आपले गळा लाऊन घेत नाहीं. कदाचित् त्यांनीं बळ च केलें तर आम्ही साफ सांगूं कीं, आम्हांस सनद श्रीमंतांची आणावी, कीं मामलत तुम्ही संभाळा, तर आम्ही संभाळूं. जर न च ऐकत, आम्हांवर टाकून जाऊं च लागले तर आम्ही हि यांचे बरोबर च येतो. ते तर आमचे गळा टाकून जाणार हा निश्चय. त्याअर्थी त्यांचे बरोबर च येणें घडेल. आतां ( आम्ही ) निक्षून बोलूं कीं, आम्हांस फक्त आपले कुमकेकरितां पाठविलें आहे. किल्ले मुलुखास आज्ञा मागवा; मग घेऊं. बिन आज्ञा कैसे घेवतें ! याप्रमाणें उत्तरें प्रांजल करतों."

यानंतर फारच आग्रह पडल्यामुळें अलीबहादूरानें आपलें सैन्य सदाशिवपंत दिवाण यांचे हवाली केलें व तो कुंजपुऱ्याहून मथुरेस पाटीलबावांचे भेटीस आला. भेटींत कोणता विषय निघणार व त्यास उत्तरें काय द्यावयाचीं हें अली बहादूरानें ठरविलें होतें यामुळें तो गडबडला नाहीं. परंतु पाटीलबावांच्या मनांतून आपल्या अंगावर कारभार टाकून देशीं जावयाचें सरासरच आहे व हा कारभार आपणास संभाळतां येईल अशी अलीबहादूराची समजूत होती असें दिसतें. तो नानास लिहितो "पाटीलबावांचें मनापासून आहे कीं आम्ही हा मुलूख आटोपावा, आणि दहा

हजार स्वार व चार हजार पायदळ घ्यावें. त्यास आपचें म्हणणें तर आम्ही येत नाहीं. यावरून बहुत नाखुष आहेत. त्यास आम्हांस आपली मर्जी मुख्य. परंतु पाटीलबावांचा आपला स्नेह. तेव्हां ते आपल्यासंगें बहुत श्रमी होतात याकरितां आपणास सुचवावें म्हणून वारंवार लिहिलें आहे. पाटीलबावांनीं फौज व फौजेचे पैक्यांचा बंदोबस्त करून दिल्यास बहुतकरून चिंता नाहीं, आटोपला जाईल असें वाटतें. कांहीं एक दोन शैल्य आहेत त्यांचा देखील बंदोबस्त करून मग हवाली करूं म्हणतात. त्यापक्षीं मुलूख सरकारांत येतो, आणि फौजेचा बंदोबस्त त्याजकडेस; असें पक्कें ठरलें तर बाध दिसत नाहीं. त्यास ते मुलूख देऊन बहुत संतोषी होतात आणि मुलूख त्याजकडेच असल्यास आपल्या संगे श्रमी होतात म्हणतात कीं नानासीं माझा इतका स्नेह, आणि मीं सरकारांत चोरी किंवा हरामखोरी केली नाहीं कीं, मला धन्याचे पाय नजरें न पडावे. सरकारआज्ञेवरून खर्चाखालीं जेरबार जालों; व आणखी हि उमेद बाळगीत आहे कीं सरकारांत चाकरी जिवांत जीव आहे तों करावी. सारांश, त्यांचे मानस कांहीं येथें रहावयाचें दिसत नाहीं. आम्ही न राहिलों तर आणखी कोणाचे हवाली मुलूख करून देशास जावें हा बेत बहुत दिसतो.' 'आणखी कोणाचे हवाली' याचा खुलासा दुसऱ्या एका भेटींत पाटीलबावांचे सरदारांनीं असा केला. 'तुम्ही न राहिल्यास मुलूख आम्ही फिरंग्याचे स्वाधीन करूं अथवा आमचे मनास वाटेल त्याचे हवाली करूं आणि देशास जाऊं. आम्हांस देशास जाणें अगत्य, याकरितां आम्ही रहात नाहीं. तुम्ही राहिल्यास तुमचा बंदोबस्त मजकडेस व सरकारचा अपराध मी आपले पदरीं घेईन. तुम्ही येविसींची काळजी करूं नये." यास अलीबहाद्दुरानें उत्तर दिलें तें गमतीचें आहे. तो म्हणाला 'तुम्ही मातबर सरदार, तुमची जरब या प्रांतांत; तुम्हाजवळ पोक्त सरंजाम; आणि कोट्यानकोटीचा मुलूख सरंजाम तुम्हांस असतां हिंदुस्थानी-यानी तुम्हांस जरब दिल्ही. आम्हीं तों गैरमाहीत, आणि आम्हांजवळ सरंजाम किती? श्रीमंताकडून सरंजाम यावा, पैका यावा, त्यास तिकडील वोढ आपले ध्यानांतच आहे. त्यास निभावणी कशी होईल?" अशा प्रकारें उत्तरें प्रत्युत्तरें काय होत असत याचे अनेक मासले या पत्रव्यवहारांत पहाण्यास सांपडतात. परंतु ते सर्व येथें दिल्यास फार पाल्हाळ होईल याकरितां एक दोन उतारे देऊन हें प्रकरण आटोपूं. दिल्लीकडील मोहिमेच्या उत्पत्तीसंबंधानें पाटीलबावा एकदां म्हणाले "आम्हांस सरकारांतुन कितीक पत्रें पाठविलीं कीं, हा बंदोबस्त फिरंगी यांजकडे न जातां आपलेकडे राखावा. याविसी खर्च हि पडला तरी चिंता नाहीं. आम्ही सरकारांतून मदत करूं. फिरंगीयाचा पाय पातशाहाजवळ पडों न यावा. तेव्हां आम्ही हा कार-भार हरएक तऱ्हेनें मसलती करून आपल्याकडे आणिला. नाहीं तर, आम्ही गोहदचा बंदोबस्त करून देशास जाणार होतों. देशीं गेलों असतों तर खर्चाखालीं कशास आलों असतों? आजपावेतों सरकार—चाकरीस अंतर केलें नाहीं. खर्चाखालीं आलों.

अंगमेहनत केली. धन्याचा नक्ष राखिला. इतका मुलूख बदललला परंतु साऱ्यांचें पारिपत्य केलें. चाकरी दहा वर्षें केली. हल्लीं फौज तुमची राहात नाहीं. आणि आम्हांस देशास जाणें अगत्य. त्याकरितां तुम्ही हा कारभार सांभाळावा. "

शेवटीं एके दिवशीं पाटीलबावा म्हणाले 'तुम्हांस पुण्याहून ताकीद आहे कीं आम्ही सांगू तें ऐकावें. त्यास आम्ही सांगत असतां ऐकत नाहीं. त्यास हें मान्य करावें अथवा नाहींतर 'नाहीं' साफ सांगावें. कदाचित पुणेकरानीं मनाई केल्यास चिंता नाहीं. आम्ही सांगूं. त्याची निभावणी करूं' तेव्हां अलीबहादर धमकी देऊन म्हणाला 'आमचा बंदोबस्त कसा करून देतां ? आमची फौज तेरा हजार; त्याखेरीज वीस बेवीस हजार स्वार व पंधरा हजार पायदळ. एकूण सारा जमाव पन्नास हजाराचा; व त्याचे खर्चवेच सारे झाडोन बंदोबस्त करून द्यावा. पुण्याहून एक पैसा येणार नाहीं व हर एक विषयीं जाबसाल आमचा कमती भरतीस करावा लागेल. हा जाबसाल कबूल करीत असल्यास मान्य करीतों एक, अथवा नाहींतर महिनाभर दम खावा. आम्ही आपली जागा हर एक विचार करून जें सांगणें तें सांगूं." या उत्तरास अर्धवट होय नाहीं असें पाटिलबावा तर्फे चाललें होतें. तेव्हां अलीबहादुरानें शेवटीं ठासून सांगितलें कीं 'बहुत उत्तम आहे. संभाळूं. परंतु आपण पैका मागता, वेळेला बेजार होऊं नये' म्हणजे 'मी खर्चास पैसे मागेन तेव्हां मात्र तुम्ही कंटाळू नका.' शेवटीं पाटिलबावाच्या पक्षास पड घ्यावी लागली. ते म्हणाले ' बरें आहे, महिन्या भरांनीं काय विचार करून सांगणें तो सांगावा. पाडव्यापावेतो दिवस तुमचा व मग आमचा आम्हीं सांगू तें ऐकावें. ' अलीबहादुरानें यावरहि असें बजावून ठेवलें कीं 'मान्य करणें अथवा न करणें हें तेव्हां सांगूं. ' या एकंदर प्रकरणांत ' पाटीलबावांच्या मनांतून खरोखरच आपल्या हातून कारभार करवावा असें आहे ' ही समजूत अलीबहादुराची दिसते. परंतु ती योग्य नसून पाटीलबावा अलीबहादुरास एखादेवेळीं तोंडघशीं पाडतील असा नानांचा अभिप्राय होता. जैपुर, जोधपूरकर व इस्माइल बेग यांच्या राजकारणांत अलीबहादुर ढवळाढवळ करूं लागला, तेव्हां नानांनीं त्यास स्पष्ट इषारा दिला आहे तो असा. 'तुम्हांस मात्र भ्रम वाटत होता कीं, पाटिलबावा, इस्माइलबेग व जैपूर जोधपुराकडील राजकरण आमचे हातें करवितील. परंतु ही गोष्ट तुमचे हातें करवितील असें होणार नाहीं. तुम्हांस सर्व गोष्टीचे अनुभव येतील. बहुत संभाळून चालत जावें. तुम्हांसीं निखालस बोलून एखाद्यास कागद लिहिवितील. तुम्ही ल्याहाल. तो धरून बोलूं लागतील कीं अलीबहादर असे फितूर करतात. तुम्ही म्हणाल पाटिलबावांचे सांगितल्यावरून लिहिला. ते म्हणतील आम्हीं सांगितलें नाहीं. अशावर आणतील. याकरितां कोणाचें राजकारण करा म्हणाले, अथवा पत्र ल्याहा म्हणाले, तर तुम्ही त्या मजकुराची याद लिहून, त्यावर त्यांचे हातचे कांहीं करून घेऊन मग करणें तें करावें.' पाटीलबावांसंबंधी नानांचा हा अभिप्राय फार च कडक आहे. परंतु प्रत्यक्ष अनुभव आल्यावर त्यांचें हें मत बनलें असावें. सालबाईच्या तहासंबंधीचे बरेच कागद काव्ये-

तिहास संग्रहात 'पत्रे यादी वगैरे' या पुस्तकांत छापलें आहेत; ते वाचीत असतांना देखील असेंच वाटतें कीं पाटीलबावांच्या मनानें एकवेळ अमूक गोष्ट करावयाची असें घेतलें कीं ते वाटेल तें बोलून व वाटेल तें करून आपला बेत सिद्धीस नेल्य.-वांचून सोडीत नसत.

येथवर सांगितलेल्या प्रकारांत आपसांत मतभेद असला तरी त्याची विशेष फिकीर करण्याचें कारण नव्हतें; थोडा बहुत राग एकमेकांचा एकमेकांवर होईल, बोलण्यांत कोट्या लढवितील किंवा निरूत्तर होऊन चिडतील; परंतु विशेष काळजी करण्यासारखें कांहीं नव्हतें. मतभेद हा मराठ्यांच्या स्वभावाशीं अगदीं खिळलेला दुर्गुण, तो सामान्य प्रसंगीं जेथें तेथें दिसतच होता. परंतु या अलीबहाद्दरानें जेव्हां हिंमतबहाद्दराचा पक्ष उचलला असें दिसलें तेव्हां पाटिलबावांना जो राग आला त्याचें स्वरूप मात्र भयंकर होतें. कारण त्याच्या मुळाशीं कांहीं भोळेपणाच्या धार्मिक समजुती, मानापमानाच्या कल्पना व दुराग्रह दोन हि पक्षाकडे उत्पन्न झाला होता. या प्रकरणाचें थोडक्यांत वर्णन करून मी माझा निबंध आटोपतों.

अलीबहाद्दरानें प्रथम गुलामाचा व नंतर पाटीलबावांचा पक्ष धरून आपलें प्रस्थ दिल्ली दरबारांत कायम केलें होतें. तथापि त्याचा जेपूर, जोधपूरकर व इस्माईलबेग यांच्याशीं पत्रव्यवहार अंतस्थ रीतीनें होत असे; यामुळें त्याच्याविषयीं मराठे नेहमीं साशंक असत. नंतर एक वेळ पाटीलबावा आजारी पडले. तेव्हां पुष्कळ औषधोपचार केले, तरी गुण येईना. शेवटीं ज्योतिषांचा विचार घेण्यांत आला. त्यांनीं असा निर्णय दिला कीं 'हा शारीरिक रोग नव्हे. कोणी प्रयोगादिक केलें आहे.' तेव्हां अनुष्ठानास ब्राह्मण घातले. अशा रीतीनें उलट उपचार होतांच पाटीलबावास आरोग्यता होऊन थोडेसें शरीरास आराम वाटों लागलें. तेव्हां बारकाईचा शोध सुरू झाला व 'जेपूरवाल्यांनीं अनुष्ठानास ब्राह्मण घालून हा प्रयोग नेहमीं चालविला आहे व हिंमतबहाद्दरानें हि अनुष्ठानाचा प्रयोग मुख्यास समाधान नसावें याजकरितां केला आहे' अशी माहिती लागली. यानंतर या गोष्टीच्या चौकशीकरितां अलीबहाद्दरांचे कारभारी सदाशिवपंत, शिवाजी विठ्ठल, बापू व गोपाळराव त्रिंबक या तिघांचें कमिशन नेमण्यांत आलें. त्यास 'ही गोष्ट खरी किंवा खोटी याची पुर्तेपणें चौकशी करून आम्हांस सांगणें. मग त्याप्रमाणें बंदोबस्त करावयासी येईल' असें पाटिलबावांनीं कमिशनमधल्या मंडळीस बजावून इतर कारभारी मंडळीस देखील या कामीं मदत देण्याविषयीं सांगितलें. शेवटीं 'हिंमतबहाद्दर गोसावी यानें अनुष्ठानास ब्राह्मण घालून प्रयोग केला खरा' ही गोष्ट सर्वांचे मुखें ठरली. यानंतर पाटिलबावांनीं रायाजी पाटील व लखबादादा आमयास होते त्यांजकडे गोसाव्यास धरून आणण्याची कामगिरी सोंपविली. ही बातमी गोसाव्यास लागली व तो शें दोनशें माणसांनसी तयार होऊन बसला, तों इतक्यांत हे दोघे जाऊन पोहोचले. तेव्हां गोसावी जलदी करून घोड्यावर स्वार होऊन बाहेर निघाला आणि 'मी राजश्री

पाटिलबावांकडे जातो' असें म्हणूं लागला. रायाजी व लखबा मागून चालले होते. गोसाव्याच्या गोटापुढें, अलीबहाद्दराचा; व त्याच्या हि पुढें पाटिलबावांचा गोट होता. अशा स्थितींत लखबानें गोसाव्यांशी लगट केली तों च गोसावी जलदी करून अलीबहाद्दराच्या डेऱ्याकडे निघाला. तेव्हां या दोघांनीं त्याला तिकडे जाऊं नका असें सांगितलें. परंतु तो तसा च रेटाई करून डेऱ्यांत जाऊन बसला आणि 'श्रीमंतांच्या जरीपटक्याजवळ आलों. आतां माझे अंगीं मुद्दा शाबूत करावा. नंतर जें करणें तें करावें' असें म्हणूं लागला. तेव्हां लोक मोठ्या पंचाइतींत पडले. अलीबहाद्दरानें गोसाव्यास धरून कैद करून पाटिलबावांकडे पाठवावा तर लौकिकास ठीक पडेना. तथापि त्यानें असा निरोप पाठविला कीं 'हिंमतबहाद्दर गोसावी याजला इकडे येऊं न देतां परभारें आपले तेथें न्यावा, तो अर्थ घडला च नाहीं. असो हल्लीं गोसावी येथें बसला आहे. आपल्यास कळेल त्याप्रमाणें बंदोबस्त करून न्यावा.' त्याजवर पाटिलबावाचें उत्तर आलें कीं 'तो चोर आमचा आहे. तो आमचा आम्हांकडे पाठवून द्यावा. अगर त्यानें आमच्या डेऱ्यास यावें. मग जो विचार करणें तो करूं.' तेव्हां अलीबहाद्दर पुनः म्हणाला "आपला चोर आहे तो घेऊन जावा. आम्ही येविशीं अडथळा करीत नाहीं." पाटिलबावांनीं यानंतर चार हजार स्वार तयार करवून अलीबहाद्दराच्या गोटांत गोसाव्यास धरण्यासाठीं पाठविले. तीन चार दिवस झाले तरी गोसावी हातीं लागेना. हल्ला करावा तर अलीबहाद्दराच्या लष्करांत गर्दी होऊन भलत्या च थरावर गोष्ट जावयाची; पण लष्करांत मात्र उगा च गडबड उडून गेली होती. तेव्हां अलीबहाद्दरानें बळवंतराव, आपाजीपंत दामले व भिकोबा पाळंदे या तिघांना पाटिलबावांकडे पाठवून कळविलें कीं "हिंमतबहाद्दर आमचे लष्करांत. आज तीन चार दिवस जाहले, अद्याप त्याजला नेत नाहीं आणि कांहीं तोड हि पाडीत नाहीं, तेव्हां आम्ही पुढें कोणता विचार करावा? यास्तव त्याजला कांहीं वचन कथन देऊन मोडून टाकावा अगर आपले मर्जीस येईल त्याप्रमाणें करावें. परंतु याउपर बेदा नसावा." पाटिलबावांनीं हें ऐकून घेऊन 'तुम्हीच तोड काढा' असें मोघम कळविलें. तेव्हां पाळंदे म्हणाले 'आम्हांस तोड पाडावी म्हणोन आज्ञा होते, त्यास उत्तम आहे. परंतु आपले कडील दोन गृहस्थ चांगले द्यावे. म्हणजे ते व आम्ही मिळोन गोसावी यास वचनकथन देऊन, जावसाल कोणते तोडीवर येतो तें पाहूं.' ही गोष्ट पसंत पडून रायाजी व कृष्णोबा चिटणीस यांनीं या तिघांच्या बरोबर जावें असें ठरलें. यानंतर खरे पहातां अलीबहाद्दराकडील तीघांनीं पाटीलबावाकडील रायाजी व चिटणीस यां दोघांना बरोबर घेऊन जावयास पाहिजे होते; पण तसें न करतां आपणच परस्पर निघून गेले आणि या दोघांना आणण्यासाठीं विठ्ठल हरी वकील याला तेथें ठेवलें. पण पाळंदे वगैरे अलीबहाद्दराच्या गोटांत पोचले नाहींत तोंच पाठोपाठ हे दोघे गेले. पण त्यापूर्वीच पाळंदे वगैरे आपापल्या राहुटीस गेले होते व त्यांनीं या पाटीलबावाकडील मंडळीची विचारपुस केली

नाहीं. तेव्हां ते माघारीं आले व पाटीलबावांना सर्व प्रकार सांगितला. त्यांची भवति न भवति चालली होती इतक्यांत अलीबहादुराकडून निरोप आला कीं 'आम्हीं हिंमतबहादर यांजला वचन कथन दिलें कीं तुजला पाटीलबावाचे हातीं देत नाहीं. परंतु तुझी दौलत येथें जितकी असेल ती झाडोन आम्हांजवळ आणोन द्यावी आणि मुलामाणसासुद्धा आमचे कैदेंत राहणें. त्याजवरून गोसावी याणें मान्य करून उत्तर केलें कीं मी आपले कैदेंत राहतों. परंतु माझी -चौकशी पुर्तेपणें करावी. जर करतां मजकडे दोष च आला तर जितकी माझी दौलत आहे ती आपण सरकारांत लावणें. आणि मजला कैदेंत ठेवणें. याप्रमाणें जाबसाल ठरण्यांत आला.' हा निरोप ऐकतांच पाटीलबावांची मर्जी बहुत खट्टी झाली. 'रायाजी पाटील व कृष्णोबा चिटणीस यांजला पाठविलें असतां त्यांचे विद्यमानें जाबसाल न होतां, त्यांगींच आपले जागा गोसावी यांस वचन कथन काय म्हणोन दिलें ? आमचा चोर आम्हांकडे पाठवुन द्यावा तरच ठीक आहे' असें पाटीलबावाचें म्हणणें पडलें. अलीबहादुर म्हणे कीं "गोसावी आमचे डेऱ्यास चालोन आला, याअर्थी आम्ही कसा द्यावा ? त्यांत प्रथम आला तेव्हां च आम्ही सांगोन पाठविलें कीं चोर आपला घेऊन जावा. तेव्हां आपली आज्ञा जाहली कीं, त्याची तोड तुम्ही पाडणें. त्याजवरून आम्ही त्याजला सदरहु अन्वयें वचन कथन देऊन जाबसाल ठरण्यांत आणिला. त्या अर्थी आम्ही आतां हातीं देत नाहीं."

परंतु पाटीलबावांस हा न्याय पसंत नव्हता. प्रसंग पडल्यास 'हरामखोरास इमान देऊन पारपत्य केल्यास चिंता नाहीं' असें त्यांचें म्हणणें होतें. परंतु ते अलीबहादरास पटेना. तेव्हां त्याचा दिवाण सदाशिव शामराज पाटीलबावांना म्हणाला 'आमची आणप्रमाणहि राखावी आणि गोसावी याचा हि बचाव करावा, हें तुमचे हातीं आहे. गोसावी यांसी आम्ही तुमचे हवालीं करतों. तुम्ही अन्याय बक्षीस करून राजश्रि शिवाजी विठल बापू यांजपासीं दहावीस स्वारानसीं चाकर ठेऊन चालवावें म्हणजे सर्व गोष्टी होतात. राजश्रि अलीबहादरबाबाचें स्वरूप येणें करून राहतें.' अर्थात् हरामखोरास इमान देऊन पारपत्य करणें जर पाटीलबावांना खरोखरीच पसंत असते तर त्यांनी यावेळीं तशी संधी होती. परंतु त्यानीं फक्त वादाच्या भरांत पुढें केलेले ते शब्द होते. त्यांनीं सदाशिवरावास साफ सांगितलें पुढें 'गोसावी याचे गोर्दाशिवाय जें सांगाल तें ऐकूं. आमचा मारेकरी गोसावी त्याची मुक्तता कैसी होईल ?' अशा तऱ्हेनें गोसावी प्रकर्ण फार च वाढलेलें पाहून तुकोजीस देखील मध्यस्ती करावीशी वाटली. त्यानें पुण्यास श्रीमंतांकडे एक पत्र पाठविलें होतें त्यांत असा मजकूर आहे "अनुपगीर गोसावी याचे प्रकर्णी राजश्री माहादजी शिंदें यांचें बोलणें जाहलें कीं गोसावी आला व प्रयोग करीत होता. त्याचा पक्ष चिरंजीव अलीबहादर यांनीं घरला, आणि त्यास वचन दिलें. त्यांत आमचा चाकर काय राहिला ? हिंदुस्थानांत सर्व आमचे दुश्मन. कोणासही मुख नाहीं. दाहा वर्षे श्रम

केले, त्याचें सार्थक याप्रमाणें जाहलें. पुढें इकडे राहून फल नाहीं. देशीं जावें, धन्याचें दर्शन घ्यावें, आज्ञा होईल तसें करावें. परंतु येथें राहणें याउपर होणार नाहीं. याप्रमाणें उदासपणें बोलतात. आपलेकडे ( = तुकोजीकडे ) परभारे तिकडील पत्रें येत होतीं. परंतु जाणें न जाहलें.... आपले जाणें न जाहलेमुळें सर्वांस दुही दिसली. शत्रूस बळ पडले. निरोपसमयीं हें च बोलणें पडलें होतें कीं, तिकडे राजश्री पाटिलबावांसीं मसलत भारी पडली आहे, याजकरितां आपण व अलीबहाद्दूर मिळोन लौकर कोठें न गुंतता जावें. उभयतां राजांसी ( = जैपूर जोधपूरकरांसीं ) वाद राखूं नये. वाद तोडून ये, तें होऊन, आपली हद्द सोडून मसलत करणार नाहींत. याप्रमाणें आपण मान्य केलें. परंतु जाणें लौकर न जाहलें. आपणांस चार दिवस लागावयाचें होतें तर अलीबहाद्दरास रवाना करावयाचें होतें. तें हि न जाहलें. शेवटीं त्यांनीं होऊन आपणांजवळ निरोप मागितला तेव्हां रवाना केलें. याउपर आम्ही हि तिकडे जात आहों. यांच्या व नबाबांच्या भेटी होतील संस्थानिकासी सलुखा राखावा याप्रमाणें बोलणीं होतील. त्यांनीं रुकार दिल्यास उत्तम. नाहीं तर येविशयीं आपणांस लिहावें लागेल.'

या पत्रांस उत्तर माधवराव नारायण म्हणजे सवाई माधवराव यांच्या नांवचें गेलें आहे. त्यांत असा मजकूर आहे. "संस्थानिकांकडे सरकारचा पैका येणें तो दरोबस्त; व अजमेरचा किल्ला पातशाही, यांनीं घेतला तो, वगैरे जाबसाल असतील ते उरकून दिले असतां पाटिलबावा हि ऐकतील असें वाटतें. आपलीं त्यांचीं निखालसपणें बोलणीं, ज्यांत विरुद्ध पडून सरकारनुकसानी व फूट दिसेल ती गोष्ट घडूं नये. हे निरोपसमयीं बोलणें जाहलें च आहे. पाटिलबावांची हि पत्रें आपणांस निखालसपणाचीं गेलीं च आहेत. आपण निखालसपणें ज्यांत सरकारकाम ती गोष्ट केली असतां पाटिलबावा ओढणार नाहींत."

अशा रीतीनें हें प्रकरण मुळांत यःकश्चित असतां बोलण्यावरून बोलणीं वाढत त्यास रंग चढू लागला. दोनही पक्षांनीं ही हकीकत पुण्यास नानांकडे कळविली. पाटीलबावांच्या पत्रास मान देऊन कदाचित् नाना आपल्या विरुद्ध निकाल देतील अशी अलीबहाद्दरास भीति वाटत होती. "शफत केली ते पाटिलबावांच्या सांगितल्यावर केली." इत्यादि मजकूर त्यानें नानांस कळविला. नानांनीं यास प्रथम तोड अशी काढली कीं गोसावी अलीबहाद्दराकडेहि नको आणि शिंद्याकडेहि नको त्याला अरुणच्या किल्ल्यांत सरकारच्या ताब्यांत ठेवावा. किल्लेदार चिमणाजी भानू यांस नाना लिहितात "अनुपगीर गोसावी व त्याचे पुतणे तीन आसामी यांस राजश्री अलीबहादर तुम्हांकडे अरुणांत कैदेंत ठेवावयास पाठवितील. त्यांस जागा मध्यावर चांगली, भोंवत्या चौक्या बसोन बंदोबस्त राहील असे स्थळांत ठेवावा. पुतणेसुद्धां त्यास शिधा उत्तम प्रतीचा व वस्त्रपात्र लागेल तें बराबर चाकरीचीं माणसें असतील त्यांस शिधा शिरस्तेप्रमाणें नेमणुकीची याद अलीबहाद्दर करून पाठवितील

त्याप्रमाणें देत जावे. गोसावी मातबर माणूस, मनसबेबाज, शहाणा आहे. पायांत बेड्या घालावयाच्या नाहींत. मोकळा च बंदोबस्तानें ठेवावा. विश्वास धरूं नये. तुम्हांजवळ काय बोलेल व काय मागेल व बराबर माणसें काय येतील तें व बातमी कच्ची वरचेवर तपशीलवार लिहीत जाणें." पण ही तोड अलीबहाद्दरास रुचली नाहीं. यानें देसील आपला 'नक्ष' राहणार नाहीं अशी त्याला शंका आली असावी. तेव्हां नानांनीं कडकपणा स्वीकारून पाहिला. त्यांनीं लिहिलें 'पाटिलबावांकडून तुम्हांसीं बोलावयास कोणी येईल. तें ऐकून त्याजकडे जाऊन गोसावी हवाली करावा आणि करारप्रमाणें पैका व मुलूख लाऊन घेऊन राहावें. सफाई करावी. हें न घडे, तर गोसावी झाशीस ठेवून देशीं यावें." या गोष्टीस अलीबहाद्दरानें कबुली दिली; परंतु ती मनापासून दिली नाहीं. त्यानें अनेक भानगडी उपस्थित केल्या व पाटिलबावा-कडून आमच्याकडे बोलावण्यासाठीं अद्याप कोणी आला नाहीं अशी पुण्याकडे तक्रार केली. तेव्हां नाना लिहितात "कृष्णगडवाला पाटिलबावांचें लक्षांत. त्याचें गांव (तुम्ही) लुटलें, जाळलें व नजफकुली व रावराजा यांस पाटिलबावांनीं गोकुळ-गडास इस्माइलबेगाचे पारिपत्यास रवाना केले असतां तुम्ही त्यास पत्रें व कारकून पाठवून राहाविलें. यावरून पाहतां तुम्ही अशा गोष्टी केल्या म्हणून पाटिलबावांनीं तुम्हांस बोलाविलें नाहीं. तें बरें च झालें असें दिसतें. अशा गोष्टी तुम्ही येथून लिहिलें असतां करूं नयेत. असो. जालें या उपर कोठें सटला न करितां व पाटिलबावांचें लक्षांत आहेत त्याशीं राजकारण न करतां उगीच मुक्काम करून राहावें. रामजी पाटील यांसी बोलणें जालें आहे. तें पाटिलबावांस लिहिणें तसें लिहितील. तुम्हांस आपलें जवळ येणेंविषयीं पत्र पाठविलें, होळकरांत सोडून त्यांजकडे जाऊन गोसावी हवाली करावा, आणि पूर्वीचे करारप्रमाणें बंदोबस्त करून देतील तो घ्यावा आणि राहावें. यांतून कांहीं च न घडे त्या अर्थी राहून फळ नाहीं. पूर्वीचें लिहिल्याप्रमाणें देशीं यावें. पाटिलबावांस वाईट वाटे असें करूं नये."

इकडे अलीबहाद्दराची धडपड गोसाव्या तर्फे चालली होती पण जवळची मंडळी अलीबहाद्दरास हें प्रकरण न वाढविण्याबद्दल सल्ला देत. शेवटीं पंचवीस हजार रुपये पाटीलबावानीं घेऊन गोसाव्यास सहा महिनें जामीनावर मोकळें सोडावें अशी एक शक्कल निघाली. ती बहुतकरून स्वतः गोसाव्यानेंच काढली असावी. तेव्हां ती सिद्दीस नेण्यासाठीं अलीबहाद्दरानें आबा चिटणीसांशी बोलणें सुरू केलें. तो म्हणाला 'पाटीलबावांसी आम्हांसी सफाई व्हावी व त्यानीं आम्हांवर पूर्ववत ममता करीत जावी।' तेव्हां चिटणीस म्हणाले "गोसावीयास एकादे स्थळीं नेऊन पोंहचवावा, म्हणजे सफाई होईल." यावर अलीबहाद्दर बोलला 'तुम्हा सारिख्यास मध्यस्तीस घालून बोलावयाचें फल काय ? गोसावी पाठविला असतां मग तों ममता करतीलच. परंतु गोसाव्याची मुक्तता होऊन, त्यांची आमची सफाई होय अशी गोष्ट तुह्मांसारख्यांनीं

करावी." परंतु 'विना गोसावी स्थलांतरीं गेल्याशिवाय सफाई होत नाहीं' असें चिटणिसांनीं सांगितलें. तें ऐकून 'जर तुम्ही आह्मांवर ममता करीत नाहीं तर येथें राहणेंच ठीक नव्हे, एकादे दिवशीं पाटीलबावांस पुसोन निरोप घेऊन देशींच जाऊं' असें उदासीनतेचें उत्तर दिलें. असो. शेवटीं पंचवीस हजार रुपये घेऊन पाटीलबावांनीं गोसाव्यास कैदेंतून मोकळा करण्याची कबूली दिली. "गोसावी मोकळा केला. परंतु त्याचे ठायीं राजश्री पाटीलबावांची मर्जी खुलासा जाली नाहीं. त्याजकडील महाल मुलूक, हत्ती घोडे वगैरे कांहीं सोडलें नाहीं. त्यावर दस्तऐवज सांपडोन पारपत्य करावें, परंतु सध्या मोकळा करावा ये विषयीं राजश्री अलीबहादर यांचें बोलणें अंतरंगीचें होऊन आलें. निमे करून घेऊन मोकळा केला. निखालसता बाह्यात्कारें दिसते, परंतु अंतर्यामी सरळता नाहीं, व विठ्ठलपंत ह्मणून बेरोजगारी गृहस्थ आहे त्याचे हातून गोसावी मोकळा करण्याविषयीं बाबाराव व आबा चिटणीस यासी दरबार खर्चाचें बोलणें होऊन, पाटील बावांसीं बोलोन सध्या मोकळा केला आहे." पण गोसावी सुटल्यावर पूर्वीपेक्षां अधीक भानगडी करूं लागला. जयपूरच्या वकीलाबरोबर गोसावी व अलीबहादर यांची भर दरबारांत खलबतें सुरू झालीं. या वेळीं अलीबहादुरानें नाना फडणीस व आपला दिवाण सदाशीव शामराज या दोघांचीं मनें विटतील असें वर्तन केलें. गोसाव्यानें 'पंचवीस हजार रुपये सरकारांत भरावे व पाटीलबावानीं त्यास मोकळीकीची परवानगी द्यावी असें ठरत आहे असें मोघम एका पत्रांत नानांस लिहून नंतर गोसाव्याकरितां सरकारांतून पंचवीस हजार रुपये पाटीलबावांस दिले असें दुसऱ्या पत्रांत कळविलें. ही लबाडी नानांनीं त्यास दाखवून दिली. पण 'झाली गोष्ट होऊन गेली' यापुढें तरी सरळपणानें वागा' एवढें त्यांचे म्हणणें होतें. शेवटीं पंचवीस हजार रुपये दंडादाखल घेऊन गोसाव्यास कुटुंबसुद्धा सहा महिने जामीनावर सोडावा व तेवढ्या अवधींत त्याच्यावर गुन्हा शाबीत करण्याजोगा पुरावा मिळाला तर गोसाव्याचा जप्त केलेला माल सरकारजमा करावा. पण पुरावा न मिळाल्यास या प्रकरणाचा पुनः विचार व्हावा असें ठरलें. वस्तुतः एथपर्यंत पाटीलबावांनी पड घेतली हें त्यांच्या स्वभावाकडे लक्ष दिलें असतां आश्चर्य च म्हणावयाचें. पण आपसांतलें भांडण कांहीं सीमेच्या पलीकडे जाऊं द्यावयाचें नाहीं असें त्यांच्या वर्तनांत जें एक धोरण महत्वाच्या प्रसंगीं असलेलें दिसतें, त्याच्याशीं या वेळच्या वागणुकीची संगति बरोबर बसते. तथापि पाटीलबावांनीं घेतलेली पड व्यर्थ गेली. गोसावी कैदेंतून सुटतांच त्याचें व अलीबहादुराचें उघड खलबत सुरू झालें. 'या भांतीची सारी दौलत तुमचे हातास येऊन पाटीलबावा पहिल्याप्रमाणे या देशींहून जात असें करून देतों. माझीं मुलें माणसें पाटीलबावांच्या अटकेंत आहेत तेवढीं सोडवावीं' असें गोसाव्याचें अलीबहादुरास सांगणें होतें. तेव्हां अलीबहादुरानें श्रीमंतांच्या पायाची शपथ घेऊन व पंचवीस हजार रुपये दरबारखर्च करून "दोन महिने गोसाव्याचे कबीले सोडावे, नंतर गोसावी कबीलेसुद्धा पाटीलबावांचे हवालीं करूं" असें बोलणें लावलें.

पाटीलबावांनीं ही गोष्ट देखील कबूल केली व कबीले सोडून गोसाव्याचे हवाली केले. पण गोसावी व अलीबहाद्दर यानीं शपथ वगैरे न मानतां जयपूर जोधपूरकराशीं व इस्माइलबेगाशीं राजकारणें सुरू केली यावेळीं रजपुतांचें शासन करण्यासाठीं पाटीलबावा सैन्य पाठवीत होते; त्यांत बहाद्दुरानें सामील व्हावें अशी पाटीलबावांनीं इच्छा व्यक्त केली. गोसाव्यास पाटीलबावांच्या हातीं देणें अपमानास्पद वाटत असेल तर बहाद्दरानें त्यास आपण च कैद करून परस्पर झांशीच्या किल्यांत ठेवावें अशी तोड पाटीलबावांच्या सरदारांनीं सुचविली. व नाना फडणीसाचें हि पत्र असें करण्याबद्दलचें आणविलें. तुकोजीनें देखील यावेळीं बहाद्दरास असें करण्याविषयीं आग्रह केला. त्याचा परिणाम होऊन त्यानें 'दरमाहा पाऊण लक्ष रुपये खर्चास घेऊन सैन्य मदतीस पाठवितों व गोसाव्यास झांशीस रवाना करितों' असें कबूल केलें. परंतु गोसाव्याची गांठ पडतांच—व स्वतःच्या मनास पटल्यामुळें देखील असेल—त्यानें कराराप्रमाणें वागणूक ठेवली नाहीं. दोन महिनें बोलाचालींत घालवून बळवंतराव सदाशिव यांजबरोबर दोन हजार फौज, सारे फौजेंतून गाळशी पाहून, दिली आणि लोकांस आंतून असें सांगून ठेवलें कीं 'प्रसंग पडल्यास हत्यार धरूं नये.' तथापि बळवंतराव सुजाण असल्यामुळें त्यानें चांगला पराक्रम करून इस्माइलबेगाचा पराभव केला. व मराठी सैन्य जैपूरकराचा पराभव करण्यास निघालें. तेव्हां पाटीलबावांनीं बहाद्दराकडे दोन लक्ष रुपये खर्चासाठीं पाठवून सरकार चाकरीसाठीं आणखी फौज धाडण्याविषयीं सांगितलें. व त्याप्रमाणें बहाद्दराचा दिवाण सदाशिवपंत फौजेसुद्धां निघाला. परंतु त्यानें पुढें जाऊं नये अशी खटपट बहाद्दरानें पुनः चालविली। तेव्हां पाटीलबावांनीं या सर्वांच्या मुळाशीं गोसावी आहे हें जाणून बहाद्दराकडे निरोप पाठविला; तो असा कीं 'गोसावी आमचें हवालीं करावा, तुम्ही सांगाल त्याप्रमाणें मुलूख व रोख ऐवज देतों. परंतु समय सरकारचाकरीचा आहे. गोसाव्याचे छंदांत लागू नये.' वीस बावीस लक्षाचा मुलूख, चार लक्ष रुपये खर्चास व शिवाय पांच लक्ष रुपये बक्षीसतादाखल देण्यास पाटीलबावा या वेळीं तयार होते व बहाद्दराच्या फौजेनें बळवंतरावाच्या हाताखालीं दोन तीन लढायांत चांगला पराक्रमही गाजविला होता. पण बहाद्दराच्या मनावर या वेळीं गोसाव्याचा पगडा पूर्णपणें बसला होता; 'हा समय पाटीलबावांचा गारद होण्याचा आहे. बळवंतरावास माघारीं बोलवावें व बापू होळकरास ही परत बोलवावे. आपण स्वतंत्र रीतीनें जैपूरवर स्वारी करूं' असें गोसाव्यानें सांगितलें. व ही गोष्ट बहाद्दरास पटली. त्यानें बापू होळकरास व बळवंतरावास तातडतोब परत येण्याचा हुकूम दिला. हे सर्व प्रकार नानांस कळत होते. त्यांनीं पत्रें लिहून बहाद्दरांची कानउघाडणी करण्याचा प्रयत्न केला. इतर मसलती लोकांना व पाटीलबावांना हें प्रकरण कसें ही संपवून टाकण्याबद्दल आग्रहाचीं पत्रें पाठविलीं. परंतु या पत्रांचा उपयोग होत नाहीं हें स्पष्टपणें दिसूं लागल्यावर देखील त्यांनीं बहाद्दरास दरडावण्याचा किंवा कैद करण्याचा हुकूम सोडला नाहीं. असें करणें नानांच्या अधिकारांतले होतें किंवा नाहीं याचा निर्णय करण्यास अद्याप साधन नाहीं. कदा-

चित बहादूर उलटला तर तें आपणास जड जाईल असा ही नानाचा समज असण्याचा संभव आहे. तें कसें ही असलें तरी अलीबहादराच्या खेळास नानांचा पाठिंबा असावा असें पाटीलबावांच्या मनानें पक्केपणीं घेतले. "इतकें केलें नानांनीं, अलीबहादूर यांचे करण्याचें सामर्थ्य किती ? नानांनीं असें करवावें असा ऋणानुबंध नानांचा माझा नव्हता. परंतु गोसाव्याचे योगेकरून अलीबहादर याणीं करविला. याचे जाबसाल पुण्यास गेल्यावर नानांचे माझे रुबरु होतील" असें पाटीलबावा वारंवार म्हणूं लागले.

हें प्रकरण मी येथेंच आटोपतों. कारण या पुढची हकीकत तयार करण्यास लागणारीं पत्रें प्रसिद्ध झालेलीं नाहींत. तीं रा. दिवेकरांच्या सहायानें मंडळाच्या ताब्यांत पुढच्या वर्षीपर्यंत येतील अशी मला आशा आहे.

गेल्या वर्षी पाटीलबावांचें चरित्र मी लालसोटच्या लढाईपर्यंत आणलें होतें. यंदा अलीबहादूर व तुकोजी यांच्याशीं त्यांचे जें वाग्युद्ध सुरू झालें तेथवर मी हकीकत आणून ठेवली आहे. लालसोटच्या लढाईंत त्यांच्या तोफा गेल्या; पलटणें गेली आणि स्वत: जीव वाचविण्यासाठीं मागें हटावें लागलें. पण त्यांचा धीर मुळीच खचला नाहीं. त्यानीं मोठ्या हिमतीनें पुन: सर्व जमवाजमव करून व मोठें सैन्य तयार करून मुसलमान व रजपूत यांशी पांच पन्नास ठिकाणीं झुंजून मराठ्यांचें नांव उत्तर हिंदुस्थानांत कायम करून ठेवलें. या वेळीं त्यानीं तरवारीचेंच तेज प्रकट केलें असें नाहीं; तर शत्रूंत उत्तम रीतीनें भेद पाडून कांट्यानें कांटा काढीत सर्व राज्य निष्कंटक करण्याचा बेत आणला होता. पैशाच्या अडचणींत राहणें म्हणजे राज्यावर मोठी आपत्ती ओढवून घेण्यासारखें आहे हें ध्यानांत असल्यामुळें व बंडखोरांपासून पैसा घेण्याची संधी वारंवार मिळाल्यामुळें त्यानीं पैशाची अडचण बऱ्याच अंशीं दूर केली. पाटीलबावांनीं दोन पासून तीन कोटी रुपये या संधीस मिळविले असावे असा एका यादीवरून आपणास अंदाज करता येतो. त्या मानानें खर्चही होता. परंतु खर्च कितीही असला तरी पगारासाठी पलटणीनीं त्यांना अडविण्याची भीति आतां राहिली नव्हती हें नि:संशय आहे. त्याचप्रमाणें फौजेस वेळच्यावेळीं पगार मिळाल्यामुळें, व वरिष्ट अधिकार मराठ्यांच्या हातीं असल्यामुळें फंद फितूराची भीति राहिली नव्हती. त्याचप्रमाणें सधन बंडखोरापासून द्रव्य संपादण्याची संधी मिळाल्यामुळें प्रजेपासून फाजील कर वसूल करून त्यांना त्रास देण्याचें कारण पाटिलबावांना राहिलें नव्हतें. सारांश भरपूर पैसा, विश्वसनीय फौज व संतुष्ट प्रजा हीं जीं राज्य कायम टिकण्यास अवश्यक अंगें पाहिजेत अशी तत्कालीन लोकांची समजूत होती व ज्या समजुतीच्या जोरावर सदाशिव दिनकरानें लालसोटच्या युद्धापूर्वी पाटीलबावांचा अंमल कायम टिकणें अशक्य आहे असें भविष्य वर्तविलें होतें तीं तीनही अंगें यावेळीं पाटीलबावांना अनुकूल होतीं. पण एवढी अनुकूलता असून देखील स्वजनविरोधापुढें यावेळीं त्यांना हात टेकणें भाग पडलें. गुलामकादर,

बिजेसिंग, प्रतापसिंग, महमदबेग, हमदानी वगैरे जबरदस्त शत्रू एकदिलानें विरुद्ध-पक्षास उभे असतां ज्यांचें धैर्य यत्किंचित ढळलें नाहीं, असें डिबॉइन मोठ्या कौतुकानें वर्णन करतो ते पाटिलबावा अलीबहादर व तुकोजी यांचा विरोध उत्पन्न होताच विरघळून गेले. यांच्यावर शस्त्र उचलण्याचें त्यांच्या मनांतच येईना. आपण दहा वर्षे खपून जें कमावलें तें या लोकांच्या मूर्खपणानें आयत्या वेळीं आपल्या हातून गमावणार हें त्यांना स्पष्ट दिसत होतें. पण राज्य आणि त्याबरोबर सर्वस्व गमा-वण्याची वेळ आली तरी आपल्या माणसावर हात टाकणारे पाटीलबावा नव्हते. भांडण वाढविण्यापेक्षा आपणच हिंदुस्थान सोडून जावें आणि या दोघांना मोकळें सोडावें असा त्यानीं विचार केला व ते शक्य तितकी सावरासावर करून पुण्याकडे चालते झाले.

पाटिलबावांचा हट्टी स्वभाव, उत्तम सेनापतीस शोभणारा त्यांचा पूर्ण आत्म-विश्वास, लष्करी हालचाली करण्याचें त्यांचें कौशल्य, योग्य वेळ येईपर्यंत पड घेण्याचा त्यांचा गुण व 'शठे शाठ्यं' या नीतिविरील त्यांचा विश्वास वगैरे अनेक मुद्दे या ठिकाणीं उपस्थित होतात. पण त्यांची शहानिशा करण्यास आणखी एक वर्ष त्यांच्या चरित्राचें बारकाईनें अध्ययन करणें मला अगत्याचें वाटतें. तथापि मराठी साम्राज्याचें स्वरूप यावेळीं कशा प्रकारचें होतें हें चार वाक्यांत मला सांगण्यास हरकत दिसत नाहीं. पुणे दरबारास शाब्दिक मान देण्यास व आणीबाणीच्या प्रसंगीं मदतीस धाऊन येण्यास शिंदे होळकर हे तयार होते. पुणें दरबार देखील तुम्हीं अमूकच केलें पाहिजे असें त्यांना दरडाऊन सांगूं शकत नव्हता; इतकेंच नव्हे तर या धोरणामुळें पुष्कळ नुकसान होत आहे असें दिसलें तरीं सामोपचाराच्या गोष्टी सांगण्यापलीकडे त्यास कांहीं एक करतां येत नव्हते. तथापि यांत सत्कृद्दर्शनी वाटतो तितका तोटा नव्हता. नाना, महादजी, व अहिल्याबाई या तीन हि तत्कालीन व्यक्ति मराठ्यांचें नांव कायम राहावें याच हेतूनें झटत होत्या. तिघांच्याही जिव्हाळ्याबद्दल संशय घेण्यास जागाच नाहीं. त्याप्रमाणें तिघांतील संबंध वरिष्ठकनिष्ठपणाचा नसून बरोबरीचा होता. यामुळें या साम्राज्यास फेडरेशनचें किंवा संयुक्त संस्थानाचें स्वरूप येत होतें; म्हणजे गादीची जागा व पूर्णपणें वाढलेल्या वसाहती जशा बरोबरीच्या नात्यानें वागतात तसें या तिघांतील नातें होतें असें म्हणतां येईल. गादीची सूत्रें चाल-विणाऱ्या व्यक्तीच्या हातून चूक झाल्यास ती त्यास दाखवून देण्याचा किंबहुना त्यास बाजूस सारून 'मी मुख्य प्रधान होणार' अशी महत्त्वाकांक्षा बाळगण्याचा आपणास हक्क आहे अशी महादजीची कल्पना होती. या कल्पनेंत गैरशिस्त, किंवा साम्राज्यास विघातक, किंवा व्यक्ति-द्वेषविषयक भावना बिलकुल नव्हती. तीव्र मतभेद व कडाक्याचीं भांडणें हीं नेहमींच अनिष्ट सूचक आहेत असें मला वाटत नाहीं. जेथें धमक असेल, कर्तबगारी असेल, कळकळ असेल तेथेंच अशा प्रकारचा मत

भेद संभवतो. ती जिवंतपणाची खूण आहे. त्यापासून नाश होत नाहीं तर उलट त्यामुळें शंकांचें निरसन होऊन संस्था स्नेहाची वृद्धी होते. असा स्नेह नाना व महादजी यांचा थोड्यावर्षांनीं पुण्यास घडला. या वेळीं मराठ्यांच्या साम्राज्याचा नाश अंतस्थ कलहानें होईल अशी भीति बाळगण्याचें कारण नव्हते. अहिल्याबाईचीं देखील शेंकडों पत्रें उपलब्ध आहेत तीं वाचली असतां महादजीच्या बरोबरीनें तुकोजीनें गादीची सेवा करावी किंवा पराक्रम गाजवून दाखवावा याच हेतूनें तिची धडपड चालली होती असें स्पष्ट दिसतें.पण मराठ्यांचे राज्य किंवा साम्राज्य चालविणारी आठ दहा माणसें एकाएकीं नाहींशीं झाल्यामुळें सर्वच कारभार एकदम आटोपला. तथापि आजच्या निबंधाचा तो विषय नव्हे याकरितां अधीक लिहिण्याचें कारण नाहीं.

---

आजचा निबंध या विषया संबंधींचीं माझीं मतें सांगण्यासाठीं लिहिला नसून माहिती गोळा करण्याच्याच हेतूनेंच लिहिला आहे. आणि माहिती गोळा करण्याचें काम आणखी एक वर्षभर केल्यानंतर मी माझें मत मांडणार आहें. पण कांहीं मुद्दे स्थूलपणें मांडण्यास मला हरकत दिसत नाहीं. विशेषतः आजच्या सभेस महाराष्ट्रांतील दोन नामांकित इतिहासज्ञ हजर असल्यामुळें हें मत-दिग्दर्शन मी मुद्दाम करीत आहे. कारण या विषयासंबंधीचीं त्यांची मतें मला ऐकण्यास मिळावीं अशी माझी फार इच्छा आहे.

दिल्ली येथील पाटीलबावांच्या राजकारणावरून माझ्या मतें हे महत्वाचे मुद्दे निघतात:—

१ दिल्ली येथील राजकारणाची जबाबदारी आपल्या अंगावर घेण्यांत मराठ्यांनीं शहाणपणा दाखविला किंवा नाहीं.

२ पाटीलबावा दिल्लीहून पुण्याकडे परत कां आले ?

३ नाना व महादजी यांचा संबंध कशा प्रकारचा होता ?

या प्रश्नांचीं उत्तरें माझ्या मतें अशीं आहेत.

१ दिल्लींत निजामाचा आधार राहू नये यासाठी थोरल्या बाजीरावांनीं तेथपर्यंत स्वारी केली यांत मला दोषास्पद कांहीं वाटत नाहीं. पण नंतर तेथें कायमची व्यवस्था बसविण्याची जबाबदारी मराठ्यांनीं पत्करली हें बरें झालें नाहीं. सातारच्या संस्थानाप्रमाणें दिल्लीची बादशाही आपल्या ताब्यांत ठेवता येईल ही मराठ्यांची कल्पना चुकीची दिसते. सातारच्या राजांनीं आपणहून पेशव्यांवर सर्व कारभाराची जबाबदारी सोपविली व स्वतः पेशवे कुलांत एका मागून एक चार पुरुष कर्तबगार निपजल्यामुळें त्यांच्या हातीं सत्ता राहिली. सवाईच्या वेळीं तेथून ही सत्ता नाना, महादजी व अहिल्याबाई यांजकडे गेली; ती देखील 'कर्तबगारानें सत्ताधीश बनावें' या न्यायानें गेली. स्वराज्यांत या सर्व गोष्टी खपण्याजोग्या होत्या. पण दिल्लीची परिस्थिति अगदीं निराळी होती. बादशाहा कर्तृत्वशून्य असला तरी अनेक प्रबल सत्ताधारी सरदार व संस्थानिक दिल्लीस कर्तबगाराचें स्वामित्व नसावें असें म्हणणारे होते. असा जबरदस्त

कोणी येईल तर त्याचे पाय मोडण्यासाठीं ते एकजुटीनें वागत. यामुळें दिल्लीस केवळ लष्करी जोरावर मराठ्यांना सत्ता स्थापित करता आली असती. म्हणजे Military occupation चें स्वरूप या सत्तेस होते. पण त्यास कायमपणा येण्यास पांच पन्नास वर्षे जबरदस्तीनें तेथें पाय कायम ठेऊन, शेजाऱ्यांत फूट पाडून, एकेका सरदारास जिंकणें व लोकांत आपल्या सत्तेविषयीं प्रेम उत्पन्न करणें वगैरे उपायांचें अवलंबन करावयास हवें होतें. अर्थात ही जबाबदारी फार खर्चाची व दगदगीची होती. तीं मराठ्यांनीं न उचलतां तेथें जो कोणी कायम होऊं पाहील त्याचा स्नेह जोडण्याची किंवा त्याचे पाय मोडण्याची व्यवस्था मराठ्यांनीं केली असती म्हणजे काम भागण्याजोगें होतें. स्वराज्याची व्यवस्था निर्वेध झाल्यानंतर सावकाशीनें या कामास हात घालावा किंवा नाहीं हें त्यानीं ठरवावयास पाहिजे होते.

२ दुसरा मुद्दा पाटिलबावा परत कां आले ? माझ्या मतें याचें उत्तर पाटिलबावांच्या मनोरचनेंत सापडण्याजोगें आहे. चार दिवस परदेशीं जाण्यास महाराष्ट्रीयाची हरकत नसते. पण कांहीं वर्षांनंतर परत स्वदेशीं यावें ही बुद्धी त्याच्या मनांत स्वाभाविकपणें उत्पन्न होते. याप्रमाणें पाटिलबावांना दिल्लीकडे राहण्याचा सहजच कंटाळा आला होता आणि या कंटाळ्यास अनुकूल अशी परिस्थिती अनेक प्रकारें होतीच. एक तर पैशाच्या दृष्टीनें पाटीलबावांची एक सारखी ओढ होती. या अडचणीमुळें त्यांना लालसोट येथें सर्वस्वास मुकावें लागलें. पुढें ही स्थिती कांहींशी सुधारली. तरी एकंदरींत पाटीलबावा इतके कर्जबाजारी झाले होते कीं त्यांना ही ब्याद नको व कोणाच्या तरी अंगावर सारें काम टाकून स्वदेशीं निघून जावें असें वाटू लागलें. याशिवाय गोसावी प्रकर्ण होतेंच. तुकोजी व अलीबहादुर पाटिलबावांच्या मदतीस म्हणून आले आणि तेच त्यांच्या इतके विरुद्ध वागू लागले कीं एक तर त्यांच्याशी प्रत्यक्ष भांडावें किंवा त्यांना मोकळें रान सोडून आपण तेथून निघून तरी जावें याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं. पाटीलबावांच्या मनांत आधीं देशीं जावें असें होतेंच. तेव्हां या यादवीच्या भीतीनें व गोसावी प्रकर्णानें या विचारास कायमपणा आला. शिवाय आजारी पडले असतांना त्यानीं कांहीं नवस केले होते; ते फेडण्यासाठीं देखील देशीं जाण्याची अवश्यकता त्यांना भासली.

३ तिसरा मुद्दा नाना व महादजी या दोघांतील वितुष्टासंबंधीचा. माझ्या मतें या दोघांचा खराखुरा स्नेह असून एकमेकांविषयीं पूर्ण आदरभाव होता. आपल्या मध्यें 'भाऊपणा' कायम आहे असें ते वारंवार लिहीत व ती गोष्ट खरी होती. मात्र कोणतें धोरण मराठ्यांच्या सत्तेस उपकारक होईल यासंबंधीं बऱ्याच मुद्यावर मतभेद उत्पन्न झाल्यामुळें व दोघांची गांठ न पडल्यामुळें हा मतभेद बराच मोठा झाला होता. उदाहरणार्थ पाटीलबावा देशीं येण्यास अति उत्सुक असून नानांच्या मतें असें होणें मुळींच श्रेयस्कर नव्हतें. 'कोट्यावधी रुपये खर्च करून पाटीलबावांनीं दाहा वर्षे केलेली मेहनत यानें व्यर्थ जाईल; कारण अलीबहादुर अगर तुकोजी यांच्या अंगीं पाटीलबावांच्या इतकी कर्तबगारी नाहीं' अशी नानांची खात्री होती. यामुळें ते शुद्ध भावानें पाटीलबावांच्या देशी येण्यास अडथळा करीत होते. अलीबहादुर प्रकर्णीं तर त्यानीं

पाटीलबावांच्या अनुमतानें सर्व गोष्टी चालाव्या म्हणून त्यांच्या मतें जें त्यांना सुचलें तें सर्व त्यांनीं केलें. पण एकंदरींत या प्रकरणास जें मलतें रूप आलें त्याची यथार्थ कल्पना नानांस नव्हती. सारांश पाटीलबावांना आलेल्या संशयाचें निरसन समक्ष भेट होऊन, चांगली भांडाभांडी होऊन नंतर च होणें शक्य होतें. तथापि यांत फारसें वाईट कांहीं नव्हतें. अशी भांडभांडी यानीं एकदोन प्रसंगी केली होती व त्याचें पर्यवसान चांगलें च झालें होतें. आणि यावेळीं देखील या भेटीपासून चांगलीच निष्पत्ती झाली. दोघे हि आपला कमीपणा व दुसऱ्याची किंमत पूर्णपणें ओळखीत असल्यामुळें हे भांडण नेहमीं फायदेशीर झालें असतें. खर्चाच्या ओढीसंबंधीं देखील असा च प्रकार होता. पाटीलबावांची जशी तंगी होती त्यापेक्षां किंचित् कमी असेल पण एकंदरीनें पुणें दरबाराची सांपत्तिक स्थिती फारशी चांगली नव्हती. स्वाऱ्या शिकाऱ्याच्या वेळीं त्यांची हि धांदलच उडे. निदान या दरबाराला पाटीलबावांच्या मदतीस जाणें तरी खास शक्य नव्हते. पण या सर्वांची जबाबदारी पाटीलबावांच्या मतें नानांच्या शिरावर होती. त्यांना ते वडीलभावाप्रमाणें मानीत. नानांनीं मुख्य गादीचा पत्कर घेतला तेव्हां दिल्लीस मोहीम नेऊन त्यामुळें पेंच पडला किंवा पुण्यास कांहीं संकट आलें तरी त्यांतून पार पाडण्याची जबाबदारी त्यांच्या शिरावर; आणि त्यांत कोठें चुकलें तर रागावण्यास व त्यास त्याबद्दल मर्मभेदक शब्द बोलण्यास आपणांस कांहीं हरकत नाहीं असें पाटीलबावांना वाटे. घरचें वडीलपण स्वीकारणाऱ्या भावाशीं जसें धाकटा भाऊ हक्कानें भांडतो तसाच प्रकार यांचा होता. त्यांत गादीशीं बेमानगिरी करण्याचा कोणाचा उद्देश नव्हता. तत्कालीन इंग्रजांची व कांहीं मतलबी लोकांची मात्र अशी समजूत झाली होती कीं या दोघांचें वैमनस्य विकोपास पोचलें आहे व ते त्र्यवस्थाची मदत घेऊन एकमेकांचा पाडाव करतील. पण हा समाज चुकीचा होता. जर्मन युद्धास प्रारंभ होतांच जसे आपसांतले भेद एकदम मिटले तसेंच येथें हि होतें. त्यांच्या मनभेदाची तीव्रता कांहीं सीमे पलीकडे जाणें शक्य नव्हतें. या मुद्यासंबंधीं दोघांनीं हीं आपलीं मतें स्पष्टपणें कांहीं दिवसांनीं अहिल्याबाई पुढें मांडलीं. तेव्हां ती देखील त्यांच्या मसलतींत मनापासून सामील होऊन एक नामी व्यूह रचला गेला होता. परंतु पाटीलबावांच्या व सवाई माधवरावांच्या मृत्यूनें सर्व च कारभार आटोपला, यास उपाय नाहीं. शत्रूंत फूट पाडून कसें राज्य करावें याचें ज्ञान पाटीलबावांना व नानांना होतें. यासंबंधीं पत्रांतील उतारे काल मी वाचून दाखविले च आहेत. तेव्हां त्यांच्या हातून आपसांतील वैमनस्याचा फायदा लोकांना मिळणें शक्य नव्हतें. सारांश या दोन प्रसिद्ध पुरुषांतील मतभेद फार मोठा आहे असें सामान्य लोकांना वाटत होतें याचें कारण सामान्य लोकांमध्यें ही खोड नेहमींच दिसून येते; आणि परकी लोक असें मानीत असत, याचें कारण एक तर असा समज लोकांत फैलावणें हें त्यांच्या राजनीतीचें एक अंग होतें; आणि या समजामुळें प्रत्यक्ष हे पुरुष जिवंत असे तोंवर या पक्षभेदाचा फायदा न मिळाला तरी त्यांच्या मागें यास तीव्र स्वरूप येऊं शकेल असा त्यांना सहज अंदाज बांधतां येण्याजोगा होता. तुकाराम व रामदास यांमधील तात्त्विक मतभेद कितीहि असला तरी त्यांच्या मनांत एकमेका विषयीं आदर भावबसत असेल हें उघड आहे. पण त्यांच्या अनुयायांनीं मात्र मतभेदाचें रूपांतर कसें केलें हें प्रसिद्ध आहे. तसा च प्रकार येथें झाला.

# फार जुनीं मोडीं पत्रें.

( शिवपूर्वकालीन )

सोबतचीं चार मोडीं पत्रें रा. अप्पासाहेब भट वकील ठाणें यांचेकडून रा. विनायकराव भावे यांचे कृपेनें मिळालीं. अस्सल पत्रें मजजवळ दोन चार महिने होतीं व रा. दत्तोपंत आपटे, श्री. मुजुमदार वगैरे आपल्या सभासदांनी ती पाहून लावण्याचा प्रयत्न हि केला. प्रथम प्रयत्नांत आम्हांला थोडींच अक्षरें लागलीं. दरखेपेस नाना युक्त्या योजल्या तेव्हां दोन दोन चार चार अक्षरें अधिक लागत व आनंद होई ! पत्रें फारच जीर्ण झालीं आहेत व शाई उडत चालली आहे. सर्वांवर शिक्कामोर्तब आहे तेव्हां त्यांचे सत्यते विषयीं शंका येत नाहीं.

पत्रें जोसपणाबद्दल व उपाधपणाबद्दल आहेत. तीं जितपत लागलीं तितपतच वाचून आपणांपुढें ठेवीत आहे. अस्सल पत्रें पुनः रा. भट देणार आहेत त्यावेळीं दुसरा प्रयत्न करून पाहीन.

ले. १ हा 'तिसा समानीनु व समानु मियां' मधील म्हणजे शक १४१० ( इ. स. १४८८ ) मधील आहे. म्हणजे आजवर मिळालेल्या **सर्व मोडी लेखांत हा जुना ठरतो.** ठरतो. रा. राजवाडे यानी कऱ्हाड-गिजरे यांच्या संग्रहांतून मिळविलेल्या १४२९ शकेंतील लेखापेक्षां हा लेख १९ वर्षांनीं जुना ठरतो. हा अस्सल आहे.

लेखांक २ हा आंतील नांवांवरून त्याच वेळेचा दिसतो. हा हि अस्सल आहे.

लेखांक ३ हा 'तिसा समानीन व तिसा मिया' म्हणजे सुरु ९८९ म्ह. शक १५१० ( इ. स. १५७८ ) मधील आहे. याचा विषय व संबंधी व्यक्ति वरील ले. १।२ यापेक्षां निराळ्या आहेत.

लेखांक ४ फारच जीर्ण, सबब मुळींच वाचणें झालें नाहीं.

या सर्व लेखांतील भाषा तत्कालीन आहे हें हीं पत्रें वाचतांच कळून येईल. तथापि पत्रें इतकीं बारीक लिहिलेलीं आहेत कीं वाचतांना डोळे थकतात. इतर कित्येक शिवकालीन पत्रांहून यांतील लेखकाचें वळण जरा निराळें आढळतें. अस्सल पत्रें ओळवार सोबत दिलीं आहेत. ओळींचे आंकडे दिग्दर्शनार्थ मी घातले आहेत. मूळांत नाहींत.

दत्तो वामन पोतदार

## लेखांक १

हु

फारसी मजकुर ओळ १

फारसी मजकूर घासटून गेलेला

फारसी मजकुर ओळ १

१ अज दिवानी

२ देसमुख देसाई माहा

४ जन माहाला निहाय तली

१ सुा। निसां समानीनु व समानु मीयां कारने ।

२ रामभटु बिनु हरभटु जोईसी वा वा टु बिनु

३ टु जोईसी वा वा

भट बिनु रामभट जोइसी

४ केसभट बिनु विसभट सले जोईसी

६ जोइसी व उपाध

७ मामले मजकुर + + आपले खुष रजावंतीने

८ आम्हासी वतनु विकत देउनु वतनाची

९ १८०० लाहारिया देउनु वतन जोइसीपनु व उपाधेपनु

१० व धर्मा • कारनु आम्हासी देउनु वतनु

१२ सत महजर करुनु देउनु

येणे प्रा। जमेदार व वतन ब हजीर मजालसी रा(म ा)याभट बिनु हरभट जोसी वरयेकर व

कृष्टभट बिनु मनभट जोसी

न होने ........ खुर्दखताची नकल घेउनु असेल जोइसी मजकुरांस देने रा॥ ( छ ा ) १३ माहे

मोहोरमु मुरतब सुद

पइवस्ता छ २१ माहे मजकुर

## लेखांक २

GOKHALE INSTITUTE OF POLITICS & ECONOMICS (DEEMED ...) PUNE-4 LIBRARY

( फारशी दोन ओळी ) देसमुख मामले तलेयां ( स १ )

सिका

१ अनंतभट किचि
[ बाळबोध ]
क...णी

सिका

परगने मांदुरण

१ सीवाजी अद्‌कारी ( बाळबोध )

( फारसी ओळी )

१ जमा (का१) ती

प्रा॥ [ मजकुर १ ] माजखनु

१ रामाजी अद्‌कारी प्रा॥ य

( फारसी ओळी )

१ भानोजी अद्‌कर परगन गोवे

(न) व परगन आंमत

( फारसी ओळी ) ( फारसी ओळी )

( १ ) येने प्रा॥ जमेदार व वतनदार हजीर मजालसी रामभट बिनु हरभट जोसी ... कारण

( २ ) कृष्टभट बिनु आनभट जोसी ...... भट बिनु रामभट जोसी

( ३ ) भटु बिन ... जोसी

( ४ ) ...... जोईसी बिन नीलभट वत

( ५ ) नु खरीदखत लिहुनु दिल्हे येसे जे

( ६ ) बिन जानु जोइसी गोवा

( ७ ) छ ६ ...... मापला

( ८ ) १ उसर बुद्रुक १ साई १ वावे १ इवेली १ दहिवली

( ९ ) ठाणा पैकीं गाउ साहा ६ यांचे वतनाचे ... गाउ १ पांगा कौलु १ कोझर १ तलोडे १ बाजु १ तोनारी १

हे सहा गाउ व श्रीवर्धन पोंकी गाउ मौजे माडले गाउ येकु १ नु जोइसीपनु व उपाधेपनु वा ... कानु वतनु

असतां त्यास अवलाद् नाही म्हनुनु तु त्यांही आपले पानु सारे
घालुनु देसी... नु दिल्हे देऊनु ... पिल जोइसी
याचा आजा वासुदेव जोइसी याने सीताराम भटासी
व कृष्ट भटाचे पुत्र मोरभट
जोइसी हरेणेकर यासि जें मुतालिकी देऊन घालत आली
होती जे मुतालकी ती तुमची तुम्हाकडे करार करुनु देऊनु
मुतालकी केसभट बिन वीसभट जोइसी
याने वतनु करुनु वारानसीस गेले
मी आज आठरा साले वतनु अनभवील मरुनु गे
ली लागल फुडे आपला भाउ उमेद् नाही तर
हे वतनु सारे जोइसपिनु व उपाधेपनघे व हायात कानु तु
म्हा चौगाजनातु वतनु विकतु दिल्हे सदरहु वतनाची किमतु आ
पनु तुम्हा चौगाजना पासुनु येने प्रो भरुनु पोचलो लाहारी
या २८०० तपशीलु ७०० रामभटु बिनु हरभटु जोइसी ... ७०० वनु
पुत्रु गोदभटु बिन रामभटु जोइसी ७०० व क
ष्टभटु बिनु गनभटु तुमचा चुलत चुलता जोइसी ७०० व के
सभटु चिनु वीस भट गोखला जोइसी म्होसलकर येकुनु लाहारिया
२८०० आठावीससे लाहारिया किमतु घेउनु सदरहु वतनु विकत चौ
घा जनासी दिल्हे तुम्ही चौगेजनु वतनु पुत्रपोत्रानसी खाने मा
जा कोनी मागे पुढे कोठे ही गोत्रजु व वंशजु नाहीं येसे आसोनु
जो कोनी माजे नाउ सांगोनु तुम्हासी उ ( भा ) राहिलु तो लबाड झु
टा तुम्ही खुशालवतनु खावें हें माजे सत्य ४२
विकलम श्री पा पंतु बिनु आनाजी पंत कुळकर
णी मामले तालिये

## लेखांक ३

### श्री

सावजी बिन रंगाजी
देशमुख निमे मा ( मले ) ++++++
अहमद् अद्कारी
परगने हुबली ( फारशी अक्षरें )

रु बा लोजी ...... मेहे ( दे । )
साईनाम केतली १
काजी शर त्र ( फारशी अक्षरें )

---

शेखजी अद्कारी ( फा. )
परगणे रजाकानून ( फा. )

ऊस्मावली सोनदी
अद्कारी परगणे महाकानून

राजश्री बालंभ ( म्हाद्णा ) पत चिन नरसीपंत कुलकरणी मा
मले तळें यांसि भिकाजी आत्माजी प्रभु वा। पाली दंडवत विणंति
उपरि सु॥ तिसा समानीन व तिसा मिया कारण लिहू
न दिल्हे येसे जे ( १ ) बाबा तुमचा प्रधपन तुमचान लिहि
ने देसकुलकरन व गांवकुलकरन लिहिन सेवटास
न जाय म्हनुन मी तुमची मुतालकी चाकरी पथकरून आपण
दोघे भाउ मी खुद १ व सिउबा १ हे दोघें मिलून हरद तुम
ची चाकरी सरकारतर्फेचा सद्द न लागता उतम तुम्हास संतोस
होईतो राहु मागें फुडे तुमचे वतनास मुजा
ईम होनार नाहीं हें प्रमान हे विनंती बिकलम
भिकाजी १ लिहिल्या प्रमान सिवाजी

## सहस्री.

प्रसिद्ध मराठी मुत्सद्दी व महाराष्ट्ररक्षक रामचंद्र निळकंठ अमात्य बावडेकर यानें तुळाजी निकम देशमुख कोकरूड जिल्हा सातारा यास पुढील पत्र लिहिलें आहे पत्राची मिति जेष्ट वा॥ ३ शके १६१३ ही आहे. म्हणजे पत्र संभाजीच्या मृत्यु नंतर महाराष्ट्रीय लोकांनीं स्वदेशसंरक्षणार्थ जें अद्वितीय स्वातंत्र्ययुद्ध केलें त्याच्या प्रभातकाळांतील होय. पत्रांत तुळाजी निकम यास व त्याचा मुलगा मिराजी निकम यास अनुक्रमें सहस्री व सवाशें स्वारांचा अंमलदारजुमला दिल्याची हकीकत आहे सहस्री व जुमला हे लष्करी हुद्दे कशा तऱ्हेनें देत असत त्याची माहिती देणारें हें पहिलेंच पत्र सापडलें आहे अस्सल पत्र. सोबत आहे.

सेनासहस्री, पंचसहस्री, दसहजारी वगैरे हुद्यांचीं आमिषें दाखवून रामचंद्र निळकंठादि राष्ट्रनेत्यानीं कडव्या मराठ्यांचा पराक्रम व वीर्य कसें उद्दीपित केलें असेल याची किंचित् कल्पना या पत्रानें येणार आहे म्हणून प्रस्तुत संमेलनप्रसंगीं हें पत्र सादर करीत आहे.

वा. दा. मुंडले.

श्री

राजश्री तुळाजी निकम सहस्री
सिलेदार गोसावी यासी

छ. अखंडीतलक्ष्मीआलंकृतराजमान्य स्नो॥ रामचंद्र निळकंठ आसीर्वाद सु॥ इहिदे तिसेन अलफ तुमचे विसी रा॥ नारो नरसिंह देशाधिकारी प्रांत पनाळा हुजूर आले याणी विनती केली की मारनिले स्वामीकार्यचे इतबारी आहेत यासी सहस्री दिल्ही पाहिजे व मिराजी निकम यासी जुमला दिल्हा पाहिजे म्हणऊन ता॥ विनंती

केली त्यावरून तुम्हास सहस्री व त्यास जुमला देऊन तुम्हाकडे दिल्हे आसे तरी तुम्ही आपले सिलेदारांचे सहस्रोचा जमाव कराल तो बरे घोडे बरे माणुस स्वामीकार्यंचे करार करून त्यास सिलेदारांचे दुडक हक पावऊन त्याच्या हाते स्वामीकार्य घेत जाणे असामी २ यासी वतन दि॥ चाकर व तेजी तुरकी सालिना होन पा॥ १००० बि ता॥

| | |
|---|---|
| खासा तुम्हास सहस्री दिल्ही यास्तव असामी केली वतन दि॥ चाकर व तेजी तुरकी होन पा॥ ७००० | मिराजी निकम तुमचें पुत्र यासी जुमला दिल्हा वतन सालिना दि॥ तेजी तुरकी ३००० |

यासी जमान रायाजी बापूजी यासी जमान तुम्हांसच घेतले शेनासहस्री सिलेदार घेतले असे एकूण असामी दोनी यासी वतन सालिना होन पा॥ एक हजार

श्री रामचं
द्र चरण नील
कंठ सोनदेव शरण

रास केले असेत इ॥ पैवस्तगीपासून वजावाट व दंडक प्रा॥ वजा करून उरले वतन माहे दरमाहे देत जाणे वतनाचे मोईन प्रा॥ तेजी व तुरकी व चाकर ठेऊन हाजीर लेहवाल त्या दिवसा पासून त्याचें वतन देणे जाणिजे छ १६ रमजान पा॥ हुजूर

लेखन
सीमा समु
ल सती

बार सुरु सुद बार
पो छ मजकूर

## एका महार वीराचा पराक्रम.

छत्रपती संभाजीनंतर मराठेशाहींत अव्यवस्था होऊन ती मोडकळीस आली असतां महाराष्ट्रांतील ब्राह्मण, मराठे, प्रभु वगैरे सर्व जातींनी स्वराज्यप्रेमानें एकदिलानें व मुत्सद्दीगिरीनें नेटाचे प्रयत्न करून, अनेक संग्राम करून, मराठेशाहीस सांवरून धरलें व तीस बळकटी आणिली. त्या कामीं मराठे, ब्राह्मण, परभू ह्याप्रमाणेंच स्वराज्यप्रेमी महारांनीहि संगरपराक्रम केले. महारांनीं असे पराक्रम केल्याचा स्पष्ट उल्लेख डफचे पुस्तकांत मला आढळला नाहीं. ज्या प्रसंगाचा उल्लेख सोबतच्या कागदावरून आज आपणापुढें मी करीत आहे तो प्रसंग राजारामकालीन आहे. हा कागद वाईच्या देशपांडे घराण्यांतून मिळाला. दप्तरांत ह्याच कागदाची आणखी एक प्रत आढळली. ह्या कागदांतील सारांश वर्ण्यविषय असा—

मौजे नागेवाडी प्रांत वाई येथील कदीम पाटीलकी मूळची महाराची. छत्रपती राजाराम महाराजांचे वळीं माहजूर सेटी चिन नागनाक महार हा पाटील होता. त्यानें नागेवाडी येथील नागवडसिद्ध ह्या देवाची पुजा करून रहण्याकरतां धांडेघर व गोंडाली येथील मोरोजी व चिंतामणी हे दोन गुरव आणिले. हे दोघे गुरव येऊन राहिल्या-नंतर त्यांनी पाटीलाशीं 'मारेचुरे' करून त्याची पाटीलकी बळकाविली. तेव्हां सदर पाटलानें गुरवा विरुद्ध परशरामपंत प्रतिनिधीकडे फिर्याद केली. प्रतिनिधींनी गुरवांस बोलाविलें पण ते आले नाहींत. तेव्हां प्रतिनिधीनीं सिवडडे–सिवधडे–यांस [ म्ह. नागेवाडी जवळील गांवचे मोकदम ] विचारिलें. त्यांनीं पाटिलकीचें वतन महाराचें असें सांगितलें. यावरून, गुरवांनी देव पुजून असावें; पाटिलकीसी त्याचा अर्थाअर्थी संबंध नाहीं, असा महार पाटलाच्या बाजूचा निकाल दिला. हा आपल्या विरुद्ध झालेला निकाल ऐकून मोरोजी व चिंतामणी या उभयतां गुरवांनी पुनः छत्रपतींकडे फिर्याद नेली. या वेळीं छत्रपती रांगण्यास होते. तेव्हां ही पाटिलकीची फिर्याद पुनः आलेली पाहून राजारामांनी महारांस **धारदिव्य** करण्यास सांगितलें. म्हणजे मोंगलानीं घेतलेला वैराटगड स्वराज्यास जोडून द्यावा व पाटिलकीचें वतन अनुभवावें असा निकाल दिला. त्यावेळीं मोगलांनी एक एक किल्ला घेऊन पुढें जावें व मागून मराठ्यांनीं ते ते किल्ले स्वराज्यास जोडावे असें चालूं होतें. अशांत च वैराटगड हा नागेवाडीच्या महारांनीं मोंगलाशीं लढून घेतला व पाटिलकीचें वतन मिळविलें. ह्या पाटिलकीच्या वतनाबद्दल नागेवाडीच्या गुरवामहारामध्यें तीन वेळां फिर्यादी झाल्या. तिनही वेळां महारांचेंच वतन ठरलें. शेवटची फिर्याद शके १६७४ म्ह. स. १७५३ तील आहे. ह्या वेळीं दिलेल्या निकालांत पूर्वीचा म्हणजे राजाराम कालीन हा प्रसंग उद्धृत केलेला आहे. आणि त्यावरून नागेवाडीच्या माहजूर सेटी चिन नागनाक महार ह्या पाटलानें वैराटगड मोंगलाकडून घेतला व आपलें पाटिलकीचें वतन काबिज केलें ही बाब आपणांपुढें सांगतां आली. दुसरी एक गोष्ट ह्या सोबतच्या कागदावरून नजरेस येते ती ही कीं, सदर महजरावर सूर्याजी पिसाळाची सही असल्यामुळें, शाहूमहाराजांनीं औरंगजेबाकडून आल्याबरोबर सूर्याजीस ठार मारिलें ही बाब खोटी ठरते.

**शं. ना. जोशी वाईकर**

( श. १६७४ मार्गशीर्ष शु. ४
से. १७५३ दिजंबर ता. ९ )

ले. १

× × × × गुरव पिलाजी गोले यांची ( साक्ष ? ) संख्या करून वतनासी भांडतो तो खोटा त्यास व वतनासी आर्थाआर्थी समंध नाही त्यावरून देशमुख व देशपांडे व समस्त गोत व समाकुल पांढर व भोंवरगांव यांचे साक्षीनसीं महजर करून दिल्हा चितां।

महजरनामा व तेरीख ९ माहे जिल्हेज बि हुजूर हजीरमजालसी गोत प्रांत वाई सरकार नवी शाहुदुर्ग ऊर्फ परनाला सुभे दारुलजफर विज्यापूर सु॥ ११११ सन इसने मया अलफ

देशमुख व देशपांडे

रा दत्ताजी केशवजी नाईक व सूर्याजी फिरंगोजी नाो पिसाल देशमुख पाा मजकूर १

गोपाल सेटिया मल्हारजी चौधरी व मोत्नसेटपाटणा कसबा वाई १

जमाल पाटील कसबा वाई १

कनूरकर

सिवजी राजपुरे १ रतोजी राजपुरे १

रा गंगाजी शंकर व गिरमाजी झुंगो देशपांडे पाा मजकूर १

बावधनकर

तुळाजी पिसाळ काा मजकूर १

आपाजी पाा मोा मजकूर १

बहिरोजी सेटया, सिवजी चौगुला काा मजकूर १

मौजे पसरणीकर मोकदम १

गोपाल कदम कसबे वाई १

मंहजूर सेटी बिन नाग नाक महार मौजे नागेवाडी साा मुन्हे पाा मजकूर यासि लेहून दिल्हा महजर येसाजे तुवा हुजूर येऊन जाहीर केलें की मौजे नागेवाडी येथील कदीम पटेलकी आपली मिरास आपले वडील वडील चालवीत आले देवाचे पुजेस गुरव धांडेघरकर येक व गोडालीकर येक येसे दोघे गुरव गावात आणून ठेविले त्याणी राहिवास होंता च आपले वडिलांचे मारेचुरे करून मिरास घेतली आपण महार दूर उभा राहून असे गुरव जवळ जडला लाचलुचपती देऊन मिरासीस जडला आपण कदीम बुनादी आहे साहेबी आपणास हातीं धरून पांढरीवरी बसऊन आपले हातें पटेलकी घेतली पाहिजे म्हणऊन विनती केली त्यावरून मनास आणितां गुरव येक दोन वेळा बोलाविले परंतु ते येऊन उभे राहिनात आगर पद्र हि झाडिनात तेव्हा दिसोन आलें कीं गुरव गैरमिरासी सेटी मजकुराने गुरव माळुमातीं जडला म्हणऊन सांगितले ते खरे व सिवखडे मुकदम यांसी हि विचारिले कीं कदीम मिरास कोन्हाची तें सत्य स्मरोन सांगणें त्यासि याणी सांगितले की मौजे मजकूरची पाटिलकी माहाराची मिरास येस आम्हास दखल आहे आमच्या वडीलवडीलीं सांगत आले आहेत येसी साक्षी दिल्ही मग मौजे मजकूरची पाटीलकी मिरास लेहून दिल्ही आसे तुझ्या लेकराचे लेकरीं पाटिलकी खाऊन गांवची लावणीसंचणी करून पाटिलकीचा हकलाजिमा पटीपासोटी गाहुड मोट इनाम मान पान(नेम)णुक खुखे असणे गुरवाने गावीचा देव श्री नागवड सिध पुजून असावें पाटिलकीसी अर्थाअर्थी समंध नाही माहारानी पाटिलकी खाऊन असावे यासी पेस्तर हिलाहरकत करील तो गोताचा अन्याई दिवाणचा गुन्हेगार बमहजर सही येणेप्रमाणे महजर करून दिल्हा त्याप्रो आपण पाटिलकी आनभवीत आसतां मोरोजी गुरव याणी चिंतामण गुरवाची पाटी करून कैलासवासी माहाराज स्वामी सनिध उभा राहिला माहराज साहेबी पूर्वील हकिकत मनास आणुन भगवंत सामराज व गिरमाजी झुंगो देशपांडे पाा मजकूर यासी हुजूर आणून पुरसीस केली त्यास त्याणी उत्तर केले की पाटिलकी मोकदमी

कदीम वतन माहाराचें त्यासि मधे गुरवानी हुजूर फिर्याद केली होती त्यास राजश्री परशरामपंत प्रतिनिधी याणी किले वैराटगड मोगलाकडे होता तें महाराज धारदिव्य दिल्हे त्यावरून माहाराने किला घेऊन साहेबास दिल्हा तेव्हा हि माहार खरा जाला व गुरव खोटा जाला त्यास देशमुख व देशपांडे यांणी गोताचे साक्षीनसी महजर माहारास करून दिल्हा त्याप्रो माहार पाटिलकी आनभवीत आहे गुरवास पाटिलकीच्या वतनास आर्थाआर्थी समंध नाही त्यावरून मनास आणून मौजे मजकूरची पाटिलकी मोकदमी तुझें वतन पुरातन हा आपले वतन वंशपरंपरेनें आनभविणे म्हणऊन आज्ञा केली त्याप्रमाणे आपण वतन आनभवीत आहे त्यास महाराज साहेबी कृपाळु होऊन भोगवटीयासि पत्रें करून देऊन वंशपरंपरेने सदरहू वतन चालविले पाहिजे म्हणऊन विदित केले त्यावरून मनास आणून मौजे मजकूरची पाटिलकी मोकदमी वतन पुरातन याचे पूर्वी रांगणियाचे मुकामी असतां याणि किले वैराटगडचे धारदिव्य याणे केले व चिरंजीव कैलासवासी याणीहि जमीदारांस पुरसीस करून पुरातन वतन याचे खरे केले त्याप्रो मौजे मजकूरची पाटिलकी मोकदमी वतन करार करून अजरामरामत करून यासी वतनपत्र करून दिल्हे तरी यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने वतन चालवून दंडक प्रो वतनाची सेवा याचे हाते घेणे गुरव पहिले पासोन खोटा होत आला आहे त्यास मौजे मजकूरचे पाटिलकीमोकदमीसी आर्थाआर्थी समंध नाही प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन हे पत्र भोगवटियासी याजवळ परतोन देणे जाणिजे छ २ माहे सफर सुाा सलास खमसैन मया आलफ

## पंताजी गोपिनाथ बोकील

१. शिवछत्रपती व अबदुल ऊर्फ अफजलखान यांचे दरम्यान शके १५८१, विकारी, मार्गशीर्ष शु० ७ गुरुवार, ता० १० नोव्हेंबर इ. स १६५९ रोजीं जो चिरस्मरणीय संग्राम झाला, त्या प्रसंगीं शिवाजीतर्फे अफजलखानाकडे हेजिबीस गेलेल्या वकीलाचें नांव पंताजी गोपिनाथ बोकील असें होतें, याबद्दल बखरकार, जेधे शकावलीकार इत्यादि लेखकांची एकवाक्यता आहे. मराठ्यांचा बखरकार ग्रांट डफ यानें पंताजी गोपिनाथ यास अफजलखानाचा वकील बनवून, पंताजीनें आपल्या धन्याशीं बेइमान दाखविलें, त्याबद्दल त्यास शिवाजीनें हिवरे गांव इनाम दिल्याचा शोध लाविला आहे+। लेखांक १ चा कागद शक १५८० चा म्हणजे अफजलच्या मृत्युपूर्वीचा असून, त्यांत पंताजीपंतास हुजुरचा चिटणीस म्हणून म्हटलें आहे. या कागदावरून व इ. स.

+ History of the Mahrathas by Grant Duff Vol. 1. P. 138-141 R. Cambary and Co's edition of 1912.

१६५९ च्या, व त्यानंतरच्या इतर प्रसिद्ध कागदांवरून पंताजी गोपिनाथ हा शिवाजीमहाराजांचा विश्वासू सेवक असून तो पहिला चिटणीस होता, असें म्हणण्यास आतां वाव झाली आहे. पंताजी गोपिनाथाचें वर्णन 'पंताजी तो काका' असें पोवाडेकारानें केलें आहे, व त्याचा जिजाबाईसाहेबांशीं सोंगट्या खेळण्याचा मान होता, असें बखरकार सांगत आहेत, यावरून पंताजीपंतांची योग्यता उघड ठरत आहे.

२. पंताजी गोपिनाथ बोकील हा कोण, कोठील, यानें केलेल्या कामगिरीबद्दल छत्रपतींनीं त्यांस कोणती वृत्ती दिली, व हल्लीं याचे वंशज वगैरे कोठें असतात, यासंबंधानें पूर्ण अज्ञान होतें. नुकतें च हिवरें, ता० पुरंधर, जि० पुणें या गांवीं कागदपत्रांच्या शोधांत असतां, मला सोबतच्यापैकीं ६ कागद मिळाले; त्यांवरून या सर्व बाबींचा कायमचा निकाल लागत आहे. पंताजी गोपिनाथ बोकील हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. अश्वलायन शाखा. जमदग्नी गोत्र. याचे घराण्याकडे हिवरें गांवची ८८ ची जोशीकुलकर्णपणाची वृत्ती होती. हा वाढत वाढत मोठ्या मानाच्या जागेवर चढला. अफजलखानाबरोबरच्या युद्धप्रसंगीं यानें केलेल्या कामगिरीबद्दल—ग्रँट डफ म्हणतो त्याप्रमाणें विश्वासघात करून धन्याशीं बेइमान राहिल्याबद्दल नव्हे !— त्यास भोळीं व मांडकी या गांवीं प्रत्येकीं एक एक चावर जमीन व मांडकी येथील सेटेपणाचें वतन येणेप्रमाणें वृत्ती मिळाली. 'थोरले कैलासवासी स्वामीची ( शिवाजी महाराजांची ) सेवा एकनिष्ठेनें केल्याबद्दलचा उल्लेख लेखांक २ मधील सनदेंत आहे. 'प्रतापगडाच्या समयीं उपयोगी पडल्याबद्दल' महाराजानीं ही देणगी दिल्याचा फसली सन १२३३ चे जबानींत उल्लेख आहे ( लेखांक ५ पहा ). पंताजीपंत पुढें कर्णाटकांत गेल्याचा दाखला लेखांक २ मध्यें आहे. शिवछत्रपतींनीं दिलेल्या देणगीबद्दल शाहुछत्रपतींनीं पंताजीपंतास पुनः पत्रें करून दिलेलीं आहेत. त्याप्रमाणें पंताजीपंतांच्या विद्यमान वंशजांकडे जमिनी वगैरे अद्यापि हि चालू आहेत. लेखांक ७ मध्यें दर्शविलेल्या वंशावळीवरून पंताजी गोपिनाथांचा वंश कोणता, याचा खुलासा उत्तम रीतीनें होतो.

३. आतां हिवरे गांव पंताजी गोपिनाथास शिवछत्रपतींनीं दिलें असा मजकूर ग्रँट डफनें लिहिला आहे, अगदीं अलीकडे मि. किंकेड व रा. पारसनीस या उभयतांच्या नांवावर इंग्रजींत प्रसिद्ध झालेल्या मराठ्यांच्या गोष्टीरूप बखरींत हि हिवरे गांव इनाम दिल्याबद्दलचा मजकूर आहे.+ ग्रँट डफनें आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ कांहीं आधार दिला नाहीं, व हिवरेगांव सखाराम बापूच्या पणजास म्हणजे पंताजीपंताच्या एका दूर दूरच्या नातेवाईकास इ. स. १७१० मध्यें शाहूमहाराजांनीं पहिल्यानें इनाम दिलें असें कागदोपत्रीं पुराव्यांनीं कित्येक वर्षांपूर्वीं प्रसिद्ध झालें

+A History of the Maratha People, by Mr. C. A. Kincaid and Parasnis, Page 164.

असतां, वरील ग्रंथकार यांनीं अद्याप ग्रांट डफची री ओढावी, हें जरा चमत्कारिक दिसतें! खरा प्रकार असा दिसतो कीं, पंताजी गोपिनाथ हा हिवरेगांवचा राहणारा व त्याच्या दूरच्या कां होईना, परंतु भाऊचंद्राकडे हिवरेगांवचें इनाम चालू होतें, या एका च गोष्टीवरून हि गफलत झाली असावी. खरा प्रकार कोणता तें सोबतच्या कागदपत्रांवरून उघड होत आहे.

४. एतावता आजच्या या टांचणानें खालील गोष्टींची सिद्धी होत आहे:—

(अ) पंताजी गोपिनाथ हा पहिल्यापासून शिवाजी महाराजांचा विश्वासू सेवक होता.

(आ) अफजलखानचे युद्धप्रसंगीं व इतरत्र केलेल्या कामगिरीबद्दल शिवछत्रपतींनी त्यास जमीन दोन चावर इनाम दिला.

(इ) इतकेंच नव्हे तर तो बाळाजी आवजी पूर्वीचा शिवाजीचा चिटणीस होता.

(ई) पंताजी पंतानें फितुरी केल्याचा ग्रांट डफचा हवाला खोटा आहे.

(उ) हिवरे गांवच्या इनामतीचा पंताजी गोपिनाथाशीं प्रत्यक्ष कांहीं संबंध नाहीं.

(ऊ) पंताजी गोपिनाथ याचे शाखेकडे हिवरे गांवची जोशीकुलकर्णीपणाची वृत्ती होती, व ती अद्यापि हि त्याचे वंशजांकडे चालू आहे.

पां. न. पटवर्धन.

---

लेखांक १ (श. १५८० मार्गशीर्ष शु॥ १५)

(इ. १६५८)

अज दिवाण ठाणे ता॥ हवेली पा॥ पुणा ता॥ मोकदमानी देहाये ता॥ मजकूर सु॥ तिसा खमसेन अलफ बा॥ खुर्दखत रा॥ छ १३ रबिलावल तेथे रजा जे बा॥ राजेश्री गोसावी चिचवड यासी चिचवडानजीक हमशाही गाव आहेत तेथील रयेती दरसाल गवत काढून देत असतानी म्हणऊनु हुजूर मालुम केले तरी सालमजकुरा-पासून साहेबी हुजरून तह ऐसा केला आहे की राजेश्री गोसावी यांसी पा॥ मा॥रून दरसाल गवत ५०००० पनास हजार काढून देववावे बरी चिचवडानजीक भोवताले असपास गाव असतील त्यापैकी तुम्ही सिस्त करून देणे जे पनास हजार गवत दरसाल काढून चिचवडी राजश्री गोसावियापासी पावतीन जाणे जैसा काही वरकड इनामतीची रयेसी आहे तैसीच रवेसीने सदरहू गवताची सिस्त जागजगा तेणप्रमाणे चालवीत जाणे सदरहू गवत जे गावी असेल जाईल ते गावाहून काढून देवीत जाणे दरहरसाल ताजा खुर्द खताचा उजूर न करणे तालीक घेऊनु असली खुर्दखत रा॥ गोसावी यापासी परतोन देणे रा॥ पंताजीपंत चिटणीस म्हणऊनु रजाय॥ रजा अमल करणे मोर्तब सुद

लेखांक २ श्री. (श. १६३१ भाद्रपद व. १
स. १७०९ सप्टेंबर ता. ८)

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३६ विरोधी सवछरे भाद्रपद बहुल प्रतिपदा गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंश श्री राजा शाहुछत्रपती स्वामि याणि देशमुख व देशपांडे ता। सिरवल प्रा। मावळ यासी आज्ञा केली ऐसी जे जगनाथ पंताजी वोकील यानी

श्री ०
शिवनरपतिह
र्षनीधान मोरेश्वर
सुत भैरव मुख्य
प्रधान

श्रीशंकरश्री
शाहु छत्रपती
कृपानिधी प्रल्हा
दसुत गदाधर
प्रतिनिधी

स्वामिसानिध वंदनचे मुकामी विनंती केली की आपले बाप पंताजी गोपीनाथ याणी राजश्री थोरले कैलासवासी स्वामिची सेवा एकनिस्टेने केली त्यावरून कृपाळु होऊन इनाम जमीन चावर २ व सेटेपण वि॥ ता।

| | |
|---|---|
| मौजे भोळी ता। मा॥र | मौजे मांडकी येथील सेटेपण |
| जमीन चावर १ | व जमीन चावर १ |

एकूण दोनी चावर जमीन प्रा। मजकूर पैकी दिली तेणेप्रमाणे चालत आला मधे ताम्राची धामधूम जाहालियावरी पंताजीपंत व आपण कर्नाटक प्रांतें गेलो त्या तागायत इनामाचा भोगवटा चालिला नाही सांप्रत स्वामी कृपाळु होऊन पूर्वी राजश्री कैलासवासी स्वामींनी देऊन चालविले प्रमाणे स्वामींनी आज्ञा करून चालविले पाहिजे म्हणून विनंती केली त्यावरून पंताजी गोपीनाथ याणी राजश्री थोरले कैलासवासी स्वामींची सेवा बहुत केली त्याचे चालविले स्वामीस आगत्य याकरिता पूर्वी दिल्हेप्रमाणे स्वामींनी पेस्तर चालवावया एथी आज्ञा केली असे तरी सदर्हू दोनी चावर जमीन कुलबाब कुलकानु हालीपटी व पेस्तरपटी पूर्वी जमीन चतुसीमा नेमून देऊन मेसजी चालविले या प्रमाणे पंताजी गोपीनाथ याचे पुत्र त्रिवर्ग त्यांत रामचंद्र पंताजी मृत्य पावले त्याचे पुत्र बाबूराऊ रामचंद्र व जगन्नाथ पंताजी श्रीनिवास पंताजी यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालावणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा उजूर न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन मुखेपत्र भोगवटयासी परतून देणे

जाणिजे इनामाचा भोगवटा पहिले पासून चालत असे त्याप्रमाणे पेस्तर हि चालवणे
लेखनालंकार

रुजु
सो छ ६ सांबा
बार सुरु सुद बार

मर्या
देयं रा
जते

लेखांक ३

श्री.

(श. १६७२ आश्वीन व. १२
स. १७२० आक्टोबर ता. १७)

× INAM ×
R
COMMISSION

82091

स्वस्ति श्री. राज्याभिषेक शके ७७ शार्वरी सवत्सरे आश्विन बहुल द्वादसी इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहु छत्रपती स्वामी याणी मोकदमान मौजे भोळी ता। सिरवल प्रा। मावळ यास आज्ञा केली ऐसी जे रामचंद्र पंताजी याचे पुत्र बाबूराऊ रामचंद्र व जगनाथ पंताजी बोकील याचे पुत्र गोपाळ जगन्नाथ व श्रीनिवास पंताजी याणी स्वामीसंनिध विनंती केली कीं थोरले कैलासवासी स्वामीनी आपले वडिलास मौजे मजकूर पैकी जमीन चावर १ एक इनाम दिला आहे त्याप्रमाणे इनाम जमीन चालवावयाची आज्ञा करून स्वामीनी हि पेसजी पत्रे दिली आहेत पुढे आविछिन चाले ऐसी आज्ञा केली पाहिजे म्हणोन त्यावरून एक चावर जमीन इनाम चालायाची आज्ञा करून हे आज्ञापत्र सादर केले आहे तर पूर्वी यास मौजे मजकूर पैकी इनाम जमीन दिली आहे ते च जमीन सुर्म्हा हि यास नेमून देऊन इनाम मुतलिन चालविणे

० श्री ~
राजा शाहुनर
पति हर्षनीधान
बाजीराव बल्ल
ल प्रधान°

० श्री ~
श्री आई आदिपुरु
ष श्री राजा शाहु छत्रप
ति स्वामि कृपानिधि त
स्य श्रीनिवास परशु
राम प्रतिनिधि

दरहरसाल ताजे सनदेचा ऊजूर न करणे या पत्राची तालीक लेहोन घेऊन हे पत्र भोगवटियास परतोन देणे जाणिजे लेखनालंकार

मर्या
देयं रा
जते

रुजू सुरु सुरु सां 82091
निवीस मंत्री
बार सुद सुरु सुद बार बार

**लेखांक ४**

(श. १६८२ आश्वीन व ६
(स० १७६० आक्टोंबर ता. २९)

श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब याणी राजश्री नारो बाबुराव व पंताजी बाबूराव उपनाम बोकील गोत्र जामदग्नी वछ सूत्र आस्वलायन यासी दिल्हे इनामपत्र ऐसे जे तुम्ही शाहुनगर नजीक किले सातारा येथील मुक्कामी येऊन साहेबांसनिध विनंती केली की आपले पणजे पंताजी गोपीनाथ हे थोरले कैलासवासी माहाराज राजश्री स्वामीची सेवा करीत होते त्यावरून त्यास इनाम जमीन व घरवाडा व सेटेपणाचे वतन प्रा सिरवल येथे करून दिल्हे येणे प्रा विो

| | | |
|---|---|---|
| मौजे भोळी पैकी | मौजे मांडकी येथे | |
| जमीन चावर १० | जमीन चावर १० | सेटेपण कलम १० |
| कसबे मजकुरी घरवाडा | लग | |
| कलम १० | | |

एणे प्रमाणे इनाम जमीन चावर २० दोन स्वराज्य व मोगलाई ऐा दुतर्फी बे॥ इनाम तिजाई व बाबती कुलबाब कुलकानू सेरीज हकदार करून व घरवाडा एक व सेटेपणाचे वतन वंशपरंपरेने देऊन पत्रें करून दिल्ही त्याप्रा चालत आहे त्यावर कैलासवासी माहाराज राजश्री स्वामी मोगलाईतून आलियावर सदरहू प्रा पत्रें करून दिल्ही त्या बा चालत आहे तरी साहेबी कृपा करून भोगवटियास पत्रे देऊन वंशपरंपरेने चालविले पाहिजे म्हणून विनंती केली व पत्रें हि आणून दाखविली त्यावरून मनास आणिता तुम्ही पुरातन सेवक तुमचे वडिली बहुत निस्टेने सेवा केली याकरितां तुमचे चालवणे आवश्यक जाणोन साहेब तुम्हावर कृपाळु होऊन सदरहू प्रमाणे हरदु गांवी जमीन चावर २० दोन स्वराज्य व मोगलाई ऐा दुतर्फी बो इनाम तिजाई व बाबती व कुलबाब कुलकानु हालीपटी व पेस्तरपटी सेरीज हकदार करून व सेटेपणाचे वतन एक व का मारी घरवाडा एक वंशपरंपरेने करार करून दिल्हा आसे

तरी तुम्ही सद्‍र्‍हू जमीन दाग चावर दोन व सेटेपणा व घरवाडा सुद्रामत प्रा तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने सद्‍र्‍हू प्रा आनभऊन सुखरूप राहाणे जाणिजे छ० १९ माहे रबिलावल सुा इहिदे सितेन मयां आलफ विक्रम संवत्सरे लेखनावधी

लेखन
शुध

बार

82091

## लेखांक ५

(इ. स. १८१७)

जबानी बो मनुहर बापूराव व खंडो मल्हार वोकील हिवरेकर सन १२३३ कारणे जबानी लेहून दिल्ही ऐता जे आमचे आजाचे पणजे पंताजी गोपीनाथ वोकील याणी थोरले कैलासवासी महाराज छत्रपती याजपासी एकनिष्ठेने सेवा हुजूर करून प्रतापगडचे समयी उपये.गी पडले त्याजवरून स्वामीनी कृपाळु होऊन इनाम दोन चावर जमीन मौजे मांडकी व मौजे भोळी येथे दिल्हे त्याची वहिवाट दिल्हापासून आज तागायत निर्वेध चालत आली सम इसने आशरीनचे साली मौजे भोळी येथील गावकर याणी आम्हास स कळतां जमीन मोजून पाव चाव्हराचा पटा इनाम कसर म्हणून केला आणि रु ३५ तीस मागू लागले तेव्हां आम्ही राजश्री लक्ष्मुभाऊ सुभेदार ठाणे वाई येथे जाऊन मार समजाविला त्यानी सेखदार यास मनाई दिल्ही की सरकार आज्ञे सेरीज ऐवज मागावयाचे कारण नाही हाली सन सलास आशरीनचे आखेरीस सरकार मोजणी जाहली त्यात आमचा इनाम बिघे ९७ सत्या

(अपुरे)

## लेखांक ६

कैफियत रामकृष्ण खंडेराव वोकील जोसी कुलकर्णी मौजे हिवरे तर्फ करेपठार परगणे पुरंदर इनामदार मौजे मांडकी तालुके मजकुर सन १२५८ फसली कारणे कैफीयत लिहुन देतो जे मांडकी येथे आम्हास इनाम जमीन चाहूर एक आहे त्याच्या असल सनदा दाखवून कैफियत लिहून देणे म्हणोन आज्ञा त्यास आमचे वडील कैलासवासी पंताजी गोपिनाथ वोकील यास श्री मन्महाराज थोरले कैलासवासी सिवाजी राजे छत्रपती याणी इनाम देऊन चालविल्यावरून पुढे कैलासवासी शाहुमहाराज छत्रपती याणी आमचे वडीलाचे नावे संदा एक गावास व दुसरी देशमुख व देशपांडे यास अशा दिल्ह्या त्या असल दाखऊन नकला करून दिल्ह्या आहेत त्याप्रो दिल्हे दिवसापासून आजपरयंत निरवेध वहिवाट चालली आहे व शेटेपण बाजार बंद होताच वहिवाट मना जाली मुख्य संपादक आमचे वडील पंताजी गोपीनाथ यांजपासून आम्ही

सातवी पिढीची वंशावळ आलाहिद्दा लिहून दिल्ही आहे ही कैफियत लिहून दिल्ही सही तारीख १८ मे सन १८४९ इसवी

सा॥
१ अंबाजी नारायण
देशपांडे पो शिरवळ
१ आंबाजी गोपाळ कुलकर्णी

सही रामकृष्ण खंडेराव
वोकील इनामदार दस्तुर खुद

लेखांक ८

## पंताजी गोपीनाथ यांचे घराण्याचा वंशवेल

सिद्धेश्वर–रामचंद्र–रंगोपंत–१ गोपाळपंत ऊर्फ गोपीनाथ, २ यमाजी (सखाराम भगवंत ऊर्फ बापू यांचा पूर्वज ).

१ गोपीनाथ–२ **पंताजी** ( चिटणीस व वतनसंपादक ).

२ पंताजी–३ रामचंद्र, ४ जगन्नाथ, ५ श्रीनिवास.

४ जगन्नाथ–६ गोपाळ.

५ श्रीनिवास–७ काशी.

३ रामचंद्र–८ बाबूराव ९ नारो, १० पंताजी.

९ नारो– ११ बाबूराव, १२ राजाराम.

११ बाबूराव–१३ मनोहर–१४ विश्वनाथ.

१४ विश्वनाथ–१५ काशीनाथ, १६ मोहनीराज ( दत्तक गेला ), १७ कुशा

१५ काशीनाथ–शंकर.

१२ राजाराम–१८ त्र्यंबक–१९ हरी–२० केशव ( मोजणीदार ) २१ हरी.

१० पंताजी–२२ मल्हारपंत–२३ खंडोपंत, २४ पंताजीपंत.

२३ खंडोपंत–२५ रामकृष्ण, २६ नाना ( दत्तक गेला ३१ )

२५ रामकृष्ण–२७ दत्तात्रेय, २८ नारायण, २९ विनायक–३० नथू.

२४ पंताजीपंत–३१ नाना ( २६ दत्तक आला. )

३१ नाना–३२ मार्तंड, ३३ सदाशिव ( शिक्षक ), ३४ महादेव.

३२ मार्तंड–३५ भिकू ( परागंदा ).

३३ सदाशिव–३६ चितू, ३७ सोमा.

२ यमाजी–३८ महादजी ( हिवरे गांवचा संपादक स, १७१० )

* या शाखेकडे हिवरे, ता० पुरंधर, जि० पुणें या गांवांतील आठ आण्याचे जोशी कुलकर्णवतन व भोळी व मांडकी येथील जमिनी येणेंप्रों वृत्ती चालू आहे. हिवरे गांवांतील बाकी आठ आण्याचें वतन यमाजी रंगनाथ याचे शाखेकडे चालू आहे. सखाराम बापू हा यमाजी रंगनाथाच्या शाखे पैकीं.

पंताजी गोपिनाथाच्या आठव्या पिढींतील सदाशिव नानाजी हे पुरंधर तालुक्यांत मराठी शाळेवर शिक्षक आहेत.

केशव हरी हा मोजणीदार आहे.

विनायक रामकृष्ण यांचा मुलगा नथोपंत हा सारोळा स्टेशन (जि. नगर) येथें नोकर आहे.

श्री धार.

१३. ५. १९

# भांबोरेकरराजे भोसले यांचे घराण्याची हकीकत.

(लेखक—भिकाजी बाळाजी भोसले भांबोरकर.)

माझा जन्म याच घराण्यांत झाला असून त्याची व तद्द्वारा महाराष्ट्राची बनेल ती सेवा करण्याची मला इच्छा आहे. माझे घराणें अहमदनगरचे निजामशाहींत पुढें येऊन त्यांचे हातुन अल्प स्वल्प देशसेवा घडली आहे; व त्या संबंधाचीं कागदपत्रें तीनशें वर्षांचीं कमी अधिक महत्वाचीं माझे घरांत आहेत. त्यांची तपासणी करून इतिहासाचे साधनांत थोडी फार भर घालण्याची मला उत्कंठा आहे. या इच्छेनें प्रेरित होऊन हें टिपण लिहिलें आहे. हा माझा पहिलाच प्रयत्न आहे. यांत न्यूनातिरेक कांहीं असल्यास त्याची क्षमा करून विद्वज्जन मला प्रोत्साहन देतील अशी आशा आहे. या प्रमाणें भोसले घराण्याच्या इतर शाखांचीहि माहिती एकत्र करून इतिहासज्ञांपुढें मांडावी असें मी इच्छितों.

विद्वान् लोकांचें लक्ष अलीकडे भोंसले कुलाचा पूर्व इतिहास शोधण्याकडे लागलें असून त्यांनीं मालोजी राजापासून ते थेट धाकटे शाहूराजापर्यंत जागोजाग इतिहास लिहून ठेविला आहे. परंतु मालोजी राजाचे सख्खे धाकटे बंधू खेलोजी उर्फ विठोजी राजे यांचे घराण्याकडे अद्याप कोणाचेंच फारसें लक्ष गेलेलें नाहीं. याचें कारण कदाचित् येवढेंच असेल कीं छत्रपती शिवाजी राजासारखा धर्माभिमानी, देशाभिमानी, स्वार्थत्यागी, धाडसी, शूरवीर कोणीच या घराण्यांत आज पर्यंत निपजला नाहीं. परंतु मी असें म्हणतों कीं याचे जोडीचा दुसरा कोणी पुरुष जरी विठोजीराजाचे घराण्यांत उदयास आला नाहीं तरी त्यांचे सालोसाल त्याच वेळेस भोसल्यांचें घराण्यांत आपल्या स्वतःच्या पराक्रमानें व इभ्रतीनें इजतअब्रू मिळवून नांवालौकिकास चढलेलीं अशीं कांहीं वीररत्नें चमकून गेलीं. त्याचे ठिकाणीं स्वराज्याची खरी कल्पना नसल्यामुळें आपल्या आंगीं असलेल्या पराक्रमाचा उपयोग त्यांनी परधर्मी

राजाचे बरोबर राजनिष्ठेनें वागण्यांतच केला व याच कारणामुळें ते महाराष्ट्राचे इतिहासांत लोकमान्य झाले नाहींत. असो.

आज विठोजी राजाचे घराण्यापैकीं भांबोरे येथील भोसले घराण्याची साग्र माहिती द्यावयाची आहे. वर सांगितलेंच आहे कीं खेलोजी उर्फ विठोजी राजे हे मालोजी राजाचे सख्खे धाकटे भाऊ होते. यांस आठ मुलगे व एक मुलगी अशीं नऊ अपत्यें होतीं. त्यापैकीं वडील मुलगी अंबिकाबाई ही जाधवरावाचे घरीं दिली होती. तिचा पाठचा पहिला मुलगा संभाजीराजे हा मीरजुमल्याचे लढाईत जाधवरावाकडून लढत असतां धारातीर्थीं पतन पावला. त्यास संतती नाहीं. दुसरा मुलगा खेलोजी राजे यांजवर गर्दी होऊन एकाएकीं मारले गेले. त्यांचे वंशज शंभुमहादेव (जिा सोलापूर) वावी (जिा नासिक) कळस (जिापुणें) मीरगांव (जिानासीक) निरगुडी (जिानगर) मानेरथ (जिानासिक) या सहा गांवीं राहात आहेत. तिसरा मुलगा मालोजी राजे यांचे वंशज जेजुरी नजीक कोन्हाळे गांवीं राहात आहेत. चवथा मुलगा कबाजी राजे हे शाहाजी राजाबरोबर तंजावरास गेले असावेत. पांचवा मुलगा नागोजी राजे यांचे वंशज मुंगीपैठण व बनसेंद्री (जिा अहंमदनगर) या गांवीं आहेत. सहावा मुलगा परसोजी राजे यांचे वंशज नांदनज (मोगलाई ता आष्टें) व भांबोरे (जिा नगर) या गांवीं राहात आहेत. त्रिंबकजी हे तंजावरास गेले. त्यांचे वंशज तिकडेच आहेत. आठवा मुलगा कक्काजी राजे यांची नकल झाली.

या आठ मुलांपैकीं सहावा मुलगा परसोजीराजे हे नांदनज व भांबोरें या दोन गांवीं राहत असलेल्या भोसल्यांचे मूळ पुरुष आहेत. निजामशाहीचे अखेरीस जेव्हां शाहाजीराजे अहमदनगर सोडून विजापुराकडे जावयास निघाले तेव्हां त्यांनी आपले चुलते विठुजीराजे यांच्या साही मुलांची व्यवस्था जागजागीं लाविली. त्यांतून परसोजीराजे यांस त्यांनी निजामशाहींतील भालोरी हा गांव दवलताबादकराकडून जागा तैनातींत लाऊन दिली. त्यामुळें परसोजी राजे हे निजामशाहींतच राहून मोठमोठालीं जिम्मेदारीचीं व पराक्रमाचीं कामें करून आपल्या इभ्रतीनें चांगलेच नांवालौकिकांस चढले. याची साक्ष त्यावेळचीं त्यांचे नांवाचीं वतनबाबीचीं सनदापत्रें देत आहेत. त्या वेळेस वऱ्हाडांत व खानदेशांत बंडखोर लोकांच्या टोळ्या जागोजाग रयतेस त्रास देत होत्या. त्या लोकांचा बीमोड करण्याकरितां सरकारांतून यांची योजना करण्यांत आली. वऱ्हाड व खानदेशांत जाऊन त्या ठिकाणचीं बंडें मोडून नर्मदा ओलांडून हे काशी बनारस पर्यंत गेल्याचा उल्लेख आमचेजवळ असलेल्या एका फारशी पत्रांत आला आहे व याच कामगिरीबद्दल त्यांना वऱ्हाडांतील जळगांव जामुदी या गांवची देशमुखीची सनद मिळाली होती. त्यांनी ठिकठिकाणीं वसाहती केल्या व औरंगाबादेस एक पुरा वसविला तो अद्याप यांचे नांवावर परसुपुरा म्हणून

चालत आहे असें आमच्या प्रांण्यांतील जुनीं माणसें सांगतात. त्यांना सयाजी नांवाचा एक मुलगा होता.

सयाजी राजे हे आपल्या वडिलांप्रमाणें च मोठे कर्ते व बहाद्दर असे पुरुष होते. यांचे वेळेस अहमदनगरास पूर्वींची निजामशाही बुडून नवीन मोंगलाई अंमल सुरू झाला होता, व शाहानशाहा औरंगजेब बादशहा दिल्लीस राज्य करीत होता. त्यानें सयाजी राजांस फौजदारी अंमल देऊन वऱ्हाडप्रांतीं बंडखोर लोकांवर पाठविलें. त्यांनी कांहीं स्वारांसह जाऊन बाळापूर ओकाल्याजवळ बंडखोर लोकांच्या पुढाऱ्यांस धरून हुजूर पेश केलें; व परत घरीं आल्यावर सयाजीनें रयतेच्या अनकूलतेनें नांदनज येथें नवीन एक गांवाची वसाहत करून त्याचें नांव अलमगीरपूर असें ठेविलें. त्यावरून अलमगीर बादशाहा खुश झाले, व मोठ्या गौरवाचे परवाने सयाजीराजे यांचे नांवे जारी करून अलमगीरपूर हा गांव ११६०८५४ दामांचा ( म्हणजे ४० दामांचा रुपया याप्रमाणें २९५०० रु. चा ) दिवाणी फौजदारी हक्कांसह जहागीर म्हणून त्यांस इनाम दिला. ते असल परवाने उपलब्ध नसून त्यांचें इंग्रजी भाषांतर आहे तें सोबत जोडलें आहे ( परिशिष्ट नं. १–२) सयाजीराजे मृत्यु पावले तेव्हां त्यास दोन मुलगे होते. वडील राजरूप व धाकटा रुस्तुमजी.

राजरूप हा वडिलांचे मार्गें आपल्या कुटुंबांतील माणसांस नांदनजच्या गढींत ठेऊन बारा वर्षें पर्यंत बादशहाच्या खिदमतींत लष्कराबरोबर जागोजागीं कामगिरीवर फिरत होता. या अवधींत नांदनज मुक्कामीं आपण ठेविलेला वहिवाटदार अबदुल-रजाक हा कोणीकडे निघून गेला त्याचा पत्ता लागला नाहीं. तेव्हां त्याच नांवाचा तोतया मुसलमान सरदार यांच्या गढींत शिरून दांडगाईनें तेथें राहूं लागला त्यावेळेस त्या कुटुंबांतील माणसांनीं आपल्या मुलांलेंकरांस त्रास होत आहे आणि या बलवान सरदारास धिटाईनें तोंड देऊन त्याचें पारिपत्य करण्यास आपण असमर्थ आहों असें समजून अब्रू रक्षण करण्याकरितां ती जागा मुकाट्यानें सोडली व तीं दुसरीकडे राहावयास गेलीं. या धामधुमींत सयाजीराजाचा धाकटा मुलगा रुस्तुमजी हा बालवयांत होता. त्यांस सुरास राखून तोतया अबदुल्लानें जबरदस्तीनें धरिला व गढींत नेऊन कोणास माहित न होईल अशा रीतीनें दडवून ठेविला. चार वर्षांनीं अबदुल्लाच्या डोळ्यांस जखम लागून तो आंधळा झाला ही संधी साधून मुलगा बाहेर आला. तेव्हां लोकांनीं उचलून त्यांस घरीं नेलें व विचारपूस केली. त्यानें सांगितलें कीं मला अबदुल्लानें जबरदस्तीनें धरून नेलें व गढींत दडवून ठेविलें. या अबदुल्लानें सुमारें १०।१२ वर्षें रयतेवर फार जुलूम केला तेव्हां रयतेनें त्रस्त होऊन सन जलूस ३९ म्हणजे इ. स. १६९६।९७ यावर्षीं बंदोबस्त होण्यासाठीं फारशींत मोठा मुद्देसूद अर्ज केला तो मराठी गोषवाऱ्यासह सोबत दिला आहे. इतिहासज्ञांस तो बराच महत्वाचा व मनोरंजक वाटेल. ( परिशिष्ट नं. ३ ). रुस्तमजी हा पुढें मोठा कर्ता व इभ्रतदार निघाला. त्यानें आपल्या कारकीर्दींत सावकारी देवघेव मोठ्या-प्रमाणावर जारीनें चालविली होती असें त्यावेळच्या त्याच्या नांवाच्या सांपडलेल्या

कर्जरोख्यांवरून समजतें. यांस दोन मुलगे होते. वडिल मुलाचें नांव खेरोजी व धांकट्याचें परसोजी.

परसोजी हे स्वभावानें जरा भोळसर होते. त्यांस च पुढें सातारचे थोरले शाहू महाराज यांची चुलत आजी म्हणजे शहाजीराजे यांचे वडील चिरंजीव संभाजीराजे यांची बायको मकाऊसो जिंतीकरीण यानीं आपणांस मूल नाहीं म्हणून वंशवृद्धि होण्याकरितां दत्तक घेतलें. जिंतीच्य. घराण्यांतील भोसले हे याच पुरुषाचे वंशज होत.

रुस्तुमजीचे वडील चिरंजीव खेलोजीराजे हे नांदनज मुक्कामीं वडिलार्जित वतनदारीवर होते. शाहूमहाराज मोगलाईत गेले होते. ते परत येतांना खेलोजी यांस बरोबर घेऊन सातान्यास आले व त्यांनी त्यांस आपले आप्त समजून नांदनज व भांबोरे येथील मोकासा अंमल देऊन राजपत्रें करून दिलीं. तेव्हांपासून हें घराणें स्वराज्याच्या अन्नोदकाचें ऋणी होऊन राहिलें आहे. खेलोजी राजे हे सातारा मुक्कामीं वारले असें म्हणतात. त्यांस चार मुलगे होते. त्यांचीं नांवें अनुक्रमें शाहाजी, कक्काजी, रुस्तुमजी व सुभानजी अशीं होतीं. या चौघांत वरील दोनही गांवची वतनदारी वांटली गेली आहे. म्हणजे दोन्ही ठिकाणीं या चार भावांचे चार वाडे चार विहिरी चार मळे अशी व्यवस्था केली गेली असून अद्यापि वरील प्रमाणें च वतन बाबीचे किंवा मानपानाचे हक्काचे प्रथमतः वरील चार घरांचे नांवानें चार हिस्से करण्याची कदीम वहिवाट कायम आहे.

या चौघांपैकीं वडील शहाजी राजे हे पेशव्यांचे लष्करांत नौकर असल्याचा खुलासा कांहीं कांहीं पत्रांत आला आहे. शाहाजी नौकरीनंतर गांवीं येऊन नांदनज मुक्कामीं राहिले. त्यांचे वेळचा पत्रव्यवहार बराच सांपडला आहे. परंतु त्याचें अद्याप वाचन चांगल्या रीतीनें न झाल्यामुळें खात्रीलायक हकीकत लिहितां येत नाहीं. दुसरे कक्काजी हे सरंजामी अंमलदार असून नानासो पेशव्यांचे वेळेस लष्करांत कामकाज करीत होते. ते एके वेळस कर्नाटकांत पेशव्यांच्या स्वारी बरोबर गेले होते असा त्यांचे एका पत्रांत उल्लेख आला आहे. तिसरे रुस्तुमजी हेहि वरील प्रमाणेंच पेशव्यांचेच लष्करांत नौकर असून गिलचांचा व मराठयांचा जो मोठा घोर रणसंग्राम पानिपत मुक्कामीं झाला त्याप्रसंगीं हे स्वतः त्यांत विद्यमान होते असें त्यांनी दिल्लीहून पाठविलेल्या राजकीय मजकुराच्या पत्रावरून समजतें. त्याची नकल **परिशिष्ट नं० ४** मध्यें दिली आहे. त्यांत ते आपल्या मातोश्रीस कळवितात कीं "श्रीमंतानी दिल्ली घेतली. किल्लेंत व शहरांत ठाणें वसविलें. गिलजा यमुना पलीकडे आहे. त्याचे वकील याजकडे येतात. परंतु हरएक विशीचा तह झाला नाहीं. काय होईल तें पाहू. व तीर्थस्वरूप बाबासाहेब अंताजी माणेकश्वर याजपाशीं आहेत. परंतु माहागाई दोन पायली प्रमाणें आहे." हें वर्णन हल्लींच्या स्थितीस जुळवून पाहिलें असतां मोठी मौज वाटते. चौथे सुभानजी हे जानोजी भोसले सेनासाहेब सुभा नागपूरकर यांचे

लष्करांत नोकर होते. हे स्वतः रघुनाथराव दादा व निजामअली यांची जी राक्षसभुवनची ( इ० स० १७६३ ) मोठी मातबर लढाई झाली तींत हजर होते, असें त्यांनीं गंगेच्याकांठीं लष्कराचा मुक्काम असलेल्या ठिकाणाहून पाठविलेल्या पत्रावरून समजतें. त्याची नकल परिशिष्ट नं० ५ मध्यें दिली आहे. त्यांत उल्लेख आहे तो असा, "राजेश्री जानोजी भोसले पेशव्यास येऊन भेटले आणि मग मोंगल बुडविला." लढाईच्या प्रसंगीं पेशवे सरंजामी सरदार व शिलेदार यांची बारकाईनें चौकशी करीत असत असें या पत्राच्या शेवटील मजकुरावरून सिद्ध होतें. आगळीक न होण्या बा॥ दूरदर्शी सुभानजी किती जपत होते हे खालील मजकुरावरून लक्षांत येते. "येथील वर्तमान पेशव्यानीं [ रघुनाथरावदादाजी ] सोध केला कीं सातारच्या आसामीया कोन आले आणि कोन न आले ते याद पाहिली. तो तुमचे कोनी नाहीं. हे बरे नव्हे तर तुम्ही येऊन चाकरी करून ये हें उत्तम आहे. ऐसा अविचार झाला तर मग संबाळनार नाहीं हे वर्तमान आम्हांस कळले म्हणून ली॥ असे. इतक्यावर तुमचे खात्रीस येईल ते करने, काम बुडल तो विचार न करने." खेळोजी राजांचे चार मुलगे शाहाजी, कक्काजी, रुस्तुमजी, व सुभानजी. त्यापैकीं शाहाजी, रुस्तुमजी व सुभानजी या तिघांची कुटुंबें नांदजन मुक्कामी राहिलीं व कक्काजी हे आपल्या कुटुंबासह भांबोऱ्यास राहवयाकरतां आले. ते तेथेंच राहिले. तेव्हांपासून आम्हां भांबोरकरांची शाखा वेगळी झाली. या कक्काजीस मुलगे दोन. वडील चिमणाजी व धाकटे आप्पासो.

आप्पासो हा पुरूष मोठा बलवान व रागीट असा होता. त्याच्या धाडसाविषयीं अनेक आख्यायिका जुनीं माणसें सांगतात. हे व यांचे वडील बंधू चिमणाजी असे दोघेजण सायंकाळचे समयांस माहादेवाच्या दर्शनाकरितां चालले असतां वाटेंत दोघा हल्यांची मोठी टक्कर झाली, व ते दोघे हि लढत लढत जवळच एक गांय बांधिली होती तिजवर जावयास लागले. हे पाहून चिमणाजी राजांनी भावास सांगितलें कीं, "अरे अप्पा गाईला वाचीव." हे भावाचे शब्द ऐकून ते एकदम दोन्ही हल्याच्या मध्यें घुसले व दोन्ही हाती दोन्ही हले दोन्हीकडे सारून त्याची झुंज सोडविली. यांना मुलबाळ कांहींच नव्हतें.

चिमणाजी राजे हे मोठे कर्ते व स्वभावानें भोळे होते. हे कोंकणांत लेकीस भेटावयाकरितां गेले असतां तेथेंच वारले असें सांगतात. यांना दोन मुलगे होते. वडील रात्रोजी उर्फ रावसो व धाकटे आबासो.

आबासाहेबांस शेतीचा मोठा नाद होता. त्यानीं भांबोरे गांवी केळीचे व जांबाचे बाग लाविले होते. हे पुढें ग्वालेरीस आपले साडू सरदार पाटणकर यांस भेटण्यास गेले तेथेंच वारले. त्यांस मुलबाळ कांहीं नव्हतें. ग्वालेरींत पाटणकराचे गोटांत त्यांची छत्री बांधली आहे. त्यांत महादेवाचे पिंडीची स्थापना केली आहे असें सांगतात.

राघोजीराजे हे शेवटचे बाजीराव पेशवे यांचे कारकीर्दींत भांबोरे गांवीं पाटी- कीच्या कामावर होते, व सरंजामी मोकासपणाची चाकरी गुमास्तेगिरीनें करवीत होते. यांची त्यावेळीं आसपासच्या गांवांत चांगलीच वजनदारी होती व लोकांत हे एक प्रमुख समजले जात असत. यांना कुत्र्याचा मोठा नाद होता. चांगले चांगले ठिकाणाहून कुत्र्यांची मागणी याजकडे होत असे. असा अदमास यांचे वेळच्या पत्रांवरून करतां येतो. त्यांचे वेळचे दोनशेंवर कागद सांपडले आहेत. परंतु अद्याप त्यांचें वाचन चांगल्या रीतीनें झालें नाहीं म्हणून जास्त हकीकत लिहितां येत नाहीं. आमचे घराण्यांत जुने कागद पत्रांचा जो संग्रह हल्लीं राहिला आहे त्याचें बहुतेक श्रेय यांसच दिलें पाहिजे. हे आपल्या कागदपत्रांस जीव कीं प्राण समजत असत. गांवावर धाडे वगैरे येत त्या वेळीं दुसऱ्या चीजवस्तांची व घरादारांची पर्वा न करितां आपला कागदपत्रांचा संग्रह उंटावर लादून घरदार सोडून पळून जात व पुनः शांतता झाल्यावर तो संग्रह घेऊन घरीं परत येत. तो ठेवण्याकरितां आमचे वाड्याचे तळघरांत दोन रांजण केले होते. राघोजी राजे वारले त्या वेळेस यांना एकच मुलगा होता त्याचें नांव कक्काजी असें होतें.

कक्काजीराजे हे अव्वल इंग्रजींतील भांबोरे गांवचे सरंजामी वहिवाटदार होते. यांचे देखत मराठेशाही बुडून नवीन इंग्रजी अंमल सुरू झाला. स्वभावानें हे फार भोळे व दयाळू असत. यांचे शरीराचा बांधा ठेंगणा असून राहणी अगदीं साधी होती. यांना साधारण लिहितां वाचतां येत होतें. यांचे पहिले कुटुंब वडुसकर शिरकेयांच्या घराण्यांतील होतें ते वारे त्यावर दुसरें कुटुंब वडगांवचे निंबाळकर यांचे घराण्यांतील केलें. तिजपासून त्यांना तीन मुलगे व तिघी मुली अशीं सहा अपत्यें झालीं. तिघा मुलांची नांवें अनुक्रमें शाहाजी, बाळाजी व लालाजी अशीं होतीं. ही बाई हि आपल्या सासऱ्याप्रमाणेंच कागद पत्रांचें महत्व जाणत असे. हिच्या पुढें मात्र तसा प्रकार राहिला नाहीं. त्यामुळें बराच संग्रह नाहींसा झाला. असो. हिचे तिघां मुलांपैकी वडील शाहूजी यांस तारळेकर महाडीकांची मुलगी केली होती. तिचीच धाकटी बहीण धार येथील महाराज ३ रे आनंदराव पवार ( १८५७–५८ इ० स० ) यांस दिली होती. त्यामुळें हे शाहाजीराजे आपल्या कुटुंबांसह धारेस आपले साडू महाराज सर आनंदराव पवार यांस भेटावयास आले त्या वेळीं महाराजांनी यांजवर मेहेरबान होऊन यांस एक सरदारी असामी करून दिली. यांस मुलगा एक व मुलगी एक अशीं दोनच अपत्यें झालीं. मुलाचें नांव शंकराजी व मुलीचें नांव येसूबाई असें होतें. हीच मुलगी श्रीसंभाजीराव आबा साहेब पवार मलठणकर यांस दिली. तिला एकच मुलगा श्रीउदाजीराव नांवाचा झाला. तेच श्री० आनंदराव पवार यांचे दत्तक पुत्र होऊन हल्लीं धारसंस्थानच्या गादीवर विराजमान आहेत.

शाहूराजे यांचा मुलगा शंकराजी यांस मूल नाहीं म्हणून त्यांची बायको गंगाबाई इनें आपले धाकटे सासरे लालाजी यांचा वडील मुलगा शिवाजी यांस

दत्तक घेतलें. त्यांचेच नांवें हल्लीं पूर्वीची सरदारी असामी चालत आहे. दुसरे बाळाजी राजे यांस मुलगा एक. तोच हें टिपण लिहिणारा भिकाजी असून त्यांसहि धार येथें श्रीमंत महाराज सर उदाजीराव पवार साहेबबहादुर के. सी. एस. आय. के. बी. ई. यांनीं कृपाळूपणें आपले दरबारीं एक सरदारी असामी देऊन कायमचा आश्रय दिला आहे. तिसरे लालाजी हे हयात असून त्यांसहि वरील मो। येथें एक सरदारी असामी आहे.

हें प्रकरण अकल्पित रीतीनें बरेंच लांबलें परंतु तें संपविण्यापूर्वी इतिहासदृष्ट्या धार येथील महत्वाची एक घटना सांगितल्यावाचून मला राहावत नाहीं. ती अशी कीं, मराठेशाहींतील कांहीं प्रसिद्ध प्रसिद्ध घराण्यांचे एक लहानसें संम्मेलनच धार येथें झालें आहे. मुख्य भोसले घराण्याच्या मुंगीकर, भांबोरेकर, व वावीकर अशा तीन शाखांचे प्रतिनिधी येथें आहेत, व त्याचप्रमाणें प्रचंडगड पैकीं मोसे गांवचे बाजी पासलकर यांचे वंशज, तारळ्याचे महाडिक, पोगरवाडीचे मोहिते, कुजांवकर सुर्वे, सरवलीचे मानकर, बेनीचे सानविलकर, सुवर्णदुर्गचे धुळप, वाडीचे निंबाळकर, शिरके डेरवनकर, घाडगे मोळकर, कदम बांडे कोपरलीकर वगैरे वगैरे घराण्याचे वंशज येथें आहेत. त्यांनी आपापले घराण्याचे कागदपत्रांचें संशोधन करून हकीकत लिहिल्यास त्यापासून महाराष्ट्राचे इतिहासास फार मदत होईल.

हें टिपण तयार करण्याच्या कामीं मला धारचे इतिहासभक्त रा. रा. काशिनाथ कृष्ण लेले मास्तर साहेब यांजकडून या कामीं कळकळीचें प्रोत्साहन मिळाल्या बद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

## परिशिष्ट नं. १

## FARMAN (1)

Whereas according to our gracious command, Sayaji son of Parsoji Bhonsle, a man of venerable rank, worthy of high respect, the choicest of the chiefs, the head of all what is good and noble, has had the village of Nandanaj pargana Karoli Sarkar Ahamadnager in the province of Aurangabad, as his Jahagir, but now for his meritorious services in causing an increase of population and income of the said village, and also in populating a new village of Alamgirpur, we are pleased to command that

this village with an income of Dam 1160854 ( Rs. 30000 nearly ) be conferred on the abovenamed Sayaji son of Parsoji as a Jahagir aud that the administrator of the province, and future officers, Karkuns of Pargana, and the subjects, and peasants of the Mahal, be informed of the fact, that we have graciously granted Alamgirpur as a Jahagir to Sayaji son of Parsoji Bhonsle, and none is to interfere with his special rights of dispensing civil and criminal Justice to his subjects and no change is to be made herein in future.

Dated the 28th of the month of Jamadilawal of the ninth year of the auspicious reign that is 1077 A. H. ( A. D. 1666-67 in the reign of Alamgirshah. )

परिशिष्ट नं. २

## FARMAN (2)

The seal of his most noble Highness the prince of the descent Dated, the 16th of Jamadilawal of the 11th year of the reign of the Emperor.

During the auspicious time it has come to our knowledge through the courtiers that Sayaji son of Parsoji says that since the commencement of our reign he has had as a Jahagir the village of Nandanaj Pargana Karoli, Sarkar Ahmednagar, in the province of Aurangabad and that he has shown a good increase in the income and revenue of the village and with his good management has papulated a new village named Alamgirpur, wherein he now lives and requests that it would be very kind and quite in conformity with the laws of justice to bestow upon him the said village, we therefore grant the above request and order that Sayaji son of Parsoji be allowed to live with Nandanaj and Alamgirpur in Jahagir as is mentioned in the order. We further enjoin that the Mutsadian ( मुत्सद्दियान ) of the Mahal and their succesors

must neve. nake [any] change herein and disobey our everholding good command aud especially they ought to be very mindful not to go against the honorworthy Farman as given under our seal.

---

परिशिष्ट नं. ३ श्री

## नांदनज येथील लोकांकडील फारशी अर्जाचा सारांश

१ मौजे अलमगीरपूर कसबे नांदनज परगणे कडोली सरकार अहमदनगर येथील रयत छ २ मोहरम सन ३९ जलूस (सन १६९६ । ९७) रोजी काजीची कचेरी कसबे कडोली परगणे मजकूर येथें हाजर होऊन विदित करती झाली कीं आम्हीं महाजन व तेली व सोनार व रंगारे, व तांबोळी व शेतकरी वगैरे रैय्यत मौजे मार जाहीर करतो कीं सयाजी बा परसूजी भोसले फौजदार व जहागीरदार व आमीन मौजे मार यांच्यां हुकमतीच्या वेळीं पूर्वी दंग्याधोप्यामुळें वैराण व उद्वस्त झालेल्या नांदनज गांवाच्या हद्दींत आम्हीं नवीन गांव वसवून त्याचे नांव अलमगीरपूर ठेविलें तेथील वतनदारी राजरूप बिन सयाजी यानें आपले मुलांस दिली. त्यापैकीं महाजनगिरीची वहिवाट करण्याकरितां अबदुलरजाक बा दावलखां यांस मुकरर केलें, आणि दुसरे कामदार नेमिलें.

२ थोडया दिवसांनीं सयाजी मजकूर मरण पावला व राजरूप शेटिये मौजे मार यानीं आपल्यातर्फें काम करण्याकरितां नायब मुकरर केला आणि स्वतः बादशाही कामगिरीवर फौजे बरोबर काम देऊं लागला. आणि अबदुलरजाक महाजन सुरूपासून हजर नसून कोठे राहतो याचा पत्ता नाहीं असें पाहून तोतया अब्दुलखा बा दावलखां यानें कांहीं संबंध नसतां विनाकारण ज्या किल्यांत सयाजीचीं मुलें बाळें आश्रय धरून राहात होती, त्यांत पन्नास माणसांनिशीं घुसून तेथें तो राहूं लागला. आणि जमीन कबजांत करून घेऊन आम्हांस खराब व वैराण केलें. जों पावेतो अबदुलखा तेथें राहीला तों पावेतो आमचे तेथें राहणे मुश्कीलीचे आहे. कारण खुदः सरकारी फौजदार व जहागीरदार हे ही त्यांस भितात. तेथें गरीब रैय्यत काय करूं शकणार ? त्याच वर्षी चार पांच हजार रुपये उकळुन त्यानें आपल्या तळाराम गार केला. त्याच्या जुलमाचा आणखीही खुलासा खाली लिहल्याप्रमाणें करण्यांत येत आहे—

१ प्रथम अबदुलाच्या भावानें दांडगे शिपाई बरोबर आणून दोनशे साडेपन्नास रुपये जबरदस्तीनें वसूल केलें, व खुदः अबदुलानेंही सात रुपये तसेंच फुकट घेतलें; व त्याचा गुमास्ता बुदेखां यानें चाळीस रुपये नजराणा घेतला.

२ दुसरें वेळीं अब्दुल्लाच्या भावानें गोविंदा यांस बरोबर घेऊन येऊन कसबे गोला येथें राहून इतकी धामधूम व लुटालूट माजविली कीं त्याच्या दहशतीनें लोक आपली बायका पोरें बरोबर घेऊन किल्ल्यांत अबदुल्लाकडे गेले. परंतु तेथें दाद न लागून त्यांवर अनेक प्रकारें जास्ती सक्ती झाली. लोकांनीं हात जोडून पाया पडून आपली लाचारी दर्षविली. तथापी त्यांजवळ दोन हजार रुपये मागीतलें आणि मोठ्या मिन्नतीनें पंधराशे रुपयावर त्यांस राजी केलें; आणि आणखीही किरकोळ रकमा याप्रमाणें सक्ती होत राहिल्यास फिसादी वाटून आबादी बिघडून जाईल. बंडें होतील. गांवें बेचिरख होऊन जातील. हल्लीही एक हजार रैय्यत पळून जाऊन झाडांचा व जंगलाचा त्यानीं आश्रय घेतला आहे. अबदुल्लाचे रिस्तेदार लुटीवर गबर झाले आहे. आणि पैसे उपटून एक हवेली बांधण्यांत आली आहे. या प्रमाणें बारा सालापासून गांव तबाह होत आहे.

३ व्यापारी लोकांनीं गांवांतील गल्ला जमा करून सरकारी लष्करांकडे पाठवीण्याचा इरादा केला. परंतु अबदुल्ला यानें फकीर महंमद वा अबदुल करीम यांस फर्माविलें कीं व्यापारी यांस कैद करून त्या पासून सव्वाशें रुपये घेतल्यावर गल्ला लष्करांकडे जाऊंद्या. अशा लांचरुष्वतीच्या सक्तीनें गांवांत अडीचशें घरें महाजनांचीं होतीं तीं वैराण होऊन गेलीं. अबदुल्लाच्या दहशतीमुळें त्याचा ऐब कोणी जाहीर करण्यांस धजत नाहीं. त्याच्या जुलमामुळें रैय्यत परेशान ( त्रस्त ) झाली आहे.

४ राजरूप जहागीरदार बारा वर्षांनी आपले वतनांस परत आल्यावेळीं गांव वैराण होण्याचें कारण विचारूं लागले. तेव्हां झालेली हकीकत त्यांस कळवून लोक म्हणाले कीं आम्हीं अबदुल्लाच्या विरुद्ध ब्र काढण्याचे जाहीर झाल्यांस तो असा जबरदस्त आहे कीं सार्‍या गांवांत हरताळ पाडील, म्हणजे गांवांत दिवा लावणें व दुकान उघडणें ही बंद करून टाकील.

५ आम्हांस कैद करून आमचे पासून जबरदस्तीनें दोनशे साडेसत्तावन रुपये वसूल केले. तात्पर्य हे कीं खानेशुमारीच्या वेळीं सत्यायशीं ( ८७ ) घरें गिणतींत आलीं. त्या सर्वांपासून रुपये वसूल करून कोणांस हिशेब दिला नाहीं.

६ मोगऱ्याचें तेल मशिदीत चिराख लावण्याकरतां म्हणून पांचशें रुपयाचे दरसाल तेल्यापासून जबरदस्तीनें करीत आहे.

७ याच्या तहकीकातीकरितां फकीरखां साहेब आलें होतें. त्यांच्या नांवानेंही दीडशे रुपये वसूल करून खाऊन टाकिलें. कोणी त्यांस विचारिलें देखील नाहीं. यास्तव आम्ही रैय्यत लोक उमेदवार आहोंत कीं या गोष्टींची तहकीकात ( चौकशी ) होऊन बंदोबस्त व्हावा. म्हणजे अबदुल्ला जबरदस्तीनें रयतेस वैराण करणार नाहीं व आम्हां रयतेस तकलीफ देणार नाहीं असें झालें पाहिजे. हा तोंच मनुष्य आहे कीं

ज्यानें सयाजी भोसले शेटिये यांच्या चार वर्षाच्या अर्भकांस घरांतून चोरून नेऊन लपून ठेविलें. चार वर्षें गेल्यावर जेव्हां अबदुल्लाचे डोळ्यांस जखम लागली तेव्हां तो मुलगा बाहेर पडूं लागला व लोकांस त्या मुलाची ओळख पटली इतके दिवस तूं कोठें होतास म्हणून त्या मुलांस विचारलें असतां त्यानें जाहीर केलें कीं अबदुल्ला खानानें मला किल्ल्यांत लपवून ठेविलें होतें.

मोहर

कायमवेग वाकेनवीस.

**परिशिष्ट नं.४** **श्री.**

तिर्थस्वरूप गंगाभागीरथी मातुश्री आक्कासो व बापुसो वडिलांचे सेवेसी.

बालक समान रूस्तुमजी भोसले चरणी सां दंडवत विज्ञापना ता. छ३ मोहोरम मुा दिल्ली जाणून वडिलाचे आशिर्वादें करून सुखरूप असो वडिलाकडील आम्हीं आलीया ता कांहीं मजकूर वर्तमान कळला नाहीं. तरी ऐसे न करितां हर कोन्ही येईल त्याबरोबर पत्रद्वारे परामृश केला पा। या नंतरी इकडील राजकी मजकूर श्रीमंतानीं दिल्ली घेतली किल्लेंत व शहरांत ठाणें आपले बसविलें. गिलजा यमूने पलीकडे आहे. त्याचे वकील याजकडे येतात. श्रीमंताचे वकील त्याकडे जातात. परंतु हरएक विशीईचा तह झाला नाहीं. काय होईल ते पा।व. तिर्थस्वरूप बाबासो अंताजी माणकेश्वर याज पाशीं आहे. परंतु माहागाई दोन पायली प्रमाणें आहे. घरचा मजकूर मुललेकर वांगींत आहेत की मांमोरीयांत आहेत हे वर्तमान पत्रीं लिहूं

विठोबा रजपू [ त ] याची माणसें लष्करांत त्याचे भावकडे येतात. त्याचा शोध करून कागद पावता करणें अथवा बालोजी गावडा बारडगावकर याची माणसें येतात त्या बराबर पत्रें पाठवणे.

माणकोपंत बावापाशी आहेत उभयता बापलेक होते त्यांस लेक माघारा गावांस गेलां. मौजे नांदुणज येथील आम्हीं हिसेब लिहून दिल्हा आहे. त्याप्रमाणें तुम्हीं गोविंद महाजन याजपाशीं ४० रुपये घेणे. पावती देणे. त्याचा रोखा आम्ही आलीयावरी देऊं सजगले याचा लेक याजपाशीं सुभानजी बावा नानासाहेबापाशी आले होते. त्यांस आहीं पुसले जे भाऊसाहेब छावनी जातात. त्यांस त्याणी आम्हांस सांगितलें जे तुम्ही श्रीमंतापाशीं निरोप मागून पाहणे. दिल्हा तरी उत्तमच म्हणून सांगितलें आम्हीं त्रिंबकजी बाबांस आम्हीं विचारलें त्यांस त्याणी सांगितलें जे भाऊसाहेब या समागमे जावे म्हणून जाणोजी बक ( ला ) री याचे रूबरू बोलले. आपणांस कळावे म्हणून असे.

ता।—

राजेश्री सुलतानजी काटकर याचा कागद राजेगावांस पोहोचवून त्याचा जाब पाठवून देणे कळले पाहिजे हे विनंती.

परिशिष्ट नं. ५ श्री.

तिर्थस्वरूप मातोश्री आकासो ( सेलोजीची बायको सुभानजीची आई ) व तिर्थस्वरूप राजेश्री बापुसो ( सेलोजीचे दुसरे पुत्र ) वडिलाचे सो.

आपत्य सुभानजी राजे भोसले मुा लसकर गंगातीर सां दंडवत विनंती-उपरी येथील क्षेम ता छ १४ सफर [ ता। २४ आगष्ट सन १७६३ इ० स० ] पावेतोसुखरूप असो. वडिली आपनाकडील वर्तमान सविस्तर लेहून पाठविलें. दुसरे राजकीय वर्तमान तर परस्पर विदित झालेच असेल. रो जाणोजी भोसले पेशव्यांस येऊन भेटलें आणि मग मोगल उडविला आपणांस कळावे म्हणून ली॥ असे वरकड वर्तमान यथास्थित केले पाहिजे बहुत काय ली॥ यावर येथील वर्तमान पशव्यानीं सोध केला कीं सताऱ्याच्या आसामीया कोन आले आणि कोन न आले तें याद पाहिलें. तो तुमचे कोनी नाहीं. हे बरे नव्हे. तर तुम्ही येऊन चाकरी करूं नये हे उत्तम आहे. ऐसा हा अविचार झालातर मग सांभाळनार नाहीं हे वर्तमान आम्हांस कळले म्हणून ली॥ असे. इतक्यावर तुमचे खात्रीस येईल ते करने काम बुडेल तो विचार न करने हे विनंती.

वडिलाचे सेवेसी रूग्गा आप्पा इंगळे मु॥ लसकर सा॥ दंडवत रुपालोभ असो दीजे.

परिशिष्ट नं. ६

## भांबोरेकर भोसले यांची वंशावळ.

बरडाजी–नागोजी–व्यंकोजी–संभाजी–बाबाजी– १मालोजी ( शिवछत्रपतींचे आजे. ) २ खेलोजी ऊर्फ विठोजी.

२ खेलोजी– १ अंबिकाबाई, २ संभाजी, ३ खेलोजी, ४ मालोजी, ५ कबाजी ६ नागोजी, ७ परसोजी, ८ त्रिंबकजी, ९ कक्काजी.

७ परसोजी– ८ सयाजी राजे– ९ राजरूप १० रुस्तुमजी.

१० रुस्तुमाजी– ११ खेलोजी, १२ परसोजी.

---

१ मीर जुमल्याचे लढाईत मारले गेले. २ गर्दी होऊन मारले गेले. यांचे वंशज शंभुमाहादेव, वावी, कळस, मिरगांव, निरगुडी व मंनिरथ येथें आहेत. ३ यांचे वंशज जेजुरी नजीक कोल्हाळ येथें ४ तंजावरास गेले. ५ याचे वंशज मुंगीपैठण येथें ६ वंशज नांदगांव व भांबोरे येथें. ७ शाहू महाराजांची चुलत आजी जिंती-करीण हजला दत्तक.

११ खेलोजी– १३ शाहाजी, १४ कक्काजी, १५ रुस्तुमजी, १६ सुभानजी.

१४ कक्काजी– १७ चिमणाजी, १८ आप्पासो.

१७ चिमणाजी– १९ राघोजी, २० आबासो.

१९ राघोजी– २१ कक्काजी.

२१ कक्काजी– २२ शाहूजी; २३ बाळाजी, २४ लालाजी.

२२ शाहूजी– २५ शंकरराजी

२३ बाळाजी– २६ भिकाजी.

२४ लालाजी– २७ शिवाजी, २८ तान्हाजी.

## परिंच्याचे जाधवराव

मला रा. रा. आबासाहेब गोविंदराव जाधव पाटिल परिंचें, यांनी तारिख १७ रोजीं ५ अस्सल सनदा व १ आज्ञापत्र असे कागद पहावयास दिले व त्यांची नक्कल हि करून घेण्यास परवानगी दिली. रा. रा. आबासाहेब जाधव हे स्वतः संमेलनास हजर राहून अस्सल कागद दाखविणार होते परंतु त्यांना तसें करतां आलें नाहीं व अस्सल सनदा ह्या त्यांचे चालु वतनाबद्दलचे अस्सल पुरावे असल्याकारणानें व त्यांचें घराण्यांत आपापसांत भाऊबंदकीचे दिवाणी खटले चाल असल्याकारणानें त्यांचेजवळ असलेल्या अस्सल प्रती ते दुसरे कोणाजवळ देण्यास नाखुष दिसलें म्हणून मीहि त्यांचे जवळ फारसा आग्रह धरला नाहीं. ह्या ६ अस्सल पत्रांपैकीं ४ शाहु महाराजांनीं दिलेल्या सनदा इनाम कमिशन मध्ये नोंदल्या गेल्या असून तसे शिक्केहि त्यांवर आहेत. त्यांचें घराण्याची अर्धीमुर्धी एक वंशावळहि त्यांनीं दाखविली व त्याची मी नक्कल करून सोबत जोडली आहे. ही वंशावळ म्हणजे इनाम कमिशन-कडून रा. रा. गोविंदराव म्हणजे आबासाहेब यांचे वडील यांचे अर्जावरून देण्यांत आली आहे. रा. रा. आबासाहेब जाधव व त्यांचे पुतणे बाळासाहेब जाधव यांचे जवळ बरींच जुनीं कागदपत्रें आहेत परंतु एकदां स्वतः परिंचे मुक्कामीं गेल्याशिवाय तीं हातास लागतील असें वाटत नाहीं. असो; आतां आपणांस मी उतरून घेतलेल्या नकला वाचून दाखवितों.

---

८ वंशज नांदनज येथें. ९ सांधारेस गेले. १० यांनीं २७ शिवाजी हा दत्तक घेतला. ११ धार येथें ( निबंधलेखक ) १२ शंकराजी २५ यांस दत्तक.

श्री ले. १

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १९ अंगीरानाम संवत्सरे माघ वदि अष्टमी भृगुवासरे क्षत्रीयकुलवतंस श्री राजाराम छत्रपति याणीं देशाधिकारी व लेसक

श्रीराजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वर सुत निळक
ठ मुख्य प्रधान

वर्तमान व भावी सुभा प्रांत सातारा यांस आज्ञा केली येसीजे गणोजी बिन बाळाजी जाधव ये विशई राजश्री संताजी घोरपडे सेनापती याणी चंदीचे मुकामी सनिध येऊन विनंती केली येसी जे गणोजी बिन बाळाजी जाधव यानीं स्वामीचे पायापासी येऊन येकनिष्ठता धरून देसीहून कर्नाटक प्रांतास चंदीस येऊन येकभावे सेवा केली ती यांस येक गाव नुतन इनाम करून घ्यावयास पाहिजे म्हणून विदित केले. त्यावरून त्याचवरी कृपाळु होऊन मौजे कुसवडे........प्रांत सातारा हा गांव नुतन इनाम करून देहे १ येकरास कुलबाब कुलकानु हलीपटी व पेस्तरपटी सहित हकदार व इनामदार करून गाव इनाम करून दिधला असे याचे स्वाधीन करून याचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरा चालवणें या पत्राची प्रति लिहून घेऊन मुख्ये पत्र इनामदार मजकुरास परतोन देणें निदेंश समक्ष

( मागील बाजू )

रुजु

तेरिख २१ माहे जमादिलाखर

जमादिलाखर सनसलास तीसैन

बार बार

ले. २

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १९ अंगीरानाम संवत्सरे फाल्गुन वदि नवमी इंदुवासरे क्षात्रियेकुलावतंस श्री राजाराम छत्रपती यांनी देशाधिकारी व लेसक वर्तमान

श्री राजाराम
नरपाति हर्षनिदान
मोरेश्वर सुत निळकं
ठ मुख्य प्रधान

व भावि सुभा प्रा सातारा यासी आज्ञा केली येसीजे जनाजी जाधव याचे विशई राजेश्री संताजी घोरपडे सेनापती याणी चंदीचे मुकामी सनिध येऊन विनंती केली येसीजे जनाजी बिन बाळाजी जाधव यानी स्वामींचे पायापासी येऊन येकानिष्ठता धरून

देसीहून कर्नाटक प्रांतास चंदीस येऊन येकभावे सेवा करीत आहे तो यास यक गाव नुतन इनाम करून द्यावा यास आज्ञा केली पाहिजे म्हणून विदित केले त्यावरून येजवरी कृपाळु होऊन मोजे चिंचनेर ता। तारगाड प्रांत मा। हा गाव नुतन इनाम करून देहे १ येकरास कुलबाब कुलकानु हलीपटी व पेस्तरपटी सहीत खेरीज हकदार व इनामदार करून गाव इनाम करून दिधला असे याचे स्वाधीन करून याचे पुत्रपोत्रादि वंशपरंपरेने चालवणे या पत्राची प्रति लिहून घेऊन मुख्ये पत्र इनामदार मजकुरास परतोन देणें जाणिजे निदेश समक्ष

मर्या
देयं वि
राजते

मागील बाजू

तेरीख २२ माहे रजब

रजब सुरसन सलास तीसैन

बार सुद सुरु सुद बार

ले. ३

*INAM*
A
COMMISSION

स्वाति श्री राज्यभिषेक शके ३५ सर्वधारी संवत्सरे माघ सुध पंचमी सौम्यवासरे क्षत्रीय कुलावतंश श्री राजा शाहु छत्रपती स्वामी यानी राजश्री देशाधिकारी व

श्री
शाहुनर
पति हर्षनि
धान मोरेश्व
र सुत भैरव
प्रधान

श्रीशंकर श्री
शाहु छत्रपती
कृपानिधी मल्हा
र सुत गदाधर
प्रतिनिधी

लेखक वर्तमान व भावी प्रांत पुणें यास आज्ञा केली येसीजे गनोजी जाधव स्वामीकार्यावरी पडले याकारिता त्याच्या मुलाच चालवणे अगत्य म्हणून स्वामी कृपाळु होऊन मार निलेचा पुत्र येशवंतराव जाधव व जनाजी जाधव व आनंदराव जाधव यास मोजे परिंचे ता। निरथडी प्रा। मजकूर हा गाव कुलबाब कुलकानु नुतन इनाम करून दिला असे

मोजे मजकूर त्रिवर्गांचे पुत्रपोत्रादि वंशपरंपरेनें चालवणे. या पत्राची तालिक लिहुन घेऊन असल भोगवटी यास परतून देणे जाणिजे लेखनालंकार

मर्या
देयं
राजते

( मागील बाजू )

रुजु

रा। छ ६ जिलकाद
तेरिख ३ जिलकाद माहे जिलकाद
सुहुर सन तिसा मया

बार सुर सुद बार

ले. ४

*INAM*
A
COMMISSION

स्वास्ति श्री राज्याभिषेक शके ३५ सर्वधारी संवत्सरे माघ सुध पंचमी भौमवासरे क्षत्रियकुलावतंश श्री राजा शाहु छत्रपती स्वामी यानी मो कदमानी मोजे परिंचे ता। निरथडी यासी आज्ञा केली येसीजे रा। येसवंतराव व जनाजीराव व अनंदराव जाधव याचे स्वामीस चालविणे अवश्यक या करि-

श्री
शाहु नर
पति हर्षनि
धान मोरेश्व
र सुत भैरव
प्रधान

श्रीशंकर श्री
शाहु छत्रपती
कृपानिधी प्रल्हा
द सुत गदाधर
प्रतिनिधी

ता त्या वरी स्वामी कृपाळु होऊन मोजे मजकुर नुतन इनाम कुलबाब कुलकानु माप करून सेरीज हकदार व इनामदार इनाम दिल्हा असे तुम्ही मारनिलेचे रजाती वरतोन मोजी मजकुरचा अकार प्रमाणे वसूल मारानिलेचाकडे चिलाकुसुर देत जाणें जाणिजे लेखनालंकार

मर्या
देय
राजते

( मागिल बाजू )

रुजु

रा। छ ६ जिलकाद

बार सुरु सुद बार

ले. ५

*INAM*
A
COMMISSIONER

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ७५ सर्वधारी संवत्सरे माघ सुध पंचमी भोमवासरे क्षत्रीयकुलावतंश श्री राजा शाहु छत्रपती स्वामी यानी समस्तराजकार्य धुरंधरविश्वासनिधी राजमान्यराजश्री नारोपंडित सचीव यांसी आज्ञा केली येसीज रा। गणोजी जाधव स्वामीकार्यावरी कस्त झाले याकरितां याच्या पुत्राचे चालवणे स्वामीस अवश्यक म्हणून येशवंतराव व जनाजी व अनंदराव जाधव यांस नुतन इनाम मोजे परिंचे ता। निरथडी हा गाव मारनिलेस इनाम देहे १ तुम्हांस आज्ञापत्र सादर केले असे तरी मोजे मजकुर कुलबाब कुलकानु मारनिलेस इनाम चालवणे प्रतिवर्षी नुतन पत्राचा आक्षेप न करणे जाणिजे बहुत लिहिणे

मर्या
देय
राजते

( मागिल बाजू )

रा। छ ७ जिलकाद

बार बार

श्री

*INAM*
A
COMMISSIONER

आज्ञापत्र समस्त सेनाधुरंधरविश्वासनिधिराजमान्यराजश्री चंद्रसेन मोजे जाधवराव सेनापती ता। माकदमानि मोजे परिंचे ता। निरथडी सुा। सन मया अलफ मजकुर रा। वाघोजी कदम याजकडे होते ते दूर करून राजेश्री स्वामीनी रा येसवंतराव व जनाजी व अनंदराव जाधव यांजकडे इनाम करून दिला असे तरी तुम्ही यासी रु। बाकी वसूल देणे जाणीजे छ २९ जिलकाद

(मागील बाजू)

मोर्तब सुद

मर्या
देयं
राजते

बार

असो. हल्लीं यां पैकीं मौजे परिंचे गांवाबद्दल जाधव घराण्यास ७५० रुपयाचा सरंजाम देण्यांत आला आहे. सनदांचें मजकुरावरून परिंचे हा गांव येशवंतराव, जनाजी व आनंदराव या त्रिवर्गाचेंच पुत्रपौत्रांना मिळावा असें दिसतें व सरंजामी नियमाप्रमाणेंही तें वतन ज्येष्ठ व अस्सल वारसासच मिळावें असें आहे; तरी हा सरंजाम १८८३ चे सुमारास वाटण्यांत येऊन त्याचा अर्धाभाग गणोजी बाळाजी (म्हणजे मूळ संपादक) यांचे कनिष्ट पुत्राकडील म्हणजे पर्वतराव याचे वंशजांत ब्रिटिश सरकारानें दिला आहे. आतां येथें एक शंका येते कीं पित्याचे पराक्रमाबद्दल इनाम करून दिलेली जमीन वगैरे सर्व मुलांसच द्यावयास पाहिजे होती. परंतु ५ सनदा व १ आज्ञापत्र या सर्वांत गणोजी बाळाजी चा दुसरा मुलगा जानराव व कनिष्ठ पर्वतराव या दोघांचा त्यांत नामनिर्देश कांहिएक नाहीं. सांगोवांगी हकीगत अशी समजते की पर्वतराव हे ग्वाल्हेरकरांचे दरबारीं जाऊन राहिले होते व त्यांचा वंशही तेथेंच वाढत आहे व जानरावांचीही तशीच स्थिती असली पाहिजे. राहिलेले आनंदराव. जनाजी व येशवंतराव हे तिघे महाराजाचें नोकरींतच होते. परंतु शाहुमहाराजाचे पत्रांतील " चालवणें " हा शब्द योजण्याचें प्रयोजन काय असावे हे परिंचे येथे असलेले कागदपत्र पाहिल्या खेरिज किंवा इतर कांहीं पुराव्याचे अभावीं, सांगणे किंचित अयोग्य होईल असें वाटल्यावरून मी त्या ७ कागदांवर आज एवढेंच टिपण करित आहे.

वा. सी. बेंद्रे

## जाधव यांचा वंशवेल ले. ७

बळवंत–गणपतराव ( मूळ संपादक ).

गणपतराव–१ परवतराव, २ आनंदराव, ३ जनाजी, ४ जानराव ५ यशवंतराव

२ आनंदराव–६ बळवंतराव ७ गणपतराव, ८ लक्ष्मणराव, ९ रामराव, १० नरसिंगराव

१० नरसिंग ११ रुस्तुमराव, १२ कृष्णराव, १३ लक्ष्मणराव, १४ आनंदराव

११ रुस्तुमराव–१५ लक्ष्मणराव.

१२ कृष्णराव–१६ नरसिंगराव

१४ आनंदराव–१७ माधवराव, १८ गोविंदराव, १९ पांडुरंगराव

१७ माधवराव–२० साहेबराव

१८ गोविंदराव–२१ आबासाहेब

---

## उज्जयिनी येथील टांकसाळ

**ले. रा. काशिनाथ कृष्ण लेले धारकर बी. ए,**

१ उज्जन हें फार प्राचीनकालापासून राजधानीचें स्थान असल्यामुळें येथें अनेक प्राचीन राजांचीं नाणीं सांपडतात.

१ गंधर्वसेनचें नांणे 'गधीया' या नांवानें प्रसिद्ध आहे. त्यावर गाढवाच्या खुरासारखें चिन्ह असतें. वस्तुतः तें राजाचें मुखवस्याचें चिन्ह आहे. 'गधीया' नाणीं चांदीचीं तांब्याचीं अशीं दोन्ही प्रकारचीं अद्याप सांपडतात व पुष्कळ शोधक लोक बाजारांतून विकत घेऊन स्वदेशीं नेतात.

२ शक व गुप्त यांचीं हि नाणीं येथें व आसपास पुष्कळ सांपडलीं आहेत.

३ माळव्यांत परमारांचें राज्य सुमारें ५ शतकें असतां त्यांच्या वेळचें नाणें एक हि सांपडत नाहीं हें आश्चर्य आहे.

४ पुढें मुसलमानी झाल्यावर दिल्लीचे बादशाहाची टांकसाळ येथें झाली–कदाचित् मांडवचे मुसलमानी राजांचे वेळीं हि ती चालू असेल. याबद्दल खात्री नाहीं. त्यांचीं चांदीचीं व तांब्याचीं नाणीं मात्र सांपडतात. जयसिंह जयपूरवाले यांनीं मध्यें टांकसाळ चालविली होती.

५ मुसलमानीं नाणीं— दिल्ली येथील शेवटचा मोठा बादशाहा महंमदशाहा (इ.स. १७१९ ते १७४८) याचे वेळीं उज्जन येथें टांकसाळ सुरू होती व तीच पुढें मराठ्यांनीं हि बादशाहाचें च नांवानें चालविली. आरंभापासून आतांपर्यंत सुमारें दीडशें वर्षांचे शिक्के अद्याप उज्जनसि असल्याचें समजतें. त्यावर बादशाहाचाच सन जलूस चालू आहे. नाण्याचे वरील पृष्ठभागास 'बाला' व खालच्यास पाई [ न ] म्हणतात.

बाला वरील शिक्का–शिक्को जदबर हम किष्वर सायये फज्ले इलाह हामिये दीन महमद शाहाआलम बादशहा.

अर्थः–शिक्का जारी केला सात विलायतांवर छाया करणारा आणि ईश्वरी कृपेनें महंमदी धर्माचा आश्रयदाता शहआलम बादशाहा यानें.

पाई [ न ] चा मजकूर–सन जुलूष [ ] मेमनत मानूस जरब दारूल फतेह उज्जेन—राज्यशक मुक्काम उज्जेन जी पवित्रता व विजय यांचें स्थान आहे.

या नाण्यावर जलूस सनें दरसाल बदलून घातला जात असे. जमा-खर्चांत फसली सन उपयोगांत येत असे.

वजन–अकरा मासे व एक रती; पौ साहा रती तांबे व बाकी चांदी म्हणजे १० मासे ३ रती चांदी व सहा रती तांबें हें उज्जनी हल्लीचें वजन. इंदुरी हल्ली शिक्का पूरे आकरा मासे वजनाचा असे. त्यांत खार रती ५ व बाकी १० मासे दोन तीन रती चांदी असे. चांदी दोहोंत सारखी असल्यानें दोन्ही रुपये सारख्या किंमतींत चालत होते. त्याच प्रों अधेल्या पावल्या व दुआण्या पडत.

२ मराठ्यांचा अंमल झाला तेव्हां टांकसाळेवरील जुना दरोगा दिल्लीस पळून गेला तेव्हां इतर टांकसाळीचें दरकदार व कामदार यांस कायम करून दरोगा नवीन आपला ठेऊन त्यांनीं टांकसाळ पुढें चालविली–टांकसाळींत मुख्य कामदार असत ते येणें प्रों

१ मुख्य दरोगा–तोच कारखान्याचा जिम्मेदार–चांदी शुद्ध आहे हें त्यानें पाहावें; व दुसरी भागळीक होऊं नये याबद्दल बंदोबस्त ठेवावा. यांस दरकावा रु. १३॥. दरमाहा असून शिवाय शिक्का पडेल त्यावर व बाजारांत सोनेंचांदी विकलें जाईल त्यावर हक्क मिळे. जरीपटकेवाले वेपारी यांनीं व इतर लोकांनीं चांदीसोनें शोधण्यास टांकसाळींत आणिलें असेल त्यावर हक्क म्हणजे १ शिक्का २ बाजार ( चांदीसोनें विक्री ) ३ तारकसी ( जरीपट्टा ) ४ चांदीसोनें शोधाई ५ अलामी असे पांच महसूल टांकसाळींत जमा होत असत. त्यावर दरकदाराचे हक्क होते. त्यांत टांकसाळवाल्यास दरमहा रु. ४०।५० पडत असत.

२ चौकशी [ परीक्षक ] हा दुसरा कामदार. याचें कामः– जी बेपाऱ्याची चांदी येईल तिची नजरेनें व इतर रितीनें परीक्षा करून ती चांदी गाळवावी आणि शुद्ध चांदी झाली म्हणजे तिचे रुपये कारीगराकडून घडवावे; व शिक्का लावावा व शिक्का लावल्यावर त्यानें जें फुटकेतुटके असेल तें काढून टाकारे व सावकारास महसूल घेऊन परत द्यावे. याबद्दल जमाखर्च तारीखवार व माहेवार त्यानें ठेवावा. महिन्याचे अखेरीस हिशेब मुखत्यारास द्यावा. त्यावरून बारमाही कागद मुखत्यारानें तयार करावा. चौकशीस दरमहा नेमलेला पगार नसे. नुसता हक्क मिळत असे. त्यानें मजुरी, हक्क वगैरे वांटणी करावी, शिल्लक संभाळावी.

३ जमीदाराचे दफ्तर टांकसाळींत असे. जमीदारी कारकून दाखले ठेवीत व त्यांस हक्क मिळत असे.

४ चौधरी–[ आकूचा हक्क ] वसूल करून तारीखवार लिहून दरोगा व मुखत्यान्यांस समजावून द्यावे व वसूल चौकशी कडेस जमा करावा.

५ इतर कामदार–

२ शिकची–म्हणजे शिक्का लावणारा

३ घणवाई–शिक्यावर घणाची जरब [ ठोका ] मारणारा.

४ चासनीगर–चासनी फुंकून जी मूस चांदीची गाळली जाईल तींतून एक रुपया भार चांदी चौकशी तोलून देईल त्यांत चार रुपये भार शिसें गाळून चांदी शुद्ध करून परत चौकशीला द्यावी.

५ चांदी गाळणारे गुजाजगर ( फारशी नांव ) जी चांदी चौकशी देतील ती गाळून त्याच्या ढाळ्या ( कांबी ) पाडून चौकशीस पुन्हां परत द्याव्या.

१ मोहोरकंद म्हणजे शिक्का खोदणारा. रुपये पैसे व मोहरा वगैरा यांचा.

६ न्याहारगीर ( न्यारगीर=मिश्र पदार्थांतून शुद्ध धातू काढणारा) जी चांदी गाळली गेली असेल तिच्या मुशा ( गंगाळा एवढ्या असत ) फोडून धुऊन जी धातु निघेल त्यांतून चांदी व तांबें निराळाळे काढून चांदीवाले बेपाऱ्यास परत देण्याकारितां चौकशीपाशीं द्यावी.

७ [दर्राब] दराब अथवा रुपये घडणारे–जी चांदी चौकशी देतील तिचे तुकडे पाडून नाणें घडून उजळून चौकशीला परत देणें हें त्याचें काम [ दर्राब ] दराब ५० असाम्या होत्या व गाळणारे ७१८ असामी होते.

८ बाजारमुत्सदी ( छोटा कामदार )– यानें सोनेंचांदी बाजारांत विकलें जाईल तें रोजच्या रोज टांकसाळींत लिहून महसूल वसूल होईल तो चौकशीजवळ भरून द्यावा.

९ रात्रीं काम चाले सबब एक मशालची असे त्याजकडे झाडझूडही असे.

१० एक जमादार व चार शिपाई.

६ टांकसाळीची जागा मजबूत सोयवार बांधलेली सराफ्याच्या तोंडाशीं आहे.

७ ही टांकसाळ संवत् १९५५ ( सन १८९८, ९९ इ. ) सालीं कलदार नाणें चालू झाल्यामुळें बंद झाली. संवत् १८२६ (इ. स. १७६९) सालीं टांकसाळ शिंदे सरकारांनीं चालविली. तेव्हां जी वहिवाट होती तिचा हिदायतनामा संवत् १९४२ ( इ. स. १८८५ ) सालीं श्री. कै. जयाजी महाराजा शिंदे यांनीं करून दिल्हा.

८ ही माहिती रा. विष्णु सदाशिव ( सोमनी देशपांडे कुलकर्णी अकोलकर ) दरोगे फडणीस टांकसाल उज्जेन यांजपासून ता। १० माहे नोव्हेंबर सन १९१४ इसवी रोजीं घेतली. ते गृहस्थ अनुमानें ७५ वर्षांचे आहेत. टांकसाळीसंबंधाचे अस्सल हुकूम वगैरे दस्तऐवज त्यांजपाशीं आहेत. त्यांपैकीं पांच साहा अस्सल कागदांच्या नकला त्या वेळीं करून घेतल्या त्या या सोबत जोडल्या आहेत. आणखी माहिती मिळवावयाची होती, परंतु सवड झाली नाहीं.

९ टांकसाळ हा शब्द संस्कृत टंकशाला यापासून निघाला असावा असें वाटतें. टांक नाण्याची किंमत दोन पैसे असे व या नाण्यांतच पूर्वीं जमीन बाब व इतर बाबी यांचा हिशेब लिहिला जात असे. नाणें तांब्याचें असून त्याची फार विपुलता असे, व तें पाडण्याचे कारखानेही देशांत फार असत. त्यामुळें नाणें पाडण्याच्या कारखान्यास टांकसाळ हें सामान्य नांव मिळालें. रुपये व मोहरा कमी चालत. त्यामुळें जुन्या मुसलमानी कागदांत टांकांची रक्कम फारच फुगे. टांकेप्रमाणें दाम हे ही लहान नाणें चालू होतें. आतां दोन्ही नाणीं वहिवाटींतून गेलीं आहेत.टक्का=२पैसे हा मात्र अद्याप उत्तर हिंदुस्थान प्रांतांत ऐकूं येतो. टक्का या शब्दापासून निघालेले टांक, टांका, [कर] तनखा वगैरे शब्द व दाम यापासून निघालेलें दामी ( जमिदारी हक्क ) वगैरे शब्द भाषेंत प्रचलित आहेत. तोंडच्या हिशेबांत एक काल्पनिक अंक घेतला जातो त्यासहि दाम म्हणण्याची वहिवाट आहे. 'दाम करी काम' ह्या म्हणींतही हाच शब्द आहे. हा संस्कृत द्रम्म व ग्रीक ड्रयाक्मा यापासून निघाला असावा. टकापेसा म्हणजे द्रव्य असें हिंदी भाषेंत बोलतांना ऐकूं येतें. व्याजाच्या हिशेबांत ही हा शब्द वापरला जातो.

ले. १ श्रीनाथ प्रसन्न.

· श्री ·
ज्योतिस्वरूप च
रणी तत्पर माहाद
जी सुत दवलतरा
व शिंदे निरंत
+·र·>

दीड इंच व्यासाची स्वच्छ अक्षराची मोहर वाटोळी.

आजसुभा राजश्री दौलतराव शिंदे ता। इजारदार व दरखदार व जमींदार व चौकसी व बेपारीयान् महाल टांकसाल शहर हवेली उज्जन सुा सबा मयातेन व अलफ [ सुा सन् १२०७ सन १८०७ इसवी ] महाल मजकुरचे दरोगीयाची असामी व दफ्तरची असामी राजश्री मोरो मैराळ यांसी मोरो हरि यांनीं करून देविली आहे.फडणीसीचे दफ्तराचा दरमहा शागीर्दपेशा सुद्धां रुपये साडे तेरा माहाल खरची लिहून बिनादिकत बारमाही देत जाणं व दरोग्याच्या हक्काचा लाग परभारे बायती तहरीर शेंकडा कच्चे मुशेवर सवाटक्का व सोने रुपें खरेदीवरव तारकसी व बाजार बैठकीवर लाग आहे तो व चांद्रातीवर साडेतीन आणे देवित जाणे दिवाणगिरीकडे चांद्रातीचा पैसा न देणे मशारानिल्हेस देविला आहे तो देत जाणे व चासनी कामाची देखरेख याज-कडे सांगितली त्याचा हक्क हे घेतील व चासनीवर गुमास्ता हे ठेऊन देतील त्याचे हाते चांसनी फुंकवित जाणें त्याचा हक्क शेंकडा कच्चे मुशेवर आर्धा आणा हे घेतील त्या प्रो चासनी फुंकणारांस हे समजावितील दरमाहा करून देतील. अगर हक्का प्रों वि-भाग देऊन समजावितील त्याची देखरेख याजकडे सांगितली आहे याचा हक्कदस्तूर वगैरे याचे आगोधर कोणीं घेऊं नये आगोधर हे घेतील नंतर सर्व हक्कदारांनीं यामागें हक्क व शिरपाव घेत जावा धुळ धुवे व न्याहारगीर झाडण वगैरे बातमी परभारे चालत आल्या प्रो देववणे दिकत केलीया कार्यास येणार नाहीं जाणीजे छ. १७ जिल्हेज मोर्तबसुद ( ता। ५ माहे मार्च सन १८०७ ई. )

मोर्तब सुद


बार

१ टांकसाळ--( मुसलमानी टकसाला )= सं० टंकशाला.

२ सवाटका--रुपयाचे १६ टक्के धरीत टक्का म्हणजे दोन पैसे. सवाटक्का म्हणजे २॥ पैसे. पैसा सोळा माशाचा असे. रूपया = ११ मासे एकरत्तीचा हेंच वजन युधिष्ठिराचे रुपयाचें असे. तो रुपया विष्णू सदाशिव सोमनी भैयाजी यांणीं सांगितलें कीं आमचे जवळ होता तो गहाळ झाला. परंतु त्यावरील श्लोक आमचे जवळ लिहीले आहेत ते पाहून कळवूं. उदेपूर वाल्याकडेस उज्जन होती त्यांचा रुपया कोठंकोठें पूजेंत दृष्टिस पडतो.

३ चासनी--चांदीचा रस त्यांत प्रमाणानें तांबें मिसळून रुपाया घडला जात असे अशा चांदीची परिक्षा करणें यास चासनी पाहणें म्हणत.

राजेश्री वर्तमान भावी इजारदार व दरखदार व आफीम माहालचे सावकार व चौकसी व जमीदार माहाल टांकसाल चांदी हवेली उज्जन यांस दौलतराव शिंदे दंडवत अनुक्रमें रामराम सुा अर्बा मय्यातैन व अलफ [ सुा सन १२०४ सन १८०३ इसवीं ] माहाल टांकसाळ हवेली मार येथील दरोगी गीरचा हक्क हक्कदारांत राजश्री मोरो हरि यांनीं आपले साडभाऊ राजश्री मोरो मयराळ सोमनी आकोलकर याजला सरकार आज्ञेवरून करून घेऊन मारनिल्हेस त्या कामावर पाठविलें आहे तरी याचे हातून दरोगीगिरीचे कामकाम वंशपरंपरेनें घेऊन हक्कआदा व तहरीर कारखान्या बाा दरसदे बमे मुस सवाटक्का व सीवाये लाग सोने रूपे खरिदीवर व तारकेसीवर हाक्क व चांदुरात बाजरबैठकीवर दरमहा दर असामी साडेतीन आणे याचा हक्क हे घेतील दिवाणगिरिकडे बाजारबैठकीचा हक्क न देगे व झाडणे व धुलधुवे ध– न्यारगीर व चासनीचा हक्क हे घेतील याचा गुमास्ता हे ठेऊन देतील त्याचे हातून चासणी फुंकवित जाणे व दुसरें सनदेत हरएकबाबत आफुचे बोझावर तहरीर परभारे हजार दरांव कमाविसदार याचे महसुलाखेरीज हे घेतील कोणी दिकत केलीयास ताकीद करून देविन जाणे व याचे फडणीसीचे दफ्तर हे लीहितील त्या कारकूनास माहालखर्च दरमहा रुपये बमे शागीर्दपेशाचे माणसा सुद्धां रुपये १३॥ साडे तेरा दरमहा माहल खर्ची लेहून दरमाहाचा दरमाहा देवित जाणे व जराया व कसारा यांस जे रुपये हक्क पोहोचेल त्या पौ दररुपायांस एक पैसा दफ्तरदारांस देवित जागे मुस व चासणी या खेरीज होऊन देणें साल दरसाल नवीन पत्राचा आक्षेप न घेणे नकल घेऊन अस्सल भोगवटियासी देणें भेटी व सीरपाव वगैरे बाबती चालत आल्या प्रो




टीप

( महाल खर्ची याचे हक्कावर दर रूपयांस पैसा एक नवीन नेमुन दिल्हा आहे तरी त्याजकडे रुपये पावतील त्याजवर. )

बिनदिक्कत चालवणे जाणिजे छ ११
रविलावल (ता। १२ माहे जुलई सन
१८०३ इसवी) हे विनंती

मोर्तब
सुद

बार

---

(हा लेख सोनेरी ठिपक्याचे देशी कागदावर लिहिलेला आहे)

१ बाबती तहरीर-शिक्के वगैरेंचा व निरनिराळे चांदीचा रोजखर्डा लिहिणें याचा हक्क-रोज खर्डयांस टांकसाळींत शाया तारीखवारचा असें म्हणत.

१ तारकसी-जुने जरीपट्टे चांदी सोनें काढणें याचा येते ते.

३ चांद्रात- चांदीसोनें खरिद करणारे व्यापारी चांदीसोने खरेद करीत त्यांची नोंद टांकसाळींत करून देऊन महसूल सरकारात १। रुपया शेंकडा चांदी याचा व एक आणा तोळा सोन्या याचा भरीत तोही टांकसाळींत टांकसाळ खर्चाकरितां जमा होई. त्या शिवाय लहान व्यापारी दरमाहा ०॥ व मोठे व्यापारी ।~॥ देत त्या हक्काचें नांव चांद्रात असें होतें. कारण मुसळमानींत चांद्रातीपासून नवा महिना सुरू होतो. हा हक्क दरोगा व जमीदार यांत वाटला जात असे. ज्याची पुंजी ३॥ हजारांचे आंत तो लहान व त्यावर असेल तो मोठा मानला जात असे. महसूल दिल्यावर व्यापारी लोक चोरी वगैरेचा मालखरेदीचे आरोपापासून मोकळे असत.

४ बाजारबैठक-तीच चांद्रात.

ले. ३

राजश्री वर्तमान भावी कमाविसदार व इजारदार व दरखदार व चौकरी व जमीदार माहाल टांकसाळ हवेली उज्जन यांस.

छ स्नो दौलतराव शिंदे दंडवत व अनुक्रमें रामराम सुहूर सन आर्बा मैया तैन व अलफ [ सुहूर सन १२०४ सन १८०३ इसवी ]-[ नंबर २ प्रमाणे मजकूर आहे त्याशिवाय मजकूर मात्र येथें लिहिला आहे.] माहाल टांकसाल हवेली मजकूर येथील दरोगगिरीचे हक्कदारांत राजेश्री मोरो हरी यांनीं आपले साडेसात रुपये मोरो मयराळ सोमनी अकोलकर याजला सरकारअर्जावरून करार घेऊन मजकूर निल्हेस त्या कामावर पाठविलें आहे. तरी याचे हातून दरोगगिरीचें कामकाज वंशपरंपरेनें घेऊन हक्क आदा व तेहरीर कारखान्याबद्दल दरसदे पंधरा सव्वापंधरा व शिवाय लाग

सोनें रूपें खरेदीवर व तारकेशीर हक्क व चांदरात बाजार बैठकीवर दरमाहा दर आसामी साडेतीन आणे याचा हक्क हे घेतील. दिवाणगिरीकडे बाजारबैठकीचा हक्क न देणे व झाडणे व धुळधुवे व न्यारगीर व चासनीचा हक्क हे घेतील याचा गुमास्ता हे ठेऊन देतील त्याचे हातून चीसमा फुंकवीत जाणे व हरएक बाबत अफूचे बोझावर तहगीर माफक दस्तुर परभोर इजारदार व कमाविसदार याचे महसूला-खेरीज हे घेतील कोणीही दिकत केलीयास ताकीद करून देवीत जाणे व याचे फडणीसीचे दफ्तर हे लिहीतील त्या कारकूनास माहालखर्चे बमेशा-गीर्दपेशाचे माणसासुद्धां रुपये १३॥ साडेतेरा दरमाहा माहालखर्ची लहून देवीत जाणे व महालखर्ची जराब व कतारायाचे हक्कावर दर रुपयास पैसा एक नवीन नेमून दिल्हा आहे तरी त्याजला रुपये पावतील त्याजवर दररुपयास पैसा प्रो कार-कुनी दफ्तरदारास देवीत जाणे मूस याचे इतल्या खेरीज परभोर होऊं न देणे साल दरसाल नूतन पत्राचा आक्षेप न घेणे नकल घेऊन अस्सल भोगवटियास देणे भेटी व सिरपाव वगैरे बाबती चालत आल्या प्रो बिन दिकत चालवणे जाणिजे छ २१ राबल, ( ता॥ ११ माहे जुलई सन १८०३ इसवी ) हे विनंती मोर्तुबसुद

बार

मोर्तब

सुद

ले. ४

श्रीनाथप्रसन्न

राजश्री वर्तमान भावी कमाविसदार हवेली उज्जैन

गोसावी यांस

॥ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य

स्नो दौलतराव शिंदे दंडवत व अनुक्रमें रामराम सु॥ आर्बा मैया तैन व अल्फ ( सु॥ सन १२०४ सन १८०३ इसवी )— .... ... ... काम वंशपरंपरे घेऊन सोने रूपे खरेदी व तारकसी व चांदरात बाजारबैठक व झाडण व धुळधुवे न्यार-गीर व चासनीची + नीजाई व भेटी व हरएक बाबत व अफूचे बोझावर तहगीर माफीक दस्तुर परभोर व इजारदार व कामदार याचे महसूल सेकडा सरकार शिरस्ता आहेत त्याखेरीज परभोर हक्क चालत आल्या प्रो हे घेतील कोण्ही दिकत केलीयास ताकीद करून देवीत जाणे व याचे दफ्तरकीचे फडणीसीचे हे लेहतील त्या कारकुनांस माहालखर्ची दरमहा रुपये १० दाहा व त्याचे आर्गीर्दपेशाचे माणुस आसामी १ येक त्याचा दरमाहा रुपये माहाल सीबंदीचे दरमाहा चालू प्रो दरम्हाचा दरमाहा देवीत जाणे माहालखर्ची रुपया जराब व कसारा हक्कावर दर रुपयास ०॥ पैसा येक नवीन कारकुनी दफ्तरदारास देवीत जाणे मूस

चासणी याचे इतल्या खेरीज कारखान्यांत परभीर होऊं न देणे साल दरसाल नूतन पत्राचा आक्षेप न घेणे जाणिजे छ २१ साबर ( ता। ११ आ. जुलई सन १८०३ इसवी ) हे विनंती

मोर्तब.
सुद.

+ या ओळीचे डावे बाजूस मागील पानावर शिक्का आहे तो मागील लेखी प्रो आहे.

ले. ५ **श्री नाथप्रसंन्न**

रफात व शुा ( शुजाअत ) दस्त गाहा इरेखान ( जाहगीरदार होता.

जमादार हीफ जुमत ( दुमरी चांदखान )

छ आजतरफ दौलतराव शिंदे सलाम सुा खमस अशरीन मयातैन व अल्फ [ सुा १२२५ सन १८२४ इसवी ] राजश्री मोरो हरी याणी हवेली उज्जनचे सायर पचे [ पुढें एक ओळीची अक्षरें गेलीं आहेत. ] माते मैराल यांसी त्या कामावर पाठविले आहे त्यास दरमाहा रुपये ७॥ तेथील माहाल खर्चे पैा देववावे व परभारे चेप री बाकडोन दर सनगास छापा लागेल तेथें च्यार कवड्या व गल्ल्यावर दर रास दंबडी गाडा दो बैली चौ बैली दर बैली दंबडी देवणे दिकत करील त्यांस तुम्ही निक्षून ताकीद करून मारनिल्हेची कवडी उगवून देवणे जाणिजे छ २४ मोहरम ( ता। १८ सेप्टेंबर सन १८२४ इ० ) ज्यादा काय लीहीणे हे कितावत मोर्तब सुद

शिक्का

ले. ६ **श्री नाथ प्रसंन्न**

राजश्री वर्तमान भावी कमाविसदार हवेली उज्जैन गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य

स्नो दौलतराव शिंदे दंडवत व अनुक्रमें रामराम सुा आबा मयातैन व अल्फ ( सुासन १२०४ सन १८०३ इसवी ) [ पुढील मार नंबर १ प्रो व नंबर ४ प्रो शिक्का मोर्तब शिरस्त्या प्रो आहेत. ]

# चार मुसलमानी नाणीं.

मला माझे एका मित्राचे घरीं चार मुसलमानी नाणीं मिळालीं. त्यांची तो पूजा करीत असे. हीं नाणीं इ० स० १२९५ ते १३२४ पर्यंतच्या दिल्ली येथें राज्य केलेल्या सुलतानांचीं आहेत. हीं शुद्ध चांदीचीं नसून रुप्याचीं म्हणजे चांदी व तांबें अशा मिश्र धातूंचीं आहेत. ह्या चार नाण्यांपैकीं तीन नाणीं खलजी घराण्यांतील महमदशहा याचीं दोन व कुतुबुद्दिन मुबारक शहा याचें एक या सुलतानांचीं असून चवथें घियासुद्दिन तघलकशाहा या तघलक् घराण्यांतील सुलतानाचें आहे. अल्लाउद्दिन महमदशहा यानें दिल्ली येथें इ० स० १२९५ ते १३१५ पावेतों राज्य केलें. याचीं नाणीं तांबें, रुपें व सोनें या तीन धातूंचीं सांपडतात, व याचीं नाणीं पाडण्याची टांकसाळ दिल्ली येथें होती. मजजवळील या दोन नाण्यांवर अक्षरें लिहिलीं आहेत तीं येणें प्रमाणें.

| | | |
|---|---|---|
| नाणें पहिलें | एक बाजू | अब्बुल मुजफ्फर महमदशाहा |
| सुलतान | दुसरी बाजू | सुलतान मोअज्जिम निवा |
| उद्दिन | | |
| नाणें दुसरें | एक बाजू | अब्बुल मुजफ्फर महमदशाहा |
| सुलतान | दुसरी बाजू | सुलतान हिन्द अल्लाउद्दिन. |

या दोन्ही नाण्यांची आकृती वर्तुलाकार असून दोहोंचा परिघ मात्र सारखा नाहीं, एकापेक्षां दुसरें मोठें आहे. हीं दोन्हीं नाणीं वजनानें सारखींच आहेत. प्रत्येकाचें वजन पाव तोळा सहा गुंजा आहे.

तिसरें नाणें कुतुबुद्दिन मुबारकशाहा खलजी सुलतान याचें आहे. यानें इ० स० १३१६ ते १३२० पावेतों दिल्ली येथं राज्य केलें. याचीं नाणीं रुपें व सोनें या दोन्ही धातूंचीं सांपडतात; व नाणें पाडण्याची टांकसाळ हझरतदार अल्‌खिलाफत म्हणजे दिल्ली येथें होती. उपलब्ध झालेल्या नाण्याचा आकार चतुष्कोनी असून त्याजवर खालीलप्रमाणें अक्षरें आहेत.

| | |
|---|---|
| एक बाजू | कुतब–उद्–दुनिया व–उद्दिन |
| दुसरी बाजू | (वाचतां आली नाहीं.) |

या चतुष्कोनी नाण्याचें वजन पाव तोळा सात गुंजा आहे.

चवथें नाणें घियासुद्दिन तुघलकशाहा या तुघलक् घराण्यांतील सुलतानाचें आहे. यानें इ० स० १३२० ते १३२४ पावेतों दिल्ली येथें राज्य केलें याचीं नाणीं रुपें व सोनें या दोन्ही धातूंचीं सांपडतात व तीं पाडण्याची टांकसाळ दिल्ली येथेंच होती. हें नाणें वर्तुळाकार आहे व त्यावरील लेख खालीलप्रमाणें आहे.

एक बाजू–अब्बुल मुजफ्फर तुघलक् शाहा

दुसरी बाजू–सुलतान अनाब उद्दिन

यावर हिजरी सन आहे परन्तु तो झिजून अस्पष्ट झालेला आहे. त्यामुळे लागत नाहीं. या नाण्याचें वजन पाव तोळा सात गुंजा आहे.

वर अल्लाउद्दिन महंमदशहा याचीं सोन्याचीं नाणीं सांपडतात असें सांगितलें आहे. या नाण्यावर देवनागरी लिपींत 'स्री सुलतां अलावदीं' अशीं अक्षरें लिहिलेलीं असतात. याप्रमाणें च घियासुद्दिन तुगलक् याच्याही सुवर्णटंकावर देवनागरी लिपींत 'स्री सुलतां गयासुदीं' अशीं अक्षरें लिहिलेलीं सांपडतात.

दिल्ली येथील पठाण सुलतानांनीं नाण्याचें बाबींत काबूल येथील ब्राह्मण राजांचें च अनुकरण केलें आहे. त्यांनीं आरबी व देवनागरी या दोन्ही लिपींचा उपयोग केला आहे. बैल, घोडेस्वार, व लक्ष्मी देवी इत्यादि चिन्हांनीं आपलीं नाणीं अंकित करण्याची पद्धत या सुलतानानीं काबूलच्या ब्राह्मण राजांची च उचलली आहे.

आपणापुढें या ठेवलेल्या चारी नाण्यांचें वजन एकच आहे असें मानलें असतां चालेल. जो कांहीं गुंज अर्धी गुंजेचा अल्प असा फेर आहे तो सहा सव्वा सहाशें वर्षांच्या प्रचंड कालाच्या घडामोडींतील घर्षणानें झाला असावा.

नाण्यांचा संग्रह व त्यांतील त्या नाण्यांवरून मिळणाऱ्या माहितीचें संकलन करण्याचा उपक्रम आपल्या मंडळानें केला आहेच. शिवछत्रपतींचा होन मंडळाचे संग्रहीं असून, आज मुद्दाम मुसलमान कालांतील नाणीं पुढें मांडित आहें. नाण्यांवरील बिरुदावली, अक्षरवटिका व तदंतर्गत माहितीवरून निरनिराळ्या राजघराण्यांविषयीं माहिती कळते, राजांचा, स्थळाचा व कालाचा निर्णय होतो, हें मी लिहावें असें नाहीं. नाण्यांवर पाश्चात्य शोधकांचे परिश्रमपूर्वक लिहिलेले ग्रंथच प्रसिद्ध आहेत. त्या दृष्टीनें आपणांकडे प्रयत्न झाल्यास, थोडक्याच अवधींत नाण्यांवर एक उत्कृष्ट पुस्तक लिहिलें जाऊन मंडळाचे संग्रहीं नाण्यांचा संग्रहहि होण्याकडे आपलें लक्ष वेधलें जाईल, अशी उमेद आहे.

स. मा. दिवेकर.

# कांहीं मुसलमानी नाणीं.

## प्रदर्शन.

मी ५–६ महिन्यांपूर्वी विजापूर येथें गेलों होतों त्या वेळीं तेथील इतिहास-प्रसिद्ध आदिलशाहींतील पुराण इमारतीप्रमाणेंच कांहीं माझ्या मुसलमान बांधवांकडे आदिलशाहीमधील अद्यापपर्यंत नीट संभाळून ठेविलेल्या कांहीं पुरातन वस्तु व निरनिराळे ऐतिहासिक व महत्त्वाचे हस्तलिखित ग्रंथ पहावयास मिळाले. हे सर्व ग्रंथ फारसी भाषेंत लिहिलेले असून नक्षी वगैरेनें फारच सुशोभित केलेले असे आहेत.

जुनीं नाणीं पहाण्यास मिळविण्याचा मूळपासून नाद असल्याकारणानें मीं तेथील सुप्रसिद्ध बांगी घराण्यांतील साहेबलाल बांगी यांचे सहायानें जवळ जवळ ५० नाणीं गोळा केलीं व आणखी पुष्कळ तेथें मिळण्याचा संभव आहे. कित्येक नाणीं साफ न करतां आल्यामुळें व त्यांवरील अक्षरें वाचनीय नसल्याकारणानें आम्हांला त्यांचा उपयोग करून घेतां आला नाहीं. जितकीं नाणीं मिळवतां येतील तितकीं नाणीं मिळविण्याचा क्रम चालू ठेवलाच आहे. शोधाअंतीं असें समजतें कीं, विजापूर येथें व आसपासचे गांवीं पुष्कळ जुनीं नाणीं होतीं; परंतु तीं सर्व आटवून त्या त्या धातूंचे निरनिराळे जरुरीचे जिन्नस करण्यांत त्यांचा उपयोग करण्यांत आला आहे व हल्लीं येत आहे. चांदीचीं नाणीं बहुतेक अशा तऱ्हेनें आटवून टाकलीं गेलीं आहेत म्हणून आपणांस तीं सद्यःकालीं क्वचितच आढळतात. सोन्याचीं नाणीं तेथें पुष्कळ ठिकाणीं असल्याचें तेथील कित्येक गृहस्थांनीं सांगितलें परंतु असेंच आढळून आलें कीं, तीं सर्व आटवून व त्यांचें सोनें करण्यांत येऊन ह्या हल्लींचे कठीण परिस्थितीशीं झगडण्यांत त्याचा उपयोग करण्यांत आला आहे. तरी अशा परिस्थितींत सोन्याचीं अगर चांदीचीं नाणीं मिळविणें फार कठीण झालें आहे. व जर कोठें तीं लक्ष्मीपूजनाचें वस्तूंत म्हणून ठेवण्यांत आलीं असलींच तर मात्र तीं कांहीं कांहीं ठिकाणीं— पण फार विरळा च— पहावयास सांपडतात व अशा तऱ्हेनें व्यवस्थित ठेवलेलीं नाणीं बहुतेक करून शिवकालीन होन वगैरेच असतात. आजपर्यंत ५–६ तऱ्हेचीं सोन्याचीं नाणीं माझे पहाण्यांत आलीं. पण जवळ फोटो काढून घेण्याचें साधन नसल्यामुळें व तीं विकत मिळविण्याचीहि आशा नसल्यामुळें तीं आपणांस दाखवतां आलीं नाहींत. मोठ्या घराण्यांतील वंशजांना आपल्या घरांतील जुन्या पुराण्या वस्तु, केवळ हल्लींच्या आर्थिक परिस्थितीला तोंड देण्याकरितां म्हणून विक्रीस काढतांना, अगदीं मातीमोल किंमतीनें व निराळ्याच तऱ्हेचा मार्ग धरून विकाव्या लागतात व त्यांत आपल्या ओळखीच्या किंवा जवळच्या मनुष्यांना अज्ञानांत ठेवावें लागतें, हें आपणा— इतिहास संशोधकांस किंवा पुण्याच्या व्यवहारदक्षांस नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. हिंदु लोकांप्रमाणें मुसलमान लोकांत जुनीं नाणीं संभाळण्याचे कार्यांत कांहीं विशेष तऱ्हेनें धार्मिक महत्त्व न दिल्या कारणानें, ज्याप्रमाणें मुसलमान लोक कुराणाच्या हस्तलिखित प्रति किंवा कुराणांतील कांहीं वचनें जितक्या आस्थेनें संभाळतात तितक्याच आस्थेनें ते जुन्या नाण्यांची जोपासना करीत नाहींत. असो, तरी जीं कांहीं नाणीं आपणास मिळविणें शक्य आहे तितकीं मिळवून त्यापासून आपणांस जो कांहीं पूर्वकालीन इतिहासाचा बोध करून घेतां येईल तितका करून घेतला पाहिजे. . . . . . .

जुन्या नाण्यांपासून आपणांला निरनिराळ्या राजांच्या वेळची आर्थिकस्थिति कशी असावी याचें बऱ्याचशा ठोकळ प्रमाणानें अनुमान काढतां येईल अशी माझी समजूत आहे. परंतु नाण्यांवरील अक्षरें वाचणें व त्यांचा बोध करून घेणें हि हि एक

कला असल्याकारणानें तिचें ज्ञान झाल्याखेरीज ह्या आज जमा केलेल्या नाण्यांवर निबंध लिहिणें तितक्या पूर्णतेनें होणार नाहीं म्हणून मी आज हीं नाणीं प्रदर्शनार्थच ठेवीत आहे. नाण्यांवरील अक्षरें फारसी लिपींत असल्याकारणानें व ती लिपी मला चांगलीशी अवगत नसल्याकारणानें ज्याप्रमाणें माझ्या मित्रांनीं वाचून दाखविलीं त्याप्रमाणेंच त्याची वर्गवारी करून खालीलप्रमाणें निरनिराळीं पत्रकें आपणापुढें मांडीत आहे. ह्या ५० नाण्यांपैकीं हें पहिल्या पत्रकावरील नाणें चांदीचें असून राजा फेरोशहा यांचें आहे. पत्रक दोनवरील तीन नाण्यांपैकीं पहिलें नाणें फसली सन १००२ चें आहे. पत्रक तीनवरील नाणें म्हैसुरचे टिपू सुलतान यांचें असून ज्याप्रमाणें हैदरअलीचे नाण्यावर सिंहासारखी आकृति असते त्याप्रमाणेंच ह्या टिपू सुलतानचे नाण्यावर हत्तीसारखें चित्र आहे. चवथ्या पत्रकावरील हीं नाणीं दिल्लीचे राजे हुमायुन यांचीं आहेत. ह्या नाण्यांवरील अक्षरें मजजवळील इतर नाण्यांपेक्षां फारच स्पष्ट आहेत. विजापूर येथें दिल्लीचीं नाणीं बरींच आढळतात.

पत्रक ५ वरील चारी नाणीं दुसरे महमद बिन महमदशहा बामनी राज्य यांचीं आहेत.

पत्रक ६ वरील नाणें बिदरचे बामनी राजे फेरोशहा यांचें आहे.

पत्रक ७ वरील ५ नाणीं पहिले महमदशहा बामनी–राज्य बिदर–यांचें आहे.

पत्रक ८ वरील १५ नाणीं विजापुरचे पहिले अली अदिलशहा यांचीं आहेत.

पत्रक ९ वरील ६ नाणीं विजापुरचे दुसरे इब्राहीम आदिलशहा यांचीं आहेत.

पत्रक १० वरील २ नाणीं विजापुरचे अबदुल मुझाफर दुसरे राजे अली अदिलशहा यांचीं आहेत.

पत्रक ११ वरील ३ नाणीं विजापुरचे राजे इस्मायल आदिलशहा यांचीं आहेत.

पत्रक १२ वरील नाणें विजापुरचे सुलतान महमद यांचें आहे.

पत्रक १३ वरील नाणें विजापुरचे शेवटचे राजे शिकंदर अली अदिलशहा यांचें आहे.

या जमा केलेल्या नाण्यांवर त्या प्रसंगीं निबंध लिहिणें शक्य झालें नाहीं तरी तीं नाण्यांवरील अक्षरें वाचण्याची कला अवगत होईपर्यंत स्वस्थ न बसतां निदान जितकीं नाणीं आज मिळवतां येतील तितकीं मिळवणें आपलें कार्य आहे असें वाटल्यावरून मला आपणापुढें ह्या वर्षी जितकीं नाणीं मांडतां आलीं तितकींच मांडण्याचा प्रयत्न केला आहे व त्याचें श्रेय माझे मित्र साहेबलाल यांणीं यास आहे.

वा. सी. बेंद्रे. ३०–५–१९

# बाळाजी विश्वनाथ यांचे हातचीं काहीं पत्रें.

श्रीमंत सरदार मल्हारराव चिमणराव ऊर्फ दादासाो पुरंदरे मोटीनोढवेकर यांचे घरीं तीन पत्रें मिळालीं. हीं पत्रें आपलेपुढें सादर करण्याचीं मुख्य दोन कारणें आहेत. पहिलें–हस्ताक्षरावरून मनुष्याचा स्वभाव, कर्तबगारी वगैरे गोष्टी समजून येतात असें पुष्कळ आधुनिक शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. व दुसरें:–आजपावेतों बाळाजीपंत नानांचें हस्ताक्षर उपलब्ध नव्हतें तें आज मिळालें आहे. पत्रांतील सारांश, अंबाजीपंत पुरंदरे ह्यांनीं एक घोडी घेतली. त्याचे किंमतीबद्दल रु. २००० ठरले. परंतु सदर रुपये रोख न दिल्यामुळें बाळाजी विश्वनाथ ह्यांचे सांगण्यावरून रा. ढिरोजी यादव हे जामीन राहिले. पुढें २००० ज्या ऐवजीं रु. २०० च फक्त देऊं असें पुरंदरे म्हणूं लागले. असें करणें बरें नाहीं अशा प्रकारचीं हीं पत्रें आहेत. हीं पत्रें बाळाजी विश्वनाथ ह्यांनीं अंबाजीपंत पुरंदरे ह्यास पाठविलीं आहेत. सदरहु पत्रें (इ. स. १७१०) शके-१६३२ मध्यें अजमासें पाठविलीं असावीं असें वाटतें.

गं. ना. मुजुमदार.

ले. १ श्री

राजश्री अंबाजीपंत स्वामी गो

सेवक बालाजी विश्वनाथ नमस्कार विनती उपर तुम्ही पत्र पाठविले की रा ढिगेजी यादव यास तुम्हास समध नाही हे गोस्ट उचित नाही येथील प्रसग तुमचा कैसा जाला होता तेव्हा ढिरोजी यादव यास बहुता प्रकारे सागोन तुमचा निकाल करविला आम्ही सावद तुमचे कों च जालो येसे असता येसी गोस्ट तुम्ही लिहिली उचित नव्हे याउपर पत्र पावताच दोन हजार रुपयाचा निर्वाह करून पाठवणे गणेशपंत मामा सकाली पाठविला असे यामुले आमचे प्रसगास अंतर पडले येसे जाले आहे. या उपर आबाजीपंत आनमान कराल तर तुम्हास आमचा सफत असे अखेर पैके सुटत नाहीं बरे समजणे आणि गणेशाबराबर निर्वाह करून पाठवणे बहुत काय लिहिणे हे वि॥

ले. २ श्री

राजश्री आबाजीपंत स्वामी गो

सेवक बालाजी विश्वनाथ नमस्कार विनति उपर रा॥ ढिरोजी यादव दोन हजार रुपयास तुम्हास जमान आमुचे वचन करून जाले घोडी यावी येसा निर्वाह केला यास येथील दडक तुम्ही जाणत च आहा घोडी मिलत नाही पैके घेऊन

म्हणोन तगादा लाविला आहे हे भले माणुस कचाटी गुतले आहेत यास तुम्ही घोडा तूर्त याचे हवाली करणे दुसरे पधरा दिवसा लिगाड अवचे वारणे हे स्वमी होन येसे सर्वथ्वी न करणे वरकड आमचे वर्तमान तर तूर्त वत हली बहुत कामी छत्रपती श्वामींस विनतीपत्रे पाठविली आहेत श्रीदेव मध्स्यत यावे येसे केले आहे चिरंजीव बाजीराउ येथे टेवावे श्री दुरम्यान यावे यास श्रीकडील विचार तुम्ही बलकट करून ठेवणे पत्राची उतरे आलियाउपर आधी तो प्रसंग सिद्ध असलापा हिजे तर आनकुल करून ठेवणे लोभ असो दीजे हे वि॥

ले. २ श्री

विनती उपर दोन हजार रुपयाचे घोडीयास जमान रा. हिरोजी यादव दिल्ही आहेत यास घोडी घेता देता पुरवत नाही हे मनास येईल तैसी येणार हजार रुपयाचो वित्त दोनसे म्हटले तर येथे इलाज नाहीं यास तुम्ही घोडियाचे + + न पडणे नस्ते चे हर इलाज करून आस्ता बरे आहे हिरोजी यादव यास तगादा केला असे तर गळा आधी उगवणे बहुत काय लिहिणे हे वि॥

---

## शके १८४० तील संशोधनवृत्त.

गेल्या वर्षी तिगस्ताच्या मानानें संशोधन थोडें झालें. यांचें कारण दुष्काळ व सर्व देशांत एकदम उपस्थित झालेला कफज्वर ( एन्फ्लुएंझा) होय. जिकडे जावें तिकडे ही सांथ होती च. त्या दोन महिन्यांत, दोन वेळ आलेल्या त्या भयंकर रोगानें सर्व देश हालवून सोडला. हिंदुस्थानांत असें एक हि खेडें नसावें कीं, जेथें याचा फेरा आला नाहीं. या रोगानें साठ लाख लोक मेले असें सरकारनें प्रसिद्ध केलें आहे। अशा त्या आधिदैविक तापांतून आज आपण सर्व येथें जमलों आहों ही त्या श्रीसंशोधनेश्वराची च कृपा होय। असो.

गेल्या सालीं कोठकोठें संशोधनार्थ हिंडलों व त्या त्या ठिकाणीं काय काय प्राप्ती झाली हें निरनिराळें न देतां एकदमच सर्व माहिती एकत्र द्यावी असें ठरविलें आहे.

प्रथम पूर्व खानदेशांतील कासोदें या गांवीं जावयाचें ठरविलें. हा गांव येरंडोल तालुक्यांत आहे. मध्यंतरीं

( १ ) वनकोठें म्हणून एक उजाड गांव लागतें. तेथें पूर्वी एक गढी होती. हल्लीं ती पडली आहे. गांवांत, सडकेच्या डाव्या बाजूस एक पायविहीर आहे. ती गवळी राजांनीं बांधिली असें सांगतात. हिच्या तीन बाजूस ३ कोनाडे आहेत, पण आंत

मूर्ती वगैरे नाहींत. फक्त एका कोनाड्यांत भंगलेली, शेंदूरचर्चित एक मूर्ती आहे, ती कदाचित् मारुतीरायांची असावी. विहिरीस पायविहीर म्हणण्यापेक्षां, कुंड म्हणणें जास्त शोभेल. कारण, जमिनीपासून फक्त चार च पायऱ्या उतरल्यावर पाणी आहे. जमिनीच्या सपाटीपासून कुंडाची खोली एक पुरुष आहे. पश्चिमाभिमुख ( पूर्वेकडील भिंतींत ) एक शिलालेख आहे. तो अर्वाचीन आहे. शिला साधारण चौकोनी दीड वितीची आहे. तो असाः--

( १ ) मौजे वनकोठ
( २ ) ठ. ता. येरंडोल
( ३ ) ही पायविहीर गोविं
( ४ ) द दाजी मामलेदार
( ५ ) ता. येरंडोल यांचे मा
( ६ ) र्फतीनें संन १८६३।६४
( ७ ) च्या एप्रीलांत दु. जा. ( दुरुस्त जाली. )

हल्लीं गांवांत भिल्लांच्या २।३ व महारांच्या ३।४ मिळून १० झोंपड्या आहेत. या गांवीं परगणे येरंडोल येथील देशमुख- देशपांड्यांचें वतन आहे. नंतर येथून

( २ ) **कासोदें** येथें आलों. गांवास पक्का तट व वेस आहे. येथें झोरे व खादी उत्तम होते. पूर्वीं हा गांव उत्राण परगण्यांत होता. येथें एका वाण्याच्या घरीं, "शके १७७६ क्रोधन माघ कृष्ण ७ मंगळवारीं" लिहलेली बल्लाळ गणेशवंदन-कृत गणेशपुराणें उत्तरखंडे विनायक चरित्राची पोथी आहे. तिचे उपासना व गणेश असे दोन खंड आहेत. येथील कुलकर्णी रा. माधवराव राजाराम यांचे घरीं कांहीं संग्रह मिळाला, त्यांत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे "विष्णुदास नामा याचें समग्र महाभारत" हा होय. आजपर्यंत संशोधकांनीं बरींच वर्षे प्रयत्न केला असतां हि हा संपूर्ण ग्रंथ उपलब्ध झाला नाहीं. त्रुटित अधलीं मधलीं पर्वें च सांपडत व त्यामुळें या विष्णु-दासानें समग्र महाभारत न रचितां, फक्त हीं च पर्वें लिहिलीं असावींत असा समज होत चालला होता. पण श्रीसंशोधनेश्वराच्या कृपेनें व महाराष्ट्राच्या सुदैवानें सदर ग्रंथ संपूर्ण सांपडला। महाराष्ट्राच्या सुदैवानें म्हणण्याचें कारण एवढें च कीं, या ग्रंथावरून- तो संबंध वाचून पहातां- त्याचा कर्ता जो विष्णुदास नामा, हा सनातन- धर्मी नसून निराळ्या च पंथाचा आहे हें सिद्ध झालें हें होय। यापूर्वीं हि या च विष्णुदास नाम्याचीं अरण्य व सौप्तिक हीं पर्वें मला सांपडलीं होतीं ( तत्पूर्वीं तीं अनुपलब्ध च होतीं ), त्या वेळीं तीं वाचून पाहिल्यावर मला अशी शंका आली कीं, हा नामदेव भागवतधर्मी ऊर्फ सनातनधर्मी नसून मानभव धर्माचा असावा; पण आणीक सबळ पुरावा सांपडल्याशिवाय ठाम मत देतां येत नव्हतें. आतां,

हा संपूर्ण ग्रंथ हातीं लागल्यावर व तो सारा वाचल्यावर अगदीं निश्चिततेनें व ठासून सांगतां येतें कीं **हा विष्णुदास नामा व त्याचें महाभारत हें मानभवी संप्रदायाचें आहे !!** या गोष्टीनें मराठी वाङ्मयावर बरा च उजेड पडेल. आजपर्यंत बऱ्या च जणांनीं, नामदेवाच्या गाथ्यांत, पंढरपूरच्या प्रसिद्ध नामदेव शिंप्याच्या अभंगांत व काव्यांत, या मानभावी नामदेवाचें हि काव्य न कळत अजाणपणें छापून टाकिलें आहे ! त्यामुळें बरे च हास्यास्पद दोष व घोंटाळे त्यांच्या माथीं आले आहेत. पैकीं, रा. शिवरामपंत परांजपे यांनीं, ज्ञानदेवाच्या समाधीचे वेळीं नामदेवास खरोखर किती मुलें होतीं व नामदेवानें त्यांचीं नांवें कशीं व किती दिलीं आहेत, याबद्दल आपल्या मंडळांत मागें एक निबंध वाचून, नामदेव दोन होते असें म्हटलें होतें. अर्थात च तो दुसरा नामदेव म्हणजे हा मानभवी नामदेव होय. याप्रमाणें बऱ्या च चुका या दोन नामदेवांच्या बाबतींत झाल्या आहेत, त्या आतां दुरुस्त कराव्या लागतील. असो. आणीक हि थोडीशी प्राप्ति या गांवीं झाली. रा. माधवरावांनीं आपल्या नऊ पूर्वजांचीं नांवें व वंशावळ सांगितली. इकडील भागांत आढळणाऱ्या कागपत्रांत तिचा कदाचित् उपयोग होईल म्हणून, ती उतरून ठेविली आहे. नंतर येथून

(३) **बांभोरीस** जाऊन तेथून

(४) **फरकांडे** येथें गेलो. येथें पाहण्यासारखी इमारत म्हणजे हालत्या मनोऱ्याची मशीद. ती गांवाच्या बाहेर जवळ च आहे. ती चंद किंवा चांद नांवाच्या मोमिनानें सुमारें १५० वर्षांपूर्वीं बांधली. त्याचा वंश असाः– (१) चंद, मुलगा (२) दोस्त्रमहमद हा १०५ वर्षांचा होऊन मेला, मुलगा (३) चांद हा १०० वर्षांचा होऊन मेला, मुलगा (४) इभराम (५) गफूर. हा हल्लीं हयात असून पारोळ्यास आहे. मशीद इतर नेहमींच्या मशिदीप्रमाणें च असून विशेष हा कीं, पुढील दर्शनी दोन मनोरे जे आहेत ते हालणारे आहेत. या दोन मनोऱ्यांतील अंतर ३२ पावलें असून, ते अष्टकोणी व पांच पुरुष उंचीचे आहेत. पैकीं, एका मनोऱ्याच्यावर आपण जाऊन बसावें व वरतीं हत्तीवरील अंबारीसारखी जी चार खांबांची छत्री अथवा मेघडंबरी आहे, तिच्या एका खांबास दोन्ही हातांनीं धरून व पाय लावून जोरानें हालवावें म्हणजे आपण ज्या मनोऱ्यांत बसलों असतों तो तर हालतो च पण त्याच्या समोरचा हि आपोआप हालतो ! शंका आल्यास दुसऱ्या मनोऱ्यांत एकाद्याला बसवून त्याच्याकडून तो हालवावा कीं आपला हि आपण न हालवितां च हालतो ! ! दोन्ही मनोऱ्यांना आंतून जिने आहेत व त्यांचे कळस सोन्याचें पाणी दिलेले आहेत. मशिदीचे तीन घुमट असून, आंतील पांढरा रंग, कवडीच्या चुन्याचा स्वच्छ व गुळगुळीत असा आहे. मशिदीच्या आवारांत शिरतांना एक भिंत लागते, ती हि जोरानें हालविली असतां हालते. या हालण्याची काय युक्ति साधली आहे तें समजत नाहीं.

चुन्याविटांची एवढी इमारत कशी हालावी ? व मनोऱ्यांचें तर एक हालविला की दुसरा हालतो याचें कारण काय असावें ? बऱ्या च पाश्चात्य शिल्पशास्त्र्यांनीं हें ठिकाण पाहिलें आहे, पण त्यांना हि या कृत्याच्या कारणाचा उलगडा होत नाहीं ! मनोऱ्यांखालीं लोहचुंबक असावें असा कोणी तर्क करितात, तर एका मोठ्या लोखंडी दांड्यावर मध्य बिंदु साधून हे दोन मनोरे बांधले असावेत असा कोणी तर्क करितात. असो. आवारांत एक हौद असून आवाराबाहेर घोड्यांची पागा आहे व जवळ च नदीच्या पात्रांत एक पायविहीर आहे. भोंवतालीं आंब्यांचीं झाडें पुष्कळ आहेत. गांवांत आणीक एक पिराचें व महादेवाचें जुनें देऊळ असून गांवास पडका तट व वेशी आहेत. नदीचें नांव अंजनी आहे. आंग्लाईपूर्वी हें गांव २ वेळ उजाड झालें होतें व दोन वेळ पुन्हां वसविलें गेलें. एक वेळ पेंढाऱ्यांनीं लुटलें होतें. हल्लींची वस्ती इ. स. १८२८ त फकीर चांद वंजारी यानें वसविली. येथील देशमुख देशपांड्या एक च, मराठा जातीचा निकम आडनांवाचा आहे. वरील मशीदीचें काम दुष्काळामुळें अपुरें पडलें आहे. ओवऱ्यांचे खांब वगैरे बांधले गेले जाऊन पुढील काम तसें च राहिलें आहे. ही एका मुसलमान बेलदारानें बांधिली. बांधल्यावर त्याला तीन हजार रुपये दिले व त्याचा हात कापून घेतला. कारण, दुसरीकडे त्यानें असलें काम पुन्हां करूं नये ! येथें हल्लीं हि एक मोमीनमहल्ला आहे; हे लोक पूर्वीं पगड्या करीत असत. लोकसंख्या ११८३ असून, वसूल १०३१ ८४ ८२ आहे. फारशी शब्द "फरकंद" म्हणजे आनंद यावरून, या गांवाचें नांव फरकांडें पडलें अशी दंतकथा आहे. हें गांव पूर्वीं म्हसवें महालांत होतें. येथील देशमुख हेंच पूर्वीं देहेर परगण्याचे हि देशमुख होते. पुढें त्यांच्या आपापसांत वांटण्या होऊन ८४ गांवांच्या परगण्यापैकीं १२ गांवांची तिसरी वांटणी ( इनाम जमिनीची ) व ३२ गांवांचा रुसूम ४८ ८६ ८४ इतकें इनाम, हल्लींच्या हैबतराव दौलतराव देशमुखास आहे. येथील कुळकरणी हे कासोदेकरांचे भाऊबंद आहेत. यांचें येथें व वरील देशमुखाकडे थोडेसे कागद सांपडले आहेत नंतर

(५) **जानफळ** या गांवीं आलों. हें गांव उजाड असून पडकी गढी व पांच सहा भिल्लांच्या झोंपड्या याशिवाय येथें काहीं नाहीं. या गांवीं फरकांड्याच्या देशमुख-देशपांड्यांस इनाम जमीन आहे. येथून

(६) **नांद्रें खुर्द** येथें आलों. येथें हि पडकी गढी आहे, व येरंडोलकर देशमुख-देशपांड्यांस इनाम जमीन आहे. पुढें

(७) **हनुमंत खेडें** येथें आलों. ह्या गांवाबाहेर उघड्यावर च उन्हाळ्यान्हांत, पावसाळ्यांत बेफिकीरपणानें राहणारी, पाउण पुरुष उंचीची प्रतापमारुतीची मूर्ती आहे. तिच्या वर गांवकऱ्यांनीं देऊळ बांधलें पाहिजे. येथून

( ८ ) **वडधानोरी** गांवीं आलों. या गांवीं येरंडोळकर देशमुख-देशपांड्यांस इनाम जमीन आहे. तेथून

( ९ ) **धरणगांवास** गेलों. येथें सारणेश्वर, पातालेश्वर वगैरे महादेवांचीं स्थानें जुनीं असून गांव हि इतिहासप्रसिद्ध आहे. मोंगलाच्या वेळीं येथें उत्कृष्ट कापड होत असे. १७ व्या शतकांत धोगगांव, दोणगांव, द्रोणगांव, धोरणगांव, धरणीधरग्राम इत्यादि नांवांनीं हें प्रसिद्ध होतें. इंग्रेजानें येथें इ. स. १६७४ त वखार स्थापिली. पुढल्या च वर्षीं म्हणजे १६७५ च्या मार्चांत शिवाजीमहाराजांनीं हें लुटलें. पुन्हां ४ वर्षांनीं ( १६७९ ) महाराजांनीं लुटलें त्या वेळीं हें फार भरभराटीचें होतें. या प्रमाणें महाराजांच्या चरणांनीं हें गांव दोन वेळ पुनित झालें आहे. पुढें ६ वर्षांनंतर १६८५ मध्यें संभाजी महाराजांनीं हें आणीकएकदां लुटलें. या वेळीं इंग्रज वखारकारास आपली व्यवस्था करण्यास फक्त २ तासांचा च अवधि दिला होता. १८ व्या व १९ व्या शतकांत भिल्लांनी गांवास बरा च त्रास दिला. Sir James Outram यानें येथें एक भिल्लकोर ( Corps ) काढिली. येथें सरकारी जिन फयाकूटरी ( कापूस पिळण्याचे चरक ) होती. हल्लीं औटरामच्या बंगल्याची बाग केली आहे. पूर्वीं येथें कागद तयार करीत. येथें हि कांहीं ग्रंथांची प्राप्ती झाली. नंतर

( १० ) **पुण्यास** आलों. येथें षष्ठ संमेलनांचें काम झाल्यावर मंडळाचें कांहीं दिवस काम केलें. नंतर पावसाळा लागल्यामुळें, मिळविलेल्या संग्रहाची विल्हे व ज्यांना, अस्सल कागदांच्या नकला करून ते परत देण्याचें कबूल केलें होतें त्यांच्या कागदांच्या नकला, वगैरे कामें केलीं. पावसाळा संपल्यावर

( ११ ) **वसई** येथें गेलों. तेथें किरकोळ २।३ ग्रंथ मिळाल्यावर व याच सुमारास सांथीच्या तापाचा प्रसार जोरांत सुरू झाल्यामुळें पुन्हां खानदेशांत वळून

( १२ ) **शहादें** या गांवीं आलों. हा गांव पूर्वीं फार भरभराटीचा होता. येथें श्रीमंत गुजराती वाणी बरेच होते. त्यांचा हुंडीचा व्यापार काशीरामेश्वरपर्यंत चालत असे असें सांगतात. हा परगणा इ. स. १३७० त गुजरातच्या मुजफ्फरखान सुलतानकडे होता. त्याच्यावर खानदेशच्या मलीकराजानें स्वारी केली पण उलट त्याचा च पराभव झाला. पुढें हा निजामानें आपल्या ताब्यांत घेतला. खर्ड्यांच्या लढाईनंतर हा महाल पेशव्यांना मिळाला. त्यांनीं तो होळकरास सरंजामी जहागीर दिला. मंडलेश्वराच्या तहानें १८१८ त सातपुड्याच्या दक्षिणेकडील होळकरी सर्व मुलूख इंग्रेजास मिळाला, त्यांत त्यांना हा हि मिळाला. १८०२ त होळकरानें हा महाल लुटला होता. हल्लीं हि निजामाच्या राज्यांतील देसाई म्हणून एका इनामदारास येथें कांहीं इनामजहागीर आहे. त्यांचे येथें कागदपत्रें आहेत पण या खेपेस त्यांचे

कारभारी न भेटल्यानें पुन्हां एकदां येथें आलें पाहिजे. गांवाच्या नदीचें नांव गोमई असून तिला बारमास पाणी असतें. येथें पडकी गढी आहे येथून

( १३ ) **सारंगखेडें** या तापीच्या काठच्या गांवीं आलों. येथें एक मान-भवचा मठ आहे. तेथून

(१४) **दोंडाइचे** या गांवीं आलों. येथें राऊळ या नांवाचा रजपूत जहागीरदार आहे. खानदेशांत १२॥ राऊळ आहेत असें म्हणतात. मागें प्रभातांत एक राऊळ-पुराण छापिलें गेलें आहे. नंतर खालील गांवीं गेलों.

( १५ ) **कानळदें**. हें गांव गिरणा नदीचे कांठीं आहे. गिरणेचें पात्र रुंद असून कांठावर एक महादेवाचें–कनकेश्वराचें–मंदीर आहे. गाभारा १३॥ × १३॥ पावलें असून, सभामंडप १२ खांबी आहे. फूट ओरसचौरस व ६ खांब १ फूट उंच असून जुन्या धर्तीचे आहेत. बांधणीवरून देऊळ २०० वर्षांचें असावें. देवळाशेजारीच पांढऱ्या भुसभुशीत मातीची एक ऊंच टेंकडी आहे. त्यांत कांहीं भुयारें आहेत. १ लें भुयार १५×७ × १० मापाचें असून आंत देवीची मूर्ती आहे. व महादेवाचें लिंग आहे. या भुयाराचें तोंड उत्तरेस आहे. याच्या आंत उजव्या बाजूस दुसरें भुयार ७ × ४ × ४ चें व त्यांच्या आंत तिसरें ४ × ३॥ × ४ चें अशीं एकांत एक तीन भुयारें आहेत. भुयारां-च्या बाहेर, इतर देवळें व समाधी आहेत. उत्तरेच्या बाजूनें टेंकडीस तट होता. हल्लीं तो पडला असून, फक्त पूर्व व पश्चिमेकडील शाबूत आहे. दक्षिणेकडे टेकडीचीच उंच बाजू आहे. या तटांचा दरवाजा पूर्वेस आहे. टेकडीची जमीन फार भुसभुशीत आहे. हिच्याखालीं या गांवाचे अवशेष असावेत असें वाटतें. येथें कण्वाश्रम होता व कण्वामुळें कानळदें हें नांव पडलें असें म्हणतात. खालील दंतकथा हि या टेंकडी-बद्दल सांगतात. पूर्वीं एक गुराखी होता. त्याच्या गुरांत एक गाय रोज चरण्यास येत असे. सकाळीं ती गुरांत येई, संध्याकाळपर्यंत चरे व संध्याकाळीं गांवांत जातांना ती या टेंकडीजवळ नाहींशी होई. तिचा मालक कोण तें हि त्या गुराख्याला माहीत नव्हतें. एके दिवशीं तिच्यावर पाळत ठेऊन व गांवांतील इतर गुरें आपल्या भावां-बरोबर गांवांत लावून देऊन तो तिच्या मागें निघाला; ती या टेकडीच्या भुयारांत आली व एकां मागून एक भुयारांत जात चालली. अंधार असल्यानें गुरा-ख्यांनें गायीची शेंपूट धरून तिच्या मागोमाग जाण्याचा क्रम सुरू ठेविला. बरा च मार्ग चालून गेल्यानंतर, त्याला पुढें उजेड दिसला. गाय तिकडे च चालली. थोड्या वेळाने ती त्या उजेडाजवळ आली व थांबली. गुराख्यांनें पाहिलें तों, पुढें तीन मोठे धिप्पाड व तेजस्वी ऋषि बसले असून त्यांच्या समोर तीन अग्निकुंडें पेटलेलीं होतीं. त्यापैकीं एका ऋषीनें गाय आलेली पाहतांच उठून तिला बांधुन तिची धार काढिली. इतक्यांत पहिल्यानें तो देखावा पाहून भेदरलेला व म्हणून गुपचूप

अंधारांत एके बाजूस लपून राहिलेला तो गुराखी, आतां थोडासा धीट होऊन पुढें येऊन त्या ऋषीला म्हणाला कीं, "बामणा, तुझी गाय आज पुष्कळ दिवसांपासून माझ्या गोवाऱ्यांत येत असते, पण आता पर्यंत तिची वनचराई व राखणावळ तूं मला दिली नाहींस. फुकट गाय चरत होती. तरी आतां तिची राखणावळ देतोस कां नाहीं!" त्या वेळीं, त्या ऋषीनें त्याला विचारिलें कीं, या भुयारांत आजपर्यंत कोणी आलें नाहीं, असें असतां आज तूं कसा आलास?" तेव्हां त्यानें झालेली हकिकत सांगितली. मग त्या ऋषीनें बरें आहे ही तुझी वनचराई व राखणावळ घे म्हणून त्याच्या घोंगडींत कुंडीजवळ असलेले यव, ओंजळभर घेऊन टाकिले व त्याला हाताला धरून भुयाराच्या बाहेर काढून लाविलें. गुराख्यानें, रागानें ते दिलेले यव भुयाराच्या तोंडाशीं टाकून व चार पांच शिव्या त्या ऋषीस हांसडून घरचा रस्ता सुधारला. घरीं आल्यावर, त्यानें झालेली हकीकत आपल्या आईस सांगितली. म्हातारी भावीक असल्यानें तिनें ऋषीनें दिलेला प्रसाद टाकून दिल्याबद्दल मुलाला रागें भरून, घोंगडी आणण्यास सांगितलें, त्यानें आणल्यावर, ती तिनें हळूं च उलगडून पाहिली. तेव्हां १०।१२ यवाचे दाणे तिला चिकटलेले सांपडले. ते तिनें तसें च ठेवून राखिले. सकाळीं उठल्यावर ते दाणे तिनें पाहिले, तों ते सोन्याचे झालेले तिला दिसले; ते तिनें आपल्या लेंकास दाखविले. त्या वेळीं त्याला लोभ सुटून, तो त्या भुयाराच्या तोंडाशीं जेथें यव टाकिले होते तेथें गेला व पाहतों तों यव हि नाहींत व भुयाराच्या तोंडांतून आंत शिरल्यावर पुढें मार्ग हि दिसेना, समोर नुसती भिंत लागली. बरें, गाय आल्यावर पुन्हां तिच्या मागोमाग जावें असा विचार त्यानें केला होता. तर त्या दिवसापासून ती गाय हि त्याच्या गोवाऱ्यांत आली नाहीं. ते ऋषि म्हणजे कण्व व त्यांचे सोबती होते. अशी हि दंतकथा आहे. पूर्वीं म्हटल्याप्रमाणें, माझा समज आहे कीं, या टेकडीखालीं पूर्वींच्या गांवाचे कांहीं अवशेष असावेत. या गांवीं पेंव अतिशय असून, लोक सुखी पैसा बाळगून आहेत. येथें एकंदर ११ जणांना इनाम जमिनी आहेत. येथून २ कोसावर तापी कांठीं

(१६) **रिधूर** गांव आहे. येथें नशिराबाद परगणेच्या देशमूख- देशमूख- देशपांड्यांची इनाम जमीन असून, येथून १ कोसावरील

(१७) **मयताणें** गांवीं श्रीमारुतीरायाचें अवचित हनुमान या नांवाचें जागृत स्थान आहे. मारुतीची मूर्ती लोण्याची आहे. मूळ मूर्ती अगदीं लहान पाषाणाची असून, तिच्यावर लोण्याचा थर देऊन देऊन हल्लींची मूर्ति पुरुषभर उंचीची झाली आहे. हल्लीं नवें देऊळ बांधित आहेत. कानळदें, रिधूर वगैरे आसपासच्या गांवीं म्हशी व्याल्या म्हणजे प्रत्येक म्हशीमागें दीड पावशेर लोणी नेऊन मारुतीच्या अंगावर चढवितात. खानदेशांतील उन्हाळ्यासारखा उन्हाळा असतां हि हे लोणी वितळत नाहीं, ही ध्यानांत ठेवण्या-

सारखी गोष्ट आहे. १०।११ वर्षांनीं एकदां हें कवच निघतें. देऊळ टेंकडीवर असून टेंकडीखालीं, तापी नदी वाहत आहे. हल्लीं हें गांव उजाड असून एकहि घर किंवा झोंपडी येथें नाहीं. एकादा गोसावी येऊन जाऊन तेथें राहतो. या गांवीं हि चार-जणांना इनाम जमिनी आहेत. नंतर येथून

( १८ ) **सावदें** गांवीं आलों. २५।३० वर्षांपूर्वीं हा गांव तालुक्याचा होता. पण येथली हवा खराब व तालुका हि मोठा म्हणून या एकाचे यावल व रावेर असे दोन तालुके केले आहेत. हा परगणा तांदुळज्याच्या लढाईनंतर निजामानें पेशव्यांस दिला. श्रीमंतांनीं तो रास्त्यांना सरंजामांत लावून दिला. तो त्यांच्याकडे १८१८ पर्यंत होता. रास्त्यांनी येथें एक गडी बांधिली होती. हल्लीं पडक्या स्थितींत ती असून, गुरांचा दवाखाना तींत आहे. ही पूर्वाभिमुख असून, तिकडचे च २ बुरूज व उत्तरे-कडील तट इतके च हल्लीं शाबूत आहे. ही गांवाच्या मधोमध आहे, व १०० फूट औरसचौरस आहे, आंत हल्लीं जुनी इमारत एक हि नाहीं; एक पीर आहे. गढीच्या दरवाज्यापासून पूर्वेस साधारण १०० फट पर्यंतचा रस्ता, फरसबंदी बांधून काढून दोन्ही बाजूस मुद्दाम झाडांची लागवड केली आहे. रास्त्यांच्या वेळच्या एका मक्त्यानें मामलत घेतलेल्या केवजीबावा नांवाच्या रेंग्या कुणब्याचा वंशज, हल्लीं येथें आहे. त्याच्या जवळ कागद असावेत, पण मला त्यानें कांहीं दिले नाहींत. येथें खानदेश सुभ्याचे सरकानुनगो राहत असते. हल्लीं त्यांचे विद्यमान वंशज, श्री. सरदार गंगाधर रघुनाथ गंभीरराव हे असून तेच येथील देशमुख व देशपांडे हि आहेत. यांना यांच्या पूर्वजांची कांहीं च माहिती ( फक्त यांच्या वडिलांशिवाय ) नाहीं. याचे जवळ बरे च कागदपत्र आहेत. आणि त्यांपैकीं पुष्कळसे जमाखर्ची फारशी आहेत. दंतकथा म्हणते कीं, या गंभीररावांचा मूळ पुरुष वतनासाठीं– देशमुखीच्या वतनासाठीं– मुसुलमान झाला, तेव्हां, त्याला दिल्लीचा मुबारिक सय्यद या बादशहानें वतन दिलें. इतिहासांत या मुबारिकाचा काळ इ. स. १४२७–१४३५ असा दिला आहे. हा बाटलेला देशमुख इकडे परत आल्यावर त्याच्या बद्दल दोन निरनिराळ्या गोष्टी सांगण्यांत येतात. कोणी म्हणतात कीं, तो बाटल्यावर त्याला पश्चात्ताप झाला व आपण बाटलों तर बाटलों, पण आपल्या भावी वंशानें तरी ब्राह्मणच रहावें–हा वंश काण्व ब्राह्मणांचा आहे, हल्लीं यांना इकडे "काणव" असें म्हणतात व यांना मैत्राणी, देवरुखे यांच्या वर्गांत मानितात. ऋग्वेदी ब्राह्मण यांच्या पंक्तीस बसत नाहींत–अशा हेतूनें तो इकडे आल्यावर, गांवांत व घरीं न येतां गांवा-बाहेर च मरेपर्यंत राहिला. तो जिवंत असतांना त्याचीं बायकामुलें गांवांत च ब्राह्मण-धर्मानें राहत असत. तो मेल्यावर वतन त्याच्या मुलाच्या नांवें सुरू झालें तें आज-तागाईत चालूं आहे. कोणी म्हणतात, बाटगा देशमूख इकडे आल्यावर, त्याच्या बायकोनें, त्याला धर्मप्रेमानें किंवा वतनलोभानें ठार मारून, सनदा आपण घेऊन

देशमुखी चालविली. असो. हल्लीं या पूर्वजाचें थडगें गांवाबाहेर देशमुखाच्या बागेंत असून, त्याच्या मृत्युतिथीस तेथें उरूस भरतो. तेव्हां विद्यमान वंशजाला सकुटुंब तेथें जावें लागतें व कबरीची पूजा करून तिच्यावर गलेफ घालून फकीरांस खैरात द्यावी लागते; शिवाय दर गुरुवारीं हि त्याला तेथें जावें लागतें. हें घराणें खानदेशांत फार जुनें आहे हल्लींचे वंशज श्री. अण्णासाहेब हे स्वभावाचे फार उत्तम, सरळ व पूर्वींच्या चालीचे आहेत. यांच्या येथें यांचे पूर्वज, मोंगली अंमलांत सर्व खानदेश सुभ्याचे हिशेबतपासनीस असल्यानें, त्यावेळचे जमावसुलीचे अस्सल कागद मुबलक आहेत, असें खानदेश ग्याझि-टियरकारानें हि म्हटलें आहे. "The ancient records of the मोंगल Government's, मोआशिनाs, were held the most authentic that could be produced. They were either in the hands of Subdivisional officers or with the Chief District accountant सरकानुगो at सावदा" जर श्री. अण्णासाहेबांना, आपल्या पूर्वजांचा इतिहास ज्यांत सांपडेल असे आपल्या संग्रहीं असलेले कागद प्रसिद्ध करण्याची इच्छा झाली तर खानदेशचा आर्थिक इतिहास बरा च उजेडांत येईल. सरदेशमुखी व सरकानुनगोई हे हक्क, सर्व सुभ्याच्या वसुलाच्या प्रमाणांत अनुक्रमें १२½ व १ असे असत. फारशींत कानून म्हणजे कायदा व तो करणारा किंवा जाणणारा तो कानूनगो असा शब्द आहे. याची जागा सरदेशपांड्याच्या च दर्जाची म्हणजे जिल्ह्यांतील एक प्रमुख अधिकारी अशी असे. असो; श्री. अण्णासाहेबांनीं कांहीं १५।२० कागद दिले आहेत. यांच्या बाबतींतील कांहीं कागद इतर ठिकाणीं मला सांपडले आहेत. हल्लीं यांना जहागीर कोठें च, नसून फक्त इनाम जमीनी आहेत व त्या खानदेश जिल्ह्यांत सर्वत्र असून यांचें एकंदर उत्पन्न ३६ ते ४० हजारांचें आहे. येथील काजीकडे हि कांहीं कागद मिळा-वेत. हा गांव अतिशय श्रीमंत असून, गुजर, वाणी व रेवे कुणबी हे येथें मोठमोठे पिढीजाद सावकार आहेत. हल्लीं येथें एके महार लक्षाधिश आहे. या गांवीं लुगडीं व इतर हात मागावरील कापड ( पूर्वींपासून ) तयार होते. गांवांत ३००।३५० घर कोष्ट्यांचे आहे. एक मानभवांचा मठ हि आहे.

(१८) येथून फैजपूर १ कोस आहे. गांवास पडका तट व वेस आहे. हा हि गांव फार श्रीमंत आहे. गांवास आगी मात्र नेहमीं लागतात. गणपतीची मढी, खंडेरावाची मढी वगैरे अर्वाचीन देवस्थानें आहेत. मारुतीचें स्वतंत्र व मोठें मंदीर आहे. अशीं मारुतीचीं मोठालीं व स्वतंत्र मंदिरें खानदेशांत नसून बेळगांव–धारवाडा कडे आहेत. गांवांतील देवीचें मंदीर जुनें असून, मूर्ती १५०।२०० वर्षांपूर्वींची असावी. मूर्ती बसलेली, भव्य व उग्र अशी असून लोक म्हणतात शेणाची आहे. जवळून पाहि-ल्यास कसल्या तरी मातीची असावीसें दिसतें. येथें हि रेवे कुणबी आहेत व ते हि श्रीमंत आहेत. येथें दरवर्षी २५।३० घरें जळतात. लोक म्हणतात कीं, वाड्याचे विमे उतरविले असल्यानें वाड्याचे मालक च आगी लावित असतील. या गांवीं "सरांथी"

म्हणून, एका सत्पंथ या नांवाच्या पंथाचे लोक आहेत. हिंदुमुसलमान एक, असें य पंथाचें मुख्य तत्व आहे म्हणतात. पुष्कळ हिंदु चोरून या पंथाचे अनुयायी झाले आहेत. अशांच्या घरीं, एके खोलींत, महिजतींत असतो तसा एक कोनाडा व तीन पाळन्या असतात, त्याच्या पुढें दर गुरुवारीं निमाज पढून त्याची पूजा करावयाची, मेल्यावर प्रेत न जाळतां दफन करावयाचें व त्यांचा गुरु सांगेल त्या दिवशीं, सर्व पंथवाल्यांनीं एके ठिकाणीं मिळून प्रार्थना करून मांसभक्षण करावयाचें, वगैरे विधी या पंथांत आहे म्हणतात. हे लोक आपल्या पंथाबद्दल खरें कांहीं सांगत नाहींत. यांचें एकत्र जमावयाचें एक ठिकाण असून तेथें तदितरांशिवाय कोणांस हि जातां येत नाहीं. त्या इमारती वर पांढरें निशाण आहे. येथें हि एक मानभवांचा मठ आहे. त्यांतील मूर्ती ३ आहेत. प्रथम पाळन्या पाळन्यांचें सिंहासन असून त्याच्यावर या मूर्ती आहेत. त्या काळ्या दगडाच्या आहेत. पैकीं पाहणाराच्या उजव्या हातास चक्रधराची आहे. हा १॥ वीत लांबीचा वरवंट्या सारखा लंबगोल दगड असून त्याला फक्त डोळे व तोंड हे तीन अवयव चांदीचे बसविले आहेत, बाकी मग कांहीं एक अवयव अगर आकार त्या दगडाला नाहीं. मधली मूर्ती दत्ताची आहे. त्याचे २ डोळे २ भुंवया २ मिशा व १ तोंड इतकेच चांदीचे अवयव डिकविले आहेत. बाकीचा दगड साधारण १॥ वीत उंचीचा लांबट असा आहे. पाहणाऱ्याच्या डाव्या हाताची मूर्ती मुरलीधर कृष्णाची आहे. ही मात्र गंडकी शिळेची असून सर्व सावयव आहे. ही हि १ वीत उंचीची आहे. मानभव लोक जो दगड पूजेला आणतात त्याला ते टाकी लावीत नाहींत. माहूर येथें, ज्या ठिकाणीं परशुरामानें आपल्या मातापित्यांस दहन केलें, व जेथें दत्तानें आपल्या चरणांगुष्ठानें गंगा उत्पन्न केली, त्या ठिकाणीं एक तीर्थ आहे, त्याच्या आसपास व त्यांत जे दगड सांपडतात तेच दगड आणून मानभव त्यांची पूजा करितात. ते जसे ओबडधोबड असतील तसे च टांकी लाविल्या शिवाय ते त्यांना पुजतात. वरील तीर्थाचें नांव चरणचालीचें तीर्थ असें आहे. या प्रमाणें च वऱ्हाडांत ऋद्धिपूर येथील जंगलांत जमदग्नी ऋषीचा आश्रम होता. तेथें सहस्रार्जुनानें तप केलें. कारण त्याला रक्तपिती झाली होती. तपानें प्रसन्न होऊन दत्तानें योगी रूपानें त्याला दर्शन दिलें. अर्जुनानें हातांचीं बोटें झडून गेलीं असतां हि तसल्या च थोट्या हातांच्या तळव्यां वर धूप पेटवून दत्ताला ओंवाळलें व प्रार्थना केली. दत्त प्रसन्न होऊन त्यानें वर मागण्यास सांगितलें, अर्जुनानें हात मागितले. दत्तानें म्हटलें, "अरेरे! तूं ब्रह्मविद्या न मागतां हें काय मागितलेंस ? असो. तुला हात येतील" मग त्याला हजार हात आले. हें वन एक मानभवी क्षेत्र आहे. या हि क्षेत्रांतील दगड आणून त्यांची पूजा करितात. या मठांतील दत्ताचा दगड माहूरच्या चरणचालीच्या तीर्थांतील व चक्रधराचा दगड ऋद्धिपूरच्या जंगलांतील आहे. या ३ मूर्ती—अगर दगडा—पुढें ३।४ वांकडे तिकडे दगड ठेवलेले आहेत. पैकीं एका ८ बोटें लांब, रुंद व ४ बोटें उंच अशा दगडावर चांदीच्या पादुका डिकविलेल्या आहेत. येथील मठपतीनें

पुष्कळ मानभवी गोष्टी सांगितल्या आहेत, त्या सर्व गमतीच्या व सनातन धर्मीयांच्या च पण त्यांना निराळें रूप दिलेल्या गडबडगुंड्याच्या आहेत, त्या येथें देणें अप्रस्तुत असल्यानें पुढें मागें स्वतंत्र देऊं. सय्यद बंधूंनीं मराठ्यांच्या सहाय्यानें ज्या महंमद शहास गादीवर बसविलें व ज्यानें त्यांचा पुढें पाडाव केला त्याचें संपूर्ण नांव "फैज महंमद" असें असून त्यानेंच हें गांव वसवून त्याला फैजपूर हें नांव दिलें असें सांगतात. येथें पूर्वीं निळा व तांबडा रंग तयार करून चिटें छापीत असत. २५० रंगाऱ्यांची घरें ३० वर्षांपूर्वीं होतीं आजहि १०।१२ रंगाचीं कुंडें गांवाबाहेर आहेत.

(२०) **म्हावी** म्हणून फैजपुराहून १॥ कोसांवर सातपुड्याच्या पायथ्याशीं एक खेडें आहे. येथील नदीचें नांव मोर असून तिला फक्त पावसाळ्यांत च पाणी असतें. येथें एक भैरवनाथाचा मठ आहे व एक पैठण येथील एकनाथसंप्रदायाचा हि आहे. तेथील मठाधिपति गांवास गेल्यानें भेट झाली नाहीं. मठांत थोडासा ग्रंथसंग्रह असावा. येथें हि एक मानभवाचा मठ आहे. येथील मूर्ती हि फैजपूर प्रमाणें च साधारण आहेत. पाहणाऱ्याच्या उजवे बाजूस, काळ्या शिळेची, २ हाताची, हातांत मुरली घेतलेली अशी कृष्णाची मूर्ती असून, मधोमध काळ्या दगडाचा ८ बोटें उंचीचा बाण असून व त्याला चांदीचे डोळे व तोंड बसविलेलें असून डोकीवर मुकुट आहे, आणि पाहणाऱ्याच्या डाव्या हातास फक्त एक चांदीचा **मुकुट** च आहे व त्याला डोळ्या सारख्या कांहीं खुणा वगैरे आहेत. मठपती म्हणतो १ ली कृष्णाची व २ री आणि ३ री दत्ताच्या मूर्ती आहेत. या हि माहूर येथील चरणचालीच्या तीर्थांतील ओवड-धोबड दगडांच्या आहेत. या. शिवाय आणीक मुरलीधराच्या धातुमूर्ती आहेत. पितळी हत्ती व घोडे यांच्या वर या मूर्ती बसविल्या आहेत. सावदें येथील मठांत हि हे हत्ती घोडे दिसतात. मठपती म्हणतो, हे हत्ती घोडे विशेष प्रयोजनाचे नाहींत. ते नुसतीं उपकरणें म्हणून आम्हीं ठेवितों. वरील मुगुटा वरून पंचम संमेलनांत "नागेशकृत महात्मा कथानक" या माझ्या निबंधांत मी मांडलेल्या मुकुटाच्या तर्कास बळकटी येते व मानभवांत या **मुकुटपूजेचें महत्व** कां आहे तें उघड दिसतें. या मठपतीनें हि कांहीं मानभवी कथा, विशेषतः काळे कपडेवाले मानभव व भगवे कपडेवाले मानभव यांच्यांतील भेद स्पष्ट करून सांगितला. हा मठपती स्वतः भगवे कपडेवाला असून, सावदें व फैजपूर येथील मठपती हे काळे कपडेवाले आहेत. येथून १ कोसा वर मोर नदीचे कांठीं गवळी राजाची किंवा अहिल्याबाईची एक ४३ पायऱ्यांची दुमजली अशी पाय-विहीर आहे. येथें. सावद्यास स्वामीनारायण पंथ जोरांत असून तेथें त्यांचीं मंदिरें हि आहेत.

(२१) **कळमोदें** हें गांव म्हावीहून २॥ कोसांवर असून येथें ४०० वर्षांपूर्वींची एक पाय विहीर आहे. हल्लीं ती पडली व बुजली असून लोक तिला गवळीराजाच्या वेळची म्हणतात. १०० वर्षांपूर्वीं यावलच्या निंबाळकर जहागीरदारानें हिचे दगड आपली गढी बांधण्यास नेले होते. येथील दगड किंवा विटा कोणी हि नेऊं नयेत, नेल्यास त्या शुभदायक नाहींत असा या गांवीं व आसपास सर्वत्र समज आहे. विटा जुन्या

वं बऱ्याच मोठ्या आहेत. मी एक वीट बरोबर आणिली असून, आज ती आपल्या प्रदर्शनसंग्रहाळयांत ठेविली आहे. तिचें मेजमाप ११॥" × ९" × २" असें आहे. येथून

**( २२ ) बुऱ्हाणपुरास** आलों. या सर्व गांवांत पडक्या इमारती पुष्कळ आहेत. गांवाचा तट हि अद्यापि मधून मधून शाबूत आहे. तापीच्या बाजूचा तट बहुतेक आहे. तापीच्या च कांठीं किल्ला आहे; तो हल्लीं सर्व पडून गेला आहे. कांहीं भिंताडें उभीं असून, त्या वर अद्यापि हि रंगीत वेलपत्ती आहे. मी बरोबर कांहीं रंगांचे पोपडे आणले आहेत. वरील जमीनींत मोठ मोठे खड्डे पडल्यानें त्यांतून आंतील भुयारें व त्यांचे वांकडे तिकडे मार्ग स्वच्छ दिसतात. या शिवाय किल्ल्यांत विशेष कांहीं नाहीं. गांवांत अबदुल रहीमखां किंवा ताणा गुजरीची मशीद आहे. ताणा म्हणजे कोष्टी लोक सुताचे जे ताणे काढतात ते व गुजरी म्हणजे बाजार. ज्या ठिकाणीं या ताण्यांचा बाजार भरत असे तेथें ही मशीद आहे. हिचे २ मनोरे फार उंच व सोन्याचें पाणी दिलेल्या कळसांचे असून मशीदींत नकसकाम साधारण च आहे. पहाण्यासारखें दुसरें ठिकाण म्हणजे जुम्मामशीद होय. हिचें नकशीकाम तर फार च अप्रतिम आहे. ही एकजात दगडी असून तीन एकांतएक १०५ कमानी काटकोनांत बसविल्या आहेत. इचे मनोरे पांच मजली उंच असून त्या वर सोन्याच्या पाण्याचे कळस आहेत. हे मनोरे २।३ कोसांवरून हि दिसतात. या मशिदींत एकंदर चार शिलालेख आहेत. पैकीं १ फारशी २ आरबी व १ देवनागरी लिपींतील आहे. १ फारशी, हा डाव्या मनोऱ्याच्या पायथ्याशीं असून ९ अे ... आहे. उजवीकडून डावीकडे गेल्यास शेवटच्या भिंतींत ८ व्या कमानींत ७ ओळींचा एक आरबी शिलालेख आहे. हा सुवाच्य व स्पष्ट खोदला गेला आहे. उजवी कडे पहिल्याच कमानींत प्रथम, वर ८ ओळींचा आरबी शिलालेख आहे. हा हि सुवाच्य व स्पष्ट आहे. याच्या च खालीं ६ ओळींचा देवनागरी लिपींतील संस्कृत शिलालेख आहे. हे सर्व शिलालेख बहुतकरून नेमाडच्या ग्याझिटियरांत आले असावेत, पण मला तें पहावयास सांपडलें नाहीं. आरबी व फारशी उतरून घेणें मला अशक्य असल्यामुळें फक्त संस्कृत शिलालेख उतरून आणला आहे. त्यांत खानदेशवर राज्य करणाऱ्या फरुकी राजांची वंशावळ व ज्यानें ही मशीद बांधली त्या एदलशाहाचें नांव आलें असल्यानें, तो खालीं देत आहे:—

[ १ ] ॥ ः श्रीसृष्टिकर्त्रेनमः । अव्यक्तं व्यापकं नित्यं गुणातीतं
चिदात्मकं व्यक्तस्य कारणं वंदे व्यक्ताव्यक्तं तमीश्वरं ॥ १ ॥
यावच्चंद्रार्कतारा

[ २ ] दिस्थिति ः स्याद्दंबरांगणे तावत्फारुकिवंशोसौ चिरं नंदतु भूतले
॥ २ ॥ वंशेयतस्मिन् किल फारुकींद्रो बभूव राजामलिकाभिधानः
ह्स्याभवत्सूनु

[ ३ ] रुदारचेताः कुळावतंसो गजनीनरेश : ॥ ३ ॥ तस्माद्भूत्कैसर-
खानवीर : पुत्रस्तदीयो हसन क्षितीशः तस्माद्भूदेदलशाहनृप :
पुत्रोभवत्तस्य मुबारखेंद्र : ॥ ४ ॥

[ ४ ] तत्सूनु : क्षितिपालमौलिमुकुटव्याव्घृष्टपादांबुज : सत्कीर्तीविलस
त्प्रतापवशगामित्र : क्षितीशेश्वर : यस्याहर्निशमाननिर्गुणगणातीते
परब्रह्मणि श्रीमानेदलभूपति

[ ५ ] र्विजयंते भूपालचूडामणि : ॥ ५ ॥ स्वस्ति श्रीसंवत् १६४६
वर्षे शाके १५११ विरोधि संवत्सरे पौषमासे शुक्ल पक्षे १०
घटी २३ सहैकादश्यां तिथौ सोमे कृत्तिका घटी ३३ राह रोहि

[ ६ ] ण्यां शुभ घटी ४२ योगे वणिजकरणेस्मिन् दिने रात्रि गत
घटी ११ समये कन्यालग्ने श्रीमुबारखशाहसुत श्री १ एदलशाह-
राज्ञामसीतिरियं निर्म्मितास्वधर्मपालनार्थे ॥

हा शिलालेख व फेरिस्ता यांत आलेल्या या फारुकी राजांच्या वंशावळी एक नसून दोघांत थोडा फरक पडतो, पण फेरिस्ता पेक्षां खुद्द फारुकी राजानें च स्वतः आपण दिलेली वंशावळ, जास्त विश्वसनीय आहे हें सांगणें नको च. कमानींत हा शिलालेख, वरून खालीं खोदला असल्यानें वरून खालीं उत्तरोत्तर ओळी लांब लांब होत चालल्या आहेत. अक्षरांच्या डोकीवरील रेघा तुटक नसून एकदम च ओढलेल्या आहेत. शिळा काळी व कठीण असल्यानें लेखाचें अक्षर ठोसर व अगदीं स्पष्ट उमटलेलें आहे. ५ व्या ओळींत "रोहिण्यां" या शब्दापूर्वी "राह" असा शब्द कोरला गेला आहे. "रोहि बद्दल चुकून दुबार तो कोरला गेला असावा, तिसऱ्या ओळींतील "खान" या शब्दांतील न वर जी खूण आहे ती फारशी तशदिदची असून तिचा अर्थ तो शब्द द्वित्त आहे असा होतो म्हणजे "खान्न" असा उच्चार करावयाचा. मशीदीच्या मधोमध जी कमान आहे तिच्यावर मागें म्हटल्या प्रमाणें अरबी शिलालेख ७ ओळींचा आहे. ही च मुख्य कमान असून तिच्या तजवीकडे ३ पायऱ्या आहेत. या शेंवटच्या पाठीच्या भिंतींत १५ कमानी असून त्या सर्व अप्रतीम कोरीव कामानें भरलेल्या आहेत. आवारांत २ हौद आहेत. दिंडीदरवाजाच्या आंत, दिंडीस एक १ धीत औरस चौरस दगड बांधलेला आहे. त्याबद्दल लोकसमज असा कीं, अंगांत हीक किंवा कस्क भरली असतां त्या जागेवरून हा जोरानें फिरविला असतां ती नाहींशी होते. कदाचित् दगड सपाट व गुळगुळीत असल्यानें कस्क चोपून जाणें साहजिक आहे. रावरतनचा महाल हा गांवा बाहेर १॥ कोसांवर आहे. हल्लीं तो पडून गेला आहे. जवळ च १।२ फर्लांग वर गोरख चिंचेच्या शेजारीं रेणुकादेवीचें मंदीर आहे. मंदीर अर्वाचीन आहे. शेजारीं जुनी पायविहीर आहे. गांव व हीं स्थानें यांत बारुदखाना—Arsenal आहे. हीं स्थळें पाहण्यास गांवाच्या शिकारपूर

दरवाज्यांतून बाहेर पडावें लागतें. दरवाज्याच्या बाहेर आल्यावर जवळ च अहिल्या-बाईची ३ मजली पायविहीर आहे. शनीवारदरवाज्यांतून तापी वर आल्या नंतर तापीच्या पात्रांत उजव्या बाजूस एक मोठी समाधी आहे. खालीं चौकोनी ओटा असून वर अष्टकोणी वृंदावन आहे. ओटा कमरे इतका व वृंदावन पुरुषभर उंच आहे. वृंदावनास पश्चिमेच्या बाजूच्या भिंतींत मोठा कोनाडा असून व आंत पूर्वेच्या भिंतींत ३ व उत्तर दक्षिणेच्या भिंतींत १।१ असे कोनाडे असून तोंडाच्यां कमानी वर शिलालेख आहे. शिला २८ × ४७ बोटांची असून तीन बाजूस जागा सोडून मधोमध लेख खालील प्रमाणें कोरला आहे. लेखव्याप्त शिळा १९ × ९ बोटें असून अक्षर ३/४″ आहे.

[ १ ] ॥ श्रीगणेशायनमः ॥
[ २ ] ॥ श्रीरामोजयतिः ॥
[ ३ ] श्रीरामरामाक्षरमंत्रबीजं
[ ४ ] संजीवनं येन्मनसप्रतीष्टां
[ ५ ] हालाहलं वा प्रलयानल वा
[ ६ ] मृत्योर्मुखंवावसताकुतोभि
[ ७ ] संवत १६६१ वर्षे शाके १५
[ ८ ] [ फुटला ]-वर्तमाने वैशाख
[ ९ ] शुा। ५ सोमे माहाराजा
[ १० ] श्रीगीरिधरजी कछवा
[ ११ ] हाये खावतकी छत्री
[ १२ ] संपुर्ण *हूघी भंभवतु
[ १३ ] बागदी
[ १४ ] महखुल हेमराजः महाकुम्हारः
[ १५ ] बीरहामन सतायेलजीः

हा गिरिधर कछवाह कोण असावा हें संदर्भग्रंथाभावीं समजणें कठीण आहे. महाजना पेठेंत शहाद्दिनची पडकी मशीद आहे हिच्या घुमटावरील नक्स काम उत्तम आहे. येथें हि येक आरबी शिलालेख असून तो सुटा च पडलेला आहे. गांवा बाहेर २ कोसांवर बोहऱ्यांचा एक बाग असून त्यांत बरे च शिलालेख ठेविले आहेत असें म्हणतात पण मला तो पहाण्यास सवड झाली नाहीं. खानदेशच्या सुभ्याची मुख्य कचेरी येथें असल्यानें, येथें बरींच जुनीं घराणीं आहेत. श्री. भुसकुटे यांचा वाडा येथें च असून ते येथें राहतात. त्यांच्या पैकीं सरदार भुस्कुटे हे वारल्यानें त्यांच्या कडे कागदपत्रांच्या शोधार्थ जातां आलें नाहीं. पुढें मागें गेलें पाहिजे. येथें महाजना पेठेंत बालाजी मंदीर आहे. तें संस्थान जुनें रत्नाकर स्वामीच्या वंशाचें असून विद्यमान वंशज रा. अमृत गणेश ऊर्फ तात्यासाहेब सदावर्ते हे उत्साही व खटपटी

* द्धवी

गृहस्थ आहेत. त्यांना इतिहासाचा हि नाद आहे. त्याच प्रमाणें सावदेकर देशमुखांच्या वाड्यांत ( याच पेठेंन ) देशमुखांचे येथील कारभारी रा. मार्तंड सीताराम पारगांवकर हे हि गृहस्थ खटपटी व सुशिक्षित व इतिहासप्रेमी आहेत. या गांवीं सावदेकर देशमुखांस पूर्वी कानुगोई कांहीं पेठा आणि मंडई या मधील कांहीं हक्क होते. हल्लीं नाहींत. येथें हि बरेच कागद सांपडले आहेत. या गांवीं पुन्हां एकदां आलें पाहिजे. बराच संग्रह मिळेल.

**२३ बोहोर्डे.** बुऱ्हाणपुराहून २॥॥ कोसांवर आहे. तापी कांठच्या उंच टेंकडीवर राजा जयसिंगाची छत्री आहे ती सरकारानें पुराणवस्तुरक्षण खात्याच्या यादींत ढकलल्यानें ५-१-१३ रोजीं सदर खात्यानें तेथील दुरुस्ती केल्याची तारीख, तेथें नमूद आहे. मआसीर अलमगिरीमध्यें म्हटलें आहे कीं " बुरहानपूर के खबरनवीसों की लिखावटों से अर्ज हुई कि राजा जैसिंह जो औरंगाबादसे चलकर हजूर में जाता था २८ मोहर्रम सन १०७८ हिजरी ( संवत १७२३ श्रावण वद्य ३०, तारीख ११ जुलई इ. स. १६६७ ) को मर गया." (जदुनाथ जुलई १ देतात.) तापीस येथें मोहना नदी मिळते. तापीच्या बाजूस असलेल्या कमानीवर एक शिलालेख आहे पण तो खालून दिसत नाहीं, कारण तो बऱ्याच उंचीवर आहे व उथळ खोदला गेला असून दगड हि काळा नाहीं, कच्चा आहे. फक्त "संवत १७३१" किंवा "१७६१" एवढीं च अक्षरें लागतात. पूर्व पश्चिम २१ व दक्षिण उत्तर २३ अशा कमानी असून, मध्यें चौकोन असून खालीं एक शिला आहे. खांब फार डौलदार व सुंदर, आपल्या येथील विश्रामबागेच्या नगारखान्याच्या खांबासारखे आहेत. त्यांवर नकशी थोडीशी आहे. वरील शिलालेख, पूर्व बाजूच्या कमानीच्या शेवटच्या ओळींत, डावी कडून तिसऱ्या कमानीवर, खांबाच्या वरच्या बाजूस आहे. कोणीं हि इमारतीचा दुरुपयोग करूं नये अशी इंग्रजी पाटी येथें लाविली आहे. येथून जवळ असलेल्या तापीच्या तीरावरील एका ओसाड देवळांत, एक अतिसुंदर गरुडवाहान विष्णुमूर्ती सांपडली ती बरोबर आणिली आहे—नंतर येथून पुन्हां खानदेशांत येऊन

**( २४ ) हिंगोणें ( २५ ) गाडेगांव ( २६ ) पळासखेडें ( २७ ) उमाळे ( २८ ) धारागीर ( २९ ) नेरी ( ३० ) जामनेर** या गांवीं हिंडलों. येथील देशमूख भेटले नाहींत, त्यांच्या जवळ कागद आहेत असें समजलें. पुन्हां केव्हां तरी आलें पाहिजे. गांवाबाहेर अहिल्याबाईची ३ मजली पायविहीर आहे **( ३१ ) पारोळें**-गुदस्तां पुन्हां एकदां पारोळ्यास गेलों, पण कागदपत्रांचें जुळलें नाहीं. किल्ल्याच्या पूर्वेस इमामसाहेबाचा दर्गा आहे. त्याचा मुजावर चांद होता, त्याला येथील जहागीरदार हरी दामोदर यानें दिलेली सनद तांब्याच्या पत्र्यावरची आहे असें ऐकिलें, त्याच्या वंशजाचा शोध काढितां तो तेथें नसल्याचें समजलें. किल्ला, फक्त तट व वेस खेरीज सर्व पडलेला आहे. आंत बाले किल्ला असून त्याला हि तट

व २ बरूज होते. आंत विहीरी पुष्कळ असून महादेवाचें एक जुनें मंदीर हल्लीं बहुतेक जमीनींत गाडलें गेलेलें आहे. किल्ल्या भोंवती खंदक चोंफेर असून, आंत पाणी हि आहे. पूर्वेस घाट व दुसरी वेंस आहे पण ती नेहमीं बंद असते. मुख्य वेस उत्तरेस आहे. या किल्ल्याची किंवा वाड्याची म्हणा बांधणी आपल्या येथील शनिवारवाड्यासारखी आहे. येथून

( ३२ ) **चोपडें** येथें आलों. हा गांव तालुक्याचा असून फार श्रीमंत आहे. या गांवीं पूर्वीं चार पाडे म्हणजे टेंकड्या होत्या म्हणून याला चौपाडें–चोपडें म्हणतात असें सांगतात. हल्लीं हि या जागा, १ शहागंज २ कुंभारटेक ३ पाटील आळी वगैरे ठिकाणीं दाखवितात. गांवाच्या मधोमध गढी होती हल्लीं ती पडली असून तेथें मामलेदार कचेरी बांधिली आहे. आयनी अकबरीच्या २ ऱ्या भागांत "शके १५२५ चे सुमारास हा गांव मोठा व भरवस्तीचा होता आणि जवळ असलेल्या रामेश्वराच्या यात्रेस फार लांबलांबून लोक येत" असें वर्णन आहे. हा रामेश्वर हल्लीं चोपड्याहून ३।४ कोसांवर तापी–गिरणासंगमीं आहे. "शके १५८२ चे वेळीं हा गांव मोठी पेठ होती" असें Finch म्हणतो. पुढें Tavernier हि याचा उल्लेख करतो. आमच्या इतिहासांत "शक १६००–१६०१ चे सालीं शिवाजी महाराजांनीं हें गांव लुटलें असा उल्लेख आहे. त्यावेळीं याचें नांव मुस्तफाबाद होतें. मुस्तफा नांवाचा एक अवलिया औरंगजेबाच्या वेळीं येथें झाला, त्याच्या नांवावरून गांवास मुस्तफाबाद नांव पडलें. याच्या च वेळीं येथें सीतळनाथ नांवाचा एक नाथपंथी साधू होता. त्या दोघांची मैत्री असे; मुस्तफानें औरंगजेबास उपदेश केला होता असें म्हणतात. ज्ञानेश्वर–चांगदेव यांची भिंत–वाघ चालविल्याची दंतकथा या सीतळनाथ–मुस्तफा बद्दल हि सांगतात. मुसलमानी कागदांतून या गांवाचें नांव चुपरह ऊर्फ मुस्तफाबाद असें येतें. या गांवाचा विशेष म्हणजे, येथें हल्लीं ५६ तर्फा असून, ५६ पाटील, ५६ कुळकर्णी व १ सरपाटील आहे. एका गांवांत ५६ पाटील अशी स्थिती मला माहीत असलेल्या गांवां पैकीं या च गांवीं आहे. पूर्वीं औरंगजेबाच्या आधीं २७ तर्फा होत्या. हल्लीं येथें ९ पुरे असून आसपास ५ वाड्या आहेत. पूर्वीं हा गांव महंमदशहा नबाबास जहागीर होता. त्यावेळीं हल्लीच्या सरपाटिलाचा पूर्वज सोनजी बधारे यानें या गांवीं महंमदपुरा वसवून त्या बद्दल सरपाटिलकी व हल्लींच्या श्रीपतरावतर्फेची सनद मिळविली. पुढें याच्या वंशांत तंटे बखेडे होऊन वांटण्या झाल्या. हल्लीं, विद्यमान सरपाटील रा. आनंदराव श्रीपतराव हे आहेत, त्यांच्या जवळ अस्सल कागदांचा भरणा पुष्कळ आहे, साधारण १०० रुमाल असावेत, पैकीं त्यांनीं मला १०।१२ रुमाल दाखविले, त्यांतून महत्वाच्या कागदांच्या नकला करून घेतल्या आहेत. सवडीनें आणीक एकदां तेथें गेलें पाहिजे. सरपाटील हे कागद दाखविण्यास तयार आहेत. पूर्वीं येथील देशमुख गुजर होता व त्याचा कारभारी ब्राह्मण होता;

कांहीं घरगुती भानगडीमुळें देशमुखानें दिवाणाचा खून केला तेव्हां दिवाणाच्या वंशजानें दिल्लीस फिर्याद नेली. निकाल असा झाला कीं, दिवाणाच्या वंशजास निम्मी देशमुखी नुकसानी दाखल द्यावी. हल्लीं ब्राह्मणाकडे निम्मी देशमुखी आहे. तेव्हां पासून या घराण्यास खुनीदेशमुख म्हणतात. येथील चौधऱ्यांचा मूळ पुरुष वीरजी तेली, हा वतनाकरितां औरंगजेबाच्या वेळीं बाटला होता. हल्लींचे चौधरी त्याचे वंशज असून मुसलमान आहेत. श्रीमंत पेशव्यांकडे हा परगणा कधीं आला तें समजत नाहीं पण हा परगणा शके १७१२ पासून पेशवाई अखेर नाना फडणीस यांना जहागीर होता व त्यांच्या तर्फे रघुनाथ गंगाधर व अंताजी कृष्ण हे येथें मामलेदार होते असें सांपडलेल्या कागदपत्रांवरून आढळतें. होळकरानें पुणें लुटावयास जाण्याच्या वेळीं हें गांवहि लुटलें होतें, त्या वेळचे कांहीं कागद सांपडले आहेत. १७८० नंतर येथें इंग्रजी झाली पण ती ११२ वर्षें च होती, नंतर हा तालुका शिंद्यांकडे अदलाबदलींत गेला, तो १०।१२ वर्षांनीं पुन्हां इंग्रेजांकडे आला. येथें सदानंद स्वामी अयाचित यांचा मठ असून तेथें ग्रंथसंग्रह पुष्कळ आहे. मठांतील संग्रह १२।१३ वर्षांपूर्वीं गु. राजवाड्यांनीं पाहिला होता व कांहीं नेला असें समजलें. हल्लींचे मठपति रा. त्रिंबक रामचंद्र ऊर्फ आपासाहेब यांनीं सर्व संग्रह मला पाहूं दिला व मी निवडून काढलेला हि माझ्या हवालीं केला. रा. आपासाहेब यांना इतिहासाची फार आवड असून ते सुशिक्षित व खटपटी आहेत. त्यांच्या येथील २००।३०० संस्कृत ग्रंथ आपल्या येथील आनंदाश्रमांत त्यांनीं दिले आहेत. यांचे येथें ग्रंथांशिवाय ऐतिहासिक कागदपत्रें हि सांपडली. मी तेथें असतांना त्यांनीं इतर ठिकाणचे कागदपत्र मिळवून देण्यांत मला फार मदत केली, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. वर ज्यांचें नांव आलें आहे त्या रघुनाथ गंगाधर पंडितांचा येथें वाडा असून त्यांची औरस व दत्तक संतती येथें नाहीं. त्यांच्या मुलीकडील वंशापैकीं रा. रघुनाथ रावजी टेंबे हे हल्लीं वाड्यांत राहतात त्यांनीं हि कांहीं कागद दाखविले. तसें च येथील मुसलमानी शाळेचा मुख्याध्यापक व त्यांचे हस्तक मिया अकबर अलीयांच्या खटपटीनें गांवांतील दोन चार मुसलमान घराण्यांतील अस्सल कागद पाहावयास सांपडले, त्यांच्या नकला करून घेतल्या आहेत. या गांवीं बरा च संग्रह मिळेल. मात्र सारखे ५।६ महिने तेथें राहावें लागेल. चोपड्याबद्दलची कागदपत्रावरून समजून येणारी माहिती ते कागदपत्र आपण जेव्हां प्रकाशित करूं त्या वेळीं तेथें देऊं, येथें दिल्यास हें संशोधनवृत्त फार वाढेल. १७ व्या सबंध व १८ व्या शतकाच्या पूर्वार्धांत इकडे आलेले यूरोपियन प्रवासी सांगतात कीं, त्या वेळचा खानदेशांतील व्यापारी मार्ग, गुजराथेंतून दिल्लीकडे जाणारा सुरत, नवापूर, नंदूरबार, दोंडाइचें, शिंदखेडें, थाळनेर, चोपडें, सांगवी, न्हावी व बुऱ्हाणपूर असा असे. येथें मशिदी फार आहेत. पैकीं वर आलेल्या मुस्ताफाची कबर व मशीद बरी आहे. कबरीचे कळस सोन्याचें पाणी दिलेले आहेत. जुमा मशीद हि, फरुखी राजांपैकीं ८ वा मिरान महंमदखान (इ. स. १५२०–१५३५) यानें बांधिली म्हणतात.

१५

काळी मशीद येथील दादामिया अवलियानें बांधिली.) सिलानी साहेब मशीद, शेख-पुरा मशीद, सात कोठडी विहीर, तटारखाची कबर वगैरे जुनीं स्थानें आहेत पण त्यांचें सर्वांचें वर्णन वर सांगितल्याप्रमाणें स्वतंत्र करूं. येथून

( ३३ ) **चहार्डी** येथें आलों. हें गांव तंबाखूबद्दल पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. जैमिनी अश्वमेधांत मयूरध्वज–हंसध्वज या राजांची कथा येते. त्यांची राजधानी जी चंपावती नगरी ती च ही होय. चंपावती नगर १० कोस लांब होतें. गांवाच्या दोन्ही बाजूस २ नद्या गूळ व अनेर या होत्या. हल्लीं या चहार्डीपासून ५।५ कोसांवर दोहींकडे आहेत. येथून २ कोसांवर हतेड म्हणून खेडें आहे. तेथें मयूरध्वजाची हत्तीची गजशाळा व २ कोसांवरील घोडगांवीं घोड्याची पागा होती. पुढें चंपावतीचें चंपकक्षेत्र नंतर श्रीनगर नंतर कसबे चहार्डी अशीं नांवें उत्तरोत्तर पडलीं. येथील नदीचें नांव अमरावती असून, येथें ७ तर्फा असल्यानें हिला सातचहार्डी असें हि म्हणतात. ७ पाटिलांपैकीं प्रत्येकास ३०।३० रु. येतात. येथील पोतें २० हजारांचें आहे. येथें पूर्वी एक वाणी चौधरी असे. त्यानें गढी बांधिली होती. तो दिवसा गढींत कचेरी करी व रात्रीं वस्तीस धरणगांवीं जाई. त्याची घोडी उत्तम होती. या-च सुमारास चहार्डीच्या आसपास अकुलखेड्यास २२ काटे रजपूत भाऊ होते. त्यांच्या मनांत येथील गढी घेण्याचें आलें. त्याप्रमाणें त्यांनीं त्या वाण्या-वर व गढीवर बरेच वेळां हल्ले केले पण त्यांत त्यांना च अपयश आलें. एके दिवशीं, पाळत ठेऊन वाणी संध्याकाळीं धरणगांवीं जात असतां, यांनीं त्याच्यावर हल्ला चढविला त्या वेळीं तो एकटा होता, बरोबर फक्त त्याचा कुत्रा व शिंगवाला मांग होता. प्रथम कुत्रा रजपुतांच्या आंगावर गेला. त्याला ठार मारून, मांगास हि तो अडथळा करीत असतां त्यांनीं त्यास ठार मारिलें. या दोघांचीं थडगीं, हल्लीं गांवाजवळ च एका नाल्यांत दाखवितात. इकडे, तेवढ्या वेळांत वाणी निसटला. त्याची घोडी पोहणारी असल्यानें तो सपाट्यानें तापी पोहून पलीकडे धरणगांवाच्या रस्त्यास लागला. तिकडे रजपुतांनीं मांगास मारल्यावर, ते हि पाठलाग करण्यास लागले, आणि वाणी धरणगांवच्या वेशींत जाऊन वेस बंद करीत होता इतक्यांत यांनीं तेथें जाऊन घोडीस व त्याला ठार मारलें, घोडीचें व वाण्याचें थडगें तेथें आहे. नंतर हे रजपूत चहार्डीस परत आले व गांव काबीज करून वाण्याची गढी पाडून, हल्लीं आहे तेथें नवीन बांधली. या च सुमारास गुजर लोक गुजरार्थेतून इकडे आले व त्यांनीं येथील पाटिलक्या खरेदी केल्या. वरील काटे रजपुतांचे वंशज हल्लीं कुणब्यांत मोडतात. वरील गुजरांनीं च शेजारचीं अकुलखेडें, चांगदेव, अहिरवाडी, हीं गांवें वसविलीं. चहार्डीस नदीकांठीं एक महादेवाचें मंदीर आहे. मंदिराचा जीर्णोद्धार केला आहे. सभामंडपांत उजव्या हातास एक शिलालेख भिंतींत बसविला आहे. पण दगड कचा असल्यानें बहुतेक अक्षरें फुटून गेलीं आहेत फक्त,

( १ ) नारायनरा + +
( २ ) जय + + ० ८ पा
( ३ ) देश + + +
( ४ ) + + + + +

इतकीं अक्षरें लागतात. लोक सांगतात, वरील वाण्यानें च हें मंदीर बांधलें असून त्याचें च नांव या शिलेवर कोरलेलें आहे. शिलेवर चंद्र सूर्य खोदलेले आहेत. हल्लीं येथें ९५ वर्षांचा एक वृद्ध गुजर आहे. त्यानें च वरील माहिती सांगितली.

( **३४** ) **काजीपुरा** म्हणून चहार्डीहून जवळ च खेडें आहे. हा गांव अथवा पुरा चोपड्याच्या काजींना पूर्वी इनाम होता, त्यांनींच हा वसविला. हल्लीं जहागीर जाऊन फक्त कांहीं जमिनी काजीला इनाम आहेत, पण आज त्या हि काझीकडे चालत नाहींत. येथून अडीच कोसांवरील

( **३५** ) **लासूर** या गांवीं आलों. हें गांव प्राचीन आहे. येथून जवळ च १ कोसावर सातपुड्याच्या टेंकड्यांत "नाटेश्वर" नांवाचें जुनें महादेवाचें मंदीर आहे. मंदीर फार च प्राचीन आहे. येथें एक शिलालेख होता, तो १०।१२ वर्षांपूर्वी सरकारनें मुंबईस नेला. ऐतिहासिक दृष्ट्या असले शिलालेख जेथल्या तेथेंच असणें उत्तम असून, ते मुंबई, कलकत्ता किंवा लंडन येथें नेणें हें अनुचित आहे, असलीं शिलालेखादि जुनीं स्मारकें, हीं तेथील लोकांची ऐतिहासिक मालमत्ता आहे. तिचे खरे वारसदार ते आहेत. ती हालवून तिला विलायतची हवा दाखविणे हें अगदीं अयोग्य ! खबरदारी घेतली पाहिजे !! हा शिलालेख प्रभात मासिकाच्या १ ल्या वर्षाच्या ८ व्या अंकांत गु. राजवाड्यांनीं प्रसिद्ध केला आहे. जिज्ञासूंनीं तेथें तो पहावा. हल्लीं देऊळ व महादेवाची पिंडी हि नवीन आहे. जुनी स्वयंभू पिंडी एका कोपऱ्यांत ठेविली आहे. गाभाऱ्यांत, आणीक गणपती व देवी यांच्या मूर्ति आहेत. देवळाचें तोंड पूर्वेस आहे. बाहेर जुनी दीपमाळ, व एक फुटकी व जुनाट मूर्ति आहे ती उभी असून तिचे २ हात बालाजीसारखे अभयदर्शक आहेत. मूर्ति शेंदूरचर्चित आहे. जवळ एक समाधी आहे. तिच्यावर पादुका व पादुकांवर वृंदावन आहे. पादुकांना सीतेच्या पादुका म्हणतात. देवळाच्या आवाराभोंवतीं तट आहे, तटापलीकडे पूर्वेस ओढा आहे. पश्चिमेस २ पायविहिरी असून जिला "सासूची पायविहीर" म्हणतात तिला १६ पायऱ्या असून पाणी आहे व दुसरी "सुनेची" असून ११ पायऱ्यांची कोरडी आहे. जवळ एक कोसावर सिद्धबावाची टेंकडी असून तेथें भुयार आहे म्हणतात. तिच्या जवळ च निर्गुंडीची हि टेंकडी आहे, पण मी या टेंकड्या पाहिल्या नाहींत. लासूर व नाटेश्वर यांत जंगल आहे. अंजनाचीं झाडें फार आहेत. त्याच्या पाल्याचा उपयोग जनावरांना चाऱ्यासारखा होतो. गांवांत परत जातांना वाटेंत वन्या देवाचें एक पडकें देऊळ, पडकी पायविहीर व पडकीं दोन वृंदावनें आहेत, तीं लागतात. देव, उभा ३ विती उंचीचा असून, त्रिशूळ व चक्र, हीं दोन आयुधें

दोन हातांत असून बाकीचे दोन हात एक कमरेवर व एक अभयंकर असे आहेत. गांवाच्या ईशान्येस, साखरबाव म्हणून एक फार मोठी पाय विहीर आहे. ही १५० वर्षांपूर्वी लासूरच्या ठोक्यांनीं बांधिली. इला उत्तरदक्षिण अशा २ बाजूंनीं पायऱ्या असून, नंतर मधोमध त्या एकत्र होऊन, पूर्वेकडे गेल्या आहेत; एकंदर ६० पायऱ्या आहेत. वर पूर्वाभिमुख गणपतीची मोठी मूर्ति आहे. ही हिंदूंनीं, ठोक्यांच्या अधिकारसमाप्तीनंतर बसविली हें उघड आहे. उत्तर दक्षिणेस पायऱ्याच्या प्रारंभी, दोन्ही बाजूस मिळून, एकंदर ४ मनोरे असून विहीर ३ मजली आहे. मधला चौकोन २५ फुटाचा व वर चार हि बाजूंनीं फिरण्यास गच्ची व तेथें ४ मोटांची व्यवस्था केली आहे. दक्षिणेस काळ्या दगडांचा १२'×३०'×२' असा हौद आहे. गांवाचा तट व वेस पडक्या अवस्थेंत आहे. ठोक्यांनीं गांवात एक मशीद बांधली होती, तिची दुरुस्ती नुकती च झाली आहे इच्या खालीं एक मोठा तलाव, २००' औरस चौरस व २५ पायऱ्यांचा आहे. समोर भुईकोट किल्ला आहे. यांतील बहुतेक भाग पडलेला आहे. वाडा व त्यांतील नकशी बुऱ्हाणपूरच्या किल्ल्यांतील वाड्यासारखी आहे. कचेरी, ओवऱ्या वगैरे पडल्या असून आज आंत फक्त दुमजली इमारत आहे. इच्या गच्चीवरून लासूरच्या आसपास ३।४ कोसांवर व सातपुड्यांतील भैरम बारीवर नजर राहते. हें गांव, ठोके या मुसलमान वंशाची राजधानी आहे. या ठोक वंशाच्या इतिहासानें, खानदेशाच्या इतिहासावर बरा च उजेड पडेल पण तो सांपडत नाहीं. दंतकथा सांगते कीं, गुलजारखान ठोक यानें कर्नाटकी भाडोत्री (mercenaries) सैन्याच्या त्रासासाठीं एक आरबांची तुकडी ठेविली. वरील कर्नाटकी पलटण, इंग्रजीच्या आरंभी खानदेशांत या भागांत लुटालूट करीत असे. गुलजारखां जवळ पगार देण्यास पैका नसल्यानें, आरबांना, त्यांनीं सभोंवारचा प्रदेश लुटावा अशी त्यानें सदर परवानगी दिली होती. यामुळें, या प्रदेशाला कर्नाटकी लुटारू व घरचे च आरबी लुटारू यांचा जाच फार होत चालला व ठोके यांचें नांव "प्रजेला ठोकून दरवडे घालणारे", असें पडलें. इकडे कर्नाटक्यांनीं आरबांना लांच देऊन, त्यांच्या कडून गुलजार व त्याचा वडील पुत्र अलियारखान यांचा लासूर व चोपडें येथें खून करविला. धाकटा मुलगा अलीफखान हा लासूरहून पळून यावलच्या सुराजीराव निंबाळकरांच्या आश्रयास गेला. तेथून निंबाळकरांच्या शिपायांच्या मदतीनें अलीफ लासूरास परत आला व पगार देण्याच्या निमित्तानें बहुतेक आरबांना किल्ल्यांत बोलावून आणून त्यानें त्यांना ठार मारलें; पण किल्ला त्याला पचला नाहीं. निंबाळकरांच्या लोकांनीं तो आपल्या ताब्यांत घेतला. तेव्हां अलीफनें भिल्लांच्या मदतीनें निंबाळकरांच्या गांवास त्रास दिल्यावर, दहा हजार रुपये घेऊन निंबाळकरानें किल्ला अलीफच्या हवालीं केला. पण एवढी रक्कम अलीफजवळ नव्हती, तेव्हां क्याप्टन ब्रिग्ज यानें इंग्रज सरकाराकडून तेवढी रक्कम त्याला कर्जाऊ देऊन, तारण म्हणून किल्ला आपल्या ताब्यांत घेतला व अलीफला किल्ल्याचा रखवालदार केलें. कांहीं

दिवसांनीं इंग्रजानें किल्ला पाडून टाकला व वाडा हि जळून गेला. फक्त वर सांगि-तल्याप्रमाणें थोडकासा अवशिष्ट भाग राहिला आहे. हल्लीं मालक दोन भाऊ आहेत. पैकीं एक समशेरखां हा, धुळें तालुक्यांत पिंचवार येथें राहत असून, दुसरा नियाझखां येथें राहतो. यांच्या बापाचें नांव जहांबाजखां व आजाचें मीरखां; इतकी च वंशावळी यांना आठवते. या नियाझखाजवळ कागद आहेत पण तो दाखवीत नाहीं. मला त्यानें नुसत्या थापा च मारल्या. तो म्हणतो आम्ही मूळचे दिल्लीचे, तेथून आमळनेर तालुक्यांत ढालवार येथें आलों व--तेथून येथें आलों. इंग्रजाला किल्ला व भरकाळीची जमीन हि, गहाण लिहून दिली. आज याप्रमाणें किती तरी शेतें सरकारांत गहाण आहेत. आम्हांला २०० रु. पोलिटिकल पेनशन मिळतें." असो येथून १॥ कोसांवरील

( ३६ ) **चौगांव** येथें आलों. येथें एक तळाव असून, तेथें पूर्वीं शिलालेख होता तो सरकारनें नेला म्हणतात. आसपास कांहीं फुटक्या मूर्ती, कोरलेले हत्ती वगैरे आहेत. येथून सातपुड्यांत १॥ कोसांवर

( ३७ ) **मलकामलचा किल्ला** पाहण्यास गेलों. हा सातपुड्याच्या एका स्वतंत्र फाट्यावर बांधला आहे. किल्ल्याचा चढाव उभा आहे. हा गवळी राजांनीं बांधला म्हणतात व तें तेथील अवशेषां वरून खरें असावेंसें दिसतें. मी येथून एक जुनी वीट आणिली आहे. ही वीट व पूर्वोक्त कळमोदें येथील गौळी राजाच्या पाय-विहीरीची वीट या बहुतेक सारख्या च आहेत. किल्ल्याचा मुख्य दरवाजा उत्तरेस, ३ पुरुष उंचीचा व ५′ रुंदीचा आहे. मागें लोखंडी अडसराची जागा दाखवितात. येथें च वेशीच्या आंत उजव्या बाजूच्या भिंतींत पूर्वीं शिलालेख होता. हल्लीं तेथें कांहीं नाहीं. तो सरकारनें नेल्याचें सांगतात. याचप्रमाणें गडाच्या पश्चिमेस जी दुसरी एक एवढी च वेस आहे, तिच्या आंत हि एक शिलालेख होता, तो हि सरकारनें नेला असें म्हणतात. पहिले वेशीनें आंत शिरल्यावर डावीकडे निघालें असतां, प्रथम दोन हौद २५′×१५′×३′ मापाचे लागतात. हल्लीं ते कोरडे असून आंत बोरू उगवले आहेत. पुढें एक पडकी समाधी व घर आहे. पुढें चौगांवच्या बाजूस म्हणजे दक्षिणेस एक बुरूज लागतो. येथून चौगांव, चिंचाळें, चोपडें, लासूर व थेट तापीपर्यंतचा प्रदेश यावर उत्तम मारा होईल. बुरूजाच्या मागें २।३ पडकीं भिंताडें आहेत. पुन्हां परत फिरून पश्चिमेकडे गेले म्हणजे ६ टांक्या लागतात. पैकीं हल्लीं फक्त एकींत च पाणी आहे. ही १५′×२५′×४′ ची असून तिला लागून-च उजव्या बाजूस दुसरी टांकी आहे; ती १५′×१०′×४′ ची आहे. हिच्या मागें च हिला लागून तिसरी आहे, ती ३०′×१०′×३′ ची असून, हिच्या डावीकडे म्हणजे पहिलीच्या मागें १५′×३०′×३′ ची चवथी आहे. या शेवटच्या टांक्याना काटकोण केलेल्या आणीक दोन टांक्या १५′×१०′×४ च्या असून, त्यांत आज बोरू उगवले आहेत. चवथा टांकीच्या उजवे बाजूस ४ कोनाडे कोरलेले आहेत. एक-

एकांत ४।४ माणसें सहज बसतील इतके ते मोठें आहेत. ६'×४'×३' असल्या मापाचे ते कोनाडे आहेत व मागच्या बाजूस टॅंकण्यास तक्त्याप्रमाणे दगड कोरून थोडीशी नक्शी हि केली आहे. पहिल्या, म्हणजे आज ज्यांत पाणी आहे त्या टाक्या-च्या उजवे बाजूस, म्हणजे या कोनाडयांच्या च बाजुस पुढें, १ भुयार आहे. तें तोंडापासून साधारण ५०'.फुटांपर्यंत दिसतें, पुढें डावीकडे वळलें असल्यानें व अंधार असल्यानें कांहीं दिसत नाहीं. येथून, किल्ल्याच्या बाहेर असलेल्या टाक्यांत जाण्याचा रस्ता आहे म्हणतात. पुढें गेल्यावर बाले किल्ला लागतो. हल्लीं फक्त चार बाजूंचीं चार भिंताडें आहेत. भिंतींत कोनाडे वगैरे आहेत. भिंती ५ पुरुष उंच व ३' रुंद असाव्यात. भिंतींच्या वर तोफांच्या मारगिरीसाठीं ज्या गंजी आहेत त्या विटांच्या व नक्शीच्या, साधारण XXXXX अशा प्रकारच्या आहेत. याच विटां-पैकीं एक वीट काढून बरोबर मीं आणिली आहे. या बाले किल्ल्याचें क्षेत्रफळ साधारण १००'×५०'=५००' औरस चौरस असावें. बाहेर पडल्यावर डावीकडे ५।६ पडक्या भिंतींचें घर आहे. येथें अव्वल इंग्रजींत किल्लेदारानें तांब्याच्या खुर्यांवर तेल्याच्या घाण्याची लाट व बैलांची पात फिरवून खुर्दा गाळून टाकला असें म्हणतात पूर्वेकडे वळल्यावर एक पीर, एक देवीची मूर्ति व कांहीं पडक्या इमारती आहेत व उत्तरेकडे बराच लांब एक बुरूज आहे. तो पाहून पुन्हां खालीं येऊन पहिल्या वेशींतून बाहेर पडून उजव्या बाजूस १०० कदमांवर तटाच्या पायथ्याशीं गेले असतां २ पाण्याचीं टांकीं, तटाच्या खालून आंत कोरलेलीं अशीं आहेत. पैकीं, लहान ६'×१२'×४' चें टांकें कोरडें असून, पलीकडे १० हातांवरचे दुसरें टांकें मोठें व सुंदर आहे. तें साधारण गोल असून, त्याचे खांब २॥ पुरुष उंचीचे चौकोनी व खालून वर निमुळते होत गेलेले, ३।४ माणसांच्या वेंघेंत मावतील असे, साधारणतः  अशा आकाराचे आहेत, हे ६ च आहेत व त्यावर छत आहे. आंत पाणी बरें च आहे. टांक्याचा घेर एकंदर २५०।३०० फूट येईल. पश्चिमेकडे आंतल्या बाजूस टांकें दूरवर गेलें आहे, पण तो मार्ग वांकडा असल्यानें दिसत नाहीं. हा च मार्ग, मागें सांगितलेल्या किल्ल्याच्या आंत असलेल्या व मोठ्या टांक्याच्या उजव्या बाजूस असलेल्या भुयारांत जातो असें सांगतात; म्हणजे किल्ल्यांतून, तटाच्या बाहेर पडण्याचा हा चोरमार्ग आहे. ही टेंकडी पायथ्यापासून ४००' उंच असावी. हिच्या मागें, पश्चिमेस, सातपुड्याची उंचच उंच रांग आहे. तिच्या वरून या किल्ल्यावर चांगला मारा करितां येईल पण पहिल्यानें हा किल्ला हस्तगत केल्या शिवाय मागें जातां येणें शक्य नाहीं. या किल्ल्याच्या आंतील बाले किल्याला २ लाख रुपये लागले असावेत, असें बर्जेस हा अर्किआलॉजिकल सर्व्हेच्या रिपोर्टांत म्हणतो. ही टेंकडी सर्वे नंबर १६८ ची होय. किल्ला व चौगांव यांत अंजन, सळई वगैरेचें जंगल आहे. अंजन १०।२० फूट अगदीं सरळ जातें व मजबूत असतें म्हणून सेंध्यापाड्यांतील गरीब लोक याचे खांब करून घरास लावितात. या रानांत, तीन

नाले एके ठिकाणीं मिळतात, त्याला त्रिवेणी संगम म्हणतात, तेथें महादेवाचें एक जुनें देऊळ आहे. हल्लीं त्याची दुरुस्ती झाली आहे. वरील संगम हा च चव्हाडींच्या अमरावतीचा उगम आहे. रानांत, वाघ, रोही, वानर वगैरे पशू आहेत. मी गड उतरून मैदानांत आलों असतां माझ्या समोरून एक मोठा रोही पळत गेला असो. येथून.

( ३८ ) **चिंचाळे** गांवीं आलों. येथें जुनें कांहीं आडळलें नाहीं म्हणून

( ३९ ) **वर्डी**

( ४० ) **गोरगावलें** या गांवीं जाऊन शेवटीं येथून ४ कोसांवरील

( ४१ ) **उनापदेव** ( ऊष्ण+आप+देव ) या ठिकाणीं गेलों. हें उन्हाळ्याचें ठिकाण सातपुड्यांत डोंगरांत आहे. पूर्वी येथें गांव होता, हल्लीं फक्त पडकी गढी आहे, वस्ती नाहीं. येथें शरभंग ऋषीकरितां श्रीरामांनीं बाण मारून ऊन पाणी काढिलें व त्यांत ऋषिस्नान झाल्यावर त्याचें कुष्ट बरें झालें असें सांगतात. हल्लीं-हि हें पाणी ऊन आहे. डोंगरांतून जमिनी खालून आलेलें पाणी, एका गायमुखांतून खालीं कुंडांत पडतें, पडणाऱ्या धारेंत कांहीं हात धरवत नाहीं. त्याचें उष्णमाप साधारण १८० F° असावें. कुंडांतील पाण्यांत स्नान करितां येतें, तें कोंबट असतें. त्याचें उष्णमाप साधारण १०० F° असावें. पाण्याला गंधकाचा वगैरे वास येत नाहीं. पाण्यांत ७।८ दिवस स्नान केल्यानें, आज हि खरूज, गजकर्ण वगैरे त्वग्रोग जातात असें सांगतात. कुंड ५॥′×३०′×२८′ चें असून खालून फरशीनें बांधून काढिलें आहे. कुंडांत १″ व्यासाची ऊन पाण्याची धार, सतत १२ महिने, रात्रंदिवस पडत असते. जास्त झालेलें पाणी बाहेर काढून दिलें आहे. कुंडाभोंवतीं आवार असून, आवारांत एक महादेवाचें, एक राम–लक्ष्मण–सीता व शरभंग ऋषि यांचें, एक मारुतीचें अशीं तीन मंदिरें, १ धर्मशाळा, कांहीं मोडक्या तोडक्या मूर्ति व एक भूयार आहे; त्याचा व्यास ८′ असून तें साधारण गोल आहे. आंत कांहीं मूर्ति आहेत. याच्या खालून च कुंडांत पडणारें ऊन पाणी जातें; येथें जमीनीवर बसल्यास खालची जमीन साधारण ऊन लागते. आवाराच्या कांहीं कांहीं विटा फार च मोठ्या आहेत. २′×१″×२″ अशा कांहीं विटा आहेत पण त्या बांधकामांत बऱ्या च खालीं असल्यानें तसली वीट न मिळतां वरून काढण्यासारखी एक वीट मी बरोबर आणिली आहे. येथें आसपास विटांचे पजावे ऊर्फ भट्या, जमीनींत गाडलेल्या अनेक सांपडतात. पन्नालयांच्या गोविंदबुवांनीं या कुंडाची व देवळांची दुरुस्ती केली व त्यांनीं नुकतें च ४।५ वर्षांपूर्वी येथें च समाधि घेतली. समाधि जवळ आवाराच्या बाहेर आहे. आवाराच्या बाहेर, उत्तरेस एका टेंकडी खालीं, कपारींत साधारण थंड पाण्याचा एक झरा आहे. हें थंड, म्हणजे वरील उन्हाळ्याच्या पाण्याच्या मानानें थंड पाणी आहे. आजारी माणसाला आपण उकळ-लेलें पाणी देतों तसें हें कोंबट आहे. कुंडाच्या पाण्यांत गंधकाचा अंश व इतर

रासायनिक द्रव्यें किती आहेत त्याबद्दल, येथील पाण्याचें पृथक्करण सरकारनें १८५४ त करविलें होतें त्या वेळीं, खालील प्रमाणें द्रव्यें निघालीं. "Chloride of Sodium, chloride of magnesium, chloride of calcium, Sulphate of Soda, Carbonate of magnesia, Carbonate of lime and Silica व एकंदर Solids २·४· " पाण्याबद्दल " The water is tasteless with a peculiar but not Sulphurous Smell and with no gas' and its temperature is १४०°" असें त्या रिपोर्टांत च म्हटलें आहे. मी फाल्गुनांत गेल्यानें व त्या वेळीं येथें उन्हाळा सुरू असल्यानें, मी पाण्याचें उष्णमान १८०° दिलें आहे तें बरोबर असावें. येथून, एक बाटलीभर पाणी हि मीं बरोबर आणलें आहे. फुरसतीनें त्याचें हि पृथक्करण आपण करून पाहूं. येथील विटा या श्रीरामाच्या आहेत, त्या कोणी नेऊं नयेत, नेल्यास त्याला दुःख प्राप्त होईल असें व एकानें नेल्या तर त्याला नारू झाले असें सांगतात. मी तर एक वीट आणिली आहे. पण ती मी मंडळाच्या संग्रहालयांत ठेवणार असल्यानें मला नारू तर कांहीं होणार नाहींत म्हणा !

झालें ! यंदाच्या वर्षांतील माझ्या फिरतींतिल हें शेवटचें ठिकाण होय. येथून फाल्गुन वद्य चतुर्दशीस निघून घरीं गेलों. घरीं ५।६ दिवस काढून, शके १८४१ च्या चैत्रांत पुन्हां कांहीं गांवीं फिरतीवर गेलों, पण ती माहिती १८४१ च्या संशोधनवृत्तांत येईल. येथें तिचें प्रयोजन नाहीं.

मीं वर म्हटलें होतें कीं, या सालीं १८३९ सारखें संशोधन झालें नाहीं व संग्रह हि तितका मिळाला नाहीं, पण येथें परवां आलों तेव्हां, येतांना पेटारे भरण्याचा प्रसंग आला असतां, १८३९ च्या सालीं जितके पेटारे लागले तितके च यंदा हि लागले असें दिसून आलें. रोग–दुष्काळादि आधिदैविक आपत्ती जर नसती, तर १८४० सालीं यापेक्षां हि अधिक काम झालें असतें. असो.

यंदां वरील एकेचाळीस गांवीं मिळालेल्या संग्रहाची तंतोतंत विल्हेवारी अजून लावावयाची आहे; तत्रापि ठोकळमानानें त्याचें खालील प्रमाणें वर्ग पाडिले आहेतः—

(१) पद्य

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | काळ | |
| (१) संस्कृत | ३० | (१) शास्त्रीय | ४ | (१) १४ वें शतक | ६५ |
| (२) मराठी | ५५ | (२) काव्यात्मक | ६१ | (२) १५ ,, ,, | १८ |
| (३) हिंदी | ४ | (३) आख्यानपर | ६ | (३) १६ ,, ,, | ४ |
| (४) गुजराती | २ | (४) वेदांत | २० | (४) १७ ,, ,, | ३ |
| | ९१ | | ९१ | (५) १८ ,, ,, | १ |
| | | | | | ९१ |

## (२) गद्य

| | | | |
|---|---|---|---|
| (१) संस्कृत | ३ | (१) शास्त्रीय | १ |
| (२) मराठी | ५ | (२) काव्य | २ |
| | ८ | (३) आख्यान | ५ |
| | | | ८ |

## (३) कागद पत्रें

| | | काळ | |
|---|---|---|---|
| (१) फारशी २२१ | २२१ | (१) शिवपूर्वकाल | ३५ |
| (२) मराठी-मोडी व बाळबोध | ११२० | (२) शिवकाळ | ५० |
| | १३४१ | (३) शाहूकाल | ४०० |
| | | (४) नाना फडणीस काल | ८५६ |
| | | | १३४१ |

## (४) इतर

(१) कळमोदेची वीट ४०० वर्षां पूर्वींची

(२) मलकामलची ,, ,,

(३) उनपदेवाची ,, ,,

(४) ,, चें पाणी

(५) बुऱ्हानपुरच्या किल्ल्यांतील रंगाचे पोपडे

(६) गरुडवाहन श्रीविष्णुमूर्ती

इत्यादि इत्यादि इत्यादि

या प्रमाणें शके १८४० तील संग्रह आहे, आणि तो आज रोजीं आपल्या देखत मंडळाच्या हवालीं मी करीत आहे।

आतांपर्यंत जशी संशोधन–सेवा माझ्या हातून होत गेली, तशी च या पुढें हि घेत जावी, एवढी च त्या श्रीसंशोधनेश्वररूपी श्रीसमर्थचरणीं विनंती आहे.

---

# माझें संशोधन–वृत्त

## तृतीय प्रसंग

### (शके १८४०)

या वर्षांचें सगळें संशोधन व.ळवें येथें झालें. या गांवच्या ऐतिहासिक माहात्म्याबद्दल गेल्या दोन संशोधनवृत्तांत दोन शब्द लिहिलेले असल्यामुळें त्याची पुनरुक्ति न

करतां इतकेंच लिहितों कीं, खडीसाखरेचा खडा जसजसा चोखावा तसतसा ज्यास्त ज्यास्त गोड लागूं लागतो तद्वत् अशा ऐतिहासिक गांवांमध्यें जसजसें बारकाईनें व कसून संशोधनकर्म करावें तसतसें अधिक महत्त्वाचे व बहुमोल कागद सांपडतात. हा अनुभव वाळव्यास चांगले प्रकारें प्रत्ययास आला.

वाळवें येथें पुढील घराण्यांत शोध केला—

१ रा. वासुदेव लक्ष्मण कुलकर्णी यांचें येथें घोरपडे घराण्यासंबंधीं, थोराता-संबंधीं व प्रतापसिंहमहाराज यांच्या कारकीर्दीतील सुमारें १००।१२५ कागद मिळाले. यांचें घराण्यांतील बाळोजी नागनाथ हा पुरुष राजकीय धालमेलींत पडणारा व सरकारदरबारांत वजन असलेला असा होता असें दिसतें. याच्याच कारकिर्दीतील हे सर्व कागदपत्र आहेत.

२ रा. बाबूराव वासुदेव कुलकर्णी—यांचें घरीं आम्हांस अत्यंत जुनाट व महत्त्वाचे असे मुबलक कागद मिळाले. ह्या घराण्याकडे प्राचीन कालापासून देशकुल-कर्ण्यांचें काम होतें यामुळें यांचे येथें महजर, करीने, पुरशीशी, निवाडपत्रें, अभय-पत्रें, सनदा इत्यादि विविध प्रकारचे कागद मिळाले. ते ब्राह्मणी राज्यापासून तों थेट अव्वल इंग्रजीपर्यंतचे आहेत. ब्राह्मणी राज्यांतील व अदिलशाहींतील बादशाह, देशमुख, देशपांडे, देशचौगले, सरदार, मानकरी, सेनापति वगैरे अधिकारी पुरु-षांचीं आज्ञापत्रें, तत्कालीन घराण्यांच्या वंशावळी वगैरे कागदांवरून पुष्कळ महत्त्वाची माहिती आपणास उपलब्ध झालेली आहे.

३ रा. सखाराम विठ्ठल उमराणीध यांचें येथें मामोपाध्ये घराण्याच्या कागदांचें एक पोतें मिळालें. त्यांत शके १४०० पासूनचे वृत्तीसंबंधीं व धार्मिक प्रकरणा संबंधीं कागद मिळाले आहेत. यांत हि सनदा, महजर, निवाडपत्रें वगैरे विविध प्रकारचे कागद आहेत. या कागदांशिवाय या पोत्यांत ज्योतिषविषयक ग्रंथ तत्कालीन पुरुषांच्या कुंडल्या, जन्मटिपणें, जुनीं पंचांगें वगैरे ज्योतिषदृष्ट्या महत्वाचें वाङ्मय उपलब्ध झालें आहे.

४. रा. लक्ष्मण नरहर व्यास—यांचे दफ्तरीं पेशवाईच्या पडत्या काळांतील म्हणजे सवाई माधवराव व राव बाजी यांच्या वेळचे व थोरात आणि घोरपडे यांचे संबंधीं कांहीं कागद मिळाले.

५ रा. विठ्ठल मोरभट पुराणिक— ह्यांचें घराणें पुरातनपासून पंडितघराणें आहे. यांचे येथें त्यांचे घराण्यासंबंधीं च सनदा, निवाडपत्रें, दानपत्रें वगैरे आहेत. त्यांतून कांहीं उपलब्ध झाले आहेत. उपलब्ध झालेल्या कागदांत कोल्हापूरकर संभाजी महाराज, सातारकर, श्री छत्रपति शाहूमहाराज, थोरले माधवराव, महादजी शिंदे, श्रीनिवासराव प्रतिनिधि, सवाई माधवराव, परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे पुरुषांचीं पत्रें आहेत.

६ विद्यार्थी रंगनाथ रामचंद्र कुलकर्णीः— यांचे कागदांत कुसाजी भोसले यांच्या सनदा, सिधोजी, शिवाजीराव, कृष्णराव, सखाराम वगैरे थोरात घराण्यांतील

पुरुषांचीं आज्ञापत्रें; कुलकर्णी घराण्यांची वंशावळ, वैद्यकसंबंधीं संस्कृत हस्तलिखित ग्रंथ, व लोलिंबराजकृत हरिविलास हा संस्कृत काव्य-ग्रंथ वगैरे सामुग्री मिळाली.

याशिवाय रा. अनंत वासुदेव ऊर्फ पिलुचा देशपांडे, वामन आबाजी देशपांडे, बलवंतरावजी देशपांडे, हर्डीकर, परूळकर, शेटे-महाजन यांनीं कागद पाहण्यास बोलाविलें होतें परंतु कार्यबाहुल्यामुळें संशोधार्थ त्यांचेकडे जाण्यास सवड झाली नाहीं. तथापि झालें आहे हें संशोधन बरें व यशस्वी आहे; असें आपणांस दिसून येईल. ह्या उपलब्ध झालेल्या सामुग्रींतून ऐतिहासिक कागदपत्रांचे दोन स्वतंत्र खंड छापतां येतील असें मला वाटतें.

## ( २ ) वस्तु-प्रदर्शन.

चालूं सालीं मी ऐतिहासिक दर्शनीय वस्तु संपादन करण्याकडे हि थोडेंसें लक्ष दिलें. त्याचें फल काय मिळालें तें आतां निवेदन करितों.

वाळव्या सारख्या जुनाट व ऐतिहासिक गांवामध्यें ताम्रपट, चित्रें, नाणीं, हत्यारें वगैरे नाना प्रकारच्या वस्तु लोकसंग्रहास असलेल्या दिसतात. त्या थोड्याशा श्रमानें व अल्प व्ययानें सहज मिळवितां येतात. चालूं वर्षीं मिळालेल्या असल्या वस्तूंस वर्णन एणें प्रमाणें--

नाणीं-वाळव्यास रा. अनंत शिवराम देशपांडे यांचेकडून श्रीशिवाजी महाराजांचा जरिपटका रुपाया ( ? ) आणि आदिलशाही व निजामशाही रुपये मिळाले. विद्यार्थी वर्गाकडून शिवराई तांब्याचीं नाणीं मिळालीं. विद्यार्थी रंगनाथ रामचंद्र कुलकर्णी यांचेकडून ब्राह्मणी राज्यांतील रुपाया व शहाअलमबादशहाचा रुपाया असे दोन रुपये मिळाले. वाळव्यास तोडकर उपनांवाच्या गृहस्थांचे घरीं १५० वर अलमगिरी रुपये आहेत व त्यांपैकीं बारा रुपये मंडळाकरितां मिळविले आहेत. शिवाय आणखी कांहीं मुसलमानी तांब्याचीं नाणीं मिळालीं आहेत.

शस्त्रास्त्रें-- ( १ ) ढाल-- वाळवें रा. वासुदेव अनंत देशपांडे यांचे कडून मिळाली.

( २ ) वाघनखें- वाळव्यास मिळालीं.<br>
( ३ ) तोफेचे गोळे- } हीं मिलवडीस मिळाले<br>
व - } लीं<br>
( ४ ) नकल तोफ- }

( ५ ) कांचे-वरील रंगीत चित्र-अनंत वासुदेव देशपांडे यांचे संग्रहांतुन मिळाले.

ह्या वस्तूंचा युद्धकार्यांत उपयोग काय तें प्रसिद्ध आहे. या इतिहासप्रसिद्ध शस्त्रांचें दर्शन आपणांस कौतुकावह वाटेल, यांत शंका नाहीं. तोफेचे गोळे जे आपले पुढें प्रदर्शनार्थ मांडण्यांत आले आहेत ते पाहून पूर्व काळच्या अवजड तोफांची आपणास

चांगली कल्पना येईल. ' नकल तोफ ' जी प्रदर्शनांत मांडण्यांत आली आहे तशा तोफा पूर्वी मुलांस खेळण्यास देत असत असें दिसतें. मुलांना अशीं खेळणीं खेळण्यास देऊन लहानपणापासून च त्यांना लष्करी शिक्षणाचें बाळकडू पाजण्यांत येत असावें असें वाटतें.

## ( ३ ) कार्य-प्रसार

देशाची उन्नति करण्याकरितां कार्यकर्ते धुरीण शहरांत चांगल्या उपयुक्त संस्था स्थापन करून तद्वारा देशोन्नतीस उचित अशा कार्यास आरंभ करितात. परंतु त्या कार्याची माहिती खेड्यांतील बहुजनसमाजास फारशी नसते त्यामुळें कार्य जसें रंगारूपास यावें असें आपणांस वाटतें तसें येत नाहीं. यास उदाहरणः–आपल्या भा. इ. सं. मंडळाचें च घ्याना. या संस्थेचें ध्येय उच्चतम असून कार्य अतिशय महत्त्वाचें आहे. संस्था आपले परी धिमेपणानें कां होईना चांगली कामगिरी बजावीत आहे. परंतु या पूर्वजोपासनेच्या महत्कार्याची माहिती देशांतील बहुजनसमाजास कितीशी आहे ? या आपल्या इतिहासप्रसिद्ध महाराष्ट्र देशांत इनामदार, जहागीरदार, व वृत्तिवंत लोक जे आपल्या पूर्वजांच्या पूर्व पुण्याईनें "सुखं च मे शयनं च मे " करीत पहुडले आहेत, असे बहुत आहेत. परंतु त्यांपैकीं किती जणांना आपल्या या कार्याची माहिती आहे ? त्यांपैकीं कितीसे लोक आपल्या कार्याशीं सहानुभूति बाळगितात ? आपल्या संस्थेनें आठ नऊ वर्षें पूर्वजोद्धाराचें पवित्र कार्य करून दाखविलें तेव्हां आतां कोठें पांचशें इतिहास प्रेमी व वाङ्मयानुरागी लोक संस्थेचें स्वागत करण्याकरितां पुढें येत आहेत. हा कार्यप्रसार दोन कोटी वस्तीच्या महाराष्ट्राच्या मानानें पुरेसा आहे असें कोण म्हणेल ? आपल्या या कार्याची ख्याति महाराष्ट्रांतील शहरोशहरीं व खडोखेडीं झाली पाहिजे. या हेतुनें प्रस्तुत लेखकानें आपल्या शक्तीप्रमाणें लोकजागृति करण्याचा आपले जिल्ह्यांत प्रयत्न केला आहे. कार्यप्रसार फक्त आपल्या महाराष्ट्रांत च झाला पाहिजे असें नाहीं. तर आपल्या संस्थेच्या व्यापक नामाभिधानाप्रमाणें तिनें आपल्या कार्याचा व्याप अखिल भारतवर्षभर पसरविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. भारतवर्षाच्या पंजाब, युक्तप्रांत बंगाल वगैरे उपदेशांमध्यें तत्प्रांतीय लोकांनीं काढलेल्या इतिहासमंडळ्या आहेत. त्यांच्याशीं आपण स्नेह व सहकारिता केली पाहिजे. या बाबतींत आपण अल्प प्रयत्न करावा म्हणून प्रस्तुत लेखकानें बंगाल्यांतील समसामयिकभारतकार्यालय, वंगीय साहित्यपरिषद्, वंगीय–मुसलमान–साहित्यसमिति, चट्टग्राम–नेतत्त्व– उद्घाटन–समिति प्रभृति संस्थांना व युक्त प्रांतांतील नागरीप्रचारणीसभा, साहित्य–परिषद् वगैरे वाङ्मयोत्तेजक सभांना आपल्या संस्थेच्या कार्याविषयीं माहिती दिली होती तेव्हां त्यांचेकडून आपल्या कामाबद्दल गौरवपूर्वक अभिनंदनपर संदेश आले होते हें कळविण्यास मला आनंद वाटतो.

शिकंदरलाल आतार.

# बाळाजी विश्वनाथासंबंधीं आणखी कांहीं पत्रें

१. अंबाजी त्र्यंबक पुरंदरे यांचे वडील बंधु तुको त्र्यंबक यांचे वंशज श्री. रा. मल्हारराव चिमणराव ऊर्फ दादासाहेब पुरंदरे मूर्तीमोढवेकर यांच्या संग्रहांतून खालील पत्रें मिळविलीं आहेत. पत्रें येणें प्रमाणें :--

( अस्सल मोडी ) ले. १

श्री उमाकांत
पदांभोज भजनाप्त
समुन्नतेः ॥ बाळाजी
वीश्वनाथस्य मुद्रा
विजयते तरां

रोख सरसुभा प्रांत पुणें ता। मोकादम कसबे सासवड सु॥ मया अलफ कसबे सुपाचे वांणी सरसुभा ऐवजाबद्दल आणिले होते त्यास याकडे रुपये ३०० तिनसे येणे त्यास तुम्ही जमान राहिले आहां तर देखत रोखा सदरहू रसद रु॥ पाठवणें या कामास सिपाई सुंभा शंकरराव पा। असे रु॥

८ सरनोजी राजपुरे
६ भीवराव
६ संभाजी गायकवाड

२०

एक वीस रु॥ देविले असे सदरहू तिनसे रुपयापैकीं आदा करणे बाकी रसद पाठवणे

जिल्हेज

मोर्तब सुद

मोर्तब
सुद

ले. २ श्री.

श्री उमाकांत
पदांभोज भजनाप्त
समुन्नतेः ॥ बाळाजी
वीश्वनाथस्य मुद्रा
विजयते तरां

अज स्वारी राजश्री बाळाजी विश्वनाथ दि॥ राजश्री सेनापती ता। मोकादमानी कसबा सासवड प्रा। पुणें सुरु सलास मया आलफ कसब मजकूर पैकी घासदाणा स्वार दि॥ स्वारी मजकूर देणे

| रु॥ | दाणा | बकरे |
|---|---|---|
| ४० | ०॥०० | १ |

एकून रु. चालीस दाणा दाहा मण रास आदा करणे
छ ७ म हरम

मोर्तब
सुद

---

ले. ३ श्री.

यादी बाळाजी वीश्वनाथ याणी जाधवराव
याजपासी राहून चाकरी केली त्याप्रों कागद

१ आनाम देशमुख व देशपांडे यांस सन मया व आ ११०९
१ देशमुख का। सासवड सन मया व अलफ ११०९
१ आनामं देशमुख का। सासवड सन इहिदे मया व १११०
१ आंबाजी त्र्यंबक यांस इहिदे मया अलफ १११०
१ सरसुभ्याचे नावाचा का। सासवड सन इसने म. अलफ ११११
१ आनाम देशमुख सासवड सन इसने मया अलफ ११११
१ आनाम देशमुख व देशपांडे इसने मया व अलफ ११११
१ सोनजी जगथाप यांस सन समस मया १११४
६ प्रत कागद सुमारी
१४

प्रधान जाल्याचे दाखले

१ तुळाजी थोरात याचे नावे सन आर्बा आशर मया आलफ ११२३
१ माहादाजी बोबदेव याचे नावे ११२३
६ किरकोळ हातचिठ्या सुमारी

८

२. वरील पत्रांपैकीं लेखांक १ चें पत्र मया अलफ मधील असून ते पुणें प्रांताचे सरसुभेदारांकडून गेलेलें आहे. सद्रहू रोख्यावर सिक्का बाळाजी विश्वनाथांचा आहे. लेखांक २ चें पत्र छ ७ मोहरम सलास मया अलफचें असून, तें बाळाजी विश्वनाथ दि॥ राजश्री सेनापती यांजकडून गेलें, असें लिहिलें आहे. लेखांक ३ च्या यादींत बाळाजी विश्वनाथ हे सेनापती जाधवराव यांजपाशीं चाकरीस राहिले असतां कोणकोणत्या सालीं त्यांनीं सासवडच्या देशमुखांस वगैरे रोखे लिहिले त्याची याद सालासह दिलेली आहे. यावरून बाळाजी विश्वनाथ हे पुण्याचे सरसुभेदारीनंतर सेनापती जाधवराव यांचे दिमतीस होते, असें स्पष्ट होतें. इतकेंच नव्हे तर, बाळाजी विश्वनाथांच्या या हुद्याचा कायमचा निकाल होता. अशा दृष्टीनें हीं पत्रें फार महत्वाचीं आहेत.

३. बाळाजी विश्वनाथांविषयीं आतां कोठें माहिती मिळावयास लागली आहे. तर्क असा आहे कीं, पुरंधरे दफ्तर मिळाल्यास या संबंधानें नवीन माहिती मिळून, या अज्ञात कालावर बराच उजेड पडेल. तृतीय संमेलनप्रसंगीं बाळाजी विश्वनाथ सुभेदार यांजवर निबंध वाचण्यांत आल्यावर, सरसुभेदार बाळाजी विश्वनाथ हा च पेशव्यांचा मूळ कर्ता पुरूष कशावरून अशी,शंका निघाली; पुढें या हि शंकेचें निरसन थोरातांकडील एक पत्रानें होऊन, बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार म्ह० बाळाजी विश्वनाथ भट च होत, असें निश्चयानें ठरवितां आलें. लेखांक १ चें पत्र हि पुण्याचे सरसुभेदारीवर असतांना बाळाजीपंतनानांनीं लिहिलेलें आहे. त्यानंतर लेखांक २ चें पत्र जाधवराव सेनापती यांचे दिमतीस असतांना लिहिलेलें आहे. त्यावरील शिक्का व सरसुभेदारीवर असतांना शिक्का पाहिला असतां हा सर्व प्रकार उघड होतो. बाळाजी पंतांची नेमणूक सरसुभेदारीनंतर जाधवरावांकडे झांली यावरून त्यांजकडे या वेळीं मोठें च काम असले पाहिजे, यांत प्रत्यवाय नाहीं. कारण सरसुभेदारीच्या उदाहरणार्थ हल्लींच्या कमिशनरच्या हुद्यानंतर त्यांची जी बढती झाली ती बखरींत लिहिल्याप्रमाणें एकाद्या क्षुद्र कारकुनीचे जागेवर नसली पाहिजे, हें न लिहितां हि कळेल. येथें दि॥ जाधवराव याचा अर्थ त्यांचे हाताखालीं काम करणारा कार्यकर्ता कामगार असा घ्यावा, हें च युक्त दिसतें.

४ बाळाजी विश्वनाथांच्या कारकिर्दीसंबंधांत कालनिर्णयाच्या दृष्टीनें हा दुवा चांगलाच उठावदार रीतीनें बसतो. धुळ्याच्या इतिहास–ऐतिहासिक मासिकाच्या वर्ष २ रें, अंक २१ वा यांत रा. वि. का. राजवाडे यांनीं, जानो विश्वनाथ यावर एक टाचण प्रसिद्ध केलें असून. त्यांत 'जानो विश्वनाथ' हा शक १६२८ पर्यंत हयात

होता, असें दिसें आहे. या नवीन नवीन मिळणाऱ्या गोष्टीवरून थोरल्या बाळाजीच्या नानांच्या पूर्वचरित्रासंबंधानें व यांच्या घराण्यासंबंधानें माहिती मिळून, लोकांत बखरी वगैरेंनीं प्रचलित केलेले बरेच गैरसमज दूर होतील, असें वाटूं लागलें आहे. बाळाजी विश्वनाथ व पुरंधरे यांचेमधील ऋणानुबंधासंबंधीं प्रश्न हि असा च विचारार्ह आहे. त्याचा हि प्रपंच लवकर च करूं म्हणतों.

पां. न. पटवर्धन

## ब्राह्मणकालीन जातिभेद

मंत्र व ब्राह्मणें असे वेदाचे दोन भाग असून मंत्रांमध्यें ऋक्, यजुस्, सामन् व अथर्व अशा चार संहिता येतात. ब्राह्मणभाग म्हणजे ऐतरेय, तैत्तिरीय, शतपथ कौषीतकि, ताण्डय, लाट्यायन वगैरे ब्राह्मणें, ऐतरेय, तैत्तिरीय, कौषीतकि वगैरे आरण्यकें व उपनिषदें. वास्तविक ऋक् व सामन् किंवा ऋग्वेद असा एक भाग करून बाकीचे सर्व ग्रंथ ब्राह्मणात्मक आहेत असें समजण्यास कांहीं हरकत नाहीं. ऋक् व सामन् हे वस्तुतः एकच असून केवळ गानाकरतां सामन् हा निराळा वेद मानला आहे. अथर्व हा अगदीं अर्वाचिन वेद आहे व त्यांत ऋग्वेदांतला बरा च भाग जशाचा तसा च घेतला आहे, कांहींमध्यें फरक केलेला दिसतो व कांहीं आभिचारिक कर्मांकरितां नवीन पण ऋग्वेदाच्या धर्तीवर बनविलेला आहे. ब्राह्मणें म्हणजे यजुर्वेदाचा ब्राह्मणभाग, ऐतरेय, कौषीतकि, शतपथ, ताण्ड्य ब्राह्मणें यांत जातीसंबंधानें काय उल्लेख आहे तें शोधून काढणें हा ह्या निबंधाचा उद्देश आहे.

पुष्कळ वेळां असें प्रतिपादण्यांत येतें कीं, वेदकालीं जातिभेद मुळीं नव्हता. तो समाजांत फार मागाहून घुसडण्यांत आला. पण ह्या म्हणण्याला ब्राह्मणग्रंथांत तरी फारसा आधार नाहीं. जातिभेद हा ह्या ग्रंथांचा पाया असें म्हणण्यास मुळीं प्रत्यवाय नाहीं. ऋग्वेदांत जातिविषयक उल्लेख फक्त पुरुषसूक्तांत आढळतो. पण हें सूक्त फार अर्वाचीन असावें असें त्याच्या भाषेवरून व रचनेवरून दिसतें. आर्य व दस्यू असे मनुष्यांचे दोन भेद असून पञ्चजन हा शब्द वैदिक वाङ्मयांत बरे च वेळ आलेला आहे. हे पञ्चजन कोण ह्याविषयीं बरा च वाद आहे. ऐतरेय ब्राह्मणांत ( १३।७ ) देवैं, मनुष्य गन्धर्वाप्सरस्, सर्प व पितर हे पञ्चजन असें म्हटलें आहे. 'निषादपञ्चमाः चत्वारो वर्णाः' असा सायणभाष्य व इतर टीकाग्रंथांत अर्थ करण्यांत येतो. विश् म्हणजे प्रजा व ह्या प्रजेचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व निषाद असे पांच भाग. ऐतरेय-ब्राह्मण रचणाराला हे पञ्चजन कोण होते हें माहीत नसून त्यानें केवळ कल्पनेनें पञ्चजनांत पाहिजे ते ढकलून दिले ह्यावरून ऋग्वेद व ब्राह्मण ह्यांमध्यें बरा च काळ लोटला गेला असावा.

सायणाचाही अर्थ अगदीं बरोबर आहे असें म्हणतां येत नाहीं. एक दोन ठिकाणीं देवगंधर्वादिक व एके ठिकाणीं ऋत्विग्यजमान वगैरे असाही अर्थ केला आहे. हे पंचजन, अग्नि, इंद्र मित्र (कृष्टयः, क्षितयः, क्षितयो, मानुष्यः, चर्षणयः भूय, जात.) व अश्विन यांना आवडतात. ते अग्नीला भजतात. इन्द्र, अदिति, पंचजन ह्यांनीं माझें सुख वाढवावें, पंचजन माझ्या हौत्राचा स्वीकार करोत, एकदां तर आदिति माता पिता वगैरे असून पंचजन आहे असेंही म्हटलें आहे. 'पाञ्चजन्य ऋषिः, ह्या शब्दांवरून त्यांच्यामध्यें ऋषि सुद्धां उत्पन्न होत असें दिसते. 'पाञ्चजन्यया राया' ह्यानें त्यांची स्थिति चांगली असावी. तेव्हां हे पंचजन निषादपंचम चार वर्ण नसून पांच मोठाले मानवी संघ किंवा पांच राष्ट्रें असावीं असें वाटतें. अवेस्तांत 'कर्ष्वर' प्रांत किंवा द्वीप ह्या अर्थी शब्द आहे. सप्तद्वीपा वसुमती ह्या कर्ष्वरे असें अवेस्तांत म्हणतात. तेव्हां 'पाञ्चजन्यासु कृष्टिषु' ह्याचा पंचजनांचे प्रांत किंवा द्वीपें असाही अर्थ होईल. तेव्हां पंचजन हीं पांच राष्ट्रें किंवा मानवीसंघ असावेत असें मला वाटतें. ऋग्वेदांत पुरुषसूक्तांत च काय ते वैश्य व शूद्र हे शब्द [ यदु, तुर्वश द्रुह्यु, अनु, पुरु (ऋ०सं० १।१०८।८) ] आले आहेत व ते एकदांच. ह्यावरून चातुर्वर्ण्याची कल्पना ऋग्वेदकालीं नसावी. पुढील ग्रंथांत म्हणजे ब्राह्मणग्रंथांत त्यांचा वारंवार उल्लेख आहे. ही चातुवर्ण्यव्यवस्था समाजांत इतकी दृढ झाली होती कीं, तिचा देवांमध्येंसुद्धां शिरकाव झाला होता. इंद्र, वरुण, सोम, रुद्र, पर्जन्य, यम, मृत्यु, ईशान हे देवतांमधील क्षत्रिय; ८ वसु, ११ रुद्र, १२ आदित्य, विश्वेदेव मरुत् हे वैश्य; पूषा हा एकटाच शूद्र; अग्नि व बृहस्पति हे ब्राह्मण. ( शतपथब्रा० १४।४।२। २३-२५ ) ( मैत्रा० सं० १।१०।१३ ) ( ऐतरेय ब्रा० ३।४।५ ) 'ब्रह्मवैबृहस्पतिः क्षत्रमिन्द्रः' ( शतपथ० ९।३।२।१८ ) अथर्व, रथेष्ठ, वाष्र्ण 'क्षत्रं वा इन्द्रो विण्मरुतः' 'इन्द्रो वै देवतया क्षत्रियो भवति सोमो राज्येन राजन्यः' 'ब्रह्म वा अग्निः क्षत्रं सोमः' ( कौषीतकिब्राह्मण ९।५ ) अशीं वाक्यें पुष्कळ ठिकाणीं आढळतात. जनावरें, ऋतु, खाण्याचे पदार्थ, सामगान, छंद, सवनें, काल, वगैरेंवर ह्या व्यवस्थेचा जारीनें अंमल चालू होता.

'ब्रह्मैव वसन्तः । क्षत्रं ग्रीष्मो विडेव वर्षाः ( शतपथ० २।१।३।५ ); 'ब्रह्म वै पौर्णमासी क्षत्रममावास्या' ( कौषी० ४।८ ); 'ब्रह्म वै 'प्रातः सवनं क्षत्रं माध्यन्दिनं विट् तृतीयसवनं' ( कौषी० १६।४ ); 'क्षत्रं वा अन्वश्वो वैश्यं च शूद्रं चानु रासभो ब्राह्मणमजः' ( शतपथ० ६।३।५।१२ ); 'क्षत्रं वा अश्वो विडितरे पशवः' ( शत० १३।२।२।१५ ); 'व्याघ्रो वा आरण्यानां पशूनां क्षत्रं' ( ऐ० ब्रा० ३।७।२ );

'अथ यत्सुरा भवति क्षत्ररूपं तत्' ( ऐत० ब्रा० ३।७।४ ); 'अथ यद्दूर्वाः भवति क्षत्रं वा एतदोषधीनां' ( तसें च ) 'व्रीहय ओषधीनां क्षत्रं यवा ओषधीनां सेनान्यः' ( ऐत० ब्रा० ३९।२ ); 'ब्रह्माग्नेयः पुरोडाशः । क्षत्रमुपांशुवाजः । विड्डुत्तरः पुरोडाशः' ( शत० ११।२।३।१४-१६ )

'क्षत्रं वै पयो विट्सुरा' (शत० १२।३।४।८); 'क्षत्रं हिरण्यं विट् आयं' (शत० १३।२।२।१७ व १९); ब्राह्मण त्रिवृत्, राजन्य पञ्चदश, वैश्य सप्तदश, व शूद्र एकविंश स्तोम (ताण्ड्य महाब्राह्मण ३।१।६–११ ऐत० ब्रा० ३६।४); ब्रह्म रथन्तरसाम व क्षत्र बृहत्साम (ऐत० ब्रा० ३६।१); ब्रह्म वै गायत्री क्षत्रं त्रिष्टुप् (कौषी० ३।५).

ब्राह्मणांत चातुर्वर्ण्याचा उल्लेख फार वेळ येतो तितका पोटजाति किंवा संकरजाति ह्यांचा येत नाहीं. 'चत्वारो वै पुरुषा ब्राह्मणो राजन्यो वैश्यः शूद्रः (मैत्रा० सं० ४।४।६);

'जनेभ्यः। ब्रह्मराजन्याभ्यांशूद्राय चार्याय च' (वाज० सं० २६।२) पोट-जात किंवा संकरजात हिचा उल्लेख पहिल्यादां आधान म्हणजे अग्निहोत्र प्रकरणांत येतो. कोणच्या वर्णानें कोणच्या ऋतूंत अग्न्याधान करावें असें सांगतांना ब्राह्मणानें वसंतांत, राजन्यानें ग्रीष्मांत, व वैश्यानें शरदृतूंत असें मैत्रायणी संहितेंत सांगितलें आहे (मैत्रा० सं० १।६।९). वाज० सं० २।१।३।५ ह्यांत 'वैश्यो वर्षास्वादधीत' असें म्हटलें आहे. 'वर्षासुरथकारः' असें एका संहितेंत आढळतें व कात्यायनश्रौत-सूत्र ४।७।७ ह्यांतहि 'प्रवर्षः ::जापशुकामवैश्यरथकृताम्' असेंच म्हटलें आहे. हे रथकार संकरजातीचे म्हणजे बाप क्षत्रिय व आई वैश्य ह्यांच्यापासून माहिष्य व बाप वैश्य व आई शूद्रा ह्यांच्यापासून करिणी व माहिष्य व करिणी ह्यांच्यापासून रथकार असें कित्येकांचें म्हणणें आहे. कित्येक म्हणतात कीं, ही संकरजात नसून पहिल्या तीन वर्णांहून कांहींशी हीन पण स्वतंत्र जात आहे व ह्या लोकांना ऋग्वेदांत ऋभु अगर सौधन्वन अशी संज्ञा आहे. पुरुषमेधांत निरनिराळ्या देवतांना निरनिराळीं मनुष्यें बली द्यावयाचीं असतात. त्यांत पुष्कळ जातींचा म्हणजे सुतार, लोहार, कुंभार, बुरूड, दोऱ्या वळणारे, परीट, रंगारी, निरनिराळ्या ठिकाणीं मासे पकडणारे कोळी, मोळीवाले, भंडारा, तिरकमठा तीर व धनुष्याच्या दोऱ्या करणारे, घोडे राखणारे, गुराखी, धनगर, वाजंत्री, अरण्यपाळ, दरवान, सोनार, जव्हेरी, मोतीवाले, नट, गवयी, झांजवाले, कोल्हाटी अशा धंद्यावरून पडलेल्या कित्येक जातींचा निर्देश आहे. चंडाळ, खाटीक हे हि ह्यांत आले आहेत. आरंभीं चार जाति असल्या तरी जोंपर्यंत मनोविकार आहेत तोंपर्यंत चार च जाति राहणें अशक्य आहे. अनुलोम व प्रतिलोम अशा संकरजाति निघाल्याच पाहिजेत. जातिभेद एकदां अस्तित्वांत आला म्हणजे त्याचा पल्ला कोठपर्यंत जाईल याचा नियम नाहीं.

ब्राह्मणकाळीं जरी अनेक जाति अस्तित्वांत होत्या तरी चार च जातींचा वारंवार निर्देश केलेला दिसतो व ह्या चार जातींत परस्पर संबंध काय होता हें हि ठिकठिकाणीं स्पष्ट दिसून येतें. मुख्य दोन जाति व ह्या दोहोंत ब्राह्मण श्रेष्ठ हें जेथें तेथें दाखविण्याचा प्रयत्न. हें श्रेष्ठत्व इतरांना मानावें लागलें ह्याचें कारण ब्राह्मणांची विद्या.

हा ब्राह्मण कशावरून, ह्याचे आईबाप कोण, असा एके ठिकाणीं प्रश्न निघाला तेव्हां त्यांना सणसणीत उत्तर मिळालें कीं, आईबापांविषयीं प्रश्न कशाला? ह्याच्या ठिकाणीं विद्या आहे आणि ती कांहीं गुप्त नाहीं. बाप, आजा वगैरे सगळी ही विद्या. ह्यावरून तो ब्राह्मण ( काठक सं. ३०।१ ) जणूं काय ब्राह्मण आणि विद्या हे समानार्थक शब्द होऊन बसले होते व एक दुसऱ्याच्या बद्दल वापरण्याला पूर्ण मुभा होती. दुसरें कारण ब्राह्मणांची धर्मपरता व देवपूजेचा आडंबर. ब्राह्मणाच्या पांच देवता, अग्नि, सोम, सविता, बृहस्पति व सरस्वती. म्हणून च इतर जाति ब्राह्मणांची आज्ञा वंदन करितात. कारण इतरांच्या देवतापेक्षां ह्यांच्या देवता ज्यास्त ( मैत्रा० सं० ४।५।८ ). आपला आचार, आपली भाषा उत्तम ठेवण्याविषयीं ब्राह्मण फार काळजी घेत. प्रजापतीच्या आत्म्याच्या अर्ध्याभागांत शांतपणा व निम्मेपणा होता, दुसऱ्या अर्ध्यांत दांडगेपणा व दंडेलपणा होता. पहिल्या अर्धातून सोम निघाला व सोमापासून ब्राह्मण उत्पन्न झाले. दुसऱ्या अर्धापासून सुरा निघाली व तिजपासून क्षत्रिय उत्पन्न झाले. ह्या सुरेचा इतका कांहीं वाईट परिणाम आहे कीं, ती प्यायल्यानें लहान मोठे, सास्वा सुना आपसाआपसांत भांडावयास लागतात. कारण दारूंत दंडेली, उपमर्द आहे हें सांगितलें च आहे. म्हणून ब्राह्मणांनीं सुरापान करूं नये ( मैत्रा० सं० २।४।२ ) देवांनीं असुरांची ( संस्कृत ) वाणी हिरावून घेतल्यामुळें ते वेडेंवांकडें बोलूं लागले व त्यांचा त्यामुळें ऱ्हास झाला; म्हणून ब्राह्मणांनीं वेडेंवाकडें बोलूं नये ( शतपथ ब्रा० ३।२।१।२४ ). बापानें जेव्हां शुनःशेपाला विकलें व पैशाकरितां त्याला ठार करावयास सुद्धां तो तयार झाला तेव्हां शुनःशेपानें देवांची विनवणी करून आपले प्राण वांचविले व विश्वामित्रानें आपला हा ज्येष्ठ मुलगा म्हणून आपल्या मुलांस सांगून त्याचा स्वीकार केला. तेव्हां लाजेनें व प्रेमानें परत ये म्हणून बाप मुलास म्हणूं लागला. पण मुलानें परत येण्याचें साफ नाकारलें. ' तुझा माझा समेट पुन्हां कसा होणार ? तरवार घेऊन तूं मला मारावयाला आलास; शूद्राप्रमाणें तूं आचरण केलेंस ' ह्यावरून ब्राह्मणाचें आचरण नेहमीं उदात्त, दयायुक्त असावें असें ठरून गेलें होतें. आपलें श्रेष्ठत्व कायम ठेवण्याकरितां आपले मंत्र निराळे, आपलीं पेयें निराळीं, अशी त्यांनीं खबरदारी घेतली होती. अग्न्याधानांत ब्राह्मणांनीं ' भृगुणां त्वाङ्गिरसां० ' किंवा ' आदित्यानांत्वादेवानां० ' असा मंत्र म्हणावयाचा, तर राजांनीं ' वरुणस्य त्वा राज्ञः० ' व इतर क्षत्रियांना ' इन्द्रस्यत्वेन्द्रियेण ' हे मंत्र म्हणावयाचे ( तैत्ति० ब्रा० १।१।४ ). वाजपेयांत यजमानानें रथाच्या चाकावर पाय द्यावयाचा असतो. तेव्हां ब्राह्मण यजमानानें ' बृहस्पतेरुत्तमं नाकं रुहेयं ' व क्षत्रियानें ' इन्द्रस्योत्तमं नाकं रुहेयं ' असें मंत्र म्हटलें पाहिजेत ( शत० ब्रा० ५।१।५।२-३ ), इंद्रानें त्वष्ट्याच्या मुलाला ठार मारलें म्हणून त्वष्ट्यानें त्याला यज्ञास बोलाविलें नाहीं. इंद्र तिथें येऊन चोरून इतका सोम प्यायला कीं, त्याच्या सर्वांगांतून तो पाझरूं लागला व त्याला फार कष्ट भोगावे लागले.

त्यानें इतर आणखीं पापें केलीं होतीं म्हणून सोमपानास त्याला मुकावें लागलें (मैत्रा० सं० २।४।१ ) पुन्हां पराक्रम करून त्यानें सोमपान मिळविलें. परंतु इंद्राच्या दुष्कृत्यानें क्षत्रिय सोमपानाला एकदांचे मुकले ते मुकले ( ऐत० ब्रा० ३५।२ ). सोम हा ब्राह्मणांचा, दही वैश्यांचें व पाणी शूद्रांचें पेय. तेव्हां क्षत्रियांना योग्य पेय म्हणजे उंबर, पिंपळ किंवा पिंपरी ह्यांच्या फळांचा व वडाच्या मुळांचा व फळांचा रस. ह्या झाडांचा महिमा काय सांगावा ! वड हा झाडांमधील क्षत्रिय, उंबर हें अन्न च कारण त्याची अन्नरसापासून उत्पत्ति. पिंपळ ( अश्वत्थ ) हा तेजापासून उत्पन्न झाला, त्यामुळें साम्राज्यप्राप्ति व पिंपरी ( प्लक्ष ) हें झाड यशापासून झाल्यामुळें साम्राज्य व वैराज्य हीं दोन्हीं मिळावयाचीं. एकदां सोमचमस उपडे ठेऊन देव स्वर्गाला निघून गेले. त्या चमसांना मुळें फुटून त्यांचे वटवृक्ष बनले व त्यांचीं पाळेमुळें फार खोल गेलीं. तेव्हां त्यांच्यामध्यें सोमाचे गुण असून क्षत्रियाचे हि गुण आहेत ( ऐ० ब्रा० ३५।४ ). सोम ब्राह्मणांचें पेय, तें प्यायल्यानें क्षत्रियांचे मुलगे ब्राह्मणासारखे म्हणजे दक्षिणा घेणारे, सोम पाजणारे, व भिक्षा मागणारे, त्यांना कोणी हि हाकलून द्यावे असे निपजतील व दोन तीन पिढ्या सोमपानाचा असा च क्रम चालेल तर सगळे ब्राह्मण च होतील व ब्राह्मणांची दीनवृत्ति पत्करतील ( ऐ० ब्रा० ३५।३ ).

क्षत्रियांचें योग्य जें पेय त्याचा अभिमर्शन आप्यायनादि संस्कार सोमाप्रमाणें च झाला पाहिजे व सोम विकत घेण्याच्या आधीं हीं फळें व मुळें आणून ठेविलीं पाहिजेत. त्या रसाचें भक्षण सोम ह्या नांवानें च व सोममंत्रांनीं च व्हावयाचें. सोम प्यायल्याप्रमाणें च पिणारानें छातीवर किंवा पोटावर हात फिरवून संतोष दाखवावयाचा. न दाखविल्यास आयुष्य कमी झालें च पाहिजे. जनमेजयादि हा भक्ष खाऊन महाराज झाले. इतकें याचें सामर्थ्य ! राजसूयांत राजाला अभिषेक होतो व सिंहासनावर बसविण्याचा विधि आटोपल्यावर त्याच्या हातांत सुराकंस द्यावयाचा असतो. त्यावेळेस सुद्धां म्हणावयाचे मंत्र सोमाचे. ही सुरा आहे, सोम नाहीं असा मात्र मंत्र त्याच्याकडून म्हणवावयाचा. शेवटीं ब्रह्मणे नमः असें तीनदां म्हटलें पाहिजे. कारण ब्राह्मणानें क्षत्रियाचे ताब्यांत राहिलें च पाहिजे. अभिषेकाचे आधीं माझ्याशीं वाईट रीतीनें वागलास तर जन्मल्यापासून मरेपर्यंत जीं पुण्यकर्में तूं केलीं असशील व करशील, तुझें सुख, तुझी प्रजा ह्या सर्वांचा नायनाट होईल अशी राजाला शपथ दिली जात असे ( ऐ० ब्रा० ३९।१ ). जनंतयाचा मुलगा अत्यराति हा सात्यहव्याशीं बेइमानपणें वागला त्यामुळें शापानें त्याचें वीर्य जाऊन शिबिवंशज शुष्मी ह्यानें त्याला सहज जिंकले, तशी तुझी अवस्था होईल असें राजाला बजावलें जाई. ( ऐ० ब्रा० ४०।९ )

वाजपेय हा ब्राह्मणांचा यज्ञ व राजसूय क्षत्रियाचा. वाजपेय राजसूयाहून श्रेष्ठ, कारण राजसूयानें फक्त राजा च होतो पण वाजपेयानें साम्राज्य मिळतें हें कोणी हि कबूल करील. क्षत्रियानें वाजपेय करूं नये. करावयाचा निश्चय च झाल्यास

आधी राजसूय करून मग वाजपेय करावा, नाहीतर सान्त्र ज्यावरून राजपदाला म्हणजे वरून खालीं येण्यासारखेंच होईल. ( शत० ब्रा० ५।१।१।११–१४ ).

ब्राह्मणकृत वाजपेयांत क्षत्रिय व वैश्य हजर असल्यास ब्राह्मणांप्रमाणें त्यांना मधुग्रह ( सोमग्रह ) दिला जाई. पण मधुग्रह हा ब्राह्मणांनाच योग्य अशी समजूत झाल्यामुळें किंवा आपण व इतर जाति ह्यांच्यामध्यें कांहीं फरक अवश्य असावेत असें वाटल्यामुळें क्षत्रिय व वैश्य ह्यांच्या हातांत ते ग्रह देत; पण लगेच सुराग्रह देऊन तो मधुग्रह विकत घेत म्हणजे परत घेत व तो सुवर्णपात्रासगट ब्राह्मणाला देत. कारण सुरा ही तम (खोटें) ती वैश्यालाच योग्य ( शत० ब्रा० ५।१।५।२८ ). येथें क्षत्रियाचें नांव मुद्दाम गाळलें आहे. असें वाटतें.

क्षत्रियानें यज्ञ केला तर ब्राह्मण यजमानाप्रमाणें त्याला हि यजमान म्हणजे सोमभक्ष मिळावयास पाहिजे पण सोमभक्ष ब्राह्मणाचा. तेव्हां युक्ति काय ? सोम प्यायला तर पाप लागेल. न प्यायला तर यज्ञफळाला अंतरेल. म्हणून यजमानभाग ब्रह्मयाला द्यावा. कारण ब्रह्मा हा पुरोहित व पुरोहित हा क्षत्रियाचा अर्धात्मा. ब्रह्मा हा प्रत्यक्ष यज्ञ. ब्रह्मयाचें ठायीं यज्ञ व यज्ञाचे ठायीं यजमान. तेव्हां हा भक्ष, पाण्यांत जसें पाणी किंवा अग्नींत अग्नि, तसा योग्य ठिकाणीं जातो व त्यानें दोन्ही हि दोष टळतात. कोणी म्हणतात यजमान भाग अग्नींत द्यावा. पण तसें करूं नये. यजमान-भाग अग्नींत टाकणें म्हणजे यजमानालाच टाकणें होय. असें करण्यानें यजमान मरेल. म्हणून तसा विचार च करूं नये ( ऐ० ब्रा० ३४।८ ).

अश्वमेधांत वीणागान दोघांनीं करावयाचें असतें. जर दोन्ही गाणारे ब्राह्मण असतील तर राजाचें क्षत्रियत्व नाहीसें होईल. कारण ब्राह्मण म्हणजे ब्रह्माचा अवतार; क्षत्रियाला ब्रह्म आवडत नाहीं. दोन्ही क्षत्रिय असतील तर राजाला ब्रह्मवर्चस गमावयाला लागेल. कारण क्षत्राला ब्रह्मवर्चसाची गोडी नाहीं. म्हणून ब्राह्मण व क्षत्रिय असे दोन असावेत. त्यामुळें त्याच्या सत्तेला दोघेजण सांवरून धरतात. दोघांनींही दिवसा किंवा दोघांनीं हि रात्रीं गान करावें असेंही उपयोगी नाहीं. दिवसाच गान झालें तर लक्ष्मी जाईल, रात्रींच झालें तर ब्रह्मवर्चस जाईल. म्हणून एकानें म्हणजे ब्राह्मणानें दिवसा गावें. कारण दिवस हें ब्राह्मणाचें रूप. क्षत्रियाचें रूप म्हणून त्यानें रात्रीं गावें. गाण्यांत 'यज्ञ केला, दक्षिणा दिली' असे शब्द ब्राह्मणानें आणावेत. 'लढला: ही लढाई जिंकली, ती लढाई जिंकली' असें शब्द क्षत्रियानें ( शत० ब्रा० १३।१।५।१–५ ).

प्रजापतीनें दोन प्रकारच्या प्रजा निर्माण केल्या–अग्नींत ज्या पदार्थांची आहुति देतात ते पदार्थ खाणारे हुताद. हे हुताद म्हणजे ब्राह्मण. हुतपदार्थ खेरीज करून बाकीचे पदार्थ खाणारे ते अहुताद–म्हणजे क्षत्रिय, वैश्य व शूद्र ( ऐ० ब्रा० ३४।१ ).

यज्ञक्रिया व पौरोहित्य ही ब्राह्मणांकडेच रहावीं अशी सारखी खटपट. एकदां यज्ञ रागावून निघून गेला. त्याला परत आणण्याला ब्राह्मण व क्षत्रिय दोघेही पाठोपाठ गेले. घोड्याचा रथ, कवच, धनुष्य, बाण ह्यांना भिऊन क्षत्रियापासून यज्ञ दूर दूर जाऊं लागला. तेव्हां क्षत्रियाला यज्ञ मिळत नाहीं म्हणून परतावें लागलें. तीच ब्राह्मणाचीं आयुधें पाहून यज्ञ परतला. कारण हीं आपलींच आयुधें असें त्यानें ओळखलें. तीं आयुधें म्हणजे खापरें, सूप, कृष्णाजिन, उखळ व मुसळ वगैरे. यज्ञ परत आल्याचें ऐकून क्षत्रिय मला यज्ञांत घे म्हणून यज्ञाला म्हणूं लागला. आपलीं आयुधें टाकून ब्राह्मणाचीं घे म्हणजे ब्राह्मण हो असें यज्ञ म्हणाला व त्याला क्षत्रिय कबूल झाला (ऐ० ब्रा० ३४।२). क्षत्रिय यजमानाला इतर यजमानांप्रमाणेंच देवयजनाकरितां (यज्ञास योग्य जागे करितां,) याचना करावी लागे. दीक्षा घेतली कीं तो ब्राह्मणच होई (३४।४). दीक्षा घेतल्या बरोबर त्याचें क्षत्रिय तेज, वीर्य, आयुष्य, राज्य, यश इंद्रादि देवता घेऊन जात. जरी यज्ञाकरितां मी ब्राह्मण झालों आहें तरी माझें क्षात्रतेज वगैरे देवतांनीं घेऊं नये म्हणून त्यास प्रार्थना करावी लागे व हें तेज वगैरे त्याचे त्याजचजवळ राही. यज्ञसमाप्तीनंतर अग्न्यादि देवतांनीं त्याला जें तेज वगैरे उसनवार दिलें असेल तें त्या परत घ्यावयाला लागत; पण पुन्हां प्रार्थना करून ही नवीन संपत्ति त्याला कायम ठेवतां येई, याप्रमाणें त्याला दोन्ही संपत्तींचा लाभ मिळे (ऐ. ब्रा. ३४।५–६). ब्राह्मणयजमानाप्रमाणें क्षत्रिययजमानानें दीक्षा घेतली असें जाहीर करण्यांत येई तेव्हां 'ब्राह्मणानें दीक्षा घेतली' असेंच जाहीर केलें जाई. दीक्षेनें यज्ञ प्राप्ति ह्याला झाली त्यामुळें हा महावीर झाला. देवांनो, तुमच्यापैकीं हा झाला. तेव्हां त्याचें रक्षण करा असा डंकेने सांगण्याचा हेतु. यज्ञ करण्याच्या अगोदर ह्याचा जन्म न झाल्या सारखाच. तेव्हां हा राक्षसपुत्र होता. आतां यज्ञापासून, ब्राह्मणापासून जन्मला. हा ह्याचा खरा जन्म. म्हणून ब्राह्मणेतर यजमानालासुद्धां ब्राह्मण असेंच म्हटलें पाहिजे (शत० ब्रा० ३।२।१ ४०). ह्या निवेदनांत ब्राह्मणाचे स्वतःचे प्रवर कथन करण्यांत येत, परंतु क्षत्रियविषयीं बोलतांना पुरोहिताचेच प्रवर सांगितले पाहिजेत असा सक्त नियम होता. का तर त्यानें आपलीं स्वतःचीं आयुधें टाकून ब्राह्मणाचीं आयुधें उचललीं (३४।७). इतकें झालें तरी सोमभाग त्याला मिळावयाचा नाहीं ता नाहींच.

ज्या राजापाशीं पुरोहित नसेल त्याचें अन्न देव खात नाहींत. तेव्हां यज्ञ करूं इच्छिणाऱ्या राजानें कोण्या तरी ब्राह्मणाला पुरोहित करावें. पुरोहित संपादन केल्यानें स्वर्गास नेणारे अग्नीच तो संपादन करतो. सर्व अग्नि तृप्त होऊन त्याला स्वर्गाला नेतात. त्याचें क्षात्रतेज, बल, वीर्य व राष्ट्र वाढतें. पुरोहित नसेल तर हें सर्व नष्ट होतें व त्याला स्वर्गातून हाकलून लावतात. पुरोहिताच्या वाणींत पायांत, कातडींत, हृदयांत व आणखी एके ठिकाणीं असे पांच क्रोधाग्नि असतात. या बसा म्हणण्यानें, पायानें, वस्त्रांनीं व अलंकारांनीं, धनानें व राजवाड्यांत ऐद-

आरामांत राहूं दिल्यानें हे अग्नि शांत होतात ( ४।०।१ ) व त्याच्या राजाला चळकटी येऊन सर्व त्याच्या ताब्यांत राहतात ( ४।०।२ ). बृहस्पति जसा देवांचा पुरोहित, तसे मानवी राजाचे ब्राह्मण पुरोहित. पुरोहित म्हणण्याचें कारण तो राजाच्या नेहमीं अग्र-भागीं असतो. पृथिवी, अंतरिक्ष व स्वर्ग ह्यांचे पुरोहित अनुक्रमें अग्नि, वायु व आदित्य व पुरोहिताला पौरोहित्य द्यावयाच्या वेळचा मंत्र 'अमोऽहमस्मि स त्वं स त्वमस्यमोऽहं द्यौरहं पृथिवी त्वं सामाहमृक्त्वं तनूरसि तन्वं मे पाहि' तूं स्वर्ग मी पृथिवी, तूं साम, मी ऋक्, तूं माझें शरीर, माझ्या शरीराचें रक्षण कर. ब्राह्मणग्रंथांत ऋक् बायको व साम नवरा अशी भाषा वापरण्यांत येते. तसा तुझा व माझा संबंध नवराबायकोसारखा. यांत स्वर्ग कोण, पृथिवी कोण, साम कोण व ऋक् कोण हें मुग्ध ठेविलें आहे. राजानें पुरोहिताचे पाय धुवावयाचे असतात व 'ह्या राष्ट्रांत मी ही संपत्ति घालतों' असें पुरोहित म्हणतो ह्यावरून पुरोहित नवरा व राजा बायको असें ध्वनित करण्याचा हेतु असेल(४।०।४). आश्वलायनगृह्यसूत्रांत विवाहाचे वेळीं वर वधूला म्हणतो 'अमोहमस्मि सा त्वं सा त्वमस्यमोहं द्यौरहं पृथिवी त्वं सामाहमृक्त्वं तावेह विवहावहै प्रजां प्रजनयावहै' ( १।७।६ ). परंतु पौरोहित्यमंत्रांत कोण कोणाला म्हणतो हें मोघम ठेविलें आहे. 'अर्धो ह्वा एष आत्मनो यज्जाया' ( शत० ब्रा० ) ह्याप्रमाणें 'अर्धात्मो ह वा एष क्षत्रियस्य यत्पुरोहितः' ( ऐ० ब्रा० ३४।८ ). तेव्हां पुरोहितानें कांहीं हेतूनें आपल्याकडे बायकोपणा घेतला असेल. दोघे एकजीव झाले, दोघांनीं एकमेकांचें रक्षण करावें हा हेतु. एकदां पुरोहित निवडला कीं तो कायमचा. त्याला हुसकावून दुसऱ्याला निवडलें कीं आलें भांडण. 'अग्निर्हि ब्रह्म लोहः क्षुरो ब्रह्मणो रूपं' ( शत० ब्रा० ३।६।४।५ ) ब्राह्मण म्हणजे केवळ आग, पोलादी सुरा, त्याला कोपवून चालावयाचें नाहीं. कदाचित् क्षत्रियावाचून ब्राह्मणाचें चालेल, पण ब्राह्मणावांचून क्षत्रियाचें मुळीं च चालावयाचें नाहीं. मैत्रावरुणग्रहाच्या वेळीं शतपथ-ब्राह्मणांत ( ४।१।४।१-६ ) म्हटलें आहे कीं 'मित्र म्हणजे ब्राह्मण व वरुण म्हणजे क्षत्र; ब्रह्म ज्ञाता क्षत्र कर्ता. एकदां मित्रग्रह व वरुणग्रह ह्यांनीं वेगळें व्हावयाचें ठरविलें. वरुणावांचून मित्राचें चाललें परंतु वरुणाचें मित्रावांचून चालेना. मित्राचें ज्यांत अंग नाहीं असें कोणचेंच कर्म सिद्धीस जाईना. तेव्हां मित्राला बोलावणें वरुणाला भाग पडलें. म्हणून मैत्रावरुणग्रह एक झाला. मित्र हा वरुणाचा पुरोहित. ब्राह्मणाला राजा मिळाला तर उत्तमच; नाहीं मिळाला तर अडावयाचें नाहीं. परंतु ब्राह्मणावाचून क्षत्रिय अशी स्थिति किती वेळ टिकणार! केवळ अशक्य. ब्राह्मणाच्या सल्ल्यानें केलेल्या कर्मालाच यश यावयाचें.' 'ब्रह्म खलु वै क्षत्रात्पूर्वं' ( ऐ० ब्रा० ३६।१ ) 'भूयानेव ब्राह्मणः क्षत्रियात्' ( ऐ० ब्रा० ३३।३ ). क्षत्रियाहून ब्राह्मण मोठा, ब्राह्मण आधीं, क्षत्रिय मागाहून, अशी समजूत लोकांमध्यें उत्पन्न केली गेली. ही समजूत इतकी ठाम होऊन गेली कीं, अजातशत्रूला वेदान्तविषयक प्रश्न विचारण्यास गार्ग्यब्राह्मण गेला व मला आत्म्याची ओळख नाहीं, मी तुझा शिष्य होतों, मला

आत्म्याची ओळख करून दे असें म्हणाला, तेव्हां राजा म्हणाला. 'ब्राह्मणानें क्षत्रियाचा शिष्य व्हावें! अगदीं उलट! माझा शिष्य होण्याची जरूर नाहीं. त्याशिवाय मी तुला आत्मज्ञान देतों.' (शत० ब्रा० १४।४।१।१५) एकदा याज्ञवल्क्यादि ब्राह्मण पुढें चालले होते; धांवत धांवत जाऊन जनकानें त्यांस गांठलें व तुम्ही अग्निहोत्र कसें करतां म्हणून प्रत्येकाला विचारलें. कोणी कांहीं, कोणी कांहीं अशीं भलतीं उत्तरें केलीं. तेव्हां ब्राह्मण म्हणाले, हा खूप च गमजा करतो आहे; ब्रह्मसंबंधीं प्रश्नांनीं याला चूप करूं या. (शत० ब्रा० ११।६।२।५) क्षत्रियाची वरचढ ब्राह्मणांना कशी सपणार! क्षत्रियाला ब्राह्मण शुद्ध करतो, तेव्हां ब्राह्मणापासून क्षत्रिय जन्मतो (शत० ब्रा० १२।३।४।१२). दीक्षित ब्राह्मण क्षत्रियधजाचें रक्षण करतात (३।६।२।१४). त्याला बलवान् करणें अगर न करणें ही त्यांच्या हातांतली गोष्ट; आहुतीमध्यें फेरबदल केला कीं, झालें काम (मैत्रा० सं० ४।६।८). प्रजा क्षत्रियाच्या ताब्यांत रहावी म्हणून क्षत्रियाबद्दलची आहुति पळ्यानीं व उभें राहून द्यावयाची व प्रजेबद्दलची बसून व हातानें (शत० ब्रा० ९।२।३।१६). क्षत्रियाला ताब्यांत ठेवण्याकरितां आपण देव आहोंत असें हि म्हणावयाला ब्राह्मण चुकले नाहींत. देव दोन प्रकारचे—एक ज्यांना आपण नेहमीं देव म्हणतों ते. पढित विद्वान् ब्राह्मण हे मनुष्यदेव. आहुतींनीं देवांना तृप्त केलें पाहिजे, दक्षिणा देऊन मनुष्यदेवांचें समाधान केलें पाहिजे. दोन्ही देव तृप्त होऊन यजमानाला सुस्थितींत ठेवतात (शत० ब्रा० २।२।२।६) व त्याला स्वर्गाला पोंचवितात (शत० ब्रा० ४।३।४।४).

आपलें वर्चस्व राखण्यासाठीं ब्राह्मणांना अशी खटपट करावी लागली व अशा युक्त्या लढवाव्या लागल्या. ते आपल्याला ओळखून होते. 'न वै ब्राह्मणो राज्यायालं' (शत० ब्रा० ५।१।१।१२) ब्राह्मण राज्य करण्याला अयोग्य. क्षत्रियाशिवाय आपण काय करणार! आपलें वीर्य वाणींत. 'ब्राह्मणो मुखतो हि वीर्यं करोति मुखतो हि सृष्टः' (ताण्ड्य. ब्रा. ६।१।६). 'बाहुवीर्यो राजन्यो बाहुभ्यो हि सृष्टः' (ताण्ड्य. ब्रा. ६।१।७) क्षत्रियाचा दंडांत जोर, तेव्हां त्याच्याशीं एकोप्यानेंच वागलें पाहिजे.. याकरितां ते जेव्हां तेव्हां क्षत्रियाची बढाई गात. 'एष वै प्रजापतेः प्रत्यक्षतमां यद्राजन्यस्तस्मादेकः सन्बहूनामीष्टे यद्वेव चतुरक्षरः प्रजापतिश्चतुरक्षरो राजन्यः' (शत. ब्रा. ५।१।५।१४) राजा हा प्रत्यक्ष प्रजापती; म्हणून एक असून पुष्कळांवर राज्य करतो; प्रजापतीच्या नावांत चार अक्षरें, राजन्य ह्या नांवातहीं चार. ऐन्द्राभिषेकानें राजा प्रत्यक्ष इन्द्र होतो. 'क्षत्रं वा इन्द्रः' (शत. ब्रा. ४।३।३।७). त्याला साम्राज्य मिळालें, स्वाराज्य मिळालें, वैराज्य मिळालें; हा खुद्द परमेष्ठी झाला; खरा क्षत्रिय झाला; सगळ्या विश्वाचा अधिपति, पुरंदर, असुरांना मारणारा, ब्राह्मण प्रतिपालक, धर्मरक्षक जन्माला आला अशा अभिषेकानंतर आरोळ्या ठोकीत (ऐ. ब्रा. ३८।१). पेढेला क्षत्रिय ब्राह्मणासारखाच, तो पाहुणा आला असतां

ब्राह्मणाप्रमाणें त्याच्याकरितां ही मोठा बैल किंवा बोकड मारावा व मधुपर्क करावा (शत. ब्रा. ३।३।५।२) असें ते म्हणत. कधीं कधीं क्षत्रियाहूनें आपला दर्जा खालचा अशी कबुली द्यावयालाही त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. 'क्षत्रियाहून श्रेष्ठ कोणी नाहीं, म्हणून राजसूयांत ब्राह्मण क्षत्रियाच्या खालीं बसतो. अशा नम्रतेनें क्षत्रियाला सर्व यश देतो; ब्रह्म हा क्षत्राचा योनि; म्हणून राजा किती जरी मोठा झाला तरी शेवटीं ब्राह्मणच त्याचा आधार म्हणून जो क्षत्रिय ब्राह्मणाला त्रास देतो तो स्वतःच्या उत्पत्तिस्थानालाच त्रास देतो; आपल्याहून श्रेष्ठाला त्रास देण्याचें पाप त्याला लागतें' (शत. ब्रा. १४।३।२।२३). पुरुषमेधांत क्षत्रिय यजमानानें जें काहीं राष्ट्रांत असेल तें दक्षिणा म्हणून दिलें पाहिजे; फक्त ब्राह्मणाचें धन व भूमि देतां येत नाहीं; पण यजमान ब्राह्मण असेल तर त्यानें हवें तें दान करावें; कारण 'सर्वं हि ब्राह्मणः' (शत. ब्रा. १३।६।२।१८–१९). 'ब्रह्मणि खलु वै क्षत्रं प्रतिष्ठितं क्षत्रे ब्रह्म' (ऐ. ब्रा. ३६।२) दोघे एकमेकांवर अवलंबून. दोघांनीं मिळून बाकीच्यांवर अंमल चालवावा, जगांत ज्या काहीं सुखोपयोगी वस्तु असतील त्या दोघांना मिळाव्या. 'यज्ञांत सर्व देवतांपेक्षां अग्नि व इन्द्र ह्यांना जसा पशूच्या शरीराचा मोठा भाग मिळतो तसें मनुष्यांमध्यें ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांना सर्वांहून ज्यास्त वस्तु भोगण्यास मिळतात' (मैत्रा. सं. ४।७।८). अशा रीतीनें कधीं क्षत्रियापेक्षां मोठे तर कधीं बरोबरीचे व वेळेला कमीही आपण आहोंत असें सांगून ब्राह्मणांनीं मोठमोठ्या दक्षिणा मिळविल्या एवढेंच नव्हे तर आपलें वर्चस्व कायम ठेविलें व लोकांच्या मनांत मान व दरारा उत्पन्न केला.

जेथें अशा प्रकारचें परस्परावलंबित्व, अशा प्रकारचें सख्य, डोकें व बाहू, बुद्धि व शौर्य ह्यांची जोडी तेथें इतर जातींचें काय चालणार ! वैश्याला यज्ञयागादि करण्याचा अधिकार होता तरी ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांच्याशीं टक्कर द्याव-याची त्याची प्राज्ञा नव्हती. पुरुषसूक्तांत वैश्य मांड्यांपासून झाला असें तेथें म्हटलें आहे (ऋ० सं० १०।९०।१२) पण ताण्ड्यब्राह्मणांत (६।१।१० ) ह्याही पेक्षां कमाल केली आहे. तो प्रजननापासून झाला असें तेथें म्हटलें आहे. ह्यामुळें च त्याचे-जवळ पुष्कळ जनावरें असतात. ब्राह्मणांचा व क्षत्रियांचा तो भक्ष. कारण ब्राह्मण मुखांतून व क्षत्रिय ऊर व दंड ह्यांतून जन्मल्यावर ह्याहून हि खालच्या भागांतून तो जन्मला. त्याला किती ही खाल्लें तरी तो कमी व्हावयाचा नाहीं. ऐ० ब्रा० ३८।१ राजसूयांत अभिषिक्त झालेल्या राजाला 'विशामत्ताजनि' प्रजाभक्षक जन्माला आला असें म्हटलें आहे. यज्ञांत दही वैश्याचें भक्ष. जर दही भक्षण करशील तर तुझी प्रजा वैश्यासारखी म्हणजे दुसऱ्याला कर देणारी, दुसऱ्याचें खाद्य, वाटेल त्यानें त्याला भेवडवावें व त्याचा अपमान करावा अशी निपजेल असें क्षत्रियांना ब्राह्मण सांगतात. (ऐ० ब्रा० ३५।३). पौरस्त्य राजपद्धतीचें हुबेहुब वर्णन आहे. गुळाचा खडा तेथें डोंगळे जमणारच. वैश्याला नेहमीं ताब्यांत ठेवलें पाहिजे. अग्निचितीमध्यें घोडा, गाढव व बकरा इकडून

तिकडे हिंडवतात. एकदां घोडा पुढें असतो व एकदा बकरा. बिचारें गाढव नेहमीं दोहों-मध्यें अडकलेलें. त्याला पुढारीपण कधींच मिळावयाचें नाहीं. अश्व हा घोडा, त्याच्या पाठीमागें इतर तीन जाति. ब्राह्मण हा बकरा, तेव्हां तो जेव्हां म्होरक्या तेव्हां त्याच्या पाठीमागें क्षत्रियादि तीन जाति. म्हणून ब्राह्मण व क्षत्रिय हे वैश्य किंवा शूद्र ह्यांच्या पाठीमागें कधीं नसतात. हे दोन्ही वर्ण ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांच्यामध्यें, दोघांनीं दोन्ही दिशांनीं पकडलेले पाहिजेत, मग जातात कोठें ! (शत० ब्रा० ६।३।५।१५). वैश्य हा गाढव, नेहमीं लादलेला. ब्रह्म व क्षत्र दोघे वैश्यावर अवलंबून, त्याच्यावांचून गत्यंतर नाहीं, तथापि वैश्य नेहमीं दबलेला (शत० ब्रा० ११।२।३।१६). वैश्याला जरबेंत कसा ठेवावयाचा हा प्रयत्न. अग्निष्टोमामध्यें मरुत्वतीयग्रह द्यावयाचा असतो. परंतु तो मरुत्वतीय असूनही इन्द्राय मरुत्वते असा दिला जातो 'मरुद्भ्यः' असा दिला तर महान् अनर्थ. 'मरुद्भ्यः' म्हटल्यानें वैश्य क्षत्रियाला डोईजड होतील, एखाद् वेळेस बंड करतील. म्हणून 'इन्द्राय मरुत्वते' असाच ग्रह दिला पाहिजे. व अशानें च वैश्य सांग-कामे ( कृतानुकर ) धोपटमार्गी ( अनुवर्त्मानं ) राहतात ( शत० ब्रा० ४।३।३।१० ). 'मरुद्भिः परिश्रीयस्व' ( शत० ब्रा० १४।१।३।२७ हे इंद्र तुझ्याभोवतीं नेहमी मरुत असोत. वैश्यांनीं क्षत्रियाला सर्वबाजूंनीं टेका दिला पाहिजे. अश्वमेधांत १७ पशु मारावयाचे असतात. अश्वसंबंधीं प्राजापत्य मंत्र असतो. इतरांचा नुसता देवसामान्यमंत्र असतो. कित्येक म्हणतात कीं ह्या सोळा पशूंच्याकरितां निरनिराळ्या देवतांचे मंत्र म्हणावेत. पण तसें करूं नये. हे पशु म्हणजे एक गोळाबेरीज. त्यांना साधारण च मंत्र योग्य. विशिष्ट मंत्रानें ते जोरावतील व त्रास देतील. हे इतर पशु म्हणजे वैश्य. अश्व म्हणजे राजा त्याच्या तांड्यांत ह्यांनीं राहिलें पाहिजे, तो करील तें केलें पाहिजे व तो सांगेल त्या मार्गानें गेलें पाहिजे ( शत० ब्रा० १३।२।२।१५ ). क्षत्र हा निरुक्त म्हणजे त्याला व्यक्तिवैशिष्ट्य आहे; वैश्य अनुनिरुक्त, त्यांना व्यक्तिवैशिष्ट्य कोठलें. ( शत० ब्रा० ९।२।३।१५ ) सगळीं मेंढरें ! वैश्वानरमारुत आहुति देतांना वैश्वानर म्हणजे क्षत्रिय ह्याची उभी राहून दिली पाहिजे, कारण क्षत्रिय नेहमी उभा तयार; मरुतांची बसून, कारण वैश्य नेहमीं काम करीत बसलेला. क्षत्र एक, वैश्य पुष्कळ; सगळ्यांचें ऐश्वर्य क्षत्रियांत एकवटलेलें ( शत० ब्रा० ९।२।३ १४।१५ ). वैश्य कमी दर्जाचे हें दाखविण्याकरितां तऱ्हतऱ्हेच्या व कांहीं चावटही कल्पना केल्या आहेत. वैश्य हे जवस व राष्ट्र म्हणजे राजा ही हरिण-हरिण जसें जवस खातें, तसें राष्ट्र वैश्याला खातें. राजा जनावरें पाळीत नाहीं. तें वैश्याचें काम. म्हणूनच वैश्य कधीं राजा होऊं शकत नाहीं. आर्याशीं व्यभिचार करणारी शूद्रा हिनें किती जरी पैसा मिळविला तरी स्वतःसाठीं थोडाच. तो तिजपाशीं कधीं राहत नाहीं. कोणीं तरी यजमान तो घेऊन जाणारच. जशी तिची धनावर मालकी नाहीं तशी वैश्याची. म्हणून वैशीपुत्र कधीं हि राजा होऊं शकत नाहीं ( शत० ब्रा० १३।२।९।८ ) अश्वमेधांत अश्वाला मारल्यावर त्याच्या अंगांत सुया रोवावयाच्या

असतात. ह्या स्रुचा म्हणजे यजमानाला स्वर्गास जाण्यासाठीं एक सेतु च. अश्वमेध हा राष्ट्र व स्रुचा प्रजा. त्यानें राजाला राष्ट्र व प्रजा दोन्ही हि मिळतात. ह्या च यज्ञांत राजाच्या राण्या व ऋत्विज एकमेकांशीं गलिच्छ भाषण करतात. वैश्य खोटें बोलतो, फसवतो. वैश्य म्हणजे स्त्रीलिंग, राष्ट्र हें पुंलिंग वगैरे वैश्यावर बळजबरी करण्याला केवढा श्रुतीचा आधार (शत० ब्रा० १३।२।३।७)। राजानें प्रजेला बेलाशक तुडवावें.

सोमाच्या ऐवजीं वैश्याला सुरा देतात त्याचें कारण तो खोटा, तमोगुणानें भरलेला, पापी म्हणून (शत० ब्रा० ५।१।५।२८) जशास तसें हा च न्याय.

जेथें वैश्याची ही दशा तेथें शूद्राला कोण विचारतो। पायांपासून उत्पत्ति. त्याला देवता नाहीं, यज्ञ नाहीं. अग्नि व ब्राह्मण मुखापासून, इन्द्र व क्षत्रिय ऊरः व बाहु ह्यांपासून, वैश्य व विश्वेदेव प्रजननापासून पण पायापासून फक्त शूद्रच, देवता नाहीं. म्हणून शूद्रानें इतर जातींचे पाय धुवावे. (ताण्ड्य ब्रा० ६।१।११) त्याचा भक्ष पाणी. जर पाणी भक्ष म्हणून घेशील तर तुझी प्रजा शूद्रासारखी होईल असें राजाला बजाविलें जाई. नेहमी इकडून तिकडे हेलपाटे घालावयाला लावावें, हवा त्यानें वाटेल तेव्हां गचांडी देऊन घालवावें, पाहिजे तर ताडन करावें किंवा ठार सुद्धां मारावें (ऐ० ब्रा० ३५।३). त्याला दान देण्याला, विकण्याला कांहीं हरकत नाहीं. ' पद्यु ह वा एतच्छ्मशानं यच्छूद्रः । तस्माच्छूद्रसमीपे नाध्येतव्यं ' (आप० श्रौ०) शूद्र हे चालतें बोलतें श्मशान; त्याला ऐकूं येईल इतकें जवळ अध्ययन करूं नये. जर मुद्दाम होऊन त्यानें श्रुति ऐकली तर त्याचे कानांत लाख किंवा कथील वितळवून ओतावें (कात्या० श्रौ० व आप० श्रौ०). अग्निहोत्रांतल्या गाईचें शूद्रानें दूध काढूं नये, कारण असत् पासून त्याचा जन्म (मैत्रा० सं० ४।१।३). शूद्रानें दूध काढल्यानें हवि अपवित्र होईल. शूद्रस्त्रीचें साधारण नांव 'रामा'; कां तर तिचा जन्म लोकांना विषयोपभोग मिळावा म्हणून (वसिष्ठ धर्मशास्त्रं १८।१८) पहिल्या अग्निचितीनंतर शूद्रस्त्रीशीं संबंध ठेवूं नये, दुसरी नंतर फक्त स्वतःच्याच स्त्रीशीं ठेवावा, तिसरी नंतर कोणाशीं च ठेवूं नये (काठक सं० २१।७) पूर्वी आदित्य मिळविण्याकरितां देवासुरांची झटापट झाली होती. तिची नक्कल महाव्रतामध्यें करावयाची असते. ब्राह्मण हा दैव्यवर्ण, शूद्र हा असुर्य. ब्राह्मण हा वेदीमध्यें व शूद्र वेदीच्या बाहेर असे उभे राहून एक वाटोळें चामडें हातांत धरून हिसकाहिसकी करतात. ब्राह्मण म्हणतो, ह्या यजमानांनीं उत्तम काम केलें म्हणून ह्यांना जेथें तेथें सिद्धि येते. शूद्र म्हणतो ह्यांनीं देश उध्वस्त केला, आम्हाला घालवून दिलें. ब्राह्मण स्तुति करून यजमानाचें पुण्य वाढवितो, शूद्र निंदा करून त्यांच्या वाईट कृतीपासून झालेल्या पापाचें निवारण करतो (तै० ब्रा० १।२।६) स्कॉटच्या 'लेडी ऑफ् धूलेक्' मध्यें रॉड्रिक् धू व फिट्झ् जेम्स ह्यांचा संवाद होतो. त्यास तुम्ही

असे दंगेधोपे लूटालूट कां करतां असें फिट्स जेम्स विचारतो. 'खालील सुपीक जमीन आमच्या मालकिची, आम्हाला तेथून हुसकावून ह्या डोंगरांत, घालवून देतां आणि विचारतां कीं लूटालूट कां करतां म्हणून असें रॉड्रिक धू उत्तर देतो. शूद्र हे ह्या देशाचे मूळचे रहिवासी. त्यांना जिंकून इतर तीन वर्णांनीं त्यांचा देश घेतला व त्यांना दास बनवून पार चिरडून टाकलें. 'उद्वासीकारिणः' असें इतर वर्णांना विशेषण दिलें आहे. अवेस्तांत फक्त तीन च वर्ण म्हणजे अथर्व, रथेष्ठ व वास्त्र्य असे आढळतात. पारशांचा शेजार सोडून जेव्हां आर्य हिंदुस्थानांत आले तेव्हां जितलोक शूद्र बनले, म्हणजे चवथा वर्ण अस्तित्वांत आला. नीग्रो, रेड इंडिअन् वगैरे जसे चिरडून टाकले होते तसे आज तीन चार हजार वर्षें शूद्र चिरडले जात आहेत व अलीकडे तर त्यांना अतिशूद्र ही संज्ञा मिळाली आहे. कारण वैश्यांपैकीं बरेच लोक अडाणी, अक्षरशत्रु बनले व संस्कारहीन झाले. त्यामुळें त्यांना शूद्र म्हणणें भाग पडलें. तेव्हां जितांना अतिशूद्र मालिकेंत जावें लागलें. दक्षिण आफ्रिकेंत आपल्याला (उच्च वर्णांच्या लोकांना) गुलामाप्रमाणें वागवितात, साहेबांना आपला विटाळ होतो ह्यांत नवल काय ! जित होणें ह्यासारखी शोचनीय स्थिति आणखी कोणची !

शूद्र पायापासून उत्पन्न झाले. मुख, बाहु, प्रजनन ह्यापासून जसे अग्नि, इंद्र व विश्वेदेव उत्पन्न झाले तसा पायापासून कोणचाही देव उत्पन्न झाला नाहीं. म्हणून शूद्राला देव नाहीं, यज्ञ नाहीं. त्यानें इतरांच्या पायाची नोकरी च केली पाहिजे. तथापि जित्यामध्येंही कांहीं प्रबल, सन्माननीय व कुशल पुरुष होऊन गेले असावेत. कांहींचे बाप उच्च वर्णाचे असल्यामुळें त्यांचा दर्जा समाजांत वाढला असावा. रथकार जरी आईच्या बाजूनें शूद्र तरी बापाच्या बाजूनें श्रेष्ठ मानले गेले व त्यांना वेदोक्त कर्मांचा अधिकार मिळाला. सोमयागांत दीक्षा घेतल्यावर ब्राह्मणयजमानानें दुधावर, क्षत्रियानें यवागूवर म्हणजे भाताच्या पेजेवर, वैश्यानें दही व दूध ह्यांच्या मिश्रणावर रहावें तसें शूद्रानें मस्तूवर म्हणजे दह्यांतल्या पाण्यावर रहावें असें श्रुति सांगते, असें कात्यायनश्रौतसूत्र ( १।१।५ ) ह्यावरील टीकेंत म्हटलें आहे. म्हणजे सोमयाग करण्याचा अधिकार शूद्रानें केव्हां तरी मिळविला असावा. दर्शपौर्णमासांत हवी तयार करणारा शूद्र असला तर ब्राह्मणाला 'यावें,' क्षत्रिय व वैश्य ह्यांना 'लवकर या' ज्याप्रमाणें म्हणतात त्याप्रमाणें शूद्राला 'धांव' म्हणून म्हणावें. (शत० ब्रा० १।१।४।१५) यावरून यज्ञमंडपांत येण्याला व हवी तयार करून द्यायला त्याला मज्जाव नव्हता. पितृमेधांत शूद्राचें सरण गुडघ्याइतकें उंच असावें (शत० ब्रा० १३।८।३।११) असें आहे. तेव्हां कांहीं शूद्रांना वैदिक कर्में करण्याचा अधिकार आरंभीं आरंभीं दिला असावा. 'निषादस्थपतिं याजयेत्'. ( मैत्रा० सं० २।२।४ ) असली काम्येष्टि निषादांचा जो अधिपति असेल त्याचेकडून करवावी. निषाद हे चातुर्वर्ण्याबाहेरचे. त्यांना सुद्धां कांहीं कारणाकरितां श्रौताधिकार द्यावा लागला.

जेत्यांना जितांना खूष ठेवण्याकरितां कांहीं कांहीं अधिकार आरंभीं आरंभीं द्यावे लागतात. एकदां बस बसला म्हणजे आली दुसऱ्या पिढीला खरडेघाशी व इतर हलकीं कामें ! त्याचें हें उत्तम उदाहरण आहे.

ह्या निबंधांतील विधानें ब्राह्मणवाक्यांच्या आधारें केलीं आहेत व ते आधार ठिकठिकाणीं दिले आहेत. ते अवश्य मूळांतून वाचावे व त्यांपासून निराळे सिद्धांत बांधतां आले तर अवश्य बांधावे. ब्राह्मणांच्या पदरीं कावेबाजपणा घातला आहे, लोकांच्या अज्ञानापासून त्यांचा फायदा झाला असें म्हटलें आहे तें बहुतेकांस खपणार नाहीं. ब्राह्मणांच्या कृतींचें समर्थन करितां आलें तर तें इष्टच होईल.

**वैजनाथ काशीनाथ राजवाडे**

# मानभावी वचनपाठ

मानभावांत धर्मग्रंथ म्हणून व नित्यनैमित्तिक पाठ म्हणून ज्या ग्रंथांचा ते लोक उपयोग करितात त्यांत सूत्रपाठ नांवाचा एक ग्रंथ आहे, त्यांत निरनिराळीं प्रकरणें किंवा भाग असून पहिला भाग वाचनपाठ या नांवाचा आहे. यांत बहुतेक सृष्टीची उभारणी व संहारणी किंवा सांजणीभाजणी, ब्रह्मविद्या, मायावर्णन, जीवाचा उद्धार फक्त चक्रधरास च शरण गेल्यानें कसा होता, चक्रधराशिवाय इतर देव मोचक कसे नाहींत वगैरे माहिती आली आहे. ही माहिती कांहीं बाबतींत सनातन-पंथीय धर्मशास्त्रपुराण वगैरेशीं जुळते तर बऱ्या च ठिकाणीं या दोन पंथांतील सिद्धांतांत अतीशय फरक आढळून येतो.

आज पुढें देत असलेल्या वचनपाठांत हे लक्षण म्हणजे सनातन पंथांतील व मानभवी पंथांतील विरोध कसकसा आहे तें वाचकांस स्पष्ट समजावें म्हणून, मूळ पोथीचें शब्दशः भाषांतर च येथें दिलें आहे, म्हणजे तर्क वितर्क केल्याचा, दूरान्वय केल्याचा अगर आपल्या पदरचा मजकूर घातल्याचा आरोप मजवर येऊं नये.

मानभवी ग्रंथांची योग्यता महाराष्ट्रवाङ्मयेतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांना महत्वाची वाटली पाहिजे. कारण या ग्रंथांची भाषा एकनाथपूर्वकालीन किंबहुना ज्ञाने-श्वरसमकालीन आहे. ज्ञानेश्वरींतील बहुतेक रूपें या ग्रंथांत आढळतात, आणि या च एका दृष्टीनें मी हा वचनपाठ पुढें ठेवीत आहे.

या वचनपाठाचा संकेत मानभवांच्या इतर ३।४ संकेतांप्रमाणें च आहे. मान-भवांचें म्हणणें कीं आमचे १५।२० संकेत आहेत. पण माझ्या जवळ असलेल्या जवळ जवळ २५।३० मानभवी अस्सल ग्रंथांचे संकेत वर सांगितलेल्या ३।४ संकेतां पैकीं कोणत्या तरी एका वर्गांत येतात. म्हणजे वरील मानभवांचें घोरणें आतां पर्यंतच्या माझ्या माहिती वरून बाधित होते. असो. या ग्रंथाचा संकेत असा:—

| मानभवी | = | देवनागरी | मानभवी | = | देवनागरी |
|---|---|---|---|---|---|
| श्रीं | | श्री | घ | | द |
| अ | | र | च | | प |
| उ | | क्ष | छ | | फ |
| ऋ | | ऋ | ज | | ब |
| ए | | ए | झ | | भ |
| क | | य | ञ | | म |
| ग | | ल | ट | | त |
| ङ | | द़ | ठ | | थ |
| ढ | | ध | ल | | ळ |
| ण | | न | व | | घ |
| त | | ट | श | | श |
| थ | | ठ | ष | | ह |
| द | | ड | स | | अ |
| ध | | ढ | ह | | उ |
| न | | ण | ळ | | ग |
| प | | च | क्ष | | क्ष |
| फ | | छ | ज्ञ | | ज्ञ |
| ब | | ज | | | |
| भ | | झ | | | |
| म | | स | | | |
| य | | क | | | |

शिवाय नेहमींच्या मानभवी रीतीप्रमाणें या सर्व अक्षरांवर रेघ नाहीं काना, ऱ्हस्व वेलांटी, दीर्घ वेलांटी, दीर्घ ऊकार, अनुस्वार, विसर्ग, रफार वगैरे आपल्या प्रमाणें च असून फक्त ऱ्हस्व उकार मात्र भिन्न आहे. अक्षराखालीं टिंब दिलें म्हणजे ऱ्हस्व उकार होतो. खेरीज या ग्रंथांत खालील शब्दसंक्षेप आहेतः—

| अक्षरसंक्षेप | = | अर्थ | अक्षरसंक्षेप | अर्थ |
|---|---|---|---|---|
| ऍं | | ऐसें | ( ) | तो, तेव्हां |
| म्धी | | स्वीकारिलें | र्पा | जीवा, जीव |
| ३ i | | त्यां ( गोसावीयां ) | चौ | पासौनि |
| त्ॊं | | तेथौनि | म्रु | अवतार |
| ४९ | | म्हणितलें | ७ | म्हणौनी |
| र | | ईश्वर | ष | जीव |

| शब्दसंक्षेप | अर्थ | अक्षरसंक्षेप | अर्थ |
| --- | --- | --- | --- |
| एक | अन्ध | ट | दैवत |
| श्रीः क | श्रीचक्रधर | स्ठी | सृष्टी |
| र्मुं | धर्मु | चं | परि |
| छ | फळ | मे | म्हणे |
| र्कं | पर्यंत | ‿क | कैवल्य |
| द | प्रसादु | च | परमेश्वर, चक्रधर |
| प्र | ( प्रशांत ) चक्रधर | ब्द्या | ब्रह्मविद्या |
| आ | माया | डा | चरण |
| ज्म | ब्रम्ह | म्ह | म्हणे |
| ग | केवळ | प. | पुरुषु |
| थ्रुं | इच्छा | | |

मैथांत आलेले जुने शब्द व रूपें अशीं:--

| | | |
| --- | --- | --- |
| वाचौनि | क्षेपी | झडेति |
| कायिसेनि | देति ( देतात ) | उरलेनि ( उरलेल्या ) |
| केंसेनी | एकु | भक्तांचां, ज्ञानियांचां |
| निरवयवु | आति | ठायां |
| सावंयवु | पवे ( पावे ) | भेदु |
| होये | होये | सतरि ( ७० ) |
| पासौनी | रिगे | अशी ( ८० ) |
| देवीचां ( च्या ) | संहारु | नौ ( ९ ) |
| अवतारु | वेगळावला | क्रीडेति |
| पुणा चाकणा प्रदेशीं | कोपौनि | कर्मभूमि स्थितां |
| कन्हाडया ब्राह्मणांचा | तुटेति | ऐसया |
| पितया | विषो ( विषय ) | अनुसरेति |
| काणयां | जाये | ननुसरेति |
| बीजें | वर्गु | नेदीति |
| दीवली | उरेति | अनुसरलयाचें |
| मार्गु | जेतुक जेतुके | कव्हणी |
| केलिया ( केल्या ) | तेतुक तेतुके | मार्गौते |
| ऐसया ( ऐश्या ) | आवेशु | एति ( येते ) |
| मस्तिते | एकाकारु | होऊनु |
| ईश्वरु | दिनो | कें |
| वर्षा | सधांप ( सधा = ११ ) | वरिचील |
| तेथ | वरौते | आपणपें |
| देहपातु | कव्हना | म्हणितलें |

आतां या वचनपाठाचा सारांश असाः—

पहिला प्रश्न असा विचारिला आहे कीं, जीवानें आपलें अंतःकरण स्वतःच्या ताब्यांत आणल्यावांचून त्याची सुटका आहे कीं नाहीं ? त्याचें उत्तर एक ईश्वर-दास्यावांचून त्याची सुटका नाहीं असें दिलें आहे. यावर तो ईश्वर निरवय व निराकार आहे त्याचें दास्य कसें कसें घडेल या शंकेचें तो सावयव, साकार, व्यक्तिमंत, मूर्तिभार्या होतो असें समाधान केलें आहे. यापुढें या प्रश्नाची फोड करावी म्हणून प्रथम

पंचकृष्ण

व त्यांचीं स्थानें देऊन त्यांना नमन केलें आहे. हें नमन हा मानभावांचा मुख्य मंत्र आहे. या पांचांची थोडीशी कथा हि दिली आहे ती अशीः (१) द्वापारी वसुदेव देवकीच्या पोटीं अवतार झाला तो श्रीकृष्ण (२) सह्याद्री येथें अत्रीअनुसूयेच्या पोटी दत्त अवतार घेतला. अत्रीचा पुत्र म्हणून आत्रेय दत्त (३) पुणा चाकण प्रदेशीं फलेठाण (फलठण) ग्रामीं कन्हाडेया ब्राह्मणाच्या गर्भी अवतार पितया नाम जनक नायक व मातें नाम जनकायिसें होतें आणि स्वतःचें नांव चांगोबा असें ठेविलें (४) ऋद्धिपूर येथें अनंतोबा व नेमायिसा या काण्व ब्राह्मण जोडप्याच्या पोटीं गुंडोबा ऊर्फ गुंडम अवतार झाला (५) द्वारकेस येऊन कामाख्या इच्या साठीं गुजराथेंत भडोच येथें जाऊन तेथील प्रधानपुत्राच्या शरिरांत प्रवेश केला व नंतर पैठणास येऊन, चांगदेवास भेटी देऊन, उभये गंगातीरीं क्रीडा केली, व अधिकरण करुनी मार्गु प्रकटिला, अनंतें चरित्रें केली, अनंता लीला केलिया, अनंत जीव उद्धरिले व जो विशाळदेव आणि माल्हायिसा यांच्या पोटीं येऊन स्वतःस द्वारिपाळदेव असें नांव ठेविलें तो चक्रधर हा पांचवा अवतार होय. हा एकु देव पांचां वेषीं अवतरला सारांश ऐसया देवाचें जैसे वा दास्य घडे तैचि जीव संसारा पासोनी मुंचे. याप्रमाणें ग्रंथाच्या आरंभीं जो प्रश्न केला होता त्याचें उत्तर दिलें आहे.

हे पंच-कृष्ण च नागेशाच्या महात्माकथानकांतील कृष्णंभट्टाचे पांच पुत्र होत. यापुढें

## [ दुसरें प्रकरण ]

असून त्याचें नांव अन्यव्यावृत्ति प्रकरण आहे. यांत खोटे देव कोणते व खरा देव कोणता याचा निर्णय आहे. कर्मभूमीच्या देव देवी, यक्ष, यक्षिणी, शाकिणी डाकिणी इत्यादि अष्टयोनी, अंतराळीचे गण गंधर्व, स्वर्गींचे इंद्रचंद्रादिक, कैलास वैकुंठ, सत्यलोकीचे, ब्रम्हा, विष्णु, महादेव, क्षीराब्धीचा शेशशय्या, अष्टधा प्रकृतीचे अष्टभैरव विश्वरूप वगैरे वगैरे ईश्वरू नव्हे, तर ईश्वर तो फक्त देवो श्रीकृष्णु होय तो जीवां उद्धरितों, रक्षिता होय.

## [ तिसरें प्रकरण ]

म्हणजे युगधर्म हें होय. यांत युगांची जी वर्षसंख्या दिली आहे ती सनातन धर्मग्रंथांत येणाऱ्या गणनेप्रमाणें नसून निराळी च आहे. प्रत्येक युगाचीं वर्षे व त्य.

युगांत कोणत्या क्रिया धर्माच्या व कोणत्या अधर्माच्या हें सांगितलें आहे. त्यांत हि सनातन धर्मग्रंथांत ज्या युगांत ज्या क्रिया धर्म म्हणून सांगितल्या आहे, त्या या प्रकरणांत अधर्म म्हणून सांगितल्या आहेत व सनातन धर्मग्रंथांनीं ज्या अधर्म म्हणून सांगितल्या त्या यांत धर्म म्हणून सांगितल्या आहेत; सारांश या प्रकरणांत आपण आजपर्यंत ऐकत आलेल्या धर्माधर्मक्रमाची उलटापालट केली आहे. नंतर

[ अस्ति परि प्रकरण ]

नांवाचें चौथें प्रकरण असून त्यांत "निरालंबी ... जो जन्मक्षेपी त्यासी पुनरपी ईश्वर आपुला प्रसादु देती" असा मथितार्थ काढला आहे. पांचव्या प्रकरणाचें नांव

[ महावाक्यप्रकरण ]

आहे. यांत खालील व्याख्या आहेत. स्थूल, सूक्ष्म, सच्चिदानंद, ज्ञान, विज्ञान शक्ती, चार विरुद्धधर्म वगैरे. शेवटीं तत्सदित तद्युक एकु ईश्वर, तो देव श्रीचक्रधर जीवां रक्षिना उद्धरिता असा नियम सांगितला आहे. यांतील बहुतेक तत्व विवेचन अपल्यासारखें च आहे.

[ निर्वेचनप्रकरण ]

असें सहाव्या प्रकरणाचें नांव आहे. ब्रह्म, माया अव्यक्तारण वगैरेंची फोड, आपल्या वेदांताला धरून च आहे. सातवें प्रकरण

[ संसरणप्रकरण ]

नांवाचें असून त्यांत ईश्वराला सृष्टी रचण्याची इच्छा कशी होते, माया जीवाला कशी हाळवी, डोंचली, उगळी, लोटी, गंधर्व नगराकार अष्टधा प्रकृति कशा रचते, प्रकृति विकृति, विकृति विकृति, चतुर्विध कर्म कसें असतें यांचें विवरण असून

[ संहरण प्रकरण ]

नांवाच्या आठव्या प्रकरणांत सृष्टीचा संहारक्रम दिला आहे तो आपल्या क्रमाशीं जुळत नाहीं. याचा शेवट "जेव्हढी सृष्टि तेव्हढा संहारु" असा केला आहे. नवव्या प्रकरणाचें नांव

[ विद्यामार्ग प्रकरण ]

असें आहे. यांत ज्या ज्या वस्तूचा वेधू लागेल त्या त्या विषयाची प्राप्ती होईल असें वर्णन आहे. "विदेहवेधें विदेहाची प्राप्ती, विदेहकैवल्यवेधें ईश्वराची प्राप्ती" होते. वेधाचीं साधनें कोणतीं, आणव, शाक्त, शांभव या त्रिविधांचा वेधु, स्थिती, देवता वगैरे कशा, उमापती पशुपती, सदाशिव, विकराळी, ब्रह्मा, विष्णु, महादेव या आठांच्या आठ विद्या कशा, शुद्ध शांभव व सचळ शांभव कसें; जें चि अंतर्यागें पाविजे तें चि बहिर्यागें कसें पाविजे, अष्ट भैरवांचे आगम कोणचे, नाथ-

स. सं. वृ.- १९

पंथाच्या चयार ओळी कोणत्या वगैरे माहिती यांत आली आहे. ही आपल्याला सर्व च नवीन दिसते. आपल्या आजपर्यंतच्या समजुतींशीं इचा मेळ बसत नाहीं. या प्रकरणांत मानभावी गडबडगुंडा–गोंधळ–चांगला दिसून येतो.

[ उद्धरण प्रकरण ]

असें दहाव्या प्रकरणाचें नांव ठेविलें आहे. माया व ईश्वर यांचीं निरनिराळी गुणकर्मे सांगून, ज्ञानी, अज्ञानी यांचें लक्षण, ईश्वर कोणाला लवकर पावतो, उपासकास गुरु हा सत्ताज्ञान देऊन सामान्य ज्ञानास कसा योग्य करितो, कर्मसृष्टी ही विकारसृष्टीच्या अधीन कशी आहे व वेगळी हि कशी आहे, साधक हा विशेषज्ञानी झाल्यावर देवसृष्टीच्या कच्छपांतून कसा सुटतो, आणि त्यामुळें अपरोक्ष ज्ञानास कसा अधिकारी होतो त्याचें वर्तन जगांत कसें असतें, "तो म्हणे तो अर्थु तैसा चि होये " ही क्रिया कशी होते, ईश्वर त्यासी कृपा करिती, आपुल्या कृपाशक्ती करूनी अनाद्य विद्या छेदु करिती, मूळाविद्या छेदु करिती अज्ञान छेदु करिती, इत्यादि क्रिया कशा होतात हें सांगून शेवटीं खालीलप्रमाणें या पहिल्या पाठाचा शेवट केला आहे. प्रथम हा मजकूर मानभवी भाषेंत देतों मग खालीं त्याचें मराठी रूपांतर देतों:––

" र : त्यामी रुचा यओटि : ...... झकामि साचुगी सणझुटि डेटि : झकामि साचुगी अटि डेटि : झकामि सनिश्ट णिवृत्टि यअुनि षष्टप्राप्टि यभीटि : झकामि साचनचें मत्रोअ डेटि ॥ ६३ ॥ सकु : रों : झेर्डे सणु झश्रीया सझेडें: ऐं : याहीं णिअचूं णके ॥ ६४ ॥ ज्ञाणिकांमि ओउ डेटि : ज्ञाणिकामि : ग्क : डेटि : ज्ञाणिकाटें मंमाआ घेळलें यओटि : ज्ञाणिकाटें चाथिमीं वागीटि : ज्ञाणिकाटे : ज्मीं : झूट यओटि: ज्ञाणिकां : ज्मीं : त्रिनळे : ज्मीं : जुद्डे ॥ ६५ ॥ काचओ श्री : क : घों : हद्रुओटि ॥ ६६ ॥ पटि चूर्घी चंप रुण्ग प्रयअन णघयं मत्रार्स ॥ २७२ ॥ ॥ ❀ ॥ ❀ ॥ ❀ ॥ "

र: ( ईश्वर ) त्यासी कृपा करीति : ...... भक्तासि आपुली अनुभूति देति : भक्तासि आपुली रति देति : भक्तासि अनिष्ट निवृत्ति करूनि इष्टप्राप्ति करीति : भक्तासि आपणपें समोर देति ॥ ६३ ॥ भक्तु रों ( ईश्वरां ) : भेदें अनुभवीका: अभेदें : ऐं ( ऐसें ) : कांहीं निरूपूं नये ॥ ६४ ॥ ज्ञानियांसि मोक्षु देति : ज्ञानियासि : ल्य ( कैवल्य ) : देति : ज्ञानियातें संसारा वेगळें करीति : ज्ञानियांतें पाठिसीं घालीति : ज्ञानियातें : म्रीं ( ब्रम्हीं ) : भूतु करीति : ज्ञानियां : म्रीं (ब्रम्हीं): मिसळे : म्रीं : बुडाले ॥ ६५ ॥ यापरी श्री : क : ( चक्रधर ) : वों ( जीवां ) : उद्धरीति ॥ ६६ ॥ इति पूर्वी पंच कृष्ण प्रकरण नवकं समाप्तं ॥ २७२ ॥

याप्रमाणें हा वचनपाठ आहे. यापुढील सूत्रपाठ म्हणून जो पाठ आहे तो अतिशय महत्वाचा आहे. कारण त्यांत च त्यांचे आचारविचार, धर्मसमजुती इत्यादि

विषय आहेत पण तो भाग पुढल्या वर्षी मी मांडणार आहें, म्हणून सध्यां येथें च पुरें करितों.

पां. मा. चांदोरकर.

॥ श्रीपरेशायनमः ॥ अस्ति अंतरवश्यें करणें जीव एक वांचौनि आनिकें कायिसेनिं हीन मुंचे ॥ १ ॥ तेंचि कायिसेनि मुंचे ॥ २ ॥ एकें : खें[2] : दाम्येंचि मुंचे ॥ ३ ॥ : ती : निरवयवा निराकारा : खा[3] : चें दास्य : वां[4] कैसेनि घडे ॥ ४ ॥ ऐसा जो : खु[5] : निरवयवू : तो सावयवू [6]होये ॥ निराकारु तो साकारु होये : अव्यक्तु तो व्यक्तिमंतु होये : अमूर्त्तु तो मूर्तिधार्यी होये : अनामा तो नाम स्वीकरी ॥ ५ ॥ ❀ ॥ द्वारीं[6] श्रीकृष्ण[6] चक्रवर्त्ति : [7]३ : चे चरण शरण ॥ १ ॥ सैंहाद्रीं[6] श्रीदत्तात्रेय प्रभु : ३ : चे चरण शरण ॥ २ ॥ द्वारावतिये[6] श्रीचांगदेव राउळ :३ : चे चरण शरण ॥ ३ ॥ ऋद्धिपुरीं श्रीगुंडम राऊळ : ३ : चे चरण शरण ॥ ४ ॥ प्रतिष्ठानीं[6] श्रीचक्रधरा[1] राया : ३ : चे चरण शरण ॥ ५ ॥ ❀ ॥ तैसे द्वापरीं: [8]र्त्ति : ३[9] : वसुदेवा : पौ[10] : देवकी देवीचा गर्भी : अ[11] [12]स्वी र्त्ती : ऐं[1] : नाम : स्वेवीं : त्यां : र्त्ति : ३ : चे चरण शरण ॥ १ ॥ जैसे सैंहाद्रीं श्रीदत्तात्रेय प्रभु : ३ : अत्री : पौ : अनसुये देवीचा गर्भी : : स्वी : त्यांसि पुत्रत्व दीधलें : ३ ७ : दत्त : अत्रींचे ३ ७ आत्रेय : श्रीदत्तात्रेय : ऐं : नाम : स्वेवीं : त्यां श्रीदत्तात्रेयप्रभु : ३ ? : चे चरण शरण ॥ २ ॥ जैसे द्वारावतिये श्रीचांगदेव राऊळ : ३ : पुणा चाकणा प्रदेशीं फलेठाण ग्राम : तेथ कन्हाड्या ब्राह्मणांचां गर्भी : अ : स्वी : पितया नाम जनक नायकः माते नाम जनकायिसें : चांगोवा : ऐं : नाम : स्वेवीं त्यां श्रीचांगदेव राउळ : ३ : चे चरण शरण ॥ ३ ॥ जैसे ऋद्धिपुरीं श्रीगुंडम राऊळ : ३ : ऋद्धिपुर प्रदेशीं तेथ काणवां : ब्रां : चा गर्भी : अ : स्वी : पितया नाम अनंतोबा माते नाम नेमायिसें : गुंडोबा: ऐं : नाम स्वेवीं : त्यां श्रीगुंडम राउळ : ३ : चे चरण शरण ॥ ४ ॥ द्वारावति येऊनि कामाख्या निमित्ते गुर्ज्जराते भरवर्सी प्रधानकुमराचें पुर स्वेवीं पितया नाम विशाळदेव : माते नाम माल्हायिसे : हरिपाळदेव : ऐं : नाम : स्वेवी[?] : २ : प्रतिष्ठाना बीजें करूनि : चां : भेटि दीधली : २ : उभये गंगातीरिं क्रोडा केली : त्तों : अधिकरण करूणि मर्जु प्रकटिला : २ : अनंतें चरित्रें केली : अनंता लीळा केलिया : अनंत : ४ : उद्धरिले : त्यां : श्रीका : राया : ३ : चे चरण शरण ॥ ५ ॥ एकु : देव पांचां

---

१ प्रचारांतीलच आहे; सांकेतिक नहीं. २ सांकेतिक र आहे. संकेत "ईश्वर" काय ? ३ सांकेतिक रा ईश्वरा ? जीवा ? ५ सांकेतिक रु. ६ प्रचारांतीलच आहे. ७ त्यां ? ८ श्रीकृष्ण चक्रवर्ति ९? १० पासौनि, मूळांत चौ. ११ अवतारु मूळांत–सु. १२ स्वीकरिला. मूळ–स्वी ।

१ ऐसें. मूळांत ऐं प्रचारांतलेंच आहे. २ स्वीं स्वीकारिलें. ३ ?

वेषीं अवतरला : त्तिं : धायी जाला : ऐसया देवाचें जैसे वा दास्य घडे : तै चि : व : संसारा : पौ : मुंचे ॥ १ ॥ ॥ ० ॥ ॥ अथ अन्यव्यावृत्ति प्रकरण ॥ कर्मभुमीच्या देव देवी : र : नव्हेति ॥ १ ॥ अष्ट देव योनीच्या यक्ष यक्षिणी शाकिणी डाकिणी इत्यादिकी : ता : होती : र : नव्हेति ॥ २ ॥ अंतराळीचे गण गंधर्व : ता : होति : र : नव्हेति ॥ ३ ॥ स्वर्गीचे इंद्र चंद्रादिक : ता : होति : र : नव्हेति ॥ ४ ॥ कैळासवैकुंठसत्यलोकीचे ब्रह्मा विष्णु महादेव : ता : होति : र : नव्हेति ॥ ५ ॥ क्षीराब्धीचा शेशशय्या : ता : होये : रु : नव्हे ॥ ६ ॥ अष्टधा प्रकृतीचे अष्ट भैरवं : ता : होति : र : नव्हेति ॥ ७ ॥ विश्वरूप : ता : होये: रु : नव्हे ॥ ८ ॥ अनंत : ( द ) डं : व्यापक : न्य : ता : होये : रु : नव्हे ॥ ९ ॥ त्यां : पर : रु : तो देवो : श्रीकु : वों : रक्षनां उद्धरिता ॥ १० ॥ ॥ ❁ ॥ अथ युगधर्म प्रकरण ॥ बत्तीस लक्ष कृतयुग ॥ १ ॥ लक्ष वर्षा आयुष्य ॥ २ ॥ तेथ द्वंद्वा अवस्थान ॥ ३ ॥ तेथिचे : ल : ही लोक ते आत्माराम ॥ ४ ॥ तेथ आत्मोपास्ति हा : मुं : ॥ ५ ॥ भक्ति अ : मुं : ॥ ६ ॥ आत्मोपास्ति : मु : ज्यां घडे : त्यां : न्य : फ : ॥ ७ ॥ भक्ति अ : मुं : ज्यां घडे : त्यां त्रेतीं जन्म ॥ ८ ॥ आयुष्यातीं विचार निमित्त देहपातु ॥ ९ ॥ सोळा लक्ष त्रेत ॥ १० ॥ दाहा सहस्र आयुष्यं ॥ ११ ॥ तेथ भक्ति हा : मूं ॥ १२ ॥ यागु अ: मु: ॥ १३ ॥ भक्ति : मु : ज्यां घडे : त्यां कैळास वैकुंठ सत्यलोक : फ : ॥ १४ ॥ याग अ : मु ज्यां घडे : त्यां द्वापरीं जन्म ॥१५॥ हिंसा पाप : पापास्तव नरक ॥ १६ ॥ आठ लक्ष द्वापर ॥१७॥ सहस्र वरुषां आयुष्य ॥१८॥ तेथ यागु हा : मुं : ॥ १९ ॥ तीर्थ क्षेत्र व्रत दान हा अ : मु : ॥ २० ॥ याग अ : + मु : ज्यां घडे : त्यां स्वर्ग : फ : ॥ २१ ॥ तीर्थ क्षेत्रव्रतदान हा अधर्मु ज्यां घडे त्या कळियुगीं जन्म ॥ २२ ॥ हिंसा पाप : पापास्तव नरक ॥ २३ ॥ च्यारि लक्ष कालि ॥ २४ ॥ शत वरुषां आयुष्यं ॥ २५ ॥ तेथ तीर्थक्षेत्रव्रतदान हा : मुं : ॥ २६ ॥ उत्तम मध्यम कनिष्ठ त्रिविध क्रिया ॥ २७ ॥ उत्तम : मुं : ज्या घडे : त्यां अंतराळ : फ : ॥ २८ ॥ मध्यम : मुं : ज्यां घडे : अष्टदेव योनीचें : फ : ॥ २९ ॥ कनिष्ठ : मु : ज्यां घडे : त्यां अधोयोनिक : फ : ॥ ३० ॥ हिंसा पाप : पापास्तव नरक ॥ ३१ ॥ कळियुगीं जन्ममात्रे चौक दा : यें : नरक ॥ ३२ ॥ एही युग : मीं : रु : नेनिजे न पाविजे ॥ ३३ ॥ : रा : चें : ४५ : कीजे तैचि : रु : पाविजे ॥ ३४ ॥ अथ अस्ति परी प्रकरणं ॥ विकार विकल्प शून्य ॥ १ ॥ स्वभावमात्रें ॥ २ ॥ निराळंबी ॥ ३ ॥ : ता : स्मैं ( असं ) : ॥ ४ ॥ जो जन्म क्षेपी ॥ ५ ॥ त्यासि पुनरपि : र : आपुला : धु : देति ॥ ६ ॥ ७ ॥ अथ महावाक्य प्रकरणं ॥ : व : प्र : व्यतिरिक्त सच्चिदानंद : स्व : रु : एकु आति : तो सर्व शक्तियुक्त ॥ १ ॥ नित्य केवळ

---

+ लेखकाच्या चुकीनें ' स ' = अ लिहिला गेला आहे.

अनादि अविद्यायुक्त वस्तु एक आति : तें : व : शब्दें : जै : ॥ २ ॥ विश्वरूपा : पौ : मृत्तिका : यें : च्रु : तोचि द्विध ॥ ३ ॥ घे सांडी तो स्थूळ : व : संलग्न तो सूक्ष्म ॥ ४ ॥ सत् शब्दें : ब्र : चित् शब्दें : मा : आनंद शब्दें : ई : ब्र : मा : ई : ऐसा त्र्यंशु एकु : रु : ॥ ५ ॥ तेथ अंशांशु ऐसा काही आव : े : त्र्यंश : ऐं : निरूपाव रा : ल : ही : ता : ल : ही : मैं : ज्ञान विज्ञान : ल : ही सामर्थ्यें हें अवघें सर्व शक्ति शब्दें : जे ॥ ६ ॥ नित्यत्व विभुत्व व्यापकत्वादिक : मैं : सौंदर्यलावन्यऔदार्यसौभाग्यादिक गुण : दया मं ( । ) या कृपा करुणा यां त्र्यान्ही शक्ती : रीं : चि आति ॥ ७ ॥ सर्व कर्तृत्व : सर्व साक्षित्व : सर्वात्मकत्वें : सर्वातीतत्व : हेच्यन्ही विरुद्ध : मैं : रीं : चि आति ॥ ८ ॥ संस हि ततद् युक्त एकु : रु : तो देव श्रीचक्रधरु : वों : रक्षिता उद्धरिता ॥ ९ ॥ ॥ ❁ ॥ ॥ अथ निर्वचन प्रकरणं ॥ सत् शब्दें : ब्र : । १ ॥ सत्य नित्य सत शाश्वत : सर्व : मैं : शून्य : ऐं : तें : ब्र : ॥ २ ॥ चित् शब्दें : मा : ॥ ३ ॥ न्य : मा : ॥ ४ ॥ विदेह : आद्यशक्ति : पराशक्ति : रा : चें व्यापार तें आद्य करण ॥ ५ ॥ : मा : गुणवंत : मैं : वंत : विकारवंत : ऐसी ते : मा : ॥ ६ ॥ आनंद शब्दें : ई : ॥ ७ ॥ आनंदु तो : ब्र : तो : सर्व : मैं : शून्य तो ॥ ८ ॥ अच्युतो : अव्यक्त तो : अमूर्त तो : शुद्ध तो : बुद्ध तो : नित्यमुक्त तो : निराभिमानु तो : अविक्रियु तो : पर तो : परिसाक्षित्व ऐसा ही : मुं : तेथ नाहीं ॥ ९ ॥ केवल तो ॥ १० ॥ केवळीं चि नित्य : धें : मा : े : ॥ ११ ॥ तेथ चि : मा : धु : पातली : े : ि : तेथ चि न पवे : ऐं : वस्तुतें ॥ १२ ॥ : मा : धें : ल : ही : मैं : ॥ १३ ॥ ऐश्वर्य आदि करूनि : ल : ही : मा : धें : चि तेथ ॥ १४ ॥ ॥ छ ॥ ॥ अथ संसरण प्रकरणं ॥ : रीं : वृः होये सृष्टी रचावयाची ॥ १ ॥ र : सृीं : मा : तमोनिमग्ना : घां : न्य : महं : ऐं : घेऊनि उठीति ॥ ३ ॥ न्यः । महं : हें : वीं : अन्यथा ज्ञान ॥ ४ ॥ : न्यः मंह हाः वांः आद्यमळु ॥ ५ ॥ न्यः] महं हेंः वांः जन्म ॥ ६ ॥ : मा : वों : विकरे : संचरे : वियें : प्रसवे : हालवी : डोंचली : उगळी : लोटी : ॥ ७ ॥ : २ : व : त्रों ( प्रों ) : करी ॥ ८ ॥ : वां : : मा : धीनता : का : चा ( प्रा धीनता : वांचौनी मध्यें राहाणें चि नाहीं ॥ ९ ॥ जन्मला : व : क्षणु : यें : शुद्ध : ी : २ : प्रों : करी ॥ १० ॥ का करी ॥ ११ ॥ मा अंतोमती मधोगति : अधोरति ३७ करी ॥ १२ ॥ कैतेनी करी ॥ १३ ॥ तै त्यातें सामर्थ्य आति ॥ १४ ॥ : मा : सृष्ट ( अष्ट ? ) : व : व : सृष्ट : प्रु : ॥ १५ ॥ माः कृतः वः वैः कृतः प्रुः ॥ १६ ॥ माः कार्यः वः वः कार्य प्रुः ॥ १७ ॥ यापरीः माः वींः उपजौनि आपण उदासीन ठाकेः चेः सूत्रातें न संडी ॥ १८ ॥ : न्यः मृत्तिकाः यः मैलेः न्याः सरिसाः वः मृत्तिकाः यें मैले ॥ १९ ॥ : न्यः न्यः यें: उजळेः न्याः सरिताः वः न्यः यें : उजळे ॥ २० ॥ आनाचा कारणीं त्या अभिमानु ॥ २१ ॥ : २ : माहीं तेचि एकः गंधर्वनगराकारः अनेकधा विश्व रचीः

त्या माजी रिगेः तदात्मक होयेः विश्वमहंः ऐंः घेऊनि उठी ॥ २२ ॥ ः २ ः नाहीं तें चि एक गंधर्व नगराकारः अष्टधा प्रकृति रचीः त्यामाजि रिगेः तदात्मकु होयेः प्रकृतिरहंः ऐंः घेऊनि उठी ॥ २३ ॥ ः २ ः नाहीं तें चि एक गंधर्व नगराकारः अनेकधा विकृति रचीः त्यामाजि रिगेः तदात्मकु होयेः विकृतिरहंः ऐंः घेऊनि उठी ॥ २४ ॥ ः २ ः नाहीं तें चि एक गंधर्वनगराकारः विकृतिविकृति रचीः त्या माजि रिगेः तदात्मकु होयेः विकृति· विकृतिरहंः ऐंः बुझे ॥२५॥ यापरीः च्यः त्वः ये ः मेळे ॥ २६ ॥ ः २ ः कर्मः फाः जाये ॥२७॥ स्वर्गनरक कर्मभूमि मोक्षः ऐंः चतुर्विध कर्मः फः ॥२८॥ जेसेंः पेः तैसें रचूनि दे ॥ २९ ॥ ः २ ः कर्म राहाटि पडिघा रे ॥ ३० ॥ सूपकेर साहनि घेऊनि उठी ॥ ३१ ॥ ॥ छ ॥ ॥ ❀ ॥ ॥ छ ॥ अथ संहरण प्रकरणं ॥ १ ॥ रा वृंः होये सृष्टिसंहारु करा- वयाचीः रःष्टीः माः सृष्टिसंहारु करीः विषो इंद्रिय अंतःकरण देह विदेह ॥ १ ॥ विषो इंद्रियां लया जाये ॥२॥ इंद्रिय अंतःकरणीं लया जाये ॥ ३ ॥ अंतःकरण देहीं लया जाये ॥ ४ ॥ देह विदेहीं लया जाये ॥ ५ ॥ विदेह तें नित्य ॥ ६ ॥ कार्य कारणीं लया जाये ॥ ७ ॥ कार्य अविद्या कारण अविद्ये लया जाये ॥ ८ ॥ अविद्ये अविद्या कारणः प्राः मुः कारण ॥ ९ ॥ एकु नित्य वर्गुः एकु अनित्य वर्गु ॥ १० ॥ नित्यवर्गीः वः ताः रः उरेति ॥ ११ ॥ अनित्य वर्गी अनादि अविद्या कर्मलेप उरेति ॥ १२ ॥ यापरीः मुः संहारे ॥ १३ ॥ संहारीं: ताः स्वः स्तिता होति ॥ १४ ॥ ः माः स्वीः एकदेशीं तमः ो॥ १५ ॥ संहारीं तमोनिमग्नः चः माः स्वीः तिः ॥ १६ ॥ जेव्हडी सृष्टि तेव्हडा संहारु ॥ १७ ॥ यापरीः माः राः चीः वृंः बोळले ॥ १८ ॥ ॥ छ ॥ अथ विद्यामार्ग प्रकरणं ॥ विषो इंद्रिय अंतःकरण देहविदेह ॥ १ ॥ विषयाधारवेधु ॥ १ ॥ इंद्रिया धारवेधु ॥ ३ ॥ अंतःकरणाधारवेधु ॥ ४ ॥ देहाधारवेधु ॥ ५ ॥ विदेहाधार वेधु ॥ ६ ॥ निराधारवेध ॥ ७ ॥ विषो वेधें विषयांची प्राप्ति ॥ ८ ॥ इंद्रियवेधें इंद्रि· याची प्राप्ति ॥ ९ ॥ अंतःकरणवेधें अंतःकरणाची प्राप्ति ॥ १० ॥ देहवेधें देहाची प्राप्ति ॥ ११ ॥ विदेहवेधें विदेहाची प्राप्ति ॥ १२ ॥ विदेहः लयः वेधेंः राः ची प्राप्ति ॥ १३ ॥ दृक् स्पर्श आलाप अंतःकरण चतुःप्रकारें वेध संक्रमे ॥ १४ ॥ उभया- न्वीक्षमानें सत्तासंनिधिमात्रें विद्या संक्रमे ॥ १५ ॥ सजात्यवेधें सजात्याची प्राप्ति ॥ १६ ॥ केवळा केवळेंसी साजात्य ॥ १७ ॥ डीं ः मूत्तिधायीं ः ता ः पिंडीं मेदमांसरूपा ः ता ः पिंडीं वेधु ः डां ः प्राप्ति ः जेचि व्यवस्था पिंडां ते चि ः डीं ः ॥ १८ ॥ जेतुक जेतुकें परप्रकाशे ः तेतुक तेतुकें अवर प्रकाशे ः परिचें सादृश्य अवरीं आति ॥ १९ हरित पीत मंजिष्ट विद्येस्तव ः ता ः स्त ः पिंडीं प्रकाशे ॥ २० ॥ ः तीं ः वां ः चें मळाधार ज्ञान ः लेपाधार कर्मज्ञान ः ॥ २१ ॥ ः वां ः तां ः प्रे ः साजात्य ः नामसाम्यं साजात्य ः अंशवेधें संपूर्णाची प्राप्ति ॥ २२ ॥ एक ः व ः लय ः ः एक ः प ः लय ः ॥२३॥ ः ळां ः विद्यासाधन एथ ः साध्य ः डीं ः श्ये ः साध्यसाधन एंथ चि ॥ २४ ॥ विद्ये अधीन ः हे ः जालयां विद्यांतरा संक्रमु नाहीं ः बिढारा ः वें ः बिढार नाहीं ॥ २५ ॥ चक्षु इंद्रियां अधिष्ठात्रा सूर्य ः ता ः चक्षुवेधें सूर्याची प्राप्ति ॥ २६ ॥ विद्या मार्गी मळ आच्छादेति

मोक्षमार्गी जाति : प : विद्ये : न्या : चे मळ जाति : वा : चे आच्छादेति ॥ २७ ॥ श्ये : वा : चे जाति : ा : न्या : चेहि जाती ॥ २८ ॥ न्या : न्य : विद्या : षा : ब्द्याः न्यः विद्यातोः न्याः चा मोक्षमार्गुः ब्द्याः तोः वाः चा मोक्षमार्गु ॥ २९ ॥ :वाः चां मोक्षांः न्याः मोक्षु ॥ ३० ॥ अशेष पिंडभेदें विश्वरूपाची प्राप्तिः समस्त लिंगपातें : लया ची प्राप्ति ॥ ३१ ॥ : वा : न्या : चें भेटें : ब्द्ये : थांचोनि न फिटे ॥ ३२ ॥ : ळा : विद्या : न्या : द्वि भावें : ब्द्या : वा : द्विभावें ॥ ३३ ॥ आणव : शाक्त : शांभव : त्रिविध वेधु ॥ ३४ ॥ आणवा आवेशु : शाक्तीं अवस्था : शांभवीं स्थिति ॥ ३५ ॥ आणवीं त्रिधा : शाक्तां द्विधा : शांभवा एकाकारु ॥ ३६ ॥ आणवीं साध्यसाधनसाधकप्रतीति : शाक्तां साध्यसाधनप्रतीति : शांभवां साध्यप्रतीति ॥ ३७ ॥ आणवीं नव कोटि : बाहातरि कोटि : बाहातरी कोटिंमध्यें नवकोटि मुख्य चामुंडा ॥ ३८ ॥ शाक्तां आठ : शांभवीं : दोनि : महाणवीं सवाय लक्ष ॥ ३९ ॥ शांकरी : शांभवी शुद्धा : वेदवंता : शांकरी ब्रह्मयाची : शांभवी महादेवाची : शुद्धा विष्णुची : वेदवंती शेषशयाची ॥४०॥ इंद्रादिकां अनात्मा आत्मप्रतीति : ब्रह्मादिकां आत्माआत्म प्रतीति ॥ ४१ ॥ कैळासवैकुंठसत्यलोक या वरौते ते मोक्ष ॥ ४२ ॥ क्षीराब्धी : पौ : आणव : अष्ट भैरव : शाक्त : विश्व : न्य : शांभव ॥४३॥ पुराणें शेषशय्या पातलीं : कन्हना एकु वेदांतविभाग : न्या : तें पातला ॥४४॥ नादु : बिंदु : कला : ज्योति : लो : अवस्था : सुख : स्थिति ॥ ४५ ॥ उमापति : पशुपति : सदाशिव : कराळि : विकराळि : ब्र : विष्णु : महादेव : यां आठांच्या आठ विद्या ॥ ४६ ॥ अष्ट भैरवांचये विद्ये : पिंडाचें सात अंश झडेति : एक अंशु उरे : उरलेनि अंशें प्राप्ति ॥ ४७ ॥ तेथ दिग्देशकाळलोक नाहीं ॥ ४८ ॥ एक शुद्ध शांभव : एक समळ शांभव शुद्धशांभव : ते : न्या : चि विद्या : समळ शांभव ते विश्वेची विद्या : ॥ ४९ ॥ न्या : नुभूती : वु : भ्रांतु : ा : बीजभूत आविद्या : ो : ॥ ५० ॥ : न्य : न्यों : अनुभवी : प : प्राप्तितें मोक्षतुल्य : फ : चि : च्युति हा दोषु ॥ ५१ न्य : ता : आदिकरूनि : ळा : ही : ता : मूर्त्ता : न्य : विद्या आदिकरूनि : ळा : ही विद्यामूर्त्ता : न्य : साधन आदिकरूनि : ळ : ही साधनें मूर्त्ते न्य : फ : आदिकरूनि : ळ : ही : फें : मूर्तें ॥ ५२ ॥ : रु : अमूर्त्तु : र : साधन तें अमूर्त्त मोचक : र : प्राप्ति ते अमूर्त्त ॥ ५३ ॥ लौकिक : : भौतिक : उपसंहाराख्य : लाभाख्य ॥ ५४ ॥ लौकिक तें लौकिकीं वर्त्ते : भौतिक आठांचांठायीं वर्त्ते : उपसंहाराख्य तें विश्व : न्यीं : वर्त्ते : लाभाख्य तें : ीं : वर्त्ते ॥ ५५ । तें चि द्विज भक्तांचां ठायां ज्ञानियांचां ठायीं ॥ ५६ ॥ जें चि अंतर्यागें पाविजे : तेंचि बहिर्यागें पाविजे ॥ ५७ ॥ साध्यसाधनां सुखरूप तो तो अंतर्यागु : साधनीं दुःखरूप साध्यीं सुखरूप तो बहिर्यागु ॥ ५८ ॥ आदिभेदु : कादिभेदु : स्वच्छंद ललितु : मंथान भेदु ॥ ५९ ॥ आदिभेद सतरि कोटि : कादिभेदु अशी कोटी : स्वच्छंदललितु नौ कोटि : मंथानभेदु शत कोटि : हे आगम अष्ट

भैरवांचे ॥ ६० ॥ मुख्य तुल्य अंशरश्मि ॥ ६१ ॥ दीव्य : दीव्यस्त : जलस्थ : स्थलस्थ : घटघटाभिमानी : अनुस्युत : जड : अजड : चिज्जड ॥६२॥ वस्तु : धं : जडां अजडां भलें : अन्यत्र विधि भावीं भलें : ॥ ६३ ॥ नियेचां योनीमोक्षु देवां आनंद : ष्यां : फ : ॥ ६४ ॥ : रा : पौ : देहविद्या एकि आति : तासि सृष्टि : यें : आयुष्य : देहाविद्ये देहाचि : फ : ॥ ६५ ॥ भूत तन्मात्रा : यें : इंद्राहे : हेमकारा वज्रकाया होये : अवांतर संहारीं उठे : तेथ तो : ो : ॥ ६६ ॥ वज्रवोळि : अमरवोळि : सिद्धवोळि : दिव्यवोळि : याच्या हि वोळी नाथांचिया ॥ ६७ ॥ कळियुगीं व्रजवोळि अमरवोळि आति सिद्धवोळि दिव्यवोळि नाहीं ॥ ६८ ॥ । छ ॥ ॥ छ ॥ अथ उद्धरण प्रकरणं सृष्टीमध्ये : र : इ : ॥ १ ॥ ष्य : वेषधारि होति ॥ २ ॥ मा : वेषधारी होति ॥ ३ ॥ : मा : पुरधारी होती ॥ ४ ॥ मा : निर्मितं पुरं : मा : पुरं : मा : पुरी मायेसी अभिमानु ॥ ५ ॥ : डीं : शक्ति अधान शक्तींच्या पारु : मा : पुरीं : रा : धानशक्तिच्या पारु ॥ ६ ॥ : मा : पुरीं इतर शक्तींतुल्य : मा : ॥ ७ ॥ : मा : घाटाकारें आकारे : घटाकारें वोते ॥ ८ ॥ नखचर्म रोमादि करूनि तेथ शुद्ध : न्य : वांचौनि आन कांहीं म्हणों नये ॥ ९ ॥ : रीं : संपूर्ण शक्ती : मीं : अंशना ॥ १० ॥ ऐसया : मा : पुरातें धरूनि : र : क्रीडेति ॥ ११ ॥ कर्म-भूमि स्थितां : ष्य : देहरुक्तां : वां : ज्ञान : यें आपुळा : धु : देति ॥ १२ ॥ एक्रां प्रेम संचरीति ॥ १३ ॥ प्रेमसंचारमात्रें विकार : त्प : स्वभाव तन्हीं उच्छेदूनि जाति ॥१४॥ प्रेम : जे : भक्ति जे : ॥१५॥ भक्तांसि श्रीमूर्त्ती : वं : साध्यसाधनबोधु प्राप्यप्राप्यबोधु : साध्यसाधनाकारें आकारलें : ो : ॥ १६ ॥ करचरणवंत : म : हें ऐसी चि प्रतीति : ऐसे ते भक्त : जि : ॥ १७ ॥ भक्तांसि नित्य : ध : भक्तासी वियोगु नाहीं : भक्त वियोगीं : नुरे : भक्तांचें : ल : ही : णीं : चि चारितार्थ ॥ १८ ॥ : २ : एकां : वां : प्रतिपारा गिरा करुनि : र : आपुलें आस्तित्व साधीति ॥१९॥ त्यांमाजि एक अनुसरेति : एक ननुसरेति ॥२०॥ ननुसरेति ते जाति : ते : प्रमादा : जी : त्यांसि सृष्टि शुन्य : सृष्टीमध्यें पुनरपि : र : आपुला : धु : नेदीति ॥ २१ ॥ एकासि : ं : बोध देति : बोधकशक्ति देति : साक्षात्कारें श्रीमूर्त्तिधायें होऊनि देति : कां अधिकरणातें अधिकरूनि देति ॥ २२ ॥ अनुसरलयाचें आगंतुक कुंठे : अनारब्धु मुके : प्रारब्धभागें क्षय ॥२३॥ अनुसरलया तैष सवा भोगु : कर्मसवा नाहीं ॥ २४ ॥ अनुसरतां देवत्व तिर्यंचत्व नाहीं : ऐसा तो ज्ञानियां : जे ॥२५॥ ज्ञानियांसि श्रीमूर्त्ती : वं : साधनबोधु : प्राप्यबोधु : त्य : दाता हा : मोक्षदाता : हा : संसारनिष्कृतिकारण हा : ऐसीचि प्रतीति ॥२६॥ कोमळ : ज्ञानी विषो विष : आपण हूनि : र : णी : सांद्रातो : षु : र्मा : पौ : जाये ॥२७॥ अनुसरूनि : णीं : ो : ळ : हा सेवा दास्य करी : किंकर : र्मी : वर्त्ते ॥२८॥ : ३ : कव्हणीं एकी अवसरीं : ळ : मळाचें प्रसारण करुनि : र : वां : सत्ता संचरीति : २ : मळ मार्गीतें घालीति ॥ २९ ॥ सत्ता : जे : ज्ञान : जे : सूचा जे : ज्ञान : जे : र्म : विद्या : जे : साधन : जे : वेध : जे : ॥ ३० ॥ सत्ता तें अपरोक्ष ज्ञान : सत्ता तें

षिद्दिल ज्ञान : सत्ता तें अव्यभिचार्य ज्ञान ॥ ३१ ॥ सत्ताज्ञानी अशेष कर्म जाणे : कर्मक्षाळणोपाय जाणे : अशेष मळ जाणे : मळक्षाळणोपाय जाणे : ॥ ३२ ॥ ये तें विण्य ( ? ) जाणे : विण्यो ( ? ) प शांति जाणे ॥ ३३ ॥ एकें : णीं : क्षाळा : एकें अ : णीं : क्षाळी ॥ ३४ ॥ णीं : क्षाळी तें तो कडेनि : बहुत क्षाळे : अ : णी : क्षाळां तें जेतुकें क्षाळावें तेतुकेंचि क्षाळे ॥ ३५ ॥ बहुरूपता होये : बहुकामता होये ॥ ३६ ॥ कर्मसृष्टि विकारसृष्टिअधीन : दैवसृष्टि विण्ग ( ? ) ॥ ३७ ॥ : २ : ब्रह्मादिक त्याच्या ठाया एति : त्यातें जयु जी शब्दीं बोलावीति ॥ ३८ ॥ आपुला संपादीति ॥ ३० : ⓒ (कि!) : तेथ तुम्ही जावों उठा : तेथिचें राज्य करा : आम्ही तुमचे सेवक होऊनु : २ : तुमचें तें कें हीं जात : ो : ब्द्या : चाड : ते : तैसे कीजे : ी : तो त्यांचा वास ही न पाहे : ॥ ४० ॥ अपमैरम हाळवीति : डंडळवीति : पी तो जैसा कांहीं नेसाचि ॥ ४१ ॥ : ब्र : तुल्यानंद त्या विण्ग ( ? ) तें पावेनि : पी : तें तो जाणे : म्हे : हे नव्हे तें ॥ ४२ ॥ विद्या अविद्या : षु : तिहीते विद्याचि प्रकाशी ॥ ४३ ॥ जाणौनि : षु : विद्येतें धरी अविद्येतें सांडी ॥ ४४ ॥ यापरी सत्ताज्ञान देऊनि सामान्य ज्ञानासि योग्य करीति : सामान्य ज्ञान दान देति ॥ ४५ ॥ सामान्य ज्ञानी अशेष कर्म क्षाळण करी : अशेष मळ क्षाळण करी ॥ ४६ ॥ यात्क्रिय ते तत्कर्म : कर्म शब्दें कर्म : जे : ो : मळ ही : जि : ॥ ४७ ॥ तेणें लाविलें तें तो फेडी : तो न लावी तें त्याचेनि न फिटे ॥ ४८ ॥ यापरी कर्मसृष्टी विकारसृष्टि वेगळावला : दैवसृष्टिआधीन ॥ ४९ ॥ यापरी सामान्यज्ञान देऊनि विशेषज्ञाना योग्य करीति ॥ ५० ॥ विशेष ज्ञान दान देति : विशेष ज्ञानी दैवसृष्टी वेगळा होये ॥ ५१ ॥ विशेष ज्ञानी : ळा : ही शक्ति अधीना अपरोक्ष होति ॥ ५२ ॥ : मा : कोपौनि उदासीन ठाके : मा : घुघुरी रोहकी : पि : कांहीं करूं न शके ॥ ५३ ॥ कृपा माया व्यतिरेकें : ळा : ही शक्ती : र : त्यासि दान देति ॥ ५४ ॥ विशेष ज्ञानी तो ॥ ५५ ॥ : ला : अर्ता प्रमाणद्रव्य तो : त्याचेनिः ळां : चे संशय तुटेति : तो : म्हे : तो अर्थु तैसाचि होये ॥ ५६ ॥ आद्य मत्रयुक्त चरमदेहस्थितु कृपास्पदीभूत होऊनि : ो : ॥ ५७ ॥ : २ : र : त्यासी कृपा करीति : आपुल्या कृपाशक्ती करुनि अनाद्यविद्याछेदु करीति ॥ ५८ मुळा विद्या छेदु करीति : अज्ञानछेदु करीति : अज्ञानछेदें चि अन्यथाज्ञाना छेदु होये ॥ ५९ ॥ बंध त्रुटि होये ॥ ६० ॥ तळिची लहानि तळ्यांवरिचील पडे : २ : उलुरुडि गडबडी ॥ ६१ ॥ : मा : पारंगता करीति : साध्याच्या प्राप्ती साधनें निविर्त्ते ॥ ६२ ॥ भक्तासी आपुली अनुभूति देति : भक्तासि आपुली रति देति : भक्तास अनिष्ट निवृत्ति करूनि इष्टप्राप्ति करीति : भक्तासि आपण पंसमोर देति ॥ ६३ ॥ भकु : रां भेदें अनुभवीका अभेदें : ऐं कांहीं निरूपूं नये ॥ ६४ ॥ ज्ञानियांसि मोक्ष देति : ज्ञानियांसि लय : देति : ज्ञानियातें संसारा वेगळे करीति : ज्ञानियांते पाठीसिं घालीति :

ज्ञानियांतें : श्रीं : भुतु करीति : ज्ञानिया : श्रीं मिसळे श्रीं : चुडाडे ॥ ६५ ॥ यापरि श्री : कृ : वों : उद्धरीति ॥ ६६ ॥ इति पूर्वी पंचरुग्ण प्रकरण नवकं समाप्तं ॥ ॥ २७२ ॥ ॥ ❁ ॥ छ ॥

## महानुभव पंथ

श्रीदत्तात्रेयाय नमः। या भा० इ० सं० मंडळाच्या शके १८३५ च्या इतिवृत्तांत व त्याचप्रमाणें सदर मंडळानें प्रसिद्ध केलेल्या दुसऱ्या कांहीं ग्रंथांत महानुभाव पंथासंबंधी कांहीं लेख आले आहेत. परंपरागत आमच्या पंथासंबंधीं गुरुमुखानें ज्ञान मिळविलेलें नसल्यामुळें व इतस्ततः मिळविलेलें ज्ञान अपुरें असल्यामुळें आणि केवळ तर्कानें ग्रंथ वाचण्याचा व त्यांचा अर्थ करण्याचा यत्न केलेला असल्यामुळें त्यांत दिलेली माहिती अनेक ठिकाणीं चुकीची आहे. मंडळानें प्रसिद्ध केलेली माहिती चुकीची आहे असें कोणास वाटल्यास त्याच्या दृष्टीनें असलेली खरी माहिती पुढें मांडण्याची हें मंडळ अवश्य योजना करील असें मला रा. विनायकराव भावे यांनीं सांगितल्यावरून मी प्रसिद्ध झालेल्या माहितीची माझ्या मतें दुरुस्ती करण्याचा आज प्रारंभ करीत आहे. शके १८३५ मध्यें आलेल्या 'मान भावोत्पत्ति कथा' या निबंधासंबंधीं माझें म्हणणें आज आपले पुढें मांडीत आहे. इतरत्र प्रसिद्ध झालेल्या माहितीचा खुलासा पुढें सवडीनें करीनच.

१ पृष्ठ १५१ वर "शालिवाहन शके १२५५ वै मन्मथनाम संवत्सरे माघ मास वदि तीज शुक्रवासरे ते दिवसीं भटमार्गु जाला" असें म्हटलें आहे. पण १२५५ ला मन्मथ संवत्सर येत नाहीं व तिथिवारहि गणितानें जुळत नाहींत अर्थात् वरील तीथ खोटी आहे.

२ "ते समयीं (म्हणजे १२५५ मध्यें) देवगीरीस रामदेवो राज्य करी" असें त्या लेखांत म्हटलें आहे; परंतु रामदेवराव १२१८ त वारले हें आपणांस मान्य आहे तर मग १२५५ मध्यें रामदेव आला कोठून !

तसेंच पान १५३ वर "येकाक्षराचि लीप उफराटी केली ल तो ग म्हणती ......" इत्यादि उल्लेख आहे. परंतु मजजवळच्या जुन्या पोथ्यांवरून ल चा ग शके १२५५ च्या पूर्वींपासून होता असें मी दाखवूं शकेन आणि त्यावरून आपली अशी खात्री होईल कीं हा प्रचार शके १२५५ पासून पुढें सुरू झाला नसून त्यापूर्वीं केक वर्षें चालू होता. म्हणजे १२५५ मध्यें सुरू केला हें म्हणणें खोटें ठरलें.

१ पृष्ठ १५२ वर " मग ते देवकीस माहात्मी वेषु केला" असें म्हटलें आहे. अर्थात् यावरून पूर्वी प्रचारांत असलेला जो ' माहात्मी वेषु ' तो त्या बाईस केला असा ध्वनि निघतो म्हणजे महात्मी वेषु हा १२५५ शकापूर्वी होता असें होतें.

हे मुद्दे मी वर दिले आहेत. याशिवाय पान १५५ वर " पाखांडमार्गु जाला — दुसरा काया परषी तिसरा डफगा× × पांचवे रनमळ ऐसे पांच पाखांड झाले " असें त्यांत म्हटलें आहे पण हे वर दिलेले पांच मार्ग आमच्या मध्यें नाहींत व कोठें असलेले मला माहित नाहींत. अर्थात् हे पोथींत लिहिणारानें कांहींतरी लिहिलें आहे. हें सत्य नाहीं. याला प्रमाणशुद्धता नाहीं. या करितां ही छापलेली पोथी म्हणजे हा ग्रंथ प्रमाणशुद्ध नाहीं व हा चुकीचा आहे असें मी म्हणतों.

महानुभाव लोकांचे म्हणून कांहीं लोकांनीं खोटे ग्रंथ रचले. त्या ग्रंथांत आमच्या पंथाचा कमीपणा होईल असा मजकूर लिहिला. त्यांपैकीं हा ग्रंथ आहे. हा विश्वासास पात्र नाहीं. याला प्रमाण म्हणून जुन्या एका ग्रंथांतून उतारा देतों.

सकळ कळा अंतरी तो जळाला । तेणें मांगिणी पट्ट निर्माण केला ॥
लटिकें रचोनि सांघे तो पै जनाला । म्हणे मांगिणी पासूनि पंथ झाला ॥
पट्ट करोनि पैठणांत पाठविला । म्हणे हा तुम्ही हो निबंधांत घाला ॥

भारतइतिहासमंडळ ही संस्था सत्यनिर्णयार्थ असल्यामुळें त्यांनी ही आमची बाजू आम्हांस पुढें मांडण्याची संधी दिली व हें माझें म्हणणें आपल्या अहवालांत छापून प्रसिद्ध करण्याचें कबूल केलें याबद्दल मी या संस्थेचे आभार मानतों. अशा या संस्थेस उत्तम दिवस येवोत असा आशीर्वाद देतो. दोन्ही बाजूंचें म्हणणें स्वच्छपणानें, व निर्भीडपणानें पुढें मांडल्यानें सत्यनिर्णय होतो हें समजून रागास न पडतां सर्वांनी या संस्थेचा फायदा अवश्य करून घ्यावा व जुने गैरसमज नवीन पद्धतीनें दूर करून आपण सर्व जणांनीं बंधु भावानें वागावें, इतकी विनंती करून आपली रजा घेतों.

महंत दत्तराज क. महानुभाव.

# अपभ्रंश भाषेंतील वाङ्मय

अपभ्रंश भाषा ही प्राकृताचा एक प्रकार आहे, कीं अगदीं भिन्न अशी भाषा आहे–आर्य व अनार्य भाषांच्या मिश्रणापासून झाली आहे–याविषयीं फार प्राचीन काळापासून मतभेद दिसून येतो. वररुचि आपल्या प्राकृतप्रकाश नामक व्याकरणांत माहाराष्ट्री, पैशाची, मागधी व शौरसेनी यांसच फक्त प्राकृत म्हणतो, अपभ्रंशाचा उल्लेख करीत नाहीं. म्हणजे त्याच्या मतें अपभ्रंशाची गणना प्राकृतांत होत नाहीं. याच मताचे दंडी व इतर कांहीं साहित्यकार आहेत. उलट चंड, हेमचन्द्र इत्यादि

व्याकरणकार व त्यांच्या अनुरोधानें कांहीं साहित्यकार अपभ्रंशाची प्राकृतांत गणना करतात. आर्ष, अपभ्रंश, पैशाचिकी आणि मागधिका या चंडच्या मतें प्राकृत भाषा होत. त्याच्या आर्षांत शौरसेनी व माहाराष्ट्री यांचा अंतर्भाव होत असला पाहिजे. या दोहींत कांहीं प्रत्ययाच्या व वर्णविचाराच्या बाबतीत जें साम्य आहे त्यामुळें त्यानें दोहींचा आर्ष या शब्दांत अंतर्भाव केला असावा. वररुची प्रमाणें हेमचन्द्र या दोन्हींची वेगळी गणना करतो व तेंच बरोबर आहे. याशिवाय एक आर्ष जिलाच जैन लोक अर्धमागधी म्हणतात-व दुसरी चूलिका पैशाचिक अशा आणखी दोन भाषा हेमचन्द्र प्राकृतांत गणतो.

अपभ्रंश भाषा प्राकृतांपैकीं एक असो अगर वेगळीच कोणी असो-तिचा विस्तार फार मोठा होता असें प्राकृतव्याकरणकारांच्या उल्लेखांवरून दिसतें. एकीकडे सिंधु व दुसरीकडे गंगा-ब्रह्मपुत्रा इतका तिचा पूर्वपश्चिम विस्तार दिलेला आढळतो. मात्र देशपरत्वें तिला नागर-उपनागर-व्राचड अशीं नांवें दिलेलीं आहेत. यावरून अपभ्रंश म्हणजे निरनिराळ्या जनपदांमध्यें लोकांच्या तोंडीं असलेली भाषा असली पाहिजे असें अनुमान निघतें; व कित्येक साहित्यकारांच्या उल्लेखांवरूनही तेंच ठरतें. उ० पिशेलनें उद्धृत केलेलें वाग्भट ( साहित्यकार, आयुर्वेदीय नव्हे ) याचें वचन पहाः- 'अपभ्रंशस्तु यच्छुद्धं तत्तद्देशेषु भाषितं, प्रत्येक देशांत लोकांची नित्यव्यवहारांतील 'अपभ्रंश' व शिष्टांची अगर वाङ्मयाची कोणती तरी प्राकृत भाषा असे. म्हणजे शिष्टांची ती माहाराष्ट्री प्राकृत व सामान्य जनसमूहाची स्त्रियादिकांची ती माहाराष्ट्री अपभ्रंश होय असें तज्ज्ञांचें मत झालें आहे. असेंच इतर प्राकृत व अपभ्रंशभाषांचें याचा अर्थ प्रत्यक प्रांतांत अशा दोन वेगवेगळ्या भाषा प्रचारांत होत्या असा नाहीं. मुख्यतःभाषा एकच खरी. पण तिचीं दोन स्वरूपें प्रचारांत होतीं: एक प्रौढ व नियमबद्ध व दुसरें लौकिक व लवचिक. आजही आपल्या महाराष्ट्रांत तोच प्रकार आहे. आजही केसरी-विविधज्ञानविस्तार यांतील अगर वसन्तव्याख्यानमालेसारख्या मालांच्या भाषांतील प्रौढ मराठी भाषेंत व स्त्रियांच्या (ब्राह्मणांच्या सुद्धां) व अशिष्ट असंस्कृत लोकांच्या मराठी भाषेंत फरक दृष्टीस पडतो. तसेंच या प्राकृत-अपभ्रंश जोडीचें.

अपभ्रंश भाषेस लौकिक व लवचीक म्हटलें आहे. हें तिचें स्वरूप व्याकरणकारांनीं तिच्या केलेल्या वर्णनावरूनही दिसून येतें. 'क, ख, त, थ, प, ब' अशा व्यंजनांचे ग, घ, द, ध, ब, भ करणें अगर न करणें, त, द चे 'ट' ड' करणें अगर न करणें, द्वित्त व्यंजनें ठेवणें अगर न ठेवणें, प्रत्ययांची समृद्धि, संस्कृत-प्राकृताशीं संबंध नसलेल्या अस्सल देशी शब्दांचा भरणा इत्यादि लक्षणांवरून तिचें लवचिक स्वरूप सहज लक्ष्यांत येतें.

---

१ चंड, ३, ३७ ते ३९.

२ ग्रामाटीक डेर प्राकृत स्प्राखेन् २. पा. ३.

अगदीं अलीकडे पावेतों अपभ्रंश भाषेंत वाङ्मय फार थोडें आहे. किंबहुना मुळींच नाहीं असें तज्ज्ञाचें मत होतें. कालिदासाच्या विक्रमोर्वशीय नाटकांतील चवथ्या अंकांत जे अपभ्रंश श्लोक आहेत त्यांच्या खरेपणाविषयीं रा. शं. पां. पंडित यांनीं शंका प्रदर्शित केली, तीच यूरोपीय संस्कृतज्ञांनीं खरी धरण्याची वहिवाट पडली होती. पण पिशेल व इतर प्राकृतभाषाभिज्ञांनीं या मतास तिलांजली दिली आहे. द्रविड देशाखेरीज इतर ज्या ज्या ठिकाणीं विक्रमोर्वशीयाचीं हस्तलिखितें सांपडलीं आहेत त्या सर्वांत हा अपभ्रंशाचा भाग आहे. द्रविडदेशीय हस्तलिखितें मूळांत कधीं भर घालतात तर कधीं त्याची वाटेल तशी छाटाछाट करतात, ही त्यांची धरसोड त्यांस सर्वथैव विश्वसनीय मानण्याच्या आड येते.

विक्रमोर्वशीयांतील अपभ्रंशाशिवाय, प्राकृतपिङ्गल नामक प्राकृत छंदोग्रंथांत अपभ्रंशाचे मासले बरेच आहेत. हे उदाहरणात्मक असल्यामुळें, निरनिराळ्या ग्रंथांतून घेतलेले असावे असें दिसतें.

काहीं सुभाषित स्वरूपाचे आहेत व कांहीं ऐतिहासिक आहेत. उ०

माणिणि माणहिँ काइँ फल
एओ जे चरणे पडु कंत ।
सहजे भुअंगम जइ णमइ
किं करिए मणिमंत ॥ १.६

अर्थ. हे मानिनि, जर कांत तसाच ( तुझ्या ) चरणीं पडत असेल तर मान ( रुसवा ) धरण्याचें काय कारण ? सहज जर भुजंग नमत असेल तर मणि–मंत्र काय करावयाचे आहेत ?

जे ऐतिहासिक आहेत ते बहुतेक हम्मीर राजाच्या पराक्रमा विषयीं आहेत, व ते कोठल्या तरी काव्यांतून घेतले असावे असें वाटण्यास जागा आहे.

यानंतर अपभ्रंश उदाहरणें हेमचन्द्राच्या व्याकरणांत थोडीशीं आहेत. हेमचन्द्र ४ ३२९ ते ४४६. तींसुद्धां त्यानें कोठून तरी घेतलीं असलीं पाहिजेत.

उ. दहमुहु भुवणभयंकरु केसिअर्ध करु णिगाउ रहवरि चडियउ । चेउमुहु छम्मुहि झाइलि एक्कहिं लाइवि णाव दइवें घडियउ॥

शिवाय भट्टिकाव्याच्या धर्तीवर आपल्या व्याकरणास धरून हेमचन्द्रानें कुमारपालचरित नांवाचें प्राकृत काव्य लिहिलें आहे, त्यांत आठव्या सर्गांत श्लो, १४ पासून ८३ पर्यंत ( सर्ग अखेरपर्यंत ) सर्व अपभ्रंशांत आहेत. त्याचे एकदोन मासले येथें देतों.

साहुवि लोउ तडप्फडइ, सव्वुवि पण्डिउ जाणु ।
कवणुवि एहु न चिन्तवइ, काइंवि जं निव्वाणु ॥ ८.३० ॥

---

१ बॉम्बे संस्कृत सीरिज्, नं. ६०

'सर्व लोक ( निर्वाणासाठीं ) तडफडतात, सर्वच पण्डित। पण, ( हे कुमार-पाळा) लक्षांत ठेव, कीं कोणीसुद्धां निर्वाण कसें आहे या विषयीं विचार करीत नाहीं.

अम्हहँ मोहपरोहु गउ, संजमु हुउ अम्हासु ।
विसय न लोलिम महु करहिँ म करहि इह वीसासु ॥ ८०४० ॥

'आमचा मोह ( प्ररोह ) गेला; संयम आमच्यांत उत्पन्न झाला. ( तरी ) विषय मला ( आपले ठिकाणीं ) लोलुप करणार नाहींत. असा विश्वास धरूं नको.

जैन लोकांचें अर्धमागधी प्राकृतांत पुष्कळ वाङ्मय आहे. त्यांच्या आगम, ग्रंथांवरील कांहीं प्रमुख टीकाही प्राकृतांत आहेत. अशा टीकांतून मधून मधून अपभ्रंश उतारे घेतलेले आहेत. याकोबीच्या 'एर्त्सेलुंगेन' नांवाच्या जैनप्राकृत उताऱ्याच्या पुस्तकांत पांच चार अपभ्रंश श्लोक सांपडतात, त्यांविषयीं त्यानें शेवटीं वेगळा निर्देश केला आहे.

अपभ्रंशांतही जैन लोकांनीं बरेचसे ग्रन्थ रचिले असावे असें म्हणण्यास सबळ पुरावा प्रसिद्ध होऊं लागला आहे.

'भविसयत्तकहा' नामक धनपाल कवीचा अपभ्रंश भाषेंतील ग्रंथ गायकवाड ओरिएंटल सीरीज मध्यें प्रसिद्ध होत आहे. हा धनपाल आपणांस 'सरसइलाद्धवहुवर' असें आढ्यतेनें म्हणवितो. आपण 'धक्कड वणिग् वंशांत जन्मलों असून, आपल्या पित्याचें नांव 'माएसर ( मायेश्वर ) व आईचें नांव 'धणसिरि ( धनश्रीः ) आहे असें यानें २२ व्या संधींत ९ व्या पद्यांत म्हटलें आहे. फक्त एवढ्या वरूनच त्याचा काल निश्चित करणें शक्य नाहीं. एवढें मात्र खरें कीं हा व 'पाइअलाच्छी कर्ता' धनपाल एक नव्हत. पाइअच्छी-कार ब्रह्मदेवाला आरंभीं नमस्कार करतो तो ब्राह्मण असावा. आमचा धनपाळ वणिग् असून जैनधर्मी आहे. शिवाय दोन्ही धनपालांच्या वडिलांची नांवें निराळीं आहेत. दुसऱ्याच्या बापाचें नांव सर्वदेव. दुसरा धनपाल दहाव्या शतकाचे शेवटीं होऊन गेला हें त्याच्या 'विक्कम कालस्स गए अउणत्तीसुत्तरे सहस्सम्मि' या पाइअलाच्छीच्या शेवटच्या श्लोकावरून सिद्ध होतें. असो.

याची अपभ्रंश भाषा लौकिकवळण सोडून चालली असून, ती किंचित नागर अगर संस्कृतप्राय स्वरूप धारण करीत होती हें खालील उताऱ्यावरून दिसून येईल.

अइठहुरुहियविरलियगर्त्ते णियणंदणु सिक्खवइपयत्तें ।
पइं विणु मज्झु कालु अइदुत्तरु होसइ विणु विनाइं संवच्छरु

---

१ प्रसिद्ध करणारे रा. दलाल हे अकालीं वारले. पण त्यांनीं आपलें काम बहुतेक संपविलें असल्यामुळें रा. ज. स. कुडाळकर, क्युरेटर, सेन्ट्रल लायब्ररी बरोडा-यांच्या कृपेनें मला त्याचीं शेवटलीं पृष्ठें पहायाला मिळालीं.

२ प्रकाशक भी. भी. आणि कंपनी भावनगर संवत् १९७३

अज्जवि पुत्र निरारिउ चालु दूरविएस तुज्झुको कालु
दिटु होज्झहि उत्तमगुणवग्गहो रक्खिज्जहि लंछणु कुलमग्गहो
होइ जुवाणभाउ सविचारउ अमुणिअकज्जाकज्ज पयारउ
चलतियमइहि पवड्ढियमाणहु गयवइयहं दूहवहं जुवाणहु
वहुरइ वयणालाउ ण किज्जइ जंपंतिहु महियलु जोइज्जइ
णयणइं होति जुवाणहं मुद्धउ तरुणिवयणदरुणरसलुद्धउ ॥
जोव्वणपिंगाररसवसपसरि सो सूरउ सो पंडियउ ।
चलमम्मणवयणुल्लावएहि जा परतियहिं त खंडियउ ॥ ३, १८

यांत 'उ' अन्त प्रथमेचें एकवचन 'हो' अन्त षष्ठी एकवचन 'हं' अंत षष्ठी अनेक वचन 'हिं' अंत तृतीया अनेकवचन इ० अपभ्रंशाच्या खास खुणा आहेत; पण लौकिक भाषेत जवळ जवळ अपरिचित असे लांब लांब समास यांत दिसून येतात. कोणत्याही बोलत्या भाषेला यांत्रिक स्वरूप येऊं लागलें म्हणजे तिचें असेंच होतें.

यानंतर आजवर शोधकांच्या नजरेस न आलेल्या एका चिमुकल्या ग्रंथाचा उल्लेख करावयाचा आहे. याचें नांव संयममंजरी-कर्ता महेश्वरसूरि. याचा काळ निश्चित नाहीं. पण टीकासहित हस्तलिखित प्रतच ज्या अर्थी संवत १५६१ सालीं लिहिली गेली आहे त्या अर्थी टीकाकार त्यापूर्वी होऊन गेला असला पाहिजे व मूळ ग्रंथकार त्याहीपूर्वी असला पाहिजे. याच ग्रंथकाराचें 'कालिकाचार्यकथा' नांवाचें दुसरें पुस्तक संवत् १३६५ सालीं लिहिलें गेलें आहे. त्याअर्थी तो त्यापूर्वी २।३ शतकें तरी-होऊन गेला असला पाहिजे.

संयममंजरी हा ग्रंथ 'दोहा' वृत्तांत लिहिलेला आहे. श्लोकसंख्या फक्त ३५ सच आहे. भाषा शुद्ध अपभ्रंश आहे. उ०

संजमु सुरसाद्धिहिं सुभउ संजमु मोक्खदुवारु ।
जेहिं गा संजमु माणि धरउ तहं दुत्तर संसारु ॥ २
विरमणु पंचहं आसवहं इंदियनिग्गह जत्थ ।
सकसायहं दंडहं दमणु सतरस संजमु तत्थ ॥ ४
अलिउ म जंपहु दुव्वयणु पर दूमिज्जइ जेण
वसु नरवइ नरइहिं रायउ अलिउब्भवदोसेण ॥ ६
जइं पाणइं संसइ पडइ जइ निव्वाहु न अत्थि
तहवि अदिन्नु म रंगहासि जं दूसिउ जिणसत्थि ॥ ७
पंचासवविरमणु करहि करहि म निग्घण पाउ ।
सिद्धिपुरंधिहि उवरि जइ तुज्झ पइट्टइ भाउ ॥ १०
गीय म रंजहि मणरयण सुणवि मणोहर गेउ ।
स्वरनिट्ठुरसद्दावसीर मा करि माणि उव्वेउ ॥ १६

इ० यांतील प्रथमेचें एकवचन व जुन्या मराठींतील प्रथमेचे एकवचन हीं सारखींच आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पुढील मराठीनें 'उ' प्रत्ययही गाळून टाकला आहे. पण ही प्रवृत्ति अपभ्रंशांतही थोडथोडी होती हें वरील उतान्यांतील 'दुत्तर,' 'सतरस', 'पर' या प्रथमांत विशेषणें वगैरे वरून दिसून येतें.

या ग्रंथ वरील टीका अपभ्रंशाच्या दृष्टीनें फार महत्त्वाची आहे. टीकेंत इतर उतान्यांबरोबर अपभ्रंश उतारे फार आहेत व ते गोष्टी, कथानकें यांतून घेतले असावे असें दिसतें; कांहीं सुभाषित स्वरूपाचे हि आहेत. उ०

( १ ) रासहु कंधि चडावइयइ लब्भइं लत्त सहस्स
आपहणे करि कम्मडां हिआ विसूरहि कस्स । ४४

( २ ) दिवसि पहिल्लइ पाहुणउ सोनासमु वीकाइ
बजिइ सोनइ पालटइ तीजइ रीरीघाइ । १३
दिवसि चउत्थइ पंचमइ जइ घरहुं तइ न जाइ
घरह गुसाइणि इम भणइ लउंडी बइठ खाइ ॥ १४

पृष्ट ५४.

अर्थ ( १ ) 'जो गाढवाला खांद्यावर चढवतो त्याला हजार लाथा मिळतात. आपणच कर्म केल्यावर हे हृदया तीं कोण निस्तरणार' ?

( २ ) 'पहिल्या दिवशीं पाहुणा सोन्याप्रमाणें विकतो. दुसऱ्या दिवशीं तें सोनें ( त्याची कळा ) पालटतें. तिसऱ्या दिवशीं ( त्याचें ) पितळ होतें. चवथ्या पाचव्या दिवशीं जर तो घरांतून गेला नाहीं, तर घरधनीण म्हणते 'हा लौंडी ( तेवढी ) बसून खाते.'

हीं उदाहरणें टीकेंतलीं. हा टीकाकार जैन आगमां खेरीज स्मृति, पुराणें, भर्तृहरीचीं शतकें इत्यादि कथांतून नेहमीं उतारे देत असतो. अपभ्रंशाचेही उतारेच आहेत; हे त्यानें त्याच्या वेळीं विपुल असलेल्या अपभ्रंश वाङ्मयांतून घेतले असले पाहिजेत हें उघड आहे.

'संयममंजरी' शिवाय आणखी कांहीं अपभ्रंश ग्रंथांची हस्तलिखितें अलीकडे सांपडलीं आहेत. तीं पाटण येथील समृद्ध भांडारांत आहेत, व म्हणून आपणांस अलभ्यच जवळ जवळ आहेत. तीं येणें प्रमाणें.

१ भवियकुटुंब ( जिनप्रभाचें ) २ चउरंगसंधि, ३ भावनासंधि, अंतरंगसंधि ( तिन्ही मिळून १७ पृष्ठें ), ५ दंडण, ६ धर्माधर्मविचार-कुलक ७ दानादिकुलक

---

१ हे उतारे डे. कॉ. मॅ १३५/१८८६ या हस्तलिखितांतून घेतले; पृष्ट ८२.

२ ही माहिती मला रा. ज. स. कुडाळकर, क्यूरेटर बरोडा लायब्ररी यांचेकडून मिळाली.

( तिन्ही मिळून ३ पृष्ठें ) परमात्मप्रकाश ( १९ पृष्ठें ) ३३० दोहे ९ आराधना ( ११४ संधि १८ पृष्ठें ) पृष्ठसंख्येवरून हीं लहानलहानच दिसतात. या सर्वांचे कर्ते जैन आहेत. संयमंजरीकर्तीहि जैन आहे, टीकेंतील उतारे कोणाचे हे कळणें आज कळणें शक्य नसलें तरी त्यांतील गोष्टी जैनांच्या आहेत. यावरून अपभ्रंश भाषेचा जैनाशीं फार निकट संबंध होता असें दिसतें अथवा शास्त्रीय भाषेंत बोलावयाचें म्हणजे गुजराथ राजपुताना येथील जैन लोकांची अपभ्रंश भाषा म्हणजे शौरसेनी अपभ्रंश भाषा या ग्रंथांतून दिसून येते. इतर अपभ्रंशांचे ग्रंथ अद्यापि उपलब्ध नाहींत.

हे ग्रंथ छापून निघणें भाषाशास्त्राच्या दृष्टीनें अत्यंत जरूरीचें आहे. त्यामुळें अपभ्रंश वृत्तें दोहा, साटक, चउपाइ इ० व अपभ्रंश व्याकरण यांचें खास स्वरूप पूर्वीपेक्षां जास्त निश्चयानें ठरवितां येणार आहे. यापैकीं भविसयत्तकहा अथवा सुयपञ्चमीकहा हा ग्रंथ गाइकवाड ओरिएंटल सीरीजमध्यें छापत असून त्याच्या प्रुफांचा उपयोग या निबंधांत मला झाला आहे.

याशिवाय १ 'संदेशरासक, २ 'नेमिरास' ३ वइरसामिमुनिवरचरिउ (वज्रस्वामिमुनिवरचरित्र ), ४ सुलसचरिउ ( सुलसचरित्र ), ५ चर्चरी ( जिनवल्लभस्तुति ) ६ भावनासार, ७ योगसार ( योगचन्द्र ) ८ सत्यपुरमंडनमहावीरोत्साह, ९ पउमसिरिचरिउ, ( लिखित ११९१ सं ) १० संदेशरासक ( कांहीं प्राकृत व कांहीं अपभ्रंश ) व इतर त्रोटक जिनचरित्रें वगैरे पाटण भांडारांत असल्याविषयीं उल्लेख के.[1] रा. दलाल यांनीं गुजराथसाहित्यपरिषदेपुढें वाचलेल्या आपल्या निबंधांत केला आहे.

पां. दा. गुणे.

## एक फार जुना मराठी शिलालेख

पुढील शिलालेख मला भीमातीरीं देऊळगांव राजे मुक्कामीं एक जुनें पडकें नक्षीदार देऊळ आहे तेथें आंतल्या बाजूस उजवे बाजूचे दगडी तुळवटावर आढळला. लेख लहान पण अगदीं स्वच्छ आहे. तो उतरण्याचे कामीं माझे मित्र व आपले सभासद रा. पं. रा. आळेगांवकर यांनी बहुत मदत केली.

लेख येणेप्रमाणें आहे.

---

१ बडोदा सेंट्रल लायब्ररीकडील एडिटोरियल ब्रँचचे मुख्य.

सो(?) ख(?) स ली प व ॰
न य कु । दे उ ल क व।
वी ले मो(?) द(?) ल ड म ॰

सदर लेख ६ × ४ इंच आहे. ओळी तीन आहेत. अक्षरें २३ असावींत. त्यांत ['वि?] इनयकु । देउल करवीले' एवढा मजकूर मला वाचतां आला. बाकी अक्षरें स्पष्ट व कोरीव असून हि त्यांच्या स्वरूपाचा व अर्थाचा धागा कांहींच सांपडत नाहीं व त्यामुळें मला त्यांची ओळख पटत नाहीं. टिपकागदार दाबून काढलेल्या व इतर प्रकारच्या या लेखाच्या प्रतिमा मी आज आपणापुढें ठेवीत आहे. ॰ हें 'ई' चें रूप फार जुनें म्हणजे अशोकापासून चालत आलेलें आहे व तें या लेखांत दोनदां आलेलें आहे. शेवटच्या ओळींत पृष्ठमात्रांकित 'ल' आहे. तोहि इतर साधनांचे अभावीं लेखाचा कालनिर्णय करण्यास उपयुक्त होणारा आहे. रा. राजवाडे यांनी येथून पांच सात कोसांवर असलेल्या पळसदेव येथील देवळावरील एक जुना शिलालेख मिळविला आहे. कदाचित् प्रस्तुतचा देऊळगांव येथील हा शिलालेख त्याच सुमाराचा असावा. लेखाचे शेवटचे ओळींत 'मोद्रले' असे शब्द वाचल्यास शेजारीच भीमे पलीकडे प्रसिद्ध आरवी मुद्गलेश्वराचें स्थान आहे त्याची आठवण होते.

अक्षरवटिके वरून व पृष्ठमात्रादि प्रमाणांवरून असा तर्क संभवतो कीं सदर लेख शक १० शें पासून १२ शें पर्यंत केव्हांतरी कोरला गेला असावा. 'देउल करवीले' हें यांतील मराठी वाक्य स्पष्ट आहे. या दृष्टीनें पाहतां या लेखाचें फार कौतुक वाटण्यासारखें आहे. जरूर तर पुन: एकदां छापवून मांडीन म्हणतों. पहिल्या ओळींतील अक्षरें 'भोयसलीय' असूं शकतील काय? हा गांव भोसल्यांचा आहे.

दत्तो वामन पोतदार

## संस्कृतफारसी कोश ( पारसीप्रकाश )

या महत्वाच्या संस्कृतफारसी कोशाची ही हस्तलिखित प्रत मी मंडळास आज नजर करीत आहे. याची पानें १० आहेत. शेवटीं म्हटलें आहे कीं:—

"इति कस्परासकृत पारसी प्रकाशे
शब्दार्थकोशप्रकरणं समाप्तम् संवत् १९१४
पंडित आराध्यदामोदरस्येदं पुस्तकम्"
यांत १५६ श्लोक आहेत. नमुना असा:—
"पात्शाहीच विभूतौ यस त्साहिबीसाति गद्यते ।
आवह यात पयूषे तू वा कल्पतरौ भवेत् इ."

महंत दत्तराज कवीश्वर महानुभाव.

# सप्तमसम्मेलन व मंदिरोद्घाटनसमारंभ.

(शके १८४१)

मि. ज्येष्ठ शुद्ध १, शुक्रवार तारीख ३० मे १९१९ या दिवशीं सकाळीं ७॥ वाजतां इ. सं. मंडळाचे सप्तमसंमेलनास सुरवात झाली. यंदा संमेलनासाठीं, मंडळानें नवीनच भाड्यानें घेतलेल्या सदाशिव पेठेंतील बखळींत प्रशस्त मंडप उभारला होता; व त्याच जागेवर मंडळासाठीं बांधावयाच्या इमारतीपैकीं पश्चिमपाखें बांधून झालें होतें. त्याचा उद्घाटनसमारंभहि आज प्रारंभींच श्री. रघुनाथराव शंकरराव ऊर्फ बाबासाहेब पंडित पंतसचिव, युवराज संस्थान भोर यांचे हस्तें झाला. संमेलन पुढें शनिवार व रविवार असे आणखी दोन दिवस चाललें होतें. या दोन्ही समारंभास सभासद व निमंत्रित पाहुणे बरेच हजर होते. सभासद जुने व नवीन संमेलनांत झाले त्यांपैकीं जे हजर होते ते येणेंप्रमाणें:—

(१) रा. नानासाहेब वैद्य–कल्याण (उपाध्यक्ष) (२) श्री. तात्यासाहेब मेहेंदळे (चिटणीस), (३) श्री. आबासाहेब मुजुमदार, (४) रा. दत्तो वामन पोतदार, (चिटणीस), (५) रा. आबा चांदोरकर (जळगांव), (६) रा. पांडोबा पटवर्धन, (७) रा. बाबा दिवेकर (कल्याण), (८) रा. शंकरराव जोशी, (वांई) (९) रा. वासुदेवराव जोशी (सातारा), (१०) रा. वामनराव फातरफेकर (बेळगांव), (११) रा. सखारामपंत जोशी, (१२) रा. रामकृष्णपंत पराडकर, (१३) रा. अनंतराव गद्रे, (१४) रा. बापूसाहेब भागवत (अमळनेर), (१५) रा. पु. ग. जोशी, (१६) रा. दत्तोपंत आपटे (१७) रा. पां. वा जोशी (द. हैद्राबाद), (१८) रा. रा. आ. जोगळेकर, (१९) रा. श्री. नी. चापेकर (एलिचपूर), (२०) रा. बाबूराव गणपत जगताप, (२१) रा. शं. ह. मुळे, (२२) रा. मनोहरपंत अभ्यंकर, (२३) रा. दा. वि. गोखले, (२४) रा. नरसोपंत केळकर, (२५) रा. वासुदेवशास्त्री खरे (मिरज), (२६) रा. वामनराव पटवर्धन, (२७) रा. दादा साठे, (२८) रा. ग. सि. देवधर, (२९) रा. त्र्यं. सि. कारखानीस, (३०) रा. रा. ज. गोखले, (३१) रा. विष्णु बाबा अक्कलकोटकर, (३२) रा. श्री. गो. काळे (फलटण), (३३) रा. ह. र. भागवत, (३४) रा. अनंतराव फडणीस, (३५) रा. य. गो. दीक्षित, (३६) रा. कृ. प्र. खाडीलकर, (३७) श्री. म. मो. फडणीस, (३८) वै. कृष्णशास्त्री कवडे, (३९) प्रो. शिवरामपंत परांजपे, (४०) रा. भाऊराव आलेगांवकर, (४१) रा. धों. कृ. साठे, (४२) रा. बर्वे (मुंबई), (४३) रा. रा. भि. जोशी, (४४) रा. ग. स. मराठे, (४९) रा. घारपुरे (मुंबई), (५०) प्रो. पां. वा. काणे (मुंबई), (५१) रा. मा. गो. भिडे, (५२) रा. वा. प. मेहेंदळे (औंध),

५३ ) वै. नानल, ( ५४ ) रा. सी. के. दामले, ( ५५ ) मिया आतार ( भिलवडी), ( ५६ ) नामदार रा. ब. ग. कृ. साठे ( सोलापुर ), ( ५७ ) नामदार केशवराव ( नि. हैद्राबाद ), ( ५८ ) ना. गोपाळराव बोरगांवकर ( गुलबर्गा ), ( ५९ ) प्रो. गं. गो. कानेटकर ( जबलपूर ), ( ६० ) डॉ. पां. दा. गुणे, ( ६१ ) रा. ब. पारसनीस ( सातारा ), ( ६२ ) बॅ. पुणतांबेकर ( उमरावती ), ( ६३ ) प्रो. वै. का. राजवाडे, ( ६४) प्रो. भानू, ( ६५ ) डॉ. पळसुले, ( ६६ ) प्रो. तुळपुळे, ( ६७ ) डॉ. लोहोकरे, ( ६८ ) प्रो. कुंभारे, ( ६९ ) प्रो. सबनीस, ( ७० ) प्रो. नाईक, ( ७१ ) रा. गोविंदराव सरदेसाई. ( बडोदें ), ( ७२ ) रा. गो. ज. फणसाळकर ( सातारा ), ( ७३ ) रा. द. कृ. देवधर, ( ७४ ) रा. उ. रं. ओझा, ( ७५ ) रा. विठ्ठल रामजी शिंदे, ( ७६ ) रा. ह. के. गोखले ( मुंबई ), ( ७७ ) रा. कृ. मो. फाटक, ( ७८ ) रा. बा. शं. नवांगुळ ( कऱ्हाड ), ( ७९ ) डॉ. बेलवलकर, ( ८० ) राजा धर्मपाल बहादुर ( चिंचोली ), ( ८१ ) रा. ल. ब. फाटक, ( ८२ ) रा. कृ. पां. लिमये, ( ८३ ) रावसा. कीर्तने, ( ८४ ) रा. त्र्यं. रा. शेजवलकर, (८५ ) रा. बाबूराव सहस्रबुद्धे, ( ८६ ) रा. न. र. फाटक ( मुंबई ), ( ८७ ) रा. गो. वि. आपटे, ( ८८ ) प्रो. वा. गो. परांजपे, ( ८९ ) रा. ल. ब. भोपटकर, ( ९० ) श्री. नानासाहेब चंद्रचूड, ( ९१ ) श्री. बाळासाहेब पुरंदरे, ( ९२ ) रा. वासुदेवराव बेंद्रे, ( ९३ ) रा. वि. म. भट, ( ९४ ) प्रो त्रिं. भि. हर्डीकर, ( ९५ ) रा. गोविंद अनंत मोडक, ( ९६ ) रा. सा. वि. त्र्यं आगाशे, (९७) रा. ज. स. करंदीकर ( ९८ ) रा. सा. वि. अ. पटवर्धन, ( ९९ ) रा. राजापुरकर ( अहमदनगर ), ( १०० ) प्रो. र. दा. करमरकर, ( १०१ ) प्रो. विजापूरकर, ( १०२ ) रा. विनायकराव भावे ( ठाणे ), ( १०३ ) महंत दत्तराज कवीश्वर महानुभाव, ( १०४ ) रा. अ. वा. बरवे, (१०५) रा. मुकुंदशास्त्री मिरजकर ( १०६ ) रा. शंकरराव वैद्य, ( १०७ ) रा. सा. स. शि. पोरेडी, ( १०८ ) श्री. भोसले राजे अक्कलकोटकर, ( १०९ ) रा. ब. वा. ग. राळे

या खेरीज पाहुणे मंडळी हि पुष्कळ होती.

**शुक्रवार** सकाळीं ७॥ वाजतां कारभारी मंडळानें श्री. बाबासाहेब यांचें यथोचित स्वागत करून त्यांस उच्चासनावर बसविलें. नंतर मंडळाचे एक उपाध्यक्ष रा. नानासाहेब वैद्य यांनीं स्वागतपर भाषण करून श्रीमंतास मंदिर खुलें करण्याची विनंती केली. ते म्हणाले:—

मंडळाचे कायमचे अध्यक्ष रावबहादूर बाबासाहेब साने यांना प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें हजर राहतां आलें नाहीं त्याबद्दल त्यांना व आपल्या सर्वांना विषाद वाटत आहे. त्यांच्या गैरहजरींत मी मंडळातर्फे श्रीमंतांचे व आपल्या सर्वांचे येथें येऊन आमच्या समारंभास हजर राहिल्याबद्दल आभार मानतों. आमचें मंडळ अत्यंत उप०

यक्त कार्य करीत आहे हें आपण जाणत च आहां. आपल्या किंवा कोणत्या हि देशाला त्याचा खरा इतिहास उपलब्ध असणें अत्यंत जरूर आहे. तो जसा सत्य तसा विश्वसनीय हि असला पाहिजे. प्राचीन ऐतिहासिक माहिती असावी तशी उपलब्ध नसल्यानें हें इतिहाससंशोधनाचें काम विशेष काळजीनें व मेहनतीनें झालें पाहिजे रा. विश्वनाथपंत राजवाडे व वासुदेवशास्त्री खरे हे अगदीं आरंभापासून या कामीं झटत आहेत. यांच्या हि आधीं या कामाचे आद्यप्रवर्तक रा. विष्णु शास्त्री चिपळोणकर, आपले अध्यक्ष बाबासाहेब सानें, कीर्तने, मोडक ही मंडळी होत. जुने कागदपत्र धुंडाळून खरी ऐतिहासिक माहिती मिळविणें हें काम अत्यंत स्फूर्तिदायक व उपयुक्त आहे. ज्या राष्ट्राला मागील इतिहास नाहीं त्याला पुढील हि इतिहास बनवितां येणार नाहीं. विशेषतः महाराष्ट्राच्या इतिहासाचें संशोधन करण्याचा आमच्या मंडळाचा मुख्य प्रयत्न आहे. आजचा दिवस या मंडळाच्या इतिहासांत महत्वाचा आहे. मंडळ आज स्वतःच्या घरीं आलें आहे. इतके दिवस श्री. तात्यासाहेब मेहेंदळे यांच्या वाड्यांत त्याचा कारभार थाटलेला होता. त्यांनीं सर्व प्रकारची अडचण सोसून मंडळाला हरएक प्रकारची मदत केली; अपत्या प्रमाणें मंडळावर त्यांनीं प्रेम केलें, या बद्दल आपण त्यांचे आभारी आहों. मंडळाचा प्रपंच लहान होता तेव्हां त्याला आप्पाबळवंतवाडा पुरेसा होता. परंतु मंडळ जसजसें वर्धिष्णु होत चाललें तसतसें तें ठिकाण अपुरें पडून मोठ्या जागेची आवश्यकता भासूं लागली. नवीन च जागा घ्यावयाची तर स्वतःची च जागा घेऊन बांधावी अशी इच्छा मंडळांतील प्रमुख मंडळीला झाली आणि त्या दिशेनें त्यांनीं आज दोन वर्षें परिश्रम चालविले. त्याला यंदा मूर्त स्वरूप आलें. मंडळाच्या इमारतीसाठीं पट्टी गोळा करून तूर्त योजलेल्या भव्य मंदिराचें पश्चिमपार्श्व तेवढेंच बांधून पुरे केलें. या कामांसच अजमासें नऊ हजार रुपये खर्च आला. मंदिराचा हा भाग उघडण्याचा समारंभ श्री. युवराज बाबासाहेब पंतसचिव संस्थान भोर यांच्या हस्तें आज व्हावयाचा आहे. राजाराममहाराजांच्या कारकीर्दीत महाराष्ट्रावर ओढवलेल्या दुर्धर प्रसंगांत ज्या कर्तृत्वशाली पुरुषांनीं हिंदुपद्पाच्छाई कायम राखिली त्यां मध्यें शंकराजी नारायण पंतसचीव हे प्रमुख होते. तेव्हां त्यांच्याच त्या ऐतिहासिक वंशांतील पुरुष आजचा हा ऐतिहासिक अनावरणसमारंभ करण्यास आपणास लाधला हें आमचें सुदैव होय. तेव्हां, श्रीमंतांनीं आजच्या समारंभाची मुख्य गोष्ट म्हणजे ही आपल्या समोरील इमारत उघडावी अशी मी त्यांस मंडळा तर्फे व आपणा सर्वां तर्फे विनंती करितों.

या नंतर **श्रीमंत बाबासाहेब** यांनीं पुढील प्रमाणें भाषण केलें:—

रावबहादुर वैद्य व इतर सभ्य गृहस्थ हो।

आज जेथें आपण येथें का जमलों आहोंत याचें कारण रावबहादुर वैद्यांनीं आपणांस निवेदन केलें च आहे. आजच्या शुभ प्रसंगीं भारतइतिहाससंशोधकमंड-

ळानें बांधलेल्या इमारतीचा प्रवेशसमारंभ करण्या संबंधानें मजला केलेल्या आज्ञेस अनुसरून मी येथें हजर राहिलों आहें.

आज पर्यंत इतिहाससंशोधनाच्या कामीं ज्यांनीं अव्याहत परिश्रम केले आहेत असे अधिकारी पुरूष आजच्या महत्त्वाच्या कामगिरीस सर्वपरीनें लायक असतांना ती कामगिरी मजकडे कां सोंपविण्यांत आली तें मला समजत नाहीं.

ज्या अधिकारी पुरुषांचा मी उल्लेख केला ते विद्वत्तेमध्यें व इतिहासाच्या ज्ञानामध्यें मज पेक्षां किती तरी पटीनें श्रेष्ठ आहेत. शिवाय, त्यांनीं द्रव्यरूपानें व पुस्तकरूपानें संस्थेस वेळोवेळीं मदत केली आहे, तशा प्रकारची मदत हि मजकडून झालेली नाहीं. या प्रमाणें सर्व बाजूंनीं मजमध्यें वैगुण्य असतां आजच्या महत्वाच्या कामीं आपण माझी योजना केली या बद्दल मी आपले जितके आभार मानावेत तितके थोडे च आहेत. माझ्या समजुतीनें माझ्या वर ही कामगिरी सोंपविण्याचा मंडळाचा हेतु इतकाच असावा कीं, आज पर्यंत मी इतिहासा मध्यें विशेष लक्ष्य घातलें नव्हतें, तें घालण्यास मला भाग पाडावें। आणि एवढा च हेतु असेल तर मी आपल्या सामर्थ्यां प्रमाणें द्रव्यद्वारां व शरीरद्वारां इतिहासदेवीचें अर्चन करण्याचें आज आपल्याला अभिवचन देतों. देशहिताच्या प्रगतीचें कोणतें हि कार्य, कोणत्या हि व्यक्तिवर पडलें तर त्या हि व्यक्तीनें तें करण्याचें टाळूं नये व आपल्या सामर्थ्यां प्रमाणें तें पार पाडावें हें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य होय. त्यास अनुसरून मी हें काम करण्याचें कबूल केलें; तरी मंडळ हें काम मजकडून करवून घेईल अशी मला आशा आहे।

आजचा प्रवेशसमारंभ करण्या पूर्वीं, इतिहासाचें महत्व काय आहे व या मंडळानें कोणतें कार्य आतां पर्यंत केलें या बद्दलचे माझे विचार मी थोडक्यांत आपणां पुढें ठेवतों. या बद्दल मज पेक्षां आपणा पैकीं बऱ्या च जणांस पुष्कळ माहिती असेल, तथापि आजचे प्रसंगास अनुसरून, मी आपली माहिती मंडळी पुढें सादर केल्यास तें अप्रस्तुत न होतां, माझ्या कर्तव्यापैकींच तो एक भाग आहे असें माझ्या प्रमाणेंच आपण हि मानाल। माझें भाषण वक्तृत्वपूर्ण अगर विद्वत्ता-प्रचुर होणार नाहीं हें मी प्रथमच आपल्याला सांगतों; तथापि, आपण तें गोड करून घ्याल अशी पुन्हां एकदां आपल्याला विनंती करून, मी आजच्या विषया-कडे वळतों.

## इतिहास म्हणजे काय ?

'इतिहास' हा शब्द 'इति ह आस' या संस्कृत शब्दांचा संधी होऊन झालेला आहे; आणि त्याचा अर्थ असें असें होतें किंवा होऊन गेलें असा आहे. परंतु, या अर्था वरून विषयाचा पूर्ण बोध होत नाहीं. संस्कृत भाषेंत एके ठिकाणीं इतिहासाची व्यापक व्याख्या दिली आहे ती अशीः—

धर्मार्थकाममोक्षाणामुपदेशसमन्वितम् ।
पूर्ववृत्तं कथायुक्तमितिहासं प्रचक्षते ॥

या व्याख्ये प्रमाणें इतिहास म्हणजे, पूर्व काळीं घडलेल्या यच्चयावत गोष्टींचें सांगोपांग वर्णन असून चतुर्विध पुरुषार्थ साधण्या साठीं उपदेशपर रचलेला असा प्रबंध. या वरूनच इतिहासास धार्मिक स्वरूप प्राप्त होऊन त्याचे संबंधानें पावित्र्याची भावना आर्यांत होती. परंतु, प्रस्तुत कालीं इतिहास याचा अर्थ धार्मिक स्वरूपाचा प्रबंध असा करण्यांत येत नाहीं. पाश्चात्य देशांत इतिहासास History असें म्हणतात. History हा शब्द ग्रीक भाषेंतील धातू पासून झाला असून, त्या धातूचा अर्थ "शोध करून मिळविलेली माहिती" असा आहे. प्राचीन ग्रीस, इटली वगैरे आणि अलिकडील प्रसिद्धीस आलेलीं पाश्चात्य राष्ट्रें यांत वरील अर्थास अनुसरून इतिहासाची रचना झाली आहे. प्रथमतः वरील शब्दाचा अर्थ, "गतकालीं घडलेल्या गोष्टींचें वर्णनपर लेखी टिपण" असाच होता; परंतु, कालांतरानें इतिहास या शब्दाच्या अर्थाची व्यापक कल्पना बनत गेली. सध्यां ती व्यापक कल्पना काय स्वरूपाची आहे हें पुढें दिलेल्या व्याख्ये वरू समजून येईलः-

History (of which biography is a part) covers all that man has thought and felt and said and planned and achieved. It is the best mirror of human nature, it describes human nature not as we fancy it but as it is. It reveals to us not only what has been, but how that which is has come to be what it is. It helps to explain to us our generation as well as those that have gone before." (James Bryce.)

ही व्याख्या यथार्थ असली तरी त्या मुळें इतिहास या शब्दांत किती अर्थ भरला आहे त्याचा सहज बोध होत नाहीं. या पेक्षां इतिहासाची खुलसेवार व्याख्या कोलब्रुक यानें दिली आहे ती एणें प्रमाणें:—

In speaking of history, I do not refer merely to the succession of political struggles, national conflicts and warlike achievements, but rather to less conspicuous yet more important occurrences, which directly concern the structure of society, the civil institutions of nations; their internal, more than their external relations and the yet less prominent but more momentous events, which affect society universally and advance it in the scale of civilized life. It is the history of the human mind, which is most

diligently to be investigated, the discoveries of the wise, the inventions of the ingenious and the contrivances of the skilful.

अर्थपूर्ण व विनोदपर अशी इतिहासाची व्याख्या करूं म्हटलें तर "इतिहास म्हणजे गतकालीन समाजाचा सिनेमांतील चित्रपट" याप्रमाणें होईल. रा. सरदेसाई म्हणतात, "केवळ राजकीय उलाढालींच्या वर्णनानें इतिहास परिपूर्ण होत नाहीं. राज्यव्यवस्था, धर्म, समाज, भाषा, ग्रंथसंग्रह व्यापार इत्यादि अनेक विषयांचा विचार इतिहासांत झाला पाहिजे."

## इतिहासाचा उपयोग

येथपर्यंत इतिहास म्हणजे काय व त्यांत कोणत्या विषयांचा अंतर्भाव होतो त्याचें विवेचन केलें. आतां इतिहासाचा उपयोग काय तें आपण पाहूं:—

( १ ) इतिहासाचा पहिला उपयोग भूतकाळीं या भूगोलावर घडलेल्या सर्व गोष्टींचें ज्ञान करून देणें हा होय. जर पूर्वीचा इतिहास अस्तित्वांत नसेल तर आपल्या देशा संबधानें आपणास कांहींच माहिती मिळणार नाहीं. आपण कोण, पूर्वी होतों कोठें, आपली समाजव्यवस्था व राज्यव्यवस्था कोण्या प्रकारची होती, हल्लीं आपली उन्नति अगर अवनती होते कीं काय, या गोष्टी इतिहासा वांचून समजणार नाहींत. तसेंच जगांतील इतर देशांतील दृश्यमान स्थिति साहजीक आहे कीं कांहीं एका विशिष्ट घडामोडी मुळें प्राप्त झाली आहे या प्रश्नाचें हि समाधानकारक उत्तर इतिहास च देतो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे इतिहास हा व्यक्ति व राष्ट्र यांना आपली पूर्वपरंपरा दाखवितो. या पूर्वपरंपरेचें ज्ञान सर्वांस आवश्यक आहे. तिच्या अभावीं व्यक्ति अगर राष्ट्र कोणास हि आपली उन्नति करून घेतां येणार नाहीं. उन्नतीची महत्वाकांक्षा हि उत्पन्न होणार नाहीं. ज्याला महत्वाकांक्षा नाहीं, म्हणजे प्राप्तस्थितींत च जो समाधान मानीत राहील, तो समाज, तें राष्ट्र अथवा ती व्यक्ति प्राप्तवैभवाला आंचवेल इतकें च नव्हे तर तें अधोगतीस जातां जातां अखेरीस नामशेष हि होऊन जाईल.

( २ ) इतिहासाचा दुसरा उपयोग मानसिक उन्नति होणें. गतकालीन थोर पुरुषांचीं चरित्रें अवलोकन केल्यानें त्यांच्या अंगीं कोणते विशिष्ट गुण होते व त्या योगानें त्यांनीं स्वतःची व स्वतःच्या राष्ट्राची कशी व कोणत्या मार्गानें उन्नति केली, आपलें ध्येय कसें साध्य केलें या सर्वांचा बोध होतो. वारंवार अशांचीं चरित्रें वाचल्यानें आत्मविश्वास वाढतो. त्यांचें अनुकरण करण्याची बुद्धि उत्पन्न होत्ये, महत्वाकांक्षा वाढते, मनुष्य उद्यमशील बनतो; या संबंधानें सीजर, शिवाजी, नेपोलियन यांचीं चरित्रें लक्षांत घेतल्यास वरील विवेचनाची सत्यता मनास पटेल.

( ३ ) गत कालांतील अनुभवानें पारखून निघालेलें व्यवहारज्ञान समवायेंना मिळणें हा तिसरा फायदा पूर्वीच्या चालीरिती, समाजव्यवस्था, राजकारण, कायदे वगैरे बाबतींतील सांठविलेल्या ज्ञानाचा फायदा मिळतो. अमुक परिस्थितींत राजानें प्रजेशीं कसें वागावें, समाजव्यवस्था कशी असावी, व्यापारधंदे भरभराटीस कसे आणावे वगैरे सर्व प्रकारच्या व्यावहारिक, सामाजिक व राजकीय बाबतींत इतिहासाचा मार्गदर्शकासारखा उपयोग होतो.

( ४ ) मनोरंजन हा चवथा उपयोग. मनुष्यानें आपल्या कल्पनेच्या कितीहि भराऱ्या मारिल्या व काल्पनिक गोष्टी किती हि रचिल्या तरी त्यांमध्यें इतिहासाप्रमाणें साहजिक वैचित्र्य नसतें. कादंबऱ्या कांहीं काळ पर्यंतच मनरंजन करितात तसें इतिहासाचें नाहीं. त्यांत ऐतिहासिक कादंबऱ्या मात्र मनोरंजन करितात. सर वाल्टर स्कॉट, अलेक्झांडर डयूमा किंवा आपले कडे कै. हरिभाऊ आपटे व आजचे अध्यक्ष ( यांची दुर्दैवी रंगु ) यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या प्रख्यात आहेत. यांच्या योगें मनोरंजन कितपत होतें हें स्वानुभवानें समजेल.

या शिवाय इतिहासापासून अनेक फायदे आहेत, परंतु, कालाचे अभावीं त्यांचा उल्लेख न करितां दुसरीकडे वळतों.

हिंदुस्थानांतील प्राचीन इतिहास अद्याप पर्यंत साग्र उपलब्ध झालेला नाहीं. इकडे परदेशी प्रवासी निरनिराळया काळीं आले व त्यांनीं आपलीं प्रवासवृत्तें लिहून ठेविलेलीं आहेत, परंतु तीं त्रोटक आहेत. आर्मनें १७८२ मध्यें एतद्देशीय राजेरजवाड्यां बरोबर झालेल्या लढायां संबंधाचा व इतर माहितीचा इतिहास लिहिला. याच सुमारास नाना फडणीस यांनीं हि मराठी साम्राज्याची एक बखर लिहिविण्याचा प्रयत्न केल्याचें आढळतें. पेशवाईअखेरी नंतर डफनें मराठयांची संकलित माहिती यांतच प्रथम दृष्टीस पडल्ये. डफचे आधीं व नंतर हि बऱ्याच युरोपियनांनीं हिंदुस्थानाबद्दल इतिहास लिहिलेले आहेत, परंतु ते इतिहासशास्त्राप्रमाणें लिहिलेले नसल्यानें त्यांचें परीक्षण करण्याची जरूरी भासली.

## इतिहाससंशोधनाची आवश्यकता

वर सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्राचा इतिहास प्रथम बहुशः युरोपियन लोकांनीं लिहिलेला होता तो ज्या परिस्थितींत व ज्या भावनेनें लिहिला गेला ती परिस्थिती व भावना महाराष्ट्रास सर्वथैव प्रतिकूल असल्यामुळें त्या काळाचें यथार्थ वर्णन त्या इतिहास कारांनीं केलें नाहीं. शिवाय, ते परकीय असल्यानें इकडील गोष्टींचें अंतर्बाह्य यथार्थ स्वरूप व कार्यकारणभाव कळणें त्यांस शक्य नव्हतें. तसेंच चालीरिती व भाषा भिन्न असल्यामुळें घडलेल्या प्रसंगांचें मर्म त्यांना नीट समजलें नाहीं अशाचे इतिहास किती दोषपूर्ण आहेत हें अलिकडे प्रसिद्ध होत अस-

लेल्या अस्सल ऐतिहासिक साधनां वरून दिसून येतें. या इतिहासकारांची माहिती ही एकांगी असून ब्रिटीश राज्याचा विस्तार कसकसा होत गेला एवढेंच सांगण्याचा त्यांचा उद्देश होता. महाराष्ट्रीयांची संस्कृति, राज्यव्यवस्था, समाजव्यवस्था, धार्मिक कल्पना, व्यापार वगैरे अवश्य प्रतिपाद्य विषय त्यांनीं चर्चेस घेतले नाहींत त्यामुळें १७ व्या व १८व्या शतकांत झालेल्या युद्धां पेक्षां दुसरी कोणति हि उपयुक्त माहिती त्यांत आढळत नाहीं. राष्ट्राची उन्नति होण्यास त्याच्या यथार्थ पूर्वपरंपरा दर्शविणाऱ्या सांगोपांग इतिहासाची अवश्यकता आहे; या दृष्टीनें पाहिल्यास युरोपियनांनीं लिहिलेले इतिहास हे पक्षपाती, एकांगी व वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे आहेत असें दिसून येतें. आपल्या राष्ट्राचा इतिहास, झाला तसा लिहिला गेला नाहीं हें कळल्यावर ती उणीव भरून काढण्यास उपलब्ध इतिहासाची चिकित्सक दृष्टीनें छाननी करण्याची आवश्यकता उत्पन्न होत्ये. युरोपियनांचे सर्वच इतिहास त्याज्य आहेत असें म्हणण्याचा हेतु नाहीं. कारण मालकम, मेडोज टेलर वगैरे कांहीं वरील सर्वसाधारण नियमास कांहीं कांहीं ठिकाणीं अपवाद होतील.

## पहिलें इतिहाससंशोधन

या संस्थेचें नांव भारत–इतिहास–संशोधक–मंडळ असें जरी व्यापक आहे तरी तूर्त महाराष्ट्राच्या इतिहासाची च सामुग्री जास्त मिळत असल्यामुळें आणि ती मिळणें जास्त सुलभ असल्यानें, मंडळाचा ती मिळविण्याकडे जास्त ओढा आहे, आणि तेवढी च जरी माहिती साग्र मिळविली तरी त्यामुळें हिंदुस्थानचा इतिहास बनण्यास एक प्रकारें मदत च होणार आहे. डफ नंतर युनिव्हर्सिटीची स्थापना होई पर्यंतच्या काळांत मराठ्यांचे इतिहास युरोपियन लोकांनींच लिहिलेले आहेत. १८६४ नंतर महाराष्ट्रीयांनीं मराठ्यांच्या इतिहासलेखनास सुरुवात केली. रा. ब. नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनीं डफचे इतिहासावर टीका लिहून त्यांतील दोषांचें आविष्करण केलें. या च वेळीं रा. विष्णुशास्त्री चिपळोणकर यांनीं निबंधमालें त 'इतिहास' हा निबंध लिहून इतिहासाचे फायदे व महत्व उघडकीस आणले. नंतर कै. जनार्दन बाळाजी मोडक व आपले मंडळाचे अध्यक्ष रा. ब. बाबासाहेब साने यांनीं काव्येतिहाससंग्रह नांवाचें मासिक सुरू करून त्यांत बखरी व पूर्वीचीं ऐतिहासिक कागदपत्रें व ग्रंथ प्रसिद्ध करण्यास आरंभ केला. पुढें ग्रंथमाला, ऐतिहासिकलेखसंग्रह, भारतवर्ष, महाराष्ट्रइतिहास, प्रभात वगैरे मासिकें सुरू झालीं. १८९५ मध्यें पेशव्यांच्या दप्तरांतील निवडक कागदपत्र प्रसिद्ध करण्यास सरकारानें परवानगी दिली व त्याप्रमाणें रा. ब. वाड यांनीं कांहीं ग्रंथ प्रसिद्ध केले. न्यायमूर्ति रानडे यांचा मराठी सत्तेचा उत्कर्ष हा इंग्रजी ग्रंथ या च सुमारास प्रसिद्ध झाला. रा. राजवाडे व खरे शास्त्री यांनीं जुनीं दप्तरें चाळून अस्सल कागद प्रसिद्ध करण्यास आरंभ केला. हे यांचे कागदपत्रांचे खंड इतके महत्वाचे आहेत कीं, त्यामुळें इतिहासांतील अनेक अज्ञात

गोष्टी उजेडांत आल्या. रा. राजवाडे यांच्या पहिल्या खंडाची पानिपतविषयक प्रस्तावना ज्यांनीं अद्याप पर्यंत वाचली नसेल त्यांनी ती एकवार अवश्य वाचावी अशी माझी शिफारस आहे. पटवर्धनदप्तराच्या साह्यानें खरेशास्त्री यांनी कर्नाटकांतील पेशव्यांच्या राजकारणाचें स्वरूप आपल्या समोर मांडून डकच्या त्या प्रसंगांतील चुक्या उघड्या केल्या आहेत. हा ग्रंथ इतका मार्मिक लिहिला आहे कीं मुंबई युनिव्हर्सिटीनें तो एम्. ए. च्या परिक्षेस नेमला आहे. या प्रमाणेंच मुंबईचे शेट पुरुषोत्तम विश्राम मावजी, ठाण्याचे राजश्री भावे, धुळ्याचे रा. देव व चांदोरकर आणि सातान्याचे रा. ब. पारसनीस यांचा हि येथें उल्लेख केल्या वांचून मला राहवत नाहीं. रा. कीर्तने पासून रा. पारसनीस पर्यंत निर्दिष्ट केलेल्या सद्गृहस्थांनीं जी झीज इतिहासाचे कामीं सोसली त्या बद्दल महाराष्ट्रानें त्यांचे उतराई होणें जरूर आहे. महाराष्ट्रावर यांचे अत्यंत उपकार आहेत. मी त्यांचे याबद्दल मनःपूर्वक आभार मानतों. हे इतिहासप्रकाशनाचे प्रयत्न कमीजास्त व्यक्तिविषयक होते. परंतु, जसजसें कार्यक्षेत्र व प्रयत्न करणारांची संख्या वाढूं लागली तसतसें इतिहासांतील निरनिराळे विषय वाढूं लागले आणि त्याकडे पाहण्याची दृष्टी हि वाढली ; अभ्यासाची पद्धति हि नवीन निघाली आणि श्रीसमर्थांच्या उक्ती प्रमाणें " जो दुसऱ्यावरी विश्वासला, त्याचा कार्यभाग बुडाला, जो स्वयें च कष्टत गेला, तो चि भला," ही प्रतीती येऊन ती भावना दृढ होत चालली. इतिहाससंशोधनाचें काम एकट्यानें पुरें पडणारें नसल्यानें त्यास संघटित स्वरूप देणें भाग पडलें, आणि त्याप्रमाणें, मुख्यतः रा. राजवाडे व श्री. तात्यासाहेब मेहेंदळे यांनीं शके १८३२ मध्यें हें भारतइतिहाससंशोधकमंडळ स्थापन केलें आणि नुसत्या महाराष्ट्रांचीच नव्हे तर साऱ्या भारतवर्षाच्या इतिहासाचीं साधनें गोळा करून प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला. आज पर्यंत मंडळानें २० ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. यांत विविध प्रकारचे ऐतिहासिक व शास्त्रीय विषय आलेले आहेत. व्याकरण, काव्य, व्युत्पत्ति, ऐतिहासिकव्यक्तिकालनिर्णय, शिलालेख, ताम्रपत्रें, मंत्रतंत्र, औषधी कूट, धनगरी वगैरे लोकगीतें वगैरे विविधपरविषय आलेले आहेत। या मंडळांत जातीभेदाचें खूळ नसून सर्वांचा समावेश यांत झाला आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. कलाकुसरीचीं कामें, ताम्रपट, जुनी रंगीत चित्रें, नाणीं वगैरे वस्तूंचा हि संग्रह मंडळ करीत आहे. अशा रीतीनें इतिहाससंशोधनाची कामगिरी मंडळानें अंगावर घेतली आहे आणि या कामीं आपल्या देशाचा जुना इतिहास निर्जीव वस्तूकडून वदविण्याची अद्भुत कामगिरी तें करीत आहे। निर्जीव वस्तूंच्या ठिकाणीं हा जो स्वाभिमान दिसून येतो त्यावरून इतिहाससंशोधनाचें कामीं आपला देह खर्ची घालावा या उद्देशानेंच कीं काय, त्या वस्तू शेकडो वर्षें तपश्चर्या करीत असाव्यात असा भास होतो। श्रीशिवछत्रपतींनीं सुरू केलेला सोन्याचा होन १५९६ पासून महाराजांच्या नामचिन्हानें अंकित होऊन आज पर्यंत स्वाभिमानपूर्वक आपलें वैभव राखून त्या राजर्षीची महती गाण्यास पुढें सरसावला आहे। अशीच स्थिति

सर्व उपलब्ध साधनांची आहे. या निर्जीव वस्तूंचा हा स्वाभिमान व राजनिष्ठा पाहून आपल्याला खरोखर च खालीं मान घालावी लागेल। कारण ज्या राजर्षींनीं आपल्या पूर्वजांचे पराक्रम व स्वामिनिष्ठा पाहून, संस्थानें, जहागिरी, सरंजाम, इनामें वगैरे दिलीं व ज्यांचा उपयोग आपण सुखानें आज घेत आहों व जीं परंपरेनें आम्हांस सहजीं प्राप्त झालीं आहेत, तीं ज्यांनीं दिलीं त्या राजर्षींच्या व आपल्या पूर्वजांच्या तत्कालीन घडामोडींचें यथार्थ स्वरूप इतिहासद्वारा प्रसिद्ध करणें आपलें आद्यकर्तव्य आहे। आपल्या पूर्वजांनीं राष्ट्रोन्नती करितां काय प्रयत्न केले, राष्ट्राचा दर्जा कसा वाढविला हें शोधून त्यांनीं संपादन केलेल्या नांवाचें व कीर्तीचें रक्षण आपण केलें पाहिजे. हें करणें फार कठीण नाहीं. परंतु, असल्या सोप्या कामास लोकांकडून जितकी मदत व्हावयास पाहिजे तितकी होत नाहीं असें मोठ्या दुर्दैवानें म्हणणें भाग पडतें। संस्थानिकांपासून तों पाटीलकुलकर्ण्यां पर्यंत सर्व ऐतिहासिक व्यक्तींच्या वंशजांनीं जर आपलीं जुनीं दप्तरें चाळून पूर्वकालीन सनदा, महजर, निवाडपत्रें वगैरे इतिहासोपयोगी कागद मंडळाच्या स्वाधीन केले, निदान त्यांच्या नकला दिल्या तरी सुद्धां मंडळाच्या कामाची प्रगती होईल व आपण हि अंशतः पितृऋणांतून मुक्त होऊं!

संस्थेनें आपल्या शिरावर घेतलेली कामगिरी फार बिकट आहे. कारण येथें काळाशींच दोन हात करावयाचे आहेत। "सा रम्या नगरी महान् स नृपतिः सामंतचक्रं च तत्" इत्यादि त्यानें गिळलेलीं रत्नें त्या पासून हिसकवून घेण्याची खटपट मंडळ करीत आहे। जुनीं कागदपत्रें मंडाळास दाखविल्यास अगर दिल्यास कोणाच्याहि इनामास अगर जहागिरीस धोका येणार नाहीं. सर्वत्रांनीं, ज्याचे पाशीं अशी सामुग्री असेल त्यांनी, ती मंडळास अवश्य द्यावी अशी माझी त्यांना विनंती आहे. प्रो. जदुनाथ सरकार यांनी जो नुकताच औरंगजेबाचा इतिहास फारशी कागदपत्रांच्या आधारानें लिहिला, त्यांत त्यांना जो अनुभव आला तो येथें नमूद करण्यासारखा आहे. एकदां एका व्यापाऱ्याजवळ कांहीं कगद होते, ते त्यांनीं पाहावयास मागितले. परंतु त्यानें तें देण्याचें नाकारलें. पुढें एका युरोपियनाच्या वशिल्यानें मालकानें ते दाखविले एवढें च नव्हे तर स्वखर्चानें त्यांच्या नकला हि करून छापून दिल्या। असल्या खेदकारक गोष्टी आपल्या कडे होणार नाहींत अशी मी आशा करितों. कागद देऊन जशी मंडळाला मदत करावयाची तशी द्रव्य देऊन हि सर्वत्रांनीं करावी.

आतां पर्यंत ही संस्था लहान होती. आतां ती वाढूं लागली आहे, आणि आज ती आपल्या स्वतःच्या घरांत आली आहे. संस्थेची स्थापना १८३२ त झाली. तेथ पासुन आज पर्यंत तिची बाळपणीची जोपासना आप्पा बळवंतांचे वंशज सरदार तात्यासाहिब मेहेंदळे यांनीं आपल्या वाड्यांत पितृवात्सल्यानें ९ वर्षें केली. संस्थेचें वयमान व कार्यक्षेत्र जसजसें वाढूं लागलें तसतसें सरदार तात्यासाहेब मेहेंदळे यांचा

वाडा तिच्या लीलेस पुरेसा होईना, सबब तिच्या क्रीडासाहित्या करितां मंडळीनें एक स्वतंत्र गृह उभारण्याचें ठरविलें आणि त्या पैकींच एका भागाचा आज प्रवेशसमारंभ आहे। येथें हें हि जाहीर करण्यास मला आनंद वाटतो कीं सरदार तात्यासाहेब यानीं या संस्थेस **आपल्या अपूर्व ग्रंथसंग्रहाची देणगी दिली आहे !**

सद्गृहस्थहो ! आपण माझें भाषण आतां पर्यंत ऐकून घेतलें या बद्दल मी आपला आभारी आहे. आपली रजा घेण्या पूर्वी एका गोष्टीचा म्हणजे संशोधनाची कामगिरी ज्या ज्या सद्गृहस्थांनीं केली असेल त्यांच्या कामगिरीच्या उल्लेख झाला नसल्यास तो केवळ माझ्या अज्ञानाचा दोष समजून, त्यांनीं मला क्षमा करावी अशी त्यांना विनंती आहे. सरते शेवटीं त्या जगन्नियंत्यानें भारतइतिहाससंशोधनमंडळास दीर्घायुष्य यावें व मंडळाची उत्तरोत्तर प्रगती व्हावी अशी त्याला प्रार्थना करून मी आपली रजा घेतों ! "

या प्रमाणें भाषण करून श्रीमंतानीं चांदीच्या नक्षीदार उंची किल्लीनें इमारतीच्या दाराचें कुलूप काढून इमारत खुली केली. येणेंप्रमाणें मंदिरप्रवेशाचें कार्य संपल्यावर रा. नानासाहेब वैद्य यांचे अध्यक्षते खालीं सप्तम संमेलनाचें कार्य सुरू झालें. प्रथम चिटणीस रा. पोतदार यांनीं शके १८४० चा अहवाल वाचून दाखविला, तो पुढें दिला आहे.

सदर अहवाल मंजूर करावा अशी सूचना रावसा. विष्णुपंत पटवर्धन यांनीं केली व निला. प्रो शिवरामपंत परांजपे यानीं अनुमोदन दिलें. अहवाल सर्वानुमतें मंजूर झाल्याचें अध्यक्षांनीं जाहीर केलें.

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

## शके १८४० ( इ. स. १९१८-१९ ) तील

# कामाचा अहवाल

अध्यक्ष महाराज आणि सभासद हो !

शके १८४० सालीं आपल्या मंडळानें काय कामगिरी केली व एकंदर मंडळाची स्थिति कशी होती इत्यादि ठळक वृत्त आज या अहवालाचें द्वारें कारभारी मंडळातर्फे आपणां सर्वांपुढें मांडीत आहों. सदर वृत्त वाचून आपणांस संतोष होईल व आपण तें मान्य कराल असा भरवंसा आहे.

**तापसराईः**—यंदाचे कामास दिवाळीचे सुमारास तापसराई मुळें फार व्यत्यय आला; व त्यामुळें पाक्षिकसभा कांहीं दिवस बंद ठेवणें भाग पडलें. एवढा खंड वगळला तर मंडळाचें काम उत्साहानें व व्यवस्थितपणें चाललें.

**शोचनीय मृत्यूः**—यंदाचे सालीं मंडळाची मृत्यूनें फार हानि केली ! रा. नाना ओक, डॉ. ह. श्री. देव, वे. भाऊशास्त्री लेले, रा. ब. का. चा. मराठे, प्रो. लिमये व रा. हरिभाऊ आपटे वगैरे बरेच सभासद हा लोक सोडून गेले !

सर्वांत प्रो. हरिभाऊ लिमये यांचा मंडळाशीं निकट संबंध होता. ते मंडळाच्या कारभारी मंडळाचे हि सभासद होते. त्यांनीं सर्व प्रसिद्ध ऐतिहासिक ग्रंथांची एक यादी तयार केली होती व ती कच्ची छापून हि काढली होती, ती मंडळामार्फतच प्रसिद्ध करण्याचा त्यांचा विचार होता, तो आपण सिद्धीला नेणें आपलें काम आहे. मृत्यूच्या कोपामुळें मंडळाचें फार नुकसान यंदा झालें आहे !*

यंदाचे सालीं प्रो. देवदत्तराव भांडारकर, प्रो. ताकखाव, प्रो, जदुनाथ सरकार वगैरे विद्वान् नवीन सभासद झाले. प्रो. जदुनाथ सरकार यानीं शिवकालीन फारसी लेखांचा एक खंड मंडळासाठीं संपादन करण्याचें काम पत्करिलें आहे. हें ऐकून सभासदांस आनंद वाटेल.

---

* नुकतेंच महाराष्ट्रांतील एक वृद्ध संशोधक व आपल्या मंडळाचे आस्थेवाईक सभासद रा. कृष्णाजीपंत आचार्य हे हि हा लोक सोडून गेले. अंतकाल पावेतों त्यांनीं मंडळाचें स्मरण चालूं ठेविलें होतें. होणारास उपाय नाहीं ! रा. भिडे वकील हे हि आपले सभासद या १८४१ सालांत नुकते च वारले !

**मंडळाचे सभासदः**—यंदा कारभारी मंडळानें असा एक ठराव केला कीं ज्या सभासदांकडून दोन वर्षांवर वर्गणी येणें बाकी राहील त्यांचीं नांवें कमी करावीं. या नियमांचा योग्य तारतम्यानें अंमल करून सुमारें ३८ सभासद शके १८४० अखेर पटावरून कमी करण्याचें ठरविलें आहे. यंदा नवीन १५१ सभासद मिळाले. त्यामुळें एकंदर सभासदांची संख्या ५०० जवळ गेली. रा. पां. न. पटवर्धन, श्री. मुजुमदार व विशेषतः रा. सदाशिवराव दिवेकर व रा. श्री. वि. नरवणे यांनीं या कामीं मंडळाची फार मेहेनतीनें सेवा केली त्याबद्दल मंडळानें त्यांचे मनःपूर्वक आभारी असलें पाहिजे.

**तहाहयात सभासदः**—गेल्या संमेलनप्रसंगीं आपण एक ठराव केला होता कीं शके १८४० सालापासून पुढें आपल्या वर्गाच्या वार्षिक वर्गणीच्या दसपट आकार एका सालांत दिल्यास त्या सालापासून कोणासहि त्या त्या वर्गाचे तहाहयात सभासद करण्यांत येतें. कळविण्यास आनंद वाटतो कीं ही सवलत पुष्कळांस फायद्याची वाटून श्री. देसाई हनगंडीकर ( वर्ग १ ) प्रो. पां. वा. काणे ( वर्ग २ ), रा. धों. रु. साठे ( वर्ग २ ), शेट मा. कि. मुथा ( वर्ग २ ), रा. रा. धों. साठे ( वर्ग ३ ), रा. स. धों. साठे ( वर्ग ३ ) व रा. शं. वि. गाडगीळ वर्ग ३ या सात सभासदांनीं रकमा भरून आपलीं नांवें तहाहयात सभासदांत दाखल केलीं. कित्येक सभासदांनीं हप्ते भरले आहेत व कित्येकांनीं तहाहयात सभासदांत नांवें नोंदविण्याचा विचार इकडे कळविला आहे. ही सवलत सभासदांस फार फायद्याची आहे. हल्लींचे दुष्काळी दिवस सर्व तऱ्हेनें अडचणीचे आहेत. तथापि त्यांतले त्यांत रुवड करून एकदां हें पितृऋणच समजा. एका किंवा अधिक हप्त्यानें रु. ३०।६०।१२०।२५०।१२५० अगर ३००० असे ऐपतीप्रमाणें देऊन मंडळास कायमचा आश्रय दिल्यास मंडळाचें स्थाईपण वाढेल. असे सुमारें एक हजार तहाहयात सभासद मिळाल्यास मंडळाची गाडी यथास्थितपणें व बिनधोक चालण्यास हरकत पडणार नाहीं.

**आर्थिक स्थिती व हिशेब**—यांचा बोध परिशिष्ट आवरून स्पष्ट होईल. हिशेब तपासनीस रा. ग. स. मराठे एम्. ए. ( अॅक्चु. ) यांचा शेरा सोबत जोडला आहे. शके १८४० अंदाजपत्रकांत रु. ४००० वर्गणीवसुली धरली होती. त्याप्रमाणें रु. ४१४८ वसूल झाले. शके १८४० ची वर्गणी अंदाजापेक्षां अधिक आली. मात्र मागील बाकी वसुली व्हावी तशी झाली नाहीं; व वाटतें कीं आतां तीवर पाणी सोडणेंच भाग आहे फार बाकी थकलेले सभासद कमी करण्याचें ठरविलें आहे तें यासाठीं च. ग्रंथविक्रीचा अंदाज बांधला होता त्यापेक्षां दुप्पट ( म्हणजे रु. १२० ) वसुली झाली. त्यावरून खात्री वाटते कीं शिस्तवार प्रयत्न केले तर ग्रंथविक्रींतून चागलें उत्पन्न उभें राहील. देशी संस्थानिकांकडून उदार आश्रय मिळेल असा

कयास सालगुदस्तां केला होता तो खरा ठरून श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या प्रागतिक बडोदें संस्थानाच्या विद्याखात्याकडून मंडळाच्या सर्व पुस्तकांस चांगला आश्रय मिळविला आला व रु. ८६६ चे ग्रंथ संस्थानानें घेतले. परंतु रकमेची वसुली १८४१ त झाली. नाहीं तर ग्रंथविक्रीचा आंकडा सालगुदस्ता पेक्षां हि वर चढला असता. बडोदें सरकारचें मंडळ फार ऋणी आहे. आतां इतर संस्थानिकांकडून आश्रय मिळण्याचा प्रयत्न आस्ते आस्ते करतां येईल. असो। यंदां चालू निव्वळ जमा ठोकळ रीतीनें ५॥ हजार रु. वर झाली. चालू खर्च मुद्दाम च काटकसरीनें करून सुमारें ३॥ हजार रु. पावेतों च केला. म्हणजे सुमारें २ हजार रु. यंदा चालू उत्पन्ना तून राखून ठेवले. कारण मंदिराचें काम अंगावर घेतलें होतें व मंदिरखातीं सालप्रारंभीं जमा अवघी रु. ३ हजार सुमार होती व या कामीं खर्चास आगखी ५।६ हजार रु. पाहिजे होते. ते उदार दात्यांकडून मिळावयाचे व दिवस पहावे तो रोज नवीन संकटें दाखविणारे. सबब हात राखून खर्च केला. मंदिरखातीं या सालांत सुमारें ३। हजार रुपये खर्च पडले व वसुलीची रक्कम हि जवळजवळ तितकी च झाली. ही यंदाची वसुली करण्याचे कामीं रा. स. म. दिवेकर यांनीं फार मेहेनत केली. त्यांचे कोठवर आभार मानावे! यंदा छपाईखर्च अंदाजापेक्षां कमी झाला. कारण निबडमंडळाकडून मजकूर वेळेवर तपासून आला नाहीं त्यामुळें ग्रंथ तयार होऊं शकले नाहींत. शके १८४१ ला छपाईखर्च फार धरावा लागेल व चालूंतील सर्व शिल्लक त्यांत जिरेल। या साठीं नवीन मदत सारखी येत राहिली पाहिजे। गेल्या सालीं ठराव केल्याप्रमाणें उत्पन्नाचा दशांश हि तोडून राखून ठेवला पाहिजे. मंदिरखात्याची ही मागणी पुढील सालीं ५ हजारापावेतों जाईल. या धोरणानें च नवीन सालचें म्हणजे १८४१ चें अदांजपत्रक तयार केलें आहे. प्रत्येक सभासदानें आतां एक-एक सभासद व तो वर्ग २ व वरील वर्गाचा जर मिळविला तर आपलीं कामें जोरानें चाल-तील. अनुभव असा आला कीं आज तीसचाळीस वर्षे महाराष्ट्रकाव्येतिहाससंशोध-कांनीं जें बीं मोठ्या स्वार्थत्यागानें, धिमेपणानें व एकनिष्ठेनें रुजविलें आहे त्याचा प्रचंड व जोमदार वृक्ष खचित बनेल अशी सहानुभूति समाजांत दृष्टीस पडत आहे. आपलें काम हे सहानुभूतीचे विस्कळित कण एकत्र करून त्यांचें वारूळ बनविणें हें आहे; व सभासदांच्या हृदयांतील प्रेमाच्या ओलाव्यानें असें वारूळ खात्रीनें झालेलें आपण पाहूं.

**मंदिराची सांगता:**—यंदा मंडळाच्या मंदिराचें पश्चिम दालन आपण तयार केलें. हें शास्त्रीयदृष्ट्या अग्राह्य ठरणार नाहीं. वास्तविक आपल्या योजनेंत पूर्व दालन अगदीं सर्वस्वीं अग्राह्य करण्याचें आहे. त्याचा उपक्रम आतां केलाच पाहिजे. यासाठीं दहा हजार रुपये खर्च येईल. हीं दोन दालनें तयार झालीं म्हणजे मग तीं जोडून मधला मध्य दिवाणखाना तयार करावयाचा. दिवाणखान्यास आंतले

याजूनें सभोंवार एक सज्जा देवण्याचा हि विचार आहे. या कामास २५ हजार रु. कमीच वाटतील, किरकोळ कामासाठीं सुमारें ५ हजार रुपये अधिक मस्तमास सर्व मंदिर संपूर्ण उभें करण्यास रु. ५० हजार लागतील असा आजचा अंदाज आहे, सुमारें तीन वर्षांत हें काम करण्याची उमेद आहे. ती खरी करणें अभिमानी सभासदांचे हातीं आहे.

( परिशिष्ट ऊ पहा. मंदिरास चंदा मदत करणारांची यादी )

**पाक्षिक सभा व टाचणें:**—यंदा पाक्षिकसभा २० झाल्या व हजर सभासदांची सरासरी १० पडली. या सभांतून सुमारें ८७ ग्रंथ व १३ नाणीं मंडळास नजर झालीं. एकंदर २४ लेखकांनीं १४५ निबंध या २० सभांतून वाचले. त्यांत रा. आबा चांदोरकर यांचे ३४, रा. द. वि. आपटे यांचे २३, कै. आचार्य यांचे २२, मिया खातार यांचे १५, रा. पां. न. पटवर्धन यांचें ११ व राहिलेले इतरांचे. या १४५ लेखांपैकीं ऐतिहासिक ९९ व सारस्वतात्मक ४६ अशी ठोकळ वर्गवारी पडते. त्यावरून यंदाचे सालीं ऐतिहासिक टांचणें सारस्वतात्मकांच्या दुप्पट झालीं, हें वाचून ऐतिहासिक वाचणांच्या भोक्त्यांस समाधान वाटेल. सर्वच संशोधकांनीं आपापलीं कार्में आवडीनें व परिश्रमानें केलेलीं आहेत. यंदा रा. दत्तोपंत आपटे बी ए. यांनीं लिहिलेलीं टांचणें विचिकित्सक दृष्टीनें महत्वाचीं ठरणारीं आहेत. रा. पटवर्धन, रा. आतार, रा. वा. वि. जोशी, रा. वा. दा. मुंडले, रा. पां. मा. चांदोरकर यांजकडून महत्त्वाचे कागदपत्र व पोथ्या वगैरे आल्या.

**आवक-जावक:**— नुसत्या पाक्षिकसभांचीं पत्रें यंदा सुमारें ७००० वर गेलीं. तीं सोडून कचेरींतून गेलेल्या पत्रांची संख्या १६८० आहे. इकडे आलेल्या पत्रांची संख्या ८६८ आहे. एवढा व्यवहार यंदा उरकला.

**कार्यप्रसार:**—रा. पां. न. पटवर्धन. यांनीं जुन्नर, सासवड, अहमदनगर वगैरे ठिकाणीं मंडळाबद्दल व्याख्यानें देऊन जागृति केली. रा. द. वा. पोतदार यांचें नाशिक मुक्कामीं मंडळाचे कार्याबद्दल व्याख्यान झालें व वांई, मनमाड, अहमदाबाद इ. ठिकाणीं अन्य कार्यानिमित्तें मंडळीची माहिती त्यांनीं दिली. कै. प्रो. लिमये यांनीं डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थ्यांसमोर एक व्याख्यान दिलें. रा. श्री. वि. नरवणे या सभासदांनीं यंदा पदरमोड करून वर्धा व पंढरपूर वगैरे पुष्कळ ठिकाणीं हिंडून मंडळाचे कार्याविषयीं लोकांस व्याख्यानद्वारें माहिती करून दिली व पुष्कळ नवीन सभासद मिळविले. या सर्व सद्‌गृहस्थांचे परिश्रम व कळकळ यांजबद्दल मंडळानें त्यांचे आभारी असलें पाहिजे.

**कारभारी मंडळ**—शके १८३९ च्या कारभारी मंडळाच्या सभा या सालांत ३ झाल्या. पण संमेलनसमयीं निवडलेल्या नवीन कारभारी मंडळाच्या सभा या १८४० सालांत ५ झाल्या. वेळोवेळीं उत्पन्न झालेल्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचा कारभारी मंडळानें विचार करून योग्य ती व्यवस्था केली.

**चंद्रचूडदप्तरः**–मराठीग्रंथोत्तेजकमंडळीकडून अभिवचन मिळाल्याप्रमाणें यंदा रु. ५०० चंद्रचूडदप्तरप्रकाशनासाठीं हल्यांनें आले. त्याप्रों दप्तरछपाईचें काम रा. द. वि. आपटे बी. ए. यांच्याकडे सोंपविलें आहे. कांहीं पानें छापून झालीं आहेत व म. ग्रं. मं. कडून राहिलेले ५०० रु. लवकर येतील तर झपाट्यानें काम पुढें जाईल.

**देणगीः**–श्री. आबासाहेब मुजुमदार यांनीं २५ रु. चें एक कपाट दिलें. रा. स. म. दिवेकर, श्री. मुजुमदार. रा. न. र. फाटक, रा. रा. भि. जोशी, रा. न. चिं. केळकर, रा. ब. का. ना. साने, रा. द. वा. पोतदार, रा. पां. न. पटवर्धन; रा. खेडकर, रा. भिडे, रा. ठाकरे, रा. वा. दा. मुंडले, श्री. बावडेकर, रा. उटगीकर व रॉ. सांबमुर्तिराव, यांनीं पुस्तकें नजर केलीं. मंडळ सर्वांचें आभारी आहे.

**जिनगीः**–मंडळांतील जिंदगीच्या कच्चया यादी तयार आहेत. त्यावरून मंडळांत कागदपोथ्यांचें सुमारें १०२ रुमाल असून त्यांत सुमारें ३० हजार कागदपत्रें व १ हजार पोथ्या आहेत. चित्रें फोटो मिळून सुमारें १२५, ताम्रपट १० नाणीं १५०, मूर्ति ४, लेखशिळा २ वगैरे वस्तू हि आहेत. या संग्रहानें मोठालीं ८, कपाटें भरलीं आहेत. शिवाय पुस्तकालयांत १० कपाटें असून त्यांत २१३ हजार पुस्तकें आहेत. खेरीज सुमारें ७५ खुर्च्या, मेजें वगैरे शिलकी सामान आहे.

**शके १८४१ चें अंदाजपत्रक**–परिशिष्ट ई त दिलें आहे. यंदा छपाईखर्च, चित्रखर्च, संशोधनखर्च हे बरे च वाढणारे असल्यामुळें त्यांचे अंदाज वाढते धरले आहेत. जशी जमा होईल तसा खर्च करावयाचा हें सावधगिरीचें धोरण अर्थात् सोडून चालावयाचें नाहीं. होतां होईल तों तहाहयात सभासदांची वर्गणी खर्चीं घालावयाची नाहीं अशी काळजी घेतली पाहिजे. यंदा कायमनिधीला सुरवात केली आहे. त्या बेतानेंच पेस्तरसालासाठीं शिल्लक मुद्दाम राखून ठेविली आहे. मंदिरखर्चांत पुढील पूर्वदालनाचा पाया वगैरे भरण्याचा खर्च दाखविला नाहीं. वाढता लोकाश्रय मिळाल्यास पूर्वदालनाचें काम हातीं घेण्यास अडचण येणार नाहीं.

**पुढें।**—यंदा मंडळाचे कार्याचा उत्कर्ष आजवर कधीं च झाला नाहीं इतका झाला. स्वतःचें मंदीर उभें राहिलें. चित्रसंग्रह, हस्तलेखसंग्रह वगैरे साधनसामग्री विपुल जमा झाली, एकंदर १७ हजार रुपयांवर उलाढाल झाली. परिस्थिति किती बिकट आहे हें पाहिलें म्हणजे झालें हें काम जरी वास्तविक अल्प आहे तरी त्यानें आपलें समाधान व्हावें व आपल्याला त्याचा योग्य अभिमान वाटावा असें च झालें यांत शंका नाहीं. यापुढें अद्याप पुष्कळ मजल आपणांस चालावयाची आहे. हस्तलेखांच्या अभ्यासोपयोगी यादी छापणें अत्यवश्य आहे. नवशिक्या पण होतकरू संशोधकांना अनुभवी व जाणत्या संशोधकांच्या शिकवणीचा लाभ मिळाला पाहिजे. आपलें मंदिर संपूर्ण होईल त्या वेळीं सदर शिकवण देण्याची मनाजोगती तजवीज करणें

आपणांस शक्य होईल. इतिहासाध्ययनाचा मार्ग सुलभ व आकर्षक करण्याकडे हि आपण लक्ष्य पुरविजें जरूर आहे. पोट बांधून काम करणारे महाभाग पुरुष कोणत्या हि राष्ट्रांत विरळा च आढळतात. यासाठीं इतिहाससंशोधकांच्या योगक्षेमाची जबाबदारी आपण हळु हळु अधिक शिरावर घेतली पाहिजे. एकंदर आपण जर **दीड दोन लक्ष** रुपये जमवूं तर आपला कारभार सुयंत्र चालेल. मंदिरास सुमारें ५० हजार रुपये लागतील. त्याच्या जोडीला आपला एखादा छापखाना असेल तर चांगली सोय होईल. त्याचप्रमाणें एक दोन पगारी संशोधक एक दोन नकलनवीस, कारकून शिपाई प्यादे मिळून निदान महिना रु. २००।३०० चा चालू खर्च करितां येईल अशी सोय केली पाहिजे. या कामास अर्धा पाऊण लाख रुपये, छापखाना वगैरेसाठीं सुमारें २५ हजार मिळून एकंदर १॥–२ लक्ष रुपये आपणांस गरिबांच्या दृष्टीनें पुरतील. तुर्त कांहीं वर्षे आपली उडी एवढीच असावी. एखादा इतिहासभक्त लक्ष्मीपुत्र अगर महाराजा मनांत आणील तर एकटाच ही सोय लीलेनें करील. संशोधनेश्वराचे कृपेनें तसें हि घडेल; परंतु तोंवर आपला ' थेंबें थेंबें तळें सांचे ' हा राजमार्ग आपणांस मोकळा आहे.

येणेंप्रमाणें यंदाचे सेवेचा वृत्तांत आहे तो गोड करून घ्यावा.

शेवटीं ज्यांनीं ज्यांनीं या पितृपूजेच्या कार्याच्या भक्तीची मशाल तेवत ठेवून प्रस्तुतच्या बिकट परिस्थितींत वाटचालीस प्रोत्साहन दिलें व साहाय्य केलें त्यांचे उपकार स्मरून आटपतों !

**खंडेराव चिंतामण मेहेंदळे,**
**दत्तो वामन पोतदार,**
चिटणीस भा. इ. सं. मं. पुणें.

## परिशिष्ट 'आ.'

## जमाखर्च शके १८४० ( सन १९१८-१९. )

**जमा, रु.आ.पै.**

६५६१—९-६ श्रीशिलक सालगु॥ असेर निघाली ती.
४१४८—०-० वर्गणीखातें
३२९९-१५-६ मंदिरखातें
९२०-१४-० ग्रंथविक्री
५२५—०-० देणगीखातें
१०५३-१४-० अनामत खातें
४५—७-६ टपाल खातें
२४—४-३ व्याज खातें
०—४-६ चित्रखातें
१२३०—४-० सदाशिव महादेव खातें
६—०-० रा. दत्तात्रय बळवंत खातें

१७८१५-९-३ एकूण.

हिशोबतपासनीस रा. ग. स. मराठे यांचे शेऱ्यांतील उतारा:—"एकंदरीत मी हिशेब पाहिले त्यावरून माझी अशी समजूत आहे कीं हिशेब सर्व बरोबर आहेत. ...... ७।५।१९. ग. स. म."

**खर्च, रु.आ.पै.**

३३७९—८-० मंदिरखातें
६४३-१०-० अनामत खातें
२२४—८-३ टपालखातें
१७२—४-६ चित्रखातें
१३३७—०-० रा. सदाशिव महादेव खातें
१५—०-० खंडेराव चिंतामण खातें
१३१—०-६ दप्तरखातें
३१६—०-६ शिलकी सामानखातें
६०८-१४-० ग्रंथखरेदीखातें
३५३—७-६ पगारखातें
६०५—९-३ संशोधनखातें
९२८—७-५ छपाईखातें
०—१-० जकातखातें
४-१०-९ मजुरीखातें
१०६-१३-० भाडेंखातें
३८-१४-३ कचेरीखातें
२०-१२-० प्रवासखातें
२३—९-६ सूटखातें
१०—७-० किरकोळखातें

८९२०—९-५

८८९४-१५-१० श्रीशिलक मेस्तरसालाकारणें
१७७-१५-७ चिटणीस
८७१७—०-३ खजिनदार

८८९४-१५-१०

एकूण १७८१५-९-३

## परिशिष्ट ' ई. '

## अंदाजपत्रक शके १८४१ ( सन १९१९—२०. )

| जमा, रु.आ.पै. | |
|---|---|
| ८८९४–१५–१० | श्रीशिल्लक दरोबस्त |
| ४०००—०–० | वर्गणी-दरोबस्त |
| १५००—०–० | ग्रंथविक्री |
| २००—०–० | चित्रविक्री |
| १०६–१२–० | अमानत परतजमा |
| ४२—४–० | अमानत परतजमा |
| १५०–०—० | व्याजखातें |
| ५०००—०–० | मंदिरदेणगी |
| ७५०—०–० | कायमनिधि |
| २०६४३।१५।१० | एकूण. |

| खर्च, रु.आ.पै. | |
|---|---|
| ३०० | टपालखातें |
| ५०० | चित्रखातें |
| २००० | छपाईखातें |
| १२५ | मोडे पट्टीखातें |
| १०० | प्रवासखातें |
| ५०० | मंदिरप्रवेश समारंभखर्च |
| १००० | ग्रंथखरेदीखातें |
| ८०० | कचेरीखातें |
| ५०० | शिलकी सामानखातें |
| २०० | ऐति. स्थलसंरक्षणखातें |
| ३५० | अनामत खातें |
| ७५० | कायमनिधिखातें |
| २०० | आकस्मिक खर्चखातें |
| १०० | किरकोळ खर्चखातें |
| ६००० | मंदिरखर्चखातें |
| १००० | संशोधनखातें |
| १४४२५—०—० | |
| ६२१८–१५–१० | श्रीशिल्लक पेस्तर-सालाकारणें |
| २०६४३–१५–१० | एकूण. |

## परिशिष्ट ' ऊ '

**मंडळमंदिरास देणगी**:—रा. बाळ गंगाधर टिळक रु. ३०० ( हप्ता ३ ) रा. वामन श्रीधर आपटे रु. ५००; रा. लक्ष्मण बळवंत फाटक रु. ३००; रा. वासुदेवशास्त्री खरे रु. १०१; रा. बाळाजी दामोदर हसबनीस रु. २५०; श्री. पायाप्पा देसाई इनगळीकर रु. १००; रा. के. दी. डोंगरे रु. १००; रा. ब. का. ना. साने रु. २०० ( हप्ता २ ); रा. विनायकराव भावे रु. ५०० ( हप्ता २ ); ना. रा. ब. साठे रु. ५०; शेट मा. कि. मुथा वकील रु. १३०; रा. शंकर श्रीकृष्ण देव रु. १०० ( हप्ता २ ); शेट मयाशंकर मूळशंकर भट्ट रु. १०१; श्री. आबासाहेब मुजुमदार रु. ५० ( हप्ता ३ ); इत्यादि एकूण रु. ३२९९–१५–६.

तत्पूर्वी चिटणीस श्री. मेहेंदळे यांनीं पुढील गृहस्थांकडून आलेले यशश्चिंतनपर संदेश सभेस कळविलेः— ( १ ) रा. ब. बाबासाहेब साने ( अध्यक्ष ) ( २ ) रा. ब. पारसनीस ( सातारा ), ( ३ ) प्रो. जदुनाथ सरकार ( पाटणा ), ( ४ ) रा. का. रु. लेले ( धार ), ( ५ ) श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधि औंधकर, ( ६ ) रा. चित्रे ( भोर ), व ( ७ ) रा. नरवणे ( सांगली ) [ पुढें संमेलनांत रा. ब. सबनीस ( दिवाण कोल्हापूर ); श्री. बाबासाहेब तासगांवकर, वगैरे मंडळींकडून संदेश आले. व निमंत्रणें जरा उशीरां पावल्यामुळें कित्येक मंडळींचे संदेश संमेलन आटोपल्यावर मिळाले.] पुढें श्री. आबासा० मुजुमदार यांनी **बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या हातचीं कित्येक अस्सल पत्रें** दाखविलीं व त्यावर टांचण वाचलें तें पुढें छापलें आहे. रा. पां. न. पटवर्धन यांनीं **पंताजी गोपिनाथ** हा आपला निबंध अस्सल आधार दाखवून वाचला.

नंतर चिटणिसांचे सूचनेवरून ४२ नवीन सभासद करून घेण्यांत आले. रा. मुंडले यांचें **'सहस्त्री'** हें टांचण वाचलें. व त्याचे अस्सल कागद सभेस दाखविले. नंतर रा. वासुदेवराव बेंद्रे यांनीं कांहीं मुसुलमानी तांब्यांचीं नाणीं सभेस दाखविलीं. हीं नाणीं त्यांस विजापुरास रा. साहेब लाल यांचे मार्फत मिळालीं व तीं त्यांनीं मोठ्या व्यवस्थेनें लावलीं होतीं. मग श्री. बाळासाहेब पुरंदरे यांनीं पुरंदरे घराण्यासंबंधीं कागदपत्रें शोधून छापण्यासाठीं तूर्त रु. ३०० तीनशें देण्याचें कबूल केल्याचें श्री. आबासाहेब मुजुमदार यांनी सभेस कळविलें. पुढें नामदार रावबहादुर साठे यांनीं श्री. बाबासाहेब यांचे सारखे इतिहासप्रेमी व थोर अध्यक्ष लाभल्याबद्दल मंडळाचें अभिनंदन करून श्रीमंतांचे व पाहुण्यांचे वगैरे आभार मानले; व हारतुरे, पानसुपारी, अत्तरगुलाब होऊन सकाळचा समारंभ समाप्त झाला.

**शुक्रवारः**—सायंकाळीं ( ५ ते ७॥ ):— संमेलनाचा कार्यक्रम पुढें चालू झाला. रा. नानासाहेब वैद्य यांनी कालिदासाचा काळ ( अन्यमतखंडण ) हा निबंध वाचला. त्याचा सारांश पुढें जोडला आहे. रा. पां. मा. चांदोरकर यांनीं आपलें १८३९ तील संशोधनवृत्त वाचलें. मानभवांचा मंडळाविषयीं गैरसमज असल्याचें रा. केशव आप्पा पाध्ये ( ठाणें ) यांनीं कळविलें. तो निरर्थक कसा आहे तें रा. पोतदार व मेहेंदळे यांनीं व्यक्त केलें. इतक्यांत जोराचें वादळ होऊन काम तहकूब ठेवावें लागलें.

**शनिवार**—सकाळ ७॥–१०॥:–अध्यक्ष रा. वैद्य हे अपरिहार्य कारणामुळें परगांवीं गेल्याकारणानें प्रो. भानू यांचीं सूचना व रा. पांडोबा यांचें अनुमोदन मिळून रा. गोविंदराव सरदेसाई रियासतकर्ते हे अध्यक्षस्थानीं बसले. प्रथम रा. द. वि. आपटे यांनीं **पाटिलबुवांचें राजकारण हप्ता २** वाचला. तो पुढें छापला आहे. नागपूरचे बॅ. पंडित या वेळीं पाहुण्यांत हजर होते.

प्रो. राजवाडे यांचा **ब्राह्मणकालीन जातिभेद** श्री. भि. वा. राजे भांबोरेकर **भोसले** यांनीं लिहून पाठविलेला आपले **घराण्याचे** माहितीबद्दलचा लेख ( सोबत कित्येक अस्सल पत्रें) व रा. पांडोबा पटवर्धन यांचा **प्रल्हाद निराजीवरील** निबंध असे निबंध वाचले. या सर्वच निबंधांची तारीफ फार झाली. सदर निबंध रा. पटवर्धन यांज-जवळच राहिला. [ पुढें रा. पांडोबांचें मृत्यूमुळें त्यांच्या कागदपत्रांचा घोटाळा झाला. त्यामुळें सदर निबंध अद्यापि सांपडला नाहीं या साठीं त्यावेळीं दुसरीं असलेला त्या निबंधाचा सारांश येथें दिला आहे.* ] मध्यंतरीं रा. पां. वा. काणे यांनीं शके १८४१ सालीं रा. ब. साने (अध्यक्ष), रा. नानासा. वैद्य व तात्यासा. मेहेंदळे हे दोघे उपा-ध्यक्ष, रा. दत्तोपंत पोतदार व श्री. आबासाहेब मुजुमदार हे उभयतां चिटणीस, रा. अ. वि. पटवर्धन हे खजिनदार, व रा. वि. ल. भावे, डॉ. श्री. कृ. बेलवलकर, रा. पां. न. पटवर्धन, रा. स. म. दिवेकर, रा. न. चिं. केळकर व ना. रा. ब. ग. कृ. साठे व रा. द. वि. आपटे असे सात साधारण सभासद मिळून तेरा गृहस्थांचें कारभारी-मंडळ असावें व याखेरीज रा. ग. स. मराठे हे हिशेबतपासनीस असावे असा ठराव मांडला. त्याला रा. रा. भि. जोशी, रा. न. र. फाटक, रा. पं. रा. आलेगांवकर व रा. गो. अ. मोडक या सर्वांचें अनुमोदन व पुष्टि मिळून तो एकमतानें मंजूर झाला. मिया आतार यांनीं लोखंडी वाघनख, १३ रुप्यांचीं व १० तांब्याचीं नाणीं नजर केलीं व सांगलीचे रा. गद्रे यांनीं एक अप्रतिमशी सचित्र गीतेची पोथी दाखविली.

**शनिवारः**—सायंकाळीं ५॥ ते ७:—नेहेमीप्रमाणें कित्येक नवीन सभासद मंजूर करून घेतल्यावर व रा. वैद्य चिनिवाले (सांगली) रा. दुर्वे ( इस्लामपुर ) वगैरेंची सहा-नुभूतीचीं पत्रें वाचल्यावर रा. आबा चांदोरकर यांचा **खानदेशी भाषा** हा विस्तृत निबंध वाचण्यांत आला. ( सदर निबंध फार मोठा असल्यामुळें नवीन शोध घालून स्वतंत्र छापविण्याचा विचार आहे.) रा. स. म. दिवेकर यांचा मुसलमानी चार नाणीं हा निबंध झाल्यानंतर श्री. मुजुमदार यांनीं कांहीं नाणीं दाखविलीं. रा. गोविंदराव आपटे

---

* हें टांचण जुन्नर येथील श्री. सरदार वि. अ. देशपांडे यांचे घराण्यांतून मिळालेल्या कागदपत्रांच्या द्वारां लिहिलें होतें. निराजी राहुजी हा शिवाजीमहाराज आग्रा येथून निसटून आले त्या वेळीं हजर होता. हा च गोवळकोंड्यास कुतुबशहा तानाशा व महाराज यांचा तह झाला त्या वेळीं महाराजांतर्फे तहावर सही करणारा होता. याचा मुलगा प्रल्हाद निराजी. यानें राजारामकालीन स्वातंत्र्ययुद्धांत चांगली कामगिरी केली. निराजी राहुजी हा विष्णुवर्धनगोत्री देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होय. या घराण्यासंबंधानें जुन्नरचे देशपांडे, खेडचे अफलाद देशपांडे, चद्रचूड घराणें, चाकण देशपांडे व नाशीक येथील क्षेत्रोपाध्ये यांचेकडे माहिती मिळण्याचा संभव आहे.

यांचे ( १ ) पांडुरंगराव पटवर्धन यांचें एक उपदेशपर पत्र ( २ ) परशुरामभाऊ व कंपनीसरकार व (३) जिमाजी आप्पास गादी मिळाल्याची हकीकत हीं टांचणें वाचलीं (हीं त्यांनीं पटवर्धन घराण्याचा इतिहास वगैरे आपल्या पुस्तकांतून अलीकडे प्रसिद्ध केलींच आहेत) पैकीं परशुरामभाऊ व कंपनीसरकार या टांचणावर रा. खरेशास्त्री यांनीं चर्चा केली व असा अभिप्राय दिला कीं, सर हेक्टर, व सर टामस असे दोन मनुरो झाले. पैकीं १७९२ त टामस नव्हता. इंग्रजांची व परशुरामभाऊंची दोस्ती होती. पण गुप्त तह नव्हता. १७९२ तील अस्सल तह जमखिंडीकरांजवळ आहे. Internal evidence पाहातां प्रस्तुत रा. आपटे यांनीं वाचलेला करार खूट दिसतो. नंतर पाहुण्यांपैकीं रा. यशवंतराव गुप्ते यांनीं शिवाजीमहाराजांनीं व्यंकोजीस लिहिलेलें एक अस्सल पत्र दाखवून तें तत्कालीन व अस्सल आहे असें प्रतिपादिलें. श्री. तात्यासाहेब मेहेंदळे, पोतदार, प्रभृतींनीं सदर पत्रांतील अक्षरवटिका वगैरे पाहातां तसें म्हणतां यावयाचें नाहीं. मात्र मूळ पत्राची ही अस्सल बरहुकूम नक्कल असावी असा अभिप्राय व्यक्त केला; यावर बराच वाद झाला. नंतर रा. पोतदार यांनीं कित्येक पोथ्या व एका अत्यंत पातळ चिवट कागदावरील अत्यंत बारीक अक्षराची भागवत पोथीचीं कांहीं पानें, रा. ग. स. खरे यांनीं जुनीं पंचांगें व नवी जंत्री, रा. नरवणे एक जुना छापील वैद्यकग्रंथ, रा. नरसोपंत केळकर यांनीं कित्येक नाणीं नजर केलीं. शिवकालीन अक्षरांचे फोटो काढून मंडळांत ठेवावे अशी सूचना रा. भवे यांनीं केली.

**रविवारः**—सकाळीं ७॥ ते १०:— आज अध्यक्षस्थान रा. वासुदेवशास्त्री खरे यांस देण्यांत आलें होतें. रा. शिकंदरलाल आतार यांचें शके १८४० तील संशोधनवृत्त, रा. वेंद्रे यांचा परिंचेकर जाधवराव, रा. आप्पा चांदोरकर यांचा मानभावी वचनपाठ, रा. प. न. पटवर्धन यांचा बाळाजी विश्वनाथांची आणखी कांहीं पत्रें, रा. दत्तोपंत आपटे यांचा पाटिलबावांचें राजकारण क्रम ३ रा. अलीबहादर व हिंमतबहादर, रा. बाबा दिवेकर, यांचा छत्रपतींचा जन्मतिथिनिर्णय ( पुढें वाढवून छापला त्रैमासिक वर्ष १८४३ पहा), रा. गो. वि. आपटे यांचा आपासाहेब सांगलीकर यांची गणेशप्रार्थना, असे निबंध वाचून झाले, व त्यावर चर्चा झाली. रा. वेंद्रे, रा. पटवर्धन व रा. चांदोरकर यांनीं सोबत अस्सल कागद हि आणलेले सभेला दाखविले. रा. द. वि. आपटे यांचे निबंधावर चर्चा करतांना रा. खरेशास्त्री म्हणाले "महादजीजवळ पैका नव्हता. टिपू हें एक श्रीमंत कूळ होतें. इंग्रज वगैरे सर्व थकल्यावर पाटिलबावा या लढाईंत पडले. निजामाकडे खंडणी थकली होती. मिर अलमास हरिपंतानें ६ महिन्यांत पैका देण्यास ताकीद दिली. त्या वेळच्या सर्व सरदारांना नानाजवळील पैका काढण्याची फार इच्छा होती. त्याचेजवळ पैका अतिशय, आणि शिवाय पिनफौजखर्च, पाटिलबावा इकडे येण्यांत नानाजवळील पैका काढण्याचा हेतू होता." रा. सरदेसाई

म्हणाले "vigorous policy" बाळाजी विश्वनाथानें सुरू केली. दिल्लीकडे त्यानें स्वाऱ्या केल्या याचें कारण हें च. नानासाहेबानें इंग्रजांची सत्ता ओळखली नाहीं. माधवराव थोरले अल्पायुषी झाले आणि नानाच्या वांट्यास आजचें मरण उद्यांवर ढकलण्याचें काम आलें." रा. आचा. चांदोरकर यांच्या निबंधावर चर्चा करतांना महंत दत्तराज महानुभाव यांनीं कांहीं माहिती सांगितली; रा. चांदोरकरांना आमचें कित्येक संकेत वाचतां आले नाहींत त्यामुळें विपरीत अर्थ झाले असें ते म्हणाले. रा. पोतदार यांनीं यावर सांगितलें कीं रा. चांदोरकर यांनी पोथी प्रत्यक्ष पुढें ठेविली आहे तरी बोवांनी आपल्या मताप्रमाणें ती वाचून दाखवून चुका दाखवाव्या. रा. विनायकराव भावे यांनी महंतांनी आमच्या चुका दाखवाव्या आम्ही आनंदानें त्या दुरुस्त करूं परंतु संकेतवाचन चुकलें असें आम्हांस अजून पटलें नाहीं असें सांगितलें.

या वेळीं पाहुणे रा. यशवंतराव गुप्ते यांनीं प्रभुप्रकरणीं प्रश्न उपस्थित केला. त्याला विनायकराव भाव्यांनीं उत्तर दिलें कीं, प्रभूंनीं आपल्यांतील वयोवृद्ध जे ठाण्याचे रा. प्रभाकरराव गुप्ते यांच्या द्वारें रा. राजवाडे यांच्या निबंधास आधार-सहित लेखी उत्तर लिहून पाठविल्यास मंडळ तें आनंदानें प्रसिद्ध करील. अध्यक्षांनीं सांगितलें कीं, मंडळ हें सर्वांचें आहे. ब्राह्मणांचें जसें तसें च मराठ्यांचें, मानभावांचें व परभूंचें हि आहे एवढें च नव्हे तर यहुदी व किरिस्तावांचें हि आहे. येथें जात-गोताचा प्रश्न नाहीं. सगळ्यांनीं बसून निर्मळ सत्य चर्चा करून शोधून काढावयाचें आहे. ज्या प्रमाणें महंत दत्तराजांना आतां संधी देऊन त्यांची बाजू त्यांना मांडाव-यास सवड दिली आणि त्यांचें जसें समाधान झालें अशीच संधी व समाधान परभु समाजाला हि देण्यांत येईल. येथें सकाळची बैठक खलास झाली.

निबंधवाचन फार लांबतें सबब प्रत्येक निबंधकारास वीस मिनिटें वेळ द्यावा असें प्रो. राजवाडे म्हणाले. प्रो विजापुरकर यांनी त्यास पुष्टि दिली. यावर चर्चा होऊन तो विषय तितकाच राहिला. मध्यंतरीं श्री. आबासाहेब मुजुमदार यांनी निंब-गांव येथील चंद्रचूड वाड्याचे फोटो, रा. नानल वैद्य यांनी एक बारीक गीता व गण-पति, असें प्रदर्शन केलें.

**रविवार**–दुपारीं ५॥ ते ७॥:–श्री. आबासा० मुजुमदार-पांजीचा कुलधर्म, डॉ. गुणे–अपभ्रंश भाषेतील वाङ्मय, रा. दिवेकर–अली बहादराचीं पत्रें व तामील शिवभारत ( या वरील जुजबी टाचणें ); महंत दत्तराज–एक फारसी संस्कृत कोश ( अस्सल ), महानुभाव पंथ; रा. गोविंदराव सरदेसाई–वाडीकर जाधवाचीं पत्रें ( सोबत अस्सल पत्रें ), श्री. आबासा. मुजुमदार– नारायणेश्वर, पुरंदर, येथील शके १२०७ मधील रामदेवराव जाधव यांचा एक शिलालेख ( शिला दाखवून ); रा. पोतदार चार जुनीं ( शिवपूर्वकालीन ) मोडी पत्रें ( सोबत अस्सल ) व एक जुना मराठी शिलालेख

सोबत ठसे ); रा. भावे बाजीराव दुसरे यांचे घालमेलीविषयीं एक इंग्रजी उतारा; रा. शंकरराव जोशी एका महार वीराचा पराक्रम; रा. मुंडले-जुनीं नाणीं येणेंप्रमाणें निबंध वाचून झाले. खेरीज रा. भा. रा. भालेराव (ग्वाल्हेर), रा. नवांगुळ (कऱ्हाड), रा.श्री.गो. बर्वे (लिंब), वे. धुंडिराज दीक्षित पाचवडकर, यांजकडून आलेल्या लेखांचा व कागदांचाहि उल्लेख चिटणिसांनी केला व कागद सादर केले. खेरिज श्री. फलटणकर यांजकडून आणलेलीं फारसी फर्मानें पांच श्री. तात्यासाहेब मेहेंदळे यांनी दाखविलीं. महंत दत्तराज यांनीं औरंगजेबाच्या कांहीं सनदा दाखविल्या, त्यांत जेझियामाफीचा विषय आहे व कांहीं मानभाव जे काळीं वस्त्रें वापरूं लागले त्याचें कारण कोणास जेझयामाफी आहे तें कळावें हें होय असें महंत म्हणाले. रा. द. रु. देवधर यांनीं कांहीं पोथ्या नजर केल्या. के. आचार्य कालगांवकर यांचीं कांहीं पुस्तकें त्यांचे चिरंजीवांकडून नजर आलीं. एक जुनी गीता व जुनी घांट वगैरे वस्तु रा. आबा चांदोरकर यांनीं, व लहान मुलांसाठीं केलेली एक खेळण्यांतील तोफ, तोफेचे गोळे, एक ढाल, एक कांचेवरील चित्र, व पोथ्या मिया शिकंदर लाल आतार यांनी नजर केल्या. श्री. बाळासाहेब औंधकर यांचे तर्फे रा. वा. प. मेहेंदळे यांनी श्रीपतराव प्रतिनिधि यांचा फोटो व कित्येक हस्ताक्षरें प्रदर्शनांत मांडलीं. रा. पोतदार यांच्या जुन्या मराठी शिलालेखा संबंधीं रा. भावे म्हणाले "प्रतापगडच्या देवीपुढें अशाच तीन ओळी आहेत. त्या कोणी लावाव्या." महंत दत्तराज म्हणाले "मौजे एदलाबाद येथें नारायणाचे देवळावर एक २८ ओळींचा शिलालेख आढळला. नमःसूर्याय असा प्रारंभ आहे. तसेंच उनकेश्वर ( माहोरच्या पलीकडे १२ कोसांवर ) येथें शके १२१२ तील शिलालेख आहे. तो महाराष्ट्रीत असून त्यांत हेमाद्रीचें नांव आहे." रा. गो. वि. आपटे यांनीं आपलें पुस्तक व वे. आखवे शास्त्री यांनी कांहीं नाणीं नजर केलीं.

येणें प्रमाणें संमेलनांत आलेले निरनिराळ्या संशोधकांचे निबंध वाचून झाल्या नंतर

## समारोप

म्हणून अध्यक्ष वासुदेवशास्त्री खरे यांचें थोडक्यांत भाषण झालें. ते म्हणाले-

"यंदाचा संमेलनसमारंभ पूर्वीपेक्षां फारच चांगला झाला. या वर्षी बरेच नवीन सभासद आपणाला लाभले. आज पर्यंत पांढरपेशेच लोक या कार्यासंबंधानें थोडे फार झटत होते. परंतु, आतां या कार्याचें महत्व इतर लोकांच्या हि लक्ष्यांत येऊन त्यांनीं त्यांत भाग घेण्याचें ठरविल्याचें दिसून येत आहे आणि या बद्दल मला खरोखर च आनंद होत आहे. तसेंच मराठेशाही इतिहास बनविण्यांत ज्यांच्या पूर्वजांनीं आपलें आयुष्य खर्चिलें त्यांचे विद्यमान वंशज असे कांहीं थोर ब्राह्मण, प्रभु, मराठे वगैरे जातीचे गृहस्थ या कामांत हौसेनें मन घालूं लागले आहेत ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.

इतिहाससंशोधनांत ही एक मोठी प्रगति च आहे. आमच्या मंडळांतील बहुमोल सामुग्री सुरक्षित ठेवणें अत्यंत अगत्याचें असल्यानें आम्ही अग्निबाधाविरहित असें एक गृह बांधण्याचें आपणा सर्वांच्या अनुमतानें मागेंच ठरविलें होतें, त्या प्रमाणें त्या कार्यास सुरुवात होऊन आज त्या पैकीं एक भाग पुरा झाल्याचें आपण पहातच आहां अद्यापि हि मुख्य इमारत व्हावयाची आहे, तिला बरीच मोठी रकम लागणार. या पश्चिम पाखयालाच जवळ जवळ नऊ हजार रुपये खर्च आला. योजलेल्या इमार-तीला चाळीस हजार तरी रुपये पाहिजेत. ते आपण व महाराष्ट्र जमवून देईल अशी आम्हांला आशा आहे. अदाह्य इमारत, सामानसुमान ग्रंथसमूह वगैरे इतिहासाची साधनसामुग्री तरी आपण तयार करून पुढील पिढीसाठीं ठेवणें हें आपलें कर्तव्य आहे. तें आपण बजावलें तर भावी पिढी या नंतरचा महत्त्वाचा कार्यभाग करील. ही आजची इमारत उवडण्यास खुद्द छत्रपतींच्या अष्टप्रधानांतील सचीव घराण्यांतील पुरुषच आपणांस लाधले हें आमचें महद्भाग्य म्हटलें पाहिजे! वर सांगितलेली मोठी रक्कम जमविण्यास आपल्याला विशेष श्रम करणें भाग आहे. उत्तरोत्तर या कार्याची जबाबदारी आपणा वरील वाढत आहे. लोकांनीं आज पर्यंत झालेलें मंडळाचें कार्य पाहिलें असेल तर ही रक्कम जुळण्यास फार काल लागणार नाहीं अशी माझी खात्री आहे. त्यांनीं हें पितृदेवाचें कार्य समजून सढळ हातानें मदत मात्र केली पाहिजे.

श्रीमंत नानासाहेब पेशव्यांपासून पुढील इतिहास संगतवार लिहिण्यास लाग-णारीं अस्सल कागदपत्रें वगैरे ऐतिहासिक साधनें आतांपर्यंत बरीं च उपलब्ध झालीं आहेत; परंतु, पेशवाईची प्राणप्रतिष्ठा करणारा महापुरुष बाळाजी विश्वनाथ याच्या बद्दलची व त्याच्या मागची माहिती अद्याप सांपडावी तशी मिळत नाहीं. बाळाजी विश्वनाथ हा मोठा थोर पुरुष असला पाहिजे. चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मिळवून, त्यावर आपल्या सैन्याचा खर्च भागवून, दक्षिणेंतील निजामअलीवर ज्यानें आपला दरारा बसविला त्याचें धोरण व राजकारण खरोखर च प्रशंसनीय असलें पाहिजे. बाळाजीपंताच्या मागें या राजकारणाचे धागे संताजी घोरपडे, धनाजी जाधव वगैरे अतुल पराक्रमी पुरुषांपर्यंत सुद्धां पोहोंचवितां येतील. फार काय शिवछत्रपतींच्या अष्टप्रधानमंडळांत हि या भावी राजकारणाचा सल झाला असेल. तेव्हां हा संबंध दर्शविणारी ऐतिहासिक सामुग्री उपलब्ध झाली पाहिजे. आ-मची संशोधक मंडळी आपल्यापरी या बद्दल श्रम घेत च आहे, परंतु ज्यांचे जवळ असा संग्रह असेल त्यांनीं तो आमचे स्वाधीन केल्यास त्यांना हि आयतें श्रेय मिळेल, सर्वांनीं हस्तें परहस्तें मंडळास मदत केल्यास खरा इतिहास बाहेर येईल. आज तीन दिवस हा समारंभ उत्कृष्ट रीतीनें पार पडला. आपण येथें येऊन तसदी घेतल्या बद्दल आपलें व श्रीमंत युवराज बाबासाहेब या उभयतांचें मंडळ फार आभारी आहे. आपण मला अध्यक्षपणाचा मान दिल्या बद्दल मी आपला सर्वांचा ऋणी आहे. मंडळाची उत्तरोत्तर भरभराट होवो अशी देवाची प्रार्थना करून व हा

तीन दिवस चाललेला वाग्यज्ञ आज संपला असें जाहीर करून मी आपलें भाषण पुरें करितों !"

या प्रमाणें अध्यक्षांचें भाषण झाल्या नंतर दत्तोपंत पोतदार यांनी न्यू रिक्रिएशन् क्लब्, शिक्षणप्रसारकमंडळी, तसेंच सहकारी मित्रमंडळी, प्रदर्शनाचे व्यवस्थापक, निबंधकार इत्यादिकांचे आभार मानले. रा. ग. स. मराठे यांनी चिटणिसांचे व रा. मुंडले यांनी अध्यक्षांचे आभार मानले. इतक्यांत आजारीपणामुळें येतां येत नाहीं अशी रा वि. का. राजवाडे यांजकडून आलेली तार सभेस कळविली व सभा व संमेलन बरखास्त होत आहे तोंच रा. चिंतामणराव वैद्य रा. दादासाहेब करंदीकर यांजसहवर्तमान आले. येणें प्रमाणें सप्तमसंमेलन समारंभ सिद्धीस गेला.

## नियमांत दुरुस्त्या व पुस्त्या इ:—

संमेलनसभेंत रविवारीं सकाळीं पुढील प्रमाणें दुरुस्त्या व पुस्त्या वगैरे फरक नियमांत मंजूर झाले. ह्या सर्व सूचना कारभारी मंडळातर्फे चिटणीस रा. पोतदार यांनी सुचविल्या त्या एकमतानें मंजूर झाल्या. मंजूर झालेल्या दुरुस्त्या वगैरे येणें प्रमाणें:— ( इंग्रजी नियमपत्रक )

( I ) Page 4 Rule 5 ( *a* ) —change as follows :—

The Managing Body shall be elected at the Annual General Meeting or at a special general meeting called for the purpose.

(II) Page 4 Rule 6. ( *e* ) —add at the end :—

"Coopting members where necessary".

(III) Page 5 Rule 7 ( *a* ) —add at the end :—

( i ) "or strike off from the list such members as have their subscriptions for two years or over, in arrears".

( ii ) "and to accept contributions in kind and to enrol members as Life-Members on a proper evaluation of the same, if desirable". ( सदरहू भाग २ हा मात्र एक विरुद्ध सर्व अशा बहुमतानें मंजूर झाला. )

(IV) Page 7 Rule 11 Instead of "Twently members" change thus "Twelve members".

( V ) Page 7, Rule 16, change line one as follows :—

"At the Fortnightly meetings and the general meetings-annual or special or the......"

(VI) Page 7, Rule 18, Add the following :—

( i ) Ten days' clear notice of a Special General Meeting shall be issued to members before the holding of the meeting.

( ii ) Adjourned meetings require no quorum, though due notice of the meeting is necessary.

## देणगीः—

या तीन दिवसांत जाहीर करण्यांत आलेल्या देणग्या व नवीन प्रमुख सभासद पुढील प्रमाणेंः–श्री. नानासाहेब चंद्रचूड यांनीं आपल्या संग्रहांतील बहुमोल संस्कृतप्राकृत ग्रंथ ५०० चे वर मंडळास नजर केले असून ते सुरक्षित राखण्याकरितां एक अद्यास असें दगडी कपाट बांधून देण्याचें कबूल केलें. श्री. तात्यासाहेब मेहेंदळे यांनीं आपला ऐतिहासिक व वाङ्मयात्मक सर्व ग्रंथसंग्रह मंडळास देण्याचें अभिवचन दिलें. श्री. बाळासाहेब पुरंदरे यांनीं पुरंदरे घराण्याचें दप्तर छापण्यासाठीं तूर्त आगाऊ खर्चासाठीं म्हणून ३०० रुपये देण्याचें कबूल केलें. रा. हरि केशव गोखले यांनीं मंडळमंदिराकरितां २५० रु. दिले. रा. रा. आ. जोगळेकर यांनीं मंडळास ५१ रु. दिले. नवीन सभासद व वर्गबदल्या झाल्या त्या येणेंप्रमाणेंः— श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधि संस्थान औंध हे संस्थेचे आश्रयदाते म्हणजे वार्षिक ३०० रु. देणारे सभासद झाले. ना. साठे (वर्ग १), रा. सा. वि. अ. पटवर्धन (वर्ग २), रा. के. आ. पाध्ये वकील (वर्ग १), रा. बापूसाहेब फडके (वर्ग १), रियासतकार रा. सरदेसाई (वर्ग २), रा. दत्तोपंत आपटे (वर्ग २), रा. वा. हि. कोठारी (वर्ग २), रा. म. गो. रानडे (वर्ग ३), रा. भाऊकाका अभ्यंकर (वर्ग २) रा. ब. राळे (वर्ग १), रा. रा. ब. गोडबोले ( वर्ग ४ ) या मंडळींनी तहाहयात सभासद होण्याची इच्छा कळविली. तसेंच श्री. फलटणकर, श्री. हेबळीकर, श्री. भोसले धारकर, प्रो. सुरेंद्रनाथ सेन वगैरे मंडळी सभासद झाली. तसेंच मंदिरदेणगी हप्त्यापैकीं श्री. आबासाहेब मुजूमदार रु. ७००, रा. नरसोपंत केळकर रु. १०० असे हप्ते आले.

# कालिदासाचा कालनिर्णय.

## ( अन्यमतखंडण )

कालिदासाच्या कालाचा निर्णय करण्यासंबंधानें मुख्यतः दोन मतें प्रचलित आहेत तीं:- ( १ ) संवताचा प्रवर्तक जो विक्रम तो उज्जनी येथें राज्य करीत असतां तेथें कालिदास झाला. हा काळ इ. स. पूर्व ५७ येतो. ( २ ) संवतप्रवर्तक असा विक्रम म्हणून कोणी झाला च नाहीं. उज्जनी येथील शकराजांचा उच्छेद करणारा चंद्रगुप्त विक्रमादित्य गुप्तवंशीय सार्वभौम राजा हा च पहिला ऐतिहासिक विक्रमादित्य होय. याच्या वेळीं कालिदास झाला असावा; म्हणजे हा काल इ. स. ४०० येतो.

यापैकीं पहिलें मत मला मान्य आहे. या संबंधानें १९१८ च्या लोकशिक्षणांत मी एक लेख प्रसिद्ध केला होता त्या लेखावर घेण्यांत आलेल्या आक्षेपांचा विचार मी या निबंधांत करणार आहें. अन्य साधन उपलब्ध नसल्या मुळें कालिदास केव्हां झाला हें त्याच्या च ग्रंथा वरून ठरविलें पाहिजे। "कालिदासाच्या मालविकाग्निमित्र नाटकावरून, अग्निमित्र-पुष्यमित्र या सार्वभौम मगध राजाच्या, म्हणजे इ. स. पूर्व १५० नंतर लौकर च कालिदास झाला असला पाहिजे असें अनुमान निघतें." असें रा. शिवरामपंत परांजपे यांनीं दाखविलें आहे. या च मताचें पुष्टीकरण मी मेघदूतावरून करितों.

"दिवः कान्तिमखंडमेकम्" असें जें वैभवयुक्त उज्जनीचें वर्णन मेघदूतांत केलें आहे, त्या वरून कालिदासाच्या वेळीं तें भरभराटीच्या कळसास पोहोंचलेलें दिसतें. विक्रमादित्य शकारि प्रथम कोणी तरी होऊन गेला. त्यानें इ. स. पूर्व १०० किंवा त्या नंतर उत्तर शकांचा कारूरच्या लढाईत पराजय केला. तेव्हां उज्जनीस सार्वभौमत्व प्राप्त होऊन, संवत हा इ. स. पूर्व ५७ सालीं सुरू होऊन उत्तर हिंदुस्थानांत प्रचलित झाला, आणि हा च कालिदासाचा काल असावा असें दिसतें. शिवाय, अवंति देशांतील गांवढ्यामधील म्हातारे लोक "उदयनकथाकोविद" होते असें कालिदासानें मेघदूतांत म्हटलें आहे. सारांश, शकांनीं इ. स. ७८ मध्यें उज्जनीचें राज्य काबीज करण्या पूर्वीं कालिदास झाला असावा असें ठरतें. आतां, या अनुमाना विरुद्ध असणाऱ्या गोष्टींचें निराकरण करणें जरूर आहे. तें कलमवार पुढील प्रमाणें:—

( १ ) "दिङ्नागानां पथि परिहरन्" असा मेघदूतांत श्लोक आहे. त्यावरून दिङ्नागाचार्य म्हणून जो प्रसिद्ध बौद्ध पंडित इ. स. ५०० चे सुमारास झाला, तो व कालीदास समकालीन असावे असा एक तर्क आहे. परंतु ही शुद्ध मल्लिनाथी

आहे. कारण कालिदासाचे काव्यांत श्लेषालंकार नाहीत; महाभारत रामायण यांत श्लेष नाहीं. श्लेषाचा उपयोग संस्कृत वाङ्मयाच्या उतरत्या कालांत वाढला. शिवाय दिङ्नागाचे हस्तावलेप तेवढे मेघ कसे परिहार करणार ?

( २ ) प्रो. पाठक यांनीं माझ्या मताविरुद्ध पुढें आणलेलें प्रमाण विशेष मननीय आहे. चिनी इतिहासावरून हूणांची वसती सिंधूनदाच्या उत्तरतीरावर इ. स. ५०० चे सुमारास झाली; त्या पूर्वी नव्हती. रघुवंशाच्या चौथ्या सर्गात "तत्र हूणावरोधानां" हा श्लोक आला आहे; त्या वरून पाठकांनीं कालिदास इ. स. ४०० ५०० चे सुमारास झाला असावा असें अनुमान काढलें आहे. पण या त्यांच्या अनुमानाला बाधक असें त्या च सर्गांतील पूर्वीचे श्लोक आहेत. हिंदुस्थानच्या हल्लीं निश्चित झालेल्या इतिहासावरून, पारसीक, ग्रीक व हूण अशीं राज्यें जिंकिलीं हें वर्णन इ. स. पूर्व १०० ते ५१ पर्यंतच्या झालेल्या कालिदासाला च ठीक लागूं पडतें. पाठकांच्या मताला विरोधी असें दुसरें एक ऐतिहासिक प्रमाण रघुवंशांत च आलें आहे. इंदुमतीच्या स्वयंवराचे वेळीं कोण कोण राजे आले होते त्या संबंधाच्या एका श्लोकांत उरगाख्य पुरनाथ म्हणजे पांड्य राजाचा उल्लेख आहे. पांड्य राजे हे खिस्ती सना पूर्वी प्रबळ होते, आणि त्यांच्या राजधानीचें उरगपुर हें शहर कालिदासाच्या वेळीं अस्तित्वांत होतें. उरगपुर म्हणजे उरय्युर हें इ. स. ५० चे नंतर करिकालाच्या कारकीर्दीत नष्ट झालें. इ. स. ४०० च्या सुमारास पांड्यांची राजधानी मदुरा होती. यावरून, कालिदासाचा काळ मी वर म्हटल्याप्रमाणें इ. स. पूर्व १०० चे सुमाराचा असावा.

( ३ ) कै. शंकर पांडुरंग पंडित रघुवंशाचे प्रस्तावनेंत म्हणतात, कीं, कालिदास कोणत्या तरी विक्रमाच्या सभेंत पंडित होता आणि 'विक्रमोर्वशीयम्' या नाटकांत त्यानें आपल्या आश्रयदात्याचें नांव खुबीनें गोंविलें आहे. परंतु, हें मत मला मान्य नाहीं. विक्रम म्हणजे पुरूरवा असें कोठें च प्रसिद्ध नाहीं विक्रमेण प्राप्ता ऊर्वशी यस्मिन् असा मध्यमपदलोपी समासच युक्त होय. याला उदाहरण व जोड अभिज्ञानशाकुंतलम् या नांवांत आहे. अन्यत्र कोठें च जर कालिदासानें आपल्या आश्रयदात्याचें नांव घातलेलें नाहीं, तर मग येथें च तो तें कां घालील ? शिवाय, कालिदासासारख्याला आश्रयदाता पाहिजे च असें हि म्हणतां यावयाचें नाहीं. कालिदास काश्मीरचा राहणारा असून, शकांनीं उज्जनी घेण्यापूर्वी तेथें भरभराटीस असलेल्या कोणत्या तरी राजवंशाच्या वेळेस तो उज्जनीस होता व तो महाकालाचा मोठा भक्त होता, असें मेघदूत, मालविकाग्निमित्र व शाकुंतल या नाटकांवरून दिसून येतें. रा. पंडित हे कालिदासाचा काल अनिश्चित मानतात तें ठीक आहे. कारण, त्यांचे वेळीं हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास पुष्कळ अज्ञात होता. पंडितांनीं आपल्या प्रस्तावनेंत केलेला ज्योतिर्विषयक ऊहापोह महत्वाचा आहे. परंतु, त्यावरून हि कालिदास इ. स. नंतर झाला असें अनुमान निघत नाहीं.

आणखी एक महत्वाची गोष्ट पंडितांच्या प्रस्तावनेतून उत्थित होते ती ही कीं, कालिदासानें वाल्मीकीरामायणाचा उपयोग केलेला आहे. हल्लींचें रामायण शकप्रचारानंतरचें आहे, म्हणजे इ. स. पूर्व १०० च्या सुमारचें च रामायण ठरतें. त्या नंतर ४००।५०० वर्षांनीं कालिदास झाला असावा. असा या अनुमानाचा पेंच आहे. कालिदासानें रघुवंशाची हकीकत कोणत्या पूर्व ग्रंथावरून घेतली हें एक कोडेंच आहे. अज, रघु, दिलीप यांच्या कथा रामायणांत नाहींत. त्याचप्रमाणें कुशानंतरचे अतिथी वगैरे अग्निमित्रान्त राजे ही रामायणांत नाहींत. वाल्मिकीचें रामायण जसें हल्लीं आहे तसें मूळच्या स्वरूपांत नव्हतें. तसें च तें केव्हांचें हें ही निश्चयानें सांगता येत नाहीं. हल्लींचें रामायण इ. स. पूर्व १०० किंवा त्या सुमाराचें मानिलें तरी, थोड्याच कालानें कालीदास झाला असें मानण्यास हरकत नाहीं. कालीदासाचा काळ शकांनीं उज्जनी जिंकल्यानंतरचा नाहीं तर त्या पूर्वीचा आहे.

(४) डॉ. भाऊ दाजी यांचा तर्क असा होता कीं, काश्मीरच्या राजतरंगिणीत वर्णन केलेल्या विक्रमादित्यानें काश्मीरचा राजा करून पाठविलेला मातृगुप्त हाच कालीदास होय. पण हा तर्क हि मान्य करण्यासारखा नाहीं. या संबंधानें मी विस्तृत विवेचन अन्यत्र केलें आहे. पाश्चिमात्य विद्वानांची मतें कालीदास हा इ. स. ४००।५०० चे सुमारास झाला असावा अशीं आहेत. त्यांचें खंडण ग. नंदर्गीकर यांनीं केलेलें आहे व. नंदर्गीकरांचें हि मत माझ्या प्रमाणें च आहे.

कालीदासानें शाकुंतलांत दुष्यंताभोवतीं यवनी स्त्रिया असल्याचें वर्णन केलें आहे. तेव्हां हा यवनांचा विचार करतां हा काळ इ. स. पूर्व १०० चा येतो.

सारांश, वर दिलेल्या एकंदर प्रमाणांवरून कालीदासाचा काळ इ. स. पूर्व १०० च्या सुमाराचा च ठरतो.

चिं. वि. वैद्य

परिशिष्ट

# फार जुनीं मोडी पत्रें


'फार जुनीं मोडी पत्रें' या नांवाचें रा. पोतदार यांचें टांचण पृ ४९ ते ५३ यांत आलें आहे. त्या ठिकाणीं पत्राच्या दुर्बोधत्वाबद्दल त्यांनी लिहिलें च आहे. तेथें च 'अस्सल पत्रें पुन्हां रा. भट देणार आहेत-त्या वेळीं (मजकूर लावण्याचा) प्रयत्न करून पाहीन' असें त्यांनी लिहिलें होतें. परवां रा. भटांनीं हीं पत्रें पुन्हां पाठविलीं; दोन दिवस सतत प्रयत्न करून मीं तीं बहुतेक सर्व लाविलीं. लेखांक पहिला, दुसरा व तिसरा हे मागें छापले च आहेत. त्यांत पहिला व दुसरा हे स्पष्ट लागले नव्हते. आतां ते (चार पांच अक्षरां खेरीज) सर्व सुवाच्य लागले आहेत. लेखांक तिसरा पहिल्यानें च लागला होता. लेखांक चार बद्दल मागें 'फार च जीर्ण. सबब मुळीं च वाचणें झालें नाहीं' असा शेरा मारला होता. आतां प्रयत्न करून तो बहुतेक सगळा लाविला आहे. या प्रमाणें या नवीन वाचलेल्या पत्रा वरून बरी च नवीन माहिती पुढें येईल. पुढें लेखांक पहिला–दुसरा व चौथा दुरुस्त करून दिले आहेत.

शके १८४४ पुणें } आबा चांदोरकर

[लेखांक १] [अस्सल मोडी]

(१) हू *

(२) + रुजु अ काजी शरअ रुजु अ सनद



§

(३) छं अज दिवानु कोट चेंऊलु बेसेंमी मामलेदारानी व
(४) मुकासांनी व देसमुखु व मेहतरानी व देसाई सेटे महा
(५) जन जोईसीयां वतनदारानी व पेशें
(६) कारेयानु महालानिहाये मामिले तलेयां व तपे म्हेर्से

---

* मोडी अक्षर + ही ओळ फारसी अक्षरांची आहे. § मुद्रा फारसी अक्षरें अस्पष्ट
१ पौल २ इसमासी ३ मोकाशी, अनेकवचन. ४ मेहतर=महत्तर=पाटील जोशी अनेक वचन. ६ पेष्कार ७ तळें ८ म्हैसाळ

( ७ ) लिया व तपे सीरवर्धनीया[९]
( ८ ) लेहोनु दिन्हलें[१०] सु॥[११] तीसा समानीनु व समानु मीयां कारने [१२]ळी॥
( ९ ) रामभट चिनु हरभटु जोईसी बरवर[१३]करु व कुर्स्ट[१४] भटु चिनु
( १० ) गनभटु जोईसी बरवरकरु गोनुभट चिनु राम भट जोईसी बरवर
( ११ ) करु व केस भट चिनु वास भट गोखले जोईसी म्हेसळकरू येही हु
( १२ ) जुरु कोट मजकुरी येऊनू बंदगीस अर्ज पोचऊनू मालूम
( १३ ) केले जे केस जोईसी चिनु नील जोईसी गोलेकु[१५] जोईसी व उपा[१६]
( १४ ) व धर्मातकारि[१७]नी मामले मजकूर याने आपले खुस रजावंतीने
( १५ ) आम्हा[१८]सूं वतनु विकत देऊनू सदरहू वतनाची कीमतु आठावी
( १६ ) सतें २८०० लाहारीया घेऊनू वतन जोईसीपनु व उपाधेपनु
( १७ ) व धर्मातकारनु आम्हासू देऊनु सारे जमीदार व वतनुदार
( १८ ) यांचे गोहीनसी खरीदखत महजर करुनु देऊनु आपनु का
( १९ ) सीसु गेला व [१९]हुई दिली तहकीकि[२०]तु करुनु खुर्दखत बक
( २० ) सीसु करुनु वतनु बाहाल करावे सबब तहकीकात केले
( २१ ) जे यासी देसमुखी वतनदाराचे गोहीनसी महजर खरीदख
( २२ ) त केले ते देखुनु खातरेस आनुनु + + +* + + + +अलम
( २३ ) पन्हा निजामशाही तलगुं[२१] मुतालिकु अमल सुरु[२२]चे खाती
( २४ ) रेस आनुनु खत महजर मोजीबे[२३] वतनु येने प्रा॥ प्रगना वर्धन
( २५ ) पैकी गांऊ ६ येने प्रमाने गांऊ साहा १ मौजे उसरु १ मौजे दही
( २६ ) १ मौजे दहिवडी १ मौजे वेंजे १ मौजे वांजले १ मौजे चावनी
( २७ ) येने प्रमाने साहा गांऊ खेरीज[२४] करुनु तलेयां मामला सारां
( २८ ) व म्हैसल तपेया पैकी गाऊ साहा येने प्रमाने १ मौजे पाल
( २९ ) केले १ मौजे कोक्षरी १ मौजे तेकरे १ मौजे अमरी
( ३० ) १ मौजे तोरारी १ फवचूक व सीरवर्धन[९] तपिया
( ३१ ) पैकी गाऊ मौजे माडलें १ येक गाऊ वतनु जोईसीपनु व
( ३२ ) उपाधेपनु व धर्मानुकारनु येने प्रमाने सारे वतनू
( ३३ ) राम भट चिनु हर भट जोईसी वरोरकर व + + * + + +

---

९ श्रीवर्धन. १० दिन्हलें = दिलें; पाटणच्या शिलालेखांत हें रूप येतें ११ सु॥ ८८९ = शक १४१० १२ लिहिलें १३ वरयेकर १४ कुस्ट = कृष्ट = कृष्ण १५ गोखलु ? गोखले ? १६ उपाध्ये. १७ धर्माधिकारी १८ आम्हांस १९ ? २० ?

* शाई उडून अक्षरें पुसलीं आहेत " हजरती स्याहा + " अशीं लागतात

२१ तेलंगी २२ सुरनीस ? २३ प्रमाणें २४ वजा.

* फाटलें. " व ई सा का ची चे रा नु " अशीं अस्पष्ट दिसतात.

( ३४ ) + * + + बाळ भट बिनु गन भट जोईसी वरवेरकर व रा
( ३५ ) म भट मजकुराचा लेक[25] गोद भट जोईसी वरवेरकर
( ३६ ) व केष भट बिनु वीस भट गोखला वेळनेस्वरकर हा
( ३७ ) री जोईसी म्हैसलकर याचे गाऊ §+ + + + + + + + + +
( ३८ ) लाहारीया ४०० च्यारसे लाहारीया लाजीमी[26] घेऊ
( ३९ ) नु सदरहु वतन चौगा जनाचे दुमाला[27] केले असे औव[28]
( ४० ) लाद अफलादे[29] वतनु खातील यांसी कोनी मुजाहीम[30]
( ४१ ) न होने वतनु खातील खुर्दखती[31]ची नकल घेऊनु अस
( ४२ ) ल जोईसी मजकुरांस देने रा। छ १३ माहे मोहोरमु
( ४३ ) मुरतब सूद

मोर्तब सुद

( ४४ ) पैईवसता छ २१ माहे मजकुर

[ लेखांक २ ]

[ अस्सल–मोडी ]

( १ ) व तेरीख + + [1] + + सु[2] तीसा समानीनु व समानु मिया
( २ ) ग्वोही जमेदार व वतनदार
( ३ ) मौजे काकने
( ४ ) १ जानो कुसा पर
( ५ ) भु देसमुखु मा
( ६ ) मीले तलेयां
( ७ ) फारसी[3] १ अनंत भट[4] चि तामणी बालबो-धी[3]
( ८ ) परगणे मांदरज
( ९ ) १ हरि बाजी अदकारी १ रामाजी अद
( १० ) कारी प्रा। दि
( ११ ) जा ले
( १२ ) १भुजी जकाती
( १३ ) प्रा काजरवड

२५ लेक = पुत्र. §स्पष्ट लागत नाहीं. "चौगा जना वाटुनु + + +' असावें
२६ । २७ । २८ पुत्राचा वंश २९ मुलीचा वंश ३० अडथळा ३१ नूतनपत्र.
१ फाटलें. २ सुा ९८९;३ दोन्ही सिके अस्पष्ट. ४ ही सही सचंध बाळबोधी

१ जानोजी अदकार (१)
परगण गोवेठर्ण[५] पर
गन अंबरुं

येने प्र्माँ[६] जमेयत व वतनदार हुजीर मजालसी रामभट बिनु हरभट जोसी वरवरेकर व कृष्टंभट[७] बिनु गनभट जोसी वरवरेकर व गोदभट बिनु रामभट जोसी वरवेरेकर व केसुभट बिनु वीसभट वेळनेश्वरकर यानी जोसी म्हैसलकर यासी कोर्डे[८] जोईसी बिनु नील जोईसी गोखुला[९] मौ। तलेयां आपनु वतनु खरीदखत लेहूनु दिल्हे येसे जे + १ + + + + + + + + + बिनु जानु जोईसी गोखुला याचे वतनु प्रा। + १ + + + गाऊ सा। हा ६ सेरीज करुनु तलेयां मामला[१०] सारा वजा गाऊ येने प्र्माँ[११] १ उसर बुद्रुक १ साहे १ ववे १ ईवर्ले १ दहिवडी १ कानावडी व म्हैसल तर्‍फा पैकी गाऊ साहा ६ यांचे वतनाचे येने प्रा। गाऊ १ मांगारोळु १ कोखर १ तलोडे १ आनु १ तोनारी १ मलठण हे साहा गाऊ व श्रीवर्धन पौंकी गाऊ मौजे माडदे गाऊ येकु १ ये वतनु जोईसीपनु व उपाधेपनु व धर्मातकरनु[१२] वतनु सारे खात असतां त्यांस अवलौद[१३] नाही म्हनूनु त्याही आपले वतनु सारे मजला उदक घालूनु देऊनु आंदनु दिल्हे देऊनु माजा सासुरा पील जोईसी गोखुला याचा आजा वासुदेव जोईसी याने सीतारामभटाचे पणजे व कृष्टंभटांचे आजे व तुमचा पुत्र गोंदभट याचे निपणजे जानु जोईसी वरवेरेकर यांसी जे मुतालिकी देऊन तुमां[१४] पाऊँत[१५] चालत आली होती जे मुतालिकी ती तुमची तुम्हा कडे करार करुनु देविली व नवे मुतालिकया केसभट बिनु वीस भट जोईसी म्हैसलकर करार करुनु माजे सांधीनु[१६] वतनु करुनु वागनसीस गेले त्यांचे मागे मी आज आठरा साले वतनु अनभवीले तो माजी बाईको मरुनु गेली आपला बापुं[१७] क्षयेरोगु लागला पुडे आल्यांसु[१८] उमेद नांही तर

---

५ गोठमें ६ प्रमाणें ७ कृष्ट = कृष्ण ८ कोंड ९ गोसले १० मामला ११ गांवांचीं नांवें बरोबर लागत नाहींत. १२ धर्माधिकारीपण. १३ संतती १४ तुम्हां १५ पाऊतर – पावतर – पावेतर = पर्यंत. १६ स्वाधीन. १७ बापास. १८ आल्यास.

( ४१ ) हे वतनु सारे जोईसीपनु व उपाध्येपनु व धर्माधिकारनु तु-
( ४२ ) म्हा चौगां जनांसु[19] वतनु विकातु दिल्हे सदरहु वतनाची किमतु आ-
( ४३ ) पनु तुम्हा चौगा जना पासुनु येने प्रा भरुनु पोचलों लाहारी॰
( ४४ ) या २८०० तपसीलु ७०० रामभटु बिनु हरभटु जोईसी वरवडेकर ७०० व तु-
( ४५ ) मचा पुत्र वेगळां गोदभटु बिनु रामभटु जोईसी वरवरेकर ७०० व कु-
( ४६ ) ष्णंभटु बिनु गनभटु तुमचा चुलत चुलता जोईसी वखरेकर ७०० व कें-
( ४७ ) सभटु बिनु वीसभट गोखला जोईसी म्हैसलकर येकूनु लाहारीया
( ४८ ) २८०० आठावीससे लाहारीया कीमतु घेऊनु सदरहु वतनु विकत चौ-
( ४९ ) घा जणांसु दिल्हे तुम्ही चौगे जनु वतनु पुत्रपौत्रादिसीं खाने मा-
( ५० ) जा कोनी मागे पुढें कोठे हि गोत्रजु व वंससु नाही येसे आसोनु
( ५१ ) जो कोनी माझे नाऊं सागोनु तुमासी उभा राहिलु तो लबाड हुं[21]-
( ५२ ) टा तुम्ही सुखाल वतनु खावें हें[22] मार्जे सत्य ४२
( ५३ )        बी कलम श्रीपादुपंतु बिनु बाळाजीपंत कुलकर-
( ५४ )        नी मामले तळेयां

[ लेखांक ४ ]                [ अस्सल-मोडी ]

श्री

(फारसी)

बेजानेब ++[1] ++ देसाईयान व देसकानी माहा
लानिहाये मामले तलेये गावगना सुाँ समस इहिर्दीन व
अलफ भिकाजी बिन आत्माजी व सिवाजी बिन आत्माजी परभु
पालकर यास बालेकंपंत वलद नरसीपंत कुलकरनी मामले
तलेया कारने वतन कुलकरन रुो पांचसे महु ++ ५००
दिल्हे सारे वतन भाई भा न ज ह ज र व लछिराम +++ पर
+++++ कागद करारेस आणून भिकाजीपंत ++
+++++++ वनन ++++++

---

१९ जणांना. २० नांव. २१ खोटा. २२ 'हें मार्जे सत्य ४२' हीं अक्षरें कोंडोपत गोखले याचे हातचीं बाळबोधींत आहेत. येथें '४२' या अक्षराची फोड अशी कीं, कोंडोपंतानें आपल्या बेचाळीस पूर्वजांची शपथक्रिया केली.

१ यांस २ सर्वत्र फुल्या असलेल्या जागीं फाटलें आहे. ३ सुा। १०१५= शा. श. १५२६ ४ बाळकृष्ण ! ५ नरसिंह ६ लागत नाहीं.

न तुमचे + + + अहेत ता। वरस गांव + + + इंदापुर ता।
+ + + + + सींव समेत सारे कुलकरन दिले सर्व वतन व वा-
डी व बाग व आगर व विहिरी व गांव व सर्च ती + + इनामती व इंसा-
वती व हक्क सारे कागद व निशाण व माल व + + + सारे + +
असे + + + आपले औलादेस व आफलादेस खाईल यास कोणी
मुजाईम न होये सु॥ तिसा समानीन व तिसा मिया पै मुनामु-
बिक या परमाने खत विठलपंत बिन अंतोपंत ओळ पाईस
+ + + + वतन कुलकरन मी घेईन तर
विकत वतन भिकाजी मजकुरास पटले + + + +
नी हे मनास आणतां तो पर्गु नाही तर त्याणे मुजाईम न हो-
णे ते मुतालीक + + + + + +
+ + + + महजर + + + +
ते हस्ताक्षर विठलपंत मा। मजकुरचे सर्चवेच कबूल करु-
न महजर करून घेता तर मा। मजकुरचे वतन + + + हो-
त तर त्यासी येकंदर मुजाईम न होणे खुर्दखत रवाना तर्सी
अ ई न द स्ता ई + + + रवाना चंद्र छ १० मल्हे साबानु
मोर्तब सुद

(फारसी)

# पांजी-नवस

श्रीमंत सरदार मल्हारराव चिमणराव ऊर्फ दादासो पुरंदरे यांच्या संग्रहांत पांजीचा नवस करावा याबद्दल माहिती देणारीं पत्रें मिळालीं. त्यांपैकीं एक अस्सल पत्र जसेंच्या तसें च खालीं देत आहे. बहुतेक प्रत्येक घराण्यांत कोणताना कोणता तरी कुलधर्मकुलाचार चालत आलेला आढळतो. अशांपैकीं च पांजी हा एक देवी-प्रीत्यर्थ कुलाचार पुरंदरे यांच्या घराण्यांत चालत आलेला आहे. अशा प्रकारचे कुलधर्म अथवा कुलाचार कोणत्या कारणानें किंवा समजुतीनें सुरु होऊन चालू झाले याबद्दल कांहीं च गमक नाहीं. तथापि अशा कुलधर्म-कुलाचारांची एकंदर नोंद केल्यास ती सामाजिक इतिहासास फार च उपयुक्त होईल व या च हेतूनें 'पांजी'बद्दलची माहिती पुढें देत आहे:—

ले. १ ॥ श्री ॥

चिरंजीव राजश्री दादा यासी प्रति मातुश्री आबई आसीर्वाद उपरि येथील कुशल ता॥ छ १९ रजब जाणून स्वकीये लिहिणे विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले सविस्तर कळले चिरंजीव राजश्री पाटील व राजश्री बापु यासी सवडे व नायटे होत होते याजकरितां श्रीजानाईची पांजी करावयाचा नवस केला आहे त्यास पांजी कोणा महिन्यांत कोणत्या दिवशी करावी संप्रदाय कसकसा आहे तो सविस्तर ल्याहावा म्हणून तुम्ही लिहिले येसियासि पांजी माघमासी अगर फाल्गुणमासी शुक्रवार सोमवार भोमवार या दिवसी करावी .पांजीचा. सांप्रदाये आमच्या घरचा

सोन्याचे अगर रुप्याचें टाक जानाईचे आहेत त्यात सोन्याच्या टाकांत सोने रुप्याच्या टांकात रुपे पहिले आहेत त्यापेक्षां ज्याजती चार सहा मासे घालून देव नवसरावे सोनाराच्या घरिहून आणत्येसमई सोनारास उलफ तांदूळ दाळ कणीक तूप गुळ द्यावा मग देव आपणाजवळ घ्यावे तां म्हणतां तांदूळ घालून त्यांत देव ठेवून घरास आणावे घराभोवती आंबील घुगऱ्या टाकाव्या आणि देव आणावे दोन प्रहरानंतर संध्याकाळचे आणावे संध्याकाळीं पूजा करावी नैवेद्य येणेप्रमाणे—

नवी दुरडी घेऊन त्यांत नैवेद्य भरावा

१ भात तांदूळाचा केली ०८।·
५ तेलवऱ्या.
५ पोळ्या पुर्णाच्या
५ पांढऱ्या पोळ्या
५ वडे
५ फळे गव्हांच्या कणकेचीं लाटून करावी
५ कानवले गुळाचे
१ क्षीर जी केली ती कार्यास येईल तांदूळ अगर वळवट
१ वरकड घरांत जो सयेपाक भाजीपाले कडी सांबारे व वरकड पदार्थ करावा त्यांतून नैवेद्यास थोडा थोडा घालावा

---

नवे सूप घ्यावे त्यात भरावे

२ तिवट १ शेला १
२ चोळी १ पातळ १

---

१ कडबंधणे कमरबंद
१ घोंगडी काळी चिमणी म्हशास वीतभर लांब
५ दालिंबे
५ निंबे
५ केळे
५ पेरु
१ नारळ
१ पंचखाजे
५ जायफळें
५ मायफळें
५ खारका
५ सुपाऱ्या
५ लवंगा
५ हळकुंडे
५ दांतवणपुड्या
२ नाडापुडी
५ पानें विड्याची

---

येणेप्रमाणे दुरडीतील नैवेद्य एकीकडे व सुपातील येकीकडे देवापुढे ठेवून देवास संध्याकाळीं समर्पावा विडा ठेवावा धूप दीप सर्व जाल्यानंतरी दुरडीतील नैवेद्य व सुपातील अगदीं झाकून देवापुढेच सारी रात्र असो द्यावे दुसरे दिवसी दुरडीतील नैवेद्य घरची खासी माणसें जीं असतील त्याणी तो नैवेद्य प्रसाद भक्षावा राहिला तो गाईस चारावा दुसरियासि त्यांतील काही देऊ नये सूपातील पदार्थ तिवट सेला घरच्या वडलाने पोषाक करावा चोळी पातळ घरच्या धननीनें नेसावे घोगडी व कडबंधन घरात ठेवावे सूप व दुरडी घरात वागीस घालावी दुसऱ्यास देऊ नये याप्रमाणे करावे १ १.

पांच ब्राह्मण पांच सवाष्णी सागाव्या सवास्णीस प्रातःकाळीं तैलाभंग करवावा फराल करतील ब्राह्मणहि फराल करतील घरच्यानीहि फराल करावा संध्याकाळी पुजा जाल्यानंतरी आवघ्यानीं सवाष्ण ब्राह्मण पंगतीस भोजन करावे सवास्णीस चोल्या द्याव्या ब्राह्मणास दक्षणा द्यावी विडे द्यावे दातवणाच्या पुड्या सवास्णीस द्याव्या १

कुंभाराच्या घरच्या डाका आणाव्या त्यांची पूजा करावी दक्षणा रु. ॥• आर्धा ठेवावा विडा ठेवावा कुंभार पाच आसामी जेऊ घालवे १

सदरहु लिहिल्याप्रमाणें पांजी करावी येसा सांप्रदाय आहे यानंतरी आमच्या वंशांत घरच्या धननीनें बारामाही मंगलवार करावे. येक धान्याचा फराळ करावा वर्षातून चार घरें माहाराची व येक घर मांगाचें नानाई तुकाईची वारी म्हणून वारी मागोन जे दाणे वारीचे येतील त्याची भाकर करून भक्षावी ते दाणे दुसरियासि देऊ नयेत दोन च्यार दिवस भाकर भक्षिली तरी कामास येईल याप्रो आमचे वडिलावडिली चाल आहे बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद

गं. ना. मुजुमदार.

# सूची.


अ

अकबर शाहाजादा—२८

अजमीर—१६, १९, ४०.

अंताजी माणकेश्वर—६८–७५

अनंदराव जाधव—८०–८२

अपभ्रंश–भाषा व वाङ्मय—१५५ —१५७–वृत्तें, दोहा इ. १६१ व्याकरण १६० व जैन १५८–१६१

अफझुलखान—५७—५९

अफरासियाखान—च्या बायकामुलांचे हाल—८.

अबदाली—तैमुरशाहा—१४–१५

अंबाजी इंगळे—लालसोटची लढाई–४ —बादशहाशीं बोलणें—१२–होळकरांकडे जाणें—२२—अलीबहादराशीं मसलत २९–३०

अंबाजीपंत पुरंदरे—९६–१२५

अमरावती—११४

अरुणचा किल्ला—४०

अलमगीरपुर—६७

अलवार—१२—१७

अली आदिलशाहा–नाणें–९५

अलीबहादर–नें रामजी पाटलास उत्तर २२—ची होळकरांस निकड २२—मेवाडाहून निघाले २२ —जैपुरच्या राज्यांतून जाणें २९ —गुलाम कादरावर रवानगी ३१ —नें गुलामास धरलें ३१ —वर कारभार सोंपविस, सं, वृ.–२६ ण्याची पाटिलबावांची योजना ३४–३६ चा गोसाव्यास आश्रय ३७–३९ ला वाटणारी नानांची भीति ४० —चें गोसावीप्रकर्णी कुटिल वर्तन ४२—४३

अल्लाउद्दिन खिलजी नाणें ९२

अहिल्याबाई–मराठ्यांचा माभिमान,नानामहादजींशीं ऐकमत्य४६–४८

आ

आग्रा —१८–२१–२४–२६

आपाजीपंत दामले –गोसावी प्रकर्णी अलीबहादरा कडील पंच ३८

आबदुल अहद्खान —२५

आबा चिटणीस—४१, ४२

आबाजी नाईक– शिंद्यांचे सावकार—३

आंबत– परगणा —५१

इ

इंग्रज –१२–१५—२१,–४८

इंद्रगड —२९

इब्राहिम आदिलशाहा –नाणें –९५

इवेली —५१

इस्माईल बेग —जवळ बादशाहा साहाय्य मागतो –पाटिलबावा विरुद्ध कट १२–१३— आग्र्यास वेढा १८— हवेलपुरास १९— भरतपुर, कुंमेरी, डीग २०— आग्र्यास पराभव २४–२५—दिल्लीस बादशा-

हावर २७— पाटिलबावांशीं संधान २८–३६ अलीबहादराशीं सूत ४३
इस्मायल आदिलशाहा –नाणें–९५

उ

उज्जनी —२१–२२— टांकसाळ ८३–९१
उदेपुरकर–मराठ्यांच्या बाजूस – ३१ –३२
उनापेदेव —११९–१२१
उमाळे —१११
उसर मुद्रक —५१
उमरावगीर गोसावी –आमच्याच्या लढाईंत जखमी व कैद –२०

औ

औट्रॅम् सर जेम्स् —१०१

क

कडोली—७१–७३.
कळमोर्दें—१०७–१२१
काजीपुरा—११५
कानळदें—१०२
काबूल—१५
कार्नवॉलीस—लॉर्ड—१३.
कालिदासकालनिर्णय –१९०–१९२
काशी–क्षेत्र — १३ – विश्वेश्वरासंबंधी पत्र ३३
कासोदें—९८.
कुंजपुरा—३४
कुंभेरी—२०
कुंवारी नदी—१९–२०.
कुसवडे—७८
कृष्णगडवाला राजा—४१
कृष्णराव हरी—३३
केसभट बिनु विसभट जोइसी गोखला म्होसलकर–५०, ५२,
कोकरूड—५३.
कोशर—५१.
कोटकर—३१–३२

ख

खंडेराव हरी—लालसोट येथें राठोडावर हल्ला. ४
खंडो मल्हार वोकील—६३.
खुशालगड—३०.
खैरुन्निस –गुलामाबरोबर कट–११.

ग

गणोजी बिन बाळाजी जाधव—७८.
गंद्रे–सावकार—३.
गंगाराम शेट—३०
गंगाजी शंकर देशपांडे—५६
गंभीरराव देशमुख—१०४
गणपतराव कृष्ण—११
गधिया–गंधर्वसेनाचें नाणें. ८३.
गाडेगांव—१११
गिरमाजी झुंगो देशपांडे—५६
गिरिधर कछवाह—११०
गुजाजगर—८५
गुरव–मोरोजी व चिंतामण—५६
गुलजारखान ठोके—१३३
गुलाम कादर– अंतर्वेदींतील मराठ्यांचा अंमल उठवितो–मिरबक्षागिरी बादशाहास घाबरवून मिळवतो–बादशाहाविरुद्ध कट ११—रामगडावर स्वारी १८–१९—बादशाहास मराठ्यांविरुद्ध उठण्यास लिहितो २०—महाबन, आग्रा, येथें पराभव २४ २५चे दिल्लींतील अत्याचार २७—चें गौसगडास पलायन २८—वर इस्माईल बेग उलटतो २९—राणेखान, अलीबहादर, मेरठ येथें वेढ॰

तात ३०—कृष्णराव हरी गुलामास पकडतो ३३ — स पाटीलबाबा 'विपत्य' करून मारवितात ३४
गोपाळ कदम—५६
गोपाळ जगन्नाथ बोकील—६१
गोपाळराव त्रिंबक—३७.
गोपाळसेटिया मल्हारजी चौधरी—५६
गोकुळगड—१८—१९, ४१.
गोरगावलें—११९
गोविंदराव पुरुषोत्तम—पेशव्यांचा दिल्ली येथील वकील १३.
गोसगड—२७, ३४
गोहद्—३, १२, ३५
गौडाली—५५—५६
ग्रांट डफ—५७—५८.
ग्वालेर—३, १२, १८, २४

घ

घणवाई—८५.
घियासुद्दिन तुघलक—नाणें—९२—९३.
घोरचगेल घाट—३०

च

चमेली नदी—१४, १८—२०, २९
चहार्डी—११४
चंद्री—७८
चंड—वैयाकरण—१५५—१५६
चंद्रसेन जाधवराव—८२
चासनी—८७
चासनीगर—८५
चांद मोमिन—९९—१००
चांदरात—८९
चिंचवड—५९
चिंचाळे—११९
चिंचनेर—७९
चिमणाजी भानु—अरुणचा किल्लेदार —स नानाचे गोसावी प्रकर्णी पत्र —४०
चोपडें—११२
चौगांव—११७
चौकशी—८४
चौधरी—८५

ज

जगन्नाथ पंताजी बोकील—६०
जनाजीराव जाधव—८०—८२
जमाल पाटिल—५६
जयसिंगाची छत्री—चोहोर्डे येथें—मृत्यु १६६७—१११.
जाधवराव सेनापति—१२६—१२७
जानफळ—१००.
जानोजी भोसले—६९, ७५.
जानो विश्वनाथ भट—शक १६२८ मध्यें हयात—१२७.
जिंतीकर भोसले—६८.
जिनचरित्रें—१६१
जिम्मेदार—८४.
जिवबादादा बक्षी—२४.
जुना मोडी लेख—४९—५२.
जुने शब्द व रूपें—मानभावी वचन पाठांतील—१४३.
जुवाबक्ष—पातशाहजादा—१२, १३, २९.
जैन—१६१—१६०
जैपूरकर—खंडणी ३—मराठ्यांविरुद्ध ४—लालसोट ४—७, १४—१६, १९—अली बहादरास वाटचंदी २९, ३०, ३१—शिंद्यांवर प्रयोग ३७.
जोधपुरकर—१४,— १७, २२—२१, ३२.

झ.

झांसी किल्ला—४१, ४३.

ट.

टिपु सुलतान—नाणें—९५.

ड.

डीग—८—रंजितसिंग जाट घेतो १९ येथें गुलामाचा पराभव २०-२१.

डिभाई—फ्रेंच सरदार—लालसोट येथें ४, ७-८—पाटिल बावासंबंधीं उद्गार—४५.

ढ.

ढपळपुर—१९-२०.

त.

तर्के—तालिये—५२, ५३.

तलोडे—५१.

तहरीर—८९.

तारेकशी—८७-८९.

तारागड—७९.

तासाची धामधूम—६०.

तुको त्रिंबक पुरंदरे—१२५.

तुकोजी होळकर—दक्षिणेंतून पाटिल बावांचे सहाय्यास रवानगी १६—शिंद्याच्या मदतीस जाण्याची टाळाटाळी—२१— अलीबहादुरास सुद्धां मार्गे ठेवण्याचा बेत २२—रजपुतांचा कैवार २३—स नानांचें पत्र ३२—चें गोसावी प्रकर्णीं व पाटिल बावासंबंधीं पुण्यास पत्र ३९-४०

तुळाजी थोरात—१२७.

तुळाजी निकम देशमुख ५३.

तुळाजी पिसाळ—५६.

तोनारी—५१.

थ.

थोरातां संबधीं—१२२

द.

दंडी—साहित्यकार—१५५.

दत्ताजी केशवजी नाईक—५६

दयाराम पुरभया—फितुरी—८

दराब—८५

दरोगा—८४

दहिवली—५१

दामोदर देवराव—२४

दिल्ली—मराठ्यांचा अंमल उठतो ९—१४,—१७-१८—अत्याचार २६—२८, ३२.

देऊळगांव राजे (जुना शिलालेख) १६१-१६२.

देवाजी गवळी—१९,३३

दौंडाइचें—१०२

दौलतराव शिंदे—टांकसाळ—८६—९१

ध

धनपाल—अपभ्रंशलेखक—१५८

धरणगांव—१०१

धांडेघर—५५-५६

धारदिव्य—५५-५६

धार येथील घराणीं—७०-७१

धारागीर—१११

न

नजब कुलीखान—१२—रेवाडी गोकुळगड दाबतो १८—१९,४१

नंदराम हळदिया—१५

नागेवाडी—५५-५६

नाजर मंजुर अलीखान—१२-१६

नांद्रें खुर्द—१००

नाना फडणीस—सदाशिव दिनकरास पाटिलबावाच्या कारभाराची चौकशी करण्यास पाठवितात २—चें जोख-

पुरकरास सणसणीत उत्तर १६— होळकर व अलीबहादरांची शिंद्यांच्या मदतीस रवानगी २२—अलीबहादरास पत्र २३—तुकोजीस पत्र ३२— भिकाजी नारायणास विश्वेश्वर देवालयासंबंधीं पत्र ३३—स अलीबहादरांचें पत्र ३४—चिमणाजी भानूस पत्र ४०—अलीबहादरास गोसावी प्रकर्णीं पत्र ४१—४२— नानांसंबंधीं पाटिलबावांचें शंकित मन ४४—व महादाजी ४७
नांदनज—६६—७५
नारो गणेश—२३
नारो बाबुराव बोकील—६२
निकम देशमुख—देशपांडे—१००
निंबाळकर—यावलकर—११६
निरथडी—७९—८२
नेरी—१११
नौबतराय खत्री—शिंद्यांकडील रांगडा सेनापति—लालसोट येथे फितुरी ४—८ चा आग्रा येथील वाडा इस्माईल बेग लुटतो—२०
म्याहारगीर—८५
म्हावी—१०७

प

परशुरापंत प्रतिनिधी—५५
परसोजी राजे भोसले—६६
परिंचें—७७—८२
पळसदेव १६२
पळासखेडे—१११
पागे—१४
पाटिलबावा—च्या कारभाराचें अवलोकन २—३—चें लालसोटच्या लढाईंतील वर्तन ५—९—चा दरारा नष्ट झाला १०—११—स पातशहाचें उत्तर १२—च्या विरुद्ध कारस्थानें १४—१५—चा दक्षिणेंत जाण्याचा बेत २१—चा दरारा पुन्हां बसतो २८—चें अलीबहादुराशीं संगनमत ३१—स नानांचा दुजोरा ३२—चा अलीबहादुराशीं युक्तिवाद ३५—३६—विषयीं नानांचा अभिप्राय ३६—चें गोसाव्याशीं वैर ३७—४३—चे गुणदोष ४४—४५—व नाना ४७
पारसी प्रकाश ( संस्कृत फारशी कोश ) —१६२
पाराशरपंत—२३
पाटण—येथील अपभ्रंश ग्रंथ—१६०
पंचजन—निरनिराळे अर्थ—१२८—१२९.
पंताजी गोपिनाथ बोकील—५७—६३ चा वंशवेल—६४.
पंताजी बाबुराव बोकील—६२.
पांगाकोलु—५१.
पांढर—५५.
पिंपळाई—पाटिलबावांचा मुक्काम—८
पुणें दरबार—पेशवे—९, १२, १६, १७, २१, ४०, ४३, ४८, ६८, ६९.
प्रतापगड—५८—६४.
प्रतापसिंग—जैपुरचा राजा—लालसोट येथें ४—दिल्लीस बादशाहाशीं सूत १४—सोडीस बादशाहाशीं भेट १७.

फ.

फरकांडें—९९
फरीदाबाद—२६—२७.
फरुकी राजांची वंशावळ—१०८.
फरोकाबादवाले—खानसामा—१२.
फेरोजाबाद—१९.
फेरोशहाबामनी नाणें—९५.

फैजपुर—१०५.

ब

बनास-नदी—३०.
बल्लाळ गणेश वंदन-कवी-९८.
बळवंतराव सदाशिव-गोसावी प्रकर्णी अलीबहादराचे पंच पाटिलबावांकडे जातात ३८-इस्माईल बेगाचा पराभव ४३.
बहिरोजी सेटिया-५६.
बाजार बैठक—८८-८९.
बाजार मुत्सदी—८५.
बाजु—५१.
बादशाहा (शाहा आलम)-चें पाटिलबावांस पत्र १०-१२-पाटिलबावांच्या कर्तबगारीवर विश्वास १३ -जेपुरच्या राजाशीं भेट १७-होळकराकडे डोळे १८-गुलामकादरशीं व्यवहार २०, २४-२६,-चे डोळे फोडले २७-चंचल मन २८ —२९.
बापू होळकर—२२, ४३.
बाबुराव रामचंद्र वोकील-६०-६१.
बाळाजी आवजी—५९
बाळाजी विश्वनाथाचीं पत्रें-हस्ताक्षर ६६—१२५-१२८.
बिजेसिंग-जोधपुरचा राणा- १४-१६, ४५.
बुधासिंग-वकील—१५.
बुऱ्हाणपुर-शिलालेख -१०८-११०-१२१.
बेदरशाहा-शाहाजादा-२८.
बोहोर्डे-१११.
बांगी घराणें -विजापुर -९४
बांभोरी —१

ब्राह्मणकालीन जातिभेद—१२८-१४०
ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व-कारणें—१३०-१३२

भ

भगवंतगड—३०
भगीरथजी शिंदे—दिल्लीस बादशाहाचे साहायास-तेथून पलायन-२६
भरतपूर—२०
भविसपत्रकद्दा-१६१
भिकाजी आत्माराम प्रभु—५३
भिकाजी नारयण—३३.
भिकोबा पाळंदे-गोसावी प्रकर्णी पंच-अलीबहादराचे हस्तक-३८
भिलवडी-१२३
भीमासिंग-राठेडाचा मेहुणा लालसोट येथें मृत्यु —४
भीमसिंग-जोधपुरचा सेनापति लालसोटच्या लढाईत ४-दिल्ली येथील मराठ्याच्या वकिलाशीं बोलणें. १७.
भेलसा—२२
भोळी—५८-६४
भांबोरे—६६-७६.
भांबेरेकर भोसले - ६५ - ७६-चें वंशावळ ७६
भोंवरगांव—५५.

म

मथुरा -वृंदावन —१२, २७, ३४
मयतार्जे—१०३
मलक महंमदखा —१२
मलकामल -किल्ला —११७-११८
मल्हारणें —३०
महमद आदिलशाहा -नाणें -९५
महमदशाहा बामनी -नाणें—९५
महंमद बेग हमदानी -आग्र्याचा सुभेदार-लालसोट येथें मृत्यु —४-५

महावन —२४
महार वीर —५५-५७
महानुभाव-मानभाव पंथ—१५४
त्यांचे वचनपाठ १४१ —पंच कृष्णाचे अवतार १४४ —चा सूत्रपाठ १४६ —चे मठ १०६-१०७
महेश्वर —२२, ३१
महेश्वरसूरि-संयमजरीकर्ता १५९
माइले —५१
माहाजुर सेठी बिन नागनाक महार —५५-५६
माहादाजी बेबदेव —१२७
मिराजी निकम —५३-५४
मुकुटपूजा —मानभावांची —१०७
मुजफरखान —सुलतान —११३
मुबारक खिलजी —नार्णे —९२
मुस्तफाबाद —चोपडें —११२
मेरठ —११, ३०, ३३
मेवाड —२२
मोरो मयराळ सोमनी आकोलकर८७,९१
मोरो हरी —८७-९१
मोरभट जोइसी हर्णेकर—५२
मोहोरकंद —८५
मांडकी —५८-६४
मांदरज —परगणा —५१

य

यमुनानदी —११, २५
येशवंतराव जाधव —८० -८२

र

रघुनाथ गंगाधर पंडित —११३
रवळोजी शिंदे —बादशाहाची भेट दिल्लीहून फरिदाबादेस पलायन २६- दिल्लीचा किल्ला घेतात—२८
राजाराम छत्रपती —५५, ७८
राजपुरे —सिवजी व रतोजी —५६
राघोगडकर राजास शिंद्यांचा दगा —१२
राणेखानभाई —लालसोटच्या लढाईत ५-८ —आग्र्याचा वेढा उठवितात २४-२५ —दिल्लीस बादशाहाजवळ २९-१९-२१—३३
रामकृष्ण खंडेराव वोकील —६३
रामगड —१८-१९, २४
रामचंद्र नीलकंठ अमात्य —५३
रामजी पाटिल जाधव —शिंद्यांचा वकील —अलीबहादुराशीं बोलणें २२ नानांशीं बोलणें —४१
रामपुरा —२१
रामभट बिनु हरभट जोईसी वरयेकर —५०-५२
रामरतन मोदी —१६-१७-२६
रायाजी पाटिल —लालसोट येथें —४ आग्रा येथें १९-२० —भरतपुरास पलायन २० —आग्र्याचा वेढा उठवितात २४-२५ —गोसावी प्रकर्णी —३७-३९
रायाजी बापूजी —५४
रावराजा अलवारकर —पाटिलबावांचा पक्षपाती —लालसोट येथें ६—१२, ४१
रिधूर —१०३
रेवाडी पा दी —१२, १७, १८
रंजीतसिंग जाट —१९-२० २४-२५;३०

ल

लखनौचे वजीर—१३, २४, ३३.
लखबादादा—आग्र्याचे किल्लेदार—१९ २४; ३७-३८.

लाडोजी देशमुख-शिंयाचा दिल्लींतील सरदार—पळतो ११-परत येणें २५
लालसोटची लढाई ४-८—
मुळें मराठ्यांचा दरारा जातो. ९-१२—बादशाहा पेंचांत १८ —पाटीलबावा शहाणे होतात-९-
लासूर—३३५.
लोलिंबराज- कृत हरिविलास-१२३.

व.

वडधानोरी—३०३
वनकोर्ठे—९७.
वर्डी—११९
वररुची—प्राकृतप्रकाशकार १५५—१५६
वाघोजी कदम—८२
वाग्भट-साहित्यकार—१५६
वावे—५१
वाळवें—१२१—१२३.
विठ्ठल हरी वकील—३८.
विठोजी ऊर्फ खेलोजी राजे भोसले ६५—चा वंश ६६.
विष्णुदास नामा-मानभाव-चें महाभारत--९८-९९.
वैराटगड—५५-५७
वैश्याचे ब्राह्मणकालीन हक्क—१३७-१३८

श

शब्दसंक्षेप—मानभावांचे—१४२
शहादें—१०१.
शहा निजामुद्दी -- दिल्ली येथील बादशाहाचा कारभारी - मराठ्यांचा पक्षपाती—११
शामाजी आपाराव — इंगळ्यांचा वकील-१२
शाहु छत्रपति--५८-६१; ७९-८१.
शाहुदुर्ग—ऊर्फ परनाला—५५
शिकची--८५
शिकंदर आली आदिलशहा- नाणें -९५
शिवाजी छत्रपति-५७-५९
शिवाजी विठ्ठल--ऊर्फ बापू पागनीस लालसोटच्या लढाईंत — ४ - ७; १४— गोसावी प्रकर्णीं कमिशनर-३७
शूद्राची ब्राह्मणकालीन स्थिति---१३९-१४०.
श्रीनिवास पंताजी वकील-६१.
श्रीवर्धन--५१.

स

सखाराम बापू--५८-६४.
सदानंद स्वामी अयाचित - मठ-११३
सदाशिव दिनकर - नानांचा बातमीदार-पाटीलबावांच्या कारभाराची मीमांसा २-३-४४
सदाशिव शामराज - अलीबहादराचा दिवाण - गोसावीप्रकर्णीं तोड ३९ यजमानास विटतो ४२
सदाशिव मल्हार—१५
सयाजीराजे भोसले—६७
सवा टका—८७
सहस्री —५३
सत्पंथ -हिंदुमुसलमान सारखे—१०६
साई —५१
सायण पंचजनांचा अर्थ -१२८-१२९
सातारा —१४, ३२, ६२, ७८

सांगखेडें —१०२
सावजी बिन रंगाजी देशमुख –५२
सावर्दे —१०४
सासवड —१२५–१२७
सिवजी चौगुला ५६
सिवझडे मुकद्दम ५५–५६
सीतलदास —१६, २६
सीतळनाथ साधु —११२
सुजातखान —१२
सुजादिसखान —१२
सूर्याजी फिरंगोजी नाईक पिंगाल
देशमुख –५६—चा मृत्यु केव्हां १५५
सोनजी जगथाप —१२६
सोभाराम भंडारी रजपुत सरदार
लालसोट येथें मृत्यु –४
संकेत —मानभावी वचनपा-
ठाचा —१४१–१४२
संताजी घोरपडे —७८

## ह

हनुमंत खेडे —१००
हालते मनोरे —९९
हिदायतनामा –जयाजीराव
शिंदे यांचा —८५
हिरोजी यादव —९६–९७
हिवरें—५७–५९
हिंगणे–वकील—१७, २०.
हिंगोणें—१११.
हिंडोण—३०.
हिंमतबहाद्दर अनुपगीर गोसावी।
गुलाम कादराचा पक्षपाती
१२ — बादशहास नाचविण्यास
पुढें येतो १८ — फेरोजाबाद
घेतो. १९ — मराठ्यांस मिळतो
२६ — फरिदाबादेस पळायन
२७ — पाटीलबावांवर अनु-
ष्ठानाचा प्रयोग – अलीबहादरा-
कडे पलायन ३७ — सुटका-
प्रकर्णी कारवाई ३८–४४
हुबळी—परगणा–५२
हेमचंद्र–वैयाकरण—१५५–१५७
हैदरअली–नाणें—९५
होळकर—३१,३२, १०१.

## क्ष.

क्षत्रियांचा दर्जा–ब्राह्मणकालीन १३२
–१३६

स. सं. वृ–२७

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

## निवडक नियम व पोटनियम

(१) मंडळाच्या सभासदांचे वर्गः—

(१) शतिवर्षी २०० रु. अगर अधिक वर्गणी मंडळास देणारा आश्रयदाता सभासद होय. (२) सालिना १२५ रु. अगर अधिक वर्गणी मंडळास देणारा हितकर्ता सभासद होय. (३) सालिना २५ रु. देणारास सभासद वर्ग १ म्हणावें. (४) सालिना १२ रु. देणारास सभासद वर्ग २ म्हणावें. (५) सालिना ६ रु. देणारास सभासद वर्ग ३ म्हणावें. (६) सालिना ३ रु. देणारास सभासद वर्ग ४ म्हणावें.

कोणत्या हि दराच्या दसपट वर्गणी एका व चालू वर्षांत देणाऱ्यास त्या वर्गाचे तहाहयात सभासद समजण्यांत येईल. म्हणजे रु. ३००० दिल्यास (आश्र०), १२५० दिल्यास हितकर्ता व अनुक्रमें रु. २५०।१२०।६० व ३० दिल्यास वर्ग १।२।३।४ चे तहाहयात सभासद होतां येईल. रकम हप्त्यानें दिल्यास भरणा पूर्ण होईल त्या सालापासूनच तहा० सभा. केलें जाईल.

(२) मंडळाच्या उद्देशांस लेखी मान्यता देऊन व मं. च्या कोणा कायम सभासदांकडून सूचना व अनुमोदन मिळून ती सूचना रीतसर मंजूर झाल्यावर कोणास हि मं. चा सभासद होतां येतें.

(३) कार्यकारी मंडळाचे ठरावानुरूप मंडळाच्या त्रैमासिकाची एक प्रत प्रत्येक सभासदास मोफत मिळेल. रु. १२ किंवा त्याहून अधिक वर्गणी दरसाल देणाऱ्या सभासदास मंडळातर्फे प्रसिद्ध झालेल्या व त्या सालाकरितां नेमलेल्या सर्व पुस्तकांची १ प्रत फुकट मिळेल. दरसाल ६ रु. व ३ रु. वर्गणी देणारे मंडळाचे सभासदास मोफत मिळणारे ग्रन्थाखेरीज त्या सालाच्या वाट्याचा मंडळातर्फे प्रसिद्ध होणारा इतर कोणताहि ग्रंथ अनुक्रमें निम्या व पाऊणपट किंमतीस मिळेल. सभासदांना वरील नियमांप्रमाणें मिळावयाचे ग्रंथ, ते ज्या सालीं सभासद मंजूर झाले असतील त्या सालापासून च मिळावयाचे कोणत्या सालच्या सभासदांना कोणता ग्रंथ द्यावयाचा तें कारभारी मंडळ ठरवील.

(४) मंडळाचें वर्ष संपण्यापूर्वी सर्व वर्गण्या रीतसर दिल्या पाहिजेत.

(५) मंडळाचें वर्ष चैत्र शु. १ प्रतिपदेस सुरू होऊन फाल्गुन अमावास्येस संपतें.

(६) ज्यांच्या वर्गण्या बाकी आहेत अशा सभासदांस मत देण्याचा हक्क व मंडळाचीं पुस्तकें हि मोफत अगर सवलतीनें मागण्याचा हक्क राहणार नाहीं.

(७) कारभारीमंडळाचे परवानगीवांचून मंडळाचें सामान, संग्रह वगैरे कचेरींतून बाहेर नेतां यावयाचें नाहीं.

(८) मंडळाची सर्व व्यवस्था सभासदांनीं निवडून दिलेल्या कारभारी मंडळाचे हुकमतीखालीं चिटणीस पहातात. एक अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष, दोन चिटणीस, एक खजिनदार व सात साधारण सभासद मिळून तेरा गृहस्थांचें कारभारी मंडळ असतें. कारभारी मंडळांत सभासद वर्ग ३।४ यांपैकीं कोणी निवडतां येत नाहींत. सभासद वर्ग ३।४ सोडून बाकीच्या सभासदांसच फक्त काय तो मंडळाच्या वार्षिक अगर साधारण सभेंत मत देण्याचा अधिकार आहे प्रत्र त्यांजकडे वर्गणी बाकी नसावी.

टीपः— दोन वर्षांवर वर्गणीची बाकी ज्या सभासदांकडे निघेल त्यांचीं नांवें पटांतून कमी करण्याचा अधिकार कारभारी मंडळास आहे.

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-ग्रंथमाला

वि. सू.—मंडळाचे बहुतेक ग्रंथांस मुंबई व बडोदें सरकारांचा आश्रय आहे. * अशी खूण केलेले ग्रंथ मुंबई सरकारनें प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयांसाठीं मंजूर केले आहेत.

| माळांक. | किंमत रु. |
|---|---|
| १ अहवाल (शके १८३२) | ३ |
| २ ,, (शके १८३३) | ५ |
| ३ दुर्गविचार (रा. वि. का. राजवाडे) | २ |
| ४ वार्षिक इतिवृत्त (शके १८३४) | ५ |
| ५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (रा. राजवाडे) | १०८ |
| *६ प्रथमसंमेलनवृत्त (शके १८३५) | ०१२ |
| *७ वार्षिक इतिवृत्त (शके १८३५) | ६ |
| *८ द्वितीयसंमेलनवृत्त (शके १८३६) | ३ |
| *९ वार्षिक इतिवृत्त (शके १८३६) | ३ |
| *१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खं. २० (शिवकालीन घराणीं) | —३ |
| *११ वार्षिक इतिवृत्त (शके १८३७) | ६ |
| भा. इ. सं. मं. त्रैमासिकः— शके १८४२।४३।४४ प्रत्येकीं | रु. ३. |
| *१२ तृतीयसंमेलनवृत्त (शके १८३७) | ३ |
| *१३ मुकुंद-महाभाष्य (संस्कृत) | ०८ |
| *१४ ग्रंथराज (दासोपंत) ,, | ०८ |
| *१५ स्फुट प्रकरणें भाग १ ला | ०१२ |
| *१६ स्फुट प्रकरणें भाग २ रा | ०१२ |
| *१७ वार्षिक इतिवृत्त (शके १८३८) | ३ |
| १८ चतुर्थसंमेलनवृत्त शके १८३८) | ४ |
| *१९ राजवाडे-खंड-स्थलसूची (१८३९) | ४ |
| *२० पंचमसंमेलनवृत्त (शके १८३९) | ३ |
| +२१ संशोधनसंग्रह (१८३९) | छा. आहे |
| २२ चंद्रचूड-दफ्तर-कलम १ | ३ |
| २३ महाराष्ट्रसारस्वत ले. रा. वि. ल. भावे | ६ |
| २४ षष्ठसंमेलनवृत्त (१८४०) | ४ |
| २५ सप्तमसंमेलनवृत्त (१८४१) | ३ |
| २६ संशोधकाची छोटी जंत्री. (रा. द. वि. आपटे) | ०४ |
| २७ प्रदर्शनपरिचय | ०४ |

## मंडळाकडे मिळणारीं इतर पुस्तकें

रा. वासुदेव शास्त्री खरे-कृतः—(१) अधिकारयोग (२) हरिवंशाची बखर—किं. प्रत्येकी ०१०. राजवाडेकृतः—मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १।५।७।१०।११ किं. अनुक्रमें रु. २५, ४, ३, २॥, ०६ चांदोरकरकृतः—संतकविकाव्यसूचिः— किं. रु. २. काव्येतिहाससंग्रह व भारतवर्षः— मासिकाचे कांहीं अंक व प्रकरणें. चित्रेः— थोरले बाजीराव, नऊरंगी किं. ०६; पिलाजी जाधवराव व श्री. शिवाजी महाराजांचा फोटो किं. ०॥.

वरील पुस्तकांशिवाय मराठी दफ्तर रुमाल १ (शेडगांवकर बखर) किं. रु. ०१२. रुमाल २ रा, व तुकारामबोवांचा अस्सल गाथा भाग १।२ किं. प्रत्येकीं १ रुपया. खरेजंची हिं निबंध.

टीपः—टपालहंशील व व्ही. पी. वगैरे खर्च निराळा पडेल. घाऊक घेणारांस चांगलें कमिशन देऊं. माहितीपत्रक मागवा.

मुंबईचे एजंटः—पाचुरे, पुराणिक आणि मंडळी—माधवबाग—मुंबई.

पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें व दसलैं बाजार पेंतदार व गंगाधरराव नारायणराव मुजुमदार यांनीं ३१४ सदाशिव पेठ (भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचें मंदिर) येथें प्रसिद्ध केलें.

[ भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-ग्रंथमाला पुस्तक १२ वें ]

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

# तृतीय-संमेलन-वृत्त

शके १८३७

संपादक

खंडेराव चिंतामण मेहेंदळे, बी. ए.

दत्तो वामन पोतदार, बी. ए.

चिटणीस

[ सर्व हक्क राखून ठेविले आहेत. ]

पौष १८३८

GOKHALE INSTITUTE OF POLITICS & ECONOMICS (DEEMED TO BE ...) PUNE ... LIBRARY

किंमत १ रुपये ६।-

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें.

## निवडक नियम व पोटनियम

( १ ) मंडळाच्या सभासदांचे वर्गः—

प्रतिवर्षी मंडळास २०० रु. अगर अधिक वर्गणी देणारा आश्रय-दाता सभासद होय.

सालिना १२५ रु. अगर अधिक वर्गणी मंडळास देणारा हितकर्ता सभासद होय.

सालिना २५ रु. देणारास सभासद वर्ग १ म्हणावें.
सालिना १२ रु. देणारास सभासद वर्ग २ म्हणावें.
सालिना ६ रु. देणारास सभासद वर्ग ३ म्हणावें.
सालिना ३ रु. देणारास सभासद वर्ग ४ म्हणावें.

( २ ) मंडळाच्या कायम झालेल्या कोणत्या हि दोन सभासदांकडून सूचना व अनुमोदन मिळाल्याशिवाय व सदर सूचना मंडळाच्या सभेपुढें येऊन मंजूर झाल्याशिवाय कोणी हि मंडळाचा सभासद होऊं शकणार नाहीं.

( ३ ) कार्यकारी मंडळाचे ठरावानुरूप मंडळाच्या वार्षिक इतिवृत्ताची अगर संमेलनवृत्ताची एक प्रत प्रत्येक सभासदास **मोफत** मिळेल. रु. १२ किंवा त्याहून अधिक वर्गणी दरसाल देणाऱ्या सभासदास मंडळातर्फे प्रसिद्ध झालेले कोणते हि पुस्तकाची १ प्रत **फुकट** मिळेल. दरसाल ६ रु. व ३ रु. वर्गणी देणारे मंडळाचे सभासदास मोफत मिळणारे ग्रन्था-खेरीज त्या सालीं मंडळातर्फे प्रसिद्ध होणारा इतर कोणता हि ग्रंथ अनुक्रमें निम्या व पाऊणपट किंमतीस मिळेल. सभा-सदांना वरील नियमांप्रमाणें मिळावयाचे ग्रंथ, ते ज्या सालीं **सभासद मंजूर झाले असतील त्या सालापासून च मिळावयाचे.**

( ४ ) मंडळाचें वर्ष संपण्यापूर्वी सर्व वर्गण्या रीतसर दिल्या पाहिजेत.

( ५ ) मंडळाचें वर्ष चैत्र शु. १ प्रतिपदेस सुरू होऊन फाल्गुन अमावास्येस संपतें.

( ६ ) ज्यांच्या वर्गण्या बाकी आहेत अशा सभासदांस मत देण्याचा हक्क व मंडळाचीं पुस्तकें हि मोफत अगर सवलतीनें मागण्याचा हक्क राहणार नाहीं.

( ७ ) कारभारीमंडळाचे परवानगीवांचून मंडळाचें सामांन, संग्रह वगैरे कचेरींतून बाहेर नेतां यावयाचे नाहींत.

( ८ ) मंडळाची सर्व व्यवस्था सभासदांनीं प्रतिवर्षी वार्षिक सभेंत निवडून दिलेल्या कारभारी मंडळाचे हुकमतीखालीं चिटणीस पहातात. एक अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष, दोन चिटणीस एक खजिनदार व सात साधारण सभासद मिळून **तेरा** गृहस्थांचें कारभारी मंडळ असतें. कारभारी मंडळांत सभासद वर्ग २।३।४ यांपैकीं कोणी निवडतां येत नाहींत. सभासद वर्ग ३।४ सोडून बाकीच्या सभासदांस च फक्त काय तो मंडळाच्या वार्षिक अगर साधारण सभेंत मत देण्याचा अधिकार आहे

श्री

# अनुक्रमणिका


१ प्रास्ताविक ... ... ... ... १

२ गतवर्षाचें संशोधनवृत्त ( शं. श्री. देव ) ... ... १

३ शक १८३६ चें संशोधनवृत्त ( पां. न. पटवर्धन) ... ५

४ संशोधनवृत्त ( भा. वा. भट ) ... ... ... ७

५ शके १८३६ चें इतिहाससंशोधनवृत्त ( कृ. वि. आचार्य ) ९

६ गतवर्षातील संशोधन( वि. का. राजवाडे) ... .. १२

७ सूचीची योजना ( गो. का. चांदोरकर ) ... ... १६

८ शके ११८१ मधील चालुक्यांचा ताम्रपट (गो. का. चांदोरकर) १८

९ बोधले घराण्याची पूर्वपीठिका ( भा. वा. भट ) ... २८

१० महाराष्ट्रांतील व्यवहारनिर्णयपद्धती ( लेखांक २ )

( भा. वा. भट ) ... ... ... ... ३६

परिशिष्ट १ लें ... ... ... ... ५०

परिशिष्ट ( बो घ. पू. पी. चें. ) ... ... ५७

११ परशुराम त्र्यंबक मुख्यप्रधान ( शं. श्री. देव ) ... ७५

१२ माध्व आणि रामदासी ( कृ. वि. आचार्य ) ... ७७

१३ सखाराम बापु बोकील ( चिं. गं. भानू ) . ... ८१

१४ बाळाजी विश्वनाथाविषयीं नवीन माहिती ( गं ना. मुजुमदार) ८५

१५ शिवाजी महाराजांचीं वाघनखें व भवानी तलवार

( वि. ल. भावे ) ... ... ... ... ९१

१६ पतितपावनपद्धति ( द. वा. पोतदार ) ... ... ९१

१७ मोरोपंतकृत धन्यरामायण ( वि. ल.भावे ) ... ९८

१८ अनंतसुत त्र्यंबक ( वि. ल. भावे ) ... ... १०२

१९ दासो दिगंबरकृत संतविजय ( वि. ल. भावे ) ... १०६

२० महिपति व इतर चरित्रकार ( वि. ल. भावे ) ... १०७

२१ पाठारे प्रभूंची मध्यकालीन परंपरा ( म. मो. फडणीस ) १२२

२२ शक १७१७ तील एक मराठी वैद्यक ग्रंथ (वा. दा. मुंडले) १२६

२३ मराठ्यांतील देशाधिकारी ( भा. वा. भट ) ... १३७

२४ प्रतिनिधींची वंशावळ ( वा. प. मेहेंदळे ) ... १३२
२५ पिरंगुट येथील कुळकर्ण्याचा हकलाजिमा (पां. न. पटवर्धन) १३३
२६ तुकोबाचें लोहगांव कोणतें? ( ल. रा. पांगारकर ) ... १४१
२७ व्यंकटेशस्तोत्राची कविसमकालीन प्रत (ल. रा. पांगारकर) १४३
२८ रामशास्त्री व त्यांचे वंशज ( कृ. वि. आचार्य ) ... १४५
२९ जगमित्र नागा ( वि. ल. भावे)... ... ... १४८
३० बाळाजी विश्वनाथ भट, सरसुभेदार, शक १६२१
( पां. न. पटवर्धन )... ... ... ... १४९
३१ श्रीज्ञानेश्वरीचें अर्वाचीकरण ( खं. चिं. मेहेंदळे ) ... १५२
३२ शिकंदर व हिंदुस्थान (श्री. व्यं. पुणतांबेकर ) ... १५५
३३ मत्स्येंद्र व गोरक्ष यांचा एक उल्लेख ( शि.म. परांजपे ) १६६
३४ श्रीशिवछत्रपतींचा एक कौलनामा ( शं. श्री. देव) ... १६६
३५ श्रीएकनाथांच्या नांवाची चोरी ( गो. का. चांदोरकर ) १६९
३६ सटीक विवेकसिंधू ( स. म. दिवेकर ) ... ... १८०
३७ धनगराच्या ओंव्या ( वा. दा. मुंडले ) ... ... १८५

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

## तृतीय संमेलन.

## शके १८३७

भा. इ. सं. मंडळाच्या तृतीय संमेलनास शनवार वैशाख वद्य १ रोजीं सकाळीं साडे सात वाजतां मंडळाचे कार्यालयांत सुरवात झाली. संमेलनास धुळें, चाळीसगांव, अहमदनगर, अकोला, सातारा, अंमळनेर, मुंबई, मिरज, जुन्नर, तळेगांव, वडोदें, नागपूर, कल्याण, एरंडोल वगैरे ठिकाणांहून अनेक सभासद, संशोधक व सन्मान्य पाहुणे आले होते. सभेच्या सुरवातीस अध्यक्ष रा. ब. साने यांचें पुढील प्रमाणें भाषण झालें:—

" भारतइतिहाससंशोधकमंडळाचे सभासद हो व इतर सज्जन हो !

आपणां सर्वांचें स्वागत असो ! आपण सर्वांनीं मिळून ह्या मंडळाच्या संमेलनाचे कार्यास साहाय्य करून तें पार पाडावें अशी आपणां सर्वांस सविनय प्रार्थना आहे.

सांप्रत आपलें ब्रिटिश सरकार एका भयंकर विग्रहामध्यें गुंतलें आहे. ही आपत्ति जशी ब्रिटिश राष्ट्रावर तशी च हिंदुस्थान देशावर हि आहे; व त्यामुळें कोणत्या हि कामांत पुढें पाऊल पडावयाचें ह्मणजे मुष्कील आहे. अशा अवस्थेंत इतर संस्थांची जी स्थिति ती च या आपल्या मंडळाची हि आहे. ' द्रव्यमूलानि कर्माणि ' ह्या न्यायानें मंडळास द्रव्यसाहाय्याची अपेक्षा बहुत असून हि ह्या स्थितींत जशी मदत व्हावी तशी होऊं शकत नाहीं. ह्या विकट स्थितींतून पार पडण्यास चालू असलेलें महायुद्ध बंद पडलें पाहिजे. याकरितां आपले राज्यकर्ते या आपत्तींतून पार पडून विजयी व्हावे व सर्व साम्राज्यावरील ही आपत्ति नाहींशी व्हावी अशा-बद्दल परमेश्वरापाशीं आपण सर्व प्रार्थना करूं या, व तो ती लवकरच सिद्धीस नेईल अशी आपण उमेद धरूं या.

संमेलनें आणि परिषदा अलिकडे जिकडे तिकडे होत आहेत, अशावरून तीं सर्व थट्टेचा विषय होऊं लागलीं आहेत. पण अशी थट्टा करणाऱ्यांचे ध्यानांत एक गोष्ट येत नाहीं कीं, प्रत्येक संमेलनामध्यें किंवा परिषदेमध्यें त्या त्या संस्थांच्या कामाचा एक वर्षाचा आढावा दिला जातो. तसाच आपल्या ह्या संमेलनांत आपल्याला मंडळाच्या कामाचा आढावा आज घेणें आहे. आपण गुदस्तसालीं कोठें होतों आज कोठें आहों व पुढील सालीं कोठें असणार याबद्दल खुलासा आपण करणार आहों. यामुळें आपलें पाऊल आपले कामांत पुढें आहे किंवा आपली पिछेहाट होत आहे हें कळेल,

आपणांस आतां लवकरच कळेल कीं, मंडळांतील संशोधकांची संख्या गेल्या वर्षी वाढली आहे. आपलें संशोधनाचें क्षेत्रहि विस्तृत झालें आहे. गोंव्या-पासून तों अकोला, उमरावती, छिंदवाडा, निजामसरकारचा मुलूख येथपर्यंत आमचे संशोधकांचें काम चालू होतें.

संशोधनाचें काम (research work) आपल्या सरकारास हि मान्य आहे व अशा कामासाठीं साहाय्य करण्याची सरकारची इच्छा आहे. मुंबई युनि-व्हर्सिटीकडून हि अशा कामास मदत मिळण्याचा रंग दिसत आहे. ह्या सर्व गोष्टी आपल्या कामाला अनुकूल अशा आहेत. त्यापासून आपण आपला लाभ करून घेतला पाहिजे.

मंडळाच्या गरजा व उणिवा पुष्कळ आहेत. त्यांचा उच्चार इतरत्र नुक-ताच झाला आहे व आज हि पुढें होईल. त्यांत मंडळाच्या कामासाठीं व मंडळानें केलेल्या ग्रंथादिकांच्या संग्रहासाठीं एक अग्निबाधारहित इमारत, संशोधक मंडळींचा योगक्षेम चालविण्यास मदत व मिळालेले ग्रंथ, पोथ्या, कागदपत्र वगैरेंच्या प्रका-शनाची तजवीज ह्या तीन उणिवा मुख्य होत. ह्या दूर होण्यास द्रव्याची अपेक्षा आहे.

गतसालीं आपलें संशोधनाचें पाऊल पुढें पडलें आहे, ह्यांत संशय नाहीं. सभासदांची संख्या वाढली आहे, संशोधक हि वाढले आहेत, तथापि हें काम ह्यापेक्षां फार मोठ्या प्रमाणावर चाललें पाहिजे, असें आपल्या लक्षांत येईल. तेव्हां त्याजबद्दल काय तजवीज व्हावी ह्याचा विचार आपण सर्वांनीं करावा.

असो; आतां आपण गतवर्षी काय काय केलें व आपली एकंदर स्थिति कशी आहे ह्याबद्दल तपशीलवार माहिती आपल्या संस्थेचे चिटणीस सरदार मेहेंदळे हे आपणांस सांगतील. इतका प्रस्ताव करून मी बसतों. ”

अध्यक्षांचें भाषण झाल्यावर, मंडळाचे चिटणीस श्री. सरदार मेहेंदळे यांनीं शके १८३६ चें मंडळाचें वार्षिकवृत्त सभेस सादर केलें तें शके १८३६ च्या इतिवृत्तांत छापिलें आहे. इतिवृत्तवाचन संपविल्यावर, रा. देव, रा. पां. न. पटवर्धन, रा. भट, रा. आचार्य व रा. राजवाडे या संशोधकांनीं आपापलीं संशोधनवृत्तें वाचलीं तीं पुढें छापिलीं आहेत.

नंतर रा. रा. चिंतामणराव वैद्य यांनीं ‘ सूर्यचंद्रवंशी क्षत्रियांचा वेदांतील माग ’ या विषयावरील आपला शोधपूर्ण निबंध वाचिला. परंतु तो निबंधकारांनीं ‘ विविधज्ञानविस्तारांत’या पूर्वीं च प्रसिद्ध केला आहे; शिवाय त्याच विषयावर एक निबंध इंग्रजींत मुंबई रॉयल एशियाटिक सोसायटीच्या जर्नल-मध्यें छापून प्रसिद्ध केला असल्यामुळें पुनरुक्ति टाळण्याकरितां तो येथें न देतां, आह्मी सदरील मासिकांवर च हवाला देत आहों.

या निबंधांत सूर्यचंद्रवंशीय क्षत्रियांचा उल्लेख करणाऱ्या वेदांतील ऋचा दाखविल्या असून, त्या यांगें पुराणांतील विधानांस कोठें कशी बळकटी, सुसंगता

व विरोध येतात त्यांचें विवेचन केलें आहे. नंतर दुपारीं रा. चांदोरकर यांनीं रा. राजवाडे यांच्या म. इ. साधनांच्या खंडांच्या सूचीची योजना ( पृ. १६।१७ पहा ) पुढें मांडली. तीवर उहापोह होऊन छापण्यापूर्वी शेंकडा दहा पांच नोंदी ठाव घेण्यासाठीं ह्मणून तपासाव्यात ही रा. नरसोपंत केळकर यांची सूचना सर्वानुमतें पसंत झाल्यावर, सूची छापण्याचा ठराव प्रो. भानू यांनीं पुढें आणिला व त्यास रा. वामनराव पटवर्धन यांचें अनुमोदन मिळून तो एकमतें पसार झाला. नंतर रा. आचार्य यांनीं ' रामशास्त्री व त्यांचे वंशज ' हा निबंध वाचिल्यावर, शके १८३७ सालांत संशोधनाप्रीत्यर्थ रु. ६०० पर्यंत खर्च करण्याचा चिटणिसांस अधिकार देण्यांत यावा, हा ठराव सभेपुढें मांडतांना, रा. केळकर ह्मणाले कीं, गेल्या वर्षी संशोधनाकडे खर्च अगदीं कमी झाला आहे. चालू सालीं हे सहाशेंच्या सहाशें रुपये खर्च होऊन रकम अपुरी पडल्यामुळें, जास्त मंजुरी करण्याबद्दलची मागणी पुढील सालीं यावी, अशी माझी इच्छा आहे. या ठरावास रा. राजवाडे यांनीं अनुमोदन दिलें, व तो सर्वानुमतें मंजूर झाला. नंतर रा. चांदोरकर यांनीं ' शके ११८१ मधील चालुक्यांचा एक ताम्रपट ' हा निबंध वाचल्यावर, ' शांतानामाभिधान ' हें टांचण रा. आचार्य यांनीं वाचलें. शांता हें नांव पूर्वी महाराष्ट्रब्राह्मणांत ठेवीत नसत, सारस्वतांत ठेवीत; ब्राह्मणांत हें नांव ठेवण्याचा प्रघात अगदीं अलिकडचा आहे, असा रा. आचार्य यांचे टांचणाचा आशय होता. या पुढें रा. भट यांनीं ' बोंधले घराण्याची पूर्वपीठिका ' व रा. देव यांनीं ' परशुराम त्र्यंबक मुख्य प्रधान ' हे निबंध वाचले. नंतर रा. देव यांनीं अध्यक्ष व चिटणीस जीं कामें करतात त्यांवर आमचा सर्वांचा पूर्ण विश्वास आहे, परंतु मंडळाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे, व उत्तरोत्तर जास्त जास्त भार तात्यासाहेब मेहेंदळे यांजवर पडणार आहे; परंतु इतका बोजा त्यांचे एकट्याचे अंगावर पडणार नाहीं अशाबद्दल कांहीं व्यवस्था आपण केली पाहिजे, ह्मणून, रा. दत्तो वामन पोतदार बी. ए. यांस जोड चिटणीस नेमावें अशी सूचना केली. तीस रा. राजवाडे यांचें अनुमोदन मिळून सूचना एकमतानें पसार झाली. या नंतर मंडळाचें कार्य लोकविश्रुत व लोकप्रिय करण्याकरितां अध्यक्ष व चिटणीस यांनीं (१) सभा भरवाव्या (२) मोठमोठ्या शहरीं जावें अगर प्रतिनिधी पाठवावे ( ३ ) वर्तमानपत्रांस जोडून पुरवण्या काढाव्या व ( ४ ) इतर योग्य ते उपाय योजावे असा ठराव रा. सी. के. दामले यांनीं पुढें मांडला. ठरावास अनुमोदन देतांना, ठाण्याचे रा. विनायकराव भावे ह्मणाले : हें कार्य इतकें पुढं सरसावलें पाहिजे कीं, त्यासाठीं ठरावांत लिहिलेली उपाययोजना अपुरी पडून कांहीं जास्त अधिकार चिटणिसांस व अध्यक्षांस आह्मी आगाऊच दिले आहेत असें समजावें. या कामाचा उत्कर्ष होईल अशी व्यवस्था करावी. आपल्याबद्दलचे गैरसमज दूर

करण्याचे भानगडींत पडण्यांत कांहीं हंशील नाहीं, कारण हे गैरसमज अज्ञानानें उत्पन्न होतात. अखेरीस निदान हें मंडळ सुशिक्षितांकरितां आहे, अशिक्षितांकरितां नाहीं एवढा एक आक्षेप तरी कायम रहाणार च. असल्या सर्व आक्षेपांस आपलें उत्तरोत्तर वाढणारें काम हें एक च उत्तर वलवत्तर आहे. एवढें काम झाल्यावर शनवार दुपारचीं बैठक बरखास्त झाली.

रविवारीं सकाळीं रा. भट यांनीं ' महाराष्ट्रव्यवहारनिर्णयपद्धति ' ( लेखांक २ ), व रा. आचार्य यांनीं ' माध्व व रामदासी ' हे निबंध वाचल्यावर, रा. भट वकील, धुळें यांनीं मंडळ इ. स. १८६७ च्या कायद्याप्रमाणें नोंदण्या-विषयाचीं ठराव मांडला. त्यावर चर्चा होऊन मंडळाची घटना करण्याचें ठरून तो ठराव रा. भावे यांचें अनुमोदन मिळून सर्वानुमतें मान्य झाला. नंतर रा. भावे यांनीं ' अनंतसुत त्र्यंबक भारतकार, ' रा. पां. न. पटवर्धन यांनीं ' बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार ', प्रो. चिं. गं. भानू यांनीं ' सखाराम बापू बोकील ', हे निबंध वाचल्यावर, रा. कृ. प्र. खाडीलकर यांनीं मंडळाकरितां सरस्वतिमंदिर उभारण्याचा ठराव पुढें मांडला. त्यास रा. चिंतामणराव वैद्य व रा. विनायकराव भावे यांचीं अनुमोदनें मिळून सदर ठराव एकमतानें आणि परमोत्साहानें मंजूर झाला. दुपारीं श्री. मुजुमदार यांनीं ' बाळाजी विश्वनाथाविषयीं नवीन माहिती ' हा निबंध वाचल्यावर, रा. नरसोपंत केळकर यांनीं बापू गोखल्यांचे गुरु चिदंबर दीक्षित गुर्लहोसूरकर यांस बापूंनीं वासोटाप्रकरणीं स्वहस्तें लिहिलेल्या अस्सल पत्रांच्या आधारें नवीन माहिती सांगितली. ती अद्याप लेखनिविष्ट व्हावयाची असल्यामुळें, पुढें प्रसिद्ध होईल. तदनंतर रा. भावे यांनीं ' शिवाजी महाराजांचीं वाघनखें व भवानी तलवार ' हें टांचण वाचल्यावर, मुंबई विद्या-पीठाकडून संशोधनाचे कामीं देण्यांत यावयाच्या रकमेंतून मंडळास मदत मिळण्या-बद्दल अर्ज करण्याविषयींचा प्रो. चिं. गं. भानू यांचा ठराव प्रो. वामनराव काळे यांचें अनुमोदन पडून मंजूर झाला. पुढें रा. द. वा. पोतदार यांनीं ' पतितपावन-पद्धति ' व रा. भावे यांनीं ' जगमित्रनागा ' हे निबंध वाचले. नंतर रा. भावे यांनीं आजपर्यंत मराठी भाषेंत प्रसिद्ध झालेल्या ( चालू किंवा बंद पडलेल्या ) सुमारें ४०० मासिक पुस्तकांची परिश्रमपूर्वक तयार केलेली मौल्यवान यादी मंडळास नजर केली. नंतर रा. चांदोरकर यांनीं ' श्रीएकनाथांच्या नांवाची चोरी ' व रा. भावे यांनीं ' मोरोपंतकृत धन्यरामायण ' हे निबंध वाचल्यावर, येथील सरकारी दफ्तरखान्यांतील ( एलिनेशन ऑफीस ) चिटणिशी दफ्तराचीं पोतीं संशोधनार्थ तपासण्याची परवानगी मिळणेबद्दल सरकारकडे विनंतिअर्ज करण्याचा ठराव अध्यक्ष रा. ब. साने यांनीं मांडला तो मंजूर होऊन दुपारचें काम संपलें.

तिसऱ्या दिवशीं सोमवारीं सकाळीं रा. श्रीकृष्ण व्यंकटेश पुणतांबेकर बॅरिस्टर यांनीं ' शिकंदर व हिंदुस्थान ' हा निबंध वाचला. रा. चांदोरकर यांनीं केलेल्या संत—कविकाव्य-सूची ' च्या ५० प्रती घेऊन, वास्तवीक मंडळानें करावयाच्या या कार्यास अल्प मदत करण्याबद्दलचा रा. राजवाडे यांचा ठराव नागपूरचे रा. आळेकर व श्री. मेहेंदळे यांच्या अनुमोदनानंतर मंजूर झाला. नंतर श्री. आप्पासाहेब फडणीस यांचा ' पाताणे प्रभूंची मध्यकालीन परंपरा ' हा लेख व रा. देव यांचें ' श्रीशिवछत्रपतींचा एक कौलनामा ' हें टांचण, हीं वाचण्यांत आल्यावर, रा. भावे यांनीं (१) महिपति व इतर चरित्रकार व (२) दासो दिगंबरकृत संतविजय व रा. भट यांनी ' स्वराज्यांतील देशाधिकारी ' हे निबंध वाचले. नंतर मराठी सारस्वताचे जे ग्रंथ मंडळाजवळ असतील ते प्रकाशित करण्याबद्दल महाराष्ट्रसाहित्यपरिषदेला विनंति करावी असा ठराव प्रो. शिवरामपंत परांजपे यांनी पुढें आणिला व रा. भावे यांचें त्यास अनुमोदन मिळून तो पसार झाला. नंतर रा.पां.न. पटवर्धन यांनी 'पिरंगुट येथील कुळकर्ण्यांच्या हकलाजिम्याचा कागद ' हा लेख वाचला; व शिवछत्रपतींचीं १५, शहाजी महाराजांचीं ७, मातोश्री जिजाबाईसाहेबांचें १ व शिवकालीन पुष्कळशीं आणि इतरकालीन कांहीं पत्रें दाखविलीं. त्या पत्रांतून श्री. भाऊसाहेब पेशव्यांच्या पत्नी श्रीमंत पार्वतीबाईसाहेब, श्री. शाहूमहाराजांच्या राण्या विरूबाई व सकवारबाई, विठ्ठल सुंदर, चिमणाजी दामोदर, सगुणाबाई दाभाडी वगैरे सुमारें ५० प्रसिद्ध ऐतिहासिक स्त्रीपुरुषांचीं हस्ताक्षरें होतीं.

सोमवारीं दुपारीं रा. चांदोरकर यांनीं सूचना केल्यावरून व रा. देव यांनीं अनुमोदन दिल्यावरून ३ रु. देणाऱ्या सभासदांस मंडळाचीं पुस्तकें पाऊणपट किंमतीस देण्याचें ठरलें. नंतर रा. स. मा. दिवेकर यांनीं ' सटीक विवेकसिंधु ', श्री. मेहेंदळे यांनीं ' ज्ञानेश्वरीचें अर्वाचीकरण', रा. शि. म. परांजपे यांनीं ' मत्स्येंद्र व गोरक्ष यांचा एक उल्लेख ' हे लेख वाचले. नंतर ग्रँटडफच्या पुस्तकांतील चुका हप्त्याहप्त्यानें प्रसिद्ध करण्याबद्दल अध्यक्ष, रा. राजवाडे, रा. खरेशास्त्री, रा. नरसोपंत केळकर वगैरेंनीं बराच ऊहापोह करून हप्ते प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. नंतर रा. ल. रा. पांगारकर यांनीं ( १ ) तुकोबांचें लोहगांव कोणतें ? व (२) व्यंकटेशस्तोत्राची कविसमकालीन प्रत हीं टांचणें वाचलीं.

शवटीं अध्यक्ष रा. ब साने यांनीं समारोप केला त्याचा मतलब असाः— " संशोधकांचे ठिकाणीं 'मिशनरीवृत्ति' पाहिजे हे रा.देव व इतर संशोधक यांचे संशोधनवृत्तांवरून स्पष्ट सिद्ध होतें. यंदाच्या संमेलनांत फार महत्वाचे निबंध वाचले गेले. कागदपत्रांचीं दप्तरें विल्हेवारीनें लावण्याबद्दल वगैरे रा. ब. महाजनी यांनीं केलेली सूचना चांगली आहे. सरस्वतिमंदिर बांधणेंबद्दल व सारस्वतग्रंथप्रकाशनाबद्दल वगैरे जे अनेक ठराव आपण केले ते सर्वच महत्वाचे होते. या ठरावांच्या अमलबजावणीनें भा. इ. सं. मंडळास उत्तम स्थैर्य येईल यांत शंका नाहीं. " नंतर

रा. न. चिं. केळकर व रा. राजवाडे यांनीं सर्वांचे आभार मानले. तीस वर्षांपूर्वी रा.ब. साने यांनीं इतिहाससंशोधनाच्या कामाचा जो पाया घातला त्यावर इमारतीचा कळस, मंडळाच्या होणाऱ्या भव्य इमारतीचा प्रवेशसमारंभ करून ते चढवितील अशी आशा व्यक्त केली. आभाराचा अंगीकार करतांना रा. ब. साने हे अत्यंत गहिंवरून आले होते व त्यांचा गळा दाटून त्यांस बोलवेना.

सरस्वतिमंदिराची उभारणी करण्याकरितां द्रव्यनिधि जमविण्याविषयींच्या कल्पनेला थोडेंसें मूर्त स्वरूप देण्याचा उपक्रम झाला तो फार उत्साहजनक आहे. अवघ्या दोन प्रहरांत वर्गणीचे आकडे पडले ते येणें प्रमाणेः— रा. ब. साने ( अध्यक्ष पुणें ) रु; १००१ रा. रा. चिं. वि. वैद्य (कल्याण) रु;१००० श्री. आबासाहेब मुजुमदार ( पुणें ) रु; १०००; श्री. खंडेराव मेहेंदळे (पुणें) १००१ रु. हितचिंतक ठाणें १००० रु. रा. रा. बाळ गंगाधर टिळक ( पुणें ) १००० रु.; रा. स. म. दिवेकर ( कल्याण ) ५०० रु.; रा. दाजी आबाजी खरे (मुंबई) ५०० रु.; रा. शं. श्री. देव (धुळें) ५०० रु.; रा. गो. का. चांदोरकर (धुळें) ५००रु.; रा. भा. वा भट (धुळें)५००रु.; रा. कृ. प्र. खाडिलकर(पुणें) ५०० रु.; रा. न. चिं. केळकर (पुणें) २५० रु; रा. केशव आप्पा माध्ये ( ठाणें ) २०० रु.; रा. वामनराव पटवर्धन पुणें ( स. इं. सोसायटी ) १०१ रु.; रा. जनार्दन विनायक ओक (पुणें) १०१ रु.; रा. हरि नारायण आपटे (पुणें) १०० रु.; श्री. दादासाहेब खापर्डे (उमरावती) (पहिला हप्ता) १०० रु.; प्रो. चिं. गं. भानु २५ रु.; रा. द. वा. पोतदार ११ रु.; रा. वि. म. भुसकुटे १० रु.; रा. अक्कलकोटकर १ रु.

याशिवाय रा. वासुदेवशास्त्री खरे यांनीं १००१ रु. ची व. प्रो. विजापूरकर यांनीं २५० रु. चीं पुस्तकें वर्गणीदाखल मंडळास देण्याचें कबूल केलें.

हीं १०।११ हजार रुपयांची रक्कम अर्थात् कार्याच्या भुकेच्या मानानें फार थोडी आहे. परंतु आणखी लागणारी वर्गणी जुळविण्याकरितां ठिकठिकाणच्या प्रमुख हितचिंतकांची एक पोटमंडळी नेमलेली असून ते आपआपल्या जिल्ह्यांत कार्याच्या महत्वास साजेल अशी वर्गणीची रक्कम उभी करतील व महाराष्ट्राच्या व पूर्वजांच्या इतिहासासंबंधीं आपलें कर्तव्य बजावतील असा आम्हांस भरंवसा आहे.

पुणें,
वैशाख वद्य ५,
शके १८३७

**खंडेराव चिंतामण मेहेंदळे**

चिटणीस.

॥ श्री ॥

# तृतीय-संमेलन-वृत्त शके १८३७

## (१) गतवर्षांचें संशोधनवृत्त

संशोधकांना लाजविण्याची मंडळाच्या चिटणीसांनीं ही बरी युक्ती योजिली आहे. "कांहो तुम्ही फार च थोडें संशोधन केलेंत, संशोधनाचें क्षेत्र फार मोठें आहे म्हणतां; आणि सबंध बारा महिन्यांत तुम्ही जर इतकें थोडें काम कराल, तर संशोधनाचें कार्य समाधानक रीतीनें कसें उरकावें" असा दोष आपण लावण्यापेक्षां ज्या त्या संशोधकाच्या मुखानें च तसें वदवावें, असें चिटणीसांनीं ठरविलें असावें; असें वाटतें. पण याचा परिणाम काय होईल, याचा चिटणीसांनीं पूर्ण विचार केला आहे काय? त्यांची इच्छा पुष्कळ असेल कीं, आपण किती थोडें काम करतों, त्याची जाणीव संशोधकाला झाली म्हणजे तो आपोआप जास्त काम करूं लागेल. पण या युक्तीचें पर्यवसान असें आनंददायी हटकून होई-ल च, असें निश्चयानें म्हणवत नाहीं. पोटा-पाण्याचा उद्योग संभाळून फावल्या वेळीं संशोधन करणारा एकादा मजसारखा म्हणेल कीं, आपल्या च मुखानें आपली फजिती सालोसाल करून घेण्यापेक्षां संशो-धन च संपुष्टांत आणून मोकळें व्हावें, हें बरें! म्हणून मी चिटणीसांना म्हणतों,— संशोधकांचा हा असा अंत पाहूं नका; असो.

स्वतःला कांहीं वाटलें तरी चिटणीसांची आज्ञा मान्य केली च पाहिजे म्हणून गत-वर्षांत ज्या कांहीं ठिकाणीं संशोधन झालें त्यांपैकीं सात ठिकाणांचें त्रोटक वृत्त सांगतों.

### (७८) हेळवाक

श्रीसमर्थांच्या चरित्रांत हें ठिकाण फार महत्त्वाचें आहे. श्रीसमर्थ संप्रदायाच्या कागदपत्रांचा श्री रामदास आणि रामदासी मालेंतील जो नुकता च भाग प्रसिद्ध झाला त्यांत ह्या ठिकाणाविषयीं सविस्तर हकिकत दिली च आहे. येथील देशपांड्यांच्याकडे जुने कागदपत्र असावयास पाहिजेत, पण नाहींत, असें देशपांडे सांगतात.

### (७९) पाटण

मसूरवरून हेळवाककडे जातांना हें तालु-क्याचें ठिकाण वाटेवर च लागतें. पाटणकर जहागीरदार गांवीं नसल्यामुळें त्यांच्या-कडील कागद पहावयास मिळाले नाहींत, परंतु येथील देशपांड्यांनीं आपणाजवळील कागद रुपा करून दाखविले. कागद शिवकालीन आहेत. त्यांत भोंवतालच्या मराठे कुळांच्या हकिकतीचे हि कागद आहेत शिवकालीन घराण्यांचा जो एकविसावा खंड निघेल त्यांत ह्या कागदांचा समावेश करूं.

### (८०) लिंब

हें रम्य स्थान सातार्‍याजवळ कृष्णा-कांठीं आहे. येथें व जवळ च सायगांव आहे, तेथें आपट्यांचीं घराणीं आहेत. त्यांच्या जवळ सुमारें १२५ वर्षांमागचे पेशवाई-तील ऐतिहासिक कागद, एक दोन गाड्या भरतील, इतके आहेत. पेशव्यांच्या संबं-धानें आदरपूर्वक व आस्थेनें संशोधन करणारे रा. पांडोबा पटवर्धन यांस हे कागद उपयुक्त वाटतील, तेव्हां त्यांनीं त्यांचें सवडीप्रमाणें संशोधन करावें, अशी त्यांना माझी विनंति आहे.

### (८१) कुडाळ

लिंबाहून जवळ च हें ठिकाण आहे. तें खोर्‍यांत असल्यामुळें एकांतप्रिय माणसाला मनोरम वाटेल. येथील देशमुख आणि देशपांडे यांच्या जवळ विपुल कागद आहेत.

त्यांच्यांकडील कांहीं कागद मिळाले आहेत, त्यांचा समावेश पुढील खंडांत होईल. काव्यग्रन्थांचीं, स्फुट अभंग, पदें वगैरे यांचीं बाडें असतात. हें मला ठाऊक होतें, पण ठिकठिकाणचे ऐतिहासिक कागद मिळवून त्यांच्या नकला करून ठेवलेलीं शें-दीडशें वर्षांमागचीं बाडें माझे पाहण्यांत नव्हतीं. तसें एक बाड येथील देशपांड्यांच्याकडे मिळालें आहे.

कुडाळास एक मारुतीचें देवालय आहे. देवळांत मागच्या भिंतींत अंधारांत एक शिलालेख आहे. तसें च लेखाची एक शिला नुसत्या हवापाण्यावर राहून देवळाबाहेर तपश्चर्या करीत पडली आहे. ह्या शिलांचा कोणातरी संशोधकानें उद्धार करावा. ५००-७०० वर्षांचें संकेश्वर महादेवाचें येथें एक स्थान आहे, तें हि प्रेक्षणीय आहे.

## ( ८२ ) शिरवळ

श्रीमंत पंत सचीव यांच्या राज्यांत हें ठिकाण आहे. प्रत्यक्ष श्रीसमर्थांच्या दोघां शिष्यांचे मठ व समाधि येथें आहेत. ( १ ) नारायण स्वामी व ( २ ) बाजीबुवा. नारायणस्वामींच्या मठांत कागदपत्र कांहीं उरले नाहींत. परंतु बाजीबुवांच्या मठांत ३७ उपयुक्त कागदपत्र होते, ते त्यांच्या वंशजांनीं कृपाकरून दिले आहेत. बाजीबुवा मराठे जातीचे होते. ते शक १६४३ चे पूर्वी समाधिस्थ झाले. या शकाच्या सुमारास त्यांची समाधि डोलूं लागली होती असें दिसतें. तत्संबंधीं एक सनद वाचून दाखवितोः—

श्री

**रामदासस्वामी**

राजश्री तुको धोडदेव हवालदार व कारकून वर्तमान व भावी प्र॥ सिरवल गो॥

॥ ॐ.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक शामजी हरी नामजाद व कारकून सुभा प्र॥ मावले नमस्कार सु॥ सलास असरैन मया अलफ ब॥ सनद राजश्री स्वामी शके ४९ सुभकृत संवछरे अधिक श्रावण बहुल पंचमी मंदवासरे तेथे आज्ञा जे रामाजी बिन बाजी गोसावी परंपरा श्री वास्तव्य कसबे सिरवल हे स्वामी सनिध येऊन विदित केले की अपले बाप बाजी गोसावी सत्पुरुष होते ते पुर्वी शांत जाले त्याचे वृंदावन क॥ मजकुरी बाधले आहे ते साप्रत गतवर्शापासून डोलते हा चमत्कार बहुता लोकानी पाहिला आहे तेथे पुजा नैवेद्य व पुण्यतिथीचा उत्छाह चालिला पाहिजे तरी स्वामीनी कृपालु होऊन नूतन इनाम जमीन दिल्हीयाने स्वामीस व स्वामीचे राज्यास कल्याण चिंतून राहो म्हणून विनती केली त्यावरून मनास आणिता बाजी गोसावी बहुत भले सत्पुरुश होते याचे वृंदावन डोलते हे गोष्ट येथार्थ च आहे तेथें पुजा नवेद्य व नदादीप व पुण्यतिथीचा उत्छाव चालियाने उत्तम आहे याकरितां स्वामी कृपालु होऊन रामाजी बिन बाजी गोसावी यासी का॥ सिरवल प्रा॥ मा॥ पैकीं नूतन इनाम पडी जमीन बिघे ८१० दाहा कुलबाब कुलकानु हालीपटी व पेस्तरपटी खेरीज हकदार इनाम करून दिल्हा असे तरी तुम्ही सदरहु जमीन अवल दुम सिम तीन प्रतीने नेमून देऊन यासी व याचे पुत्रपौत्रादि वौसपरंपरेने इनाम चालवित जाणे म्हणून अज्ञा अज्ञेप्रमाणे रामाजी बिन बाजी गोसावी यासी का॥ सिरवल पैकी इनाम जमीन ८१० दाहा बिघे देविले असे ती अवल दुम सिम तीन प्रतीने नेमून देऊन दुमाल करणे तेथील अकार होईल तो इनाम दुमाल करणे लिहित जाणे या पत्राची तालिक लेहून घेऊन असल पत्र भोगवटीयासी परतोन देणे जाणिजे रा छ १४ मोहरम

शक १६४३।४४ त डोलणाऱ्या या समाधीची हकिकत १८३७ त आपणांस

कितपत पटते न पटते हें आपलें आपण पहावें.

## ( ८३ ) वरंधा

शिरवळ, भोर, हिरडोशी यांच्यापुढें सबंध घाट उतरून गेल्यावर हा लहानसा गांव लागतो. येथें शिक्केकरी देशमुखांचीं दोन तीन घरें आहेत. त्यांच्या जवळ ऐतिहासिक कागदपत्रें विपुल आहेत. त्यांत शिवकालीन कागदपत्रांचा हि बरा च मोठा संग्रह आहे. तो डोळ्यानें पहावयाचा योग आला होता, परंतु हातीं येण्यास अजून अवकाश आहे. त्या संग्रहांतील शिवछत्रपतींच्या एका कौलनाम्याची मात्र नकल करून घेण्यास परवानगी मिळाली. तो कौलनामा चालू संमेलनांत अन्य प्रसंगीं आपणांस वाचून दाखविणार आहे.

## ( ८४ ) शिवथर खोरें

श्रीसमर्थांच्या पादस्पर्शानें पवित्र झालेलीं जीं कांहीं ठिकाणें महाराष्ट्रांत आहेत त्यांत या खोऱ्यास बरें च वरचें स्थान मिळेल, कारण या खोऱ्यांत श्रीसमर्थांचा वास १०।५ वर्षें झालेला आहे. सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें हि हें खोरें मनोरम आहे. चौफेर उंच डोंगरांचा घेर असून मध्यें कुंभे शिवथर, आंबे शिवथर व कसबे शिवथर अशीं तीन गांवें आहेत. कसबे शिवथरच्या पिछाडीला जो डोंगर आहे त्यांत श्रीसमर्थांची घळ आहे. या च घळींत श्रीमत् दासबोधाचे कांहीं दशक श्रीसमर्थांनीं लिहिले असा दाखला मिळाला आहे. या घळींत राहून अनुभवामृताची दिवाकरभटांनीं केलेली प्रत मिळाली आहे. घळीचें किंचित् वर्णन श्रीरामदासी मालेंतील नुकता च जो नववा भाग "श्रीसंप्रदायाचीं कागदपत्रें" म्हणून प्रकाशित झाला आहे त्यांत आलें आहे. घळ फार मोठी आहे. सुमारें १२५ फूट लांब व ७५ फूट रुंद अशी घळ आहे. आंत १०।१२ दालनें आहेत. चंद्रराव मोऱ्याला पूर्णपणें जिंकावयाचें म्हणजे नुसतें जावळीखोरें हस्तगत करून भागणारें नव्हतें, तर शिवथर खोऱ्यांत हि मोरे प्रबळ असल्यामुळें शिवथर खोरें जिंकल्यावांचून श्रीशिवछत्रपतींस गत्यंतर नव्हतें, हें इतिहासज्ञांस विदित च आहे. श्रीसमर्थांच्या घळीपासून दहा पांच मिनिटांच्या अंतरावर, अर्थात् पर्वताच्या च मध्यभागीं, मोऱ्यांचा वाडा होता. तो वाडा जमीनदोस्त झालेला अथवा केलेला आहे, फक्त पायांच्या खुणा अजून आहेत. घळीपासून दोन तीन तासांच्या अंतरावर जावळी खोरें, रायगड, तोरणा, राजगड वगैरे ठिकाणें आहेत. खोऱ्यांतील कागदपत्र हातीं येण्याची अजून वेळ आली नाहीं.

येथें च हें वृत्त संपावें, परंतु संशोधन करीत असतां, येणारा अनुभव संशोधनवृत्तांत नमूद करणें किंवा संशोधनासंबंधानें एकाद दुसरी सूचना करणें विषयाला सोडून होणार नाहीं, असें वाटतें.

( १ ) वाटेल त्या ठिकाणीं व वाटेल त्याच्याजवळ आपण कागदपत्रांचा किंवा काव्यग्रन्थांचा कांहीं शोध करीत नसतों. कांहीं तरी आपणांस सुगावा असतो. अशा शंभरजणांना आपण कागदपत्रांविषयीं किंवा ग्रन्थांविषयीं विचारलें तर त्यांत ५ च असे असतात कीं, ते आपणांजवळ काय आहे, नाहीं तें सरळपणें सांगतात; बाकीचे ९५ जण, आपलें प्रास्ताविक भाषण चाललें असतां, आपलें अभिनंदन करीत असून हि आपलें अखेरचें धोरण ओळखून; नाहीं, नाहीं, म्हणून मान डोलवूं लागतात. शेवटीं आपण स्पष्ट विचारतों च व ते हि आपणांजवळ कांहीं नाहीं म्हणून तितक्या च स्पष्टपणें सांगतात. पण माझा अनुभव असा आहे कीं, या ९५ जणांपैकीं खरोखर कांहीं नसतें ५ जणांजवळ, बाकी ९० जवळ कांहींना कांहीं तरी आपणांस अपेक्षित असें

असतें. म्हणून अनुभवानें मीं असें ठरविलें आहे कीं, आपणांस काय पाहिजे आहे तें मिळविण्याविषयीं निराश होण्याचें केव्हां च कारण नसतें. फार काय पण १० जणांजवळ आपण आपली प्रस्तावना केली तशी च आणखी दहा पांच मिनिटें चालविली, तर त्या सद्गृहस्थाच्या नाहीं म्हणण्यांतील स्पष्टपणा कमजोर होत चालल्याचें आपणांस आढळून येतें. तात्पर्य, कोणा हि संशोधकानें केव्हां हि निराश होऊं नये, हा पहिला अनुभव.

( २ ) माझा दुसरा अनुभव जरा विचित्र आहे. इतर संशोधकांचा हि अनुभव तसा च आहे कीं नाहीं मला सांगतां येत नाहीं; पण त्यांचा तरी अनुभव निराळा कां असावा ? माझा असा अनुभव आहे कीं, तरुण मनुष्य आपणाजवळ काय आहे तें सांगण्यास व देण्यास जितका लवकर तयार होतो, तितक्या लवकर वृद्ध माणसें होत नाहींत. म्हणून कोणा हि कडे संशोधनास जाण्यापूर्वी, त्या गृहस्थाविषयीं आधीं जो शोध घ्यावयाचा असतो, त्यांत त्याचें वय किती आहे याचा हि शोध घेण्यास मी विसरत नाहीं. तरुणानें नाहीं म्हटलें तर तें खरें असेल असें एकादवेळीं तरी मी मानतों; पण वृद्धाच्या नाहीं म्हणण्यावर माझा मुळीं च विश्वास नसतो. मला च तेवढीं वृद्ध माणसें अशीं आढळावीं व इतरांना आढळूं नयेत असा माझ्यांत च कांहीं दोष आहे, असें मला वाटत नाहीं. वृद्ध माणसाच्या शब्दावर विश्वास न टाकण्यांत इतर संशोधक अनुकूल असतील तर मला आनंद होणार आहे. व्यक्ति, स्थळ, वगैरे सांगण्याचें कारण नाहीं, परंतु यासंबंधानें मला आलेला एक विशिष्ट अनुभव सांगतों. एका वृद्ध गृहस्थाजवळ कागदपत्र असावेत असें मला वाटे. प्रत्येक वर्षी सुट्टींत मीं त्यांचेकडे जावें. असे चार वेळां गेलों. प्रतिवर्षी त्यांनीं नाहीं म्हणावें. शेवटच्या वेळीं तर ते मला असें म्हणाले, "वास्तविक आमच्या जवळ कागद असावयास पाहिजेत पण काय करावें नाहींत हें खरें, आपण सालोसाल यावें, आणि नाहीं म्हणण्याचा मजवर प्रसंग यावा याची मला आतां लाज वाटूं लागली आहे." संशोधनापुरता वृद्धवचनावर विश्वास न ठेवणारा मी, पण मला हि वाटूं लागलें कीं, त्यांचेकडे कागद नसावेत. पांचव्या वर्षी त्यांचे गांवीं गेलों तर ते गृहस्थ कैलासवासी झाल्याचें समजलें. गृहस्थ फार सज्जन होते म्हणून त्यांच्या चिरंजीवाकडे सांत्वनार्थ गेलों. मला पाहतां च कांहीं न बोलतां चिरंजीव घरांत गेले व कांहीं वेळानें वेष्टणें च वेष्टणें बांधलेलें व पांच पंचवीस वर्षांत न सोडलेलें असें एक दप्तर घेऊन येऊन मला म्हणाले, "आपण येत होतां आणि वडील नाहीं म्हणत होते याचें मला वाईट वाटत असे. हें तें दप्तर. त्यांत काय आहे मला ठाऊक नाहीं, पण ज्या अर्थी वडील नाहीं म्हणत, त्या अर्थी त्यांत कांहीं महत्त्वाचे च कागद असावेत; असें म्हणून दप्तर माझ्या हातीं देतांना तो थोर तरुण म्हणाला, "माझ्या वडिलांच्या जिवाचा हा कलिजा मी तुमच्या हवालीं करतों, सांभाळा, काम झाल्यावर परत करा." तो कलिजा मी हि त्या गांवीं न सोडतां घरीं जाऊन उलगडून पाहिला, तर त्यांत अत्यन्त महत्त्वाचे असे ऐतिहासिक कागद मिळाले !

( ३ ) असे लहान मोठे आणखी अनुभव सांगतां येतील. एकदां संग्रह हातीं पडल्यावर त्या गांवीं पाणी पिण्यास हि राहूं नये. नाहीं नाहीं तीं विघ्नें विघ्नसंतोषी लोक आणण्याचा संभव असतो. एकदां एका गांवीं एका ठिकाणीं संग्रह हातीं पडला म्हणजे आपला मार्ग सुधरावा. त्या वेळीं तरी अति आशा करूं नये. आपण दिलेला शब्द पाळण्याविषयीं अत्यंत दक्ष असावें. वचनाप्रमाणें मिळालेल्या संग्रहाचें काम

करून तो परत केल्यावर त्या गांवीं इतर ठिकाणीं असलेला संग्रह दुसऱ्या वेळीं सहज च मिळतो. हे म्हणजे मी कांहीं वर्तनाचे नियम सांगतों असें नाहीं, सामान्य अनुभव सांगत आहें. त्यांना अपवाद नसतात असें हि नाहीं; आणि म्हणून सामान्यपणें असें म्हणतां येईल कीं, प्रसंगविशेषीं काळवेळ पाहून वर्तन करावें हें च खरें. तेव्हां सर्व अनुभव न सांगतां संशोधनाचे कामीं माझ्या दृष्टीस आवश्यक वाटणारा एक विचार सांगून हें प्रकरण संपवितों.

( ४ ) संशोधनाच्या कामीं आपली निरालस निःस्वार्थबुद्धि असावी. स्वार्थाचा मनाला स्पर्श हि होऊं न देतां केवळ कार्यावर निस्सीम प्रेम ठेवून संशोधन करावें. असें संशोधन परमेश्वराला हि आवडतें. अशा संशोधनास सर्वोत्तम परमेश्वराचें हि साहाय्य असतें. अशा संशोधनांत केव्हां हि अपयश येत नसतें.

सरते शेवटीं माझी एक सूचना आहे. साऱ्या संशोधकांच्या स्वाऱ्या पुणें, सातारा व आसपासचा मुलूख यांवर च व्हाव्यात हें अगदीं साहजिक आहे. पण मला वाटतें, या स्वाऱ्यांना आतां कांहीं नियम घालून देण्याची वेळ आली आहे. प्रत्येक जिल्ह्यांत संशोधकांचें एक एक उपमंडळ स्थापन करावें. ह्या उपमंडळानें आपआपल्या जिल्ह्यांतील संशोधन करावें. याचा अर्थ असा नाहीं कीं, कोणी च मग आपला जिल्हा सोडून दुसरीकडे जाऊं नये. सारा देश संशोधनास मोकळा आहे व वाटेल त्यानें वाटेल तेथें संशोधनार्थ जावें. पण प्रत्येक उपमंडळानें आपल्या जिल्ह्यापुरतें तरी संशोधनकार्य संपूर्ण करण्याची हाव धरावी. अशीं उपमंडळें सर्वत्र स्थापन झाल्यास संशोधनाचें कार्य त्वरित होईल; असा मला भरंवसा आहे. निष्ठावंत, आस्थेवाईक व संशोधनकार्यावर प्रेम करणारे तीन जरी सभासद असले, तरी त्यांचें उपमंडळ करावें. अशा उपमंडळानें आपआपल्या जिल्ह्यांतील ऐतिहासिक घराणीं, साधुसंतांचे मठ, पीरांच्या जागा, इत्यादिकांचें संशोधन करावें, ताम्रपट कागदपत्र वगैरे मिळवावेत, शिलालेख वाचावेत, ऐतिहासिक स्थळें पहावीं; भाषा, रूढि, चालीरीति यांचें निरीक्षण करावें, समाजाच्या अंतर्बाह्यरंगाचें परीक्षण करावें, पूर्वसंस्कार विचारांत घ्यावेत, विद्यमान स्थिति अवलोकावी, भावी अनुमानें काढावीत आणि आपल्या श्रमाचें सारें फळ भारत–इतिहास–संशोधक मंडळाचे मार्फत निष्कामबुद्धीनें महाराष्ट्रदेवतेच्या चरणीं अर्पण करावें.

पुणें, वैशाख शुद्ध ९ शके १८३७

**शंकर श्रीकृष्ण देव**

## (२) माझें शके १८३६ चें संशोधनवृत्त

१ गतवर्षींच्या संमेलनानंतर पुणें, सातारा, अहंमदनगर व नाशिक ह्या चार जिल्ह्यांतील कांहीं कांहीं भागांत संशोधनार्थ मी हिंडलों. ह्या संशोधनांत अमुक एका विशिष्ट प्रसंगासंबंधानें अगर कारकीर्दीसंबंधानें च संशोधनाचे कामाची व्याप्ति आंखून न घेतां, जीं जीं इतिहासोपयोगी साधनें मला मिळत, त्यांचा संग्रह करण्याचें व त्यांसंबंधीं मधून मधून कांहीं ऐतिहासिक टिपणें वाचण्याचें मीं चालू ठेविलें होतें. चार पांच घराण्यांसंबंधींचा जो बरा च पत्रव्यवहार उपलब्ध झाला, त्याचा प्रपंच एका स्वतंत्र ऐतिहासिक साधनांच्या खंडांत करण्याचें ठरविल्यामुळें मिळालेले कागदपत्र कोणत्या ठिकाणचे, व प्रकारचे एवढ्यांचा किंचित् निर्देश मी आपल्या परवानगीनें करीत आहें. माझ्या संशोधनांत मी काव्यसंशोधनाचा हि परामर्ष घेतला आहे.

२ सातारा जिल्ह्यांतील खुद्द सातारा, वांई, ओझर्डे, कोरेगांव, रहिमतपूर, फत्यापूर, अंगापूर, पाली, निनाम–पाडळी, अतीत, लिंब, गोवा, धावडशी, ब्रह्मपुरी, कोरेगांव, पिंपरी इत्यादि ठिकाणीं संशोधनाचें थोडें-बहुत काम मीं केलें. गतवर्षी रहिमतपुरास गेलों असतांना, तेथील रणदुल्लाखानाच्या घुमटावरील शिलालेखासंबंधानें चार शब्द मला लिहितां आले, हें आपणांस माहीत च आहे. येथील माने हें घराणें बेदरचे बादशहाचे वेळेपासून नांवारूपास आलेलें आहे. इतिहासप्रसिद्ध फत्तेसिंग माने ह्या च घराण्यांत जन्मास आला; व संतकवि तुकाविप्र ह्याचें हि जनन येथील कुळकर्ण्यांचे वंशांत झालें. रणदुल्लाखान हा ह्या गांवचा संस्थापक व पेशव्यांचे राजवटींत हा गांव पटवर्धनांकडे असलेला इत्यादि ऐतिहासिक परंपरेनें निबद्ध असलेल्या गांवीं ऐतिहासिक विपुल सामग्री मिळेल, असा माझा अंदाज होता; व ह्या अंदाजाप्रमाणें रा. भाऊसाहेब टांकसाळे वकील, व रा. राजारामपंत माने, पेन्शनर मास्तर या उभयतांच्या प्रशंसनीय खटपटीनें बरा च संग्रह उपलब्ध हि झाला. माने यांचे संग्रहांतून बरीं च शिवकालीन पत्रें मिळालीं असून, एका पत्रांत शिवछत्रपतींच्या धामधुमीचा साक्षात् उल्लेख आहे. रहिमतपूरचे जागीं पूर्वी कुमठें नांवाचें गांव होतें. तेथील राणे–भोंसले घराण्याचा मनोरंजक इतिहास येथें च मिळाला. **पिंपरी** येथील मोकाशी यांजकडून त्यांचे मूळ संपादकांस मिळालेली सनद मिळाली. हें घराणें फार पुरातन असून, शाहू छत्रपतींच्या पदरीं ह्या घराण्यानें चांगली कामागिरी बजाविलेली आहे. येथें फारसी कागदपत्र बहुत आहेत. फत्यापूर येथें शालुकरांचे वंशज नांदत आहेत, त्यांनीं आपला सर्व संग्रह मोठ्या खुषीनें माझ्या स्वाधीन केला. ह्या संग्रहांतील कागदपत्रांवरून रावबाजींच्या कारकीर्दीवर प्रकाश पडेल, गायकवाडी प्रकरणाचा उलगडा होईल, व इंग्रजी न्यायनीतीचा व राजकारणाचा मासला पाहावयास सांपडेल. पाल–पेंबर येथील श्रीखंडोबाच्या देवस्थानासंबंधींचे कांहीं कागद तेथील रहिवासी रा. धोंडोपंत कुळकर्णी यांचे रुपेनें मला मिळाले आहेत. घाशीरामानंतरचा पुण्याचा कोतवाल आनंदराव काशी यांचे वंशजांकडून व तेथील मोकदम पाटील काळभोर यांजकडून हि चांगला कागदसंग्रह मिळावा. श्रीसमर्थशिष्य रंगनाथ अडसुल ह्यांचेसंबंधानें कांहीं कागद मिळतील अशी आशा होती, परंतु ती विफल झाली. रंगनाथांच्या समाधीची विपन्नावस्था पाहून अन्तःकरण विषण्ण झालें! असो.

निनाम–पाडळी येथें श्रीसंप्रदायाच्या मठाची एक उपशाखा आहे. विद्यमान मठपतींजवळ ‘ स्वानुभव दिनकरा ’ ची एक जुनी हस्तलिखित प्रत आहे. थोडासा पत्रव्यवहार हि मिळावा. मी गेलों त्या वेळीं तो मिळवितां आला नाहीं. कोरेगांव, अंगापूर व ब्रह्मपुरी येथून कांहीं त्रुटित कागद मला मिळाले. ओझर्डे येथें पिसाळ देशमुखांचे वंशज राहतात. येथून चार दोन महत्वाचे महजर मला मिळाले. वांईस एका देशपांडे घराण्याकडून बरा च संग्रह मिळाला. ह्या संग्रहांतील राजारामकालीन कागदांवरून त्या वेळच्या बऱ्या च वादविषयक प्रश्नांचा उलगडा होईल, असा रंग दिसतो. क्षेत्र माहुलीस माहुलीच्या स्थापनेसंबंधाचे व अग्रहाराचे कागद मिळाले. त्रिपुटी येथें संग्रह आहे; परंतु मला तो मिळाला नाहीं. खुद्द सातारा येथें हि अद्याप पुष्कळ च काम राहिलेलें आहे. महाराजांचें खासगी व सरकारी दप्तर, शिर्के यांचा राजारामकालीन व इतर महत्वाचा संग्रह, केसरकर यांचे कागद इत्यादि किती तरी कागद अद्याप मिळवावयाचे आहेत. लिंब येथील बर्वे घराण्यांतून श्री. थोरले माधव-

रावसाहेब पेशवे ह्यांचे वेळचा बहुमोल पत्रसंग्रह मला मिळाला. बाळाजी विश्वनाथांचें कुटुंब राधाबाईसाहेब ह्या नेवऱ्याचे मोकदम बर्वे ह्या घराण्यांतील असल्यामुळें, ह्या बर्वे घराण्यावर पेशव्यांचा लोभ असे. ह्या संग्रहांत माधवरावसाहेबांनीं आपल्या मातुःश्रीस लिहिलेलीं अस्सल पत्रें आहेत. पेशव्यांच्या गृहस्थितीवर उत्तम प्रकाश पाडणारीं पत्रें हि ह्या घराण्यांतून मिळालीं आहेत.

## नाशिक

नाशिक जिल्ह्यांत फक्त चार दोन ठिकाणीं जाण्याचा योग आला. येवलें, अंदरसूल, नांदगांव, मालेगांव इत्यादि ठिकाणीं कागपदत्रांची चालना मीं केली. मालेगांवास श्री. नारो शंकर राजेबहादर यांचे वंशजाची एक शाखा आहे. तेथील विद्यमान वंशजांनीं नारो शंकर राजेबहाद्दर यांची हातानें काढिलेली एक तसबीर दिली असून, बाकी सर्व संग्रह देण्याचें अभिवचन दिलेलें आहे. कळवण, दिंडोरी, धोडप, वणी व बागलाणांतील अत्यल्प भाग ह्यांतून हि थोडाबहुत मी हिंडलों. सटाण्याकडे तर देशमुख, देशपांडे व लहान लहान संस्थानें, देवस्थानें इत्यादि ठिकाणीं साधनांच्या राशी आहेत. मला देशमुख घराण्यासंबंधानें थोडीबहुत माहिती व कागद मिळाले.

## अहंमदनगर

अहंमदनगरापैकीं अहंमदनगर, कोपरगांव, नेवासें, संगमनेर हीं गांवें पाहण्यांत आलीं. अहंमदनगरास नगरच्या स्थापनेसंबंधानें चार दोन कागद, किल्ल्याविषयींची बरी च माहिती, व नगरचा किल्लेदार कवीजंग ह्याचे वंशजांकडून कांहीं कागद मिळाले. तेथील श्री. नानासाहेब मिरीकर यांनीं हि प्रेमानें बरे च कागद माझ्या स्वाधीन केले. नगर येथील देशमुख देशपांडे, मुसलमानांतील कांहीं घराणीं, व नगरचे सुभेदार कान्हूर येथील अभ्यंकर ऊर्फ नगरकर यांचीं दप्तरें पहावयाचीं आहेत. संगमनेर तालुक्यांत निंबगांव-जाळी येथें त्र्यंबकजी डेंगळ्यांचे वंशज आहेत. त्यांचेकडील कागद मिळण्यासारखे आहेत. पुणतांब्यास जोशी घराण्यांतून कांहीं कागद मिळाले. कोपरगांवाजवळ हिंगणीस गेलों असतांना, श्री. रघुनाथराव दादासाहेब यांचें निवासस्थान निश्चित करतां आलें. श्रीगोंदें तालुक्यांतील बहादुरगड ऊर्फ पांडे पेडगांव येथून हि तेथील देशपांड्यांच्या दप्तरांतील कांहीं कागद उपलब्ध झाले.

## पुणें

पुणें जिल्ह्यांतील चाकण, खेड, तळेगांव, शिक्रापूर, पावळ, शिरूर, वाघोली, दावडी-निंबगांव, कोरेगांव ह्या ठिकाणीं च काय तें जाण्यास मिळालें. खुद्द पुण्यास राहून हि थोडेंबहुत काम करितां आलें. चांबळीचे सरनाईक यांचे कागदपत्र, मोरया गोसावी यांचीं पदें, शिवकालीन व तत्पूर्वकालीन कागदपत्र, बापू गोखले यांनीं आपल्या गुरूंस लिहिलेलीं पत्रें वगैरे इतिहासोपयोगी पत्रव्यवहार उपलब्ध झाला. येणेंप्रमाणें माझें गतवर्षीचें संशोधनवृत्त इतिहासप्रिय मंडळीस सादर करीत आहें.

**पांडुरंग नरसिंह पटवर्धन**

## (३) संशोधनवृत्त

गेल्या डिसेंबर महिन्यांत पंढरपुराकडे व्यवहारविषयक कागदपत्र बरे च मिळतील अशी बातमी एका स्नेह्याकडून मिळाल्याकारणानें त्या प्रदेशांत मी संशोधनार्थ जाण्याचें ठरविलें. मुख्य जो हेतु मनांत बाळगून संशोधनार्थ निघालों, त्या हेतूचे दृष्टीनें संशोधन ह्मणण्यासारखें सफल झालें नाहीं. व्यवहारपद्धतीसंबंधीं ज्या कागदपत्रांचे योगानें विशेष प्रकाश पडेल, अशा

स्वरूपाचे नवीन महत्वाचे कागद म्हणण्यासारखे हातीं लागले नाहींत. परंतु, पेशवाईचे उत्तरार्धांत राघोबादादांनीं जें कारस्थान केलें, त्यासंबंधीं बरे च महत्वाचे कागदपत्र हातीं लागले. या कागदपत्रांवरून राघोबादादांचे कारस्थानासंबंधीं जी कांहीं नवीन माहिती उपलब्ध झाली आहे ती मंडळास आज मीं जो एक दुसरा लेख सादर केला आहे, त्यांत संकलित केली आहे. पेशवाईचीं सूत्रें आपल्या हातांत आणण्याचा राघोबादादादांनीं जो प्रयत्न केला व तत्संबंधीं त्यांनीं ज्या अनेक खटपटी केल्या, त्यांपैकीं कांहींचें अत्यंत त्रोटक वर्णन इतिहासग्रंथांतून आढळतें. परंतु निरनिराळ्या प्रदेशांत राघोबादादांनीं काय काय खटपटी केल्या व हें कार्य घडवून आणण्याचे कामांत त्यांचे कोण कोण हस्तक होते, याचें साग्र वर्णन इतिहासग्रंथांत क्वचित च आढळतें. मंडळास आज मीं सादर केलेल्या लेखावरून महाराष्ट्राचें दक्षिण बाजूकडील प्रदेशांत राघोबादादांनीं स्वतःचें वर्चस्व प्रस्थापित करण्याकरितां काय काय खटपटी केल्या, त्या कोणाकरवीं केल्या व त्या कामांत त्यांचे कोण कोण साथीदार होते, याचा बोध होणार आहे.

विशिष्ट स्वरूपाचे कागदपत्र मिळविण्याच्या इराद्यानें संशोधकानें वाटल्यास संशोधनास उद्युक्त व्हावें. परंतु, एकदां संशोधनाचे कार्यास लागल्यावर जें हातीं येईल, त्याचा संशोधकानें संग्रह करावा. विशिष्ट स्वरूपाचे कागदाव्यतिरिक्त कागद मिळाल्यास तिकडे दुर्लक्ष्य करून त्यांचा त्याग करूं नये. विशिष्ट स्वरूपाचे कागद एके च ठिकाणीं प्राप्त होणें दुरापास्त असतें. सर्व प्रकारचे कागद सर्वत्र आढळतात व त्या सर्वांचा संग्रह करणें इष्ट आहे. पंढरपूर येथील रा. रा. दत्तात्रय त्रिंबक आराध्ये वकील यांनीं आपल्याकडील कागदपत्र मला मोठ्या उत्सुकतेनें दाखविले. त्यांचेकडील कागदपत्रांचें संशोधन पूर्वीं एकदां रा. राजवाडे यांनीं केलें असल्याकारणानें शिवकालीन कागदपत्र मला मिळाले नाहींत. परंतु, थोरले माधवराव व सवाई माधवराव पेशवे यांचे कारकीर्दींतील कांहीं ताकीद पत्रें, पंढरपूर येथील श्रीविठ्ठलाचे देवस्थानाचे वतनदार व मानकरी लोकांचे हक्कांबद्दल माहिती असलेले आणि इतर कांहीं व्यवहारविषयक कागद रा. आराध्ये यांचे दप्तरांत मिळाले. या कामीं रा. आराध्ये यांनीं मला जी मदत केली, तीबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. मीं स्वतः केलेल्या संशोधनासंबंधीं नमूद करण्यासारखें इतकेंच आहे.

रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचे संशोधनांत त्यांना जे कागदपत्र मिळाले, त्यांपैकीं कऱ्हाडचे धर्माधिकारी रा. गिजरे यांचे कागद त्यांच्या नकला करून त्यांचा योग्य तो उपयोग करण्याकरितां रा. राजवाडे यांनीं माझ्या स्वाधीन केले. या कागदांपैकीं बरे च कागद महत्वाचे असून त्यांचे योगानें स्वराज्यांतील महाराष्ट्रीय समाजाचे सामाजिक स्थितीवर बरा च प्रकाश पडण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें व्यवहार व प्रायश्चित्त या दोन बाबतींसंबंधीं स्वराज्यांत कोणत्या पद्धतीचें अवलंबन करण्यांत येई याबद्दलची हि बरी च माहिती या कागदपत्रांवरून होण्यासारखी आहे. या कागदपत्रांचें यथायोग्य निरीक्षण करून त्यावरून कोणते सिद्धांत निष्पन्न होतात, याचें दिग्दर्शन पुढें कधीं तरी करण्याची आशा व्यक्त करून हें संधोधनवृत्त मी पुरें करतों.

**भास्कर वामन भट**

# शक १८३६ चें
# इतिहास-संशोधन-वृत्त

शोधकदृष्टीनें पाहिलें असतां जेथें तेथें इतिहास दिसूं लागतो. लोकांच्या रीतिभाती, त्यांच्या समजुती, त्यांचे सण व उत्सव, त्यांतील वागणुकी, त्यांची सामान्य भाषा आणि पुरुष, स्त्री, मुलें ह्यांच्या, विद्वान् व अडाणी ह्यांच्या, निरनिराळे धंदेवाल्यांच्या, निरनिराळे मनोविकार प्रकट करण्याच्या वेळच्या भाषणप्रसंगीं येणारी भाषा ह्या सर्व गोष्टींचा लक्षपूर्वक विचार केला तर त्यांत इतिहासाचा शोध लागतो.

एखाद्या गुजराथी वाण्याच्या घरीं लग्नसमारंभ असतो. लग्नाकरितां वर व वधू एकमेकांसन्मुख उभीं राहिल्यावर वराच्या मागें तरवार धरून एक बनिया उभा राहिलेला असतो. तेव्हां मनांत येतें कीं, ह्या ढेंकूण, पिसा, विंचू, सर्प वगैरे दुःख देणाऱ्या प्राण्यांचीही हिंसा न करणारा, रक्ताकडे पाहिलें असतां ज्यास घेरी येईल, मारामारीचा प्रसंग आला असतां जो पळून जाईल, त्या ह्या वाण्याच्या वरामागें मराठा वराप्रमाणें तरवार घेऊन दुसरा उभा कशाला? अशी शंका येऊन घरच्या मुख्य मालकास विचारावें कीं, ही तरवार धरून वराच्या मागें उभें राहण्याची चाल तुमच्या लोकांत कां आहे? तेव्हां तो सांगतो कीं, आह्मी गुजराथेंतील मूळचे क्षत्रिय आहों. आमच्या पूर्वजांनीं जैन धर्माचा अंगीकार केल्यावर आह्मीं ही वाणिज्यवृत्ति पत्करिली. आह्मी क्षत्रिय असतांना पडलेला आचार तसाच राहिला आहे.

ही गोष्ट ऐकल्यावर—ह्या जैन धर्माचा प्रत्यक्ष परिणाम पाहिल्यावर—आपल्या मनांत विचारांचें काहूर उठतें. ह्या जैनधर्माचा—ह्या अहिंसापरमधर्माचा—आपणास संताप येतो आणि असें वाटतें कीं, ह्या धर्म ह्मणजे शूरांच्या शेळ्या-मेंढ्या बनविणारा, विलक्षण गुणाचा होय. ह्या धर्मामुळें तागडीतुकापा बनलेले क्षत्रिय गुजराथेंत पुष्कळ असल्यामुळें राज्यरक्षणाच्या कामीं गुजराथेंत सरकारास लष्करी लोक मिळण्याची केवढी पंचाईत पडेल! ह्याच धर्म सर्व हिंदुस्थानांत वाढला तर हिंदुस्थानच्या लोकांचा नंबर शौर्याच्या कामांत कोठेंसा लागेल? इत्यादि विचार ऐतिहासिक शोधावरून आपल्या मनांत उभे राहतात.

मराठ्यांच्या लग्नांत त्यांच्या अंगांत वीर संचरतात. ज्यांच्या अंगांत वीर संचरतात, त्यांची मिरवणूक त्यांच्या पद्धतीप्रमाणें निघते. त्या लोकांचे हात, पाय, डोळे इत्यादिकांचे हावभाव पाहिले असतां त्यांचें भय वाटतें. अंगांत झालेला हा वीरसंचार जातो, तेव्हां अंगांत वीर संचरलेला असतो, तो आपल्या लोकांस—आपल्या वंशजांस—आपल्या शत्रूंचा—त्यांच्या वंशजांचा—सूड घेण्यास सांगतो.

मागील शोधांतील गुजराथी वनियाची वृत्ति व वरील शोधांतील मराठ्यांची वीरवृत्ति ह्यांत केवढा फरक आहे. ह्या वीरवृत्तीमुळें च हजारों मराठे वीर यूरोपांतील रणक्षेत्रावर सरकारच्या मदतीस आज जात आहेत.

अशा प्रकारच्या शोधांत, गेल्या ह्मणजे शके १८३६ सालीं माझे बरे च दिवस गेले. लोकसमजुतीचीं म्यां बरीं च टिपणें केलीं आहेत व त्या समजुतींत कांहीं ऐतिहासिक तत्वें आहेत काय, त्यापासून इतिहासावर कांहीं प्रकाश पडतो काय, ह्याचा शोध माझ्या शक्तीप्रमाणें मी करीत आहें.

मार्गशीर्ष शु. १ च्या दिवशीं थोरली दिवाळी ह्मणून एक सण येतो. ह्याची व्याप्ति सह्याद्रीच्या पश्चिमेस समुद्रापर्यंत व पूर्वेस सुमारें ४० मैल प्रदेशांत आहे. दक्षिण महाराष्ट्रांत दिला देवदीपावली

ह्मणतात. देशावरील मराठ्यांच्या बायका संध्याकाळीं आरत्या करून देवास ओवाळतात, हे च काय ते या दिवाळींतील दिवे. ह्या दिवशीं खाण्याला अगदीं बाजरी अवश्य असली पाहिजे अशी या लोकांची समजूत. मांगुळी ह्मणून गवताची दोरी करून ओढतात वगैरे त्या दिवशींचा सर्व विधि मंडळापुढें मांडला आहे. ह्या संबंधाची अशी माझी कल्पना आहे कीं, कार्तिक शु. १ ला जसा विक्रम संवताचा आरंभ आहे, तसा ह्या दिवाळीला विक्रमाच्या पूर्वीच्या एकाद्या राजाचा शक सुरू होत असावा. दुसरी कल्पना अशी आहे कीं, "मासानां मार्गशीर्षोऽहं" अशी जी भगवद्गीतेंत श्रीकृष्णांची उक्ति आहे, तिच्याशीं ह्या गोष्टीचा कांहीं तरी संबंध असावा. विद्वान् शोधकांचें लक्ष इकडे गेल्यास माझे तर्क व्यर्थ ठरतील, अथवा अधिक ऐतिहासिक कल्पनांची ह्यांत भर पडेल. ह्या दोहोंपैकीं कांहीं तरी घडेल. कोंकणस्थ लोकांत ह्या दिवाळींत कांहीं कुलधर्म असतात. देशस्थ लोकांत ह्या दिवाळीचें माहात्म्य सेडेंगांवांतून पूर्वोक्त प्रदेशांत थोडेसें आहे.

भाषेच्या विचारावरून व चालीरीतींवरून इतिहासाचा शोध कसा लागतो, ह्याचीं दोन उदाहरणें येथें देतों.एकदां कांहीं नुकतीं च बोलूं लागलेलीं मुलें एकत्र जमून बोलत असतां, "घर" ह्या शब्दाबद्दल एका मुलानें "गड" हा शब्द उच्चारला, व दुसऱ्यानें "घल" हा शब्द उच्चारला. हे त्यांचे उच्चार ऐकतां च "गड" ह्मणजे डोंगरी किल्ला व घळ ह्मणजे गुहा ह्या शब्दांची व्युत्पत्ति संस्कृत 'गृह' शब्दापासून गृह–घर–गड किंवा घल–घळ अशा रीतीनें झाली हें तेव्हां च लक्षांत आलें व ही शब्दव्युत्पत्ति मंडळापुढें ठेविली.

मामक– मामा–मामाजी; मामी; भ्रातृ–भाऊ–भावोजी; भगिनी–बहिणी–वहिनी; अशी मामाजी, मामी, भावोजी व वहिनी ह्या शब्दांची व्युत्पत्ति, ह्या शब्दांचे प्रयोग, सासरा, सासू, दीर व भावजई ह्या शब्दांबद्दल ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत सर्व लोकांत प्रचलित आहेत. माध्यंदिन शाखेच्या ब्राह्मणांत मामाच्या गोत्राचीही मुलगी चालत नाहीं व चित्पावनांत मामीचा मुलगी करीत नाहींत. ह्या दोन अपवादांखेरीज महाराष्ट्रांतील ब्राह्मणादि सर्व लोकांत मामाची कन्या वरण्याची चाल आहे, व कित्येकांत मावळणीची ह्मणजे आतेची मुलगी वरण्याची चाल आहे. ह्या चालीमुळें वर व वधू यांचा, मामा हा सासरा होतो, ह्मणून सासऱ्यास मामाजी, मामाची बायको किंवा आत सासू होते ह्मणून सासूस मामी किंवा अत्ति. दीर–भावजई एकमेकांचीं मामे–भावंडें किंवा आते–भावंडें–भाऊबहिणी होतात ह्मणून भावोजी व वहिनी हे शब्द योजले गेले. माध्यंदिनांत व चित्पावनांत जरी वर लिहिल्याप्रमाणें मातुलगोत्र व मातुल–कन्या वर्ज्य असली, तरी भाषा सदर प्रमाणें च वापरतात, निराळी नाहीं. समावर्तनसमयीं ह्मणजे सोडमुंजीच्या वेळीं मामाचें सान्निध्य अवश्य मानण्यांत येतें व समावर्तन झालेला पुरुष–मुलगा–प्रवासास निघाल्याचें सोंग करितो, तेव्हां त्यास आपली मुलगी देण्याचें कबूल करितो ही चालही त्यांच्यांत आहे ह्मणून भाषेवरून व चालीरीतीवरून असा शोध लागतो कीं, मातुल–कन्यापरिणयाची रीत फार जुनी आहे. तद्विरुद्ध शास्त्र मागून झालेलें आहे. असा इतिहास निःसंशय समजतो. हा हि शोध मीं मंडळापुढें ठेविला आहे.

मराठी भाषेच्या इतिहासांतील आणखी एक शोध लागला आहे, तो पहा. द्वितीयेचा व चतुर्थीचा अनेकवचनी प्रत्यय ना ह्याचा उपयोग लेखांत कोणत्या काळीं झाला? मुकुंदराज ज्ञानेश्वरापासून तों पेशवाईच्या

अखेरचे कवि मोरोपंतरामजोशीतात्या-पर्यंत कोणत्याही कवीनें केला नाहीं. इतिहाससंशोधकांनीं ज्या बखरी व कागद-पत्र पेशवाईच्या अखेरपर्यंतच्या काळां-तील हुडकून काढिले आहेत, त्यांतही ह्या प्रत्ययाचा लेशांत उपयोग कोणीही केला नाहीं. ह्यांची व्युत्पत्ति संस्कृतांतील द्वितीया व षष्ठी यांच्या बहुवचनीं जो नकार येतो, त्यावरून करितां येते, असें माझ्या अल्प-मतीस वाटत आहे, हा हि विचार मंडळापुढें मीं ठेविला आहे.

असो. सांगण्याचें तात्पर्य इतकें च कीं, माझ्यासारख्या उतार वयाच्या मनुष्यास –प्रवासांतील विशेष दगदग ज्यास होत नाहीं त्यास–अशा प्रकारचे शोध करण्यास जागा आहे असें मला वाटतें. राजवाड्यां-सारखे विद्वान् शोधक थकून जेव्हां घरीं बसतील–तसें लवकर न होवो असें मी इच्छितों–तेव्हां त्यांच्यासारख्या व्यापक बुद्धीच्या मनुष्याच्या शोधाचा प्रदेश ते दोन हात जागेंत बसले असतां हि केवढा अफाट असेल ह्याची कल्पना करावी.

इतिहाससंशोधक एखाद्या ठिकाणीं जाऊन आले, ह्मणजे त्या ठिकाणीं पुन्हां कांहीं शोध लागणार नाहीं असें समजूं नये. सातारा जिल्ह्यांतील कोरेगांवीं आज-पर्यंत मी शंभर वेळ गेलों असेन व प्रत्येक वेळीं चौकशी हि केली असेन, परंतु नुक-तां च तेथें गेलों असतां, तेथील केदारे-श्वराच्या देवळांतील गोसाव्यानें एक शिला-लेख देवळाशेजारीं असलेला मला दाखविला. त्याची खबर मंडळास मीं दिली आहे.

कोरेगांव, खटाव, वाळवें ह्या तालुक्यां-तून कांहीं ठिकाणीं गेल्या वर्षी शोध करीत हिंडलों, परंतु उतार वयामुळें खाण्या-पिण्याची बरोबर व्यवस्था जमेना. एक दोन दिवस राहून कांहीं कामाचें हि जमेना. व्यर्थ खर्च मात्र अशानें होतो, हें जाणून एका च ठिकाणीं आपली सोय असेल तेथें कायम मुक्काम ठेवून तेथें व भोंवतालीं शोध करावा असें आतां मीं ठरविलें आहे. असें केल्यानें बरें च काम होतें असा अनु-भवहि आला आहे.

एके दिवशीं एका वैदिकाच्या घरीं मी गेलों व तुमच्या घरच्या पोथ्या पाहूं ह्मणून बोललों, तेव्हां त्यानें सांगितलें कीं, आमच्या घरीं काय वेदाच्या व याज्ञि-काच्या प्रयोगाच्या पोथ्या आहेत, कांहीं विशेष नाहीं. शेवटीं त्यांच्या घरच्या पोथ्या पाहण्याचें ठरलें. पोथ्या पाहतां पाहतां "भगवद्गीता-संगति-निबंध" नांवाचा एक १५० वर्षांपूर्वीं ठाकूर उपनामक एका ग्रंथकारानें लिहिलेला अप्रसिद्ध असा ग्रंथ उपलब्ध झाला. वैदिक भटजीस थोडीशी दक्षिणा देऊन, ग्रंथ आणून मंडळाच्या चिटणिसांच्या स्वाधीन केला आहे.

आमच्या भाऊबंदांपैकीं एका घरा-ण्याचा लौकिक असा आहे कीं, त्याच्या पूर्वजांनीं जयपुराहून कित्येक उंट भरून पोथ्या आणिल्या. त्या घराण्यांत हल्लीं अज्ञान पुरुष व निराश्रित विधवा आहेत. त्यांपैकीं एका विधवा बाईच्या घरांतील पुस्तकांची स्थिति पाहतां त्यांस वेष्टणें नाहींत, त्यांवर गळून त्यांचीं पानें एक-मेकांस चिकटून कुजून गेलीं आहेत. तपा-सतांना कांहीं कागदपत्र व पुस्तकें मिळालीं, त्यांपैकीं ३००वर्षांपूर्वीं लिहिलेला देशी नाम-माला हा हेमचंद्राचा कोश–ज्याचीं पानें चिकटलीं तरी मोकळीं होण्यासारखीं आहेत असा–आणून मीं मंडळाकडे दिला आहे.

कामरत्न वगैरे तंत्रशास्त्राचे ग्रंथ व नागार्जुनाचार्यकृत योगरत्नावली ह्मणून एका ग्रंथाचीं २१४ पानें सांपडलीं तीं हि मीं मंडळाकडे दिलीं आहेत. योगरत्नावलींत अनेक चमत्कारिक प्रयोग लिहिले आहेत ह्मणून तो समग्र ग्रंथ मिळविण्याची खटपट सुरू आहे.

फार प्रसिद्ध अशा जुन्या विद्वानांच्या घराण्यांची फार दुर्दशा होऊन गेली आहे. त्यांच्या घराण्यांतील अज्ञ माणसांनीं पुस्तकें वाण्यास किंवा आतारास रद्दी ह्मणून विकून टाकलीं आहेत व कोठें कोठें घर सांगितल्याप्रमाणें कुजत पडलीं आहेत. कोणी मागेल तर तीं माणसें देणार नाहींत. अशा एका बाईस मी २ रुपये देण्यास तयार झालों. त्याचा परिणाम असा झाला कीं, ती पुस्तकें दाखवीत असे ती आतां दाखविनाशी झाली.

कन्हाड तालुक्यांतील कालगांव येथील एका कुणब्याच्या बाईकडे सदाव तालुक्यांतील दोन गांवांच्या शिवेच्या तंट्याचा महजर सांपडला आहे. कोणीकडचे कागद कोठे सांपडतील त्याचा नियम नाहीं. सातारा जिल्ह्यांतील बहादूर-वाडीकर घोरपडे ह्मणजे वाळवे प्रांताचे देशमुख ह्यांचे कागदपत्र मुलांनीं शाळेंत आणिलेल्या लिखितांत सांपडले. ते वाळवें प्रांतांतले सातारा प्रांतीं सांपडले. वावटळींत सांपडलेल्या पाल्यापाचोळ्याप्रमाणें ही स्थिति आहे.

जावलीचे चंद्रराव मोरे याचा शिवाजीनें निर्वंश केल्याचें आपणा सर्वांस माहीत आहे.परंतु जावली प्रांताची देशमुखी शिवाजीनें त्याच्या एका भाऊबंदास दिली आहे. जावली ज्या खोऱ्यांत आहे, त्यास कांदाट-खोरें असें ह्मणतात व तेथील मोरे देशमुखास कांदाटकर देशमुख असें ह्मणतात. त्यांचीं १०।१२ पत्रें तिकडे असलेल्या माझ्या एका विद्यार्थ्यांनें पाठविलेली मंडळाच्या स्वाधीन मीं केलीं आहेत. पाठविणाराचें नांव रामचंद्र तुकाराम जगदळे. त्याला मिळतील ते कागद अस्सल अगर नकला त्यानें पाठवाव्या ह्मणून पोष्टसचींकरितां त्यास एक रुपया मीं पाठविला.दुसरे कोणी शोधक जातील तर कागद मला दाखवितात ते मुळीं च बंद होईल असें तो ह्मणतो. इकडे आलेले कागदपत्र छापून आमच्यापुढें आल्यावर मग आमच्याजवळचे आणखी कागद देऊं असें मात्र त्या देशमुखांनीं जगदळे याजपाशीं कबूल केलें आहे.याप्रमाणें माझें संशोधनवृत्त आहे.

पुणें, तारीख २९।५।१९१५

**कृ. वि. आचार्य काळगांवकर**

---

## भारतवर्षातील संशोधन

गेल्या वर्षी नाशिक, खानदेश, नेवासें शेगांव व कन्हाड या प्रांतांत संशोधनार्थ मला फिरावें लागलें. त्यांत सवाशेंवर संस्कृत ग्रंथ, अडीचशेंवर मराठी ग्रंथ व तीन हजारांवर ऐतिहासिक पत्रें हातीं लागलीं. संस्कृत ग्रंथांत महाराष्ट्रांतील विद्वानांनीं गेल्या पांचचारशें वर्षांत लिहिलेले गद्यपद्य लहान मोठे प्रबंध आहेत. मराठी ग्रंथांत शंभरसवाशें मराठी ग्रंथकारांची मराठी गद्यपद्य ग्रंथरचना आहे. पैकीं बऱ्या च ग्रंथांचीं वर्णनें गेल्या वर्षाच्या व चालू वर्षाच्या पाक्षिक सभांत वाचलीं गेलीं आहेत. बाकीच्या ग्रंथांचीं वर्णनें चालू वर्षाच्या पुढील पाक्षिक सभांत वाचावयाचीं आहेत. ऐतिहासिक पत्रव्यवहारांत आर्थिक, प्रायश्चित्तविषयक, व्यवहारविषयक, ग्रामसंबंधक, राजकारणी इत्यादि अनेक बाबींची माहिती देणारे कागद उपलब्ध झाले आहेत. कन्हाड येथील गिजऱ्यांच्या दप्तरांत शिवकालीन व शिवपूर्वकालीन पत्रव्यवहार मिळाला. त्यांत जुन्यांत जुना कागद शक १४२९ तील आहे. तो मोडींत आहे. गिजऱ्यांच्या ह्या व इतर पत्रांवरून दिसून येतें कीं, गिजऱ्यांना जोसपणाची वृत्ति शक १४२९ त मिळाली. ती देणारा पानसी या नांवाचा एक जोइसी ऊर्फ जोशी होता. त्याच्या घरांत ही वृत्ति शक १४२९ पूर्वी तीनचारशें वर्षे असावी. ह्मणजे शक १०२९ पासून पानश्याच्याकडे कन्हाडा-

जवळील कारवें वगैरे गांवांचें जोसपण होतें. हा पानसी शक १४२९ त निपुत्रिक होऊन काशीयात्रेस जाऊं लागला, व जातांना त्यानें आपली वडिलार्जित वृत्ति गिजऱ्यांना दिली. गिजऱ्यांकडे ही वृत्ति शक १४२९ पासून शक १८३७ पर्यंत ह्मणजे ४०८ वर्षें अव्याहत चालत आली आहे. शक १४२९ तील कागदांत तेया, हेया, गिजरेया, करुनु, पाटेलु इत्यादि ज्ञानेश्वरी रूपें येतात, तीं आपण पहावीं. या पत्राच्या पाठीला बळकटीकरितां एक जुनाट कागद चिकटविलेला आहे, त्यांत हि ह्या पत्राच्याहून हि जुनी भाषा आहे, व अक्षराचें वळण ह्या पत्राच्या वळणाहून हि सुबक आहे. आमचेया, गिजरेयां, विनवा॰ वेया, वगैरे रूपें या पत्रांत आलीं आहेत. हेया हें रूप शक ११२९ तील चांगदेवाच्या ह्मणजे भास्कराचार्यांच्या नातवाच्या चाळी॰ सगांवाशेजारील मराठी लेखांत येतें.

आजपर्यंत जुन्यांतलें जुनें असें मोडी पत्र मजजवळ असलेलें ह्मणजे शक १३५० च्या सुमारचें आहे. तदनंतर शंभर दीडशें वर्षांतील हीं पुढील तीन पत्रें मिळालीं.

**विश्वनाथ काशीनाथ राजवाडे**

---

लेखांक १

[ फारसी दोन ओळी ]

साक्षी कामाक्षा तथा हानुमानू

[ नांगराचें चिन्ह ]

॥ ४ श्री स्वस्ति श्री साकु १४२९ वरीखे परमा वछरे आस्विनु वादि पचमी आयातवारु तेया दिवसी करुवे थाळ देको पाटेलु बीन इनाएकु पाटेलु वा सेळो पाटेलु वा नेगो पाटेलु वीगकरु वा वाटगुडी पिसळ वा साईदे पाटेलु वा तुकतेऊ वा रामीदेऊ वा सोनु गुडी वाडिका वाडिगा गुडी पु हे मुख्य करुनु सामास्ता पाटेलु गिजरेया मानाभट गोविंदभटें सी वींतीपत्र जोतिक आमचे गांवी ची जैसी पूर्वी आमाचां वडिले तुह्मा सी दिल्ही होती तैसी ची आह्मी दिल्ही ते तुवा आपुली (था) लेकुरा चा लेंकुरी चालावजे हे आमा ची सत्या हेया बोला सी आन्यथा नाही

गोही

कानोजी मराठजी चोरडे
मादा उदोबा सेटी करुवे
मायी नाईक करुवे
लासुमण बाळो सुतारु करुव
माई सेटी आई सेटी सोनारु कारुवे
राघो तुकदेऊ पा। सेडे तळघाटू

[ दुसरा रकाना ]

एकोजी केसोजी साळीवा सो निगुडी पा। सातारे
पुरसादेऊ मोईगुडी सो करुवे
बाबू डोईगुडू ताराळू करुवे
माळ दुदुमी सेटी मेहतरी कारुवे

[ रकान्याचे खालीं मधोमध ]

संडो पलिदेऊ कुळकर्णी रामरामे नगरकुलकर्णी का। कन्हाड सही
मालिक चंदन साहेबु हवल करुवे
गुडे, अंतोबा निसिंदा कारुवे
लिखिते मानोबा राघोबा
कुळकरणी कारुवे
पत्राप्रमाणें साक्ष्य अतो लाहीदेऊ

फारसी शिक्का

---

लेखांक २

साक्ष कामाक्षी वा हनुमंत वा कृष्णाभागीरथी

मल्हारजी गोदाजी सही [ निशाणी नांगर आकृति ]

॥ ४ स्वास्ति श्री सके १४६४ वरीख सुभकृत नाम संवछरे फळगुण वदी

तेरसू वारु सणी तदीनी मौजे करुवें थळ गोदोजी बिन देको पटेळू वा + + + + को पटेळू बिन वासुदेउ पटेळ वा खळ जयेक बिन कान जयेक वा नमादेऊ बिन रमागुडी वा चिळोदेऊ बिन कमाल गुडी वा माद पुजगुडी बिन ऐदू गुडी वा कान्ह जयेक बिन एळू गुडी वा माद गुडी बिन डाई गुडी वा एकदेऊ बीन रूपगुडी हे मुख करुनु समस्ती क्रिस्णा भट मान भट गींजरें सी लिहुनु दिले ब्रीतीपत्र ऐसे जे तुमचया वडिले सी आमच्या वडिलानी पूर्वानिपूर्वी जोतिसव्रीती दीली होती तैसी ची आता आह्मी तुज दीली असे तुवा आपुले लेकुरा चे लेकुरी वीर्ती चालविजे हे आमचया वडिला चें सत्या भाक हेया बोला सि अनेथा नही

**गोही**

डाया बिन लखमण सुतारु करुवें
तान्हा बिदू डोई गुडी तरळ करुवें
भीकु लाहीया अहीर करुवें
तुका बीन साया गाव्हर करुवें
[ एकाना दुसरा ]
लाहिया नेमदेऊ न्हावी करुवें
सेदा दरणे बीन पोमा दरणे करुवें
माळ दरणे बीन रीवा दरणे करुवें
साया लुया गाव्हरु करुवें
[ खालीं मधोमध ]
मीया आबास साहेबू हवाल करुवें
क्रीस्णोबा नरसोबा सेणवी मौजे करुवें
लिखिते पिलोबा भानोबा कुळकर्णी करुवें
चंदन मादा मादई जमादारु करुवें
+ + + सेटी बीन दामो सेटी
+ + ळ कसबे करड सही

लेखांक ३

यासी साक्ष कृष्णा भागीरथी

॥ ५ श्री सके १४७९ वरीखे पिंगळ नाम संवछरे कार्तिक वदि दसमी सोमुवार तदीनी देसाईयानि वा सेटिये वा माहाजनानि वा मोकदमानि पा करहड यानि क्रीस्णभट वा पिलंभट वा संभुभटजी गिजरेयासि लिहुनु दिल्हा माहजर ऐसा जे वीर्ती गाव ५ वि॥

मौजे कारुवे मौजे सेरिये मौजे वडगाऊ
मौजे कोडवली मौजे दुसेरिये

जोतिस वा उपादिक हरि गंगाधर जोइसीयानी तुमचे वडिल रामेस्वरभट गिजरेयासि आपुले आत्मसुखें पाय धुनु दिले ऐसे आमचे वडिला चे मुखे आइकिले हा माहाजर सही ह्या वृती हरि गंगाधर जोइसी याचिया ऐसे आमा सी ठाउके आसे मोर्तब

हरीजी कान्होजी यादव देसाई पा करहड

साक्षी भु
हरी ज्स्जावी न
कानोजी देसा यी
पा कराड

जायनायेक हरिनायक सेटिया पा करड
[ निा तागडी ]
+ + + + +
+ + + +
जोग सेटी बाबी सेटी चिखले माहाजन का करड
चौंडोबा नारोबा सराफु करड
कुख पटेलु बिन नागदेऊ पटेल मौजे काययेवी
बहिरो चौगुला [ निा नांगर ]
इनको पटेल बिन वासदेऊ पटेल

मोकदम मौजे करवें पाा मजकुरु
पिलोबा भानोबा कुळकर्णी कारवे
हरी गुडी बिन रमा गुडी चौगुला मौजे मजकुरु
नारुजी काळू साऊ माहाजन काा करड नाराजी
खंडोबा चाटे काा करड
गोदोजी बिन + + + +
पटैल + + + +
[ निाा नांगर ]
देमाजी राम कुलकर्णी मौजे मजकुर
चिळगुडी बिन कमलगुडी मोकदम मौजे मजाा
मौजे कोडवली
लाखामण पटैल बिन कोया पटैल पटैल
सीदोजी बिन चगोजी चौगुला ठेउला
[ निाा नांगर ]
गोदुजी बिन चगोजी टेवल
सदू पटेल बिन काया पटेल
गोदो पटेल वा सभो पटेल वा मलो पटेल मौजे सेरिये [ निाा नांगर ]
रामजी पटैलु बिन गोदजी पटैलु काा कऱ्हाड [ निाा नांगर ]
कमलाजी पीलदेऊ कुलकरणी काा कऱ्हाड मौजे रेटरें पिपलादेवीचें
भैरोजी खेळजी मोकदम मौजे मजकुरु
पदमोबा चोंडोबा अष्टाधिकारी मौजे मजकुरु [ निाा नांगर ]
राघो एवतो ——— पधरे कुलकरणी जोइसी मौजे रेटुरे बुाा
हरी गुडा पटेल पटैल बिन लाही गुडा पटैल मौजे दुसेरे [ निाा नांगर ]
साई गुडा खटिंग चौगुला मौजे दुसेरें

---

लेखांक ४

( १४२९ पत्र पाठीची बाजू ).

॥ ॐ श्री सकलगुणसंपन राजमान्य राजश्री गुणमणि इस्टजनआल्हादक गोब्राह्मणप्रतिपालक श्री कारवें व कोडिवलें व वडिगाऊ राजमुद्रामुख्य समस्त इ आसीर्वादु विनती विनवावेया कारण ऐसें उपरी तुमचा गांवीं आमचे वडील गंगाधर जोसीयाची जोईसीपण व उपाध्येपण व सर्वआदि ए ते आमचेया वडिलाची वृती ते आमचां वडिलीं गिजरेयां रामेश्वरभटां सी दिल्ही तेथें कोणीएक लक्ष्मीधर भट उभे राहिले असेती आमाचा म्हणौनु तरी तेथें आह्मी कांही नांकाबू नाही ऐसें तुमचे ही पूर्वज ह्मणजेत होते आणि तुह्मासी ठाउकें असें तरी राउळे जो उभा राहिला असेल तेयासी निवारिजे वृतीचे स्वामियें तुह्मी आह्मी सर्व प्रकारें गिजरेयांची वृती गिजरेयां सी थापिजे आह्मासी लेहावेया संमधु इतुका जें वृती आमचां पूर्वजीं दिल्ही तरी जो उभा राहिला तो तुह्मी निवारिजे तुमचें उतर जो नाइके तेथें आपलेया दुतासी आह्मी उतर देणें ला +

* * *

लेखांक ५

( १४२९ चे पत्रामागें चिकटविलेला आणखी एक कागद )

रौद्री नाम सवस्छाह श्रवण सुध १ सुक्रधार वितीपात परवकालनिमित्यार्थ वेदमूर्ती रुद्रभट गिजरेया सी बिडो भास्कर दानपत्र तुह्मास खरिदी हासी होनु ४॥ साडेच्यारी देउन तुह्मास दानपत्र दिल्हे असे आमचे समंधीय कोण्ही तुह्मासी प्रसंग करण्यास समंध नाही पुत्रपौत्री रुष्णा अर्पण दिल्हे असे हे विनती

( लेखांक ५ प्रमाणें च एक तुकडा ).

---

लेखांक ६

॥ ॐ सकळगुणसंपन सौजन्य-सिरोमणी देवब्राह्मणप्रतिपाळ निराधार्योंची अधारु परउपकार चिंतामणि राजमान्य राजश्री कऱ्हा

गोत्रजीं दिल्हे ये अर्थीचीं अम वडिळ यानी त्रे.

(या शिवाय दोन फारशी ओळी हि आहेत.)

## सूचीची योजना

मागचे वर्षी मंडळानें ठरविल्याप्रमाणें प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक साधनांपैकीं रा. राजवाडे यांनीं संपादित केलेल्या साधनांची बृहत्सूचि करण्याचें काम, धुळ्याचे मंडळीनें अंगावर घेऊन तें आपल्या मनाशीं निश्चित केलेल्या काळांत ईशकृपेनें पार पाडलें. ती सूचि आज मंडळास सादर करण्याचे पूर्वी ती करीत असतांना आलेला अनुभव थोडक्यांत आपल्यापुढें ठेवावा, म्हणून मंडळाचे विद्वान् चिटणीस रा. तात्यासाहेब मेहेंदळे यांची मला आज्ञा झाली. सूचि चालली असतां वेळोवेळीं केलेलीं टिपणें आज जवळ नसल्याकारणानें रा. मेहेंदळे यांच्या आज्ञेनुसार जो रिपोर्ट आपल्यापुढें मी ठेवीत आहें, तो यथासांग असणें शक्य नाहीं, आणि त्यांची आज्ञा तर अनुल्लंघनीय आहे, तेव्हां कसेबसे दोन शब्द आपल्यापुढें ठेवीत आहें, त्यांचा स्वीकार व्हावा.

सूचीचें महत्व आपणांस सांगण्याची आवश्यकता नाहीं. श्रम आणि काल यांचा अपव्यय न करतां एखादा ग्रंथाचें आकलन करणें झाल्यास सूचीसारखें दुसरें सुलभ साधन नाहीं. श्रमविभागाचें फार च उत्तम तत्व सूचि या रूपानें आपणांस सहज मिळण्यासारखें आहे. हें सूचीचें महत्त्व सर्वश्रुत व इतकें उघड असून हि आजपर्यंत प्रसिद्ध झालेले मराठी ग्रंथ बहुतेक सर्व सूचीवांचून च प्रकाशित झालेले आहेत, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. ऐतिहासिक ग्रंथांत तर सूचीचें महत्त्व अत्यंत आहे. त्यांत अलीकडे ज्या प्रमाणावर व ज्या पद्धतीनें इतिहासाचीं साधनें प्रसिद्ध झालीं आहेत, तीं लक्षांत घेतलीं तर सूचीवांचून त्यांचा अभ्यास अत्यंत त्रासदायक, बेशिस्त व फार मोठ्या श्रमाचा होणार आहे, किंबहुना सूचीवांचून या साधनांचें परिशीलन अशक्य च झालें आहे. त्या साधनांची ही हल्लींची स्थिति लक्षांत घेऊन च मंडळीनें सूचीचें काम करण्याचें ठरविलें, व या ठरावानुरोधानें या कामाचा आरंभ धुळ्यास व्हावा असें आम्हीं मनावर घेतलें. सूचीचें काम अत्यंत परिश्रमाचें व कालातिपाताचें आहे, तथापि रा. राजवाडे यांचे प्रोत्साहनानें त्याचा उपक्रम आम्हीं केला. ग्रंथांची जमवाजमव आणि योग्य माणसांची निवड झाल्यावर सूचीच्या नमुन्यासंबंधीं वाटाघाट होऊन सांगोपांग विचारांतीं प्रस्तुतचा नमुना रा. राजवाडे यांच्या अनुमतानें आम्हीं ठरविला. या नमुन्यांत ४ निरनिराळीं सदरें आहेत, तीं अशीं:—१ स्थल अथवा व्यक्ति, २ काळ, ३ प्रसंग आणि ४ संदर्भ. या नमुन्याच्या योगानें एका सूचीच्या परिश्रमानें आम्हांस तीन सूचि सुलभ झाल्या आहेत, त्या अशा:—(१) स्थल अथवा व्यक्तिदृष्ट्या, (२) काळदृष्ट्या व (३) प्रसंगदृष्ट्या. कोणत्या हि ऐतिहासिक विभूतीचें नांव काढून पाहिल्यास आपणांस असें दिसून येईल कीं, भिन्न काळांतील भिन्न प्रसंगांचा उल्लेख त्या नांवापुढें आल्याकारणानें तें एक प्रकारचें त्या व्यक्तीचें त्रोटक चरित्र च झालें आहे. स्थल अथवा व्यक्ति यांत जरी सर्व प्रकारच्या स्थलवाचक व व्यक्तिवाचक विशेषनामांचा समावेश केला आहे, तरी सुद्धां ऐतिहासिक अभ्यासास सौकर्य यावें म्हणून तह, मोहीम, लढाई व स्वराज्यादि विशेष हक्क यांजकडे हि दुर्लक्ष्य केलें नाहीं, आणि यामुळें सदरचे सूचीस जेवढें विस्तृत स्वरूप देतां येईल, तेवढें देण्याचा प्रयत्न केलेला आहे. एवढ्यावरून ही सूचि अगदीं निर्दोष आहे असें भासविण्याचा माझा उद्देश नाहीं. तिच्यांत दोष हे आहेत च, परंतु ते दोष प्रमादरूपी नसून क्वचित् पुनरुक्तिस्वरूपाचे आहेत. शक १६५० चे पूर्वीचे कालाचा फारशी, इंग्रजी व हिंदी या तीन पद्धतींचा निर्णायक

ग्रंथ उपलब्ध नसल्याकारणानें शक १६-५० चे पूर्वी ज्या अनेक ऐतिहासिक गोष्टी घडून आल्या व ज्यांचा काल फारशी अथवा इंग्रजी वर्षांत दिलेला आहे, त्यांचा उल्लेख शकांत करणें–विशेषतः तिथीवारांसह–बरेंच कष्टसाध्य असतें, अशा ठिकाणीं क्वचित् प्रमाद हि घडण्याचा संभव आहे. दुसरें असें कीं, मूळ ग्रंथांत च जेथें शक व सन नमूद केलेले आहेत, त्यांची सत्यता अजमावून पाहणें हि सुकर नसतें. तिसरी एक अडचण सूचि करतांना आह्मांस जी आली, ती ह्मणजे कांहीं ठिकाणीं विशेष नांवांच्या ऐवजीं फारशी पदव्यांचा च उल्लेख केलेला असतो, अशा ठिकाणीं नुसत्या पदव्यांवरून विशेषनाम ओळखण्याचें इतिहासाचे परिशीलनावांचून बरें च दुष्कर होतें. तसें च कित्येक पत्रें तर अशीं आहेत कीं, त्यांचा बरा च भाग निव्वळ फारशी च असून त्यांत उल्लेख केलेल्या पदव्या या विशेषनामासारख्या च असल्याकारणानें विशेषनांव कोणतें, व पदवी कोणती, हें ओळखणें कठीण पडतें. २१३ पत्रें अशीं आढळलीं आहेत कीं, तीं कोणीं कोणास लिहिलीं, याचा मागमूस लागत नाहीं. यावरून जी एक गोष्ट स्पष्ट होत आहे, ती ही कीं, सूचि करणें हें जसें शारीरिक श्रमाचें काम आहे, त्याहून हि त्यांत बुद्धीचें काम जास्त अधिक आहे. तशांत, थोडक्यांत पुष्कळ अर्थाचा प्रसंग नमूद करण्याचें कर्तव्य आपण लक्षांत घेतलें ह्मणजे तर सूचि करणारा मनुष्य बुद्धिमान् असला पाहिजे हें उघड होतें. या अडचणींकडे लक्ष देऊन, मंडळीची निवड झाल्यानंतर व प्रत्येकीं एकएक भाग वांटून दिल्यानंतर २१३ आठवडे प्रत्येकानें आपापला भाग वाचून त्यांत जीं शंकास्थळें असतील, तीं नमूद करण्यास सवड दिली, आणि नंतर त्या शंकांचें निराकरण रा. राजवाडे यांनीं केलें. अशा तऱ्हेनें सूचि करण्यास प्रारंभ झाला. सूचीचें काम चाललें असतां प्रत्येक रविवारीं नियमित स्थळीं व नियमित वेळीं एकत्र जमून, आपापलें काम, अकारविल्ह्यानें लावून, गेल्या आठवड्यांत, कांहीं शंकास्थळें उत्पन्न झालीं असल्यास, त्यांचेबद्दल आपसांत चर्चा करण्याचा क्रम ठेविलेला होता. असें करणें अनेक दृष्टीनें आवश्यक व इष्ट असतें. एक तर, गेल्या आठवड्यांत कोणीं किती काम केलें हें परस्परांच्या नजरेस आल्यानें, कार्यकारी मंडळींत एकप्रकारें सात्त्विक अहमहमिका उत्पन्न होऊन, उत्साह वाढतो. समानशील असून एका च उद्योगाप्रीत्यर्थ श्रम करणाऱ्यांत उत्साह कां वाढूं नये? दुसरें असें कीं, राहिलेलें काम व निश्चित केलेला काळ यांच्यांत परस्पर प्रमाण बांधणें हि सुलभ होतें. असो.

सूचीचें हें काम चाललें असतां, प्रत्येकानें आपलीं शंकास्थानें व मूलग्रंथांत उपलब्ध होणारे फारशी शब्द हे निराळे टिपून ठेवावे असा एक निर्बंध केलेला होता. सूचि करणारे हे सद्गृहस्थ सर्व पदवीधर असून, त्यांतील बहुतेकांचा आपल्या या मंडळाशीं प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष कोणते हि प्रकारचा संबंध नव्हता. असें असून विशेष आनंदाची व अभिमानाची गोष्ट ही कीं, हजारों रुपये खर्चून जें काम होणें नाहीं, तें मोठ्या आस्थेनें व आनंदानें या सद्गृहस्थांनीं नियमित वेळीं पार पाडलें, याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. महाराष्ट्रांत कार्यकर्तृत्व नाहीं असें नाहीं, बुद्धि नाहीं असें हि नाहीं, उणीव काय ती योजकाची आहे. ती या प्रसंगीं रा. राजवाडे यांनीं भरून काढली आहे.

मोठ्या श्रमाचें परंतु स्वीकृत कार्य संतोषास्पद रीतीनें नेमलेल्या वेळीं आमचेकडून पार पडलें, यांत च आमच्या श्रमाचा मोबदला आह्मांस मिळाला आहे. हे आमचे श्रम राहिलेल्या साधनांची सूचि करण्यास

मार्गदर्शक नव्हे तर एकास ठेंच दुसरा सावध या दृष्टीनें बोधप्रद झाले, म्हणजे ते सफल आहेत, अशी आमची अल्प समजूत आहे. माझे मित्रांचे वतीनें ही हकीकत व त्या हकीकतीबरोबर च तयार झालेली ही सूचि मंडळास मी मोठ्या प्रेमानें सादर करीत आहें; तिचा स्वीकार करणें हें आपल्यांकडे आहे.

पुणें, वैशाख वद्य १।१८३७

**गो. का. चांदोरकर**

---

श्री

# शक ११८१ मधील चालुक्यांचा एक ताम्रपट

हा ताम्रपट **श्रीबप्पदेवराय** यांच्या **पुलुदाडा हुत** रठकु ( पुलुदाडा हुतर–ठकूर ) नांवाच्या सेनापतीनीं श्री शक ११८१ सिद्धार्थ संवत्सरीं कार्तिक शुद्ध १५ सोमवार या दिवशीं **वासुदेव** प्रभु (देसाई) प्रमुख एकादश ब्राह्मणांस '**मातुलिंगी**' गांव ( त्यांतील, भिन्न ब्राह्मणांस, भिन्न मापाची सुपारीच्या झाडाची भूमि ) दान दिल्याबद्दलचा आहे.

या दान:पत्राचे तीन पत्रे असून, त्यांच्या कडा वाळल्या असल्याकारणांनें व आंतील अक्षरें बरीं च स्पष्ट व खोल कोरलीं असल्यानें, ते न झिजतां, अक्षरें हि सुवाच्य अशीं राहिलीं आहेत. नेहमींचे पद्धतीस अनुसरून हा ताम्रपट प्रथम व तृतीय आंतील बाजूंनीं व द्वितीय दोहों बाजूंनीं कोरलेला आहे. एकूण एकंदर ओळी ३५ असून प्रत्येक ओळींत २१ ते २५ अक्षरें आहेत. पत्रे आडवे लिहिले असून मध्यभागीं कडीस अडकविण्यास भोंक प्रत्येक पत्र्यास आहे. कडी उपलब्ध झाली नाहीं, यामुळें या चालुक्यांच्या चिन्हांचा बोध होत नाहीं.

प्रत्येक अक्षर सुमार पाव इंच लांबट असल्यानें बरें च सुवाच्य आहे. लिपि ११।१२ वे शतकांतील पृष्ठमात्रेची आहे; तथापि 'छ' हा जुना आहे. लिपि संबंधीं विशेष लिहिण्यासारखें असें कांहीं नाहीं.

या दानपत्राची भाषा कोणती ? हा एक प्रश्न आहे. बारावे शतकाची अखेर अखेर म्हणजे वस्तुतः संस्कृत भाषेच्या अभ्युदयाचा च काळ म्हटलें तरी चालेल. तेव्हां या कालांतील धड संस्कृत नाहीं व पुरी प्राकृत ( मराठी ) हि नाहीं अशी ही भाषा तरी कोणती ? या दृष्टीनें हा ताम्रपट विशेष महत्वाचा आहे. मराठीचा झालेला पूर्ण विकास परंतु संस्कृतभाषेची गोडी व अभिमान यांच्या मिश्रणानें बाहेर पडलेले उद्गार या ताम्रपत्रांत आहेत. शकु, रठकु, श्रेयमाकु, हीं अस्सल मराठी रूपें आहेत. त्याच प्रमाणें विसर्गाचा अभाव, व विलक्षण प्रयोग यावरून हि गीर्वाण भाषेस चिकटून बसण्याची दृढतर लालसा आणि मराठीचा मनावर व विचारावर बसलेला पगडा यांच्या ओढाताणीचें ही भाषा एक दर्शक आहे, असें वाटतें.

'श्री शक' या शब्दानें गैरसमज होण्याचा संभव आहे, परंतु हा भिन्न नसून शालिवाहन शक च हा आहे हें निश्चित आहे. शक ११८१ ( गत ) च्या कार्तिक शुद्ध १५ स सोमवार येतो.

या दानपत्रांत 'पूगिफल वृक्षभूमि' हा दानाचा विषय आहे. यानें जर कांहीं सूचित असेल तर तें हें च कीं ही 'भूमि' कोंकणांतील असावी व हा च तर्क पुढील विवेचनावरून खरा ठरतो. ही 'भूमि' '**मातुलिंगी**' नांवाच्या गावांतील आहे. हें गांव, व श्रीकेदारेश्वर हें दैवत, यांचा पुढें दिलेल्या विवेचनाशीं मेळ घातला म्हणजे आज संगमेश्वर तालुक्यांत **मातुलिंग** किंवा '**मावळिंग**' म्हणून जें गांव

आहे तें च हें असावें असें वाटतें. हा ताम्र- पट हि चिपळूणास च मिळालेला आहे.

' लावगन ' असा एक शब्द या दान-पत्रांत आलेला आहे ' लावगन सहित पुगी-फलवृक्षभूमि ' या वाक्यार्धाचा स्पष्ट बोध होत नाहीं.' लावगन ' हा कांहीं संस्कृत शब्द नाहीं हें उघड आहे. तेव्हां हा मराठी शब्द असावा. मराठींत समानोच्चार, ' लाग-वण ' असा आहे. तो येथें इष्ट आहे कीं काय न कळे. या नांवाचें एक गांव हि संगमेश्वर तालुक्यांत आहे. परंतु या शब्दाचा कोणता अर्थ येथें इष्ट आहे तें मला सांगतां येत नाहीं.

येथें दान देणारा '**पुलुदाडाहुतर**' या नांवा चा ' ठकूर ' ( ठाकूर ) जातीचा श्रीबप्पदेवाचा सर्वदंडाधिपति ( सेना-ध्यक्ष ) होता. ' पुलुदाडा हुतर ' हें का य नांव आहे याची कल्पना होत नाहीं. या नांवातील पु, लु, दा, डा, आणि त, र, हीं अक्षरें स्पष्ट व सुवाच्य आहेत,' हु ' बद्दल थोडा संशय आहे; तेव्हां ठाकूरज्ञातींत हें अथवा असें एखादें नांव असतें किं नाहीं हें ठरविणें वाचकांवर च सोंपविलेलें बरें ! एक गोष्ट मात्र येथें नमूद करावीशी वाटते ती ही कीं हीं अक्षरें खोदणारास एखाद दुसरें अक्षर गाळण्याची वाइट खोड होतीशी दिसते; उदाहरणार्थः--दुसऱ्या पत्र्याच्या समोरील बाजू वरील १७ वे ओळींत '**गोपालदे**' याचे ऐवजी '**गोलदे**' इतकें च खोदलेलें आहे. तसें च या च पत्र्याच्या मागील बाजूवरील २१ वे ओळींत '**नारण**' येवढें च खोदलें आहे, कदाचित हा शब्द ' नारायण ' असेल. 'नारण' च नसेल असें हि म्हणवत नाहीं.' पुलुदाडाहुतर ' हें काय नांव होतें याबद्दल मला निश्चय होत नाहीं.

प्रस्तुतच्या ताम्रपत्रावरून चालुक्य वंशीय श्रीबप्पदेवा संबंधी विशेष अशी कांहीं च माहिति मिळत नाहीं. जी काय मिळते ती एवढी चः--हा कलियुगांतील कर्णाच्या वंशांतील होता, महामण्डलेश्वर असून पञ्चमहाशब्दांचा अधिकारी होता, ( हे पञ्चमहाशब्द म्हणजे शृङ्ग, शङ्ख, भेरी, विजयघंटा व तम्मट हीं होत ), तसें च केदारेश्वराचा हि उपासक होता व म्हणून त्यास 'महामाहेश्वर' हें उपपद अन्वर्थ होतें. याचा ध्वज चालुक्यांच्या परंपरेस अनुरूप असा सुवर्णवराहानें लांछित होता. तेव्हां अवांतर माहितीवरून या बप्पदेवाचा कांहीं निश्चय करतां येतो कां पाहूं. असें करण्या-पूर्वीं केवळ मराठी वाचकांकरितां चालुक्य वंशाची अगदीं थोडक्यांत संगतवार अशी माहिति देतों म्हणजे प्रस्तुच्या बोप्पदेवाचा ही बोध सुकर होईल.

चालुक्य हे एक पूर्वकालीन व दुसरे उत्तरकालीन. पूर्वकालीन चालुक्यांचा उदय शक ४९७ चे पूर्वीं होऊन त्यांचा अस्त शक (६७५।)६९७ मध्यें झाला. उत्तरकालीन चालुक्यांचा उदय शक ८९५ चे सुमारास होऊन त्यांस शिलाहारांच्या साहाय्यानें कलचूरीनें शक ११११ मध्यें हतवीर्य केलें. या चालुक्यांपैकीं कोणी कोणी जरी जैन-मतानुयायी होते तरी हे बहुधा वैदिक धर्माभिमानी होते; परंतु यांच्या राजवटींत वैदिक धर्मास जरी उत्तेजन मिळालें तरी भिन्न दर्शनांवर ही त्यांची समदृष्टी होती. यज्ञांस थारा मिळाला, संस्कृताचें पुनरु-ज्जीवन झालें; आणि विशेष महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे ही कीं १७ वे शतकांत ब्राह्मणांनीं जी राजकारणपटुता व जें क्षात्रतेज प्रकट केलें, त्याचीं अर्वाचीन कालीन बीजें जशीं यादवांचे राजवटींत तशीं च या चालुक्यांचें राजवटींत ही दृग्गो-चर होतात. तेव्हां या महाराष्ट्रीय क्षत्रिय-कुलाचें थोडक्यांत चरित्र-मराठी वाचकां-करतां-देणें अप्रस्तुत होणार नाहीं, अशा भावनेनें तिकडे वळतों:—

पूर्वकालीन चालुक्यांचा तिसरा पुरुष जो **पुलकेशी** यानें कलादगी जिल्ह्यांतील **बदामी** येथें गादी स्थापिली. त्याचा मुलगा **मंगलीश** यानें 'चेदी' देशांतील '**त्रिपुर**' येथील **कलचूरि** यांचा पराभव केला व त्यांस माण्डलिक केलें. ही गोष्ट विशेषतेनें सांगण्याचें कारण हें च कीं याच कलचुरी वंशांतील एकानें पुढें या अपयशाचा सूड चालुक्य वंशावर घेतला आहे.

मंगलीशाचा पुतण्या दुसरा **पुलकेशि** हा अत्यंत पराक्रमी होता. यानें **बनवासीचे कदम्ब, चेरांतील** ( म्हैसूर ) **गङ्ग, मलबारावरील** अलूप, यांस पादाक्रान्त केलें. कोंकणांतील '**पुरीचे**' मौर्य, लाटचे राष्ट्रकूट, माळवा, व गुर्जर यांस यानें सामन्त बनविलें; कनोजच्या **हर्षवर्धाचा** मोड केला; **कोसल** व **कलिंग** यास वचकून असत. **चोल, पांड्य** व **केरल** हे त्याचें मित्रत्व संपादून होते. याप्रमाणें हा चालुक्य पुलकेशी महाराष्ट्राचा महापराक्रमी असा प्रथम सम्राट् झाला.

याचा धाकटा भाऊ **विष्णुवर्धन** ( विषमसिद्धि ) हा सातारा व पंढरपूर या प्रांतांवर देखरेख करी; यास च पुढें 'कृष्णा' व 'गोदावरी' यांच्या अंतर्वेदीतील वेङ्गी या प्रांतावर राज्य करण्यास **पुलकेशीन्** यानें नेमिलें व तिकडे त्यानें चालुक्यांची निराळी च एक गादी स्थापन केली.

याचा दुसरा भाऊ **जयसिंह** यास त्यानें **नाशिक** कडील भागावर नेमिलें. तसें च आपला सर्वांत वडील मुलगा जो चंद्रादित्य त्यास **सांवतवाडी** कडे नेमिलें. दुसरा मुलगा **आदित्यवर्मा** हा 'कृष्णा' व 'तुंगभद्रा' यांच्या अंतर्वेदीवर हुकमत चालवीत होता.

या बलाढ्य सम्राटामागून त्याचा दुसरा मुलगा **विक्रमादित्य** हा गादीवर आला. हा नांवाप्रमाणें च प्रतापसूर्य होता. यानें आपला भाउ पूर्वोक्त **जयसिंह** याच्या हुकमतींतील नाशिक भागास लाट प्रांत हि आणखी जोडला. या जयसिंहानें हि लाटदेशाकडे चालुक्यांची एक स्वतंत्र शाखा स्थापन केली.

विक्रमादित्यानंतर, विनयादित्य, विजयादित्य, विक्रमादित्य २ रा, आणि कीर्तिवर्मा २ रा, असे राजे झाले. शेवटचा जो कीर्तिवर्मा याचा राष्ट्रकूट **दन्तिदुर्ग** यानें पराभव केल्यानें चालुक्यवंश महाराष्ट्रास व त्या बरोबर च साम्राट्पदास मुकला. याप्रमाणें पूर्वकालील चालुक्यांचे हातून शक $\frac{६९७}{६७५}$ चे सुमारास महाराष्ट्र गेलें.

हें गेलेलें सम्राट् पद अथवा महाराष्ट्र या च कुळांतील **तैलप्प** यानें मिळविलें. यानें राष्ट्रकूट वंशाचा (कक्कल) पाडाव करून कीर्तिवर्म्याचें लांछन धुवून काढलें (शक सुमार ८९५). हा तैलप्प चालुक्य वंशीय खरा, परंतु या वंशास इतिहासांत उत्तरकालीन चालुक्य वंश म्हणण्याचा प्रघात आहे. या वंशाची गादि **कल्याणपुर** येथें होती. या उत्तरकालीन वंशातील शेवटचा दुसरा **तैलप** यास त्याचा दण्डनायक जो **बिज्जल** कलचूरी यानें **कोल्हापूरच्या विजयार्क** नांवाच्या शिलाहारास मदत घेऊन व तैलंगणांतील **प्रोलराज** कैकट याच्या साह्यानें पराभूत केलें. बिज्जलाची व्यवस्था त्याचा मेहुणा **बसव** यानें कशी लाविली तें इतिहासप्रसिद्ध च आहे. स्वामिद्रोहास योग्य तें च प्रायश्चित्त त्यास मिळालें. शिलाहारांस चालुक्यवंशाचें च साहाय्य घेऊन देवगिरीच्या यादवांनीं हतबल केलें. या प्रमाणें महाराष्ट्रांत चालुक्य, कलचूरी, व शिलाहार यांस क्षीणबल करून देवगिरीचे ( ? ) यादव प्रबल झाले. असो.

२ रा तैलप्प याचा त्याच्या च दण्डनायकानें पराभव केल्यावर तो '**कल्याणी**' अथवा **कल्याणपुर** सोडून धारवाडाकडे **अण्णिगिरी** येथें गेला, तेथें हि बिज्जलानें

त्यास चैन न पडूं दिल्याकारणानें तेथून तो **बनवासी**स गेला. ही गोष्ट १०८४ शकाचे सुमाराची आहे. कृतघ्न बिज्जलास शासन करण्याचा प्रयत्न तैलप्पाचा इमानी सेनापति **ब्रह्म** अथवा **बम्म** यानें केला; परंतु यादवांनीं त्यास नामोहरम केल्याकारणानें चालुक्यांचा प्रतापसूर्य कायमचा च अस्तंगत झाला. शक **१११** चा सुमार.

पुरी येथील शिलाहारांचा वर उल्लेख आला च आहे. कऱ्हाड, कोल्हापूर, गोंवा, वगैरे दक्षिण कोंकणावर अमल चालविणारी ही एक यांची शाखा होती. तिचें मुख्य ठिकाण प्रथम **खारेपाटण** व नंतर **पन्हाळा** होतें. शिलाहार **भोज** यानें दोनी शाखा एक करून सर्व कोंकण आक्रमण केलें परंतु **सिंघण** यादवानें यास हतवीर्य केलें. शक ११२७ चा सुमार.

यादवांनीं जो हा शिलाहारांचा पराभव केला व त्यांस बहुतेक निःसत्त्व केलें, या त्यांच्या प्रयत्नांत चालुक्यांच्या जीव धरून असलेल्या एका शाखेनें, मग ती लाट देशाकडील म्हणजे नाशिकाकडील असो अथवा वेङ्गी कडील असो (माझ्या समजुतीनें ही दक्षिणेकडील च असावी हें पुढील दिलेल्या विवेचनावरून स्पष्ट हि होईल) मदत केली असावी व त्यामुळें पारितोषिक म्हणून शिलाहारांचें कोंकण त्यांस मिळालें असा एक तर्क होतो.

या तर्कास पोषक असें प्रस्तुतच्या ताम्रपत्राच्या व या च वंशांतील शक ११८२ तील, म्हणजे प्रस्तुत दानपत्रानंतर एक वर्षानें दिलेल्या दानपत्राच्या आधारानें केलेलें पुढील विवेचन आहे.

प्रस्तुत दानपत्रांत श्रीबप्पदेव यास जीं विशेषणें दिलीं आहेत त्यांवरून दोन गोष्टी निःसंशय सिद्ध होतात. तीं 'कल्याण पुरवराधीश' व 'रिपुरायसाहसमल्ल' हीं विशेषणें होत. या दोन विशेषणांवरून हा श्रीबप्पदेव उत्तरकालीन चालुक्यवंशांतील होता हें स्पष्ट होतें; कल्याणपुर ही राजधानी उत्तरकालीन चालुक्यांची च होती व ती ८९५ शकानंतर. तसें च साहसमल्ल, जगदेकमल्ल, त्रिभुवनमल्ल ह्या व अशा च पदव्या पूर्वकालीन चालुक्य कधीं हि धारण करीत नसत. परंतु त्या उत्तरकालीन चालुक्य मात्र धारण करीत असत. तेव्हां हा बप्पदेव शक ८९५ चे नंतरच्या उत्तरकालीन चालुक्य वंशांतील आहे, इतकें स्पष्ट होतें. आतां दुसरें एक विशेषण या दानपत्रांत आहे. तें 'कलिकर्णान्वयसंभूत' हें होय. या वरून 'कल्याणपुरवराधीश्वर' ज्यास म्हणतां येईल अशा कलियुगांतील **कर्ण** नांवाच्या चालुक्यांच्या वंशांत हा बप्पदेव उत्पन्न झाला होता. या कर्णराजाचा शोध थोडासा इतिहासांत जो लागतो तो असाः—

कै. बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांनीं कोल्हापुरच्या आसपास मिळालेले कांहीं शिलालेख प्रसिद्ध केले आहेत. त्यांत एक **कर्णान्वय सोमेश्वर** चालुक्याचा आहे (पहा बां. ब्रँ. रा. ए. सो. ज. व्हा. ३), त्या शिलालेखांत जी वंशावळ दिली आहे ती अशीः—

कर्ण
|
वटुगी
| |
सोमदेव सोमेश्वर

यांत शकाचा कोठें हि उल्लेख नाहीं; तथापि एक दोन गोष्टींच्या साहाय्यानें आपणांस यांच्या कालासंबंधी कांहीं कयास बांधतां येतो. तो असा.

हल्लींच्या ताम्रपत्रावरून व पूर्वोक्त शिलालेखावरून हा कर्ण उत्तरकालीन चालुक्य होता; म्हणजे शक ८९५ नंतरचा हा होता हें अगदीं स्पष्ट आहे. आतां या कर्णान्वयांतील प्रस्तुतचा बप्पदेव हा आहे.

याचा काल शक ११८१ चा व तत्पूर्वीचा आहे. कारण शक ११८२ मधील जो एक ताम्रपट कै० बाळ गंगाधर शास्त्री यांनीं प्रसिद्ध केला आहे; तो चालुक्य कांम्वदेव याचा आहे. तेव्हां श्रीबप्पदेवाचा अवतार शक ११८१ मध्यें च संपला हें उघड आहे. मरणानें च तो संपला असें जर गृहीत धरलें आणि त्यावांचून दुसरा तर्क करण्यास कांहीं आधार हि नाहीं, तर श्रीबप्पदेवाचा काल शक ११६१–११८१ असा ठोकळ मानानें धरण्यास हरकत नाहीं. तेव्हां ८९५ पासून ११६१ पावेतों २६६ वर्षांची च काय ती व्यवस्था लावावयाची आहे, परंतु शक ११११ पावेतों कोण राजे होऊन गेले हें आपणांस माहित आहे. तेव्हां शक ११११ ते ११६१ अशा पन्नास वर्षांची च काय ती व्यवस्था लावावयाची आहे. उपरिनिर्दिष्ट शिलालेखांत कर्णाची जी प्रशस्ति आहे तींत ' चालुक्यकुल–कमल-कलिका–विकासभास्कर ' असें एक विशेषण आहे. प्रशस्तीमधील विशेषण अन्वर्थ नसतें असें नाहीं, तेव्हां चालुक्यकुलाचा विकास करणारा हा कर्ण होता येवढें म्हणण्यास हरकत नाहीं; विकास होण्यास पूर्व स्थिति कोमेजण्याची हवी ती या कुलास शक ११११ चे सुमारास आली. तेव्हां शक ११११ नंतर केव्हां तरी या कर्णानें या आपल्या कुलाचा विकास केला होता. आतां तो कोणते प्रसंगीं यावद्दल ही थोडासा तर्क करूं.

वर प्रथम निर्दिष्ट केलेल्या प्रस्तरलेखांत असें वर्णन आहे कीं कल्याणपुराचा कर्ण यानें कोंकणांत संगमेश्वरीं गादी स्थापिली. भोज शिलाहारानें तर सर्व कोंकण स्वाधीन केलें होतें, असें आपण वर पाहिलें च आहे, तेव्हां त्याची व्यवस्था लाविल्यावांचून कल्याणीच्या कर्णास संगमेश्वरीं गादी कशी स्थापितां यावी? या गोष्टीचा निर्णय करणें म्हणजे च आपल्या शकेचें समाधान होणें आहे. आतां शक ११११ नंतर शिलाहारांचा भोज जो हतवीर्य झाला तो शक ११२७ मध्यें. कारण तो हतवीर्य होईपावेतों शिलाहारावाचून कोकणांत इतरांस महामण्डलेश्वर होणें शक्य च नव्हतें. तेव्हां शक ११२७ चे सुमारास कर्ण कोंकणांत संगमेश्वरीं आला असावा, व त्यास तसा येऊं देण्यास शिलाहारास पराभूत करणारा जो यादव, त्यास त्यानें भोजाविरुद्ध मदत केली असावी हें च अधिक संभवनीय आहे.

या वरून कर्णाचा शक ११२७ चा काल असावा असें वाटतें; या शकाच्या सुमारानें वर दिलेली वंशावळ जर आपण मांडली तर ती फारशी चुकेल असें वाटत नाहीं. कर्णाचा काल ठोकळ मानानें आपण काढला व त्याचे वंशांतील श्रीबप्पदेवाचा हि निश्चिततेनें माहित झालेला आहे. तसें च कर्णानंतर कोण कोण पुरुष झाले हें हि आपणांस विदित आहे. ते चार आहेत.

तेव्हां शक ११२७ पासून शक ११८१ पावेतों म्हणजे सुमार ५० पन्नास वर्षांचे अवधींत आपणांस जे चार चालुक्य कर्णवंशीय राजे माहित झाले आहेत, त्यांची व्यवस्था त्या कालावधींत लावली म्हणजे झालें. तेव्हां ज्ञात शका पासून अज्ञात शकाकडे जर आपण उलटे गेलों तर वंशावळ अशी:–

श्री बप्पदेव ११६१–११८१
श्री सोमदेव ११४१–११६१

येथें सोमेश्वर व सोमदेव हे बंधु असल्यानें दोघांची हि एक च पिढी धरली आहे.

श्री वेटगीदेव ११२१–११४१
श्री कर्णदेव ११००–११२१

हा काल अज्ञात असल्यानें यांत ६ वर्षांची चूक पडते. ती कदाचित् निघण्यासारखी हि आहे. यावरून एक गोष्ट मात्र निश्चित अशी घ्यावी लागते ती ही कीं श्रीबप्पदेव हा श्रीसोमेश्वरा नंतर च मस-

नदनशनि झाला असला पाहिजे कारण राजांच्या संख्येचे मानानें काल इतका थोडा आहे कीं त्यांत नेहमींच्या पिढीच्या कालानुरोधानें जास्त पिढीचा मुळीं समावेश च होणें अशक्य होत आहे. शक १११५ या ज्ञात कालांत सोमेश्वर ४ था हा होता. तेव्हां ११२७ तील कर्ण हा कदाचित् सोमेश्वराचे मागून लागला च झाला असावा. येथपर्यंत जें मीं विवेचन केलें आहे तें आजपर्यंत या वंशाबद्दल उपलब्ध असलेल्या माहितीचा उपयोग करून जरी केलें आहे तरी त्यास सर्वांशीं तर्काचें च स्वरूप आहे व यामुळें कित्येक गोष्टी जरी गृहित धरून मला चालावें लागलें हें खरें तथापि साधनाभावीं हा तर्क विशेष ग्राह्य वाटतो म्हणून तो येथें नमूद करणें इष्ट वाटलें.

एक गोष्ट येथें पूर्वीं सांगण्याचें मी विसरलों ती ही कीं सोमेश्वरकालीन शिलालेख जो प्रसिद्ध झालेला आहे; त्याची लिपि १२ वे शतकांतील लिपीप्रमाणें च असल्यानें सोमेश्वराचे कालाचा व त्यावरून सोमेश्वराचा आजा जो कर्ण त्याचे कालाचा जो निर्णय आपण वर केला त्यास एक प्रकारें हा प्रत्यंतर पुरावा च होत आहे. असो.

या ताम्रपत्रांत पहिल्या पत्र्याचे ८ वे ओळींत ' राय धरणीवराह रायबेटकर रिपुरायसाहसमल्ल,' अशीं पदें आहेत; हीं च पदें वर जो मी प्रस्तरलेख व ताम्रपत्र यांचा उल्लेख केला आहे त्यांत हि आहेत. यांचा अर्थ कै. बाळशास्त्री यांनीं हें पंचमहा शब्द म्हणून केला आहे परंतु तो बरोबर नाहीं हें आतां अलिकडे ( कै. बाळशास्त्र्यांनंतर ) उपलब्ध झालेल्या साधनावरून स्पष्ट च होत आहे; तेव्हां यांचा अर्थ काय ? हीं पदें शक ११८२ तील काम्वदेवाच्या दानपत्रांत आहेत व पूर्वोक्त शिलालेखांत हि आहेत असें स्मरतें, तेव्हां कर्णापासून हीं उपपदें हा वंश धारण करीत होता असें गणण्यास हरकत नाहीं. पण त्यांचा अर्थ काय ?

यांचीं पदें कै. शास्त्रीबुवांनीं पाडलीं आहेत तीं अशीं:—

राय, धरणी, वराहराय, बेटकार, रिपुरायसाहसमल्ल. आणि अशा पदांनीं पांच ही पदांचीं संख्या निश्चित करून हे च पंचमहाशब्द असें त्यांनीं प्रतिपादन केलेलें आहे. दुसरें अनुमान म्हणजे पंचमहाशब्दाचा अर्थ ज्या अर्थीं अयोग्य, त्या अर्थीं प्रथम प्रयत्न म्हणजे वरील पदच्छेद हि योग्य च असेल असें म्हणवत नाहीं. मी अशीं पदें पाडतों.

राय, धरणीवराह, रायबेटकार, रिपुरायसाहसमल्ल.

म्हणजे हीं चार पदें आहेत. वराहलांछन ज्यांचें त्या चालुक्यांस ' धरणीवराह ' हें अलंकारिक उपपद लावणें कांहीं आश्चर्यकारक नाहीं. ' राय ' अथवा ' राव ' हें ही उपपद कदाचित् यादवांनीं यांस महामण्डलेश्वर केल्यानंतर दिलें असावें, हें हि अश्रुतपूर्व नाहीं. परंतु ' रायबेटकार ' याचा अर्थ काय ? तर्कच करावयाचा तर कल्याणीहून कोंकणांत आल्यानंतर ' रायबेट ' अथवा ' रायबाग ' कर्णराजानें वसविला म्हणून त्यास व त्यांचे वंशजांस 'रायबेटकार' म्हणतात, असा हि तो करतां येईल. परंतु येथें निश्चित असें मला कांहीं सांगणें शक्य नाहीं.

' महामाहेश्वर ' हें पद अन्वर्थक आहे असें आतां निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. राष्ट्रकूट, चालुक्य, ही मराठे क्षत्रिय मंडळी—यांच्यापैकीं जे जैनमतानुयायी होते ते वगळून—शिवोपासक होती हें परम माहेश्वर, महामाहेश्वर या पदांवरून व त्यांनीं बांधिलेल्या देवालयांवरून स्पष्ट च होत आहे.

आतां या व या कालांतील चालुक्य व यादव यांचे जे इतर ताम्रपट उपलब्ध आहेत त्यांवरून एक दोन विचार जे सामान्यतः सुचतात ते येथें नमूद करून हा लेख संपवितों.

वैय्यक्तिक गुण काय किंवा राष्ट्रीय गुण काय त्यांचा विकास कालाच्या अनुकूलतेनें व अवसराच्या साह्यानें होतो व करतां येतो. कालास अनुकूल बनविणें व अवसर उत्पन्न करणें हें कार्यकर्त्यांच्या स्वाधीन आहे कीं नाहीं, हा प्रश्न अत्यंत भिन्न व एकदेशी आहे. गुणांचा सार्वत्रिक विकास हा मात्र वर दिलेल्या परिस्थितींत च शक्य होतो.

अठरावे शतकाचे आरंभीं राज्यसूत्रें व तलवार हातांत खेळविणें ही जी ब्राह्मणांस सहज लीला झाली होती त्या लीलेचें बीं ५।६ शतकें लांबवर रुजलें गेलेलें होतें. पूर्व-परंपरा नसतां ब्राह्मण क्षात्रवृत्ति कसे बनले असें वाटण्याचें कारण नाहीं. चालुक्यांच्या मोडूं पहाणाऱ्या राजशकटास आपल्या बाहुबलाचा आश्रय देऊन किंचित् काल कां होईना त्यास स्थीरत्व आणणारा बम्म अथवा ब्रह्म हा ब्राह्मण. सिंघणाचा विजय ध्वज हातीं घेऊन सर्व महाराष्ट्रभर व महाराष्ट्रा बाहेर हि हुतुतु घालणारा खोलेश्वर व त्याचा शौर्यांत तत्तुल्य पुत्र राम हे हि ब्राह्मण च. श्रीजनलाच्या कुलांत उत्पन्न झालेला अच्युत व यादव रामचंद्रानें कोंकणावर अम्मल चालविण्यास नेमलेला श्रीकृष्णदेव हे हि ब्राह्मण च. फार काय परंतु आपल्या पराक्रमानें कदम्बासारख्या मराठ्यांस व इतर दाक्षिणात्य वीरांस खडे चारून, सौराष्ट्र, लाट, द्रविड, तेलंग, गंड, बडु, व हम्मीर यांस त्रस्त करून गोंव्या कडें इंदुलींत राहणाऱ्या देवशर्म्याचें कुल ब्राम्हणाचें च. गोंवें काबीज करणारा हरिहराचा दिवाण माधव हा ब्राम्हण आणि त्यावर नंतर अंमल चालविणारा नरहरी हा हि पण ब्राह्मण च.

तसें च श्रीबप्पदेवाचा कदाचित् परंतु काण्व चालुक्याचा निश्चयानें महामात्य **केशव महाजनी** हा ब्राम्हण. अपरादित्याचा महामात्य **भोण** हा हि ब्राम्हण (?). श्री रामचंद्र यादवाचे वेळीं एक देवपंडित नांवाचा ब्राह्मण च महामात्य होता. हेमाद्रि संबंधीं तर त्याचा निर्देश न करतां हि त्याचें स्मरण होतें.

अशा या बुद्धि व बाहुबल शाली ब्राह्मणांची परंपरा पाहिली व तिचा विचार केला म्हणजे कालाच्या एका विविक्षित भागांतील, ब्राम्हणांच्या कर्तृत्वाचें आपणांस कौतुक न वाटतां तसलें कर्तृत्व हें जन्मसिद्ध च असल्यानें ब्राह्मणांस तें सहज च आहे अशी बुद्धि होते व त्याचा अभाव हा मात्र विस्मयास कारण होतो.

या वरून आणखी हि एक गोष्ट लक्षांत येते. स्वबुद्धीनें अथवा परबुद्धीनें आज ब्राह्मणांत कऱ्हाडे, कोंकणस्थ व देशस्थ असा भेद करून परस्परांच्या अंगीं असलेल्या गुणावगुणांसंबंधीं स्वबुद्धीनें अथवा परबुद्धीनें अभिमान अथवा मत्सर, उपहास इत्यादि विकारांस आपण बळी पडतों तो आगांतुक आलेला अथवा बुद्धिपुरःसर केलेला भेद पार विसरून जाऊन बुद्धिबल काय किं बाहुबल काय सर्व च ब्राह्मणांस तें निसर्गसिद्ध च आहे अशी समबुद्धि जर आह्मां सर्वांत बाणली तर किति मौज होईल ! असो. यादव व चालुक्य यांच्या अर्वाचीन ताम्रपत्रांवरून व विशेषतः श्रीबप्पदेव चालुक्याच्या केशव महाजनी नामक महामात्याचे योगानें स्मरण होऊन वरील विचार नमूद केले आहेत.

गो. का. चांदोरकर

आतां प्रस्तुत ताम्रपत्रावरून गोत्रासंबंधी जो चमत्कार दिसतो तो इतर तत्कालीन ताम्रपत्रांतील समान उल्लेखाशीं ताडून त्यावरून काय निदर्शनास येतें तें पाहूं.

प्रस्तुतचें दानपत्र ११ ब्राह्मणांचा नामनिर्देश करतें. या ब्राह्मणांचीं जीं अडनांवें दिलीं आहेत त्यावरून ज्यांस आज आपण कोंकणस्थ व कऱ्हाडे म्हणतों त्या दोन्ही स्थलपरत्वें बनलेल्या भिन्न पोटजातींच्या ब्राह्मणांस तें दिलेलें आहे असें उघड होतें. तीं अडनांवें-प्रचलित पद्धतीस अनुसरून त्यांस मी अडनांवें म्हणतों-व त्यांचीं गोत्रें अशीं:--

| अडनांव | गोत्रें |
|---|---|
| प्रभु देसाई ... ... | गौतम |
| घैशास ... ... | गौतम व अत्रि |
| भानु ... ... | गार्ग्य |

यांत 'क्रमैत' असा एक शब्द नांवापुढें आलेला आहे; कदाचित् हें हि अडनांव असावें असें वाटण्याचा संभव आहे, परंतु तसें तें अडनांव नसून कदाचित् जटापाठी, घनपाठी हीं जशीं विद्येचीं प्रावीण्यसूचक उपपदें आहेत तद्वत 'क्रमा' पावेतों ज्याचें अध्ययन झालें तो 'क्रमैत' असावा असें वाटतें. याबद्दल पुढें हि उल्लेख होईल च.

अशीं हीं अडनांवें व गोत्रें या ताम्रपत्रांत आलीं आहेत तशीं फार थोड्या ताम्रपत्रांत आलीं असतील अशी माझी समजूत आहे कारण ज्या एक दोन दानपत्रांचा मी पुढें उल्लेख करीत आहे त्या खेरीज इतरत्र तसा उल्लेख ताम्रपत्रांत अगर प्रस्तरलेखांत झालेला माझ्या आढळण्यांत नाहीं.

हीं दुसरीं दानपत्रें एक शक ११७१ मधील कृष्ण अथवा कन्हरदेव यादवाचें व दुसरें प्रस्तुनच्या दानपत्रानंतर सुमार एक वर्षानें च म्हणजे शक ११८२ मधील कामदेव चालुक्याचें. हीं दोन व वर दिलेलें प्रस्तुतचें दानपत्र यांचा जर संकलित विचार आरंभ केला तर असें दिसतें:-

| अडनांव | गोत्रें |
|---|---|
| १ प्रभु देसाई ... | गौतम व भारद्वाज |
| २ घैशास . . ... | गौतम, अत्रि, काश्यप, भार्गव, भारद्वाज, वत्स व कौशिक |
| ३ पट्टवर्धन ... ... | वासिष्ठ, अत्रि, अगास्ति, हारीत, शांडिल्य, भारद्वाज, गौतम, काश्यप, विष्णुवृद्ध व भार्गव |
| ४ भानु ... | गार्ग्य |
| ५ उपाध्याय ... | अत्रि, शांडिल्य, वासिष्ठ-मैत्रावरुण-कौंडिण्य, मौद्गल्य, हारीत |
| ६ पाठक ... | कौशिक, वासिष्ठ, काश्यप |
| ७ घळशे ... ... | काश्यप, वासिष्ठ, कौशिक, विश्वामित्र, मूक, शांडिल्य, शौनक, गौतम, वत्स, भारद्वाज व अत्रि |

या शक ११७१ चे ताम्रपत्रांत 'पट्टवर्धन' यास क्रमैत असें म्हटलें आहे तेव्हां 'क्रमैत' कांहीं अडनांव नाहीं. पट्टवर्धन हि कदाचित् अडनांव नसून धंद्याचें दर्शक नांव असलें तरी हि मी जी शंका पुढें मांडीत आहे तिला बाध येत नाहीं.

वर दिलेलीं अडनांवें व गोत्रें यांचा पडताळा प्रचलित असलेल्या गोत्रावळीशीं घेतला तर

| | |
|---|---|
| प्रभु हे | फक्त वासिष्ठ व जामदग्नि गोत्री आहेत. |
| घैशास ... ... | भारद्वाज " |
| पट्टवर्धन... ... | काश्यप, कौंडिण्य व जामदग्नि |
| उपाध्याय... ... | अत्रि, शांडिल्य, काश्यप व जामदग्नि |
| घळशे ... ... | |

तेव्हां आतां प्रश्न असा उद्भवतो कीं संशयित असें जें 'पट्टवर्धन' हें अडनांव तें सोडून दिलें तरी बाकीच्या अडनांवांस हल्लींपेक्षां शक ११।१२ शेंत इतकीं जास्त गोत्रें आलीं कोठून व तीं तशीं आज कां नाहींत ? कदाचित् कालमानानें आज उपलब्ध न होणारीं त्या गोत्रांचीं तीं अड नांवें लुप्त झालीं असावीं असे कोणी ह्मणेल तर तें बरोबर होणार नाहीं. कारण, शक ११८१ चे कार्तिकांत जीं भिन्न गोत्रांचीं अडनांवें होतीं तीं च शक ११८२ च्या पौषांत नामशेष होतील असें प्रतिपादन करणें विचारास सोडून होईल, परंतु या १२।१४ महिन्यांत व एका च अडनांवाच्या गोत्रांत फरक तर फार मोठा दिसतो. तेव्हां असल्या या भिन्नतेचें काय कारण असावें तें संशोधकांनीं शोधून काढणें अवश्य आहे. तशांत वसिष्ठ–मैत्रावरुण–कौंडिण्य असलीं एका च अडनांवाचीं **तिजोड** गोत्रें तर हल्लीं अश्रुतपूर्व आहेत. तेव्हां हा काय चमत्कार आहे ?

गोविंद काशीनाथ चांदोरकर

पत्रा १ ला

(१) ॥ ॐ श्री भैरवायनमः ॥ स्वस्ति श्री शक ११८१ वर्षे सिद्धार्थ संवश

(२) रे कार्तिक सुद्ध १५ सोमे ॥ अद्येह समधिगतपंचमहाशब्द म

(३) हामंडलेश्वर कल्याणपुरवराधीश्वर कलियुगकर्णान्व

(४) यप्रसूत । चालुक्यकुळकमल-कलिकाविकासभास्कर

(५) सुवर्णवराहलांछनध्वज । सत्य-रत्नाकर । शरणागतवज्रपं

(६) जर । महामाहेश्वर । महेश्वरदेव-चरणप्रसादनाराधनोप

(७) चारादवाप्त परमराज्येश्वर ॥ श्री केदारदेवपदपंकजभ्रम

(८) र । राय धरणीवराह । रायवेट-कार । रिपुरायसाहसम

(९) ल्ल श्रीयपदेवराय विजय ० राज्यो । दैतत्पादपदुमोप

पत्रा २ रा बाजू १ ली

(१०) जीवी । सर्वदंडाधिपति । चालु-० क्यराय स्थापनाचार्य पुलुदा

(११) ढा हुतर ठकुरेण प्रसादप्राप्तो ग्रामः मातुलिंगी नामधे

(१२) यो सोमपर्वणि परमया भक्त्या महाधार्मिकेण भूत्वा

(१३) सोपरिकर दंडदोषमार्गणस-हितः । गौतमगोत्रा

(१४) य नाना द्विजातिसहिताय । वासुदेवप्रभवे हस्तोद

(१५) केन प्रदत्तः तत्र वासुदेवप्रभवे पूगिफलविक्षभू

(१६) मि २७५ तद्गौतमगोत्रस्य विष्णु घैशासस्य पूगी

(१७) फलविक्षभूमि ३०० तद्गौतम-गोत्रस्य गो (पा) ल दे

(१८) व घैशासस्य पूगीफलविक्षभूमि २७५ तद्वासिष्ठ गो

(१९) त्रस्य पद्मनाभस्य पूगीफल-विक्षभूमि १२५ तद्गार्ग्य

(२०) गोत्रस्य भानोः पूगीफलविक्ष-भूमि ३५० तद्दात्रिगो

(२१) त्रस्य नार(य)ण घैशासस्य पूगीफलविक्षभूमि ६०० तद्वा

(२२) सिष्ठगोत्रस्य गोविंद क्रमैतस्य पूगीफलविक्षभूमि १२५

(२३) तद्दात्रिगोत्रस्य कान्हु क्रमैतस्य पूगीफलविक्षभूमि २५०

(२४) तद्गार्ग्य गोत्रस्य नागदेवस्य लागवनसहित पूगीफल

(२५) विक्षभूमि १०० तद्वासिष्ठ ० गोत्रस्य महादेवस्य पूगी

(२६) फलविक्षभूमि २०० तद्वा ० शिष्ठ गोत्रस्य केशवस्य पूगी

(२७) फलविक्षभूमि २०० एवमेका-दश द्विजा विर्तिमंतस्य दातव्यं । या

( २८ ) मोयमात्रान्वयसंभूतराज्ञा अपरेण वा धार्मिकेण भूत्वा पा

( २९ ) लनीय । यथा दाता श्रेयभाकु पालकोपि भविष्यति बहुभिर्व

( ३० ) सुधा दत्ता राजाभिः सगरादिभिः यस्य यस्य यदा भूमिस्तस्यत

( ३१ ) स्य तदाफलं । स्वदत्त परदत्तं वा यो हरेत्य वसुंधरा । षष्ठिर्वर्षसह

( ३२ ) स्राणि विष्टायां जायते क्रिमिः । क्रिमियोनिं ततो गत्वा चांडालेत्वे

( ३३ ) भिजायते । हिरण्यमेकं यामेकां भूम्यामप्येकमंगुलं । हरं न

( ३४ ) रकमायांति यावदाभूत संप्लवं । न विषं मिषमित्याहु ब्रह्मस्वं विष

( ३५ ) मुच्यते । विषमेकाकिनो हंति ब्रह्मस्वं पुत्रपौत्रिकम्

गोविंदेना लख्यते

( पहिल्या पत्र्यावर )

( १ ) मद्वंशजातः परवंशजातः पापादपेत मनसो भुविभारभूताः

( २ ) ये पालयंति मम धर्ममिदं हि सर्वं तेभ्यो मया विरचितोञ्जलिभृभ्रिरेषा

(पत्रा १ ला तर्जुमा)

( १ ) ॐ श्री भैरवास नमस्कार असो॥ स्वस्ति श्री शक

( २ ) ११८१ सिद्धार्थ संवत्सर कार्तिक शुद्ध १५ सोमवार या दिवशीं ज्याचा मान पंचमहाशब्दांचा आहे,

( ३ ) जो महामण्डलेश्वर आहे, कल्याणपुराचा अधीश्वर, कलियुगांतील कर्णाच्या

( ४ ) वंशांत ज्याचा जन्म झाला आहे, चालुक्यकुल ही च कोणी कमलकलिका तिचा विकास करण्यांत जो भास्करासारखा आहे,

( ५ ) ज्याच्या ध्वजावर सुवर्णवराह आहे, जो सत्याचा केवळ समुद्र, जे शरण आले ( त्यांच्या रक्षणार्थ ) त्यांस वज्राचा जो केवळ पिंजरा,

( ६ ) जो परम माहेश्वर, श्रीशिवचरणाच्या प्रसादानें व आराधनानें

( ७ ) ज्यास मोठें राज्यैश्वर प्राप्त झालें आहे,. श्रीकेदारेश्वरांच्या चरणकमलीं केवळ भ्रमराप्रमाणें जो दंग,

( ८ ) राय, धरणीस वराहाप्रमाणें आश्रय देणारा, रायबेटाची वसाति ज्यानें केली, रिपूंच्या ठिकाणीं साहस दाखविण्यांत पुढें,

( ९ ) असा जो श्रीबप्पदेवराय, तो राज्य करीत असतां त्याच्या चरणप्रसादानें उपजीविका करणारा,

( १० ) सर्व सेनेचा अधिपति, चालुक्यांच्या संस्थापनेंत अग्रणी असा

**( ११ ) पुलुदाडा हुतर** जो **ठाकुर** त्यानें स्वतःस राजाच्या प्रसादानें प्राप्त झालेलें गांव जें **मातुलिंगा** नांवाचें

( १२ ) तें सोमपर्वणी आली असतां मोठ्या भक्तीनें व स्वतः धार्मिक होऊन,

( १३ ) तदंगभूत वस्तूंसह व तेथें घडणाऱ्या अपराधांचा सुगावा लाऊन त्याबद्दल शासन करण्याच्या अधिकारासह, गौतमगोत्री जो

( १४ ) **वासुदेव** प्रभु ( देसाई ) त्यास इतर ब्राह्मणांसह हस्तोदक

( १५ ) देऊन दान केलें आहे. तें असें:—वासुदेव प्रभू यास २७५ सुपारीच्या झाडांची लागवड हो

( १६ ) ण्यास लागणारी भूमि, गौतमगोत्री

( १७ ) विष्णु घैशास यास ३०० झाडांस लागणारी भूमि, तसें च गौतम-गोत्री गो( पा )ल देव

( १८ ) घैशास यास २७५, तसें च वसिष्ठ गोत्री

( १९ ) पद्मनाभ यास १२५, तसें च गार्ग्यगोत्री

( २० ) भानु यास ३५०, तसें च अत्रिगोत्री

(२१) नार(य)ण घैशास यास ६००, तसें च

(२२) वासिष्ठगोत्री गोविंद क्रमेत यास १२५,

(२३) तसें च अत्रिगोत्री कान्हु क्रमेत यास २५०,

(२४) तसें च गार्ग्यगोत्री नामदेव यास

(२५) १००, तसें च वासिष्ठगोत्री महादेव यास

(२६) २००, तसें च वासिष्ठगोत्री केशव यास

(२७) २००, याप्रमाणें वृत्तिवान् अकरा ब्राह्मणांस (दान) दिलें आहे. हें गांव

(२८) या कुलांत उत्पन्न होणाऱ्या अथवा इतर कुलांत जन्मणाऱ्या राजानें धर्मनिष्ठ होऊन

(२९) (दान दिलें असल्यानें तसें दान) पाळावें कारण दात्यास दान दिल्यानें जें श्रेयस् (कल्याण) प्राप्त होतें याचा अंश (तें दान) पाळणाऱ्यास हि मिळतो.

(३०) सगरासारख्या अनेक राजांनीं भूमिदान केलें आहे. ज्या कालीं ज्याची भूमि त्या कालीं त्या दानाचें फल त्यास

(३१) आपण अथवा दुसऱ्यानें दिलेल्या दानभूमीचें जो हरण करतो तो ६० हजार वर्षें

(३२) नरकीं जंतु होतो. त्या योनीचा त्याग केला ह्मणजे मग तो

(३३) चांडाळ होतो, एक हिरण्य, अथवा एक गाय किंवा एक बोटभर भूमि जो हरण करतो तो

(३४) प्रलय होईपावेतों नरकांत पचतो. विष हें कांहीं खरें विष नव्हे, ब्रह्मस्व हें खरें विष

(३५) आहे. विष घेणारास एकट्यास मारतें परंतु ब्रह्मस्व हें विष पुत्रपौत्रांसह नाश पाववितें.

गोविंदानें लिहविलें.

(पहिले पत्र्यावर)

(१) (२) माझ्या अगर परांच्या वशांत जो उत्पन्न झाला आहे, पापापासून ज्याचें मन परावृत्त झालें आहे, भूमीचे ठिकाणीं ज्याचे जन्मण्यानें केवळ भार च झाला नाहीं व जो माझ्या या धर्माचें (दानाचें) पालन करतो, त्यास हा माझा बद्धांजली नमस्कार असो.

---

# गतवर्षांतील संशोधनवृत्त

## राघोबादादा यांचे हस्तक नरसिंगराव गोविंद बोंधले

---

## बोंधले घराण्याची पूर्वपीठिका

१ पंढरपुरापासून २।३ मैलांच्या अंतरावर चंद्रभागा नदीच्या कांठीं उंबरे अथवा भटउंबरे या नांवाचें एक खेडें आहे; तेथील पाटील बोंदले या नांवाचे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण आहेत. पंढरपूर येथें जुने ऐतिहासिक कागदपत्रांचा शोध करीत असतां भटउंबरे येथें गोविंदपंत बुंदेले यांचे वंशज आहेत, व त्यांचेपाशीं बरे च ऐतिहासिक कागदपत्र आहेत, असें समजलें. ही माहिती मिळाल्यानंतर एका स्नेह्याच्या मार्फतीनें हे कागदपत्र पहाण्यास मिळतील, अशी खटपट केली; व अशा प्रयासानें त्या खटपटीस यश येऊन ते सर्व कागदपत्र पाहावयास मिळाले.

२ या घराण्याचे कागदपत्र पाहिल्यानंतर गोविंदपंत बुंदेले यांचे घराण्याशीं या घराण्याचा कांहीं एक संबंध नाहीं असें समजून आलें; परंतु गोविंदपंत बुंदेल्याशीं आपले घरण्याचा संबंध आहे, अशी जी या घरांतील विद्यमान गृहस्थाची समजूत आहे ती निव्वळ निरर्थक आहे असें बरीक ह्मणता यावयाचें नाहीं. नानासाहेब पेश-

त्यांचे कारकीर्दींत बुंदेलखंड व त्याचे उत्तरेकडील प्रदेशांत मराठ्यांची सत्ता स्थापित करण्याचे कामीं प्रामुख्यानें ज्या व्यक्तींनीं परिश्रम केले त्या व्यक्तींपैकीं बोधले घराण्यांतील गोविंदराव शिवदेव हे एक होते. या गोष्टीमुळें बोधल्याचे बुंदेले समजून गोविंदपंत बुंदेल्यांचे वंशज अशी बोधले घराण्याचे विद्यमान पुरुषानें आपली समजूत करून घेतल्याचें दिसतें.

३ बोधले यांचेकडे एकंदर ६३ कागद मिळाले त्यांचें वर्गीकरण खालीं दर्शविल्या-प्रमाणें करितां येतें.

१ वंशावळी अथवा बोधले घराण्याची बखर
२ गोविंदराव शिवदेव यांस मुधोजी भोंसले यानें दिलेलें नेमणुकीचें पत्र
३ व्यंकाजी विठ्ठल याचें नेमणुकीचें पत्र
४ नरसिंहराव गोविंद यांचे तैनातीचा जाबता
५ नरसिंहराव गोविंद मृत्यु पावले त्यांचे उत्तरकार्याप्रीत्यर्थ रक्कम खर्चास देण्याबद्दल यादी
६ लक्ष्मणराव नरसिंग यानें लिहि-लेल्या याद्या २
७ पेशव्यांचे नगरखाने कोणकोणत्या देवस्थानांत होते त्याचें टिपण व इतर किरकोळ राजकीय गोष्टींचें टिपण
७ रघुनाथ बाजीराव यांचीं पत्रें नर-सिंगराव गोविंद यांस; व देशमुख देशपांडे व देसाई यांस ताकीदपत्रें एकंदर ३६
९ नरसिंगराव गोविंद यांचीं पत्रें ३
१० दुर्गा आईसाहेब यांचीं पत्रें २
११ शिवछत्रपति यांचें पत्र १
१२ माधवराव नारायण याचें पत्र १
१३ सगाजी नरसिंह याचें पत्र १
१४ पांडुरंग रामचंद्र कुळकर्णी याचें पत्र १
१५ यशवंतराव शिंदे याचीं पत्रें २
१६ परशुराम बल्लाळ गणपुले यांचें पत्र १
१७ बाजीराव गोविंद याचें पत्र १
१८ जिवाजी अनंत फडके याचें पत्र १
१९ विठ्ठलराव शिवदेव याचें पत्र
२० गंगाधर बल्लाळ याचें पत्र १

६३

या एकंदर ६३ कागदांपैकीं ४।५ खेरीज करून बाकीचे कागद अस्सल आहेत. वरील सर्व कागदांच्या माहितीवरून नरसिंगराव गोविंद याचे पूर्वज, त्यांनीं केलेली कामगिरी, राघोबादादांचें कारस्थान व नरसिंगराव गोविंद याचें चरित्र या तीन बाबतींसंबंधीं हकीकत मीं आपणांस सादर करितों.

भटउंबरें येथील पाटील घराण्याचा मूळपुरूष जनार्दनपंत कुळकर्णी संमत मद्रकी कसबे, सगर प्रांत सुरापूर येथील राहणारा हा होय. यास ५ मुलगे होते. त्यांपैकीं रायाजी जनार्दन यानें चांगला लौकीक संपादन केला औरंगजेब बाद-शहा पंढरपूर नजीक बेंगपूर येथें असतां रायाजीनें औरंगजेबाची भेट घेतली व बादशहाकडून मनसबी मिळविली. नंतर रायाजी जनार्दन यानें पाटिलकीवतनें संपादन करण्यास सुरुवात केली; अशा प्रकारें रायाजी जनार्दन याचें वजन बरेंच वाढल्याकारणानें औरंगजेब बादशहानें त्यास रायाराव हा किताब दिला. औरंगजेब बादशहाचा काळ झाल्यानंतर दक्षिणेंत जिकडे तिकडे खोटिंगपातशाही सुरू झाली. या गर्दींत कासेगांवकर पांढरे यांनीं मोठा दंगा केला, आणि रायाजी जनार्दन याची जहागीर, वतनें, जमिनी वगैरे बळका-विल्या. रायाजीच्या मरणानंतर त्याचा भाऊ शिवराव जनार्दन यानें रायाजीचीं जहागीर, वतनें सोडविण्याचा फार प्रयास केला व तत्प्रीत्यर्थ त्यानें अतोनात पैसा दि

खर्च केला; परंतु त्या कामीं त्यास यश न येतां, तो कर्जबाजारी होऊन मरण पावला. यापुढें या घराण्यांत शिवराव जनार्दन याचा मुलगा भगवंत शिवदेव यानें बरा च नांवलौकिक संपादन केला. शिवराव जनार्दन व शाहुमहाराज या परस्परांची ओळख व परिचय असल्याकारणानें शाहुमहाराजांनीं भगवंतराव यांस कऱ्हाडदेशचे देशमुखीचा कारभार सांगितला. त्यानंतर भगवंतराव मसुरास जाऊन राहिला; व तेथें त्यानें वाडा बांधला. भगवंतराव याची वडील मुलगी छत्रपतींची पंडीतराई ज्या कालगांवकर घराण्याकडे होती, त्यापैकीं माधवाचार्य यांचे वडील पुत्र गोपाळाचार्य यास दिली. भगवंतराव याचा धाकटा भाऊ गोविंदराव शिवदेव हा होय. हा पुढें मोठ्या नांवलौकिकास चढला. भगवंतरावाचे मरणसमईं त्यास लाखों रुपये कर्ज झालें होतें त्यामुळें, त्याचे मरणानंतर, त्याचीं मुलें देशोधडीस लागलीं. शिवराव जनार्दन यांस ३ मुलगे होते. त्यांपैकीं तिसरा मुलगा नरसिंगराव शिवदेव हा हि बऱ्या च नांवलौकिकास चढला. त्याचे मामा अच्युतराव यांचे मार्फतीनें संधान बांधून त्यानें शाहुमहाराजांची सातान्यास भेट घेतली; तेव्हां नरसिंगराव यास पदरीं ठेवण्याबद्दल शाहुमहाराजांनीं सवाई बाबुराव दाभाडे यास आज्ञा केली. दाभाडे व थोरले बाजीराव पेशवे यांचेमध्यें जी मोठी लढाई झाली तींत नरसिंगराव शिवदेव जखमी होऊन मरण पावला.

औरंगजेबाचे मरणानंतर पंढरपुरकडील प्रदेशांत पांढरे यांनीं आपला अंमल बसविल्याचें वर नमुद केलें आहे च. पांढऱ्याचा अंमल दूर करून त्याठिकाणीं आपला अंमल बसविण्याकरितां पेशव्यांनीं साबाजी शिंदे व रामचंद्र हरि पटवर्धन यांची नेमणूक केली. त्यांचेबरोबर गोविंदराव शिवदेव याचे पथकाची हि त्या कामगिरीवर नेमणूक झाली. साबाजी शिंदे, पटवर्धन वगैरे मंडळींनीं पांढऱ्यांचा मोड करून, पंढरपूरकडील प्रदेशांत पेशव्यांचा अंमल सुरू केला. या कामीं गोविंदराव शिवदेव यानें चांगली मदत केली. या प्रांतांत असतां गोविंदराव शिवदेव यानें त्याचें वडिलार्जित पाटिलकीवतन सावकाराकडे गहाण होतें तें सोडविलें. पांढऱ्याचा मोड झाल्यानंतर त्या कामगिरीवर नेमलेले सरदारलोक परत पुण्यास आले, त्याबरोबर गोविंदराव शिवदेव हा हि परत आला.

यानंतर नानासाहेब पेशवे, भाऊसाहेब, मल्हारजी होळकर, राणोजी शिंदे, कवडे आबाजी, यशवंतराव पवार यांनीं बुंदेलखंडावर स्वारी करण्याचें ठरविलें त्यावेळीं गोविंदराव शिवदेव यांची हि त्या कामगिरीवर नेमणूक झाली. बुंदेलखंड काबीज केल्यावर फौजा परत फिरल्या ते वेळीं नरवर, ग्वाल्हेर, पंचमहाल या प्रदेशांवर पेशव्यांनीं विठ्ठलराव शिवदेव यांची नेमणूक केली. या प्रदेशांत पेशव्यांचें एक हि ठाणें बसलें नव्हतें. नरवरच्या राजापाशीं, त्याचप्रमाणें ग्वाल्हेरकरापाशीं हि सरंजाम मोठा होता. बुंदेलखंडाहून पेशव्यांच्या फौजा दक्षिणेकडे परत फिरल्या, ते वेळीं विठ्ठल शिवदेव याचे मदतीकरितां पेशव्यांनीं गोविंदराव शिवदेव व त्याचे मामा अच्युतराव या उभयतांची नेमणूक केली. वसईचे वेढ्याचे प्रसंगीं अच्युतराव यानें चांगला नांवलौकीक संपादन केला होता, व त्या कामगिरीवर असतांना ईरकर पोंवार, सोमण घाटे, लांबे, सालसकर वगैरे मंडळींचा व अच्युतराव याचा दाट परिचय झाला होता. या सर्व मंडळींनीं बरोबर ३०० निवडक लोक घेऊन अच्युतराव व गोविंदराव शिवदेव यांचे मदतीस रहाण्याचें कबूल केलें. या मवासी प्रदेशांत शिवदेव यांनीं बरसातीचे चार महिनेपावेतों अत्यंत कष्टप्रद स्थितींत काढले. बरसात संपतां च

इटावें येथील पाटलाशीं सख्य करून त्यांनीं त्याचे गढींत आश्रयाची जागा संपादन केली. उभरशेरेकर याचेपाशीं पायदळ ५० हजार होतें. माधवसिंग उभरटी कढोलीवाला याचेपाशीं २०।२५ हजार पायदळ होतें. बुधसिंग सुभेदार, धुरीशा पोंवार, जोर यावला हे दोघे हि या प्रांतांत मोठे वजनदार जमींदार होते. या सर्वांचें सख्यत्व गोविंदराव शिवदेव यांनीं संपादन केलें. बरसात संपतां च नरवरचे राजावरील मोहिमेस गोविंदराव शिवदेव यांनीं सुरुवात केली. नरवरपासून १० कोसांवर परवछा ह्मणून ठाणें आहे, त्या ठिकाणीं नरवरचे राजानें १० हजार स्वार व २५ हजार पायदळ व तोफखाना असा सरंजाम घेऊन तळ दिला. त्याठिकाणीं मराठ्यांचे फौजेचें व नरवरचे राजाचें मोठें युद्ध झालें, मराठ्यांचे फौजेंत फक्त ३०० मराठे होते; बाकी सारे रांगडे लोक होते. १३ दिवस सारखें युद्ध चाललें. नरवरचे राजास वेढा घालून त्याची फौज कापून काढली; व नरवरचे राजानें पळ काढला. मराठ्यांनीं नरवर व ग्वालेर प्रांत थेट चंबळीपर्यंत सर केला. त्या प्रदेशांत आपलीं ठाणीं बसवून लाखों रुपये सरकारांत दिले व आपण हि मिळविले. अशा रीतीनें गोविंदराव शिवदेव यानें मोटी कामागिरी करून नांवलौकिक संपादन केला.

यानंतर आमानसिंग, हिंदुपद व जगतराज बुंदेले यांचेमध्यें तंटे सुरू झाले; तेव्हां पेशव्यांनीं नारो शंकर यास फौजेसह हिंदुपद व जगतराज यांचे कुमकेस जाण्याचा हुकूम केला. ते वेळीं नारो शंकर यांनीं गोविंदराव शिवदेव यास आपले मदतीस देण्याबद्दल पेशव्यांस विनंति केली. पेशव्यांनीं ही विनंती मान्य करून गोविंदराव शिवदेव यास वर्खे देऊन नारोशंकर याचेबरोबर हिंदुस्थानांत जाण्यास आज्ञा केली. बुंदेल्यांच्या या तंट्यांत आमानसिंगाचा पराभव होऊन हिंदुपद आणि आमानसिंग यांचा तह झाला. यानंतर नारो शंकर व गोविंदराव शिवदेव झांशीस परत आले. या च सुमारास रघुनाथराव दादा जाटाची कुंभेर घ्यावी ह्मणून हिंदुस्थानांत फौजेसह आले. तेव्हां नारो शंकर आपल्या फौजेसह गोविंदराव शिवदेव यास बरोबर घेऊन राघोबादादांच्या मदतीस निघाले. कुंभेरीकडील कामगिरी संपल्यानंतर विठ्ठलराव शिवदेव यानें गोविंदराव शिवदेव यास त्यांचें मदतीकरतां देण्याबद्दल दादासाहेब पेशवे यांस विनंती केली. विठ्ठलराव शिवदेव ग्वालेरीस असतां गोहदचा राणा भीमसींग यानें ग्वालेरचे किल्ल्यास वेढा दिला व विठ्ठलरावाचा पराजय करून त्यास किल्ल्यांतून हांकून दिलें. इकडे गोविंदराव शिवदेव यानें जिगणीस जाऊन फत्तेसिंग यास मारलें आणि गोहदास मोर्चे लाविले व गोहदकराचा सारा मुलुख ३० लाखांचा घेतला. रघुनाथरावदादांनीं कुंभेर घेतल्यानंतर ते परत दक्षिणेंत यावयास निघाले त्यावेळीं गोहद जाटांस परत दिलें व ग्वालेरीच्या किल्ल्यांत विठ्ठलराव शिवदेव याचें ठाणें बसविलें.

पेशवे सावनूरचे मसलतीस निघाले ते वेळीं गोविंदराव शिवदेव हे हि त्यांचेबरोबर बागलकोटास गेले. शके १६७८ (इ. स. १७५६) सालांत श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब यांनीं गोविंदराव शिवदेव यास मुधोजी भोसले सेनाधुरंधर यांची मजमु सांगितली. यानंतर जानोजी भोसले व मुधोजी भोसले यांचा कजिया तुटला; तेव्हां मुधोजी भोसले यांनीं दादासाहेब पेशवे यांचे बरोबर हिंदुस्थानांत जावें असें ठरलें. या कामगिरीवर गोविंदराव शिवदेव यांची हि नेमणूक करण्यांत आली. हिंदुस्थानांत जातेवेळीं भोसल्याचे मुलुखांतील चंद्रपूर येथील मजमूची असामी गोविंदराव शिवदेव यांनीं त्यांचे आप्त मल्हारराव यास

सांगितली. हिंदुस्थानांतील कामगिरी पुरी झाल्यानंतर मुधोजी भोसले चंद्रपुरास परत फिरले तेव्हां त्यांचे बरोबर गोविंदराव हे हि परत आले. चंद्रपूर येथें परत आल्यानंतर मुधोजी भोसले यानें गोविंदराव शिवदेव यांचेवर लटका आरोप ठेवून त्याची सर्व चीजवस्त लुटून त्यास कैदेंत टाकलें. तांदुळजाच्या लढाईनंतर पेशव्यांचा जय होऊन मोंगलांशीं तह झाला, तेव्हां पेशव्यांनीं गोविंदराव शिवदेव यास घेऊन येण्याबद्दल मुधोजीबावास हुकूम केला. पेशव्यांचे हुकुमाप्रमाणें मुधोजी भोसल्यानें गोविंदराव शिवदेव यास पेशव्यांचा तळ टोक्याचे मैदानांत होता तेथें पेशव्यांचे भेटीकरितां नेलें. श्रीमंतांची व गोविंदरावाची भेट झाली. तदनंतर गोविंदराव शिवदेव याची सर्व चीजवस्त त्यास परत देण्याचा व त्याचें सर्व नुकसान मुधोजी भोसल्यानें भरून देण्याचा करार झाला. यानंतर पानीपतची लढाई झाली व पुढें थोडे च दिवसांनीं गोविंदराव शिवदेव हा मरण पावला गोविंदराव शिवदेव यास मुलगे ३, नरसिंगराव गोविंद, माधवराव गोविंद व बाजीराव गोविंद. यांपैकीं माधवराव हा कर्नाटकचे स्वारीत मारला गेला

नरसिंगराव गोविंद याचे पूर्वजांची वंशावळींत अगर बखरींत जी माहिती दिली आहे त्यापैकीं महत्वाच्या गोष्टी वर दिल्याप्रमाणें आहेत. या घराण्याचा इतर पत्रव्यवहार जो आहे त्यापैकीं ५ पत्रांत गोविंदराव शिवदेव याचा उल्लेख आलेला आहे; त्यापैकीं शके १६७९ ज्येष्ठ वद्य ३ चें मुधोजी भोसल्याचें नेमणूकपत्र आहे; त्यावरून गोविंदराव शिवदेव याचा दरजा कोणत्या प्रकारचा होता हें दिसून येतें. कमाविशीचे वेतनाबद्दल रु. १००० यासेरीज भोजनखर्च व किरकोळ खर्चाबद्दल रु. १००० एकुण रु. २००० ची गोविंदराव शिवदेव यास नेमणूक होती. याशिवाय स्वार १०, प्यादे ५०, जासुद २, कारकुन १ व मशालजी १ इतके नोकर गोविंदराव याचे तैनातीस होते, व यांचा सर्व खर्च मुधोजी भोसले यांनीं गोविंदराव शिवदेव यास द्यावयाचा करार होता. शके १६७९ वैशाख वद्य २ चें बाळाजी पंडित प्रधान यांस लिहिलेलें एक पत्र आहे. या पत्रावरून गोविंदराव शिवदेव याचेकडून २५ हजार रुपये मुधोजी भोसले यानें सरकारांत घेतले ते जानोजी भोसले याजकडून प्रांत वऱ्हाडचा जो ऐवज द्यावयाचा त्यांतून गोविंदराव शिवदेव यास द्यावे त्याची फार अडचण आहे असें मुधोजी भोसले यानें बाळाजी बाजीराव यांस कळविलें. शके १६७९ वैशाख वद्य २ चें मुधोजी भोसल्याचें सदाशिव हरी यास लिहिलेलें एक पत्र आहे त्या पत्रावरून गोविंदराव शिवदेव यास बागमळियाचा ऐवज इजारा रु. ४ लक्ष सरकारांतून दस्तूर नेमून दिला आहे तरी ती रकम व त्याचेवर रु. २ प्रमाणें व्याज रु. ८ हजार पावते करणें असा उल्लेख आहे. शके १ ७९ ज्येष्ठ वद्य ३ चें मुधोजी भोसल्याचें गोविंदराव शिवदेव यास पत्र आहे त्यावरून गोविंदरावाचा मुलगा नरसिंगराव याचें पथक मुधोजी भोसल्याकडे नोकरीस असून त्याचे खर्चाबद्दल परगणे वण ठाण्यासुद्धां कमाविशीनें दिला आहे, तरी नेमणुकीप्रमाणें रकम घ्यावी असा उल्लेख आहे. या खेरीज गंगाधर बल्लाळ याचें एक पत्र आहे या पत्रास तारीख नाहीं. तथापि हें पत्र शके १६७९ चे पूर्वीचें असावें असा पत्रांतील मजकुरावरून तर्क होतो. गंगाधर बल्लाळ हा नागपूरकर भोसले यांचे पदरचा मोठा अधिकारी असावा असें वाटतें. गोविंदराव शिवदेव याचें उर्जित करण्याबद्दल गंगाधर बल्लाळ यानें या पत्रांत शिफारस केलेली आहे. वरील सर्व उल्लेखांवरून मुधोजी भोसल्याचे

दरबारांत गोविंदराव शिवदेव हा मोठा वजनदार असामी होता असें स्पष्ट दिसतें. प्रस्तुत लेखाचा जो विषय नरसिंगराव गोविंद याचे पूर्वजाची हकीकत आतां सांगितल्याप्रमाणें आहे. आतां खुद्द नरसिंगराव गोविंद याचे संबंधीं या कागदपत्रावरून काय माहिति मिळते त्याचें दिग्दर्शन करतों.

राघोबादादा यांनीं पेशवाईचीं सूत्रें हातांत घेण्याचा उद्योग सुरू केला तेव्हां नरसिंगराव गोविंद हा राघोबादादास सामील झाला. शके १६९७ अश्वीन वद्य ७ चें रघुनाथ बाजीराव यांचें नरसिंगराव गोविंद यास लिहिलेलें जें पत्र आहे त्या पत्रांत कर्नाटक येथील कामकाज तुह्मांस सांगोन रवाना केलें आहे तरी प्रांतमजकुरीं जाऊन संस्थानिक, देसाई, देशपांडे वगैरे जमा करून ते तुह्मीं एकत्र होऊन झाडून प्रांतांतील ठाणीं हस्तगत करून सरकारअंमल बसवून पैका वसूल करणें, सरकार कामामुळें शिबंदी वगैरे लागेल तो वाजवी हिशेब पाहून मजरा दिला जाईल असा उल्लेख आहे. कर्नाटक प्रांतांत या समईं पेशव्यांचे तर्फे वामनराव गोविंद व आनंदराव भिकाजी रास्ते हे दोघे अधिकारी होते. या दोघांकडून मामलतीचें काम काढून नरसिंगराव गोविंद यांचेकडे सोंपविलें असल्याकारणानें त्यास रुजू राहून हरएक विषयीं साह्यता करीत जाणें व परगणेमजकूरचा अंमल नरसिंगराव गोविंद यास सुरळीत देत जाणें असे विषईं त्या प्रदेशांतील देशमुख, देशपांडे व देसाई यांस राघोबादादानीं या च सालचीं लिहिलेलीं ताकीदपत्रें आहेत. हीं ताकीदपत्रें एकंदर २४ असून तीं खालीं नमुद केलेल्या परगण्यांचे देशमुख, देशपांडे व देसाई यांस लिहिलेलीं आहेत,--

| | | |
|---|---|---|
| बोहाटी | दाडवाडी | गोकाक |
| तेरदळ | हुबळी | धारवाड |
| कलघटी | कडकोल | एकोंडी |
| कदुलगी | तडस | हरिहर |
| अमीनबावी | मुळगुद | मिस्त्रीकोट |
| जमखेडी | बेटगिरी | |

येणेंप्रमाणें १६ परगण्याचे देशमुख व देशपांडे यांस रघुनाथरावदादा यांची वरील आशयाचीं ताकीदपत्रें आहेत.

राघोबादादाचीं देसाई लोकांस गेलेलीं पत्रें:--

लिंगप्पा हणमतगौडा देसाई परगणे हावपुर

अचप्पा नाईक किल्ले बदामी

दौलतराव हिंदुराव घोरपडे

बासप्पा नाईक संस्थान हारपनहाळी

श्रीनिवास व्यंकटाद्री नाईक देसाई परगणे गदग

सुरराव बळवंत

व्यंकटपती नाईक संस्थान सुरापूर

विरभद्र देसाई संस्थान कित्तूर

शंकरराव लिंगोजी

लिंगाप्पा नाईकगौडा देसाई मामले तोरगल

मुरारराव हिंदुराव घोरपडे

येणेंप्रमाणें देसाई लोकांस लिहिलेलीं राघोबादादाचीं पत्रें आहेत. हीं सर्व ताकीदपत्रें शके १६९७ अश्वीन वद्य ३ ह्मणजे इ. स. १७७५ सालचीं आहेत. राघोबादादा यांचा या सर्व पत्रांवर शिक्का "श्रीसांबः सपुत्रो विजयते राजा शाहुनरपति हर्षनिदान रघुनाथ बाजीराव" हा आहे. इ. स. १७७५ सालांत सवाई माधवराव पेशवे हे पेशवेपदावर होते. तथापि राघोबादादांचा पेशवाईपद बळकाविण्याचा प्रयत्न चालला असल्याकारणानें त्यांनीं स्वतः आपणांस पेशवेपद लावून घेऊन

आपला शिक्का सुरू केला. या कागदपत्रांत जीं दुसरीं कांहीं पत्रें उपलब्ध झालीं आहेत त्यांवरून राघोबादादांचे कारस्थानांत सातारचे शिवछत्रपति सामील असून त्यांचें त्यांस पाठबळ होतें असें दिसतें.

राघोबादादा यांनीं चालविलेल्या या कारस्थानांत मोठे व लहान लोक त्यांस सामील होते ते येणेंप्रमाणें:—

शिवछत्रपति

यशवंतराव शिंदे सरसुभेदार } शिवछत्रपतींचे
परशराम बल्लाळ गणपुले } अंकित

दुर्गाआईसाहेब नागपूरकर भोसल्यांचे घराण्यापैकीं

गोविंदराव गायकवाड

दौलत बाबुराव

जानोजी चोर

या मंडळींत जीं खलबतें चालत त्यासंबंधाची बातमी परस्परांस देण्याचें काम जानोजी चोर हा करीत असे, असें या कागदपत्रांवरून दिसून येतें. हैद्राबादच्या निजामास सामील करून घेण्याची खटपट या मंडळींनीं चालविली होती असें नरसिंगराव गोविंद याचा भाऊ बाजीराव गोविंद याचे पत्रावरून स्पष्ट होतें. इंग्रजांपाशीं हि या मंडळीचा या कारस्थानाचे बाबतींत पत्रव्यवहार चालत असे, असें कागदपत्रांत आलेल्या उल्लेखांवरून दिसून येतें. राघोबादादा व ही मंडळी यांची बाजू पैशाचे दृष्टीनें अत्यंत लंगडी होती. यशवंतराव सरसुभेदार यांचें नरसिंगराव गोविंद यास इ. स. १७७६ चें पत्र आहे त्या पत्रांत खालील उल्लेख आला आहे. "ऐशियास आपण सरंजामासुद्धां श्रीमंत धनीसाहेबाचे शेवेसीं येऊन पोहोंचलेस बहुत उपयोग आहे. पोटापाण्याचा अर्थ दर्शविला, अशास तिकडे च मुलुख मारून चालवितां, तैसे च सरंजामासुद्धां हुजूर येऊन इकडील मुलखांत न्यून काय आहे." मुलुख लुटून त्यावर आपला खर्च चालवावा असा या पत्राचा आशय आहे. यावरून हें बडें राज्यकारस्थान चालविण्याकरितां लागणाऱ्या पैशाची तूट होती हें उघड होत आहे.

राघोबादादा व त्यांचे साथीदार व हस्तक यांनीं हें जें कारस्थान चालविलें होतें, तत्संबंधीं कोणकोणत्या लढाया झाल्या व त्यांचे काय परिणाम झाले तें आतां नमूद करतों. गोविंदराव गायकवाड हे राघोबादादाचे साथीदार होते याचा उल्लेख वर केला च आहे. गोविंदराव गायकवाड व फत्तेसिंग गायकवाड यांची लढाई होऊन, या लढाईत नरसिंगरावची घोडी पडल्याचा उल्लेख शके १६९५ ज्येष्ठ वद्य ३ चे पत्रांत आहे. या च पत्रांत लढाईत कामकाज चांगलें केल्याबद्दल राघोबादादांनीं नरसिंगराव गोविंद यास शाबासकी दिली आहे. नरसिंगराव गोविंद याचे हाताखालील लोकांस प्रोत्साहन येण्यासाठीं राघोबादादांनीं "येकनिष्ठपणें सेवा केल्यास तुमचेवर सरकारची मेहेरबानगी होईल" अशा आशयाचीं २ पत्रें शके १६९६ भाद्रपद शु. ७ व ११ चीं लिहिलीं आहेत. या च पत्रांत दौलत बाबुराव याचे बरोबर गोविंदराव गायकवाड याचे मदतीस नरसिंगराव आपले लोकांसह गेल्याचा उल्लेख आहे. गोविंदराव व फत्तेसिंगराव गायकवाड यांचेमधें जी लढाई झाली ती कोठें झाली याचा उल्लेख या पत्रांत नाहीं, परंतु ही लढाई शके १६९५ ज्येष्ठ वद्य ३ ह्मणजे इ. स. १७७५ चे पूर्वीं केव्हां तरी झाली असली पाहिजे, असें नरसिंगराव गोविंद यास रघुनाथ बाजीराव यांनीं शके १६९५ ज्येष्ठ वद्य ३ ला जें पत्र लिहिलें आहे त्यावरून दिसून येतें. या पत्रांत "तुह्मी विनंतीपत्र पाठविलें तें पावलें राजश्री गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादुर याची व फत्तेसिंग गायकवाड याची लढाई

झाली त्यांत आपली घोडी पडली, कामकाज झालें व २०० राऊत जास्त ठेविले आहेत बोजा भारी आहेत ह्मणून लिहिलें तें कळतें" असा उल्लेख आहे. यानंतर शके १६९८ पौष शु. ६ ह्मणजे इ. स. १७७६ सालांत राघोबादादांनीं चालविलेल्या कारस्थानास चांगला रंग येत चालला असें दिसतें. या च मित्तीचें राघोबादादांचें नरसिंगराव गोविंद यास एक पत्र आहे त्यामध्यें कर्नाटक प्रांतांतील संस्थानिक सामील करून घेऊन तिकडील बंदोबस्ताकरितां नरसिंगराव गोविंद यानें फौज जमा केल्याबद्दल रघुनाथरावदादांनीं संतोष व्यक्त केला आहे. या च पत्रांत "खासा स्वारी मुंबईस दाखल झाली आहे अंग्रेजांस विलायतचा हुकुम आला ह्मणजे मसलत सुरू होईल" असा उल्लेख आलेला आहे. नरसिंगराव गोविंद यानें जरीपटका मिळावा, असा राघोबादादांकडे अर्ज केल्याचा हि उल्लेख या पत्रांत आहे. राघोबादादांनीं नरसिंगरावाचे विनंतीस खालीलप्रमाणें जबाब दिला. "तुह्मी जरीपटक्याविषई अर्ज सांगोन पाठविलात त्यास पंढरपूर पावेतों मुलुखाचा बंदोबस्त करून चाकरी बजावून दाखविणें फितुरीयाची फौज तुह्मांवर आल्यास ताराज करणें ह्मणजे तुह्मांस जरीपटका सरकारांतून बहाल च केला असें जाणिजे" या लेखावरून पेशव्यांचेकडून जरीपटका संपादन करण्याची तत्कालीन शिलेदारांची महत्त्वाकांक्षा असे असें दिसतें. त्या च प्रमाणें युद्धप्रसंगीं सरकारचाकरी उत्तमरीतीनें बजाविल्यास जरीपटका देण्यांत येत असे, असें या उल्लेखावरून सिद्ध होतें. या पत्रांत मसलत सुरू होईल असा उल्लेख आल्याचें आतां च सांगितलें आहे; परंतु या मसलतीसंबंधीं पुढें कोणकोणत्या घडामोडी झाल्या, याबद्दलची माहिती ज्या पत्रांत आहे अशीं पत्रें आढळलीं नाहींत; तथापि नरसिंगराव गोविंद याचे मरणानंतर लक्ष्मणराव नरसिंह यानें जी एक यादी लिहिली आहे, त्या यादींत "नरसिंगराव गोविंद यानें कर्नाटक प्रांतापासून क्षेत्र पंढरपूरपर्यंत फौजा धरून भाऊशीं लढाई केली व करकंबेवर होळकर व मिरजकर व सरकारी कुमक तोफासुद्धां ५० हजार फौजेसीं तीन महिने टक्कर दिली" असा उल्लेख आहे. राघोबादादाचा मोड झाल्यानंतर नरसिंगराव गोविंद हे त्याचे हस्तकांपैकीं एक असल्याकारणानें त्यास त्याचे कृत्याबद्दल प्रायश्चित्त भोगावें लागलें. नरसिंगराव याचा मुलगा लक्ष्मणराव याची एक विनंतारसेची यादी या कागदपत्रांत आहे. त्यांतील मजकुरावरून नरसिंगराव यास नाना फडणवीस यांनीं तुरुंगांत ठेविलें होतें हें सिद्ध होतें. नरसिंगराव यास तुरुंगवास कोणत्या सालापासून कोणत्या सालापावेतों भोगावा लागला हें समजण्यास मार्ग नाहीं; परंतु शके १७०६ भाद्रपद वद्य १२ इ. स. १७८४ सालचें नरसिंगराव गोविंद यास माधवराव पेशवे यांचें पत्र आहे. त्यांत फंदफितुरी न करतां चांगली वर्तणूक ठेवण्यास नरसिंगराव गोविंद तयार आहे असे विषईं नरसिंगरावाचे वतीनें भास्कर शंकर यानें विनंती केल्याचा उल्लेख आहे. नरसिंगराव गोविंद यानें चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल सरकारांत जामीन दिले असतां त्यास उपसर्ग लागणार नाहीं असें सवाई माधवराव पेशवे यांनीं नरसिंगराव यास आश्वासन दिलें. या पत्रावरून शके १७०६ ह्मणजे इ. स. १७८४ सालापूर्वी नरसिंगराव गोविंद यास कारागृहवास भोगावा लागला हें सिद्ध होतें. सवाई माधवराव यांचे हुकुमास अनुसरून नरसिंगराव गोविंद यानें फंदफितुरी न करण्याबद्दल व चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल तीन जामीन शके १७०७ भाद्रपद वद्य १२, अश्वीन शु. ५, व अश्वीन व. ५ रोजीं अनुक्रमें

कानोजी बाबा मोहिते, हंबीरराव सगाजी नरसिंह देशपांडे व पांडुरंग रामचंद्र कुळकर्णी यांचे दिले. यानंतर नरसिंगराव गोविंद याची स्थिती अत्यंत दैन्यवाणी झाली. राघोबादादा यांचेकडून लभ्यांश होईल या आशेवर नरसिंगराव यानें फौज उभी करण्याकरितां मनस्वी कष्ट केले होते. त्यामुळें त्याची अगदीं अन्नान्नदशा झाली. नरसिंगराव यानें राघोबादादांस एक पत्र लिहिलें त्यावरून नरसिंगरावाचे दैन्यावस्थेचें चित्र डोळ्यापुढें हुबेहुब उभें राहतें. या पत्रांत "माझा कांहीं च परिणाम नाहीं, ऐशा बहुत संकटांत आहें, माझा मानस होता कीं, स्वामीसेवा करून दाखवावी, तें हि माझे दैवी नाहीं व मृत्यहि येत नाहीं तथापि आपणांस न कळतां परागंदा व्हावें" इत्यादि. अशा प्रकारची नरसिंगराव गोविंद याची विपन्नावस्था होऊन शके १७१८ माघ शु. १५ चे सुमारास त्याचा अंत झाला. नरसिंगराव याचे क्रियेचे खर्चाकरितां रु. १ हजार पेशव्यांनीं दिले यावरून हि नरसिंगराव याचे विपन्नावस्थेची कल्पना होते. नरसिंगराव गोविंद यानें केलेला अपराध लक्षांत घेतला असतां, त्यास पेशव्यांनीं अत्यंत सौम्य शासन दिलें, इतकें च नव्हे, परंतु तो मेल्यावर त्याचे क्रियेस लागणारा खर्च देऊन, त्याचे मुलामाणसांचे हि पोटापाण्याची तजवीज केली, यावरून पेशवे व त्यांचे पदरीं असलेले राजकारणी पुरुषांचे ठिकाणीं क्षमाशीलत्व बरें च होतें असें दिसतें. एवढें सांगून राघोबादादा पेशवे यांचे हस्तक नरसिंहराव गोविंद बोंधले यांचें चरित्र येथें पुरें करितों.

भास्कर वामन भट

---

## महाराष्ट्रांतील व्यवहारनिर्णयपद्धति

### ( लेखांक २ )

गेले संमेलनाचे प्रसंगीं इंग्रजी सत्ता स्थापन होण्याचे पूर्वीच्या महाराष्ट्रांतील व्यवहारनिर्णयपद्धतीसंबंधीं मंडळास एक लेख मीं सादर केला होता. त्यानंतर आजपर्यंत ह्या विषयासंबंधीं जी नवीन माहिती मला मिळाली तिच्या आधारें या च विषयासंबंधीं प्रस्तुतचे लेखांत चर्चा करण्याचें मीं योजिलें आहे. मंडळास सादर केलेल्या पूर्वीच्या लेखांत विषयाचे विवेचनाचे सोयीकरितां जी पद्धत मीं स्वीकारिली आहे त्या च पद्धतीस अनुसरून या लेखांत विवेचन करण्याचें ठरविलें आहे. सातारचे छत्रपति प्रतापसिंह महाराज यांचे कारकीर्दींत त्यांनीं त्यांचे ताब्यांत असलेल्या मुलखाचे बंदोबस्ताकरितां अमलांत आणलेली ११५ कलमांची यादी उपलब्ध झाली आहे. * ही यादी कृष्णराव कारकून निसबत दप्तर चिटणीस यानें लिहिलेली असून यादीचे शेवटीं शके १७५८ (इ. स. १८३६) हा शक दिलेला आहे.

या यादींत एकंदर ११५ कलमें असल्याचा उल्लेख करण्यांत आला च आहे. त्या ११५ कलमांचे पोटविभाग खालीं दर्शविल्याप्रमाणें आहेतः—

३३ कलमें मुलखाचे बंदोबस्ताविषयीं
३९ ,, न्यायाधीशप्रकरणीं
५ ,, दत्तकपुत्राविषयीं
३८ ,, महालाचे व वसुलाचे बंदोबस्ताविषयीं

छत्रपति प्रतापसिंह महाराज यांची कारकीर्द शके १७२० ते १७६१ (इ. स. १८०८–१८३९). अर्थात् गादीवर बसल्या·

---

* रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचे संग्रहांत ती यादी होती; व मागील संमेलनानंतर त्यांनीं ती यादी मला दिली.

नंतर राज्याचे बंदोबस्ताचे दृष्टीनें, पूर्वापार चालत आलेले नियम एकत्र करून त्यांचे राज्यांतील अधिकाऱ्यांचे व प्रजेचे माहितीकरितां ते त्यांनीं प्रसिद्ध केले असले पाहिजेत हें उघड आहे. पेशवाईचा लय शके १७४० (इ. स. १८१८) मध्यें झाल्यानंतर इंग्रजी अंमल जिकडे तिकडे स्थिरस्थावर होऊन प्रथम इंग्रज सरकारानें इ. स. १८२७ सालांत इंग्रजी कायदे (इ. स. १८२७ सालचे रेग्युलेशन्स) इंग्रजी अमलाखालील प्रदेशांत सुरू केले. साताराचे छत्रपतींचें राज्य इ. स. १८४८ सालांत खालसा करण्यांत आलें. तोंपर्यंत छत्रपतींचे अमलाखालील मुलुखांतील राज्यव्यवस्था पूर्वापार पद्धतीस अनुसरून चालू होती. इ. स. १८२७ सालांत जे रेग्युलेशन्स अमलांत आणले, त्यांचा परिणाम छत्रपतींचे अमलाखालील मुलुखांतील पूर्वापार चालू असलेल्या राज्यपद्धतीवर ह्मणण्यासारखा झालेला नव्हता असें प्रतापसिंहांनीं प्रसिद्ध केलेल्या या ११५ कलमांचे यादीवरून दिसतें. या दृष्टीनें विचार करितां प्रतापसिंह महाराज यांच्या या यादीचें महत्व फार आहे. कारण या नियमांवरून व्यवहारनिर्णयपद्धतीसंबंधीं महाराष्ट्रांत पूर्वापार कोणचे नियम प्रचलित होते याबद्दलची बरीचशी माहिती होण्यासारखी आहे.

प्रतापसिंह महाराज यांनीं केलेल्या नियमांपैकीं पहिले ३३ नियम मुलखाचे बंदोबस्तविषयीं आहेत. ह्या सर्व कलमांचा हेतु होतां होईल तों राज्यांत गुन्हे घडूं नयेत व गुन्हे घडल्यास त्यांचा तावडतोब तपास लागून गुन्हेगार पकडला जावा हा आहे. हल्लींच्या क्रिमिनल प्रोसीजर कोडमध्यें (प्रिव्हेन्शन ऑफ क्राइम) गुन्हा घडूं न देण्याचे इरादानें ज्या कलमांची योजना केली आहे, त्या च इरादानें या हि कलमांची योजना दिसत आहे. या कलमांबद्दल तूर्त इतकें च सांगून व्यवहारनिर्णयपद्धतीचे दृष्टीनें अत्यंत महत्वाचीं अशीं जीं न्यायाधीशप्रकरणीं ३९ कलमें आहेत त्यांच्या चर्चेकडे वळूं (परिशिष्ट पहा).

आतां या कलमांसंबंधीं सुचणाऱ्या कांहीं महत्वाच्या मुद्यांबद्दल विवेचन करितों:—

पहिल्या कलमांत "होतां होईल तों आपसांत तंट्यांचा निकाल करण्याचा दस्तुर या मुलखांत आहे तो फार चांगला आहे" असें मत प्रदर्शित करून नंतर आपसांत तंट्याचा निकाल न झाल्यास व पंचाईत केल्याखेरीज इलाज नाहीं, असें दिसून आल्यास पंचाईत करण्यांत यावी असें सांगितलें आहे. पहिले कलमामध्यें जे प्रशंसात्मक उद्गार नमूद केलेले आहेत त्यांवरून महाराष्ट्रांत सरकारी अधिकाऱ्यांचे अगर पंचांचे मध्यस्थीखेरीज लोकांत उत्पन्न होणाऱ्या व्यवहाराचा आपसांत समजुतीनें निकाल करण्याचा प्रघात बरा च सुरू होता असें दिसतें. कलम १६ मध्यें पंचांकडे न जातां वादीप्रतिवादी आपसांत समजल्यास अगर तिऱ्हाईत इसमावर आपसांत समजूत करण्याचें सोंपाविल्यास ती गोष्ट सरकारास पसंत आहे, असें जाहिर करण्यांत आलें आहे कलम २७ मध्यें आपसांत समजतील त्यांचेकडून हरकी गुन्हेगारी घेतली जाणार नाहीं असें नमूद करण्यांत आलें आहे. परंतु आपसांत न समजतां सरकारांत फिर्याद दिल्यानंतर व हरकी गुन्हेगारीबद्दल उभयतां वाद्यांबद्दल सरकारनें हमीदार घेतल्यानंतर आपसांत समजाविशी झाल्यास हरकी गुन्हेगारी शिरस्त्याप्रमाणें घेतली जाईल असें ठरविण्यांत आलें होतें. महाराष्ट्रांतील लोकांत उत्पन्न झालेल्या व्यवहाराचा निकाल सरकारी अधिकाऱ्यांकडे अगर पंचांकडे न जातां आपसांत करण्याची जी

प्रशंसनीय पूर्वापार वहिवाट होती तिला उत्तेजन देऊन ती कायमची ठेवण्याचें या कलमांचें धोरण स्पष्ट दिसत आहे.

सरकारी अधिकाऱ्याचे हुकुमावांचून गांवचे पाटलास गांवांत उत्पन्न होणाऱ्या व्यवहारांचा निर्णय पंचाईत भरवून तिचे मार्फतीनें करण्याचा अधिकार असे. पाटलानें पंचाईत करण्याचें नाकबूल केल्यास मामलेदाराकडे अग्रवादी यानें अर्ज द्यावा व मामलेदारानें पाटलास पंचाईत करण्याचा हुकूम करावा असा शिरस्ता होता. शहरांतील व गांवांतील शेटे महाजन यांनीं शहरांतील अगर गांवांतील उदमी सौदागर यांचेमध्यें उत्पन्न झालेल्या व्यवहाराचा निकाल पंचाईत भरवून करावा असा परिपाठ होता. याप्रमाणें शेटे महाजन यांचे पंचायतीनें केलेले निवाडे कायम करण्यांत येत असत. मोठा कज्जा असल्यास वादी–प्रतिवादींनीं प्रथम मामलेदाराकडे जावें. मामलेदारानें आपसांत समजूत करण्याचा प्रयत्न करावा. आपसांत समजूत न झाल्यास मामलेदारानें निवाड्याचें काम पंचाईतीकडे सोंपवावें. पंच जो निकाल देतील त्याप्रमाणें वहिवाट मामलेदारानें चालवावी. मोठ्या कज्जाचे निवाड्यासंबंधीं या च स्वरूपाची व्यवस्था या यादींतील नियमांनीं ठरविलेली आहे. वादी-प्रतिवादींचे संमतीनें पंचायत नेमल्यानंतर वादी अगर प्रतिवादी हजर न झाल्यास, उभयतां वाद्यांपैकीं जो हजर असेल त्याचे वतीनें व्यवहाराचा निकाल करून त्याचेकडून वहिवाट सुरू करण्यांत येत असे. कलम १ ते ११ यांचा सारांश वरीलप्रमाणें आहे. व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्था व त्यांचे अधिकार यांसंबंधीं गेल्या सालचे लेखांत जीं विधानें मीं केली आहेत, त्यांची सत्यता या नियमांवरून पटल्याखेरीज राहणार नाहीं. गोत अगर पंचाइतीचे व्यवहारनिर्णय करण्याचे अधिकारास कांहीं मर्यादा असे किंवा काय, या प्रश्नाची चर्चा पूर्वी केली होती.

पूर्वी आढळण्यांत न आलेला असा एक निर्बंध कलम ५ मध्यें आढळून येतो. भूत अगर देवाचा कज्जा मनांत आणणें गरज नाहीं. सबब पंचांनीं त्यासंबंधीं पंचाईत करण्याचें कारण नाहीं असा कलम ५ मध्यें निर्बंध घालण्यांत आला आहे. पंच लोकांचे वर्तनावर व पंचांविरुद्ध लांच घेतल्याच्या खोट्या तक्रारी करण्याचे प्रवृत्तीस आळा घालण्याकरितां १२,१३, १५ व ३९ या कलमांची योजना करण्यांत आली आहे. या कलमांत अंतर्भूत असलेली योजना इतरत्र कोठें हि आढळण्यांत आली नाहीं. कोणत्या हि व्यवहारासंबंधीं पूर्वी उभयतां वादींमध्यें वाद होऊन निकाल झाला असल्यास त्या व्यवहारासंबंधीं शेवटचा निवाडा ज्याचे तर्फेचा असेल त्याप्रमाणें वहिवाट सुरू करण्यांत येईल असें १९ वे कलमांत सांगितलें आहे.

कोणत्या हि व्यवहाराचा निर्णय झाल्यानंतर उभयतां वाद्यांकडून हरकी व गुन्हेगारी घेण्याचा प्रघात पूर्वापार अस्तित्वांत होता तो या कलमांत ग्रथित केला आहे. कलम २० मध्यें हरकी आणि गुन्हेगारी घेण्याचे हेतु नमूद करण्यांत आले आहेत. त्यापैकीं खोट्या फिर्यादी करण्याचे प्रवृत्तीस आळा बसावा व होतां होईल तों उत्पन्न झालेल्या व्यवहाराची आपसांत समजाविशी व्हावी हा जो हेतु नमूद करण्यांत आला आहे, तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे. कलम २१ ते २६ व २८ यांमध्यें कोणत्या स्वरूपाचे व्यवहारांत हरकी व गुन्हेगारी किती घ्यावी, त्याचें प्रमाण काय असावें व हरकी व गुन्हेगारीच्या रकमेची काय विल्हेवाट करावी, याबद्दल नियम आहेत. हे सर्व नियम पूर्वी उपलब्ध न झालेले असे आहेत. कलम २८ मध्यें वसूल झालेल्या हरकी

व गुन्हेगारींपैकीं चार हिस्से पंचांस पोटगीबद्दल द्यावे असें ठरविण्यांत आलें आहे. ही योजना हि लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कलम ३० व ३१ मध्यें हरकी व गुन्हेगारीबद्दल पंचायत नेमण्यापूर्वी मामलेदारांनीं उभयतां वाद्यांकडून हमीचिठ्या घेऊन तत्संबंधीं पुढें कोणची तजवीज करावी हें सांगितलें आहे. कलम ३२ गांवचे सीमेचे व्यवहारासंबंधीं आहे. कलम ३३ व ३४ मध्यें नादारींत फिर्याद करण्याची जी सवलत ज्या स्वरूपाची हल्लीचे कायद्यानें दिली आहे, त्या च स्वरूपाची सवलत नमूद आहे. कलम ३७, ३८ व ३९ मध्यें लांच देणें व घेणें याबद्दल शिक्षा सांगितली आहे. येणेंप्रमाणें या ३९ कलमांत व्यवहारनिर्णय करण्याचा अधिकार कोणास आहे व व्यवहारासंबंधीं आनुषंगिक बाबतींत कोणत्या योजना कराव्यात हें सांगण्याचा हेतु दिसतो. व्यवहाराच्या सर्व बाबतींसंबंधीं संपूर्ण नियमांचा एके ठिकाणीं संग्रह करण्याचा हेतु हीं कलमें प्रसिद्ध करणाराचा दिसत नाहीं हें उघड आहे. ही गोष्ट लक्षांत घेतां गेले संमेलनाचे वेळीं मंडळास सादर केलेल्या लेखांतील अनेक बाबींचा निर्देश हि या कलमांत आलेला नाहीं हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. आतां व्यवहारनिर्णयपद्धतीसंबंधीं दुसऱ्या कित्येक मुद्यांचे विवेचनाकडे वळतों.

मौजे सोनारी परगणे पुणें येथील कुळकर्णीवतनाबद्दल व्यवहार होता. त्याचा निवाडा शके १५९० मध्यें शिवाजी महाराजांनीं केला. रामाजी कृष्ण यानें शिवाजी महाराजांकडे वतनाबद्दल फिर्याद केली. उभयतां वाद्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्यावर शिवाजी महाराजांनीं उभयता वाद्यांस खालीलप्रमाणें सवाल केले:—"तुह्मी गोतास राजी असाल तर गोतांत पाठवूं. परस्थळास राजी असाल तर परस्थळास पाठवूं. अगर हमशाई गांवाचे मोकादम व मोख्तसर व मौजे मजकूरचे मोकादम व बारा बलुते याशीं राजी असाल तर त्यांचे गोष्टीवरून मुनसफी करून. जे गोष्टी तुह्मास मानील ते सांगणें." * या सवालावरून तत्कालीं कोणती हि फिर्याद राजाकडे नेल्यास त्याची तीन प्रकारें विल्हेवाट लावण्यांत येत असे हें स्पष्ट होतें.

एखाद्या व्यवहारांत धर्मशास्त्राचा प्रश्न असल्यास त्या व्यवहाराचा निर्णय करण्याचें काम श्रीशंकराचार्य मठ करवीर यांचेकडे सोंपविण्यांत येत असे असें एका निवाड्यावरून दिसलें. प्रवरा संगम येथील धर्माधिकारी वृत्तीचे वारसाबद्दल प्रश्न होता. सिद्धेश्वर भट बिन नरहरभट धर्माधिकारी हा निपुत्रिक मयत झाला. या उपर त्याची स्त्री येसूबाई इनें तिच्या लेकीचा पुत्र दुहित्र होता तो दत्तविध करून आपला पुत्र केला. नंतर त्याचा व्रतबंध, विवाह शांडिल्य गोत्रीं केला. सबब सिद्धेश्वराचे धर्माधिकारी वृत्तीवर तो दत्तक मुलगा या नात्यानें मालकी सांगूं लागला. दत्तक मुलास हरकत करणारा सिद्धेश्वर बिन शिवभट याचें ह्मणणें "दत्तक घेतल्याचें आह्मांस ठाऊक नाहीं, आह्मास पुसून घेतला नाहीं. आपले वंशाचा पुत्र घ्यावा, तो हि पिता असतां घ्यावा. बायकोस लेकीचा पुत्र घ्यावयास संबंध काय!" याप्रमाणें सिद्धेश्वर बिन शिवभट याची तक्रार होती. यावरून त्या काळीं दत्तक घेण्यास नवऱ्याचे नातेवाईकांच्या संमतीची जरूरी असे. दत्तक वंशीचा असला पाहिजे. दत्तविधानाचे वेळीं दत्तक मुलाचा बाप जिवंत असला पाहिजे व मुलीचा मुलगा दत्तक घेतां येत नसे, अशा प्रकारच्या दत्तकासंबंधीं तक्रारी योग्य समजल्या जात

---

* पारसनीस-संपादित "वतनपत्रें, निवाडपत्रें" वगैरे-पृ. १२, १८.

असत असा तर्क होतो. या व्यवहाराचे कामीं उभयतां वाद्यांच्या तक्रारी एकून घेऊन हुजूरनें हें प्रकरण श्री स्वामी मठ कोल्हापूर यांचेकडे धर्मशास्त्राप्रमाणें निर्णय करण्याकरितां पाठविलें. जातींत पावन करून घेण्यासंबंधीं व्यवहार असल्यास त्याचा निर्णय करण्याकरितां श्रीशंकराचार्यांकडे पाठविण्याची वहिवाट असे. त्यांत असल्या प्रकारच्या व्यवहाराची आणखी भर पडली असें दिसतें. या व्यवहाराचा निर्णय त्वयार्ध मयार्ध या तत्वास अनुसरून केल्याकारणानें या व्यवहारांत सिद्धेश्वर भट यानें दत्तकासंबंधीं ज्या तक्रारी केल्या होत्या, त्या तक्रारी त्या कालांत धर्मशास्त्रास अनुसरून कितपत ग्राह्य समजल्या जात होत्या हें समजण्यास साधन राहिलें नाहीं.

व्यवहारनिर्णय करण्याकरितां त्या काळीं सरकारी अधिकारी नेमले जात असत व कित्येक प्रसंगीं एकादा विशिष्ट व्यवहार निर्णयाकरितां एखाद्या खाजगी व्यक्तीकडे हि सोंपविण्यांत येत असे असें मागील लेखांत दर्शविण्यांत आलें होतें. या च मुद्यासंबंधीं कांहीं नवीन माहिती येथें नमूद करण्यासारखी आहे.

न्याय करण्याचे कामावर ज्यांची नेमणूक झाली होती अशा सरकारी अधिकाऱ्यांचीं कांहीं नांवें येथें देतों:-

१ काझी आबन हाकीम शरा काझी इस्माईल शरा परगणे पुणें येथील काझी. काल शके १५३०.

२ काजी चांद बिन काजी मनसूर परगणे सुपें येथील काजी. काल शके १५५०.

३ काजी इसाक परगणे इंदापूर येथील काजी. काल शके १५५०.

४ काझी अबदुल्ला बिन काझी महंमद परगणें पुणें येथील काझी. काल शके १५६४-१५७९. (सनदापत्रें वगैरे पृ. ७४).

५ काजी सदर बिन काजी इस्माईल काल शके १५६४.

६ कवी कलश छंदोगामात्य. काल शके १६०६.

७ अगारुजवानः-आदिलशाही रियासतींत किल्ले सातारा येथें हा गृहस्थ दिवाणाचे कामावर होता. याचा काल निश्चित ठरविण्यास साधन नाहीं.

८ प्रल्हाद निराजी पंडितः-पन्हाळा येथें न्यायाधीश होते. काल शके १६११.

९ मुद्गलभट पंडितरायः-न्यायाधीश काल शके सुमारें १६५०.

१० सखो विठ्ठल न्यायाधीशः-सातारा येथें न्यायाधीश होता.

११ सदाशिव पंडितः-न्यायाधीश.

१२ होनाजी अनंत न्यायाधीश काल शके १६६४.

१३ रामशास्त्री प्रभुणेः-न्यायाधीश.

येणेंप्रमाणें न्याय करण्याचे कामाकरितां नेमलेल्या सरकारी अधिकाऱ्यांचा उल्लेख आढळतो.

परगणे मोहियाबाद ऊर्फ पुणें येथील काजीस दिलेल्या सनदेंत काजीपणाच्या हुद्याचीं कामें खालीं लिहिल्याप्रमाणें नमूद केलीं आहेतः—कज्जे व तंटे फैसल करणें, फटके मारणें व शिक्षा देणें, शुक्रवारचे दिवशीं निमाज व जमात करणें व ज्या स्त्रीचा वारस नसेल तिचा मोतिर लावणें व मेलेल्या माणसाची कांहीं जिनगी असल्यास त्याची धर्मांप्रमाणें वाटणी करणें इत्यादि. मराठी देवळांतील मूर्ती वगैरे मोडणें हें हि काजीच्या अनेक कामांपैकीं एक काम होतें. ( सनदापत्रें पृ. ७७ ).

व्यवहारनिर्णय करण्याकरितां नेमलेल्या सरकारी अधिकाऱ्यांखेरीज व्यवहारनिर्णय करण्याचे बाबतींत निष्णात अशा खाजगी व्यक्ती हि समाजांत बऱ्या च असत असें दिसतें. वाडांच्या "सनदा आणि पत्रें' पान ११६ मध्यें खालील उल्लेख आढळतो. " हल्लीं राजश्री नेताजी पालकर यांच्या

मुख्यामध्यें बहुत बोभाट खटला आहे व राजश्री नेताजी पालकर वृत्तीचे निवाडे दूर दृष्टीनें विचारून करिताती.'' या उल्लेखावरून नेताजी पालकरासारखे व्यवहारनिर्णयाचे कामीं कुशल असे बरे च लोक त्यावेळीं असत. या च निवाड्यांत दुसऱ्या एका गोष्टीचा जो उल्लेख केलेला आहे, त्यावरून हि अनुभवाचे योगानें व्यवहारनिर्णयाचें शिक्षण बरे च लोकांस प्राप्त होत असे असें दिसतें. हा उल्लेख खालीं दिल्याप्रमाणें आहे:—"आणि मजालसीस लोक ज्यास्त वृत्ती आहेत व ते वृत्तीचे व्यवहार जीही निवडले आहेत देखिले ऐकिले असे लोक मजालसी सभेस बैसविले होते.'' कोणत्या हि व्यवहाराचा निर्णय करण्याकरितां जी मजालस भरवावयाची ती Trial by Jury चे तत्वास अनुसरून भराविली जात असे हें हि वरील निवाड्यावरून स्पष्ट होत आहे. वृत्तीसंबंधीं व्यवहार असल्यास ज्यांस वृत्ती आहे व ज्यांनीं वृत्तीसंबंधीं व्यवहाराचा निर्णय केला आहे अशा लोकांची च सभेंत नेमणूक करण्यांत येत असे.

## व्यवहारनिर्णयाचे कामीं प्रमाणभूत मानले जात असलेले ग्रंथ

व्यवहारनिर्णयाचे कामीं महाराष्ट्रांत याज्ञवल्क्यस्मृतीवर, विज्ञानेश्वरांनीं केलेली मिताक्षरा नांवाची टीका प्रमाणभूत मानली जात असे, याचा उल्लेख मागील लेखांत केला च आहे. याखेरीज व्यवहारमयूख व दानकमलाकर हे हि ग्रंथ प्रमाणभूत मानले जात असत असें श्रीकराचार्यास दिलेल्या दानपत्राबद्दलचे निवाडेपत्रावरून दिसून येतें.

सोपदे देशमुख तरफ उतरोली यांचा देशमुखी वतनाबद्दलचा व्यवहार श. १६५९ सालांत उपस्थित झाला होता. त्याचे निर्णय करण्याचें काम रा. फत्तेसिंग भोसले यांनीं प्रमुख सरकारी अधिकारी व गोत महालनीहाय यांची सभा भरवून केलें. खाजगी व्यक्तीकडे व्यवहारनिर्णय करण्याचें काम सोंपविण्यांत येत असे त्याचें हें उदाहरण आहे.

कोणत्या हि व्यक्तीचें *धर्माविरुद्ध वर्तन झालें कीं, व्यवहार हा उत्पन्न व्हावयाचा च. या दृष्टीनें व्यवहाराच्या हजारों बाबी असूं शकतात व त्या काल, देश, समाजस्थितिपरत्वें भिन्न भिन्न असतात. त्या कालच्या व्यवहाराच्या कांहीं विशिष्ट बाबी आढळण्यांत आल्या आहेत त्या येथें नमूद करतों.

देशमुखाचे विद्यमानें होणाऱ्या कागदांवर शिक्का करण्याचा हक्क देशमुखाचा असे. या शिक्का करण्याचे हक्काबद्दल देशमुखास कांहीं उत्पन्न मिळत असे. उतरोली तपे रोहिडखोरें येथील सोपडे देशमुखाचे घराण्याचे दोन तक्षिमामध्यें शिक्का ताब्यांत ठेवण्याचा, तो करण्याचा व त्याबद्दलचें उत्पन्न घेण्याचा व्यवहार उत्पन्न झाला होता. यावरून असल्या प्रकारचा हक्क अस्तित्वांत असल्याचें दिसतें.

देशमुखीचे कज्जाचा कागद देशमुखी वतनाचे दोन तक्षिमांमध्यें झाल्यास जो कागद परस्परें दोघांस लिहून देणें तो देशकुळकर्णी यांनीं लिहावा असा परिपाठ असे. या परिपाठास अनुसरून देशकुळकर्ण्यांनें कागद न लिहितां एखाद्या तिऱ्हाईत इसमानें लिहिल्यास तो कागद व्यवहाराचें दृष्टीनें निरुपयोगी समजला जात असे, व त्या कागदामुळें ज्या दोन व्यक्तींमध्यें व्यवहार उत्पन्न झाला असेल, त्यांचे वाजवी हक्कांस कोणत्या हि प्रकारचा बाध येत नसे, दोन व्यक्तींमध्यें व्यवहार उत्पन्न झाल्यास व्यवहारनिर्णय करणारानें

* या ठिकाणीं धर्माचा अर्थ श्रुतिस्मृतींत प्रतिपादिलेला धर्म हा समजावयाचा हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

जो वास्तविक खरा प्रकार असेल त्याविरुद्ध दोन्ही इसमांची आपसांत समजाविशी केल्यास ती समजाविशी रद्द करण्यांत येऊन त्या व्यवहाराचा फिरून निर्णय करतां येत असे. हे दोन्ही मुद्दे वर नमूद केलेल्या खोपडे देशमुखांचे निवाडेपत्रावरून सिद्ध होतात.

## क्रिया आणि दिव्य

क्रिया आणि दिव्य या दोन बाबींसंबंधीं मागील लेखांत जी माहिती दिली आहे त्यापेक्षां बरीच नवीन माहिती उपलब्ध झाली आहे. नवीन माहितीचे आधारें सुचणाऱ्या मुद्यांचें दिग्दर्शन करतों.

क्रियेचे आणि दिव्याचे निरनिराळे प्रकार किती होते याचा उल्लेख रुष्णाजी बिन नरसोजी बोडका वि॥ सोमाजी बिन बापुजी बोडका यांचेमधील भाऊपणाचे भांडणाचे निवाड्यांत आलेला आहेः—" या उपरी दुसरे दिवशीं सदरहू सोमाजी सदरहु गोतास गैरराजी होऊन श्रीचे क्रियेस रजावंद झाला कीं, पांढरी ज्यास हातीं धरून ओढून काढील तो खरा ऐसें बोलिला. त्यावरी तुह्मी बाबाजी देखील श्रीचे क्रियेस राजी आहां कीं काय ह्मणून पुर्शीस केली. त्यास तुह्मी राजी झाला. दुसरे दिवशीं श्रीचे क्रियेस गैरराजी होऊन कजबे रांजण गांवीचे मशीदीचे दिव्यास रजावंद झाला. तिसरे दिवशीं मशीदीचे दिव्यास नाकबूल होऊन श्रीचे क्रिया मागों लागला, तेव्हां त्यास आज्ञा केली कीं, परस्परें वादीवादियांनीं एकाचे हातावरी एकानें पाणी घालावें. खरा होईल तो वतन अनुभवील ऐसा नियत केला. ते समयीं हे गोष्टीस सोमाजी गैर राजी होऊन अग्निदिव्य करीन ह्मणून बोलिला." वरील प्रकारांपैकीं परस्परें वादेवादेयांनीं एकमेकांचे हातावरी पाणी घालावें हा जो क्रियेचा प्रकार सांगितला आहे त्याची कल्पना बरोबर होत नाहीं. हा क्रियेचा प्रकार आजपावेतों आढळण्यांत न आलेला असा आहे. दिव्य आणि क्रिया करण्याचा प्रघात ज्या काळीं अस्तित्वांत होता त्या काळीं दिव्य आणि क्रिया करण्याचीं कांहीं ठिकाणें प्रसिद्ध ठरलेलीं होतीं. दिव्य करावयाचें तें गांवाचे पांढरीवर शिवाचे देवालयासमोर करावयाचें असा सर्वसाधारण नियम होता. त्याचप्रमाणें माहुलीसंगम, रुष्णातीर अगर गोदातीरचे क्षेत्राचे ठिकाणीं क्रिया करण्याचा प्रघात होता. याखेरीज मशिदीचें रांजणगांव येथील मशीद क्रियेसंबंधी प्रसिद्ध होती. त्याचप्रमाणें श्री अमृतेश्वर होसळे प्रांत कोंकण, श्री अमृतेश्वर मौजे मोहोरी बु॥तर्फ गुंजणमावळ, वज्र-जोगिणी प्रांत कल्याण हीं ठिकाणें दिव्य आणि क्रियेसंबंधीं प्रसिद्ध होतीं. वादी हिंदु असो अगर मुसलमान असो त्यास एक च व्यवहारनिर्णयपद्धति लागू होती, असें मागील लेखांत सांगितलें होतें. हा च मुद्दा शाबीद करण्यास आणीक एक उदाहरण आढळण्यांत आलें आहे, तें येथें नमूद करितों.

मौजे कात्रज तर्फ कर्यात मावळ येथील मोकद्दमीचा व्यवहार बाबाखान घोरी वि॥ पोलादशाहा यांचे मध्यें होता. उभयतांचे साक्षीपुराव्यावरून वादाचा निर्णय होईना तेव्हां उभयतांस रांजणगांवचे मशीदीचे क्रियेस पाठविलें. उभयतां वाद्यांकडून क्रिया करण्यापूर्वीं राजीनामे लिहून घेतले व नंतर क्रियेस सुरवात केली. क्रियेचें वर्णन जसें चें तसें च या ठिकाणीं उतरून घेतोंः—

' हरदोजण श्री देवळांत बसले. त्यास रक्षण सरकारचे लोक व कजबेमजकुरचा मुजावर होता. त्यास पंधरा रोज गुदरल्या उपरी दोघां वाद्यांच्या रुबरू सैदअली मुजावर कजबेमजकूर याशी बोलावून सत्य घालून सरकारच्या लोकाविद्यमानें पुर्शीस केली. कोणास काय अजमत झाली

ती जाहीर करणें. त्यास मुजावरमजकुरानें हकीकत जाहीर करून लिहून दिली कीं, पहिले दिवशीं क्रिया केली तेव्हां उदी घेते वेळेस पोलादसैद कापला. त्या उपरी तिसरे दिवशीं पोलातशहाचा दिवा जळला नाहीं त्या उपरी नववे दिवशीं सैदाचा दिवा विझला. चौदावे पंधरावे दिवशीं पोलातशहा सैदाचा दिवा जळला नाहीं. दिव्याचे भडके झाले.'

येणेंप्रमाणें हकीकत सरकारचे लोक यांचे समक्ष मुजावरमजकुरानें पोलातशहा सैद यास श्रीं देवाची अजमत घडली ते जाहीर केली. बाबाखान घोरी यास क्रिया लागली नाहीं,सबब तो खरा झाला. वातीची क्रिया भाद्रपद महिन्यांत करावयाची नाहीं असा त्याकाळीं नियम होता. त्याचप्रमाणें वातीचे क्रियेचा अवलंब करणें असल्यास सरकारची परवानगी लागत असे; व क्रियेचे प्रसंगीं सरकारी अधिकारी हजर असावा लागे. हे मुद्दे शके १६७५ सालच्या मौजे पानवडी तर्फ निरथडी कजबे पुणें येथील भाऊपणाचे भांडणाच्या निवाडेपत्रावरून सिद्ध होतात. या निवाड्यांतील लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, वातीचे क्रियेस सरकारची परवानगी पाहिजे; व क्रियेचे प्रसंगीं दिवाणाचा अमीर हजर पाहिजे हे मुद्दे गोतानें स्वतः होऊन काढिले. व त्याप्रमाणें उभयतां वाद्यांनीं सरकारची परवानगी आणल्यावर व दिवाणाचा अमीन आल्यावर क्रियेस सुरुवात केली. प्रत्येक गांवांतील सामान्य प्रतीच्या लोकांना सुद्धां व्यवहारनिर्णयपद्धतीसंबंधीं नियमांचा किती दाट परिचय होता हें निवाड्यांतील वर उल्लेख केलेल्या मुद्यांवरून दिसून येतें.

रांजणगावचे मशीदींतील क्रियेचा वर जो उल्लेख केला आहे, त्यावरून या कामीं झालेल्या क्रियेचें स्वरूप जरा निराळे प्रकारचें आहे. त्याचें वर्णन जसें चें तसें च येथें उतरून घेतों.

'त्याप्रमाणें आपला पुतण्या भवानजी बिन रखमाजी व वाघोजी भिसा यांनें आपल्या बोलीप्रमाणें उच्चार करून श्री-पाशीं चिठ्ठ्या लिहून ठेविल्या आणि विहिरींत आंघोळी करून पांच पांच तोळे कणकेचे दिवे दोघांनीं दोन करून दर दिव्यास अर्धा तोळा प्रमाणें तेल घालून बरोबर श्री पाशीं उभयतांनीं वाती लाविल्या वाघोजीची वात अगोदर अवघें तेल जळालें. विझली. त्यावर आपल्या पुतण्या भवानजीची वात ३०० टाळी वाजत तोंवरी होती. आपण खरें झालों ह्मणून गोतानें आपले खरे वातीस फूल दिलें. आपल्या दिव्यांतील तेल तीन मासे तेल बाकी राहिलें. आपण ह्मणत होतों ती गोष्ट खरी झाली.'

याज्ञवल्क्य स्मृतींतील व्यवहारकांडाचे दुसरे अध्यायाचा बावीसावा श्लोक

> प्रमाणं लिखितं भुक्तिः
> साक्षिणश्चेति कीर्तितम् ।
> एषामअन्यतमाभावे
> दिव्यान्यतममुच्यते ॥

व त्यावरील विज्ञानेश्वरांनीं केलेली टीका या दोन आधारांवर क्रिया आणि दिव्य या व्यवहार-निर्णय-पद्धतीचे अनेक अंगांपैकीं दोन अंगांची रचना केली गेली आहे, असें मागील लेखांत सिद्ध केलें आहे. त्या च मुद्याचे जास्त स्पष्टीकरणार्थ आणिक कांहीं उदाहरणें येथें नमूद करितों. याज्ञवल्क्यस्मृति व त्यावरील विज्ञानेश्वरांनीं केलेल्या टीकेंतील यासंबंधीं तत्वाचा महाराष्ट्रांतील लोकांस तत्कालीं इतका दाट परिचय झाला होता कीं, हीं तत्वें ह्मणीच्या रूपानें साधारण प्रतीच्या लोकांत हि त्या काळीं प्रचारांत होतीं. शके १३९६ सालचा मौजे दुरुज व करोली परगणें सटाव येथील मोकादमीबद्दल वाद उत्पन्न झाला होता. सदरहू वादाचा निकाल गोतानें

केला. उभयतां वाद्यांपैकीं गोळीमजकूर बोलिला जे "आपण रवा काढीं आणि देव घरीं खरा निधन. जर देव घरीं निघाले तर राहीन नाहींतर मुलखावरी जाईन." गोळी-मजकूर हें बोलिला तेव्हां हजरमजालसी सभानाईक बोलिले जेः—

'दिवस असतां दिवा नाहीं
गोहीं असतां रवा नाहीं'

याप्रमाणें सभा-नाईकांनीं हरकत घेतली. या ह्मणींत याज्ञवल्क्य स्मृतींतील श्लोकाचें महत्व फार थोडके आणि मार्मिक शब्दांत ग्रथित केलें आहे. साक्षी पुरावा असतां रवा काढतां येत नाहीं ह्मणजे दिव्य करतां येत नाहीं, हा सिद्धांत आहे, सबब दिव्य करण्याची परवानगी देतां येत नाहीं, असें सभानायकांनीं दिव्य मागणाऱ्या वाद्यास सांगितलें; त्यावर गोळ्याचें ह्मणणें पडलें: "आपण पुरातन पाटील, आपल्या वडिलांनीं सांगितले जे आपण पुरातन पाटील, आपणापासून पटेलग्या जबरदस्तानें घेतल्या आहेत ऐशी शाहिदी आपली. पुराणा ह्मणवून आपण रवा आपले खुषीनें कबूल केला आहे. मग हजर-मज्यालस सभानाईक यांचे खात्रेस आले जे वाद्या जैसा निकाल काढील तो निकाल काढून वाद तोडिला पाहिजे. यानंतर गोळ्यानें रवा काढला. गोळ्यास रवा लागला अर्थात् तो खोटा ठरला.

राघो नारायण प्रभु वि॥ गणेश दत्ताजी प्रभु यांचेमध्यें परगणे साळसे प्रांत कल्याण येथील देशपांडेवृत्तीबद्दलचा व्यवहार होता. उभयतां वाद्यांच्या तक्रारी ऐकून घेऊन गणेश दत्ताजी यानें दिव्य करावें असें ठरलें व दिव्य करण्याकरितां वज्र-जोगिणी प्रांत कल्याण हें स्थळ नेमून देण्यांत आलें. वज्र-जोगिणी येथें दिव्य करण्यास जावें तों तेथील ब्राह्मण-सभेच्या विचारें गणेश दत्ताजीचा भोगवटा होत आला आहे त्यास दिव्य बोलिलें नाहीं ऐसा निर्णय झाला.'

या व्यवहाराची हकीगत निवाडेपत्रांत जी दिली आहे त्यावरून गणेश दत्ताजी हा जरी खरा वतनदार नव्हता तथापि देशपांडे वृत्तीचा भोगवटा फार दिवस त्याचेकडे चालू होता असें दिसतें. ही गोष्ट लक्षांत घेऊन ब्राह्मणसभेनें वरील हरकत घेतली हें उघड आहे. ब्राह्मणसभेनें याप्रमाणें निर्णय केल्यानंतर राघो नारायण यानें कजचे कोपरगांव परगणे कुंभारे येथें श्री गोदातीरीं श्री शुक्लेश्वर देवा संन्निध बाजीराव बल्लाळ पेशवे व थोर थोर पंडित व शास्त्रज्ञ यांचे समक्ष दिव्य केलें. एक लोखंडाचा गोळा पंचाशत पळाचा ह्मणजे १६६॥ तोळे दोन मासे वजनाचा विस्तवांत तापून लाल करण्यांत आला. राघो नारायण याचे हातावर पिंपळाची पानें ठेऊन ती कच्च्या सुतानें बांधण्यांत आलीं. नंतर तो तापलेला गोळा त्याचे हातावर ठेवण्यांत आला. राघो नारायण सात मंडळें चालत जाऊन त्यानें आठवे मंडळांत ठरलेले ठिकाणीं गोळा टाकला. ज्या ठिकाणीं गोळा टाकावयाचा होता, त्या ठिकाणीं पूर्वींच कणीक ठेवण्यांत आली होती ती जळाली नंतर शिरस्त्या-प्रमाणें राघो नारायणाचे हात पिशवींत घालून ते बंद करून त्यावर लाखोटें कर-ण्यांत आले. व त्यास तीन दिवस अटकेंत ठेवण्यांत आलें. तीन दिवसानंतर त्याचे हात सोडून तपासतां हातास कांहीं इजा झाल्याचें आढळलें नाहीं. सबब राघो नारायण वतनाचा खरा मालक ठरून वतन त्याचे स्वाधीन करण्यांत आलें.

उभयतां वाद्यांस समवेत दिव्य कर-ण्यास लावण्याचा प्रघात असे हें मौजे सोनेरी तर्फ कऱ्हे पठार प्रांत पुणें सरकार जुन्नर येथील ज्योतिष व कुळकर्णी वतना-

बद्दल शके १५९० सालचे शिवाजी महाराजांचे निवाडेपत्रावरून दिसतें.

क्रियेप्रमाणें दिव्य करण्यास हि मुहूर्त लागत असे. ग्रामउपाध्येपणाबद्दलचे व्यवहाराचे निवाडेपत्रावरून हें सिद्ध होतें.

या निवाडेपत्रांतील यासंबंधींचा उल्लेख अशा प्रकारचा आहेः—मार्गशीर्ष शु॥ ५ रविवारी दिव्य करार केले. दिव्यसमयीं रवापात्रांतील तेलतुपास अग्नि लागला आणि जळोन गेलें व ह्मणून दिव्य राहिलें. या उपरी दिव्यास दुसरा मुहूर्त समस्तांचे विचारें शके १६४७ विश्वावसू नाम संवत्सरे मार्गशीर्ष शु॥ १३ सोमवारीं निश्चय केला."

वाड यांचीं "सनदा आणि पत्रें" पान १२ मध्यें दिव्याचा जो प्रकार दिला आहे तो जरा निराळ्या प्रकारचा असल्याकारणानें तो येथें नमूद करतों. मौजे घाटण तपे करकंब व मौजे भोसर तपे उंदरगांव या दोन गांवचे शिवेचा तंटा होता. या तंट्याचा निकाल दिव्याचे आश्रयानें करण्यांत आला. दिव्य करणाराचे हातावर पिंपळाची पानें सात कोवारीच्या सुतानें शिवून ठेविलीं. दहीभात वजन ८०॥९ जोखून पानावर पसरला व त्यावर लोणी वजन ८००९ घातलें. ऐरण तापवून दिव्य करणाराचे हातावर देण्यांत आली. दिव्याचे जे निरनिराळे प्रकार पूर्वी नमूद करण्यांत आले आहेत त्याहून हा प्रकार निराळा आहे. दोन गांवचा शिवेचा तंटा असल्यास शिवेवर दिव्य न करतां शिवेची माती आणून इतर ठिकाणीं हि दिव्य करतां येत असे, असें वाड यांच्या सनदा पत्रांतील ३८ व्या पानावरील निवाडपत्रावरून दिसतें. क्रियेच्या अनेक प्रकारांपैकीं देवापुढें चिठ्या टाकून वादाचा निकाल करण्याचा हि प्रघात होता. वाड यांचे सनदापत्रांतील पान १७ वर जो महजर दिला आहे त्यांत उभयतां वाद्यांमध्यें ह्मसोबापाशीं चिठ्या टाकाव्या त्यांत खरा खोटा जो असेल तो निवडेल असा ठराव झाला. मग शिराधडाच्या चिठ्या दोनी करून देवापाशीं टाकिल्या. मग त्या उभयतांस बोलावून सांगितलें कीं, चिठ्या उचलों. त्यास त्या दोघांनीं चिठ्या उचलून आणल्या. व शिराची चिट्टी मावजीनें आणली, धडाची चिट्टी केरोजीनें आणली; त्या चिठ्या वाचून पाहून हुजरमजालसीनें मावजी पाटलानें मोकदमी करावी आणि केरोजी पाटलानें बापरोटी निम्मेमात्र खावी असा ठराव केला.

## शिरोपत्र, श्रीपत्र, चीरपत्र व भाळपत्र

क्रिया अगर दिव्य करते वेळीं क्रिया अगर दिव्य करणाऱ्या इसमानें जी प्रतिज्ञा केली असेल ती कागदावर लिहून तो कागद क्रिया अगर दिव्य करणाऱ्या इसमाचे डोक्यास बांधावा लागत असे, असें कित्येक निवाडेपत्रांवरून दिसून येतें. या कागदास शिरोपत्र, श्रीपत्र, चीरपत्र, भाळपत्र असें ह्मणत असत. क्रिया करते वेळीं जी प्रतिज्ञा करण्यांत आली असेल त्या प्रतिज्ञेंतील नमूद केलेली गोष्ट फक्त सिद्ध समजण्यांत येई. प्रतिज्ञेवरून ज्या गोष्टीचें अनुमान काढतां येईल ती गोष्ट क्रियेचे योगानें सिद्ध झाली असें समजत नसत. या मुद्याचें जास्त स्पष्टीकरणार्थ एक उदाहरण येथें नमूद करितोंः—

कान्होजीराव शिरके वि॥ देवजीराव बिन पिलाजीराव शिरके यांचेमध्यें मामलेरायरी शिरकाण येथील सरदेशमुखीचे वतनाबद्दल शके १६४० सालीं व्यवहार उत्पन्न झाला. कान्होजीराव शिरके यांनीं या व्यवहाराचे बाबतींत पूर्वी एकदां श्रीकृष्णेचें दिव्य केलें होतें व त्या दिव्याचे योगानें देवजीरावाचे वतनावरील सर्व

हक्क नष्ट झाले असा मुद्दा कान्होजीरावा-तर्फे पुढें करण्यांत आला. या मुद्याचें विवेचन महजरनाम्यांत खालीं नमूद केल्याप्रमाणें केलें आहे.

हा महजरनामा मुद्गलराव पंडित, बाळाजी विश्वनाथादि अष्ट प्रधान, सरदार व गोत यांचे हजरमजालसींत झालेला आहेः—"कान्होजी राजे शिरके यांनीं श्री कृष्णेचें दिव्य केलें त्याचा विचार पाहतां उभयतां वादी यांचा मूळ पुरुष वाघोजी शिरके यास पुत्र तानाजीराव पिलाजीराव एकूण दोघे पैकीं वडील तानाजी यास पुत्र कान्होजी त्याचे रामोजी त्याचे कान्होजी त्याचे हल्लीं लक्ष्मणराव व धाकटे पिलाजी त्यास पुत्र देवजी राजे शिर्के त्याचे हल्लीं तुह्मी एका मूळपुरुषाचा वंश असतां मामलेरायरी शिरकाण येथील सरदेशमुखीचे वतनाचे वडिलपणाचा शिक्का आपला ऐसे देवजी शिर्के ह्मणत नसता व वडीलपणें आह्मी देऊं ते देवजीराजे शिर्के यांनीं घ्यावें असें कान्होजी राजे यांचें बोलणें असतां वडीलपणा शिक्का आपला ह्मणून श्रीकृष्णेचें दिव्य केलें तें दिव्य विरुद्ध कैसे पडेल व दिव्याचे उच्चारांत देवजी शिर्के याशीं वतनाशीं संबंध नाहीं असें असते तरी दिव्य लागतें तें गोष्ट कांहीं च नाहीं तेव्हां वडील असतां वडीलपणाचें दिव्य केल्यामुळें देवजी शिर्के याशीं वतनाशीं संबंध नाहीं, ऐसें कैसें घडेल." कान्होजीरावांनीं क्रियेचे वेळीं जी प्रतिज्ञा केली त्या प्रतिज्ञेस देवजी राजे शिर्के याचा वतनाशीं कांहीं संबंध नाहीं अशी प्रतिज्ञा केली नव्हती. वडील आह्मी, व वडील या नात्यानें शिक्का आमचेकडे चालावा अशी त्याची प्रतिज्ञा होती व तेवढा च मुद्दा फक्त कान्होजी रावांनीं केलेल्या क्रियेमुळें शाबीत झाला, असें ठरविण्यांत आलें. परंतु ह्या प्रतिज्ञेवरून देवजीराजे याचा वतनाशीं संबंध नाहीं असें अनुमान कदाचित् कोणीं काढलें तर तें कान्होजीरावांनीं केलेल्या क्रियेमुळें शाबीत आहे असें ठरवितां येत नाहीं.

पांच, दहा अगर पंधरा दिवसांची मुदत ठरवून वाद्यांपैकीं कोणाचें कांहीं नुकसान झाल्यास ज्याचें नुकसान होईल तो खोटा समजावयाचा असा क्रियेचा एक प्रकार पूर्वीं सांगण्यांत आला आहे. ह्या क्रियेचे प्रकारांत मुदत ठरविणेचे वेळीं उभयतां वाद्यांपैकीं कोणाच्या घरचा मनुष्य आजारी असल्यास व ठरलेल्या मुदतींत मेल्यास त्या मनुष्याचे मरणामुळें क्रिया लागू झाली असें समजत नसत.

कोणत्या हि व्यवहाराचा निर्णय क्रियेच्या आश्रयानें करणें ही कमीपणा आणणारी गोष्ट आहे अशी त्या कालीं शिष्टांची समजूत होती. प्रवरासंगम येथील धर्माधिकारीवृत्तीबद्दलचा व्यवहार कोल्हापुरचे श्रीमत् शंकराचार्यांकडे निर्णयाकरितां पाठविला होता. त्या व्यवहारांत श्रीमत् शंकराचार्यांकडे उभयता वाद्यांपैकीं एक वादी क्रियाकरण्यास तयार झाला. तेव्हां श्रीमत् शंकराचार्य यांनीं तो विचार मोडला कीं "हे गोष्ट आपल्या थळास योग्य नाहीं, तुह्मी उभयतां भले ब्राह्मण अग्निहोत्री आहा, तुमचे प्रतिष्ठेस क्रिया योग्य नाहीं."

ह्यावरून क्रिया करणें कमीपणा आणणारें समजलें जात होतें हें उघड आहे. ज्या व्यवहारनिर्णयाचे कामीं क्रियेचा अवलंब केला गेला आहे त्या च कामीं दिव्य करीन असें मागणें पराजय पावलेल्या वाद्यास करितां येत असे असें पाडळी तर्फ हवेली प्रांत सातारा येथील कुळकर्णीवतनाबद्दल शामजी गंगाधर व गोपाळ तुकदेउ यांचेमध्यें झालेल्या व्यवहाराचे निवाडेपत्रावरून व शिरवळ येथील ग्रामउपाध्येपणाबद्दल मांडके जोशी व वाळिंबे यांमध्यें झालेल्या व्यवहाराचे निर्णयपत्रावरून दिसतें.

प्रतापसिंह महाराजांच्या न्यायाधीश-प्रकरणीं एकोणचाळीस कलमांपैकीं गुन्हेगारी व शेरणी संबंधीं नियमांचा वर उल्लेख केलेला च आहे. वादांत जो खोटा होईल त्याचेकडून घ्यावयाचे रकमेस गुन्हेगारी असें ह्मणत. खरा होईल त्याचे कडून घ्यावयाचे रकमेस शेरणी अथवा हरकी ह्मणत. दोन चार निवाडेपत्रांवरून शेरणीचे दुप्पट गुन्हेगारी घेण्यांत येत असे असें दिसतें. कांहीं उदाहरणांवरून वादांत यशस्वी झालेल्या इसमाकडून च फक्त शेरणी घेण्यांत येऊन पराजय पावलेल्या इसमाकडून गुन्हेगारी बिलकुल घेतली नाहीं असें दिसतें.

शेरणी, हरकी, गुन्हेगारी याबद्दल वसूल करावयाचे रकमेचें प्रमाण ज्या बाबतीबद्दल व्यवहार असेल, त्या बाबतीचे किंमतीवर अवलंबून असे. बडवे आणि बेपारी यांचे मध्यें श्री विठ्ठलाचे पालखीपुढें ठेवलेल्या अगर श्रीस अर्पण केलेल्या वस्तूवर मालकी कोणाची असेविषयीं वाद होता. त्या कामीं बडवे खरे ठरले तेव्हां त्याचेकडून सरकारची हरकी ७००१ सात हजार एक हप्तेबंदीनें घेण्याचा ठराव करण्यांत आला. २००१ तूर्त, २००० भाद्रपद शुद्ध १, १००० आश्विन शुद्ध १, २००० कार्तिक अखेर. तीन महिन्यांचे अवधींत एवढी मोठी रकम बडव्यांकडून वसूल करून घेण्याचा ठराव केला. ह्यावरून बडव्यांची प्राप्ति किती मोठी होती याची कल्पना होते.

वतनासंबंधीं व्यवहार असल्यास त्या व्यवहाराचा निर्णय झाल्यानंतर वादांत जो खरा ठरेल त्या वतनदारास लेख करून देण्यांत येत असे त्यास वतनपत्र अथवा वृत्तीपत्र असें ह्मणत. ह्या खेरीज ज्या प्रांताचे हद्दींतील वतन असेल त्या प्रांताचे सुभेदारास व देशमूख देशपांडे व वतनाचे व्यवहाराचा निकाल झाल्याची माहिती ज्या अधिकाऱ्यास असणें अवश्य अशा अधिकाऱ्यास ती माहिती कळविण्यांत येत असे.

विषप्रयोग झाल्याबद्दल व्यवहार असल्यास सरकारी अधिकाऱ्याकडे अर्ज देऊन एका वैद्याची नेमणूक करून घेऊन त्याचे विद्यमानें विष पाडून तें सरकारी अधिकाऱ्याचे हवालीं करून त्या विषाची पारख चांगल्या वैद्याकडून करवून घेत असत.

मिताक्षरा हा ग्रंथ महाराष्ट्रांत प्रमाणभूत समजत असत व त्यांतील नियमांस अनुसरून व्यवहारनिर्णय करण्यांत येई असे विषयीं बरीं च उदाहरणें पूर्वीचे लेखांत दिलीं आहेत. ह्या च विषयासंबंधीं आणिक कांहीं उदाहरणें येथें देतों.

सोपडे वि॥ सोपडे याचेमध्यें देशमुखी वतनाबद्दलचा जो व्यवहार होता, त्यांत वडील मुलगा कोण—प्रथम जन्मास आलेला किंवा वडील बायकोचे ठिकाणीं जन्मास आलेला—असा प्रश्न होता. मग समस्त सभानायकांनीं श्री विज्ञानेश्वर ग्रंथ मनांत आणून निर्णय केला कीं, "बापाच्या पुत्राच्या अनुक्रमाप्रमाणें वडील-धाकुटपणाचा निश्चय खरा, स्त्रियांच्या अनुक्रमावरी पुत्राचा अनुक्रम नाहीं." ह्याप्रमाणें ह्या प्रश्नाचा निर्णय करण्यांत आला.

मनुस्मृति अध्याय ९ श्लोक १२५ मध्यें या प्रश्ना संबंधीं खालीं नमूद केल्याप्रमाणें व्यवस्था सांगितली आहे.

सदृशस्त्रीषु जातानां पुत्राणामविशेषतः।
न मातृतोज्यैष्ठ्यमस्ति जन्मतो जैष्ठ्यमुच्यते॥

समानजातीय स्त्रियांचे ठायीं उत्पन्न झालेल्या पुत्रांमध्यें जातीसंबंधीं विशेष नसल्यामुळें मातेच्या विवाहक्रमानें ज्येष्ठत्व येतें असें ऋषी ह्मणत नाहींत. तर ते जन्माप्रमाणें च ज्येष्ठत्व व कनिष्ठत्व समजतात.

मिताक्षरा टीकेमध्यें मनुस्मृतींतील ह्या श्लोकाचा हवाला देऊन या प्रश्नाचा निकाल मनुस्मृतीप्रमाणें च लाविला आहे.

इंदापुर येथील महार व मांग यांचें मध्यें वृत्तीबद्दल तंटा लागला. तेव्हां उभयतां महार–मांगांस पैठणचे स्थलास पाठविलें. महार व मांग यांनीं राजीनामे लिहून दिले कीं, निर्बंधीं निवडेल त्यास आपण राजी असो. त्यावरून हजीर-मजालसी यांनीं पंडिताकडून निर्बंध काढून निर्बंधांत असेल त्याप्रमाणें निवाडा करणेचें ठरविलें. निर्बंध काढून पाहतां निर्बंधीं खालीं लिहिल्याप्रमाणें निघालें:—

"पड पडेल ते महारांनीं न्यावी, आपली जीवनवृत्ति करावी. प्रेताचे वस्त्र व चार रूकें घेणें ते महारानें घ्यावे. व महालक्ष्मी-ची सुवासीन व पेढी याची घागर गावा-भोंवतीं फिरवावी, "मांगास संबंध नाहीं. मांगानें नाडे कातड्यांचे व वाती करून आपली उपजीविका करून" ऐसा निर्बंध निर्वाह झाला. याप्रमाणें पैठणीहून सडी आली व तीस अनुसरून महार–मांगांचे वृत्तीच्या तंट्याचा निवाडा करण्यांत आला.

साबजी बिन सूर्याजी मोकदम विरुद्ध नेताजी बिन धारोजी मोकदम यांचेमध्यें कसबे तलवीड येथील पाटिलकीवतनाबद्दल वाद होता. वाड यांचीं सनदापत्रें पान ११५ मध्यें या वादाचें निवाडेपत्र दिलेलें आहे. निवाडेपत्रामध्यें उभयतां वाद्यांमध्यें तकारीचा मुद्दा कोणता होता हें समजण्यास मार्ग नाहीं. परंतु, अखेरच्या निवाड्यावरून वादग्रस्त प्रश्न कोणता होता याविषयीं कल्पना होते. वडिलार्जित मिळकतीवरील कुटुंबाची मालकी नष्ट झाल्यानंतर, एकत्र कुटुंबांतील सहभागिदारां-पैकीं एखाद्यानें स्वकष्टानें संपादन केल्यास त्यांस इतर सहभागीदारांना हिस्सा मागण्याचा हक्क आहे किंवा काय असा प्रश्न या वादांत उपस्थित झाला होता, व या प्रश्नाचा निकाल हजरमजालसीनें विज्ञानेश्वराच्या आधारें केला. 'तेथें अज्ञेनें धाकटा होऊन वृत्तीस कस्त करून रक्षील तर त्यासही द्यावा आणि समाजावीस करावी. या विचारें धर्मता बरहक्क दरदोवादीयाचा निवाडा केला.' मिताक्षराटीकेमध्यें दायभागप्रकरणांत याज्ञवल्क्य-स्मृतींतील ११८ व ११९ श्लोकांवरील टीकेंत खालील उल्लेख आलेला आहे:–

'क्रमात्पितृक्रमादायातं यत् किंचित् द्रव्यं अन्यैर्हृतमसामर्थ्यादिना पित्रादिभिरनुध्दृतं यः पुत्राणां मध्ये इतराभ्यनुज्ञयोद्धरति तद्दायादेभ्यो भ्रात्रादिभ्यो वा दद्यात् । उद्धृतैव गृह्णीयात् । तत्र क्षेत्रे तुरीयांशमुद्धर्ता लभते शेषं तु सर्वेषां सममेव । यथाह शंखः।'

'पुढें पुत्रांतील एकाद्यानें इतरांच्या अनुज्ञेनें तें त्या अपहारकापासून परत मिळविलें तर त्यानें तें हि भ्रात्यास देऊं नये. ज्यानें त्याचा उद्धार केला असेल त्यानें च तें घ्यावें. पण तें क्षेत्र असल्यास उद्धार करणाराला त्याचा चवथा भाग मिळतो. बाकीचें सर्वांनीं सारखें वाटून घ्यावें.' या तत्त्वास अनुसरून पाटिलकी वृत्ती-बद्दलचा वाद असल्याकारणानें वृत्तीसंबंधाच्या इनाम जमिनी मानपान वगैरेंच्या सारख्या दोन वाटण्या करण्याबद्दल हजर-मजालसीनें निर्णय दिला.

वाड यांचीं सनदापत्रें पान ४७ मध्यें मौजे चन्होली तर्फ हवेली प्रांत पुणें येथील कुळकर्णी वतनाबद्दलचा महजर छापला आहे. वतनाचा मालक गणेश जनार्दन हा निपुत्रिक मरण पावला त्याचे मागें त्याची कन्या जिऊबाई ही होती. वतनास वारस जिऊबाई ठरवून हजरमजालजीनें तिचे नांवचा महजर करून दिला. महजरामध्यें या मुद्यासंबंधीं खालील उल्लेख आहे. 'अवलाद बुडाली तरी अफलादीनें वतन खावें हें चालत आलें आहे. गणेश जनार्दन याचे पत्रसंतान बुडालें त्याची कन्या जिऊबाई

गोविंद खंडेराव यांची बायको अफलाद तिनें वतन खावें हें शास्त्रप्रमाण आहे व चराचरही चालत आहे.' हा निवाडा शके १६०७ सालचा आहे. त्यावरून वतन-मिळकतीच्या वारशासंबंधीं शास्त्र व वहिवाट कोणत्या स्वरूपाची होती हें दिसून येतें. एके काळीं वतन मिळकतीवर कोणत्या हि स्त्रीस वारस या नात्यानें मालकी प्राप्त होत नाहीं असें सदर दिवाणी अदालतीचे निवाडे होते व त्यांस अनुसरून मुंबई इलाख्यांतील वतनमिळकतीची व्यवस्था केली जात असे. याज्ञवल्क्यस्मृतींतील दायविभाग प्रकरणांतील ' पत्नीदुहितरश्चैव पितरौ भ्रातरः ' इत्यादि १३५ व्या श्लोकांत ग्रथित केलेल्या तत्वास अनुसरून वरील निवाडा केलेला आहे हें उघड आहे.

वाड यांचीं सनदापत्रें पान २०३ मध्यें श्रीकराचार्यांस राजाराममहाराजांनीं मौजे मांगले कसवे सावरे प्रांत पन्हाळा हा गांव दान दिला त्याबद्दलचा निवाडा आहे. राजाराममहाराजांनीं सकुश हिरण्योदक श्रीकराचार्यांचे हातावर घालून त्यांस हा गांव धारादत्त दान दिला. श्रीकराचार्यांनीं आपले भावबंदांची ममता धरून आपले ज्येष्ठ कनिष्ठ बंधु व पुतणे व स्वतः असा एकंदर सर्वांचे नांवचा लेख करून घेतला. कालांतरानें मांगले गांवाचे मालकीबद्दल श्रीकराचार्य व त्यांचे बंधु यांचेमध्यें वाद उत्पन्न झाला. गांवाचे पत्रीं आमचीं नांवें घातलीं आहेत, यास्तव आह्मास गांवाचा अंश द्यावा असा श्रीकराचार्यांचे भावांनीं वाद सुरू केला. सदरहू वादाचा निकाल श्रीमत् शंकराचार्य यांचेकडे सोंपविण्यांत आला शंकराचार्यांनीं विज्ञानेश्वर, व्यवहारमयूख, दानकमलाकर हे ग्रंथ मनास आणून ज्या-अर्थीं गांव दान दिल्याचा संकल्प राजाराम-महाराजांनीं श्रीकराचार्य यांच्या नांवाचा करून त्यांचे एकट्याचे हातावर उदक सोडलें त्याअर्थीं दान दिलेल्या गांवांचे मालक श्रीकराचार्य हे एकटे च होत असें ठरविण्यांत आलें. निर्णयपत्रामध्यें खालीं नमूद केल्याप्रमाणें विवेचन केलेलें आहे. ' मुख्य अर्थ हा आहे कीं, जो ग्राम भूमी इत्यादि वस्तूंचें दान ब्राह्मणास देतो ते आपलें नामगोत्रोच्चारण व या ब्राह्मण नामगोत्रोच्चारण व त्या ग्रामादि यांचें नामोच्चारण करून अहम् तुभ्यमिदं संप्रददे ह्मणजे मी तुजकारणें देतों ऐसें ह्मणोन सकुश हिरण्योदकपूर्वक ग्रामादि दानग्रहणादि पर्वकाळीं देतो. त्याचें दानपत्रीं त्या च दात्याचें नांव, अथवा ज्या ब्राह्मणानें प्रतिग्रह घेतला च नाहीं त्या ब्राह्मणाचें नांव अथवा जी वस्तू दिली च नाहीं त्या वस्तूचें नाम लिहून दानपत्र केलें तर तें दानपत्र अप्रमाण. तैसें पत्र ज्यानें केलें त्यानें १०८० ढवू राजगृहीं द्यावे ऐसें धर्मशास्त्र आहे. व तसें पत्र पूर्वील राजाचें कोणी एकानें लोभादि उपाधि करून केलें असेल आणि तें वर्तमान जो राजा आहे त्यास कळलें कीं ज्या ब्राह्मणास दान दिलें नाहीं त्याचे नांवें हें पत्र झालें आहे, असें कळलें तरी तें पत्र दूर करून यथास्थित ज्या ब्राह्मणास दान दिलें त्याचें नांवें आणखी दुसरें पत्र करून द्यावें. हा धर्मन्याय आहे. अन्यथा दोष आहे.' या उताऱ्यांतील तत्त्वास अनुसरून एक हजार ऐंशीं ढवू ह्मणजे ४५ रुपये श्रीकराचार्यांकडून घेऊन मांगले गांवचे नूतन पत्र श्रीकराचार्य यांचे

एकट्याचे नांवचें करून देण्यांत आलें.

स्मृतिग्रंथावर ज्याप्रमाणें मिताक्षरीसारख्या टीका निर्माण झाल्या त्या च प्रमाणें स्मृतिप्रतिपादित कांहीं विवक्षित विषयांवर स्वतंत्र निबंधरूपी ग्रंथ निर्माण झाले. अशापैकीं एका ग्रंथाचे आधारानें वरील निवाडा केल्याचें दिसतें. विज्ञानेश्वरांनीं केलेल्या मिताक्षरी टीकेखेरीज निबंधादि ग्रंथ हि व्यवहारनिर्णयाचे कामीं प्रमाणभूत मानले जात असत हें उघड आहे. आतां शेवटीं एका नवीन मुद्याचें दिग्दर्शन करून हा लेख पुरा करितों.

स्मृतिग्रंथांत आचार, व्यवहार आणि प्रायश्चित्त या तीन विषयांचें मुख्यत्वेंकरून प्रतिपादन केलेलें असतें. राजांनीं स्वतः अगर त्यांनीं नेमलेल्या विद्वान् ब्राह्मणांकडून प्रजेंत उत्पन्न होणाऱ्या व्यवहाराचा निर्णय करून प्रजेस संतुष्ट ठेवणें, हें जसें राजाचें कर्तव्य समजलें जात असे त्या च प्रमाणें प्रजेंतील प्रत्येक वर्णाचे लोक वर्णाश्रमधर्मास अनुसरून वागत आहेत किंवा नाहींत हें पाहण्याची व श्रुतिस्मृतिप्रणीत धर्मास अनुसरून न वागणारास प्रायश्चित्तादि देण्याची जबाबदारी हि राजावर होती. शिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्रांत जी स्वराज्यस्थापना केली तिचा मुख्य विशेष ह्मटला ह्मणजे श्रुतिस्मृतिप्रणीत धर्मास अनुसरून वर्तन करणारा लोकसमाज अस्तित्वांत आणणें हा होता. मराठी समाजाचा लय होईपर्यंत या तत्त्वास अनुलक्षून मराठी राजसत्तेचीं सूत्रें हातीं बाळगणारे अधिकारी तजवीज ठेवीत असत असें कृष्णाकाठच्या कऱ्हाड क्षेत्राचे गिजरे या उपनांवाचे धर्माधिकारी घराण्याचे कागदपत्रांवरून दिसतें. शिवाजीमहाराजांनीं राज्यव्यवस्थेचे सोयीचे दृष्टीनें जे अष्टप्रधान नेमिले होते त्यांपैकीं * पंडितराव हें पद धारण करणारा एक प्रधान असे. पंडितरायांनीं सर्व धर्माधिकार धर्माधर्म पाहून विचिक्षा करावी. शिष्टांचे सत्कार करावे. आचार, व्यवहार, प्रायश्चित्तपत्रें होतील त्यांवर **संमत** चिन्ह करावें. दानप्रसंग, शांति, अनुष्ठान तत्काळीं करावे, या स्वरूपाचें पंडितराव ही पदवी धारण करणाऱ्या प्रधानाचें कार्य होतें. मराठी राज्यांतील सुभा व त्याचे हाताखालील अधिकारी यांच्या अनेक कर्तव्यांपैकीं त्यांचे ताब्यांत असलेल्या मुलखांत कोणीं वर्णाश्रमधर्माविरुद्ध वर्तन केल्यास त्याची बातमी पंडितराव यांस देणें हें एक कर्तव्य होतें. अशा रीतीनें पंडितराव यांस कोणाचे हि दुर्वर्तनाबद्दल बातमी मिळाल्यास पंडितरावांनीं कऱ्हाड, वाई, नाशिक, कोल्हापूर, वगैरे मोठमोठ्या क्षेत्रांचे ठिकाणीं असणाऱ्या विद्वान ब्राह्मणांचे व त्या त्या क्षेत्रांचे धर्माधिकाऱ्यांचे सल्ल्यानें त्यास प्रायश्चित्त देऊन पावन करून घ्यावयाचें असा परिपाठ होता. कऱ्हाडचे गिजरे धर्माधिकारी यांचेकडे ज्या स्वरूपाचे कागदपत्र उपलब्ध झाले आहेत, त्या च स्वरूपाचे कागदपत्र दुसऱ्या कांहीं प्रसिद्ध स्थानच्या क्षेत्रांचे धर्माधिकाऱ्यांकडे उपलब्ध होण्याचा संभव आहे. तोंपावेतों या मुद्याचें अधिक विवेचन करण्याचें तूर्त तहकूब ठेवणें अपरिहार्य आहे.

**भास्कर वामन भट**

* सनदा आणि पत्रें (वाड) पान १२३

# परिशिष्ट १

## न्यायाधिशी प्रकर्णी कलमें

१ या मुलकांत दस्तुर बहूत चांगला आहे कीं पडोसी रई मिलोन आपसांत समजोन कजिया तोडतात हें फार चांगलें आहे त्यास पंचाईत केल्यासिवाय दुसरा इलाज नाहीं आसें होईल तेव्हां पंचाईत करावी कलम

२ कदीम दस्तुर चांगला आहे तो सरकार कायम करीत आहेत आडोसी पडोसी खटला फैसल करतील आपसांत पंचाईत तुटली आसतां सरकार फिरवावयाचें नाहीं हे सर्व लोकांस दील दिलासा भरंवसा या करितां कलम लिहिलें आहे कलम

३ सारे गांव वेगळे वेगळे आहेत गांवांत पाटील आहे तो सरकारचा चाकर साऱ्याहून मोठा आहे तो चांगला असल्यास गांवचे सारे लोक त्याचा हुकूम मानतील व त्याचा मगदूर वाजवी असेल तो कायम राखावा ये विसी सरकारांतून त्याची पुस्तपन्हा होत जाईल तो जुलूम करील गांवचे लोकांस मिलोन गोही खोटी करील किंवा लाच खाईल तरी त्यास शिक्षा होईल कलम

४ गांवांत कजिया असेल त्याचा फैसला आपसांत न होई तरी दाई मुदाई पाटील याजपासी येतील पाटील आपसांत समजण्याची बहूत मेहनत करील व जेथें पंचाईनि कमी आहेत त्या गांवचा बंदोबस्त चांगला आहे असें सरकार समजेल व आपसांत न समजतां पंचाईत करणें जरूर जाहालें तरी पाटील यानें लाहान कजिया असल्यास सरकारांत समजाविल्या सिवाय पंच जमा करून राजिनामा घेऊन वाजवी पंचाईत करून सारांष केलीयास चिंता नाहीं पंचाईत पुरी होऊन सारांष होईल तो व उभयतां वादी याचे राजीनामे कुलकर्णी याजपासीं आसावे यांत खराब नसलियास ती पंचाईत कायम होईल फिरावयाची नाहीं कांहीं खराब जालीयास मामलेदार यास समजवावें त्यांनीं पकी चौकसी करून त्याचे मनांत आसिलें कीं पंचाईत चांगली जाली नाहीं तरी त्यास सरकारांत पाठवितील व कसी पंचाईत खराब जाहाली ती त्याजबरोबर लिहून पाठवीत जातील कलम

५ पाटील लाहान कजिया पंचाईत करीत नाहीं किंवा दाई मुदाई गांवांत पंचाईतीस राजी नाहींत तरी मामलेदार याजवळ जातील मामलेदार पाटील यास सांगोन पंचाईत करवितील अथवा दुसरे थलास पंचाईत देतील किंवा जसा भूत आगरी देवाचा कजिया मनांत आणणें गरज नाहीं त्या प्रमाणें पंचाईत करावयासी त्यायख नसल्यास फिरोन लावितील ते मामलेदार यांनीं महिन्याचा झाडा पंचाईत प्रकर्णी पाठविणें त्यांत भूत देवाचा कजिया खेरीज करून झाडा लिहून हुजूर पाठवीत जाणे कलम

६ शहरांतील व गांवांतील पेठेंत शेटे माहाजन यांनीं उदमी व सौदागर याचा लाहान कजिया आसेल तो पंचाईत करणें चाल आहे आपसांत न समजले तरी त्या वादी प्रतिवादी राजीपणें आडोसी पडोसी पंचाईत फैसल सेटे माहाजन यांनीं करावी सारांष व राजीनामे शेटे माहाजन या जवळ राहावे जसे गावांत पाटील याची

पंचाईत कायम आहे तसेच शेटे माहाजन पंचाईत करतील ती कायम आहे कलम

७ मोठा कजिया आहे पंचाईत सेटे माहाजन व पाटील करावयासी त्यायख नाहीं तो कजिया किती मोठा आसला तरी पडोसी याचे बोलण्यावर तुटले असतां चांगलें आहे कलम

८ दोस्तीनें तुटत नाहीं तरी मामलेदार याजवळ वादी प्रतिवादी यानें जावें मामलेदार हर येक तऱ्हेनें समजोन करवितील मामलेदार याचे समजाविल्यानें समजूत न पडे तरी मामलेदार यांनीं दोघांचे राजीपणें पंचाईतदार जमा करून पंचाईत करावी ती पंचाईत सुरू जाहाल्यावर दोघे राजी होऊन बोलले कीं आह्मी तिसरे येक माणसावर राजी आहों तरी प्रथम त्या दोघांचे राजीनामे घेऊन नंतर पंचाईत बंद करून त्याजकडे पाठवून द्यावे त्याजपासीं न समजतां फिरोन आले तरी त्या वेळेस जितक्या पंचाईती हुजूर किंवा मामलेदार याजवळ आसतील त्या साऱ्या फैसल जाहाल्यावर ती पंचाईत करावी कलम

९ वादी प्रतिवादी पंचाईतीस राजी होऊन राजीनामा देऊन त्याहून पंचाईतीस गैर हाजर जाहाल्यास त्याजकडील खटल्याची जी वहिवाट आसेल ती हाजर राहील त्याजकडे चालेल हें समजोन वादी प्रतिवादी यांनीं हाजर आसावें गैर हाजर जाहाल्यास तो मजकूर मामलेदार यांणीं हुजूर लिहीत जावा कलम

१० कोणी फिर्याद येतील त्यांचीं नांवें नंबर वार कोणते तारखेस आले ते लिहीत जावें आणि ज्या वेळेस फिर्याद येतील त्या वेळेस समजोन द्यावयास फुरसत नसलियास अगोदर येतील त्या नंबराचे अनुक्रमें आधीं समजत जावें मागाहून येतील त्याचें मग ऐकत जावें कलम

११ मामलेदार याचे हुकमानें पंच जमा जाले तर जो पंचाईतीचा दस्तुर आहे त्या प्रमाणें पंचाईत करून तपसिलवार सारांष करून त्या सारांषाची नकल हुजूर पाठवीत जावी पंचाईत होऊन सारांष जाहाला आणि येक वादी त्या प्रमाणें वागत नाहीं आसें जाहालीयास त्याची सबब पुसावी लाच व तरफदारी जाहाली असल्यास मुदा आणवून हुजूर मुदे सुद्धा पाठवावे ते नसलीयास पाहाणें गरज नाहीं सारांष जाहला आसेल त्याप्रमाणें वर्तणें विसी मामलेदार यांनीं ताकीद करावी कलम

१२ वादी अथवा प्रतिवादी यांजपासून पंचाईतदारांनीं लाच खाऊन गैर वाजवी केलें आसा संशय येऊन शाबूत करण्याचे मुदे असल्यास हुजूर अर्ज करावा वाजवी पंचाईत जाहाली आसतां त्याजवर उगेंच बाहने करून अर्ज केला तरी तो मनास आणावयाचा नाहीं कलम

१३ हर कोणी पंच यांणीं गैर वाजवी पंचाईत केली असी फिर्याद करतील त्यांनीं सरकारांत कतबा लिहून द्यावा कीं आह्मी फिर्याद केली ही खोटी ठरली तरी सरकारची गुन्हेगारी द्यावयाची ठरेल ती देऊं असा कतबा लिहून घेऊन जामीन घेतल्याशिवाय ती फिर्याद मनास आणावयाची नाहीं जर करितां पंचाईतदार यांणीं लाच

घेऊन किंवा गैर वाजवी केलें तरी पंचाईतीचा सारांष जाहल्यावर लाच व तरफदारीची प्रतिवादी याणें सहा महिन्यांत फिर्याद करून लागू करून दिल्यास ज्या कलमाचा सारांष जाहाला असेल तो तो फिरोन सन सबा आशर आकार वहिवाटी प्रमाणें चालले नाहीं तर बारा महिने जाहाल्यावर तरफदारीची फिर्याद कधींही मनास आणावयाची नाहीं व लाचाचे कलमा बदल चौकशी करण्यास मुदत नाहीं हर कोणी लाचाची फिर्याद करून लाच शाबूत केल्यास जो सारांष जाला असेल तो फिरणार नाहीं परंतु लाच देणार व घेणार त्याजविशीं खालीं एकूण चाळीसावें कलम लिहिलें आहे त्या प्रमाणें शिक्षा होईल कलम

१४ कर्जाचे वगैरे देण्याघेण्याचे जाबसाल आसतील ते इंग्रजी सरकारचे अंमलाचे पूर्वी छत्तीस वर्षा पलीकडील मनास आणूं नये वतन अगर जमीन गाहाण आसल्यास तो कजिया सत्तर वर्षा मागील मनास आणूं नये वतनदाराचा जो कजिया असेल तो सत्तर वर्षांत खटला असो किंवा नसो परंतु सत्तर वर्षांत ज्याचें भोग्य कधीं नाहीं तें मनांत आणावयाचें नाहीं हा कायदा मामलेदार व पंचाईतदार यास करून दिल्हा आहे परंतु गांवचे पाटील कुलकर्णी यांनीं मुलूक व गांवचे पहिले सिरस्ते व चाली प्रमाणें वहिवाट आपसांत करीत जावी कलम

१५ वादी प्रतिवादी पैकीं जो कोणी पंचाईतदार यास लांच व नजर दिल्हा हें शाबूत जाहल्यास खरा असेल तत्राप त्याचें खोटें होऊन लांच देणार व घेणार याचें पारपत्य होईल कलम

१६ तमाम लोकांस महशूर केलें जातें जे आपले खटल्याची समजूत आपसांत करून घेत आसावी आपसांत समजूत न पडे तरी कोणी तिराईत यांजपासून समजूत करून घ्यावी आपसांत कोणी तिराईत वादी प्रतिवादी यांची समजूत करून तंटा तोडतील तरी त्याजवर सरकार नाखुषी होणार नाहीं पसंत करतील कलम

१७ मामलेदार याणीं खंड घेणें व कैदेंत ठेवणें येविशीं मगदूर होता त्याहून हालीं जाजती मगदूर जाला कीं दाहा रुपये पर्यंत दंड घ्यावा दोन दिवस पर्यंत कैदेंत ठेवावें दंड घेतला व कैदेंत ठेवलें त्याचा मजकूर हुजूर लेहून पाठवीत जावा व किरकोळ खटला गांवांत जालियास त्याची चौकसी करून फैसला दस्तूर माफक पाटील यांणीं करावा मोटा कजिया जाला त्यास सजा जाली पाहिजे आसे आसल्यास मामलेदार यास खबर पाटील यांनीं देत जावी मामलेदार याजवळ फिर्यादी कोणते तेरखेस किती आल्या त्या पैकीं कोणते तेरखेस किती फैसला जाल्या त्या कोणते प्रकारें जाहाल्या त्या तपसील व फिर्यादी पैकीं फडसे होणें किती राहिल्या त्याची याद महिन्याचे आखेरीस दरमाहाचे दरमाहा हुजूर पाठवीत जावी कलम

१८ इनाम व जागीर व दुमाले गांवची वहिवाट चालत आहे त्यास पाटील कुलकर्णी व वतनदार सदरीं लिहिल्या प्रमाणें वहिवाट करतील त्या प्रमाणें यांनींही करावी इनामदार व जाहागीरदार व दुमालदार यांनीं मना करूं नये पाटील कुलकर्णी व वतनदार सरकार आज्ञे प्रमाणें चालतात ह्मणोन त्याचे

हाक वगैरे जप्त व आटकाव करूं नये जर करितां केल्यास बहूत सजा होईल इनाम जागीर व दुमाला सरकारांतून ज्याचा त्याजकडे चालेल या करितां त्यांणीं सरकार हुकूमा प्रमाणें चालावें चोर खुनी दरवडेखोर वगैरे हुजूर पाठवावे त्याजपासून दंड वगैरे घेऊं नये व आश्राही माहीत देतील व धरण्याची सुस्ती करतील त्यांचें इनाम व वतन जाहागीर व दुमाला जे आसेल ते जप्त केले जाईल कलम

१९ हर येक पंचाईत प्रकर्णी मागील आमलांतील दोघे वादी याजपासीं साधनें व फडशाचे कागद असल्यास ज्या जवळ आकरे फडशाचे कागद होतील त्या अन्वयें भोगवटा आसल्यास मुस्तकीम धरावें कलम

२० लबाडी फिर्याद मना होण्या करितां व आपसांत समजावें या करितां व पंचाईत पंच करितात त्याचे पोटगी करितां व साक्षीदार आणावे लागतात त्यास पोटखर्च सरकारांतून देणें पडतो सबब हरकी गुन्हेगारी ठरविली आसे कलम

२१ कोणीं देण्या घेण्याचे वगैरे खटल्या करितां फिर्याद येतील त्याच्या जबान्या घेऊन त्यांत अमूक बेरीज आसें लिहिलें आसेल त्याचे प्रतिवादी यास पुसावें त्या पैकीं प्रतिवादी बेरीज कबूल करितील ती वजा करून बाकी तंटा राहील त्याजविसीचे दस्तुर माफक गुन्हेगारीचे कतबे दोघां पासून घेऊन जामीन घ्यावे आग्रवादी यांणीं बेरीज लिहून दिली ती प्रतिवादी अगदींच रुजू नसल्यास त्या बेरजेस गुन्हेगारीचे जामीन दोघांचे घ्यावे नंतर त्या पैकीं दर्यादफी मुळें प्रतिवादी याजकडे कांहीं ऐवज लागू जाहल्यास तितके यैवजाची गुन्हेगारी प्रतिवादी याजपासून घेऊन बाकी यैवज लागू होणार नाहीं त्या यैवजाची गुन्हेगारी अग्रवादी याजपासून घ्यावी कलम

२२ सरकार वसुली मिरासी कुणबाव्या सुधां जमिनीचा कजिया आसेल त्या जमिनीचा जो सरकारांत येक सालचा वसूल येत आसेल त्याचे निमे गुन्हेगारी घ्यावयाची कलम

२३ कर्ज व भाऊवांटणी घर व सोनें व रुपें वगैरे मालाचे खटले असेल त्याचे किंमतीचे आकारावर एक रुपाया पासून दाहा हाजार पर्यंत शेंकडा रुपये दाहा प्रमाणें गुन्हेगारी दाहा हाजारा पुढें वीस हाजार रुपये पावेतों दर सदे रुपये आठ प्रमाणें घ्यावयाचे वीस हाजार रुपाया पासून येक लक्ष रुपये पावेतों दर सदे रुपये पांच प्रमाणें गुन्हेगारी घ्यावी कलम

२४ इनामदार व जातीस सरंजाम आसेल ते जाहागिरदार व देशमूख व देशपांडे व पाटील कुलकर्णी वगैरे वतनदार याचे कजिया संमंधें येक सालचें उत्पन्न आसेल तितका यैवज घ्यावयाचा त्या पैकीं खऱ्या पासून हरकी येक हिसा व खोट्या पासून गुन्हेगारी दोन हिसे कलम

२५ वतनदाराचे वृत्ती विषयीं मानपानाचा कजिया आसेल त्यांत मानपानाचा हाक घुगरी वगैरे जें स्वास्त आसेल त्याचा येक सालचा आकार गुन्हेगारी घ्यावी वतनदाराचे खेरीज दुसरीयाचा मानपानाचा खटला आसेल त्याची गुन्हेगारी सरकारांत मुनासफ पाहून घ्यावयाची

ठरेल त्याप्रमाणें हुकूम होईल कलम

२६ पंचाईत होण्याचे पूर्वीं खरा अगर खोटा हे समजुतीस येत नाहीं सबब पंचाईत नेमून द्यावयाचे अगोदर हरकी गुन्हेगारी बदल वरचे कलमांत लिहिलें आहे त्या प्रमाणें दोघे वादी याचे निशेदार सरकारांत घ्यावे कलम

२७ जे कोणी हरयेक खटल्याचे फडशे आपसांत समजोन करतील त्याजपासून हरकी गुन्हेगारी घ्यावयाची नाहीं सरकारांत फिर्याद येऊन हरकी गुन्हेगारीचे हामिदार सरकारांत दिल्हा नंबर आपसांत समजलें आसतां त्याजपासून हरकी गुन्हेगारी सिरस्त्याचे निमे घेतली जाईल कलम

२८ जे कोणी पंचाईत करितील त्यास पोटखर्चास पंचाईतीचा फैसला जाहल्यावर हरकी गुन्हेगारी वर लिहिल्या प्रमाणें जमा होईल त्या पैकीं पांचवा हिसा सरकारांत कागद शाई शिपाई सुद्धां खर्चा बदल ठेवून बाकी चार हिसे पंचास पोटगी बदल दिले जातील कलम

२९ मामलेदार याजपासीं जे कोण्ही फिर्याद येतील त्याजपासून पंचाईत नेमल्या अगोधर सदरीं कलमांत लिहिल्या प्रमाणें हरकी गुन्हेगारी बदल हमी चिटी घेऊन हुजूर रवाना करीत जावी खटल्याचा फैसला जाहल्यावर पंचाईत करावयास जे लोक आसतील त्याची नांवनिशीची याद हुजूर आली ह्मणजे त्यास खर्चास द्यावयाचें मुकरार केलें आहे त्याप्रमाणें देण्या विषयीं आज्ञापत्र होऊन हामी चिटी परत रवाना होईल कलम

३० जे कोणी मामलेदार याजकडे फिर्याद येतील त्यास मामलेदार याणें सांगावें कीं तुह्मीं आपले गांवीं आपसांत समजावें तें न होई तरी हरकी गुन्हेगारीचे हमीदार घेऊन कचेरीस पंचनामा आणावा या जोगे आसल्यास पंच नेमावे अगर हरयेक गांवीं दोन वादी राजी होतील त्या गांवचे मोकदम यासी चिटी देऊन तेथें पाठवावे कलम

३१ जे कोणी आपसांत समजाविसीं राजी होऊन राजीनामा आपस पंच यास लिहून दिल्हा त्यांणीं मनास आणून पंचाईत वाजबी करून सारांष होईल तो सरकारांत मंजूर आहे त्याची दर्याफ्ती पुन्हा व त्याजपासून हरकी गुन्हेगारी घ्यावयाची नाहीं कलम

३२ हर येक गांवीं सिवेचे वगैरे हादीचे खटले आहेत ते सबा आशर अखेर जसे चालत आसेल तसे ठेवून पंचाईत द्यावी दोघे ही पंचाइतीस उभे राहात तरी तिराईत कोणी जमीन करण्यास उभा राहिला आसता सरकारांतून तूर्त लागवड करवावी त्या लागवडीस हर दोघांतून जो कोणी आडवा आल्यास ती पड ठेवून नुकसान त्याजपासून भरून घ्यावें व पंचाईत करावयास पंच येतील त्यास पोटगीखर्च लागेल तो पेशजी प्रमाणें दोही गांवा कडून खुसीनें करावयाचा जाल्यास ज्याचा त्यांनीं करावा कलम

३३ हर कोणी पूर्वी मातबर होता नातवानी मुळें गरीब जाला त्याचा ऐवज येणें आहे व त्याचें देणें आहे असे खटले मोठे त्यास दस्तुरा प्रमाणें गुन्हेगारी बदल हामी द्यावयास ताकत नाहीं आसे आसल्यास

खाली कलम लिहिलें आहे त्या प्रमाणें करावें कलम

३४ चार मातबर माणूस यांजकडून हा नादार आहे परंतु याचा खटला खरा आहे या प्रमाणें सरकारची खातरजमा त्या गृहस्था कडून करावी ते सांगतील ते वाजवी समजोन घेऊन निशा घ्यावी अगर न घ्यावी याची तजवीज करून सरकारांतून पंचाईत करण्याचा हुकूम होईल कलम

३५ जो कजिया आसेल त्याची वहिवाट सन सबा आशर अखेर चालत आसेल तशी होऊन पंचाईत द्यावी कलम

३६ सारांश जाहल्यावर त्या प्रमाणें चालतो ह्मणोन उभयतां वादी याच्या मान्यता जाहाल्या तत्रापी पंचाईत करणारे याची संमते सारांशा वर आसावी कलम

३७ खोटी क्रिया करून लांच खाल्ला आसतां ती क्रिया फिरोन लांचाचे कलमा अन्वयें शिक्षा होईल कलम

३८ हर येक लोकांचें काम सरकारांत फिर्याद करावयाचें आसेल त्याजबदल जो कोणी सरकारांत आर्ज वरद बदली करितो त्याजपासून लिहून घ्यावे जे आह्मीं ज्या कामा करितां ज्याचा अर्ज करितों त्याजबदल आह्मां कडोन लांच व तर्फदारी वगैरे कांहीं येक गैर दस्तुर नाहीं आसें लिहून घेऊन नंतर मनास आणावयाजोगें आसल्यास चैंवकसी करावी तसें नसल्यास दुसरेयाणें कोणी बोलूं नये ज्याचा तो येऊन सरकारांत फिर्याद करील तेव्हां दस्तुर माफक मनांत आणावयाचें वरद बदल करणारानें कागद लिहुन दिल्हा आसतां त्याजकडे तर्फदारी अथवा लांच वगैरे बे दस्तुर लागू जाहाल्यास खालीं कलम लिहिलें आहे त्या अन्वयें शिक्षा होईल. ज्याजकडे जें काम आसेल त्या कामांत त्यांणीं दस्तुर माफक बोलावें कलम

३९ ज्याजकडे लाच लागू होईल त्यास व देणार यास बेडी घालून परजांत ठेवून देणारा पासून जो लांच दिल्हा आसेल तो बेरीज गुन्हेगारी बदल घेऊन व घेणारा पासून दुपट रुपये भरून घेऊन जेथें गुन्हा केला आसेल त्या पेठ्यांत त्याच गांवीं नेऊन ब्राह्मण व मराठे व प्रभु व सेणवी आसल्यास लाहान तटावर बसऊन धिंड काढावी धिंड काढणे ती तटावरून नाहीं गाढवा वरून आहे परंतु सदरीं लिहिले मंडळीस जातींत घेणार नाहींत सबब तटा वरील मुकरार केली आसे कुणवी व मुसलमान वगैरे हर येक जातीची दस्तुर माफक गाढवा वरून काढून सोडून देऊन जाहीरनामा करावा ह्मणोन छ ६ मोहरम तारीख १० आगष्ट सन १८२६ इसवी या तारखेचा जाहीरनामा जाला आहे येसीयास लांच देणारानें अगोदर सरकारांत जाहीर केल्यास त्याजपासून गुन्हेगारी व्हावयाची नाहीं व शिक्षाही व्हावयाची नाहीं सरकारांत न कळवितां परभारा दुसरीयानें समजाऊन शाबूत जाहाल्यास लांच देणारापासून गुन्हेगारी घेतली जाईल हीच शिक्षा व घेणारास सदरहू जाहीरनाम्याबदल शिक्षा होईल लांच देणार व घेणार याचा मजकूर सरकारांत नौकर लोकांपैकीं अगर दुसरा कोणी यानें समजाविल्यानें शाबूत जाहाल्यास ज्या कलमाबदल जो कोणी समजावील आणि

जी बेरीज शाबूद होईल त्या बेरजे पैकीं शेंकडा रुपये २५ बक्षीस सरकारांतून दिल्हे जातील हे सर्वांनीं समजोन जो कच्चा मजकूर आसेल तो सरकारांत जाहीर करावा

कलम

—xxx—

# परिशिष्ट*

## बोंधले घराण्यांतील कागदपत्र

शके १६७९ ज्येष्ट वद्य ३

श्रीरघुविर

श्री
शाहुराज
प्रसादन रघुज
स्य यशोधना त
त्सुनोस्तु मुधोना
म्नः श्रेषा मुद्रा वि
राजते ॥

नेमणूक पा टाणा प्रांत चंद्रपुर ( पंढरपूर ) जीाो राजश्री गोविंदराव सिवदेव सुा समान खमसैन मया अलफ माहे रमजान छ १७

रोज — खर्च

१००० कमाविसदार जातीस वेतन एक हजार

१७५० स्वार १० दर १७५

१९७४॥ प्यादे ५० नोकरी बाा माहीर्ता
लव आकार माही प्रो
१६५ भालदार ३ दर ५ प्रो
१८०९॥ प्यादे ४७ दर ३॥ प्रो
१९७४॥

१०० जासूद २
४० मशालची १
४०९ कारकून १
१०९० भोजनखर्च व किरकोळ खर्च

६२६४॥ एकुण बासष्टसे साडे चौसष्ट रुपये करार करून दिले आहेत येणेप्रमाणे खर्च करणे जाजती खर्च केलयानें मजरा पडणार नाहीं जाणिजे छ १७ माहे रमजान मोर्तब सुद ( मोर्तब सुद )

शके १६७९ वैशाख वद्य २

श्रीरघुविर

राजश्री बालाजी पंडित प्रधान गोसावी यासी

सकलगुणालंकरण आखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो मुधोजी भोसले सेनाधुरंधर दंडवत विनंती उपरी येथील कुशळ जाणुन स्वकिय कुशाळ लिहित असिले पाहिजे यानंतर जाणोजी भोसले याजकडिल सालमजकुरीचा ऐवज प्रांत वऱ्हाड वगैरे पैकीं श्रावण मासचे मुदतीचा येणार त्यापैकीं राजश्री गोविंदराव शिवदेव मजमदार याचा ऐवज सरकारांत मुबदलयास घेतला आहे हा २५००० पंचविस हजार हे लाजला देवावे यांचा वोढा फार जाला आहे याजकरिता सदरहु ऐवज आधीं देवावा छ १६ माहे साबान सुा सबा खमसैन मया अलफ सुज्ञाप्रती विशेष काय लिहिणे लोभ असो दिला पाहिजे हे विनंती ( मोर्तब सुद )

{ शिक्का अष्टकोनी }
{ मुधोजी भोसले यांचा }

* मागे पृष्ठांक २८ वर सुरू झालेल्या लेखाचें हें परिशिष्ट आहे.

शके १६७९ वैशाख वद्य २

श्रीरघुविर

राजश्री सदाशिव हरी गोसावी यासी अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजेश्री स्नो मु(ढु)धोजी भोसले सेनाधुरंधर दंडवत सुा सबा खमसैन मया आलफ राजेश्री गोविंदराव सिवदेव मजमदार याजला सरकारातून दस्तुर नेमून दिला असे बाग मलियाचा ऐवज इजारा रुपये चार लक्ष करार जाहले आहेत. त्यास दर सदे रु २ दोन प्रमाणे रु ८००० आठ हजार मशार-निल्हेस प्रविष्ट करुन पावलीयाचे कबज देणे जाणिजे छ १६ माहे साबान बहुत काय लिहिणे ( मोर्तब सुद )

{ शिक्का अष्टकोनी
मुधोजी भोसले यांचा }

बार

---

शके १६७९ ज्येष्ट वद्य ३

श्रीरघुविर

राजश्री गोविंदराव सिवदेव मजमदार गोसावी यासी छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री स्नोा मुधोजी भोसले सेनाधुरंधर दंडवत सुा समान खमसैन मया आलफ राजश्री नरसिंगराव गोविंद याचा पथकाना साल गुदस्ताचा हिसोब करून बाकी निधाली आहे त्याजबद्दल पा (वण) टाण्यासुद्धा तुह्माकडे कमाविर्सानें दिला आहे त्याची नेमणुक आलाहिदा करून दिली असे तेणे प्रमाणें खर्च करुन बाकी ऐवज यादीच्या बाकिस घेउन इमानें इतबारे वर्तणुक करणें जाणिजे छ १७ माहे रमजान बहुत काय लिहिणे ( मोर्तब सुद )

{ शिक्का अष्टकोनी
मुधोजी भोसले यांचा }

---

शके १६९२ चैत्र शुद्ध १

श्रीशंभुप्रसन्न

श्रीमन माहाराज मातुश्री दुर्गाआई-साहेब याणी राजश्री नरसिंगराव गोविंद यासी आज्ञा केली ऐसिजे सुा सबैन मया व अलफ पेसजी साहेबी तुह्मास आज्ञापत्रें सादर केली आहेत ती येउन पोचलिच असतील त्याप्रमाणें सरंजामासुद्धा तयारीनि-शी जलदीनें येणे तुह्मी जोडी. रा रघुनाथ पंडित याजकडे रवाना केली आहेत ती येथे आलि त्यासमागमे हुजरे व कारकून देउन जलमार्गे मुंबईस रवाना करून तेथून त्याची पत्रें आलि ती तुह्मा कडे पाठविली आहेत सत्वर फौजे सुद्धा अविलंबे येणे जाणिजे ताा छ २९ जिलकाद लेखनसीमा[1] (लेखनसीमा)

---

शके १६९५ ज्येष्ट वाा ३

श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव गोविंद यासी सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सुा अर्बा सबैन मया व आलफ तुह्मी विनंति-

१ हीं अक्षरें निराळीं आहेत, दुर्गाआईसाहेब यांचीं असतील.

पत्र पाठविले ते पावले राजश्री गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबाहादुर याची व फतेसिंग गाईकवाड याची लढाई झाली त्यांत आपली घोडी पडली. कामकाज जाले व दोनसे राउत जास्त ठेविले आहेत बोज्या भारी आहेत ह्मणुन लिहिले ते कळले ऐशीयास लढाईत काम काज केले हे गोष्ट उत्तम केलित नेमणुके शिवाय ज्याजती दोनशे राउत ठेविले त्याते प्रयोजन कार्य सेनाखासखेल याणी ठेविले असेल तर त्याचे तीबेचा ऐवज त्याजपासून घेणे सरकारात लडा नाहीं जाणीजे छ ८ रबिलावल बहुत काय लिहिणे ( लेखनावधी )

---

**शके १६९६ भाद्रपद शुा ७**

**श्री**

राजश्री लोकानी निा नरसिंगराव गोविंद गोसावी यासी

१ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजेश्री स्नेाा रघुनाथ बाजिराव प्रधान आशिर्वाद सुा खमस सबैन मया व आलफ तुह्मास राजेश्री दौलत बाबुराव याजबराबर देऊन राजश्री गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबाहादुर याचे कुमकेस पाठविले त्यास देशी फितुरीयानी मुला माणसास पेच पाडिला आसता तुह्मी एकनिष्टेन सरकारचाकरी वरी आहा ह्मणुन मशारनिल्हेनी लिहिले ते कळले ऐशास तुह्मी खातरजमेनी एकनिष्टपणे सरकारसेवेनरी काईम असणे सारच पेच निवारण होतील जाणिजे छ ५ रजेब बहुत काय लिहिणे ( लेखनावधी )

श्रीसांब
सपुत्रोति जयते राजा
शाहु नरपती हर्षनिधान
रघुनाथ बाजीराव
मुख्य प्रधान

---

**शके १६९६ भाद्रपद शुा ११**

**श्री**

राजश्री लोकानी नि॥ नरसिंगराव गोविंद गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेाा रघुनाथ बाजीराव प्रधान आशिर्वाद सुा खमस सबैन मया व अलफ राजेश्री दौलत बाबुराव यास हुजूर यावयाची आज्ञा केली आहे तरी तुह्मी त्याजबराबर निघुन येणे रोजमुरे व नालबंदीचे ऐवजा करिता विलंबावरी न घालणे छ ९ रजब बहुत काय लिहिणे ( लेखनावधी )

{ शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा }

---

**शके १६९७ आश्विन वद्य ७**

**श्री**

आखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजेश्री नरसिंगराव गोविंद गोसावी यास सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सुा सीत सबैन मया व आलफ प्रांत कर्नाटक येथील कामकाज तुह्मास सांगोन रवाना केले असे तरी प्रांत मजकुरी जाऊन संस्था-

१ हीं अक्षरें रघुनाथ बाजीराव यांचीं.

नीक देसाई देशपांडे वगैरे यासी जमा करुन ते तुह्मी एकत्र होऊन झाडून प्रांतातील ठाणी हस्तगत करून सरकार अमल बसवून पैका वसूल करणे / सरकारकाममुले सीबंदी-खर्च वगैरे लागेल तो वाजबी हिसेब पाहुन मजरा दिल्हा जाईल जाणिजे छ १९ साबान बहुत काय लिहिणे (लेखनावधी)

बार

---

शके १६९७ आश्विन वद्य ३

श्री

आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजश्री लिंगापा हणमत गौडा देसाई पा ह्यांवणुर गोसावी यासी

सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सुा सीत सबैन मया व अलफ वामनराव गोविंद व आनंदराव रास्ते याजकडिल तालुक्याचा व धारवाड वगैरे येथील मामलतीचे बंदोबस्ताची आज्ञा करोन रा नरसिंगराव गोविंद यास पाठविले आहेत तरी तुह्मी मशारनिल्हेसी रुजु राहुन हरएक विषई साहीता करित जाणे पा मजकुराचा अमल देत जाणे व सरकारसेवा करून दाखविलीयाने तुमचे सेवेनुरुप सर्फराजी केली जाईल जाणिजे छ १५ शाबान बहुत काय लिहिणे (लेखनावधी)

बार

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

राजेश्री आच्यापा नाईक किल्ले बदामी गोसावी यासी

छ आखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो रघुनाथ बाजीराव प्रधान आशिर्वाद सुा सीत सबैन मया व अलफ राजश्री आनंदराव भिकाजी व वामनराव गोविंद व तालुके धारवाड वगैरे जिल्हेचे बंदोबस्ताची आज्ञा करोन रा नरसिंगराव गोविंद यास पाठविले आहे तरी तुह्मी मशारनिल्हेसी रुजु राहोन हरएक विशी साहिते करित जाणे व किल्ले मजकुरचा अमल देत जाणे सरकारसेवा करून दाखविलीयाने तुमचे सेवेनरुप सरफराज केले जाईल जाणिजे छ १५ शावान बहुत काय लिहिणे (लेखनावधी)

{ शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा }

---

शके १६९७ आश्विन वद्य ३

श्री

{ शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा }

छ मा आनाम देशमुख व देशपांडे पा बेटगीर यास रघुनाथ बाजीराव प्रधान सुा सीत सबैन मया व आलफ मौजे मजकुरचे आमलाचे बंदोबस्ताची ++++ करोन रा नरसिंगराव गोविंद यास पाठविले आहेत तरी तुह्मी मशारनिल्हेसी रुजु राहोन पा मजकुरचा अमल सुरलीत देत जाणे जाणिजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण (लेखनावधी)

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

राजश्री दौलतराव हिंदुराव घोरपडे गोसावी यासी

सकलगुणालंकृत आखंडीत लक्ष्मी +++++++ रघुनाथ बाजिराव प्रधान

आसिर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकिय कुशल लिहित ज'णे विशेष वामनराव गोविंद व आनंदराव भिकाजी याजकडिल तालुकियाचा व धारवाड वगैरे येथील मामलतीचे बदोबस्ताकरिता येथुन राजश्री नरसिंगराव गोविंद पाठविले आहेत तरी आपण हरएक विशी मशार निल्हेचे साहित्य करोन अमलाचा बंदोबस्त होये ते करावे रा छ १५ शाबान बहुत काय लिहिणे हे विनती ( लेखनावधी )

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

राजश्री बासापा नाईक संस्थान हरपनहाली गोसावी यासी

छ सकलगुणालंकरण अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री स्नो रघुनाथ बाजीराव प्रधान आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणुन स्वकिय कुशल लिहितजाणे विशेष वामनराव गोविंद व आनंदराव भिकाजी याजकडील तालुकियाचा व धारवाड वगैरे येथील मामलतीचे बंदोबस्ताकरिता हुजुरुन राजश्री नरसिंगराव गोविंद पाठविले आहेत तरी तुम्ही हरएक विसी मानिलेचे साहित्य करोन अमलाचा बंदोबस्त होये ते करणे ता छ १५ शाबान बहुत काय लिहिणे ( लेखनावधी )

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

{ शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा }

छ मा अनाम देशमुख व देशपांडे पा बोहाटी यास रघुनाथ बाजीराव प्रधान सुा सीत सबैन मया व अलफ पा मजकुरचे अमलाचे बंदोबस्त'ची आज्ञा करोन राजश्री नरसिंगराव गोविद यास हुजुरोन पाठविले आहेत तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन पा मजकुरचा अमल सुरालेत देणे जाणिजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण ( लेखनावधी )

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

{ शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा }

छ मा अनाम देशमुख व देशपांडे पा दाडवाली यासी रघुनाथ बाजीराव प्रधान सुा सीत सबैन मया व आलफ पा मजकुरचे बंदोबस्ताची आज्ञा करुन राजश्री नरसिंगराव गोविंद यास हुजुरुन पाठविले आहेत तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु होउन राहोन पा मजकुरचा अमल सुरलित देणे जाणिजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण ( लेखनावधी )

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

{ शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा }

छ मा अनाम देशमुख देशपांडे पा गोकाक यास रघुनाथ बाजीराव प्रधान सुा सीत सबैन मया आलफ पा मजकुरचे आमलाचे बंदोबस्ता ×××× अज्ञा करोन रा नरसिंगराव गोविंदराव यास हुजुरोन पाठविले आहे तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन पा मजकुरीचा अमल सुरलित देणे

जाणिजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण (लेखनावधी)

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा

७ मा आनाम देशमुख देशपांडे पा तेरदल यासी रघुनाथ बाजीराव प्रधान सुा सीत सबैन मया व अलफ पा मजकुरचे आमलाचे बंदोबस्ताची आज्ञा करोन रा नरसिंगराव गोविंद यास हुजुरोन आज्ञा करून पाठविले आहे तरी तुम्ही मशारनिल्हेस रुजु राहोन पा मजकुरचा अमल सुरलित देणे जाणिजे छ १५ साबान आज्ञा प्रमाण (लेखनावधी)

---

शके १६९७ आश्विन वा॥ ३

श्री

शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा

७ मा अनाम देशमुख व देशपांडे पा धारवाड यास रघुनाथ बाजीराव प्रधान सुा सीत सबैन मया व आलफ पा मजकुरचे तुमचे अमलाचा बंदोबस्ताची आज्ञा करून रा नरसिंगराव गोविंद यास हुजुरुन पाठविले आहेत तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन पा मजकुरचा आमल सुरलित देणे जाणीजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण (लेखनावधी)

---

शके १६९७ आश्विन वा॥ ३

श्री

शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा

७ मा अनाम देशमुख देशपांडे पा हुबली यास रघुनाथ बाजीराव प्रधान सुा सीत सबैन मया व आलफ पा मजकुरचे आमलाचा बंदोबस्ताचे आज्ञा करोन रा नरसिंगराव गोविंद यास हुजुरोन पाठविले आहे तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन पा मजकुरचा अमल सुरलित देत जाणीजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण (लेखनावधी)

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा

७ मा अनाम देशमुख देशपांडे पा धारवाड यास रघुनाथ बाजीराव प्रधान सुा सीत सबैन मया व आलफ पा मजकुरचे आमलाचा बंदोबस्ताची आज्ञा करुन रा नरसिंगराव गोविंद यास हुजुरोन पाठविले आहे तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन पा मजकुरचा अमल सुरलित देणे जाणिजे छ १५ शावान आज्ञा प्रमाण (लेखनावधी)

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा

७ मा आनाम देशमुख व देशपांडे प्रा कलघटी यास रघुनाथ बाजीराव प्रधान सुा सीत सबैन मया व आलफ पा मजकुराचे बंदोबस्ताची आज्ञा करोन रा नरसिंगराव गोविंद यास पाठविले आहे तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन पा मजकुरीचा अमल सुरलित देणे जाणेजे छ १५ शावान आज्ञा प्रमाण (लेखनावधी)

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा

५३ मा। अनाम देशमुख व देशपांडे पा। कडकोल यास रघुनाथ बाजीराव प्रधान सु॥ सीत सबैन मया व अलफ मौजे मजकुरचे अमलाचा बंदोबस्ताची आज्ञा करोन रा॥ नरसिंगराव गोविंद यास हुजुरोन पाठविले आहेत तरी मानिल्हेसी रुजु राहोन पा। मजकुरचा अमल सुरलित देणे जाणिजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण (लेखनावधी)

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा

५३ मा। आनाम देशमुख व देशपांडे पा। येकोडी यासी रघुनाथ बाजीराव प्रधान सु॥ सीत सबैन मया व आलफ पा। मजकुरचे आमलाचा बंदोबस्ताची आज्ञा करोन रा॥ नरसिंगराव गोविंद यास हुजुरोन पाठविले आहे तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन पा। मजकुरचा अमल सुरलित देणे जाणिजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण ( लेखनावधी )

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा

५३ मा। अनाम देशमुख व देशपांडे पा। कुदलगी यास रघुनाथ बाजीराव प्रधान सु॥ सीत सबैन मया व आलफ पा। मजकुरचे आमलाचा बंदोबस्ताची आज्ञा करोन रा॥ नरसिंगराव गोविंद यास हुजुरोन पाठविले आहे तरी तुम्ही यासी रुजु होउन पा। मजकुरचा अमल सुरलित देणे जाणीजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण (लेखनावधी)

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा

५३ मा। आनाम देशमुख व देशपांडे प्रा। तडस यासी रघुनाथ बाजीराव प्रधान सु॥ सीत सबैन मया व आलफ पा। मजकुरचे आमलाचे बंदोबस्ताची आज्ञा करोन राजश्री नरसिंगराव गोविंद यास हुजुरोन पाठविले आहे तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन पा। मजकुरचा अमल सुरलित देणे जाणीजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण ( लेखनावधी )

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा

५३ मा। आनाम देशमुख व देशपांडे पा। हरीहर यासी रघुनाथ बाजीराव प्रधान सु॥ सीत सबैन मया व आलफ पा। मजकुरचे आमलाचे बंदोबस्ताची आज्ञा करोन राजश्री नरसिंगराव गोविंद यास हुजुरोन पाठविले आहेत तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन पा। मजकुरचा आमल सुरलित देणे जाणीजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण ( लेखनावधी )

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

{ शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा }

५४ मा आनाम देशमुख व देशपांडिये पा अमीनबावी यास रघुनाथ बाजीराव प्रधान सुा सीत सबैन मया व आलफ पा मजकुरचे आमलाचे बंदोबस्ताची आज्ञा करोन राजश्री नरसिंगराव गोविंद यास हुजुरोन पाठविले आहेत तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन पा मजकुरचा अमल सुरलित देणे जाणीजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण ( लेखनावधी )

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

{ शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा }

५४ मा आनाम देशमुख व देशपांडे पा मुलगुद यासी रघुनाथ बाजीराव प्रधान सुा सीत सबैन मया व आलफ पा मजकुरचे आमलाचे बंदोबस्ताची आज्ञा करोन राजश्री नरसिंगराव गोविंद यास हुजुरोन पाठविले आहेत तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन पा मजकुरचा अमल सुरलित देणे जाणीजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण ( लेखनावधी )

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

{ शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा }

५४ मा आनाम देशमुख व देशपांडे पा मिसरीकोट यास रघुनाथ बाजीराव प्रधान सुा सीत सबैन मया व आलफ पा मजकुरचे आमलाचे बंदोबस्ताची आज्ञा करोन राजश्री नरसिंगराव गोविंद यास हुजुरोन पाठविले आहेत तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन पा मजकुरचा अमल सुरलित देणे जाणीजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण ( लेखनावधी )

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

{ शिक्का गोल
रघुनाथ बाजीराव यांचा }

५४ मा आनाम देशमुख व देशपांडे पा जमखेडी यास रघुनाथ बाजीराव प्रधान सुा सीत सबैन मया व आलफ पा मजकुरचे आमलाचे बंदोबस्ताची आज्ञा करोन राजश्री नरसिंगराव गोविंद यास हुजुरोन पाठविले आहेत तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन पा मजकुरचा अमल सुरलित देणे जाणीजे छ १५ शाबान आज्ञा प्रमाण ( लेखनावधी )

---

शके १६९७ आश्विन वा ३

श्री

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजेश्री श्रीनिवास वेंकटाद्री नाईक देशाई पा गदग गोसावी यास

सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सुा सीत सबैन मया व आलफ राजश्री आनंदराव भिकाजी व वामणराव गोविंद व तालुके धारवाड वगैरे जिल्हेचे बंदोबस्ताची आज्ञा करोन रा नरसिंगराव गोविंद यास पाठविले आहे तरी तुम्ही मशारनिल्हेसी रुजु राहोन हरएक विशी

साहीते करित जाणे पा मजकुर चा अमल तुम्ही देत जाणे सरकारसेवा करुन दाखविलीयानें तुमचे सेवेनुरूप उर्जित केले जाईल छ १५ शाबान आज्ञा प्रमाण ( लेखनावधी )*

---

शके १६९८

( नक्कल दिसते )

**श्रीमार्तंडप्रसन्न**

यादि करार राजेश्री वेंकाजी विठ्ठल सुा सबा सबैन मया अलफ बोलिजिवक

२५०० ऐन तैनात दोन हाजार

१००० पालखी

१ पालखी बक्षिस कलम एक

१००० तैनात बारमाही

१ अफतागीर घ्यावे पेशवेशाही जाबत राईकरार केला.

२५० माणसे

२ खिजमतगार आफतागिर आसाम्या

पाच प्रमाणे १०

| | | |
|---|---|---|
| १ | आफतागिऱ्या आा | ६ |
| १ | माशालिची आा | ५ |
| ४ | | २१ |

दर माहा दर आा रुपये ५ प्रा शिवाय अफतागिराजऐा. दमाहा २१ एकविस प्रा बारमाही रुपये

- २५० भोजन खर्च बारमाही

३५००

शिवाय बाद कापड सुमार ५०० पाचशे करार

येणे प्रमाणे करार

शिवाय मधिल हिशेब आमचे आनुमतें देउ तो घ्यावा. कलम

---

शके १६९८ पौष शुद्ध १

**श्री**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १०३ दुर्मुखीनाम संवत्सरे पौष्य शुद्ध प्रतिपदा भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाशिवछत्रपती स्वामी याणी राजश्री नरसिंगराव गोविंद यास आज्ञा केली ऐसि जे पेशजी स्वामिनी तुह्मास आज्ञापत्रें सादर जालि आहेत ती येउन पोहचलि च असतील त्याप्रो सरंजामासुद्धा स्वारीनिशी जलदीने येणे तुह्मी जोडी राजश्री रघुनाथराव पंडित याजकडे रवाना केलित ती येथें आली त्यासमागमे सरकारचे हुजुरे व कारकून जलमार्गे मुंबईस रवाना करून तेथुन त्याचीं पत्रें आलीं ती तुह्मा कडे पाठविली आहेत

---

* ह्या स्वरुपाची ह्या च तारखचों रघुनाथ बाजीराव याचीं पत्रें खालील लोकांस गेलीं आहेत.

राजश्री सुरराव बळवंत राजश्री व्यंकटपती नाईक बाहद्दरी संस्थान सुरापुर [शाबुत] राजश्री वीरभद्र देसाई संस्थान कितुर [ बहुतेक फाटलेलें ] राजश्री शंकरराव लिंगोजी गोसावी ( बहुतेक शाबूत ) राजश्री लिंगापानायक गोडा देसाई मामले तोरगल ( अर्धवट फाटलेलें ) राजश्री मुरारराव हिंदुराव घोरपडे सेनापती ममलकतदार ( ह्मापत्रावर फक्त मायना आहे बाकी फाटलें आहे. )

सत्वर फौजेसुद्धा अविलंबे येणे जाणिजे निदेशें समक्ष ( मर्यादेयं विराजते )

रुजु समत मंत्री
सुरु सुद बार सुद समत सुद बार

---

शके १६९८ पौष शुा ६
श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव गोविंद यास सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सुा सबा सबैन मया व अलफ तुह्मी विनंतीपत्र पाठविले ते प्रविष्ट जाले सोलापुरकर संस्थानीक यानी सरकारचाकरीवर लक्ष ठेऊन आपले सरजाम सुद्धा मुलखाच्या बंदोबस्तास हजीर जाले आहेत. याची एक निष्टता सरकारांत फार आहे एवेशी त्याचे हि विनंतीपत्र हदूर आहे ह्मणून सविस्तर लिहिले ते कळले ऐशास तुह्मी तिकडील बंदोबस्तास संस्थानीक सामिल करून फौज धरलित याज वरुन संतोष जाला फार उत्तम गोष्ट केलित ह्या उपरी हि भारी फौजेचा जथ पाहून मुलकाचा तिकडील बंदोबस्त करणे. संस्थानिकानी यावेळेस मातबर चाकरी करून दाखवावी आणी ते करून दाखवितील मर्द माणूस आहेत त्याजविशीं खातर जमा च असे त्यास हि पत्र सादर केले असे चाकरी बजाऊन दाखविल्यावर त्याजवर कृपाच केलि जाईल तुह्मीही शाहाणे मनुष्य हिमातिचे आहा तुमच्या पुस्त पन्हया विषई राजश्री बाजिराव गोविंद यास लिहिले आहे. व आणखिही तुह्मास जे सामिल होतील ते करून घेउन फौजेचा जथ धरून तीकडिल मुलखाचा बंदोबस्त करणे खासास्वारी मुंबईस दाखल जालि आहे अंगरेजास विलायतचा हुकुम आला ह्मणजे मसलत सुरु होईल. तुह्मी जरपटक्याविषई अर्ज सांगोन पाठविलात त्यास पंढरपुर पावेतो मुलकाचा बंदोबस्त करून चाकरी बजाऊन दाखविणे. फितुरियाची फौज तुह्मावर आल्यास ताराज करणे ह्मणजे तुह्मास जरीपटका सरकारातून बाहाल च केला असे जाणिजे छ ५ जिलकाद बहुतें काय लिहिणे ( लेखनावधी )

---

शके १६९८ माघ शुद्ध ५
श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १०३ दुर्मुखी नाम संवत्सरे माघ शु॥ ५ सौम्यवासरे क्षात्रय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती स्वामी यानी राजश्री नरसिंगराव गोविंद यासी आज्ञा केली ऐसि जे स्वामिचे शेवेसी तुह्मी विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले हालि जानोजी चोर हुजुर रवाना केले आहेत जबानी अर्ज करतिल त्यावरून ध्यानास आणुन सेवकास आज्ञा करणार धनी समर्थ आहेत ह्मणौन विनंती पत्री लिहिले प्रमाणे निवेदन जाले आशास राजश्री येशवंतराव सींदे सरसुभेदार यासी आज्ञा जाहालि असे राव मशारनिल्हे याणी तुह्मास लिहिले आहे त्यावरून कलेल जाणिजे नीदेशें समक्ष ( मर्यादेयं विराजते )

रुजु स॥ मंत्री

---

१ शिव छत्रपतीचीं अक्षरें. २ हीं अक्षरें रघुनाथ बाजीराव याच हातची. ३ हीं अक्षरें राजा शिवछत्रपति याची.

सुरसुद समत
बार बार

---

शके १६९८ फाल्गुन शु॥५

श्रीशंभुप्रसन्न

श्रीमन्माहाराज मातुश्री दुर्गा आईसाहेब याणी राजश्री नरसिंगराव गोविंद यासी आज्ञा केली ऐसि जे सुा सबासबैन मया व अलफ साहेबाचे सेवेशी तुह्मी विनंतिपत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले हलि जोनोजी चोर हुजुर रवाना केले आहेत जबानी अर्ज करतील त्यावरून ध्यानास आणुन सेवकास आज्ञा करणार धणी समर्थ आहेत ह्मणोन विनंती पत्रि लिहिले प्रमाणें निवेदन जाले ऐशास चिरंजीव राजश्री यशवंतराव शिंदे सरसुभेदार यास आज्ञा जाहाली आहे राव-मशारनिल्हे याणी तुह्मास लिहिले आहे त्यावरून कळेल जाणिजे ता ७ ४ माहे मोहरम लेखनासिमा

बार

---

शके १७०६ भाद्रपद वा॥१२

नक्कल

श्री

राजश्री नरसिंगराव गोविंद गोसावी यासी सेवक माधराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस समानीन मया व अलफ तुह्माविशीं रा भास्कर शंकर यानी विनंती केली कीं मागील आपराध माफ करावे व पुढे फंदफितुरी अगर कोणती वावगी वर्तणूक न करिता जामिन सरकारात देउन स्वस्थ राहातील ह्मणून त्याजवरून हे पत्र सादर केले आहे. तरी सदरहू कराराप्रमाणे सरकारांत जामिन देउन कोणेविसी वावगी वर्तणूक अगर फंदफितुरी न करिता स्वस्थ राहावे ह्मणजे कोणेविशी उपसर्ग लागणार नाहीं खातर जमेने हुजुर येणे जाणिजे छ २५ सवाल आज्ञा प्रमाण

शके १७०७ चैत्र शुा २

नक्कल

तैनात जाबता नरसिंगराव गोविंद सिलेदार सुा सीत समानीन मया व अलफ-जंदिदसाल मजकुरी पासोन करार करून ठेविले बोलि स्वार

१ खासा करोल, भालेकरी
अडहत्यारी

---

१०१

तैनात ——————— रुपये
नक्त ——— रुपये कापड जातीस
३५०० जातीस देखिल आंख ७००
पालखी स्वारास दर २५
३०००० स्वार १०० दर प्रमाणे २५००
स्वारास ३०० प्रमाणे ९५००

---

३३५००

तेहतीस हजार रुपये व सातसे आख कापड सालिना तैनात जाजती खाशास पान्चशे रुपये तैनात व राउतास आख सुद्धा हजार
श्री नालबंदी

---

१ हीं अक्षरें निराळी दिसतात.

नक्त ——— रुपयें कापड आख
१२०० खासा ५००
१००० जातीस रावतास दर २०००
२०० पालखी २० प्रा
———
१२०० २५००
१२५०० स्वारास दर १२५ प्रा
———
१३७००

तेरा हजार सातशे रुपये व पाचशे आख कापड नालबंदी ज्याजती रावतास कापड आख दोन हजार येणेप्रमाणे करार फौजे बराबर पावेल येणेप्रमाणे

तनात पैकीं राजमरा

——— रुपये
३५० जातीस दुमाही छ १ सन
देखील पालखी सीत समानीन
४५० स्वारास आठवड्या चैत्र मास
प्रमाणे ४॥ प्रमाणे
———
८००

आठसे रुपये पैकीं जातीस दुमाही साडे तीनसे व रावतास आठवडा साडे च्यारशे येणेप्रमाणे गणतीचे तेरीख पासून रोजमरा

---

शके १७०७ भाद्रपद वा। १२

नक्कल

श्री

राजश्री कानोजी बावा मोहिते हंबीरराव गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य रा। नरसिंगराव गोविंद आशिर्वाद विनंती उपरी कारणे इमान पत्र लिहुन दिल्हे ऐसाजे पेशजी कैलासवासी श्रीमंत दादासाहेब याजपासी होतो त्यासी हल्लि हुजुर श्रीमंत राजश्री पंतप्रधान याजपासी आलो ऐसियासी सरकारातून आज्ञा जालि कीं सरकारांत जामिन देऊन सेवा चाकरी एकनिष्ठपणें करावी ऐशास आह्मी आपणास सरकारांत जामिन दिल्हे त्याजवरून आपण आह्मांस जामिन होऊन जामिन कतबा सरकारात दिल्हा त्यासी आह्मी सरकार आज्ञेप्रमाणें सेवा करून चाकरी निष्ठेन करू अंतर पडो देणार नाहीं यासी श्रीची शेफथ असे हे इमानपत्र लिहून दिले सही सुा सीत समानीन मया व अलफ तेरिख छ २५ माहे जिलकाद

---

शके १७०७ आश्विन शुा ५

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधानसाहेब स्वामिजीचे शेवेसी

आज्ञाधारक + + + सगाजी नरसिंह देशपांडे पा। भोसे. कृतानेक सा। नमस्कार विनंती विज्ञापना ऐसिजे राजश्री नरसिंगराव गोविंद श्रीमंत राजश्री दादासाहेबाकडे होते हाल्लि स्वामीपासी हुजुर आले त्यास आज्ञा केलिकीं सरकारात जामिन देउन एकनिष्ठपणे सेवा करून असावे त्याजवरून मशार निल्हेस आह्मी जामिन जाहलो असो आज्ञेप्रा। चाकरी एकनिष्ठपणें करतिल फंदफितुरी केल्यास आपण हाजीर करू हजर न करू तर त्याचे निसबतीचा जाब करु हा जामिन कतबा लिहून दिला सुा सीत समानिन मया व अलफ छ ४ माहे जिल्हेज

शके १७०७ आश्विन शुा ५

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधानसाहेब स्वामिजीचे शेवेसी

आज्ञाधारक पांडुरंग रामचंद्र कुळकर्णी मौजे माढे प्रा + + + कृतानेक सा। नमस्कार विनंती विज्ञापना ऐसीजे राजश्री नरसिंगराव गोविंद श्रीमंत राजश्री दादासाहेबाकडे होते हलि स्वामीपासी हुजुर आले त्यास आज्ञा केली कीं सरकारात जामीन देऊन एकनिष्टपणे सेवा करून असावे त्याजवरून मशार निल्हेस आह्मी जामीन जाहालो वरून मशार निल्हेस आह्मी जामीन जाहालो आसो आज्ञेप्रमाणे चाकरी एकनिष्टपणे करतील फंदफितुरी केल्यास आपण हजर करू हजर नकरू तर त्याचे निसबतीचा जाव करू हा जामीन कतबा लिहून दिला सही दस्तुर सिक्का सीत समानीन मया व आलफ छ ४ माहे जिल्हेज

---

शके १७१४ आषाढ शुा १

## श्रीगणेश

राजश्रीयाविराजीत राजमान्य राजेश्री नरसिंगराव देसाई गुतीकर स्वामी यासी सेवक गंगाधर गोविंद नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकिये लिा विशेष तुह्मी पत्र पा ते पावले जकातीकडील चोरीच्या जावसालाकरिता खुरसिंगीवर रोस जाला आहे त्यास अजपर्येत चोऱ्या जाल्या त्या गावकरी भरीत आले नाहीत जकातदार व मेठकरीच भरतात येविषई रामाजी हरी यास आज्ञा व्हावी ह्मणोन लिहिले ते विदित जाले ऐसियांस एविषई रा रामाजी हरी आपटे यास लिहुन पाठविले आहे वाजवि चौकशी करून सुदामत चालत आल्या अन्वये करतील ता। छ ३९ सवाल सुा सलास तीसैन मया व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती

---

शके १७१८ माघ शु॥ १५

नकल

श्री

यादी नरसिंगराव व् गोविंद सिलेदार मृत्यु पावले याचा उतरकार्य खर्चास सुा सबा तीसैन मया व आलफ रुपये

१०००

र्कायेच्या खर्चास एक हजार रुपये देवावे देणे

छ १३ साबान सनसबा तीसैन माघमास चीटी लिहिणे

---

## श्रीशंभुप्रसन्न

राजश्री नरसिंगराव गोसावी यास

छ अखडित अक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री स्नो यशवंतराव सींदे सरसुभेदार दंडवत विनती उपरी येथील कुशल जाणोन स्वकिय लेखन करित असीले पाहिजे विशेष श्रीमंत धणीसाहेवी तुह्मास येणेविषई आज्ञापत्रें व आमची पत्रें पेसजी रवाना केली ती पोहचलिच असतील तरी फौजेसुद्धा जलदिनें येणे तुह्माकडून राजेश्री रघुनाथपंडित याजकडे जोडी रवाना केली ती येथे येउन पोचली येथुन सरकारचे हुजुरे व कारकून समागमे देउन मुंबईस पाठऊन तेथुन उतरे आलि ती तुह्माकडे पाठविली आहेत या समागमे

---

१ हीं अक्षरें निराळीं आहेत.

सरकारची ही आज्ञापत्रें सादर आहेत अविलंबे फौजेसुद्धा सरंजामानिशी येणे कळले पाहिजे बहुत काय लिहिणे[1] हे विनंती

श्रीशंभुप्रसन्न

राजश्री नरसिंगराव गोसावी यासी

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो. येशवंतराव सींदे सरसुभेदार दंडवत विनंती उपरी येथील क्षेम जाणोन स्वकिय लेखन करित असले पाहिजे विशेश आपण श्रीमंत धणीसाहेबाचे शेवेसी विनंतीपत्रे पाठविली व आह्मासही पत्र पाठविले ते प्रविष्ट होउन लिहिला मजकूर कलला ऐविसी श्रीमंत धणीसाहेबाची आज्ञापत्रें सादर आहेत आपण कितेक मनसबेचा अर्थ जानबा यासमागमे सांगुन पाठविला व पत्री ही लिहिला ऐसियासी आपण सरंजामासुद्धा श्रीमंत धणीसाहेबाचे सेवेसी येऊन पोहचलेस बहुत उपयोग आहे पोटापणेचा अर्थ दर्शविला आह्यास तिकडेच मुलुक मारून चालविता तैसे च सरंजामासुध्धा हुजुर येऊन ईकडिल मुलुकात न्युन काय आहे यास्तव लिहीले प्रमाणे सत्वर आलेस बहुतच मनसबेचे उपयोगी आहे इकडून नबाब बाहादर ही सनिधच आले आहेत तिकडून आपण आलेस कार्योपयोगीच आहे येविषयी राजश्री परशरामपंत यानी ही आपणास लिहिले आहे त्यावरुन कळले पाहिजे बहुत काय लिहिणे[2] हे विनंती

श्री

राजश्रीया विराजीत राजश्री नरसिंगरावजी स्वामीचे शेवेसी पो परशराम बल्लाळ गणपुले कृतानेक नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता छ ५ मोहरम मुक्काम करविर जाणोन स्वकिय कुशल लिहित असले विशेष आपण जानोजी चोर याजबरोबर पत्र पाठविले व जबानी कित्येक प्रकारचा मजकूर सांगितला त्याजवरोन सविस्तर कळले ऐशास तुह्मी फौजेसुद्धा ह्या प्रांती यावे ह्मणोन पेशजी पत्र पाठविलेच आहे हल्लि श्रीमंत माहाराज छत्रपती स्वामी याची व राजश्री सरसुभेदार याची पत्रें रवाना केलि आहेत व कित्येक मनसबयाच्या गोष्टी जानोजीशीं सांगितल्या आहेत हे चित्तांत आणोन इकडे फौजेसुद्धा आल्यावरी दर्शनाअंती सर्व गोष्टी सिद्धीस जातील आपले येण्याचा निश्चय असल्यास उतर आल्यावर श्रीमंताकडे जोडी रवाना करून देऊ आपणही पत्रें श्रीमंतास लिहून पाठवावीं ह्मणजे आमचे जोडी बरोबर जलमार्गे रवाना करून देउ एविसीं विलंब न करावा मसलतीचा समय हाच आहे बहुतें काय लिहिणे कृपा करावी हे विनंती

शके १६९८ सुमार

श्री

राजश्रीयाविराजीत राजमान्य राजेश्री नरसिंगरावजी स्वामी गोसावी यासी सेवक बाजीराव गोविंद साा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल छ ११ रबिलावल जाणुन स्वकिय लेखन केले पाहिजे + + + + + + + + + पत्र पाठविले लिहिले सविस्तर कळले व रा नारोराम याणी (मुखोद्गत) सांगितल्यावरून कळले असे

[1] हीं अक्षरें बाळबाधिति वेडी वकिडी. [2] ही अक्षरें परशराम बल्लाळ गणपुले यांची आहेत.

यासी नवाबसाहेबास वर्तमान सांगितले पाहिजे तेथुन जावसाल होईल त्याप्रमाणे लेहून पाठउ दरबारातून जाब लवकरी पावेल + + + + ह्मणाले कीं आपणास राहावयासी अवकाश नाहीं याजकरिता उतर लेहून दिले आहे बहुतं काय लिहिणे लोभ करावा हे विनंती

---

श्री

रो या विराजित राजमान्य रा नरसिंगराव देसाई स्वामींचे शेवेसी पा जिवाजी अनंत फडक सा नमस्कार विनती उपरी येथील कुशल जाणोन स्वकिय कुशल लेखन करित गेले पाहिजे विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले श्रीमंत रो बाळासाहेबानी तुह्मास पत्र पाठविले त्याची नकल पाठविली ते पावली लिहिला मजकुर सविस्तर कळला आणि रो नारोराम याणी ही नकार्यतीचे मजकुर सांगितले ऐसियास नकार्यतीचे मजकुर आहे तो खडल्याचे आहे सर्व मजकुराविशी रो रामाजीपंत आपटे आलेच आहेत त्यास तूर्त राजश्री बाबुराव पा यासी आह्माकडे पाठवावे ह्मणजे मुळपासोन सर्व मजकुर रुबरु विचारून मग मशारनिल्हेस पत्र पाठवावयाचे सर्वांचे विचारे करावयास येईल आजत्र रा पाटील यासी पाठवावे कळावे बहुत काय लिहिणे लोभ किजे हे विनंती

---

श्री

शेवेसी नरसिंगराव गोविंद विनंती एसाजे स्वामीचे पादाजवळ येऊन आजपर्यंत नव दाहा वर्षे जाली त्यांत देणे साहासष्ट हजार रुपये केले एकतर देणेचे पेचांत आणि पुढे अन्नवस्त्र नाहीं यास्तव सर्व फौजेचे कारभारी व स्वामीचे पदरचे मुत्सदी यास पराकाष्ट विनंती करावयाची तेथवर केली परंतु मजविशींचे दैन्य स्वामीजवळ कोणी सांगत नाहीं प्रत्तीक्षा प्राण जावा हा समय आला आहे स्वामीस क्रोध मजविशींचा आसल का की ज्याची चाकरी केली त्याची एकनिष्टपणें केली आता स्वामीपाय पाहिल्यावर इतका खराबा जाला परंतु वाकडी गोष्ट सवका + + + + + + पासून जाली आमचा शेवकाचा स्वधर्म हाच कीं ज्याची शेवा करावी त्याची एकनिष्टपणे करावी स्वामी सुज्ञच आहेत परंतु जे जाले ते जाले आता स्वामीचे चित्तातील संशय दूर होउन मजपासून शेवाचाकरी घेऊन मीं एकनिष्ट आहे अथवा नाहीं याची परीक्षा करावी एकनिष्टतेचे पेचामुळें ही अवस्था जर मजकडून आंतर स्वामीचे पायाजवळ जाल्यास स्वामीचे पाये व कासीविश्वेश्वर साक्ष आहे ह्या उपरांत्तीक उपेक्षा केल्यास निरापक्ष विनंती करणार कोणी नाहीं तोंड काळ करून जोवईइ आणि फार वाईट क्रीया भ्रष्ट होतो दुसरी यास विनंती करावयास सांगितल्या अर्थी तातपर्य पाहतात यास्तव मजजवळ अर्थ नाहीं उपेक्षा केल्यास प्राण जाईल यास्तव विनंतीहि लिहिली आहे इतकही लिहिले आहे यात ही आपला संशय नच जाये तर एक सनेसी बोलाउन मजला सनेश ग्रहण द्यावे त्यात माझे लिहिण्याची सीमा

---

१ हस्ताक्षर निराळें.

असें स्वामीचे मर्जीस येईल तैसे करावे व आपल्यावाचून माझा त्राता दुसरा नाहीं शेवेसी शृतहोये हि विनंती

---

श्री

राजश्रीया विराजीत राजमान्य राजेश्री बाजीराव गोविंद स्वामीगोसावी यासी पो रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील + + + + + खुशाली लिहित जाणे विशेष रा नरसिंगराव गोविंद सोरापुराकडे रवाना केले होते त्यास सांप्रत मशारनिल्हे व संस्थानिक एक विचारे होऊन सरकार चाकरीवर लक्ष ठेउन कांहीं फौजेचा जथा धरून मुलकाची जप्ती करित आहेत येविसी संस्थानीकानी व नरसिंगराव गोविंद यानी हुजुर विनंतीपत्रें लिहिली आहेत त्याजवरुन हे पत्र तुह्मास लिहिले आसे हे तरी उभयता फौज धरुन पंढरपुर पावेतो जत्फी करतील तुह्मी ही त्याची कुमक करणे जाणिजे छ ५ जिलकाद बहुत काय लिहिणे हें विनंती

---

श्री

यादी लक्षुमणराव नरसिंह याची विज्ञप्ती ऐसिजे तीर्थरुप नरसिंगराव गोविंद याणी श्रीमंत साहेबाचे पायी लक्ष ठेउन सेवा एकनिष्टे केली वडिलोपार्जित संग्रह पागा हत्ती व कांहीं धुत्रया संचय होता तो अगदी नाहिसा होऊन कर्ज मनस्वी जाले कित्येक लोक पेचात आले व भाउबंद व आपविशी याजवर पेच पडले करनाटक प्रांतापासोन क्षेत्र पंढरपुर पर्यंत फौजा धरून भाउशी लढाई केली व करकंबेवर होळकर व मिरजकर व सरकारी कुमक तोफासुद्धा पन्नास हजार फौजेसी तीन महिने टकर दिली हे सर्व त्याचे श्रम साहस स्वामी जाणतात बहुत दुःख भोगुन डोळ प्राण ठेउन होते त्याचे एकनिष्ठेचे फळ इतकेच कीं स्वामीचे पाये दृष्टी पडल्यानंतर देह ठेविला यात सर्वतोपरी त्याची सार्थकता जाली कृपेची जोड करुन ठेविलीसी कृपा अवलोकन मजवर आहे आह्मास साहेबाचे पायाखेरीज आधार किमपी नाहीं वडिलाचा हेत होता त्याप्रमाणे अर्ज लिहिला आहे.

१ पो करकंब अर्ज करून मागावयाचा हेत बहुत होता त्यास तुर्त पा मजकुर पैकीं मौजे उंबरे वतनाचा गाव आहे तो गाव देखील करकंबच्या खटल्या पासोन पारखा झाला आठ नउशे रुपये वसुलि आहेत तेवढा गाव + + + + + + + इनाम करून देवावा ह्मणजे तीर्थरुप मातोश्री तेथे स्नानदान करून राहातील

१ माझी मुंज यंदा केली पाहिजे स्वामीनी केल्याशिवाय होत नाहीं.

१ साहेबाचे आज्ञेवरून मुंडव्याचे तळावर तीर्थरुपानी लोक ठेविले त्याचे खर्चास भोसल्याकडील चार लक्ष रुपयेची खत व कागदपत्र वा जगन्नाथ शास्त्री जवळ गाहाण ठेऊन पाच हजार रुपये कर्ज घेतले ती खते साहेबानी रूबरु आणुन उगवाणी याचा अर्थ करावा ह्मणजे कर्जमुक्त होऊन सेवेत सुखरूप राहु

१ जातीची बेली ठराऊन देऊन सेदोनसे लोकासुद्धा चाकरीस असावयाचा बंदो-

बस्त करुन देऊन पालखीसुद्धां सरंजाम लाऊन देणार धणी समर्थ आहेत वडिल येथे विपत्य भोगुन होते आता कृपा करुन बंदोबस्त करुन घ्यावा

१ तीर्थरुपाचे पुतणे बाबु + + + +[1] याजविसी आनंदराव शिवाजी यांणी साहेबास अर्ज करून भेटी केली होती त्याचे जातीचा बंदोबस्त करून देववितो ह्मणोन आश्वासन झाले होते त्याचा बंदोबस्त कृपा करून साहेबानी करून द्यावा फार दिवस जाले

५

एकूण कलम पाच विनंती अवलोकन करून कृपाळु होऊन बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे

---

श्री

राजश्रीयाविराजीत राजमान्य राजेश्री बापु स्वामिचे शेवेसी

पो विठलराव शिवदेव कृतानेक सा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकिय कुशल लेखन करावे विशेष गोविंदराव शिवदेव यानी पुण्यात कर्जे घेतली आणि राजश्री मुधोजी भोसले याजकडे ऐवज दिला त्यावरील ऐवज फिरावा सावकारास पाववावा तो योग जाला नाहीं गोविंदराव यानी तगादा भोसल्यास केला तेव्हा सरकारातून मना केले याजमुले याचा गुंता तैसाच राहिला सावकार तगादे करितात त्यास गोविंदराव गुदस्ता निवर्तले चिरंजीव त्याचे राजश्री नरसींगराव गोविंद आमचे पदरी आहेत त्यास घरी सावकार तांबेकर वगैरे चौकी वसवितात रुण निघणे नाही परंतु तगदी होती एविसी आपल्यास पत्र घ्यावे ह्मणोन विदित केले त्याज वरुन स्वामीस पत्र लिहीले आहे तरी विचारे करुन चौघास सांगावे भोसल्या कडिल निर्गम होउन आल्यास यासी देणेदाराची काळजीच आहे ती पावतो त्याजवरी जप्ती न बसे ते करविले पाहिजे विशेष लिहिणे लोभ असो दिजे हि विनंती

---

श्री

नक्कल

शेवेसी नरसिंगराव गोविंद विनंती ऐसी जे मजला आपणा जवळ येऊन आठ नउ वर्षे जाली येथील फौजेचा कारभारी यासी जितकी पराकाष्टा करावयाची ती केली दुसरीकडे गेलो नाही असे असता माझा काहीच परिणाम नाहीं ऐशा बहुत संकटात आहे माझा मानस होता कीं स्वामीसेवा एक वेळ करुन दाखवावी ते ही माझे दैवी नाही व मृत्य ही येत नाहीं तत्रापी आपणास न कळता परागंदा व्हावे तेव्हा मी स्वामी जवळ आश्रीया पुरस्कर आलो असे असता न कळता जावे तेव्हा मी आश्रीया भ्रष्ट होतो आता माझा काही परिणाम नाही त्यास स्वामींनी कृपा करुन मी काही समक्ष विनंती करावयाची ती करीन आणि आज्ञा घेऊन श्रीमाहाया-त्रेस जाईन आता माझा उपाय नाही असे संकट इश्वरक्षोभ जाणोन विनंती लिहीली आहे एक वेळा समक्ष बोलणे होईल हे मानस आहे माझी भेटी स्वामीस घेणे नसल्यास तसेच सांगोन पाठविणे आपले चरणा जवळ माझा दुसरा विचार नाहीं मी

[1] येथून हस्ताक्षर निराळें.

या दरबारी सर्वांचा वाहक आहे मजविशी स्वामी जवळ कोणी विनंती करणार नाही हे सर्व आपणास ठाउक च असेल व आता मी फार संकटात आहे कृपा करुन माझे दोन घटका बोलणे ऐकून आज्ञा द्यावी यावयास आज्ञा दिली पाहिजे हे विनंती

---

श्री

यादी नरसिंगराव गोविंद याचे पुत्र लक्ष्मणराव याची विज्ञापना ऐसिजे स्वामिनी आमचे बंदोबस्ता विषई राजश्री बालाजीपंत पटवर्धन यासी रूबरु आज्ञा केली आहे त्यास वडिलानी स्वामीकार्यास्तव स्वराज्यात काय जे मेहनत केली ते स्वामिस विदित आहे आता कृपाळु होउन बंदोबस्त करून देविला पाहिजे

१ श्रीमंत राजश्री बाबासाहेब याची भेटी होउन वस्त्रे आह्मास देवीली पाहिजेत

१ तीर्थरूप नरसिंगराउ गोविंद यासी राजश्री नाना फडणीस यानी आज्ञातवासी ठेविले होते त्यास खर्चाची नेमणूक दुमाही

२५० जातीस
१०० पालखीस
२५ कारकून
---
३७५

एकूण पावणे चारशे रुपये होते हल्लि कृपा करून जाजती नेमणूक करून देविली पाहिजे

१ अलिकडे बेविस महिने रोजमुरा नाही आम्ही नूतन कर्जाचे पेचात येउन बहुत श्रमात आहोत

---

श्री

शेवेसी गंगाधर बलाल कृतानेक विज्ञापना ऐसी जे येथील कुशळ ता छ १० माहे रबिलावल पावेतो साहेबाचे कृपाकटाक्षे करोन मुकाम चंद्रपुर येथें सुखरुप असो यानंतर रा गोविंदराव शिवदेव मजमदार याची रवानगी करून लष्करात पावेत ऐसी खर्चाची बेजमी करुन देणे ह्मणौन आज्ञा त्यावरुन मशारनिल्हेची कुटुंब सुधल येथे घोडी वगैरा वस्तभाव बैतीते देऊन थोडी-बहुत खर्चाची वेगमी करुन आपणाकडे रवाना केले आहे येथून हालतील याचे उर्जित येथापुर्वक करून विशेष वाढवावे येविशी आह्मी वचन दिले आहे भेट व्हावी आणि आपले वचन खरे करावे ऐसा हेत बहुत होता परंतु इकडे येणे न जाले दिवसगती मुळे याची हैराणगत देखवेना याजला रिता पाठविले आहेत त्याचा सर्व प्रकारे गौरव करून जे वस्तभाव व घोडी वगैरा साहेब जवल असेल देविले पाहिजे यासिवाये सरकारातून सर्व साहित्य करून द्यावे ज्या प्रकारे प्रथम हे आपणा पासी आले ते समई पाहिले तसे मागती पाहुन त्याजपेक्षां विशेष उर्जित करून उभये लोकी उतम लौकिक होये तो अर्थ करावा विशष याची पत सरकारीत व सरदारीत वाढे ऐसे करणार साहेब समर्थ आहेत अन्य आश्रय असत नाही आह्मा सेवकलोकावरी कृपा पुर्ण आहे त्यात सर्वांशी खात्री आहे न्युन काही नाही याचे आपण उर्जित करावे त्याचा लवकिक आहे यात्रा याजला दृष्टिस उत्तम प्रकारे पाहावे हे अपेक्षा आहे. पुर्ण साहेबी करावी विशेष काय लिहिणे हे विज्ञापना सहस्र

---

श्री

यादी स्मरणार्थ श्रीमंत रा पेसवे यानी पूर्वी पैवस्तीत नगारखाने ठेवले

देवस्तानाकडे

१ श्री परवती पुणेची
१ श्री वोंकारेश्वर पुणेचा
१ श्री नागेश्वर
१ श्री तुळशीवाग पुणे
१ श्री फुलगावी
१ श्री अलंदी
१ श्री पाशाणी
१ श्री कुंवर साहेब
१ श्री नरसीमपुर
१ श्री पंढरीस आहे

राजमंडळी सरदार

१ श्री माहाराज छत्रपती
१ प्रतीनीधी
१ सचीव
१ मंत्री
१ आलि वहादर
१ परशराम रामचंद्र
१ ढमढेरे
१ विठ्ठल शिवदेव विंचुरकर
१ राजेबाहादर नारो शंकर
१ रास्ते
१ गोपालराव मिरजकर
१ चिंतामणराव सांगलीकर
१ हरीपंत फडके
१ शीदे, होळकर
१ मालोजी घोरपडे
१ पानशे

यादी स्मरणार्थ

१ मोगलाई जाउन बाहिरजी पाढरे याचा आजा मंगलवेढ्यास आला त्यास पैवस्ती सन ११११ येउन सन ११५३ नात गेला ऐकून वर्ष ३५ होता कलम

१ आताजी शिवदेव याचा अमल मंगलवेढ्यास त्रेपन अखेर आला तो ११६० त गेला नउ वर्षे होता

१ गोविंद हरी पटवर्धन याचा अमल श्रीमंत पेशवे याचे कडून आला सन ११६० आखेरीस आला तो सन १२३२ पर्यंत आहे पुढे किती दिवस आहे

१ श्रीमंत भाउसाहेब पेशवे सन ११७० पानपती गिलजानी बुडविले

१ सन ११७१ पंढरपुरास रामचंद्र जाधव येउन क्षेत्रास उपद्रव करुन नागवान

१ निजाम मोगल पंढरी आला सन ११७२ येउन उपसर्ग करता गेला

१ सन ११७३ मिरज पेशव्यास जुजली मिरजेत गोपाळराव होते ते निघोन मोगलाकडे जाउन मोगल पुण्यास घेउन जाउन पुणे जाळले मग मिरजकराचा सला होउन लस्कर उठोन गेले

१ वेंकोजी केशव याचा जन्म काळे सुा सन ११४२ पासून सन १२

मृत्य जाला

१ सन १२२५ वैशाख शुा १० सोमवारी रामचंद्र व्यंकाजी दसणेर याचा काळ जाला

---

श्रीराम

## परशुराम त्र्यंबक मुख्य प्रधान

परशुराम त्र्यंबक यांच्या नांवापुढें प्रतिनिधि हें पद ऐकण्याची आपणांस संवय आहे, परंतु ते केव्हां हि मुख्य

प्रधान होते ही गोष्ट, मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें छापण्यापूर्वी कोणत्या हि प्रकाशित मराठी-इंग्रजी ग्रन्थांत नमूद आहे, असें वाटत नाहीं. परंतु १६२१ च्या आश्विन कार्तिक या दोन महिन्यांत तरी निदान परशुराम त्र्यंबक हे मुख्य प्रधान होते, असा पुरावा उपलब्ध झाला आहे.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १५, लेखांक १७९, यांत परशुराम त्र्यंबक यांचा शिक्का दिला आहे तो असा आहे :

श्री आई आदि
पुरुष प्रसन्न श्री
राजाराम नरपति
हर्षनिधान परशु
राम त्र्यंबक मु
ख्य-प्रधान+

ह्या शिक्क्यांतील ओळी व शिक्क्याचा बाह्य आकार हीं दोन्ही नकलकारानें चुकीचीं उतरलीं आहेत असें वाटतें. लेखांक १७९ हें श्री राजाराम छत्रपति यांचें तिमाजी यमाजी देशाधिकारी पा। सातारा यांस आज्ञापत्र आहे. परंतु श्रीसमर्थसंप्रदायाच्या कागदपत्रांचा जो भाग नुकता च धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेनें प्रसिद्ध केला आहे, त्यांतील लेखांक १५५ हें खुद्द परशुराम त्र्यंबक यांचें पत्र असून त्यांत ते स्वतः आपणांस प्रधान ह्मणत आहेत. या लेखांकांत जो त्यांचा शिक्का आहे, तो असा :

श्री आई आदि पु
रुष प्रसन्न श्री रा
जारामनरपतिहर्षनि
धान परशराम त्र्यं
बक मुख्य प्रधान

हा शिक्का बरोबर लावलेला आहे. १५ व्या खंडांतील लेखांक १७९ ची मिति १६२१ आश्विन वद्य ५ आहे व श्रीरामदासी लेखांकाची मिति त्या च शकांतील कार्तिक शुद्ध ११ आहे. यापूर्वी, पंधराव्या खंडांतील १६२१ वैशाख वद्य ६ च्या १७४ व्या लेखांकांत परशुराम त्र्यंबक यांचा जो शिक्का आहे, तो प्रतिनिधि ह्मणून च आहे; व यानंतर १६२३ भाद्रपद वद्य ५ च्या श्रीरामदासी ११४ व्या लेखांकांत हि ते आपणांस प्रतिनिधि ह्मणून च ह्मणवीत आहेत. यावरून इतकें निर्विवाद ठरतें कीं, कांहीं जुजबी कारणापुरते १६२१ त कांहीं महिने परशुराम त्र्यंबक हे मुख्य प्रधान होते. त्यापूर्वी आणि त्यानंतर ते प्रतिनिधि च होते.

मुख्य प्रधान मोठे कां प्रतिनिधि मोठे असा एका इंग्रज इतिहासकारानें उत्पन्न केलेला प्रश्न विचारास घेऊन रा. सरदेसाई यांनीं प्रतिनिधि मोठे असें उत्तर दिलें आहे. ( मराठी रियासत, पूर्वार्ध, आवृत्ति पहिली, पृष्ठ ६२३ ) परंतु वरील व इतर लेखांकांच्या आधारानें असें ह्मणतां येतें कीं, प्रतिनिधि या शब्दाचा अर्थ मोठा होत असला तरी वस्तुतः मुख्य प्रधानांचा च अधिकार मोठा होता आणि ह्मणून पर-

शुराम त्र्यंबक यांनीं प्रधानपदाची अपेक्षा केली असल्यास ती वावगी नव्हती.

वर उल्लेखिलेल्या लेखांकांच्या योगानें आणखी एक शोध लागतो. परशुराम त्र्यंबक यांना प्रतिनिधिपद केव्हां प्राप्त झालें असा प्रश्न आहे. " Timmojee Rugonath (तिमाजी रघुनाथ) being found unfit for his high Station, Pureshram Trimbuck was raised by Tara Bye to the rank of Pritee Needhee and received general charge of all the forts". ( History of the Mahrattas by J. Grant Duff, third Edition, published at the Times of India Office, page 175 ) असें ग्रँट डफ ह्मणतो व त्याचा च अनुवाद रा. सरदेसाई यांनीं हि केला आहे. ( मराठी रियासत पृष्ठें ५११-५१२ ). श्री छत्रपति राजाराम महाराजांच्या पश्चात् ताराबाईनीं परशुराम त्र्यंबक यांस प्रतिनिधि नेमले, असें या इतिहासकारांचें ह्मणणें आहे. पण आतां ही समजूत वरील कित्येक लेखांकांवरून चुकीची ठरत आहे व छत्रपति राजाराम महाराजांच्या च कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं परशुराम त्र्यंबक हे प्रतिनिधि होते, इतकें च नव्हे तर कांहीं काळ मुख्य प्रधान हि होते.

पुणें, वैशाख शु. १०
शके १८३७

शंकर श्रीकृष्ण देव

---

# माध्व आणि रामदासी

द्वैतमताचे प्रख्यात श्रीमन्मध्वाचार्य यांच्या मतानुयायी लोकांस माध्व असें ह्मणतात व महाराष्ट्रांतील साधुवर्य प्रख्यात श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या अनुयायांस रामदासी असें ह्मणतात.

माध्व आणि रामदासी ह्या दोघांच्या आचारविचारांत पुष्कळ साम्य आहे, ह्या गोष्टीकडे आजपर्यंत कोणाचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. मी ज्या गोष्टी खालीं लिहीत आहें त्यांकडे लक्ष दिल्यानें हें साम्य कसें आहे तें समजून येईल. श्रीसमर्थांनीं आपल्या जन्मानें ज्या घराण्यास धन्य केलें तें घराणें माध्व होतें असा लोकप्रवाद आहे व सांप्रत रामदासांचा मूळ गांव जों जांब त्याच्या आसपास व अन्यत्र पसरलेले त्यांचे भाऊबंद माध्वमतानुयायी आहेत असें ह्मणतात. सांप्रत त्यांपैकीं पुष्कळ रामदासी सांप्रदायानें हि वागतात.

रामदासांचें घराणें मूळचें माध्व असल्यामुळें माध्वांचा वैष्णवी बाणा त्यांच्या ग्रंथांत व रामदासीयांच्या आचरणांत झळकताना दिसतो. त्यांचा "रामदासी बाणा" आहे, असें एखाद्याविषयीं बोलतांना ह्मणण्याची वहिवाट आहे. दोघांचा हा बाणा ह्मणजे एकविधभक्ति हा होय. समर्थ हे जरी अद्वैतवादी आहेत तरी अद्वैताचा भलताच परिणाम त्यांनीं कर्ममार्गावर घडूं दिला नाहीं, ही गोष्ट त्यांचे ग्रंथ वाचले असतां ध्यानांत येईल. उत्कटभक्तीचें बाळकडू त्यांच्या पूर्वजांपासूनच त्यास मिळालेलें आहे.

माध्व व रामदासी यांच्या समजुतींत व आचारविचारांत साम्य कसें आहे तें सांगून मग तदनुरोधानें द्वैताद्वैतमताचे परिणाम आपल्या देशावर कसे घडले, ह्याचें दिग्दर्शन करण्याचा माझा विचार आहे.

श्रीमन्मध्वाचार्य यांचें उपास्य दैवत श्रीरामचंद्र होय. मध्वाचार्य हे वायुदेवाचा अवतार असें माध्व वैष्णव समजतात.

**प्रथमो हनुमान्नाम द्वितीयो भीम एव च। पूर्णप्रज्ञस्तृतीयश्च भगवत्कार्यसाधकः ॥**

हें वचन माध्वांत प्रसिद्ध आहे. हनुमान् ह्मणजे मारुती, पंडुपुत्र भिमसेन व पूर्णप्रज्ञ ह्मणजे मध्वाचार्य हे भगवत्कार्यसाधक वायुदेवाचे अवतार आहेत, असा ह्या वचनाचा अर्थ आहे, श्रीसमर्थांनीं जर अद्वैताचें प्रतिपादन न करितां द्वैत प्रतिपादन केलें असतें तर आमच्या माध्वांनीं “ रामदासश्चतुर्थकः ” असें घालून ह्या श्लोकाच्या चतुर्थ चरणांत पाठभेद केला असता ! असो.

श्रीमध्वाचार्यांप्रमाणें श्रीसमर्थांचें हि उपास्य दैवत श्रीरामचंद्र च होय. आणि समर्थ मारुतीचे ह्मणजे वायुदेवाचे अवतार अशी महाराष्ट्रांत सर्वत्र समजूत आहे. पुष्कळ लोक रामदासांना शेंपूट होतें असें ह्मणतात ! ह्यावरून वर सांगितलेल्या श्लोकाच्या चतुर्थ चरणांत वर सांगितल्याप्रमाणें चतुर्थ स्थानीं बसण्यास ते किती योग्य झाले असते हें ध्यानांत येईल. दुसरी गोष्ट सर्व माध्वांचे गुरु मध्वाचार्य व रामदासांचे गुरु श्रीमद्धनुमान् हे एका च देवाचे अवतार.

माध्व वैष्णव गोपीचंदनाचे द्वादश तिलक ह्मणजे नाम शरीरावर लावून गोपीचंदनाचे च शंखचक्रादि मुद्रांचे व श्रीनारायणनामांकित मुद्रेचे ठसे त्या नामावर व शरीरावरील यथानियमित भागीं लावितात. त्याचप्रमाणें रामदासी हि गोपीचंदनाचे नाम लावून त्यांवर रामनामांकित मुद्रेचे ठसे उठवितात. माध्वांच्या चक्र, शंख, गदा, पद्म व नारायणनाम ह्यांच्या पांच मुद्रा असतात व रामदासीयांच्या तशा नसून एक च रामनामांकित मुद्रा असते. एवढा फरक आहे. भोजनापूर्वी भगवंताचा तीर्थप्रसाद घेऊन कपाळीं, गंध, अंगारा, अक्षत दोघे हि लावितात. अलीकडे सुधारणेचा प्रसार वैष्णवांत व रामदासीयांत हि झाला आहे, त्यामुळें पुष्कळ माध्व वैष्णव मुद्रा, अंगारा, अक्षत लावीत नाहींत; त्याप्रमाणें रामदासीयांनीं हि ह्या गोष्टींचा त्याग केलेला दिसतो.

माध्व वैष्णव सर्व देवता सारख्या च आहेत, असें मानीत नाहींत. त्यांत तारतम्य मानितात. योग्य काय व अधिक योग्य काय ? हा विचार त्यांच्या मताचें सार आहे असें ह्मटल्यास चालेल. हव्यकव्यादि नित्यनैमित्तिक कर्में करितांना हि तारतम्यभाव ते ठेवितात. त्यांची पूजानैवेद्यादिकांची पद्धति ह्या च तत्वावर अवलंबून आहे. अगोदर भगवंतास नैवेद्य समर्पण करून त्या निवेदित अन्नानें वैश्वदेव करितात. श्राद्धादि पितृकर्म नैवेद्यवैश्वदेवादिक झाल्यावर करितात. रामदासी लोकांत हि हा च प्रचार आहे. रामदासांचा मुख्य मठ चाफळ येथें आहे. तेथें वर सांगितलेल्या माध्वांची आचारपद्धति च चालू आहे. भागवतपंथ

ह्मणून जो महाराष्ट्रांत पंथ आहे, त्याच्यांत हि अशी च पद्धति आहे. आह्मी रामदासी आहों, आह्मी भागवतपंथी आहों, इत्यादि ह्मणणारे आजकाल पुष्कळ च आहेत; परंतु त्या त्या पंथांचे आचार त्यांना माहित नाहींत, असें त्यांचें आचरण पाहिलें असतां दिसतें. नव्या पद्धतीवर कै. माधवराव गोविंद रानडे यांनीं लिहिलेल्या निबंधवाचनापेक्षां अधिक माहिती पुष्कळांना असेल, परंतु आचार-पद्धति फार च थोड्यांना ठाऊक असते. आचाराला फाटा देण्याकडेस च हल्लीं बहुतेकांची प्रवृत्ति आढळते.

वर सांगितलेले माध्वांचें तारतम्य रामदासी व भागवतपंथी मानितात. रामदास दशक १३ समास १० मध्यें ह्मणतात :

**देहीं आत्मा देह अनात्मा। त्याहून पर तो परमात्मा। निरंजनास उपमा। असेचिना ॥७॥ रायापासून रंकवरी। अवघ्या मनुष्यांचिया हारी। सगट समान सरी। कैसी करावी ॥ ८ ॥ देव दानव मानव। नीच योनी हीन जीव। पापी सुकृति अभिप्राव। उदंड आहे ॥ ९ ॥ येकांशें जग चाले। परी सामर्थ्य वेगळालें। येकासंगें मुक्त केलें। येकासंगें रवरव ॥ १० ॥ साकर माती पृथ्वी होये। परी ते माती खातां नये। गरळ आप नव्हे काये। परी तें खोटें ॥११॥ पुण्यात्मा आणि पापात्मा। दोहींकडे अंतरात्मा। साधु भोंदु सीमा। सांडूंच नये ॥ १२ ॥ अंतर येक तों खरें। परी सांगातें घेऊं न येती माहारें। पंडित आणि चाटें पोरें। येक कैसीं ॥ १३ ॥ मनुष्य आणि गधडे। राजहंस आणि कोंबडे। राजे आणि माकडें। येक कैसीं ॥ १४ ॥ तैसें निंद्य सोडून द्यावें। वंद्य तें ह्रदईं धरावें। सत्कीर्तीनें भरावें। भूमंडळ ॥ २० ॥ उत्तमासि उत्तम माने। कनिष्ठास तें न माने। ह्मणौन करंटे देवानें। करून ठेविले ॥ २१ ॥**

ह्यावरून श्रीसमर्थांचें मत तारतम्यविचारास किती अनुकूल आहे हें लक्षांत येईल व तदनुरोधानें च त्यांच्या मठांतील व रामदासी मंडळींतील हि आचार आहेत व त्यांचें माध्वाचारांशीं साम्य आहे.

कर्नाटकांत व दक्षिण महाराष्ट्रांत हनुमंतव्रत ह्या नांवाचें व्रत माध्व वैष्णवांपैकीं कित्येक लोक करितात. हें व्रत मार्गशीर्ष शुद्धांत असतें. अनंतव्रतांत ज्याप्रमाणें तांबड्या दोऱ्याची पूजा असते, त्याप्रमाणें हनुमंतव्रतांत पिवळ्या दोऱ्याची पूजा असते. महाराष्ट्रांत हें व्रत रामदासी लोकांत सज्जनगड व चाफळ येथील लोक करितात, हें म्यां पाहिलें आहे. महाराष्ट्रांतील बहुतेक माध्वांना ही व्रताची गोष्ट माहित हि नाहीं ! ह्यावरून लक्षांत येईल कीं, रामदासी पंथांत जो कांहीं जिव्हाळसूदपणा दिसून येतो, त्यांत माध्वमताच्या झऱ्याचा फाटा येऊन मिळालेला आहे ! किंवा मूळचा च आहे ह्मटलें तरी चालेल !

शके १५७७ त श्रीसमर्थ कर्नाटकप्रांतीं तीर्थयात्रेस गेले होते. तेव्हां माध्वांच्या उत्तरादि मठाच्या सिंहासनावरील अधिकारी श्रीराघवेंद्रस्वामींच्या व उडपी

सुब्रह्मण्य येथील श्रीमन्मध्वाचार्यांच्या मठांतील मुख्य आचार्यांच्या दर्शनास गेले होते. राघवेंद्रस्वामींनीं समर्थांस पुष्कळ दिवस आपणाजवळ ठेऊन घेतलें होतें. ह्या गोष्टींचा उल्लेख समर्थांच्या चरित्रांत हि आलेला आहे.

आतांपर्यंत म्यां माध्व आणि रामदासी यांच्या आचारांत दिसणारें साम्य दाखविलें; आतां विचारांत कितपत साम्य आहे हें पाहूं. रामदासांच्या पूर्वींचे अगर त्यांच्या समकालीन जे साधुपुरुष होऊन गेले त्यांच्या कोणत्या हि संप्रदायाशीं रामदासांच्या संप्रदायाचा संबंध नाहीं. त्यांचा कोणी हि मानवी गुरु नसून श्रीमारुतीराय त्यांचे गुरु; त्यांच्या कृपेनें त्यांस श्रीरामचंद्राचें दर्शन झालें. त्यांनीं सर्व संतजनांस आपल्या ग्रंथांत मान दिला आहे; परंतु अमुक एकाचें नांव घेऊन कोणाची प्रशंसा केलेली नाहीं. शंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुजाचार्य किंवा वल्लभाचार्य यांपैकीं कोणत्या हि आचार्यांचें नांव त्यांनीं आपल्या ग्रंथांत–दासबोधांत-उल्लेखिलें नाहीं. ह्मणून ते स्वतः शांकरमताचे किंवा मध्वमताचे असें ह्मणतां येत नाहीं. आपल्या ग्रंथांत रामदासी हा एक स्वतंत्र पंथ आहे व त्यांतील विचार स्वतंत्र आहेत. त्यांनीं आपल्या मठांतून व शिष्यांस घालून दिलेले आचार माध्वांच्या आचारासारखे आहेत. माध्वांचें तारतम्य त्यांस मान्य आहे असें त्यांच्या दासबोधावरून दिसतें. ते अद्वैतमती आहेत तथापि इतर अद्वैत्याप्रमाणें आचार, व्यवहार व ज्ञान ह्यांची कालवाकालव ते करीत नाहींत. असो जे प्रपंची मूर्ख । ते काय जाणती परमार्थ सुख ॥ असें ह्मणून उत्तम रीतीनें प्रपंच कसा करावा, हें त्यांनीं आपल्या दासबोधांत जागोजाग सांगितलें आहे. अद्वैतमताचें प्रतिपादन करून आपण ब्रह्मज्ञानी झालों; असें मानून, हवे तसे वागणारे, रामदासांना आवडत नाहींत. आचार उपासना सांडिती। ते भ्रष्ट अभक्त दिसती । जळो त्यांची महंती । कोण पुसे ॥ असें ह्मणून त्यांनीं त्यांचा तिरस्कार व उपहास केला आहे. आचार आणि उपासना ह्यांत बावळटपणा व ढिलेपणा किंचित हि नसावा, ह्यांचें उत्कटत्व असावें. बालोन्मत्तपिशाचवत् वागून, आपण मोठे योगी व ज्ञानी आहों, असें दाखविणाऱ्या ढोंग्यांचें वर्णन त्यांनीं आपल्या गोसावी ग्रंथांत केलें आहे व अशांच्या आचारावर, फाल्गुन मासींचा खेळ । पाहतां अवघा चि बाष्कळ । तेथें पाहूनि निर्मळ । काय घ्यावें ॥ असा शेरा मारिला आहे. तात्पर्य, आत्मज्ञानीपणाचा डौल आणून आचार व उपासना सोडूं नयेत. ज्ञानीजनांस हि कर्मे सुटत नाहींत. प्रपंच आणि परमार्थ दोन्ही हि साधावीं. प्रपंच करितांना परमार्थाकडे दुर्लक्ष करूं नये. परमार्थी लोकांस हि प्रपंच आहे च. संसारी व परमार्थी ह्यांच्या प्रपंचाची तऱ्हा निराळी असेल, परंतु प्रपंच कोणास सुटत नाहीं, असें त्यांचें मत त्यांच्या ग्रंथांवरून दिसतें. "सत्यं जगत् तत्वतः" असें जरी ते निश्चयानें माध्वाप्रमाणें ह्मणत नाहींत, तथापि क्रिया माध्वाप्रमाणें जग सत्य मानून करावयास सांगतात. मी ब्रह्म आहे, ब्रह्म सत्य, जग मिथ्या आहे, सगळी माया आहे, प्रपंच असार व असत्य आहे. कोठें तरी राहावें, काय मिळेल तें खावें व स्वस्थ पडावें; अशा प्रकारच्या बोधाचा एक च

गोंधळ करून रडगाणें गावयाची कला ते कोणास शिकवीत नाहींत. त्यांनीं कोणत्या हि व्यक्तीचें नांव घेऊन कोणास दोष दिला नाहीं. तथापि अद्वैत आणि द्वैत वाद्यांचीं दोघांचीं हि मतें त्यास सर्वोपरी मान्य नव्हतीं. शैवीं आणि वैष्णवीं । केली आवघी गाथा गोवी ॥ असें ह्मणून दोघांविषयीं हि त्यांनीं अनादर दाखविला आहे. फार अद्वैतवादी जनांनीं सगळें च मायेत गुंडाळून असत्य व नाशवंत आहे, एक ब्रह्म मात्र खरें व तें ब्रह्म आपणच, असा उपदेश करून प्रपंचा कडून लोक परावृत्त केले व त्यांचे मनोविकार ढिले करून त्यांस बावळट बनविले तर उलटपक्षीं द्वैतवाद्यांनीं भेदभावाची परमावधी करून समाजांत फूट पाडली व तेणेंकरून आपलाच समाज दुभंग झाला. हें पाहून त्यांनीं मधला च मार्ग धरलेला दिसतो. आचार आणि उपासना ह्यांस त्यांनीं माध्वांचें वळण दिलें आहे व कर्ममार्ग उत्कट राहावा अशी त्यांनीं योजना करून वैष्णवांचा कडकपणा अंगिकारलेला दिसतो व ज्ञानी जनांस अंतीं अद्वैतप्राप्ति होते खरी, तरी त्यास कर्म सुटत नाहीं असा कांहीं अद्वैत्या सारखा व कांहीं द्वैत्या सारखा त्यांचा विचार आहे. तात्पर्य त्यांचा पंथ द्वैताद्वैतमिश्रित आहे. त्यांच्यापूर्वी महाराष्ट्रांत शांकर, माध्व, जैन, लिंगायत, वगैरे आपल्यांतील मतें व मुसलमान आणि ख्रिस्ती ही परकीय मतें दशांत कमजास्त प्रमाणानें पसरून लोकांच्या आचरणांत व मतांत त्यांचा संकर झाला होता. हें पाहून त्या काळास योग्य असा भक्तिमार्ग त्यांनीं स्थापिला. त्यांच्या काळीं असलेल्या परिस्थितीहून निराळी परिस्थिति त्यांनीं आपल्या पराक्रमानें उत्पन्न केली. तेणेकरून द्वैती वैष्णव व अद्वैती शैवादि लोक ह्या सर्वांचा संग्रह रामदासी मंडळांत होऊं लागला.

आचार व उपासना ह्यांत बहुतांशी साम्य असल्यामुळें माध्व लोकांचा फार मोठा समुदाय रामदासीपंथांत मिळून गेलेला आहे. महाराष्ट्राप्रमाणें कर्नाटकांत ही रामदासी मठ आहेत. मराठी भाषेंत माध्वमताचें वाङ्मय नसल्यामुळें व माध्वांच्या आणि रामदासीयांच्या आचारादिकांत साम्य असल्यामुळें ही महाराष्ट्रीय माध्व रामदासी पंथाकडे सहजच वळतात.

पुणें ता. ३०।५।१५ } कृ. वि आचार्य
कालगावकर

---

# सखारामबापु बोकील

'पेशवाईत साडेतीन शहाणे झाले' असा लोकप्रवाद आपणा सर्वांप्रमाणें मी हि लहानपणापासून ऐकत होतों. या साडेतीन शहाण्यांत च सखाराम भगवंत ऊर्फ बापू बोकील, यांचा अंतर्भाव होतो. ह्या अलौकिक गृहस्थाला 'सोळा आणे शहाणा' असें सर्टिफिकिट मिळालें असतां हि, पेशवाईत व इतर दरबारांत या पुरुषाचें अत्यंत वजन होतें, असें असतां हि व १७७०–१७७८ पर्यंत बापू प्रायः सर्वाधिकारी असतां हि त्यांच्या संबंधानें आपणांस कांहीं दंतकथा, पेशव्यांच्या बखरींतील तुटपुंजे वृत्तांत, पटवर्धनांच्या दप्तरांतील कागदपत्रांत आलेला संबंध, काव्येतिहासांत, मराठी इतिहासाच्या साधनांत व इतिहास

संग्रहांत मिळून प्रसिद्ध झालेलीं दहावीस पत्रें, याशिवाय कांहीं च माहिती नसावी याचें मला वाईट वाटे. असो. पांचचार वर्षांपूर्वी मी मध्यभागच्या कमिशनर साहेबांस एलिनिएशन डिपार्टमेंट [ इनाम चौकशीचें खातें ] मध्यें जुने कागदपत्र सरकारनें जपून ठेविलें आहेत. त्यांतील बापूसंबंधीं माहिती देणारे रुमाल पाहण्याची परवानगी मागितली आणि मला लिहिण्यास आनंद वाटतो कीं, ती परवानगी कमिशनरसाहेबांनीं दिली. याबद्दल त्यांचे आभार मीं मानले हें सांगणें नलगे.

परवानगी मिळाल्यावर मी त्या आफिसांत जाऊं लागलों. आठ एक दिवस जात होतों. तेथें आफिसांत मला तीन रुमाल पाहण्यास मिळाले. घडणी, जमाव आणि सरंजाम, अशीं हीं तीन व्यवस्थेनें ठेवलेलीं दप्तरें होतीं. या दप्तरांत बापूंचा खासगत जमाखर्च, त्यांस वेळोवेळीं मिळालेल्या सनदा आणि त्यांस असलेल्या जात व फौज सरंजाम यांचा जमाखर्च दिला आहे घडणी दप्तरावरून कांहीं हकीकत काढितां येतें.

महादाजीपंत बाबा पुरंदरे यांचे वशिल्यानें बापूंचा नानासाहेब पेशव्यांजवळ प्रवेश प्रथम झाला. हे प्रथम शिलेदार कारकून ह्मणून होते. यांस सालिना ३०० रुपये तैनात व शिवाय पोषाख असे. शेवटीं शेवटीं ह्मणजे राज्याचे पूर्ण यखत्यारी झाल्यावर यांस सालिना ६०,००० रु. ची नेमणुक आणि शिवाय इनामें आणि जहागिरी होत्या असें दिसतें. इसन्ने अर्बैनांत ( १७४१-४२ ) यांस नेमणुक ३७७ रु. ची होती, ती खमसेनांत ६००० ची झाली, सीत खमसेनांत १९००० तर समान सितेनांत नेमणुक ५६ हजार व फौजेबद्दल ६ लाखाची झाली. शिवाय, इनाम, मोकासे व जहागीर गांव होते, ते निराळेच. समानसबेनांत यांस ७२ हजार तनखा मिळे. शिवाय ६ लाखाची जहागीर फौजेबद्दल असे. तिसेन सबैन मध्यें बापूंस अटकाव झाला. त्यांस पुष्कळ गांवांत शेरीबागा, पुष्कळ गांवें पेशव्यांनीं इनाम दिलीं. त्यांचा वसूल सालीना ८००० असे. शिवाय, जोशी कुळकरणाच्या वृत्ती त्यांनीं पेशव्यांच्या कृपेनें संपादन केल्या. वंदनचा किल्ला बापूंच्याच ताब्यांत असे. मराठे सरदारांकडून व इतर सरकारांतून त्यांस दरवर्षी रोख रकमा पोहचत असत. सरदारांच्या जाहागिरींत फडणीशीचे व चिटणीसीचे दरकदार बापूंच्या नेमणुकीचे असत.

## जमाव दप्तर

यमाजीपंत
|
महादाजीपंत ( यांस शाहुमहाराजांनीं हिवरें गांव दिला १७१० याच्या च फेर सनदा १७४५ मध्यें खंडोपंतांनीं व १७५६ मध्यें बापुंनीं पेशव्यांकडून घेतल्या. )
|
गंगाधरपंत
|
भगवंतराव
|
खंडोपंत — बाजीपंत — सखारामपंत [बापू]
|
अक्कोपंत
|
यशवंत [दत्तक]

## सरंजाम दप्तर

घडणींतील जमाखर्चाशीं या दप्तराचा मेळ आहे. त्यांचा जात जमाखर्च अर्बा सब्बेनांत २०३, ३०४ जमा व १९१, २४६ खर्च आहे. बापूंस कैद केल्यावेळीं त्यांच्या घरांची जप्ती झाली, तींत सुमारें ८ लाखांची मोजदाद झाली. यावेळीं त्यांचें इनामी उत्पन्न व जहागीर मिळून सालीना सुमारें ५।६ लाख उत्पन्न असे. बापू जिवंत असतां व त्यांच्या पश्चात् त्यांच्या २ बायकांस व सुनेस मिळून ८००० ची नेमणूक नानांनीं करून दिली.

बापू २५ साबान ? इसन्ने समानीनांत वारले. त्यावेळीं त्यांच्या उत्तरक्रियेस ५००० रुपये खर्च केला अशी नोंद आहे. शिवाजीपंत ह्मणून त्यांचा कोणी नातेवाईक होता, त्यानें बापूंस सोडविण्याचा यत्न केला, पण विचाऱ्यानें आपल्या मात्र पायावर धोंडा पाडून घेतला.

## या दप्तरांत मिळालेली किरकोळ माहिती.

बापू हे देशस्थ असून ऋग्वेदी अश्वलायन शाखेचे असत. बोकीलांचें गोत्र जमदग्नी. बापूंचे पणज्यांनीं शाहूमहाराजांची सेवा करून व प्रसंगीं उपयोगी पडून राजास प्रसन्न करून घेतलें व हिंवरे गांवची वंशपरंपरा सनद मिळविली.

बापूंस अप्पोपंत या नांवाचा एकच मुलगा होता पण मुली बऱ्याच असाव्या. तीत सानांतील जमाखर्चावरून यासाली बापूंच्या तीन बायका जिवंत होत्या असें दिसतें. सबासबेनांत बापूंनीं चवथें लग्न केलें. या वेळीं यांचें वय कमीतकमी ६० च्या पलीकडे असावें. बापूंनीं आपल्या शेवटच्या मुलीचें लग्न मोठ्या थाटानें केलें असावें. श्रीमंत सचिवांकडे ही मुलगी दिली त्यावेळीं बापूंस ४०,००० रुपये खर्च आला.

तथापि बापू जपून खर्च करणारे असत. त्यांचा गोतावळा मोठा व घरीं चाकरमाणसें हि मनस्वी. नुसते धर्मादायाकडे च बापूंचे १०,००० खर्च होत. इतका खर्च करून हि बापूंजवळ शेवटीं ८ लाखांची माया होती, असें जप्तीच्या वेळीं दिसून आलें. बापूंचा आचारविचार शुद्ध ब्राह्मणाचा असे. ते स्नानसंध्यादि नित्य नैमित्तिक कर्में सहसा चुकूं देत नसत. बापूकडे कोणी गेला व तो भिक्षुक विन्मुख परत आला, असें झालें नसावें, हें त्यांच्या नित्याच्या जमाखर्चावरून दिसतें. वैदिक, शास्त्री, पुराणिक, इत्यादि विद्वानांची व नटनर्तकादि कुशल तमासगिरांची संभावना बापूंच्या घरीं चांगली होई. जप्तीच्या वेळीं ताब्यांत घेतलेल्या मालाची यादी दिली आहे, त्यावरून शेलके स्वदेशी व परदेशी जिन्नस बापू विकत घेत, मिळवीत अगर त्यास भेट ह्मणून येत असत असें दिसतें. बापूंच्या कोठींत ४ पौंड चहा व सामानाच्या यादींत चहाची बरणी, हातमोजे इत्यादि पदार्थ पाहून मला मोठी मौज वाटली. बापूंची द्राक्षावर फार भक्ति असे, असें दिसतें. सुवर्णवर्ख व नारायणतेल त्यांच्या कोठींत असावयाचें च व नेहमीं आणवावयाचें च. यावरून मी तर्क केला कीं बापूंस

काहींतरी रोग जडला असावा. किंवा त्या काळीं बरेच लोक हे जिन्नस मागण्यासाठीं बापूंकडे जात असतील. गुलाबपाणी हि त्यांस प्रिय असावें.

बापूंचें निशाण व डंका हीं स्वतंत्रच असावींत. ते दोन शिक्के वापरीत असत.

त्यांनीं कित्येत ठिकाणीं नवीन घाट व देवळें बांधिली आणि कित्येकांचा जीर्णोद्धार केला. तसें च, देवालयाच्या आसपास फुलझाडें व फळझाड लावून त्यांस पाणी घालण्याची ही व्यवस्था त्यांनीं केली असावी. दादासाहेबांबरोबर ते काशी प्रयाग वगैरेस जाऊन व त्रिस्थळी करून त्यांनीं आपली तीर्थयात्रा संपूर्ण केली होती.

त्यांचें अक्षर अगदीं सामान्यांतलेंसामान्य आहे. म्हातारपणीं त्यांचा हात कापूं लागला असावा, असें त्यांचे लिहिण्याचे ढबीवरून अनुमानतां येतें.

यावेळा पेशवाईंत गंगावन, बिलोरी पेले, मेणबत्त्या, गालीचे इत्यादि जिनसांचा बराच वापर असे. लोहचुंबकाचा उल्लेख आहे. डगलीं, टोप्या पेशवाईंत गैरमाहित नव्हत्या. श्रीमंत व मध्यम लोक पलंगावर निजत असत. सरकारी कामदारांस खरेदीविक्रीवर बसणाऱ्या जकाती माफ असत. १०० रुपयांस घोडा विकत घेतला, तर त्याला १२८८ जकात पडे. बापूंजवळ २००० रुपये पर्यंतचे घोडे असत. झाशी वगैरे बद्दल बापूंस २५०० पर्यंत पट्टी भरावी लागली आहे. लढाईप्रीत्यर्थ बापूंनीं व केव्हां वर्षाची सर्व नेमणुक सरकारचे स्वाधीन केली आहे.

घोड्यावर बसून वरात काढण्याचा कुंभारांस हक्क नसे पण थोरल्या रावसाहेबांनीं तो गरीब कुंभारांस दिला, हें वाचून मला भारी कौतुक वाटलें. हल्लींच्या केळवणाचा प्रघात पेशवाईंत जारीनें चालू होता. पेशव्यांच्या वाड्यांत पुष्कळ च केळवणें होत व या समारंभांत वस्त्रांचे आहेर करीत. हळदीकुंकवाच्या समयीं बापूंच्या बायकांस शालू, शेले दिल्याचे उल्लेख आहेत.

प्रतापगडावर बापू कैदेंत असतां त्यांची बरदास्त चांगली ठेविली होती. त्यांची सर्व नित्यनैमित्तिकें व श्राद्धपक्षादि सर्व धार्मिक कृत्यें यथासांग होत असत.

सुमेरसिंग ( नारायणरावाचा खून करणारा गारदी ) यास बाळाराम नांवाचा एक मुलगा होता, त्याची मिळकत सल्लासमैनांत जप्त केल्याचा दाखला बापूंच्या दप्तरांत कां सांपडावा हें समजत नाहीं. बापूंची जहागीर जप्त करण्याच्या दादांच्या पुष्कळ सनदा या दप्तरांत दृष्टीस पडतात.

कागदाच्या गड्डीस ६॥ रुपये पडत. जमाखर्ची पद्धति फारच सुरेख दिसते. प्रतिवर्षी कीर्दखतावण्या, रोजबंद, तेरजा यांची रुजवात होई.

या टिपणांत दिलेले आंकडे ढोबळ आहेत.

वर उल्लेखिलेल्या माहितींतील बरीच माहिती मला नव्हती. सरकारच्या कृपेनें ही मला मिळाली, हे सरकारचे मजवर उपकार च होत. पण ही माहिती फारच एकांगी व तुटपुंजी आहे. मराठेशाहींत कित्येक वर्षेपर्यंत प्रामुख्यानें वागून रावसाहेब पेशव्यावर सुद्धां वचक ठेवणाऱ्या बापूसारख्या अद्वितीय पुरुषासंबंधानें ही

माहिती ह्मणजे ' दर्यामेखसखस ' इतक्याही योग्यतेची नाहीं. बापूंनीं पेशवाईंत कमीअधिक ४० वर्षें वावरून पुष्कळ च उठाठेवी केल्या आहेत. त्यांवर नानासाहेबांची बहालमर्जी असे. दादासाहेबांचे तर ते कित्येक वर्षें मुख्य कारभारी होते आणि पुतण्याचा खून करून अथवा करवून ब्राह्मण्यास व माणुसकीस पारखे होणाऱ्या दादासाहेबांचे थेर पाहून बापूंनीं आपल्या बुद्धिकौशल्यानें व आटोकाट शहाणपणानें दादांस " धुळीचे दिवे चारण्यास " आरंभ केल्यानंतर सुमारें ४।५ वर्षें ते मराठी राज्याचे मुख्य चालक होते. इतक्या योग्यतेस केवळ आपल्या बुद्धिवैभवानें चढलेल्या पुरुषानें हजारों पत्रें लिहिलीं असतील, यादी व खलिते लिहिले अथवा शुद्ध केले असतील, मराठी राज्याच्या ध्येयासंबंधानें विचार प्रगट केले असतील, नव्हे? अशा थोर पुरुषाविषयीं उपलब्ध असलेली माहिती अगदीं च थोडी व ती ही धरसाडीची आहे. असली माहिती याच इमारतींत चिटणीशी दप्तरांची गचोनगच भरलेलीं पोतीं आहेत, त्यांत मिळावी. पण चिटणिशी पोत्यांना 'दप्तर' हें नांव द्यावें कीं नाहीं. ही च वानवा आहे. हीं पोतीं फोडून त्यांतील कागद चाळण्याचें काम रा. ब. डोंगरे व रा. ब. पारसनीस करीत आहेत. पण सणासुदीच्या वेळीं काम करणाऱ्या या रा. ब. च्या हातून काय होणार ? इतिहासाला वाहिलेले वीस पदवीधर राजवाडी परिश्रमानें वीस वर्षें एकनिष्ठ तपश्चर्या करतील, तर कांहींतरी बरें च माठ कार्य होणार ! असा तेथील रंग आहे ! दुर्दैव आमचें कीं शहाणपणा, युक्ति प्रयुक्ती, धैर्य, प्रत्युत्पन्नमतित्व इत्यादि गुणांत प्रसिद्ध असलेल्या, स्वतः गरिबींतून वाढलेल्या आणि राज्याचा सर्व भार शिरावर घेणाऱ्या बापूसंबंधानें आपल्यास कांहीं माहिती नसावी व माहिती मिळवून देणारें कागदांचें भांडार आपल्यास दुर्मिळ व्हावें. १००।१५० वर्षांत जर ही दशा, तर पुढें काय होईल, याची मला कल्पना हि करवत नाहीं.

अशा अर्थाचें पत्र मे. कमिशनर साहेबांस लिहून त्यांनीं आपल्या या ऐतिहासिक मंडळाचें साह्य घ्यावें व ही ऐतिहासिक अडचण दूर करावी, असें मी आपल्या पत्रांत सुचविलें आहे. हें मंडळ खटपट करील तर इष्टहेतु साध्य होईल. निदान प्रयत्न केला नाहीं, या पापापासून आपण मुक्त होऊं.

**चिंतामण गंगाधर भानू**

---

## बाळाजी विश्वनाथाविषयीं नवीन माहिती.

सदरहू बखर पुणें येथील शनवारवाड्यालगत दर बुधवारीं व रविवारीं दुपारीं भरणाऱ्या जुन्या अथवा मोडक्या बाजारांत विकण्याकरितां आली होती. प्रथमदर्शनीं बखर हातांत घेऊन चाळली तों बाळाजी विश्वनाथाबद्दल वगैरे अश्रुतपूर्व हकीकत पाहिली त्यामुळें विशेष उत्कंठेनें बरीच किंमत देऊन हि घेतली सदर बखर मंडळामार्फत स्वतंत्र छापून काढण्याचा विचार आहे त्यावेळीं तीसंबंधीं विशेष विवेचन करीन च. ऐतिहासिक पुराव्याचे दृष्टीनें कोणती हि बखर दुसऱ्या अथवा तिसऱ्या

प्रतींत जाते. बखरींत असलेला मजकूर कारणापुरता आतां वाचला आहेच. या मजकुराचें पुष्टीकरणार्थ अस्सल तत्कालीन पत्रव्यवहारादि कागदपत्र मिळाल्यास अनुमानास बळकटी येईल हें खरें तथापि तोंपर्यंत वरील बखर प्रमाणभूत धरण्यास हरकत नाहीं असें मला वाटतें.

बाळाजी विश्वनाथ हे कोकणांतून आल्यावर अगदीं थोड्या च अवकाशांत त्यांस पेशवे पद प्राप्त झालें अशी बहुतेक लोकांची समजूत बरेच दिवस होती परंतु संशोधकांच्या परिश्रमानें ही समजूत चुकीची आहे असें आतां सिद्ध होत चाललें आहे.

बाळाजी विश्वनाथ यांस शके १६३५ मध्यें "पेशवे" पद प्राप्त झालें शके १६३३ मध्यें "सेनाकर्ते" हें पद मिळालें. शके १६३० मध्यें "मुतालिक" झाले. शके १६२१ मध्यें पुणें प्रांताव "सरसुभेदार" होते हें तर आपणांस नुकतेंच सप्रमाण समजलें आहेच. पेशवाईचें एवढे मोठें पद मिळविण्याकरितां बाळाजी विश्वनाथ याला कोणकोणत्या पायऱ्या आक्रमण कराव्या लागल्या हें वर स्पष्ट दाखविलेलें आहे च. शके १६२१ च्या पूर्वी बाळाजी विश्वनाथ कोण होता हें हि समजणें अवश्य आहे सरसुभेदारीचें पद मिळविण्याइतकी कर्तबगारी त्यानें कांहीं तरी केली असली पाहिजे हें उघड होय.

बखरींतील... ... "तून आल्यापासून शंभुसिंग... ... ... याचे शिवायदु० " हा मजकूर बाळाजी विश्वनाथ यांसच उद्देशून असला पाहिजे असें अनुमान सहज निघतें.

बखरींत उल्लेखिल्याप्रमाणें शाहुमहाराजांस बाळाजीनें दिल्लीस नेले तेव्हां शाहू तीन साडे तीन वर्षांचा होता. शके १६०२ च्या सुमारास शाहूचा जन्म आहे त्यावरून शके १६०५ मध्यें दिल्लीस जाण्याकरितां बाळाजी निघाला. परंतु त्याचे अगोदरच जाधवाकडे राहून नंतर दिल्लीस जाऊन राजकारण करून मग शाहूस नेण्याकरितां परत दक्षिणेंत आला. इतक्या सर्व गोष्टीस निदान ५।६ वर्षांचा अवधि लागला असला पाहिजे. ह्मणजे शके १६०० च्या सुमारास बाळाजी विश्वनाथ देशावर आला असला पाहिजे असें निर्विवाद अनुमान निघतें. प्रतिनिधी व पेशवे वगैरे मंडळींचा शाहूस ताब्यांत देण्याइतका त्याच्यावर बऱ्याच कालांतरानें विश्वास बसला असला पाहिजे हें सांगणें नकोच. एवं च बाळाजी विश्वनाथ इकडे शके १६०० च्या सुमारास आला असावा असें दुय्यम अथवा तिय्यम प्रतीच्या पुराव्यावरून कां होईना स्पष्टपणें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं.

**गं. ना. मुजुमदार.**

## बखरींतील जरूर तेवढा भाग खालीं दिला आहे.

संभाजीस धरून औरंगाबादेस आणून कैदेत ठेविले महिना दोन महिने कैदेत होते तेथून काढुन पिंजऱ्यात घातले तेथे हीं चार महिने होता नतर येके दिवसी बातशाहा बोलले कीं हा बदमस्त आहे यास मुसलमान करावा ( संभाजिनें उत्तर केले कीं हा तक्तावर बसले. ह्मणजे आपण तक्तावर

बसावे या प्रों होत होते नंतर बालाजीपत याचे कागद प्रतिनिधी व पेशवे यास उजागरीने लागले बातशाहानी मुलास जड जव्हाइरी बहुतयेक देत गेले त्याच पाच साहा वर्षे गुजरली तो येके दिवसी दरबार आम भरला आहे मानसींग राजे जा''वराव देउलगावकर यास बातशाहा ह्मणाले कीं तुह्मी आपली लेक यास देणे जावराव बोलले कीं मी देणार नाही हजरत बोलले कीं तुमचे जातीचा नाहीं ह्मणोन यास लेक देत नाहीत की कारण काय मा

—तून आल्यापासून शभुसिंग जाधव याचे तीर्थरूपापासी चाकर होते सातआठ वर्षे होते तेथे च त्यास आत्फागिरी मिळाली तो बाना आयाप आत्फागिरीचा काळाचा लावितात जाधवराव याजपासून दूर होऊन वामनराव पिंगले मुख्य प्रधान पेशवे याचे चाकरीस राहिले होते तेव्हा आवध्यानी मनसुबा केला कीं बालाजी विश्वनाथ यास धरला आगर मारला तरी परभारे कोकणचा आहे आपला काही आप्त नाही यास पाठवावे याचे सीवाय दु॥

गेला आसता संभाजीचा मा विचार......त नाही या आदेशात होते तो येके दिवसी वाण्याचे दुकानीं बसले त्याचे समोर फकीराचा तकीया होता तेथे दाहापाच फकीर मीळोन सहार्जीचा कारखा......शुरु होता तेथे येक फकीर आपले आपसात बोलो लागला कीं "बादशहाकी' चूतीया उसकी जोरु बी चूतीइ उसकी बेटी वो बी चूतीइ सब चूतीयेच मीले है" दुसऱ्याने विचा...े कीं कसे चुतये तेव्हा सांगितले की दक्षिणेकडील मुदसद संभाजी धरून आणिला होता त्यास बातशहा ह्मणाले कीं तू मुसलमान हो त्याणे उत्तर केले कीं तू आपली लेक देशील तरी होईन बेआदबीचे उत्तर जाले ह्मणोन त्याचे डोकेस मारले हे वर्तमान कोणी बातशाहा याचे लेकीस सांगितले ती ह्मणाली की त्याणी मागितले तेव्हा तोच नवरा दुसरा करावयाचा नाही हे काही बातशाहास ठाऊक नाही ती माहालांत बोलली बातशाहा मूल मोठी जाली ह्मणोन नवरा पाहावयास लागले तो बातशहाचे बायकोनें सांगितले की तुह्मी नवरा कशास पाहाता लेक काही ———— १

## १०

करीत नाही तिचे ह्मणणे की संभाजी—तले तोच नवरा आतां लग्न करावयाचे नाही हे बातशाहानी ऐकून लेकीस रुबरु बोलावून आणून सांगितले की ही गोष्ट लौकिकांत चांगली नाही तो मुदसद त्याचे प्राणावर आली ह्मणून तो बोलला याजवर न जावे लग्न करावे ती एकेना तिचा आग्रहच पाहिला तेव्हा बातशाहा विदेही होते त्याणीहि रुकार दिल्हा याप्रमाणे जाले लग्न राहिले जाणोन आह्मी त्यास चुतिये——हे अवघे फकीर बोलला ते बालाजीपत याणी ऐकून घेतले यास बातमी लागली नतर यास आठपधरा दिवस जाले बेगमेचे कुणबुणीचीं भेट घेतली तीस दाहा पाच रुपये देऊन कुणबुनीची जमादारीन कुणबीन आसील होती तिची भेट घेतली तिला शंभर रुपये नजर केले आणि तिचे घरी जायाचा पाठ घातला जाता जाता येके दिवसीं आसिलेनें विचारले की तुह्मी का येता तुमचे काम काय आहे याणी

सांगितलें की आह्मी उमेदवार आहो आह्मा जवळ पैका अडका नाही की मामलत करावी त्यास आमचे बदल बेगमसाहेबासी आपण आर्जे करून त्याकडून हजरतासी सांगून येखादे काम १'

११

सांगवावे याजकरिता आलो तीहि बोलली– आहे संधी पाहून बोलेन दैव तुमचे (आहे) आसील बेगमेची वेणी घालीत होती आणखी जाता येता बातनी आसीलाचे घरी घेतली की बेगमसाहेब ह्मणजे खचित लग्न करीत नाही हे ऐकून येके दिवसी आसिलासी बोलले की बेगम याचा जन्म तरी व्यर्थच गेला नवरा जेव्हा नाही मुदसदास नवरा ह्मणोन राडवपण घालितात त्यास येक तरी करा की लौकिक आधिक होईल संभाजीचे पोर बाल असल्यास त्यास यांणी आपले जवळ आणोन त्याचे चालवावे आसील ह्मणाली की तो मुदसद त्याचे जवल मूल आहेंत किंवा नाहीत ठाऊक कोणास असले तरी नमूद होणार नाहीत त्यास येथे आणितो कोणी आणल्यास त्याचे चालवणे बेगमसाहेबास अगाध नाही बालाजीपंत बोलले की तुह्मी अगोदर बेगमसाहेब यास विचारावे त्याचे मर्जीस ही गोष्ट आल्यास मला नेऊन भेटवावे त्याणी आभ—

१२

दिल्यास मलाहि रोजगार नाही आणि आपल्याने हि सांगवत नाही त्यास हेच सिध जाहले तरी दक्षणेंत जाऊन त्याचा शोध करून त्यास घेऊन येतो आसील बोलली की फार बरे आहे या गोष्टीस काहीयेक दिवस गुजरल्यावर येके दिवसी बेगमसाहेब संतोषात पाहून वेणी घालतेवेलेस अर्ज केला की आपण तरी रांडवपण भोगिता हा लौकीक जघन्यांत जाला आहे इतके तरी करा की संभाजीचा लेक बाल असल्यास शोध करून त्यास आणून आपलेजवळ ठेवावे आधिक लौकिक होईल बेगमसाहेब ह्मणाले की माझे चितांत आहे परतु त्यास कोण आणितो आणिल्यास मी त्याचे लेकराप्रमाणे चालवीन तो माझा लेक आसील बोलिली की हे तरी खचीत नाही तरी संभाजीची गत्य जाली तसी याची न व्हावी याचे वचन यावे ह्मणजे माझे घरी साहाचार महिने दक्षणी ब्राह्मण येक येत असतो त्याजला तिकडे पाठवून तो शोध करील आसल्यास घेऊन येईल आपण त्याची खातरजमा करावी आणि वचन यावे तेव्हा बेगमसाहेब बोलली की माझे वचन शपतपूर्वक आहे त्या ब्राह्मणास मजकडे घेऊन येणे मी त्याची खातरजमा करून देईन नतर आसिलेने——

१३

बालाजीपंतास मार जाला तो सांगून मारनिलेस बेगमसाहेबाकडे घेऊन गेली याणी हाजार रुपये नजर केली बेगमसाहेबानी सांगितले तुह्मी खातरजमेने शोध करून त्याचे मुलास घेऊन येणे त्याचा बंदोबस्त करून देईन व तुमचा हि बंदोबस्त करून देईन याप्रमाणे वचनप्रमाण देऊन बालाजी निरोप घेऊन देसी आले प्रतिनिधी व पेशवे पिंगले यास मार सांगितला की राजा तरी मारला गेला मी जाऊन बेगमसाहेब याची भेट घेऊन वचन घेऊन आलो आहे मर्जी असल्यास मुलास हवाली करावे दैवीं असल्यास आव-

घेच घडेल नाही तरी येथे बी कोणी राहू देणार नाही आह्मास काय जसे सांगाल तसे तेव्हा राण्या व प्रतिनिधी व अष्टप्रधान मिळोन येक सला ठरवून राजा शाहूस बाळाजीपत याचे हावाली केले तेव्हा राजा तीन साडे तीन वर्षाचा होता बाळाजीपत येक पालखी मुलास बसावयास दाहा वीस माणसे दाहा पाच घोडे इतके लवाजम्यानसी मुलास घेऊन दिलीस आले शाहूची आसिलाची भेट करवून नतर बेगमसाहेबाची भेट केली दैव शाहूचे आधिक बेगमेने पाहातांच आपले मांडीवर बसवून आपले वाड्यांत मुलास जागा करविली मुदबखा—

१४

ने स्वयपाक करून जेऊ घालावे आणि आष्टौप्रहर निजावे बसावे बेगमसाहेब याजपासी याप्रमाणे काहीयेक दिवस गुजरले हे वर्तमान बातशाहास समजले की बेगमेने संभाजीचे मुलास आणोन आपणाजवळ ठेविले आहे तेव्हा बुध्यात बेगमसाहेब याजकडे बातशाहा येऊन त्यास विचारले की तू आपला कोणता लेक आणला तो आह्मास दाखविला नाही. तिने आणोन पायावर घातला त्याणी आपले माडीवर बसविले बाळाजीपंत बाहेर उभेच होते कसा हा आणला हे वर्तमान बेगमेस विचारले त्याणी सांगितले की आवघी खटपट या मुलाची बाळाजीपत याणी केली तेव्हा बाळाजीपत यास बातशाहानी पाहून शाबासकी दिल्ही हुकूम चोपदार यास जाला की बाळाजीपत या मुलास दरबारांत घेऊन येत जातील तेव्हा येऊ देणे दिकत न करणे बाळाजीपंतास सांगितले की तुह्मी आमचे पोतऱ्यास राजे कचेरीत आणीत जाणे याप्रो हुकूम जाला बातशाहा आपले मकानास गेले नतर रोज बेरोज शाहूस जेऊ घालून बाळाजीपत याणी कचेरीत नेत असावे शाहू लाहाणच होता कचेरीत आला ह्मणजे बातश—



१६

—मनात सकेत केला की आपला नातू तेव्हा त्यास सर्वांपरीस आधिक आधिकार द्यावा तेव्हा योजना सहा सुभे दक्षणेची सरदेशमुखी दहा रुपये शेकडाप्रों वतनदारचा वतनदार व फौजबदचा फौजबद ही योजना करून सनद छ १ रबिलावल सन १०८८ फसली करून दिल्ही बाळाजी विश्वनाथ याणी सनदा इकडे पाठविल्या की आमल जारी करणे तेव्हा प्रतिनिधी व पेशवे वगैरे दिवाभीत जाले होते याच्याने कोणतीहि गोष्ट जाली नाही सनदा मात्र जवल घेऊन बसले राजे शाहू व बाळाजी विश्वनाथ——यावर दिलीसच विचार—बातशहानी बाळाजीपंतास विचारिले की तुह्मास सनदा सरदेशमुखीच्या करून दिल्ह्या त्याचे कसे जाले आमल जारी जाला की नाही याणी अर्ज केला की आद्याप आमल जारी नाही त्यास तुह्मी शाहूराजास तिकडे घेऊन जावे आमल जारी करावा त्याजवरून बातशाहानी बेगमसाहेबानी जडजवाहीर माहीमरातबे दौलतीचे इतमाम तितके दिल्हे पाचेपाो हजार घोडे व दाहा हत्ती सरकारातून दिल्हे त्या सधीत महमद-

१७

खा सुभे दक्षणेचे होते यांजकडून काम काढून सैद हुसेनखा यासमुभेदारीची खिलत-

जाली बातशाहानी हुसेनखानास सांगितले की याचा अमल सरदेशमुखीचा तुह्मी बसवून द्यावा आणि यास याचे मायेपासी पोचाऊन द्यावे राजे शाहू याची व सैदाची पैवस्तीबा हजरतानी बाळाजीपत यास सांगितले की तुह्मी हुसेनखाचे समागमे जावे बदोबस्त करून आमचेपासी तुह्मी वकीलीस येणे जी कमती पडेल त्याची पुर्वणी करून देऊ नतर राज्यानी बातशाहाच्या पायावर डोकी ठेविली त्याणी मस्तकावर हात ठेविला बातशाहा व बेगमसाहेब वगैरे याणी निरोप राज्यास देते वेळेस हैराण जाले की सात आठ वर्षे मूल आपणाजवळ होता आता दूर चालला हा ममतेचा विचार हि होऊन निरोप आवघ्याचे घेऊन बाळाजीपत राजास घेऊन सैदाबरोबर देसी आले मातोश्री व रामराजा वगैरे याच्या भेटी होऊन आनंद जाला नतर याणी सिवाजी याचे वेलेस मुलूक विज्यापूर सुभ्या पौ दाबला होता तो पुन्हा माघारे घेतला आणि

१८

औरगाबाद सुभ्यात आमल चालविला हे वर्तमान सांगावयास पुन्हा दिलीस बालाजी विश्वनाथ जाऊन आला नतर औरंगाबादेस कामकाज लागले तेव्हा सैदाकडे बाळाजी विश्वनाथ याणी जावे याप्रो चालत होते सन १०९२ फसली औरगजब बातशाहा आखेर जाले गादीवर महमदशाहा बातशाहा गादीवर बसले सन १०९३ प्रतिनिधि मेले नंतर श्रीपतराव प्रतिनिधि व बाळाजीपत मिळोन दौलतीचा कारभार करीत होते फौज घेऊन प्रतिनिधी जाऊ लागले कर्णाटका तेलंगण वगैरे खंडणी मात्र घेत असावी सरदेशमुखीचा आमल माहालोमाहाली गुमास्ते औरगाबाद सुभ्यात असले वरकड सुभ्यात आमल ज्यारी नवता विज्यापूर सुभ्यापैकी आसपास दरसाल लाख दोन लाख रुपयाचा मुलुख सोडवावा याप्रो आन्हिक होते चाळी सपनास हजार जमियेत होती राजे हि दिवसेदिवस उमेदीसआले पिंगले पेशवे होते याचे ह्मातारपण जाले होते त्याचेवरचा कारभार बाळाजी विश्वनाथ त्याचे गुमास्ते ह्मणोन करीतच होते राजे बाळाजीपंत यास येके दिवसीं ह्मणाले—

१९

की पेशवायगिरीची वस्त्रे तुह्मास देतो त्याणी उतर केले की जोपावेतो आहे तोपावेतो असेच चालो द्यावे मला वस्त्रे घेयाची नाहीत ते आस्ता वस्त्रे घेतली तरी लौकिकास चांगले नाही वदमामली होती ते दिवसी इतकाच मार जाला सन ११०२ फसली पिंगले पेशवे याचा काल जाला त्याणी तेच दिवसी पेशवयगिरीची वस्त्रे बाळाजी विश्वनाथ यास दिल्हीं त्याणी आपले नावाची मोहोर काही केलीच नाही कागदपत्रावर कारण पडले तरी येजमानाचेच नावाची मोहोर करीत होते बाळाजी विश्वनाथ पेशवे याचे चिरंजीव बाजीराव हि उमेदीस आले राजे दरबारास येऊ जाऊ लागले काहियेक दिवस यैसेच गुजरले श्रीपतराव यास राजे शाहू याणी सागितले की तुह्मी स्वारीस जात आसता त्यास येखादे निकडीचे काम पडल्यास तुह्मी जात जावे नाही तरी बाजीराव हुशार आहे याचे तैनातीस फौज सरंजाम देऊन पाठवीत जाणे याप्रो हुकूम जाला सन ११०३ फसली बालाजी विश्वनाथ दिलीस गेले होते तेथे जनार्दनपत

भानूस वकिलीचे कामावर ठेवून आले दिवसें —वस मान आधिक वसत चालले याजकरिता औरंगाबादेस सैदाकडे साहा च्यार महि- न्यानी जावसालास येत होते ते राहूमे आनंदराव सुमत याजकडे वकिली सागि- तली याप्रीा क्रम चालली आसता राजे याणी आपले प्रधानास जागिरी नेमनुक करून दिल्या बीतपसील सरमजाम व जात जागीर सन ११०४ फसली ... ... ...... ...

---

# श्रीशिवाजीमहाराजांचीं वाघनखें व भवानी तलवार

१ श्रीशिवाजीमहाराजांचीं वाघनखें व भवानी तलवार हीं ब्रिटिश म्युझियम् लंडन येथें असल्याचा समज आहे. परंतु तो **साफ खोटा** आहे. यां बाबतींत मीं लिहिलेल्या पत्राला पुढील उत्तर आले आहे:—

Department of British and Medieval Antiquities and Ethnology British Museum London W. C.

March 24th 1915.

V. L. Bhawe Esq.
THANA,
near Bombay, India.

Dear Sir,

We do not possess the original 'tiger's claw' or sword of Sivaji in the British Museum.

You have quoted† the label accurately.

Yours faithfully
(Signed) C. HERCULES
Record Keeper.

**विनायक लक्ष्मण भावे**

---

# पतितपावनपद्धति

१ कऱ्हाडचे धर्माधिकारी गिजरे यांच्या घरीं सांपडलेले कांहीं कागद नकला करून रा. राजवाडे यांनीं कृपाळू होऊन माझ्या हवालीं केले. त्यापैकीं निवडक सात कागद एका विषयासंबंधीं निराळे काढून त्यावरून दीडदोनशें वर्षांपूर्वींच्या पतितपावन पद्ध- तिची रूपरेखा ठरविण्याचा अल्पसा प्रयत्न पुढें केला आहे. तो पाहतां, ध्यानांत येईल कीं सनातनधर्माच्या नियमांचें जाळें बाहे- रून किती हि गुंतागुतीचें दिसलें, तथापि त्यांत हि पुष्कळ लवचिकपणा, पळवाटा, व सोई ठेविलेल्या आहेत. पतितपरावर्तनाच्या प्रश्नावर कांहीं वर्षांपूर्वीं आपल्याकडे रण माजलें होतें परंतु पूर्वींच्या परिस्थित्यनुरूप काळीं, या बिकट प्रश्नाचा उलगडा उदारमनानें सहज व सरळ केलेला पाहिला, ह्मणजे स्वयंसत्ताक समाजाचें महत्व सम- जून येतें. अस्तु !

२ आधारास घेतलेलीं सात पत्रें :—

† "A waghnukh like the one used by Shiwaji" अशी चिठी ब्रि. म्यु. मधील वाघनखावर आहे.

(१) एका मुसलमानाधमाच्या बळात्कारास बळी पडलेल्या सावित्री नामें बाईतर्फे संभाजी आंगरे सरखेल यांजकडून विनंतिपत्र कऱ्हाडकर शिष्ट ब्राह्मणांस

( शके १६५६ आश्विन व. ३ )

(२) खंडू जाधव यास यवनान्नसंसर्ग बळात्कारें झाला त्याजबद्दल हुकुमवजा विज्ञप्ति कऱ्हाडकर शिष्ट ब्राह्मणांस रघुनाथभट्ट पंडितराव यांजकडून

(३) व (४) यातिभ्रष्ट करून बलात्कारानें यवन झालेल्या अनुतप्त ज्ञातिबांधवाकरितां समस्त कायस्त कुलप्रभूंची विनंति क्षेत्रवासी वेदमूर्तींस (शके १६१७)

(५) मातेच्या बदअमल दोषाच्या संसर्गापासून मुलाला मुक्त करण्याबद्दल श्रीनिवास परशराम प्रतिनिधीकडून समस्त कऱ्हाडकर ब्रह्मवृंदास

[ शके १६६७ आश्विन शु. १ ]

(६) श्रीशंकराचार्य आपण दिलेल्या पावनपत्र मान्य करण्याबद्दल

(७) पांचरात्रिक दिव्यानें शुद्ध ठरलेल्या बाईबद्दल कऱ्हाडकरांचें आज्ञापत्र मोकदम नाणेगांव प्रांत पुणे यांस

[ शके १७०८ श्रावण शु. १३ ]

३ हीं सर्व पत्रें बारकाईनें पाहतां एक गोष्ट ठळकपणानें नजरेस येते. ती ही कीं या पावनीकरणाविषयीं क्षेत्रस्थ ब्रह्मवृंदाचा अधिकार व महत्व विशेष आहे. लांबलांबच्या ठिकाणाहून हि कऱ्हाडकरांस विनंतिपत्रें शुद्धीकरणार्थ आलेलीं आहेत. ले. ३ व ४ यांत " समस्त कायस्त कुलप्रभु " यांनीं स्वतःच एक विनंतिअर्ज कऱ्हाडकरांस सादर केला आहे. अशा भारदस्त अर्जांचा विचार अनुकूल च होत असे, हें इतर लेखांकांतील अनुकूल निकालांवरून स्पष्ट दिसतें.

कऱ्हाडकरांसारख्या क्षेत्रस्थांशिवाय पंडितराव, शंकराचार्य, छत्रपती, वगैरे अधिकारी हि स्वतंत्रपणें पतितांस पावन करून घेत. ( ले. ५ ) पतित व्यक्तीला हि क्षेत्रस्थ ब्रह्मवृंदाकडे, श्रीशंकराचार्यांकडे, पंडितरावांकडे अगर छत्रपतीकडे स्वतंत्रपणें दाद मागतां येत असे व सदरील ठिकाणांहून पातित्याचें निराकरण हि होत असें.

ले. १ मधील बलात्काराची "हकीकत हुजूर जजिरे विजयदुर्गचे मुकामी लिहून आली" व ले. ७ मध्यें " सरकारचे वरातदार यांनि तुह्मास व माळी व अतार ऐसे चौकशीबद्दल क्षेत्रास श्रीमंत राजश्री बळवंतराव सुभेदार यांकडेस आणिलें " यावरून स्पष्ट दिसतें कीं, पातित्याचीं प्रकरणें वर चौकशीकरितां पाठविण्याचें काम खालचे अधिकारी करीत.

ले. २ मध्यें " या पासुन दोन रुपये घेणें " असें पंडितराव लिहितात. प्रायश्चित्त देण्याबद्दल ही आकारणी आहे.

ले. ६ मध्यें आचार्यांनीं " ब्राह्मणसभा व राजसभा बैसउन शास्त्रमतें मनास आणुन विधिपूर्वकें प्रायेस्छीत देउन ब्राह्मणात मेलउन सुधपत्र दिल्हे. " यावरून ब्राह्मणांबरोबरच इतर वरिष्ठः लोकांचें हि संमत अशा कामीं घेण्यांत येत असे.

ले. ४ ह्याला इतरांपेक्षां एक विशेष महत्व असें आहे कीं त्यांत सुप्रसिद्ध वीरशिरोमणि " बाजी देश कुलकर्णी तो हिर-

इस मावल याचा पुत्र पिलाजी यासि शामळानी "धरून नऊ वर्षे ठेवून बाटविला. तो पळून आला तेव्हा त्याच्या पुनःज्ञातिप्रवेशनाबद्दल " समस्त कायस्त कुलप्रभु " यांनी ब्रह्मवृंदास प्रार्थना केली आहे कीं " यासी प्रायेस्छीत दिल्हे पाहिजे ये गोस्टीस आह्मी समस्त मान्य असो " कागदावर शक नाहीं तथापि ले. ३ मध्यें शामळाचे स्वारीचा जो उल्लेख केला आहे तो, त्याचप्रमाणें ले. ३ वर दादाजी नरस प्रभूची असलेली सही, व ले. ३ व ले. ४ ह्या विनंति एकाच मितीच्या आहेत ही गोष्ट, या तीन बाबी ध्यानांत घेतल्यास या लेखांचे अंतीं दिलेला युवा संवत्सर त्याच वार न जुळला तरी खास शके १६१७ हा च ठरतो. शामळाच्या धामधुमीची वेळ ती च. दादाजी नरस प्रभू हि तेव्हांच हयात होता. तात्पर्य ले. ३ व ४ शके १६१७ मधले आहेत.

ले. ६ मध्यें कऱ्हाड क्षेत्राचें महत्व दर्शविणारा मायना आरंभीं आहे.

कै. न्या. माधवराजी रानडे यांनीं पेशव्यांच्या रोजनिशीवरील आपल्या इंग्रजी प्रबंधांत पृ. २७ वर पतितपरावर्तनाचीं चार उदाहरणें दिलीं आहेत. त्यांचा हि तात्पर्यानें निष्कर्ष हा च आहे. रा. सरदेसाई यांच्या मराठी रियासतींत बजाजी निंबाळकर शिवाजीचा जावाई याचें उदाहरण दिलें आहे. कै. न्या. तेलंग यांनीं आपल्या Gleanings from Maratha Chronicle या निबंधांत पृ. २६६।६७।६८ व पृ.२८१ मध्यें कांहीं उदाहरणें घेऊन विषयाची चर्चा केली आहे. त्यांचा मुख्य हेतू मराठी राजांचे धार्मिक सभाक्षेत्र दाखविण्याचा च फक्त आहे.

प्रायश्चित्तप्रकरणाचा सांगोपांग इतिहास लिहिण्यास अद्यापि पुष्कळ साधनप्रकाशनाची जरूर आहे. विशेषतः गिजऱ्याप्रमाणें इतर धर्माधिकाऱ्यांचे कागद पुढें आणिले पाहिजेत.

वैशाख शु. ११ १८३७ पुणें } दत्तो वामन पोतदार

---

श्री

वेदशास्त्रसंपन्य राजमान्य राजेश्री शीष्टे ब्राह्मण व धर्माधिकारी प्रमुख समस्त ब्राह्मण वास्तव्य कसबे कराड प्रांत मा। स्वामी गोसावी यास

सेवक संभाजी आंगरे सरखेल दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करणे विशेश येशो पुरुषात्तम पळसुरा वास्तव्य मौजे धोपेश्वर ता। राजापूर याची स्त्री बनाम सावित्री हे मौजे रायेपाटण ता। मा।स आपले माहेरास जात होती मार्गी मलिक—आबदला मुसलमान याणे बळात्कार करून अकर्म केले हे वृत बाइको मजकुरीनें आपले घरास येऊन आपलें स्वमुखें लोकास सांगितले याची हकीकत हुजूर जजिरे विजयदुर्गीचे मुकामी लेहून आली त्यावरून मलिक मजकुरास हुजूर आणून गर्दन मारिली हाली बाइको मा।र्नें हुजूर येऊन विनंती केली कीं आपणावरी त्यानें बळत्कार केला पुढें साहेब धर्मस्थापक आहेत आपणास प्रायश्चित होऊन कृतीत सरती होऊन यथायुग्त वर्तवावयाचा विचार होऊन येई ते करावें ह्मणौन त्यावरून याचा विचार मनास आणिता माहाक्षेत्र प्रसीध व

समस्त सिष्ट माहाक्षेत्री व समंतात यौग ब्राह्मण याचे संमतें प्रायश्चित होऊन कुंतीत अधिकार व पंक्तिपावन व्हावया ब्राह्मणाचा विचार आहे तो मान्य असे ह्मणऊन हे पत्र तुह्मास लिहिले आहे तरी शास्त्रसंमतें करून कुंतीत अधिकार होऊन येथापूर्व ब्राह्मणात येऊन पावन होये ते बाइकोस आज्ञा करून वाइकाचे वलित सुभा प्रांत राजापूर या जागा संमतें पत्र दिले पाहिजे जाणिजे रा छ १७ जमादिलेवल बहुत काये लिहिणे सुाा खमस सलासीन मया अलफ हे विनंति

मूल बालबोध लिपी

**श्रीमुद्गल**

आज्ञापत्र राजेश्री वेदशास्त्रसंपन्न कऱ्हाड-क्षेत्रस्त समस्त ब्रह्मवृंदेषु यांप्रति रघुनाथ भट्ट पंडितराव नमस्कार श्री छत्रपतीनि आज्ञा केली ऐसि जे खंडु जाधव याजवरी यवनानि जोरावरि करून आपलें अन्न याज (क) डून खाविले त्यास राजेश्री स्वामि छत्रपतिनी क्षेत्रास पाठवणें त्यावरून खंडु जाधव पाठविला आहे तर यापासुन दोन रुपयें २ घेंणे यास निर्बंध प्रायश्चित्त देणें त्यास शुद्धपत्र देउन हुजुर रवाना करणें विलंब न लावणें हे नमस्कार ईयं विज्ञप्तिः

**श्री**

श्री वेदमूर्ती क्रियाविराजित राजश्री समस्त क्षेत्रवासी स्वामीचे शेवेसी

सेवेसी वियार्थी समस्त कायस्त कुलप्रभु
कृष्णाजी हरी पालकर
अंताजी तुकाजी प्रभु कलमुडीकर
पुतलाजी श्रीरंग कुलकर्णी पनवेलकर
प्रयाम अनंत पनवेलकर
यादव काकाजी पेणकर
विनाजी निलकंठ निमक कुलकर्णी पणवेल
बावाजी बाजी व कृस्णाजी फुलाजी देस कुलकर्णी ताा हिरडस मावल
रघुजी केशव राजपूरकर
नरसो विठल
नरसो मेरेश्वर
यादव सोन प्रभु पनवेलकर
बाजी सूर्याजी देस-कुलकर्णी ताा पोडखोरे
रायाजी रंगनाथ कुलकर्णी ताा अमरनाथ
सखाजी वैज प्रभु बदलापुरकर
दामाजी कुस्ण कुलकर्णी मौजे पोईनाड ताा सिरगांव मामले चेउल
आउजी बापुजी प्रभु अधिकारी ताा लिंगारतण
गोपाल बाजी पेणकर
विठल ह्माउ प्रभु बदरापूरकर
चिमणाजी तान प्रभु कल्याणकर
शंकराजी तावजी माहाडकर
पिलाजी कृस्ण कुलकर्णी पणवेल
नरहरी गोज प्रभु खारकर
बालाजी संभाजी प्रभु कुलकर्णी दुर्गवाडीकर
माहादाजी गोपजी कुलकर्णी कसबे पणवेल
रघुजी विठल पनवेलकर
विनाजी आउजी केलसीकर
विठल नरसी देसकुलकर्णी कानडवीकर
कासीराम कल्याणकर
रामाजी गोमाजी
सजणाजी रंगनाथ कुलकर्णी अमरनाथ
रायाजी मल्हार
तानाजी अत्माजी निमक कुलकर्णी ताा पनवेल
मुकुंद कृस्ण अधिकारी ताा चरेडी

अंताजी त्रिंबक देसकुलकर्णी ताा मोशेखोरे
बालाजी रुद्र देसकुलकर्णी ताा वनखल
हरी महिपाजी प्रभु देस--कुलकर्णी प्राा करनालें
सुंदर काकाजी टिपनीस बोरघाट
दादाजी नरसिंह कुलकर्णी रोहिडकर
सजणाजी खंडो भडळीकर
रामाजी माहादेव देसकुलकर्णी प्राा नसरापूरकर
बावाजी गोविंद अधिकारी ताा निजा(म)पूर

साष्टांग दंडवत विनंती उपरी रायाजी नरसी देसकुलकर्णी मामलेपाल ताा हवेली व ताा आतवणे याचा पुत्र शामजी हा सुखवस्तीनें मौजे आंबवली ताा तुडल येथें होता ऐसीयास सुा सन खमस समानिना मधें शामळाची स्वारी राजपुरीहून मौजे मजकुरावरी आली ते समई धरून नेलें जंजिरे राजपुरीमधें नेऊन येकवरीसपरयंत अदबखाना ठेउन चुना वाटविला याचे सुटकेचा येत्न भावबंदी करावा तरी त्यास अनकूल पडलें नाहीं याकरितां मुख्य शामले बलत्कारें भीन यातीचा विचार करून याती-भ्रस्ट केले आणि आपणासंनिध सेवेसी ठेविला होता त्यादारभ्य मनाच्या तिरस्कारें गंतव्याच्या सूचनेमधें असोन तेथून निघायाची संधी पाहून गंतव्य केलें आणि आपले समुदायामधें आला मनामधें पश्चात्ताप होऊन स्वयातीस शरण निघाला कीं आपणास येकवेल भुग्तता केली पाहिजे जरी आपणास स्वयात मिलोन भुग्त करीत नाहीं तरी आपण प्राणत्याग करीन पूर्ण पश्चात्ताप जाला ऐसे कलोन समस्तांनीं मनावर घेऊन त्याग स्वयातीमधें घ्यावा हा निश्चय जाला परंतु शास्त्रनिर्णय न केला ह्मणून स्वामीस विनंतिपत्र लिहिले असे तरी स्वामींनीं शास्त्रनिर्णयें यासी प्रायश्चीत्त द्यावें ऐसे जाले तरी क्षेत्र प्रायश्चीत्त देऊन प्रायश्चित्ताचा निर्णय करून आह्मास आज्ञापत्र पाठविले पाहिजे स्वामीचे आज्ञेवरून वर्तणूक करूं हें पत्र श्रावण सुध सप्तमी भोमवासरे युवानाम संवत्सरे हे विनंती

---

श्री

श्री वेदमूर्ती राजमान्य राजश्री
क्षेत्रवासी ब्राह्मण स्वामीचे सेवेसी

सेवक विद्यार्थी समस्त कायस्त कुल प्रभु
कृष्णाजी हरी पालकर
बाळाजी संभाजी देशकुलकर्णी ताा तुरुगवाडी
तान्हाजी आत्माजी नीमे कुलकर्णी ताा पणवेली
बाळाजी रुद्र कुलकर्णी वनखल
सखाजी वैज प्रभु बदलापुरकर
नरसो मोरेस्वर पणवेलकर
अंताजी तुक प्रभु कलमुडकर
माहादाजी गोपजी कुलकर्णी कसबे पणवेल
रघुजी विठल पणवेलकर
विनाजी आउजी केलसीकर
नीलाजी माहादेउ कुलकर्णी मामलेपाल ताा हवेली व तर्पे आतवणे
रामाजी गोमाजी शाहाबाजकर
विठ्ठाजी निलकंठ निसक कुलकर्णी ताा पणवेलकर
आउजी बापूजी गुमस्ते अधिकारी ताा लिंगार
विठल म्हाउ प्रभु बदरापूरकर
सजणाजी खंडो भडळीकर

शंकराजी तावजी माहाडकर
पिलाजी कृस्ण कुलकर्णी पणवेल
वेंकाजी दामोदर प्रभु आतोणकर
नरहरी गोज प्रभु खारकर
रायाजी मल्हार पणवेलकर
मुकुंद कृस्ण अधीकारी ताा वरेडी
अंताजी त्र्यंबक देस कुलकर्णी ताा मुसेखोरें
दामाजी कृस्ण चेउलकर
बाजी सूर्याजी देसकुलकर्णी ताा पौडखोरें
यादव सोन प्रभु पणवेलकर
पुतळाजी श्रीरंग कुलकर्णी पणवेलकर
प्रयाग अनंत पणवेलकर
यादव काकाजी पेणकर
कासीराम कल्याणकर
सजणाजी रंगनाथ अंबरनाथकर कुलकर्णी
रघुजी केशव राजपूरकर
रायाजी रंगनाथ कुलकर्णी
अमरनाथ

हरी महिपाजी देस कुलकर्णी प्रा करनालें
गोपाल नमाजी पेणकर
सुदर काकाजी टिपनीस खोपवलीकर
चिमणाजी तान प्रभु कल्याणकर
रामाजी माहादेव देस कुलकर्णी प्रा नसरापूर
बावाजी गोविंद अधिकारी ताा निजा(म)पूर
दामाजी त्रिंबक देस कुलकर्णी मामले तले

सास्टांग दंडवत विनंती उपरी ऐसा जी बाजी देश कुलकर्णी ताा हिरडस मावल याचा पुत्र पिलाजी यासि शामळानी राजपुरीस धरून सा वर्षे नेळा त्याचे समंधी कोणी सोडवावया येतील ह्मणौनु मार्ग पाहिला परंत कोणी आला नाहीं ऐसें देखोन यासी बलत्कार करून अविंध केळा आणि मागती त्यासी अडीसेरी देऊनु तीन वरसें ठेविलें त्यासी जे समई अनुकूल पडिलें ते वेलेसी निघोन आला या प्रांतासी आलेवर यासी अनुताप बहुतच आला की आपळया स्वयातीस शरण जाऊनु कुलामध्यें यावें ऐसी यासी तुह्मी हा शास्त्रार्थ मनासी आणून जो शास्त्रयुक्त विध जैसा असेल तैसा निर्वाह मनासी आणून यासी प्रायेस्छीत दिल्हे पाहिजे ये गोस्टीस आह्मी समस्त मान्य असो प्रायेस्छीत विध संपादून येक आपले आज्ञापत्र पाठविलें पाहिजे त्यापत्रावरून वर्तणूक करून सुत जालें पाहिजे. हे पत्र स्रावण शुध सप्तमी भौमवासरे युवानाम संवत्सर हे विनंती

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त ब्राह्मण
क्षेत्र कसबा कराड स्वामी गोसावी


सेवक श्रीनिवास परशराम प्रतिनिधी नमस्कार सुा सीत अबैन मया अलफ अपाजीराम वस्ती मसूर याचें आईवर बदअमल याचा दोश येऊन ती माहेरास गेली त्यास अपाजी गैरमजकूर यास अनवेव्हार जाहाला पाहिजे याजकरिता प्रायश्चीत देऊन सूध करविले आहे तर समस्त ब्राह्मण मिळून सूध करणे अनवेव्हार करवणे छ २९ साबान बहुत काय लिहिणे

राजत
लेखना
वधी

**श्रीशंकर**

श्रीमत् परमहंस परिव्राजिकाचार्ये श्रीमत् शंकराचार्ये अभिनव विद्याशंकर भारती स्वामीकृत नारायेण स्मरणानि सकलगुण अलंकरण हरिगुरुभक्तिपरायेण

राजमान्ये राजेश्री मोरेस्वरभट व त्रिंबकभट व समस्त ब्रह्मव्रीं दप्रांत कऱ्हाड भक्तोत्तमा-प्रति — विशेश श्री—चे पुण्येंतिर्थींचे मोह-छाव जाहाला तदनंतर खंडो सोमनाथ येथें आला होता त्यावरी ताब्रांचा शब्ददोश होता हे तुह्मास विदित आहे ऐसीयास ब्राह्मण दुर्बल नित्राणी बहुत लिहीनपणें शरण आला देखोन स्वामी कृपालु होऊन ब्राह्मणसभा व राजसभा बैसउन शास्त्रमतें मनास आणुन विधिपूर्वकें प्रायेस्छीत देउन ब्राह्मणात मेलउन सुधपत्र दिल्हे असे तरी तुह्मी मठीचे मठाभिमानी अहा अह्मी केले ते तुह्मी केले दुसरे कोणही असक करितील तरी त्यास बुधीवाद सांगणें अह्मी त्या प्रांते येणार असो भेटीनंतर सकल वर्तमान कळूं येईल दरयेक विशाई याची साहेता केली पाहिजे विशेश लिहिणे काये असे सुधपत्रीं अवघा येथान्यायें लिहिला असे त्यावरून कळू येईल हे असीर्वाद



श्रीमत्कृष्णा ककुद्मती प्रीति संगमो विजयते

स्वस्ति श्रीमत्निखिलवसुधामूर्धावतंस निदानस्थान परिसरवर्ती आदिस्थान महा-क्षेत्र दक्षिणवाराणसी श्रीउत्तरालक्ष्मी प्रिय-कर कमलोपरिधृताष्टादश शक्तिपीठांतस्थित महाशक्तिपीठ महासंस्थान श्रीमत् करहाटक-क्षेत्रस्थ विद्वद्वैदिकसमूह यानी मोकदम मौजे नाणेगांव ता। पाटस प्रांत पुणे यांसि अज्ञा केलि ऐशी जे मौजे मजकुरी यमा त्रिन तुक माळी याची स्नुषा गंगी शेतातुन घरास अपल्या येत होती त्यास मार्गी साळ्या अतार मौजे मजकुर हा तीजला झोंबला तेंव्हा तीने गलबाला व माहावाय केलि तत्समई मार्गाने वाटसरु जात होता त्याने गलबाला श्रवण होताच तोहि तेथे अला अणि अतार पलु लागला वाटसराने धरून त्याची पाघ्रुणे घतालि गंगी घरास गेलि अणि झाले वर्तमान अपल्या घरी सर्वत्रास व तुह्मास हि सांगीतले तदनंतर माळी याने तीजला वेघळि ठेविलि सरकारचे वरातिदार यांनि तुह्मास व माळी व अतार ऐसे चौकशीबद्दल क्षेत्रास श्रीमंत राजश्री बळवंतराव सुभेदार यांकडेस अणिलें यांचे झालें वर्तमान लेहुन घेतलें माळिण यिनें सांगीतले अतार पद्रास झोंबला चौकशी केलि परंतु व्यभिचार कर्म घडले नाही ऐसा निश्चय जाहला परंतु संशय निवारण जाहला पाहिजे एतद्विषई गंगी माळीण बोलिलि कीं श्री—संगमी दिव्य करीन ऐसे बोलून दिव्यास राजी जाहली त्याजवरून समस्त ब्राह्मण व हकिम व समस्त दैव प्रभृति यानी दिव्य पंचरात्रीचे नेमिले क्रियापत्र लेहून घेतले अणी श्रावण शुक्र ५ पंचमीस श्री—त संगमी स्नान करून त्रिवार उच्चार करून दिव्य केले तीला घेऊन सरकारच्या वाड्यात अणून ठेविलि पंचरात्री गेल्यानंतर गंगी माळिण दिव्यातून खरी जाहलि त्याव-रून गंगीचा सन्मान केला अणी शुद्धपत्र दिल्हे पाहिजे एतद्विषई शुद्धपत्र तुह्मास सादर केले अहे तरि तुह्मी व त्याचे ज्ञातीस सांगणे पूर्ववत्प्रमाणें अन्नोदक व्यवहार करणे मिती शके १७०८ पराभवनाम संवत्सरे श्रावण शुक्र १३ त्रयोदश्यां एवं शुद्धपत्रस्य पंक्तयः २९

## मोरोपंतकृत धन्यरामायण

मोरोपंतांनीं अनेक रामायणें रचिलीं परंतु त्यापैकीं कांहीं रामायणें गाहाळ झालीं असून हल्लीं उपलब्ध नाहींत ही गोष्ट महशूर आहे. कांहीं दिवसापूर्वीं जुनीं दप्तरें तपाशीत असतां ' धन्य ' रामायणाची एक पोथी मला आढळली. परंतु या पोथींतील मधलेंच एक पान गाहाळ झालेलें आहे. यामुळें पोथी त्रुटित आहे. त्रुटितच कां होईना, पण पंतांच्या नामशेष झालेल्या कृतींचा हा भाग , महाराष्ट्राला सादर करण्याचें पुण्य मला लाभलें. याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानितों. याखेरीज एका वृद्ध गृहस्थानें ' हूं ' रामायण प्रत्यक्ष पाहिल्याचें सांगितलें व त्यांतल्या एकदोन आर्याही मला ह्मणून दाखविल्या. सदरहू ' हूं ' रामायण मिळविण्यासाठीं, मी अनेक वेळां, अनेक यत्न केले. आतां तर ते गृहस्थ कैलासवासी झाले असल्यामुळें ' हूं ' रामायण मिळण्याची आशाही तूर्त सोडून दिल्यासारखी आहे. पुढें मागें कोणा शोधकांस ' धन्य ' रामायणाचा अनुपलब्ध भाग, व इतर कांहीं नवीं रामायणें मिळतील व पंतांची ' अष्टोत्तर शत ' संख्या प्रसिद्ध होण्यास मदत होईल अशी आशा आहे. तस्कराच्या उपद्रवांत रामायणें नष्ट झालीं तीं आतां पुन्हा सांपडावयाचीं नाहींत ही समजूत टाकून देणें भाग आहे.

ज्या चिठीवरून मला या रामायणाचा प्रथम सुगावा लागला त्या चिठीसंबंधें एकदोन बाबी विचार करण्यासारख्या असल्यामुळें चिठिची असल वरहुकुम नकल येथें देतो.

( पुढील बाजू आडवी लिहिलेली )

॥ यादि स्मरणार्थ रामचंद्र निळकंठ परित प्रा भोस[1] यास हरिभक्तपरायण दादानी मयूरकृत आर्या रामायणें द्यावयास केली त्याचें स्मरण रामचंद्र याजपासि आहेत तपशील

१ साधुरामायण १ मंत्ररामायण १ परंतुरामायण १ तीर्थरामायण १ मंत्रमयरामायण

५

एकूण हीं पांच रामायणें वेगळीं करून दुसरी जी असतील ती द्यावी दादानी करार केला आहे त्यांत आगल्य द्यावयाचा करार दादाचा जी असतील ती अगत्यरूप दिली पाहिजेत सेवकाचा लळा समर्थांनीं च पूर्ण करावा १ अवोध्द्र रामायण १ धन्यरामायण १ रामरामायण

सदरहू तीन रामायणें कार्तिकीस पोंचती करावी ह्मणून दादानी वचन दिलें आहे याशिवाय दुसरी काय असतील ती ही द्यावयाचें वचन दिल्हे दादास प्रपंचामुळें गरिबाचें स्मरण राहणार नाहीं ह्मणून विनंती स्मरण लेखन केलें शिवाय तीर्थरामायण पुस्तक नेलें तें पाठवावें हे विज्ञापना

वरील दिलेल्या चिठीच्या उताऱ्यावरून पुढील बाबी लक्षांत येतात

(१) भोसे प्रांतांत रामचंद्र निळकंठानें पंतांचीं रामायणें उतरून घेतलेलीं असावीत व त्या प्रांतीं शोध केला असतां अझून ही कांहीं नवीन रामायणें सांपडण्याचा संभव आहे.

---

१ भोस हा प्रांत पढरपुरा जवळ आहे.

(२) आपण इतके दिवस ' लघुरामायण ' निराळें व ' सुखरामायण ' निराळें असें समजत होतो. या सोबत जोडलेल्या पानांवरून हीं दोन भिन्न नांवें एका च रामायणचीं आहेत असें स्पष्ट दिसतें. ह्मणजे १०८ संख्येंत एक नांव कमी झालें व ती पुरी करून घेण्यासाठीं आतां एक नवें नांव पाहिजे. हें उघड आहे. नांव ह्मणजे नवें रामायण न सांपडलें तर रा. पांगारकरांनीं दिलेली यादी १०७ नांवांची होते.

(३) चिट्ठींत ' साधुरामायण ' व ' रामरामायण ' अशीं दोन नांवें आलीं आहेत. रा. पांगारकरांच्या, रा. काव्य संग्रहकारांच्या व इतर यादींत हीं नांवें नाहींत. यापुढें ही यादी पुन्हां प्रसिद्ध करतांना रामायणाच्या एका नांवापुढें त्याला च असणारीं दुसरीं नांवें ही कंसांत देणें इष्ट आहे.

**विनायक लक्ष्मण भावे**

---

# " धन्यरामायण "

श्रीगणेशायनमः ॥ विष्णुप्रभु अवतरला जेथें तो वंश भानुचा धन्य । धन्य दशरथ त्रिजगीं कोण्ही झाला नसे असा अन्य ॥ १ ॥ देवर्षि धन्य धन्य श्रीमान् वाल्मीकि आदिक विलोकीं । धन्य महाकाव्य श्री रामायण जें बुडो न दे शोकीं ॥ २ ॥ धन्य विभांडकसुतमुनि कौसल्या रामसुप्रसू धन्या । तोंही धन्य सपूर्वज ज्याची हे अदितिसी सती कन्या ॥ ३ ॥ धन्या कैकेयी सुत भरत जिचा जो द्विपन्मुखें सुकवी । धन्या सती सुमित्रा लक्ष्मण शत्रुघ्न हे जिचे सुकवी ॥ ४ ॥ धन्य वसिष्ठमहर्षि श्रीरामा सानुजासि जो पढवी । सद्गुण नृपनंदन जे त्या सर्वांच्या हि मस्तकीं चढवी ॥ ५ ॥ धन्य श्रीमान् गाधिज सच्छिष्य प्रेम जो करी रामीं । शत अस्त्रें शिकवि ह्मणे देतों हें कवच तव शरीरा मी ॥ ६ ॥ ती ताटका हि धन्य रामें वधिली वनांत जी चंडी । धन्य सुबाहु हि ज्याचें शिर राघव पूर्तेमार्गे पोखंडी ॥ ७ ॥ ज्या बाणपूर्वातें शत योजन दूर संगरीं उडवी । मारीच धन्य होय त्रासें रामीं च चित्त जो बुडवी ॥ ८ ॥ सिद्धाश्रम धन्य तसा धन्य श्रीगौतमाश्रम हि झाला । होय अहल्या धन्या प्रभु उद्धारा स्वयें जिच्या आला ॥ ९ ॥ धन्य जनक नृप मिथिला धन्या धन्या धरासुता बाळा । धन पण धन्य शिवधनु धन्या श्रीरामकंठगामाळा ॥ १० ॥ धन्या श्रीरामाला सीता आणूनि दशरथा अन्या । दे जनक लक्ष्मणाला गाधिजपद नमुनि उर्मिळा कन्या ॥ ११ ॥ धन्य कुशध्वज दे जी भरताला ते हि मांडवी धन्या । धन्या श्रुतकीर्ति दिली शत्रुघ्नालाहि जी दुजी कन्या ॥ १२ ॥ अति धन्य विवाहोत्सव ज्योंहीं मिथिलेंत पाहिले सुर ते । हे ही धन्य चिगाती ऐकति अद्यापि राजक जे पुरते॥१३॥ बहु सुगुण दासदासी रथ हय गज रत्नभूषणें कनकें । अति धन्य सर्व झालें जें श्रीरामासि अर्पिलें जनकें ॥ १४ ॥ मार्गे धरि क्रोध करी ज्याचें दे मोहदिग्मथागात्र । भृगुराम धन्य झाला प्रभुनें केला सुशांतिला पात्र ॥ १५ ॥ साकेत धन्य झाले विजयिसुतयुत प्रभुप्रवेशमहे । पौर सकळ यश गाती भृगुरामा मद हरूनि देशमहे ॥ १६ ॥ धन्य युधाचित्प्रेक्षुनि परमोत्सव होय लोक-

रायास । पुसुनि सशत्रुघ्नभरत ने स्वपुरा धन्य तो करायास ॥ १७ ॥ दशरथ ह्मणे करावा युवराज जेष्ठ सुत विचाराया । गुरु सचिव धन्य ह्मणती वररोधी जी प्रिया तिचा राया ॥ १८ ॥ धन्या देवर्षिमतें जरि जनर्थांतून मंथरा गेली । धन्या कैकेयी जरि पतिवरि सोडूनि पंथरा गेली ॥ १९ ॥ स्त्री वर मागे सुत युवराज जटावल्कधर जसा वन्य । राम चतुर्दश वर्षे हो तूं ही सत्य रक्षणें धन्य ॥ २० ॥ हा परम धन्य आग्रह देवर्षिप्रिय यशस्करस्तव्य । कव्यति महित महितपट फळदशमुखपीडित प्रजा भव्य ॥ २१ ॥ वनवासा राम निघे जे पुत्रीं देव विप्र राजन्य । त्यांत कराया रक्षुनि सत्य व्रत आपुला पिता धन्य ॥ २२ ॥ सीता लक्ष्मण हि निघे सर्व हि वदले तदा तया धन्य । हें यश पोषी विश्वासा तें च जेंवि बाळका स्तन्य ॥२३॥ धन्य सुमंत्र तुरग रथ धन्य चि ये हाय पौर वदनातें । धन्य गुह निषाद सखा हें दे प्रभु ज्यासि गौर वदनातें ॥ २४॥ धन्य वट जटावळि ज्याच्या गंधें सहानुजें रामें । तापसवेष हि धन्य चि तो जो स्वीकारिला रमाधामें ॥ २५ ॥ शय्या ज्याहीं रचिली ते पल्लव तीं तृणें महा धन्यें । धन्या गंगा धन्या नौका धन्यें फळादिकें वन्यें ॥२६॥ धन्य भरद्वाज हि तो प्रभु वंदी ज्यास जेंवि जनकास । धरितीयन्नामाची दुस्तर भवसागरींत जनकास ॥ २७ ॥ नग चित्रकूट धन्य प्रभु जेथें उटज करूनि वास करी । ज्याचा मोह न साहे गुण जैसा गंध हस्ति वास करी ॥ २८ ॥ तो धन्य शाप धन्य चि दशरथ नृप मृत्यु रामराम असे । ह्मणत प्राणत्यागी प्रभुशोकें मरण हें न धन्य कसे ॥ २९ ॥ माते तें धिक्कारुनि धन्य भरत होय अन्यता पावें । परि बहु साधुनि बोले सत्पुत्रें ती हि धन्यता पावें ॥ ३० ॥ शत्रुघ्न धन्य दासी ह्मणतां चि स्वाग्रहें रहा न वधी । कौसल्या भरतातें धन्य ह्मण कीं कळ न हा नवधी ॥ ३१ ॥ करि संस्कार पित्याच्या जा अंती योग्य होय देहातें । धन्यत्वार्थे भरत तो विधिनें तिळमिश्रतोय देहातें ॥ ३२ ॥ गुरु राज्यग्रहणाज्ञा कुळगुरुची जी तिची अवज्ञा त्या । धन्यत्व चि दे भरता न स्पर्शे अज्ञता लवज्ञात्या ॥३३॥ धन्य प्रेमळ गेला तो स्वामी आपला परत वाया । राज्याधिकार इतर सुखद गमे तापला परत वाया ॥ ३४ ॥ धन्य स्वयें परंतु न धन्य असें भरत आपणां मानी । गमती गुहा मुनिसद्वी जातो प्रभुची करावया हानी ॥ ३५ ॥ भी राज्यस्वीकारा परधर्मा जेंवि जेंवि अन्याया । प्रभुपादुका न मिळल्या कोण वळवि त्या सुबुद्धि धन्या या ॥ ३६ ॥ नंदिग्राम हि धन्य प्रभुच्या जेथें दया समा चवदा । बहु करिती पादुका या धन्या सुगुणा तया समा चवदा ॥ ३७ ॥ अतिधन्य अत्रि रामें जो दशरथ साच मानिला धन्या । अनुसूया शोभवितां जी गमली माय जानकी कन्या ॥ ३८ ॥ धन्य विराध जयाच्या वारी श्रीरामचंद्र शापातें । दंडक वन मुनि धन्य प्रभु नुरवी तन्मनींत तापातें ॥ ३९ ॥ शरभंग सुतीक्ष्ण घटज धन्य सरी अप्सरांस जो भ्रमला । तो मांडकर्णि धन्य प्रभु चित्तीं यद्व्रतव्ययें श्रमला ॥ ४० ॥ अग्रहि धन्य जटायु प्रभु वदला ज्यास बाजपासून । हे

तुमची सुत आह्मी रक्षा गहनांत आजपासून ॥ ४१ ॥ श्रीपंचवटी धन्या धन्या गोदावरी नदी अजि ते । निरुपम भाग्य तयाचें ज्या सादर सुचिर सेविल्या अजितें ॥४२॥ धन्या शूर्पणखा जी करि जीवांची उदंड हानि रया। वाल्मीच्या प्रकटिं तिच्या चुकवि प्रभुल्लत सुदंड हा निरया ॥ ४३ ॥ चवदा सहस्र राक्षस धन्य चि केवळ न धन्य तो खर चि । त्रिदंशातचि न प्रभुच्या + + + +[1] दिघट कर्ण कर्ण ना साजो । तो धन्य धन्य ऐशा पावुनिया कां न वर्णना साजो ॥८८॥ क्षोभे विकर्णनास त्रासे ज्याच्या महेंद्र हाकेला । तोडुनि भुज चरणशिर प्रभुनें अति धन्य वीर हा केला ॥ ८९ ॥ घनरवध्य ह्मणुनि घे न गणुनि परयत्न सानुजा रामा । सबळा पाडी जैसा प्रळयानिळरत्न सानुजा रामा ॥ ९० ॥ मारुति वोषधिपर्वत शृंगद्रुतकक्षवरवचें आणी । उठवी सबळा प्रभुला ऐके अति धन्य धन्य हे वाणी ॥ ९१ ॥ झाले धन्य घट श्रुतिसुत कुंभनिकुंभ गुरु समर यज्ञ । रावण-पुत्र त्रिशिरा अतिकाय हि करुनि गुरु समरयज्ञ ॥ ९२ ॥ श्री वधुनि विभुसि मोही ज्यासि ह्मणति धन्य लक्ष मायावी । त्या रावणितें लक्ष्मण वधि खळदल नीच न क्षमा यावी ॥ ९३ ॥ प्रभु या कर्मे अनुजा बहु धन्य ह्मणे द्रवोनि कुरवाळी । जेणे पळांत वधिला येकें चि शरें चिरूनि उरवाळी ॥ ९४ ॥ सुत शोकार्त दशानन सीतेसि वधावया कृपा न धरी । सचिव सुपार्श्व तयातें वारुनियां आपणासि धन्य करी ॥ ९५ ॥ चतुरंगबळ सहस्राधिक कोटि दशास्य पाठवी रादे । होउनि धन्य स्वर्गी राम ह्मणे दे न पाठ वीरा हे ॥९६॥ मग मरण निश्चयें ये प्रभुंसी दशवदन तो करी जन्य । बैसुनि रामप्रभु ही त्या शत्रुरथासही रणीं धन्य ॥ ९७ ॥ सौमित्र पडे वक्षीं खरशक्ति महेंद्र जिपिता हाणी । न्हाणी रक्तें पुनरपि तें वोषधिशृंग धन्य तो आणी ॥ ९८ ॥ सप्त अहोरात्रें रण होय न तो अन्य समरस वदावा । देवर्षि वदे प्रभुजी चिर जग हो धन्य समरस वदावा ॥ ९९ ॥ मनुदा घटावरदा अर्का धन्यतर अरिस दे वधुनी । सत्कवि ह्मणति न अधिका या प्रभुच्या कीर्तिपरिस दे वधुनी ॥ १०० ॥ ते दिव्य दुंदुभीरव स्तव जयजयकार देव मुनिजन्य । हिम मंद सुगंध पवन ते दिन तें नृत्यगानही धन्य ॥ १ ॥ तापद कुसंग सुटला प्रभु सांत्वन करि मनीं दया आली । मंदोदरीहि धन्या साधु बिभीषण समाश्रयें झाली ॥२॥ जळद साधु बिभीषण मेला अभिमुख करूनि जो जन्य । प्रभुमहिमाप्येपयथा तव हें बोले कसा न तो धन्य ॥ ३ ॥ केला धन्य बिभीषण अभिषेचुनि लक्ष्मणें पुन्हा विधिनें । धन्या सीता झाली दिव्यें स्वीकारितां दया निधिनें ॥ ४ ॥ वर देउनि रणमृत कपिकोटि उठविल्या अशा यशें शक्र । केला धन्य प्रभुनें जेणें गज साचि तारिला नक्र ॥ ५ ॥ झालों मी धन्य ह्मणे दशरथ रामहि तसेंच वदला हो । तात तसें सुत हि वदे स्वीकारीं धन्यतेसि पद लाहो ॥६॥ पुष्पकविमान धन्य प्रभुनें केलें बसोनि बसवून । सकटक कपि यातुपति हि मोक्षपदीं स्वस्थ जेंवि वसवून ॥ ७ ॥ सेतु विलोकुनि सीता मी धन्य

[1] येथून एक पान हरवलें असल्यामुळें मधील ४४ ते ८८ या आर्या नाहींत.

ह्मणे असा पहायास । अत्यद्भुत हाचि जना मजकरितां सोसिले महायास ।। ८ ।। तारा धन्या केली सीतेनें पुष्पकांत वाहून । हष्टिस सधन्य करि प्रभु पंचवटी पाहवूनि प्राहून ।। ९ ।। धन्य करि भरद्वाजा वंदुनि भेटुनि गुहास्वपादरता । प्रभुभक्ता भरताची करि धन्या त्रिभुवनांत सादरता ।। ११० ।। राज्याभिषेक विधितें राज्यपदातें वशिष्ठ-प्रद मुनी । स्वीकारुनि धन्य करी स्तवि-ति सखुर सुप्रसन्नवदन मुनी ।। ११ ।। धन्या पुरी अयोध्या धन्या सर्वप्रजाधरा धन्या । धन्या भास्कर संति रामकथा लाजवी कथा अन्या ।। १२ ।। साकेत चि वैकुंठ ह्मते याचें चि धन्य यश गाती । अत्यंत दुर्लभा जी मुक्ति अयोध्या पशूसि वश गाती ।।१३।। श्रीराम राज्य धन्या श्वा ही नकरी जयांत अन्याया । राज्यप्राज्य गुण असो महदंतर सूज्ञ वदति अन्याया ।। १४ ।। धन्य सुगल अंगद कपिऋक्ष बिभीषण सरजनिचर धन्या। अति धन्या मारुति असा न त्रिजगीं श्रीश सुबहुमत अन्या ।। १५ ।। धन्य श्रीवाल्मिकि प्रभुचें यश जो अशेष गाय कवी । नायक विश्व + एके सादर सभेसि आयकवी ।।१६।। थोर कलींत **मयूर** हि गाववुनि स्वयश धन्य केला हो । हे श्रीराम प्रभुची कीर्ति सखी जन्हु कन्यके लाहो ।। ११७ ।।

श्लोक

भावें हें धन्य रामायण रघुपतिच्या वाहिलें पादपद्मीं । छन्नायदृष्टि ते ही प्रभुवर वसवी जो सदा दिव्यसद्मी । दीनाभक्ता मयूरा मजहि निजयशीं लाविली नित्य गोडी । जोडी पीयूष ज्यातें कर सुरसिक हो हे दया काय थोडी ।। १ ।।

---

# अनंतसुत त्र्यंबक

सुमारें दहा-पंधरा वर्षांपूर्वी "आनंद-तनय" कृत महाभारत आपण प्रत्यक्ष पाहिलें असल्याचें मला माझ्या एका स्नेह्यानें सांगितलें. व ग्रंथ कल्याणप्रांतीं मिळण्याचा संभव आहे असें सुचविलें. पुढें शोधाअंतीं कल्याणाजवळ भिवंडी येथें हा ग्रंथ असल्याचें कळलें. व प्रत्यक्ष ग्रंथ पाहतां तो प्रसिद्ध 'आनंदतनया' चा नसून, दुसऱ्या कोणा अनंत-तनयाचा आहे असें दिसून आलें. आणि ह्मणून च तो आनंदतनयाच्या इतर प्रकरणांबरोबर 'महाराष्ट्रकवि' त छापला नाहीं.

हा ग्रंथ साग्र भारत नसून फक्त उद्योग-पर्व आहे. ग्रंथांत कवि आपणास 'अनंत-तनय' 'अनंत सुत' 'अनंताचा पुत्र' व त्र्यंबक अशा नावांनीं आपला उल्लेख करितो. 'ही त्र्यंबकें आपुली वाणी । वाग्पुष्पांची गुंफिली श्रेणी । अर्पिली असे श्री-कृष्ण चरणीं । अर्थ सुगंधें घमघमित ।।१२६।। असे १३ व्या अध्यायाचे शेवटीं ह्मटलें आहे ( अ. १३ )

आपल्या नांवापलिकडे इतर कोणतीही माहिती कवीनें या ग्रंथांत दिली नाहीं. मात्र पंधरावे अध्यायांत योजिलेल्या नौकेच्या रूपकावरून हा समुद्रकांठचा राहणारा असावा असें वाटतें. महाराष्ट्राच्या हल्लीं परिचयाचे असलेल्या अनंतसुतांहून हा अगदीं भिन्न कवि आहे एवढें मात्र निश्चित आहे. प्रसिद्ध आनंदतनय ह्मणजे अरणीबावा गोपाळराव हा उघड नव्हे. रुक्मणीस्वयंवरकार अनंतसुत तो हि हा नव्हे. 'काळेया मर्दन' गाणारा

अनंतसुत तोही हा नव्हे. व ' विठ्ठलस्तुति ' किंवा ' चेंडुफळी ' लिहीणारं अनंतात्मजही हा नव्हे. ह्मणजे ठाऊक असलेल्या चारी अनंतपुत्राखेरीज हा कोणा पांचव्या अनंताचा पुत्र, हें उघड आहे.

या अनंततनयानें महाभारताचें उद्योगपर्व कां रचलें याविषयीं आपल्या ग्रंथांत पुढील प्रमाणें खुलासा केला आहे. कवि ग्रंथारंभींच ह्मणतोः—

असो पूर्वी मुक्तेश्वरें । ओंविकाकवीच्या ईश्वरें । आरंभिलें भारत सारें । भाषाधारें वर्णावया ॥ ६ ॥ परी ते न गेलें समाप्ती । ऐसें तर्कूनी सर्वमती । चतुर्थानंतरे पंचमी प्रीती । उद्योगीं मती संचरली ॥ ७ ॥ आदि–सभा–वनपर्व । विराट पर्यंत वर्णिलीं सर्व । परी उद्योग भारती अपूर्व । यास्तव सर्व ही प्रेरिती ॥ ८ ॥ तया साधूंचिये प्राज्ञे । आरंभ केला असें म्यां अज्ञें । परंतु चतुरिं या अवज्ञे । क्षमा कृपेनें करावी ॥ ९ ॥ कोठें गहन उद्योग पर्व । कोठें रंक मी प्रज्ञा खर्व । जेथें विद्वद्वर्य गर्व । सहजें चि सर्व ही टाकती ॥ १० ॥ असो कुमुद कळिका कांही । आमुतें विकाशी ह्मणत नाहीं । परंतु इंदू स्वउदये पाहीं । विकास लवलाही करीतसे ॥१२॥ साधूंसी नलगे प्रार्थणें । खळासी न पाहिजे निंदणें । गूण घेणें दोष ठेवणें । निज निज गुणें करिताती । तयां साधूंचिये कृपे । आरंभिले म्यां ग्रंथगुंफे । तीते श्रोतीं श्रवणदीपें । प्रकाशरूपें प्रकटावे ॥ १३ ॥

पहिल्या अध्यायाचे शेवटीं कवीनें आपल्या नांवाचा उल्लेख आनंतात्मज असा पुढील ओंव्यांत केला आहे.

इतिश्री भारतीं उद्योगपर्वें । श्रोता जनमेजय पार्थिव । व्यासवाणीचे अर्थ गौरव । वैशंपायन निवेदी ॥ १४१ ॥ ही अनंतात्मजे स्वीय वाणी । आर्पण केली ईश्वर चरणीं । तीच श्रोत्यांचिये श्रवणीं । पडतां आनंद देतसे ॥ १४३ ॥

" पहिल्या अध्यायाच्या ओंव्या लिहिल्या नंतर कवीनें " श्रीमद्भारत व्यासनिर्मित तयां ग्रंथांत हें पांचवें । " पर्वश्रेष्ठ वरिष्ठ जो परिसतो तो या भवा आंचवे । " तें म्यां प्राकृत भाषणें विरचिलें ऐकोनियां पाहिजे । " कांहीं अंतरही असेल पडिलें तें सज्जनीं साहिजे ॥

असा एक श्लोक लिहिला आहे. बहुतेक सर्व अध्यायांचे शेवटीं या अनंतात्मज कवीनें त्या त्या अध्यायाचा सारांश देणारा असा एक एक श्लोक योजला आहे

या उद्योगपर्वाचे एकंदर ४६ अध्याय असून त्याची ग्रंथसंख्या अदमासें ६००० आहे. अदमासें ह्मणण्याचे कारण असें की माझे पोथींत मधलेच एक दोन अध्याय कमी आहेत. उद्योगपर्वानंतरची सर्व पढील पर्वें कवीनें रचली किंवा नाहीं हें माहीत नाहीं. पण याचें कर्णपर्व तरी असावें असें मला वाटतें.

उद्योगपर्वांतर्गत कृष्णशिष्टाई, कर्णभेद प्रयत्न, विदुलाख्यान वगैरे सर्व रसभरित आख्यानें यानें चांगली गायीलीं आहेत. कृष्णकर्ण संवादांत तुला राज्यप्राप्ती होईल व पांच पांडव तुझ्या चरणीं वागतलि असें अमिष कृष्णानें दाखविल्यावर, मी कानीन ह्मणजे कुमारीपुत्र असून पंडुराजाचा व कुंतीचा विवाह होण्या पूर्वी च जन्मलो

असल्यामुळें, पंडुराजाच्या राज्यावर माझा हक्क कसा पोंचतो असा कर्णानें प्रश्न केला आहे. मराठी वाचकांनां तरी हा प्रश्न अगदीं नवीन आहे असें मला वाटतें.

तसें च कुंतीनें सांगितलेलें विदुलाख्यान ही कवीनें थोडक्यांत व सरस सांगितलें आहे. या उत्साहकारी अख्यानाची अनंतसुतानें वर्णिलेली फलश्रुति, जुन्याना आणि नव्यानां, भाविकानां किंवा शास्त्रज्ञानां, सर्वांनाही सारखी च पटेल अशी आहे कवि ह्मणतो

क्षत्रिणी जे गर्भिणी । तिणें ऐकतां हे श्रवणीं । पुत्र प्रसवेल वीर्यखाणी । अथवा दाता तपस्वी ॥ ७१ ॥ अथवा ब्राह्मणी सादर श्रवणी । तरी ब्रह्मवर्चस्वी परम गुणी तेजःपुंज जैसा तरणी । पुत्र पावें निर्धारें ॥ ७२ ॥ अ. ४०

याप्रमाणें या त्र्यंबक कवीनें मुक्तेश्वरी-भारत पूर्ण करण्याच्या हेतूनें प्रारंभिलेलें आपलें उद्योगपर्व ४६ अध्यायांत सांगितलें आहे. ४६ व्या अध्यायाचे शेवटीं जरी कौरव व पांडव हे निरनिराळीं सैन्यें उभारून युद्ध चालवीत होते तरी त्या दोहोंचा खरा चालक तो भगवान् श्रीकृष्ण च होता असें " श्रीमत् कृष्णबळें करूनि सकळें दोन्ही दळें हालती । वाढे ज्या सलिलें पलांडुहि फुले तेणें च कीं मालती ॥ " असा श्लोक योजला आहे.

मुक्तेश्वराचे महाभारता संबंधें या वेळीं साहजिकपणें कांहीं विचार मनांत येतात ते आपणापुढें ठेवतों.

१ पुढील पर्वांतर्गत कांहीं त्रुटित आख्यानें सांपडतात.

२ शुकरंभा संवादाचे शेवटीं तें प्रकरण 'तृतीय' अध्याय असल्याचें लिहिलें आहे. सबब हें एकाद्या मोठ्या ग्रंथाचा तुकडा असणें संभवनीय आहे.

३ विराटपर्वांचे शेवटीं " तेंचि निरुपण पुढारें । उद्योगपर्वीं सविस्तारें । श्रवण कीजें चतुरें " असें लिहिलें आहे.

४ सौप्तिक-पर्वाचे एका पोथीवर शेवटीं 'उद्योगपर्व पुणियाजवळ दाभाडियाच्या तळेगांवीं आहे' असें लिहिलें आहे.

५ फार दिवस हीं पर्वें प्रत्यक्ष पाहिल्याचें लोक सांगत आहेत.

६ सौप्तिकपर्व अलिकडे च सांपडलें आहे.

या सहा मुद्यांवरून मुक्तेश्वरानें पुढील पर्वें रचिलीं असावींत व तीं पुढेंमागें सांपडतील असें वारंवार मनांत येतें. परंतु आज सुमारें २०० वर्षें महाराष्ट्रांतील साधु व कवि व जिज्ञासू संशोधक, महाराष्ट्रांत व बाहेर मुक्तेश्वराच्या काव्याचा शोध करीत असून त्यांस पुढील पर्वें आढळलीं नाहींत.

निराश झालेल्या कवींनीं पुढील पर्वें स्वतःच रचण्याचा यत्न केला व कांहीं रचलीं मुक्तेश्वरानें स्वप्नांत येऊन आपणास पुढील पर्वें लिहिण्यास सांगितलें किंवा पुढील कृती पुरी करण्यासाठीं मुक्तेश्वरानें पुन्हां जन्म घेतला अशी भावना महाराष्ट्रांत कांहीं पुरुषांची झालेली आढळते.

श्रीधरस्वामीनीं आपला पांडवप्रताप मुक्तेश्वरी भारताच्या साह्यानें रचला, हें तो ग्रंथ वरवर पाहणारासही सहज दिसून येईल. प्रतापाच्या ६४ अध्यायांपैकीं ३५ अध्याय पहिल्या चार पर्वांनीं व्यापले आहेत व पुढील बाकीचीं सर्व पर्वें २९ अध्यायांत

धांदलीनें उरकून घेतलीं आहेत. या ६४ अध्यायांत मुक्तेश्वराच्या बहुतेक सर्व कल्पना व दृष्टांत श्रीधरानें आपल्या ग्रंथांत घेतले आहेत. किंबहुना श्रृंगाराच्या या उसन्या अतिरेकानें तो ग्रंथ एके दृष्टीनें बालबोध कुटुंबांत ठेवण्यास थोडा अयोग्य झाला आहे. प्रतापाचे हे अध्याय वाचीत असतां श्रीधरस्वामींना पांडुरंगानें "तूं स्वर्गारोहणाची कथा सांगूं नको" असें सांगितलें त्या ऐवजीं तूं मुक्तेश्वरी भारत पाहूं नको असें सांगितलें असतें तर बरें होतें असें दहा वेळां मनांत येतें.

तें असो; येथें विचार करण्याची गोष्ट अशी कीं ज्याअर्थीं श्रीधरस्वामींनीं मुक्तेश्वराचीं चार पर्वें पाहून प्रताप रचिला व पुढें त्यानीं मुक्तेश्वराचा आधार घेतला नाहीं —आणि हें तो ग्रंथ पहातां सहज दिसेल— त्याअर्थीं तेव्हांपासूनच हीं पर्वें लोकांच्या पाहण्यांत नाहींत हें उघड आहे. मुक्तेश्वराचा भारत रचनाकाल अदमासें शके १५७५ धरला तर त्यानंतर ५० वर्षांचें आंत च ह्मणजे श्रीधराचे वेळींच (हरिविज० १६२४: पां. प्रताप १६३४) बाकी पर्वें नष्ट झालीं; असें होतें. मुक्तेश्वर हा एकनाथाचा नातू व श्रीधर हा नाडवडलांपासून पांडुरंगाचा भक्त ही बाब लक्षांत घेतां पर्वें लिहीली असून नष्ट होणें हें असंभवनीय वाटतें.

आतां 'त्रुटित प्रकरणें' व उद्योग पर्वाचा उल्लेख' या दोन मुद्यांसंबंधें असें ह्मणतां येईल 'उद्योगपर्व' रचण्याचा कर्त्याचा मानस असून तो तसाच राहिला असेल. व 'त्रुटित प्रकरणें' हीं 'त्रुटित च रचलीं असतां च. महाराष्ट्रांतले मोठ मोठे ग्रंथकार अशी त्रुटित रचना करून मागाहून मधले दुवे जोडतात, हें आपणास माहीतच आहे. संत चरित्रकार महिपति बावा

संतांचीं चरित्रें संपूर्ण। एकदांच नाकळती जाण। जेव्हां जी झाली आठवण। तीं चरित्रें लिहून ठेविलीं॥

व मग ती ग्रथीत करून ग्रंथ तयार केला असें प्रत्यक्षच सांगतात. आर्याभारताचे रचनेसंबंधानें ही मोरोपंतानीं पुढील पर्वें अगोदर रचल्याचें त्यांचे प्रकाशक सप्रमाण दाखवतात. व इतरत्रही हा प्रकार नजरेस येतो.

तेव्हां या सर्व गोष्टी लक्षांत घेतां मुक्तेश्वराची पुढील चवदा पर्वें नसावींत असें वाटतें. कांहीं असलीं तरी तीं चवदा नसावींत. मुक्तेश्वराच्या आदिपर्वाची गोडी सभापर्वांत नाहीं. वनपर्व देखील आदिपर्वाशीं लावून पाहिलें तर थोडें डावेंच आहे. व तिहींच्या मानानें विराटपर्व तर अगदीच नीरस व मळमळीत आहे. तें इतकें कीं भाषेची प्रभा अशी कमी कमी होत गेल्यास पुढील पर्वें न रचणें हेंच उत्तम असें कविलाच काय पण कोणाला ही वाटेल. मुक्तेश्वराची व मोरोपंतांची दोघांची ही भाषा कुमुदिनी आनंददायिनी खरी. पण एकाचा चंद्रमा कृष्णपक्षांतला व एकाचा शुक्लपक्षांतला दिसतो. एकाचा प्रकाश कमी होत जातो व दुसऱ्याचा वाढत जातो.

असो. हें बरेंच वाढलें. या माझ्या ह्मणण्याचा अर्थ मुक्तेश्वराची कोणतीही कृती आतां शोधीत बसूं नये, व आतां मुक्तेश्वराचें नवीन असें कांहीं च सांपडणार नाहीं असें मुळीं च नाहीं. आणि असें ह्मणण्याचा माझा बिलकुल आशय नाहीं अशी आ-

पली खात्री करून देण्याकरितां मुक्तेश्वराचें एक पद व एक अप्रसिद्ध अशी आरती वाचून मी या टिपणाची आरती करण्यास घेतों.

पदः—नाहीं घडलें यात्रा गमन । जळो त्याचें संतपण । परद्वार नाहीं ठावें । त्याचें संतपण वावें ॥ २ ॥ परवस्तूचा अभिलाष तो चि एक विष्णुदास ॥ ३ ॥ ऐसा संत वर्ते कोणी । मुक्तेश्वर लोळे चरणीं ॥ ४ ॥

आरतीः—कमळ सोडुनी हृदयीं कोमळदळमाळ । प्रेमाचे बडिवारें लेतो गोपाळ। नाना भजनीं लावुनि गोपीजन सकळ । प्रगट विष्णू आपण तुळसीदळ । जयदेव जयदेव जयमाये तुळसी । अक्षय मोक्षाचेनी फळभारें फुलसी । तुळसीमूळमृत्तिका जो चर्ची भाळीं । तुळसी तीर्थें अनुदिनी करितो आंघोळी । तुळशीकाष्टें ग्रीवा मंडित मणिमाळी । त्या संगें सर्वदा विचरे वनमाळी । मंजरीया दिसती वज्राच्या धारा । पापाचे पर्वत नुर्वीती अनु थारा । पळती यम किंकर ह्मणती रविकुमरा । आह्मा भूतळवासी न दिसे चि थारा । तुझीया येका दळें सोडविला देव । ह्मणवूनी तुझे ठायीं धरिला दृढभाव । वृंदावनि देई वस्तिसी ठाव । सहज संगे भेटे वैकुंठराव । मन हे तुळसीदळ श्री गुरुचे पायीं । याहुनि निश्चळ होतां प्रगटे निजदेहीं । अंती तयालागीं भवसंकट नाहीं । ह्मणे मुक्तेश्वर मुक्ति त्या ठायीं ॥

**वि. ल. भावे.**

---

## दासोदिगंबरकृत संतविजय.

प्रसंग ५: नामदेव

प्रसंग ६: श्रीधर टीकाकार; बिल्वमंगळ. ज्ञानदेव ( यांत तिमाजी नाईक सावकाराच्या घरीं पैठणांत हीं भावंडें राहिलीं होती व तिमाजी नाईक यांचे घरीं श्राद्ध असतां कोणी ब्राह्मण जेवण्यास आले नाहींत तेव्हां ज्ञानदेव यांनीं प्रत्यक्ष पितर आणून जेवविले अशी कथा सांगितली आहे.) याच प्रसंगांत आणखी सांवतामाळी व गोराकुंभार यांच्या कथा आहेत.

प्रसंग ७: चोखामेळा; विसाखेचर; जनाबाई; राकाबाका; भानुदास; दामाजीपंत; नरहरी व विठ्ठल पुरंदर

प्रसंग ८: मालोपंत; मुद्गलभट ( रामार्याचा कर्ता) वडवाळ सिद्धनागेश; जोगा परमानंद; मुकुंदराज; जागाजगमित्र; बहिरापिसा; त्रिलोचन; वल्लभाचार्य

प्रसंग ९: संतराय; रूपाबाई; नरपाळ; रमाबाई; जगन्नाथ; भुवनचव्हाण; देवपंज्या; कर्मध्वज

प्रसंग १०: जयमल्लराजा; श्रीधरपंत (प्रसिद्ध श्रीधरस्वामी नाझरेकर नव्हे ) रामराया; हरिपाळ; नारायणभट; जसुस्वामी; नंददास; हरिभट; शामराय; नरपाळ; रोहिदास;

प्रसंग ११: कबीर; पिपाजीराजा; धना जाठ; सेनान्हावी

प्रसंग १२: सुखानंद; सुरसुरीबाई; पद्मनाभ; जीवातत्वा माधवदास; रघुनाथ राजा; नित्यानंद कृष्णचैतन्य; सुरपरमानंद; केशव भट; हरि व्यास

प्रसंग १३: त्रिपुरदास; कृष्णदास; वर्धमान; रामदास ( प्रसिद्ध समर्थ रामदास नव्हेत एका राजाचा पुत्र) हरिसंत कमलाकर; नारायण; व्यास गोपाळभट; भगवानदास; नोकनाथ

प्रसंग १४: मधु गोसावी; कृष्णदास ब्रह्मचारी; कृष्णदास पंडीत; भूगर्भ गोसावी; रसिक मुरारी; सजन कसाई; काशीश्वर गोसावी; खोजीजी; लाडू; विठ्ठलदास; त्रिलोक सोनार; गोविंददास; गुजा हरी

प्रसंग १५: मधुकरशाहा; नरवाहन साधु; गोपाळदास; लाखाभक्त; नरसीमेहेता

प्रसंग १६: नंददास; राघवदास; अंगद; चतुर्भज राजा मिराबाई; पृथ्वीराज; रतनसिंह; रामदासराजा; विमलानंद; सूरदास मदन मोहन; मुरारदास

प्रसंग १७: तुळशीदास; चतुर्भुजस्वामी; कृष्णदास गोपाळनाथ; कान्हा हलालखोर; राघवदास; नारायणभट; हरिदास; परशराम; गदाधर; करमानंद चारण; कोधु आल्हू

प्रसंग १८: पृथ्वीराज; नारायण; विदुर; केवळकुवा सेरवावत; तुवरभगवान; हरिदास वाणी; कुवरबाई

प्रसंग १९: प्रेमानिधी; केवळराम; कृष्णदास सोनार; गदाधरदास; नारायणदास; भगवानदास; कल्याणदास गोविंददास; गिरिधर

प्रसंग २०: जनार्दनपंत (जनार्दन स्वामी पैठणकर) एकनाथ दंडवत बोवा; नरसीभारती; विठारेणुकानंदन

प्रसंग २१: जयरामस्वामी (हे विठोबाचे सांगण्यावरून वडगांवीं कृष्णा नापिक यांस शरण गेले) विठागोंदा; कानोपाठक कृष्णदास मुद्गल; नारायणाश्रम; कमाल कमाली; कर्माबाई

प्रसंग २२: रामचंद्रभट; तुकाराम; माणकोजी बोधला

प्रसंग २३: केशवस्वामी; रामदास; (समर्थ); उद्धवस्वामी

प्रसंग २४: विठ्ठल पुरंदर (याचा कनकदास नांवाचा एक माहार शिष्य होता) जनजसवंत; कृष्णाबाई

प्रसंग २५: भर्तृहरी; गोपीचंद; विसोबा नाईक; बोडानाभक्त; ताजीमोहना

प्रसंग २६: स्वाहाक्षा; बलक बुखार, मधुकरशा; संताजी पोवार

प्रसंग २७: बोगरसा; हरि आनंद; शेख फरीद; नानकशा; रामगीर

प्रसंग २८: गोरक्षनाथ; कूर्मदास; रमाबाई; नरसिंहसरस्वती

प्रसंग २९: नयनीस्वामी; रत्नाकर गोसावी; नारायणभट; रुद्राई; विठोबासंत; नारायणस्वामी; गुप्तनाथ (जगांत दासीच्या रूपानें वावरे ह्याचा शिष्य उद्बोधनाथ व उद्बोधनाथाचा शिष्य केसरीनाथ. केसरीनाथाचे शिष्य तीन (१) प्रसिद्ध शिवदिननाथ (२) नारायणस्वामी (३) अन्नपुर्णाबाई या पैकीं नारायणस्वामी व अन्नपुर्णाबाई ह्यांचीं चरित्रें ह्या अध्यायांत आहेत) माधवदास; हस्तामलक

प्रसंग ३०: रणछोडदास, जडभरत; सहज राम; रतनभक्त

प्रसंग ३१: मावजी भक्त; खंडभट; पूर्णानंद; मनसुखदास

प्रसंग ३२: सिंहाजी; ब्रह्मानंदस्वामी

प्रसंग ३३: अद्वैतानंद; हरिनारायण; चौरंगीनाथ; रामानंद कुंडलीक

प्रसंग ३४:

## महिपति व इतर चरित्रकार

प्रसिद्ध संतांची चरित्रें लिहिण्याचा प्रघात महाराष्ट्रांत फार पूर्वीपासून आहे. ज्ञानेश्वराचें चरित्र त्याच्याच वेळच्या सच्चिदानंदबावानें व त्याच्या नंतरच्या अनेक लेखकांनीं लिहीलें आहे. तसेंच नामदेवादि संतमंडळ, एकनाथ, दासोपंत, जनी जनार्दन, रामदास, तुकाराममहाराज वगैरेंची चरित्रें ही निरनिराळ्या लेखकांनीं लिहिलेलीं आहेत. तसेंच साधारणपणें आपल्या ग्रंथासंबंधीं व परंपरेसंबंधाची व स्वतःसंबंधाची कांहीं कांहीं माहिती ग्रंथकार प्रायः आपल्या ग्रंथारंभीं किंवा शेवटीं देतो. पण ही हि माहिती त्या कवीच्या एकट्या पुरतीच ह्मणजे आत्मचरित्रात्मक च असते. अशी एक एकट्याची माहिती दिलेले ग्रंथ व चरित्रें सोडली तर ज्यांत अनेक कवींचीं किंवा साधूंचीं चरित्रें सांगितलीं आहेत असे चारपांच च ग्रंथ मराठींत हल्लीं उपलब्ध आहेत. संताची नुसती यादीवजा नांवें व क्वचित चार दोन शब्दांत कांहीं माहिती सांगणाऱ्या 'संत मालिका' पांचपंचवीस आहेत. यांचा काळ ठरविण्यास मात्र थोडास उपयोग होतो. याशिवाय त्यांचा फारसा उपयोग दिसत नाहीं. संतांसंबंधीं इतिहास कुतुहल पुरें करण्यास वर सांगितलेल्या चारपांच ग्रंथाचा मात्र उपयोग आहे. ह्मणून या ग्रंथांची व ग्रंथकर्त्यांची थोडीशी माहिती येथें सांगणें अवश्य आहे.

या सर्व चरित्रात्मक ग्रंथांत नाभाजीची भक्तमाला हा ग्रंथ फार महत्वाचा आहे. एकतर तो सर्वांत आधीचा आहे व दुसरें महाराष्ट्रांतल्या चरित्रात्मक ग्रंथकारांनीं, त्या ग्रंथाचा बराच उपयोग करून घेतला आहे. या दोन कारणांसाठीं या भक्तमाला ग्रंथाची व नाभाजीची हकिकत प्रथम सांगणें योग्य आहे. नाभाजी हा जातीचा नागर ब्राह्मण मूळ रामभद्राचल पर्वताजवळील राहणारा. लहानपणींच याला घेऊन याचे आईबाप व्यवहारधंद्यानिमित्त ग्वाल्हेर प्रांतीं गेले. थोडेच दिवसांत त्याचा बाप वारला. आणि संसाराचा व या मुलाचा सर्व भार याचे आईवर पडला. आधींच गरीबी होती. पण त्यांतही ती माउली दोन धंदे करून दिवस लोटी; व समाधानानें असे. परंतु पुढें मोठा दुष्काळ पडला. तेव्हां नाभाजीला घेऊन त्याची आई ग्वाल्हेर सोडून जयपुराकडे गेली. यावेळीं नाभाजीचें वय अवघें पांच वर्षांचें होतें. काळ कठीण येत चालला व दिवस निघतना पोटचें पोर पण तेंही नकोसें झालें तेंव्हां त्याला एकट्यालाच टाकून वाट चुकवून आई कोठें निघून गेली. मूल रस्त्यांत एकटेंच राहिलें. पण दैवयोग कांहीं विचित्र आहे. त्यावेळीं 'कील्हदास' व 'अग्रदास' या नांवाचे दोघे साधुपुरुष त्याच वाटेनें चालले होते. त्यांनीं जवळ येऊन, त्या मुलाला कमंडलूंतून पाणी पाजलें व उचलून आपल्या मठांत नेलें. तेथें या साधुपुरुषांनीं त्याचें पालनपोषण करून त्याजकडून विद्याभ्यास करविला. नाभाजी हा दोन्ही डोळ्यांनीं आंधळा होता. पुढें त्याला अग्रदासाना उपदेश दिला व नांव 'नारायणदास' ठेविलें परंतु हा नाभाजी याच नांवानीं हल्लीं महशूर आहे. नाभाजीनें 'भक्तमाला' या नांवाचा संतचरित्रवर्णनात्मक एक ग्रंथ

मूळ ग्वाल्हेरी भाषेंत रचला. या ग्रंथास संतचरित्र वर्णनात्मक ह्मणणे नीट नाहीं. कारण या मूळ ग्रंथांत संतनामांच्या उल्लेखापलिकडे फारशी हकीकत नाहीं. मूळ भक्तमाला ग्रंथाच्या १९७ छप्पा आहेत व या छप्यांवर ह्मणजे मूळ 'भक्तमाला' ग्रंथावर नाभाजीच्या प्रियादास नामक शिष्यानें 'भक्तिरसबोधिनी' नांवाची टीका लिहिली आहे. ही टीका

'संवत प्रसिद्ध दससातसतउन हत्तर

'फाल्गुनमास वदि सप्तमी बिताइके

ह्मणजे संवत १७६९ त लिहिली संवत १७६९ मध्यें शक १६३५ येतो.

या टीकेसंबंधें प्रियादास ह्मणतो:—

रचि कविताई सखदाई लगे निपट सुहाई आ सचाई पुनरुक्ति ले मिटाई हैं ॥ अक्षर मधुरताई अनुप्रास चमकाई अति छबि छाई मोदझरीसी लगाई हैं ॥ काव्यकि बडाई निजमुख न भलाई होता नाभाजू कहाई याते प्रौढके सुनाई हैं ॥ हृदय सरसाई जोये सुनिये सदाई यह 'भक्तरस बोधिनी' सोनाम टीका गाई हैं.

टीकाः प्रियादास ह्मणे ते समयीं । मी जें कवित्व करी पाहीं । तें सर्वांसी बहुसुखदाई । अतिशयेसी आवडे । जें सत्यत्वें शोभे पाहीं । पुन्हा पुन्हा भाषण ज्यांत नाहीं । अक्षरांत बहु मधुरताई । अनुप्रास यमकें उत्तम । यापरी कविता विस्तारली । आनंदामृतातें वर्षेली । जैसे मेघ वर्षाकाळीं । संतत वर्षती जलधारा । आपुल्या कांव्याचें आपण । न वर्णी मी श्रेष्ठपण । हृदयीं नाभाजी प्रगटोन । तें चि कवन कंरीतसे । ज्यांचें कां हृदय अतिसरस । तें चि योग्य येथें श्रवणास । इतर जे कां अभक्त वायस । ग्राम्यगीत परिसोत कीं । असो 'भक्तिरस बोधिनी' । या टीकेसी नाम ठेवोनी । गातसे मी ऐका श्रवणीं । शृंगार सहित भक्तिरूपा ॥

या प्रियादासाचे टीकेवर मराठींत श्रीमार्तंड बुवांनीं 'भक्तिप्रेमामृत' नामें टीका केली आहे. याच ग्रंथाला हल्लीं सामान्यतवें 'भक्तमाला' ह्मणतात. नाभाजी हा शके १६०० च्या सुमारास होऊन गेला व त्या पूर्वीच्या च संतांचा त्याच्या ग्रंथांत उल्लेख आला आहे. त्यानें दिलेल्या शेकडों संतांपैकीं ज्ञानदेव किंवा ज्ञानेश्वर, नामदेव व आणखी एकदोन संतखेरीज करून बाकी सर्व संत महाराष्ट्राबाहेरचे आहेत. असें असूनही मराठी ग्रंथकारांनीं नाभाजीच्या भक्तमालेंतून शेकडों संतांचा उल्लेख—नांवें व चरित्रें मिळून—केला आहे. नाभाजीनें वर्णन केलेलें महाराष्ट्रांत जे ज्ञानेश्वर नामदेव वगैरे संत आहेत त्यांच्या ही कथा आपल्या इकडे प्रचलित असलेल्या कथांपेक्षां नाभाजीनें ह्मणजे त्यांत टीकाकार जो प्रियादास यानें-अगदीं निराळ्या च वर्णन केल्या आहेत. किंबहुना या संतांची माहिती नाभाजीस अगदीं च

१ श्रीनारायणदासजु किती 'भक्तमाल' पुनिताकी टीका करी प्रियादास सुरलाल टीकाः नाभाजी हे चि नारायणदास भक्तमाल येही केली सुरस पुन्हां त्यावरी प्रियादास परम रसाळ टीका करी २ एकनाथ रामदास तुकारामासारख्या महाराष्ट्रांतल्या अत्यंत प्रसिद्ध संतांचाही उल्लेख किंवा निर्देश नाभाजीचें ग्रंथांत नाहीं.

थोडी व ती ही फारशी बरोबर मिळालेली दिसत नाहीं. नाभाजी हा मथुरा प्रांतात राहणारा असल्यामुळें व त्याचा मराठी भाषेशीं ही परिचय नसल्यामुळें महाराष्ट्रसंतांची माहिती केवळ दंतकथावरून किंवा इकडील एखाद्या प्रवाशाच्या सांगण्यावरून च लिहिली असली पाहिजे, असें वाटतें. ह्मणजे भक्तचारित्रें या दृष्टीनें नाभाजीच्या ग्रंथाचा उपयोग महाराष्ट्रास किती हि असला तरी महाराष्ट्रांतील साधुपुरुषांसंबंधीं ऐतिहासिक माहिती मिळवण्याच्या कामीं नाभाजीच्या भक्तमालेचा फारसा उपयोग होण्यासरखा नाहीं. किंबहुना त्याच्या ग्रंथाचा उपयोग महाराष्ट्र भक्तचरित्रकारांनीं मुळीं च केला नसता तरी ही चालण्यासारखें होतें.

नाभाजी नंतरचा चरित्रग्रंथकार एक उद्धवचित्घन किंवा 'दासोदिगंबर' या दोहोंपैकीं एक होय. दोहोंपैकीं एक ह्मणण्याचें कारण या दोघांचाही बरोबर काल आपणास माहीत नाहीं. पण या दोहोंत उद्धवचित्घन विशेष प्रसिद्ध असल्यामुळें त्याचा उल्लेख अगोदर करून दासोदिगंबराचा नंतर करावा हें बरें.

उद्धवचित्घन या जोडशब्दापैकीं 'उद्धव' हें कविचें व 'चित्घन' हें उद्धवाच्या गुरूचें नांव आहे. तथापी या कवीचा 'उद्धवचित्घन' याच नावानें उल्लेख करण्याचा संप्रदाय आहे. उद्धवचित्घनाचें उपनांव 'कोकिळ' व हा धारूरचा राहणारा[२] हा चैतन्य सांप्रदायांतील एका परंपरेंत येतो. ह्मणजे प्रसिद्ध साधुपुरुष तुकाराम महाराज व उद्धव चित्घन हे एका च चैतन्य सांप्रदायपैकीं होत. आत्माराम चैतन्यापासून दोघांची परंपरा निराळी झाली हें पुढील गुरुपरंपरेच्या दिलेल्या वृक्षावरून दिसून येईल

- श्रीदत्त
  - शिवचैतन्य
    - गोपाळ चतन्यै
      - आत्माराम चैतन्य
        - तुळशी चै०
          - कृष्ण चै०
            - अद्वय चै०
              - चित्घन चै०
                - राघव स्वामी
                - उद्धव चैतन्य
                  - आत्माराम
                    - शंकर
                      - माधवदास
                  - उल्हास चैतन्य
                    - कविकाळ चै०
                      - वाघो चै०
        - राघव चै०
          - केशव चै०
            - बाबाजी चै०
              - तुकाराम

१ नाभाजी नामदेव हा वामदेव नांवाच्या विधवा मुलीस विठोबा पासून झालेला मुलगा ह्मणतो. तसेंच ज्ञानेश्वराच्या शिष्यांची नांवें त्यानें त्रिलोचन व नामदेव अशीं दिलीं आहेत. २ ग्रंथमाला. कोकिळ या उपनांवाचा गंगाधर कोकीळ या नांवाचा एक कवि होऊन गेला. याचा व उद्धव चित्घनाचा काय संबंध होता तें माहीत नाहीं. या गंगाधर कोकिळाची पदें बरी च पाहण्यांत येतात.

उद्धवचिद्घनानें आपल्या अनुभव शतकाचे शेवटीं आपली परंपरा ज्या श्लोकांत दिली आहे ते श्लोक असे.

श्रीदत्त जो तो शिवरूप झाला । गोपाळ, आत्मा, तुळसी ही बोला । श्रीकृष्ण अद्वयपदासि ध्यातां । चैतन्यता पूर्ण प्रकाश आतां ॥ ९९ ॥ श्री चिद्घनीं स्नेहसुधा प्रसादें । वळोनियां वर्षत पूर्ण बोधें । आब्रह्म प्रेमोदधि पूर्ण झाला । पूर्णोदकीं उद्धव ही विराला ॥ १०० ॥

या परंपरे पैकीं अनेक पुरुषांनीं मराठींत ग्रंथरचना केली आहे. त्यापैकीं उद्धव चिद्घनाचा गुरुबंधु राघवस्वामी यानें शके १६११ मध्यें संदेहहरण नांवाचा एक ओंवीबद्ध ग्रंथ केला आहे. व या ग्रंथसमाप्तीनंतर उद्धवास. चिद्घनाचा अनुग्रह झाला असें याच परंपरेतल्या माधवदास कवीनें आपल्या ' अलक्ष निधान ' ग्रंथांत सांगितलें आहे. म्हणजे शके १६११ नंतर उद्धवचिद्घनास गुरुपदेश झाला असें होतें. व उद्धवचिद्घनाचा काळ ठरतो.

या अलक्ष निधानांत च उद्धवचिद्घनासंबंधीं लिहितांनां माधवदास म्हणतो

जयाच्या कीर्तनाचा डंका । चोहों देशीं विराजे भजन शिका । उभी शंकर देवता देखा । कीर्तनामाजी ॥ व बहुत केला वाग्विलास । ' भक्तमालिका ' वर्णिली विशेष असें ही पुढें म्हटलें आहे.

उद्धवचिद्घनाची उपलब्ध अशी बहुतेक सर्व कविता ' काव्यसंग्रहांत ' छापली आहे. याची छापलेली कविता निरनिराळ्या वृत्तांत आहे. वर उल्लेखलेलें ' अनुभवशतक ' हें अनेक वृत्तांत श्लोकबद्ध रचलेलें आहे. याचा ' गीतार्थ मंजरी ' हा गीतेचा छायारूपी ग्रंथ सवाई वृत्तांत आहे. याचा शुकरंभा संवाद ' दिंडी ' वृत्तांत आहे. व नागनाथ आणि त्याचे शिष्य ' हेगराज ' व ' बहिरंभट किंवा ' बहिरापिसा ' यांची चरित्रें तसेंच ' मृत्युंजय ' ' गोराकुंभार ही हीं चरित्रें यानें दिंडी वृत्तांत गाईली आहेत. अशी याची विविध रचना आहे. परंतु उद्धवचिद्घनाचें नांव आपणास नेहमी ऐकूं येतें तें याच्या यापैकीं कोणत्याही प्रकरणा वरून नसून याच्या अप्रसिद्ध व अनुपलब्ध अशा ' भक्तकथामृतसार ' किंवा अशा च नांवाच्या, संतचरित्रात्मक ग्रंथा वरून होय. हा ग्रंथ कोठेंही आढळत नाहीं. यामुळें या ग्रंथासंबंधें कांहींच लिहितां येत नाहीं. मात्र असा स्वतंत्र चरित्रात्माक ग्रंथ असतां वर सांगितलेलीं सुटीं चरित्रें कविनें कां लिहिली, याचा उलगडा नीटसा होत नाहीं.

उद्धव चिद्घनस्वामी पंढरीस समाधिस्त झाले. त्यांची समाधी पंढरपुरास असून त्यांचा मठ श्रीक्षेत्र काशी येथें आहे.

उद्धवचिद्घनाप्रमाणें च दासोदिगंबर या साधुनें भक्तचरित्रें गाइलीं आहेत. उद्धव चिद्घनासंबंधें थोडीफार माहिती उपलब्ध

१ हा ह. प. भिंगारकर बुवानी प्रत्यक्ष पाहिल्याचें लिहिलें आहे. व त्यातील उताराही दिला आहे. हा ग्रंथ पाहण्यासाठीं मीं शक्य ते सर्व यत्न केलें. परंतु द्रव्य, काळ आणि मेहनत हीं सर्व फुकट जाऊन अखेर या ग्रंथाचा व भींगारकर बुवांचा नाद सोडला.

आहे पण दासोदिगंबरासंबंधें ती ही नाहीं. उद्धवचिद्घनाचा भक्तचरित्रपर ग्रंथ उपलब्ध नाहीं पण दासोदिगंबराचा भक्तचरित्रपर 'संतविजय' नांवाचा ग्रंथ उपलब्ध आहे. या ग्रंथाचीं ३४ प्रकरणें असून यांत अनेक संतांची माहिती सांगितली आहे. यांत कविनें नाभाजीच्या ग्रंथाचा उल्लेख केला असून त्याच्या ग्रंथाचा उपयोगही पुष्कळ करून घेतला आहे. यांत वर्णन केलेल्या संतांचीं नांवें सांगतों म्हणजे या ग्रंथाबद्दल कांहींशीं कल्पना बांधतां येईल.

नामदेव (६) जयदेव, श्रीधर (भागवत टीकाकार) ज्ञानदेव, सांवतामाळी, गोराकुंभार (७) चोखा मेळा

दासोदिगंबरांनीं आपली कोणतीहि माहिती किंवा आपला ग्रंथरचनेचा कालही आपले ग्रंथांत दिला नाहीं. मात्र महिपतिबावांनीं हा चरित्रग्रंथ पाहिला असावा असें वाटतें.

महिपतीबोवा ताहराबादकर हे महाराष्ट्र भाषेंतील एक फार प्रसिद्ध कवि व साधुपुरुष होत. हे नगर जिल्ह्यांत राहुरी तालुक्यांत ताहराबाद म्हणून एक गांव आहे तेथले राहणारे. हे ऋग्वेदी वसिष्ठ गोत्री उपनांव कांबळे देशस्थ ब्राह्मण. यांच्या वडिलांचे नांव दादोपंत व आईचें गंगाबाई. दादोपंत व गंगाबाई हीं दोघें ही भक्तीपरायण असून पंढरीची वारी नियमानें करीत. दादोपंतांस फार दिवस पुत्रसंतान नव्हतें. पुढें वयाची साठी उलटल्यावर त्यांस ईश्वरकृपेनें शके १६३७ मध्यें एक पुत्र झाला. त्याचें नांव त्यांनीं महिपती असें ठेविलें. महिपती हा रूपानें फार सुरेख असून याचा बांधा ही सदृढ होता. याची वृत्ती लहानपणीं जरा खोड्याळ होती. परंतु लवकर च म्हणजे याचे वयाचे सोळाव्या वर्षीं वडील निवर्तल्यामुळें संसाराचा भार याचे च आंगावर पडला. यामुळें व्रात्यपणा टाकून महिपतीस संसारवृत्ती चालवणें भाग पडलें. वडिल हयात असतानांच हा पंढरीची वारी करूं लागला होता. लहानपणापासून धर्माचे व विद्येचे बाबतींत यास शिक्षा मोरोबा तांभेरकर[2] नांवाच्या एका गृहस्थाश्रमी सत्पुरुषाची असे. व यासच महिपती बुवांनीं गुरु म्हटलें होतें. ताहराबादची तेव्हांची कुग्रामवस्ती व गांवही जरा एकीकडे यामुळें महिपतीबुवांचें शिक्षण जितक्यास तितकें च झालें होतें. 'मी विद्वान् नाहीं, मला संस्कृतही येत नाहीं, फार काय पण ' म्यां नाहीं पाहिला अमरकोश। गीर्वाण भाषा तीही निःशेष। नाना पुराणें विशेष। श्रवण सायासें न केली कीं। अशासारखें उद्गार यानें अनेक ठिकाणीं काढले आहेत. यांत कदाचित् कांहीं भाग विनयाचा असेल पण यांत सत्यही बरें च आहे. महिपतीबावांचें हस्ताक्षर फार चांगलें होतें. व यांस संस्कृत वगैरे अनेक भाषांचें ज्ञान फार उत्कृष्ट होतें असें यांचे एक अधुनिक चरित्रकार सांगतात. याचा निवाडा स्वतः आपणास करता यावा व त्यांच्या हस्ताक्षराचें दर्शन

१ ही माहीती या ग्रंथावरून मी सुमारें पंधरा वर्षां पूर्वी (१८१७) केलेल्या टिपणा वरून येथें देतों. हल्लीं ग्रंथ मजजवळ नसल्यामुळें अधिक लिहीतां येत नाहीं. मला मिळालेली पोथी पांचव्या अध्याया पासून पुढें होती. २ तांभेर हे गांव ताहराबादेपासून सहा मैलावर आहे.

घडावें याकरतां त्यांचीं स्वदस्तुरचीं पत्रें येथें ठेवतों.

दादोपंत वारल्यानंतर गांवची कुळकर्णपणाची वृत्ती करून महिपतीबुवा संसार संभाळून असत. बावांसंबंधीं पुढील अख्यायिका वारंवार ऐकूं येते. पुढें एकें दिवशीं सकाळीं बावा स्नानसंध्या व पूजाअर्चा करीत असतां यांस सरकारचे शिपाई बोलावूं आले. तेव्हां बावानीं सांगून पाठविलें कीं देवपूजा करीत आहे. झाल्यावर येईन. यासबबीनें समाधान न होतां सरकारकडून त्यांस फिरून बोलावणें आलें. व अधिकाऱ्यांचा बोल लागला. त्यावेळीं बावा सरकारांत जाऊन काम करून आले. पण मनांत बावांनीं विचार केला कीं दोन धन्यांची नोकरी आपले हातून होणार नाहीं यापेक्षां एक विठ्ठलाचीच नीट नोकरी करावी हें उत्तम. असें ह्मणून कानांतील लेखणी घरीं दादोपंतांनीं स्थापलेली विठ्ठलाची मूर्ती होती तिच्या पायावर ठेवली. व अतःपर आजन्मपर्यंत गांवकृत्याचें लिहिणें लिहिणार नाहीं अशी शपथ वाहिली. आणि एव्हांपासून बावा भजन कीर्तन करून देहाचें सार्थक करूं लागले. ही बावांची प्रतिज्ञा आज तीनचार पिढ्या त्यांचें वंशजांनीं पाळली. परंतु आतां कालानुसार सेवावृत्ती पत्करणे त्यापैकीं कांहींस भाग पडलें आहे.

ईश्वराचे भजनकीर्तनांत व कुटुंबकार्यांत निमग्न असतां, काहीं ग्रंथ– रचना करण्याचें बुवांच्या मनांत आलें. व तुकोबानीं ही स्वप्नांत येऊन सांगितलें कीं ' नामदेवाची शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा राहिली होती ती मी पुरी केली. आतां संतचरित्रें वर्णन करण्याचें काम त्वां करावें, ' असा दृष्टांत झाल्यावर तो च तुकोबाचा गुरुपदेश मानून बुवा संतवर्णनाचे कार्यास लागले. यावेळीं बुवा पन्नाशीच्या घरांत गेले होते.

संतचरित्रें वर्णन करावयाचीं तीं आपले पूर्वी होऊन गेलेल्या नाभाजी व उद्धवचिद्धन यांच्या ग्रंथाधारेंच वर्णन करावीं, असा संकल्प धरून महिपतीबुवा ग्रंथरचनेस लागले, असें दिसतें. कारण आपल्या चार चरित्रात्मक ग्रंथांपैकीं प्रथम रचलेला जो ' भक्तविजय ' त्याच्या प्रारंभीं च

ह्मणाल निजबुद्धीनें त्वरित । आपुले मतिनें रचिला ग्रंथ । तरी तैसें नव्हे निश्चित । विकल्प मनीं न धरावा । उत्तर देशीं साचार । नाभाजी विरंचीअवतार

१ महिपतिबावांस श्रीमंत पंतप्रधान बाजीराव साहेब पेशवे यांजकडून व त्यांचे सरदारांकडून कांहीं जमीन व वतनें वगैरे इनामें मिळालीं होतीं. यांच्या सनदा त्यांच्या वंशजांजवळ मी ( शके १८१६ त ) पाहिल्या आहेत. सनदा शके १७१० पासून पुढल्या ह्मणजे बावांची ख्याती सर्वभर पसरल्या नंतरच्या आहेत. सनदेंत ' हरिभक्त परायण महिपत गोसावी बीन दादाजी गोसावी कांबळे वास्तव्य ताहराबाद पा पारनेर हे श्रीहरी सेवा करून निरापेक्ष वृत्तीनें आहेत. परंतु पदरीं कुटुंब त्याचेंही संरक्षण होऊन चाललें पाहिजे याजकरितां ...यांसी धर्मादाय वर्षासन करून देऊन हें पत्र तुह्मास सादर केले असे ' इ. इ. मजकुर आहे. या पेक्षां त्यांत विशेष मुद्याचें कांही नसल्यामुळें विस्तारभयास्तव येथें सनदांचे उतारे देत नाहीं. हल्ली इनाम कांहीं नसून भिक्षावृत्तीवरच कुटुंबाचा निर्वाह चालतो.

तेणे ' संतचरित्र ' ग्रंथ थोर । ग्वालेरी भाषेंत लिहिला असे । आणि मानदेशी ' उद्धवचिद्धन ' त्यानीं भक्त चरित्रें वर्णिलीं जाण । दोहींचें संमत एक करुन । भक्तविजय आरंभिला ॥

असें कवीनें सांगितलें आहे. चरित्रग्रंथ लिहितानां नाभाजीच्या ग्रंथाबरहुकूम आपला ग्रंथ लिहावा असें प्रथमारंभीं कवीच्या मनांत होतें, असें दिसतें. व प्रारंभीचीं चरित्रें ही तशीं च लिहिलीं आहेत. परंतु नामदेव ज्ञानेश्वरादि कवींच्या चरित्रापर्यंत आल्यावर नाभाजीपेक्षां या पुरुषांसंबंधें या प्रांतांत जास्त व भिन्न माहिती प्रचालित आहे असें पाहून, महिपतीनें नाभाजीचा ग्रंथ सोडून इकडील ग्रंथांच्या आधारें हीं चरित्रें लिहिण्याचें योजिलें. व कांहीं[1] अध्याय नामदेवाचे तीर्थावळीवरून रचले[2]. हे असे लिहीत असतां महिपतीचें मन नाभाजीच्या ग्रंथावरून इकडील साधुसंतांकडे वळलें. व पुढें कांहीं अध्यायांत ( २०।२२ ) इकडील संतांचीं च चरित्रें सांगितलीं. तीर्थावळीवरून रचना करूं लागल्यावर हें ओघानेंच आले. हे तीर्थावळींतले संत संपल्यावर कवि पुन्हा नाभाजीच्या ग्रंथाकडे वळला व पुढील सोळासत्रा अध्याय त्यानें भक्तमालेच्या आधारें रचले. व एकोणतिसाव्या अध्यायानंतर दामाजी, भानुदास वगैरे चरित्रें सांगितलीं. भानुदासचें चरित्र सांगतांना, महिपतीसारख्या वारकऱ्यास, पैठणच्या भानुदासांच्या-नाथांच्या-वंशजांकडून साहाजीकच जास्त व विश्वसनीय माहिती मिळाली व तिचा त्यानें ग्रंथांत उपयोग करून घेतला. पुढें बहिरंभटाचें चरित्र आटोपून महिपतीनें तुकारामाचें चरित्र लावलें. तुकारामाच्या चरित्राची माहिती कोणाच्या ही आधारें न लिहितां ती महिपतीनें प्रत्यक्ष त्याच्या वंशजांकडून मिळवून लिहिली. हे तुकाराम चरित्राचे अध्याय सर्व भक्तिविजयांत किंबहुना महिपतीच्या सर्व ग्रंथांत फार सरस उतरले आहेत. यांत तुकारामास ' सद्गुरु '[3] ह्मटलें आहे. तुकारामाची माहिती मिळवितानां व ती सांगतानां त्या वेळच्या इतर संतांची माहिती हि ग्रंथकारांस सहजासहजीं मिळाली व मनांत घोळून राहिली. अर्थात तुकारामानंतर बोधलेबुवा, गणेणनाथ, संतोबापवार वगैरेंच्या चरित्राचें संकीर्तन यापुढील अध्यायांत आलें. व पुढें ज्याच्या ग्रन्थाचा भक्तविजयास आधार झाला त्या उद्धवचित्घनाचें व नंतर विसोबा सराफाचें अख्यान सांगून महिपतीनें भक्तविजय ग्रंथ पुरा केला. ग्रंथसमाप्ती शके १६८४ चित्रभानु संवत्सरीं वैशाख वद्य २ येस झाली.

या ग्रंथांत भक्तांचा व भक्तचरित्रांचा जयजयकार केल्यानंतर ईश्वरप्राप्तिस साधनीभूत अशीं कांहीं व्रतें सांगण्याच्या उद्देशानें कवीनें 'कथासारामृत' नांवाचा एक ग्रंथ रचला. यांत कार्तिकव्रत, माघमहात्म्य, वैशाखव्रत व एकादशीमहात्म्य आणि त्यासंबंधांच्या पौराणिक कथा सांगून हा ग्रंथ

१ १२ ते १५. २ सच्चिदानंद बावाच्या ' ज्ञानेश्वरविजया ' चा उल्लेख महिपतीच्या ग्रंथांत कोठेंही नाहीं महीपतीस या ग्रंथाची माहिती नव्हती असें वाटतें. ३ स्वप्नांतला गुरुपदेश मनांत आणून. असें दिसतें.

शके १६८७ मध्यें श्रावण शु. ५ स पुरा केला.

भक्तांचीं चरित्रें व व्रतें गाईल्यानंतर यासर्वांचें ध्येय जो श्रीपांडुरंग त्याचें चरित्र व त्यांच्या कथा वर्णन करण्याचें महिपती बावांच्या मनांत आलें. आणि हें मनांत आणून त्यांनीं 'पांडुरंगमहात्म' हा ग्रंथ रचण्यास सुरवात केली. पांडुरंगाचा सर्वांत जुना व प्रियभक्त, ज्यानें विठ्ठलाची पंढरीस स्थापना केली त्या पुंडलिकाचें चरित्र भक्तविजयांत आलें नाहीं. हें जाणून कवीनें या पांडुरंगमहात्म्य ग्रंथांत पुंडलिकाचें ही चरित्र सांगितलें आहे. भक्तविजयादि ग्रंथांप्रमाणें या ग्रंथांत सरळ कथानकें सांगितलीं नसून हा ग्रंथ शंकरपार्वती संवादरूपानें निरूपण केला आहे.

एकेवेळीं कैलासनाथ ध्यानस्थ बसले असतां गिरिजेनें त्यांस विचारलें कीं 'नाथ' तुह्मी सर्व देवांचे देव, सर्वांनीं ध्यान तुमचें करावें असें असतां तुह्मी ध्यान करतां तें कोणाचें? तेव्हां किंचित हास्य करून शंकरांनीं श्रीकृष्णाचें नांव सांगितलें. व एके वेळीं पट्टराणी रुखमिणी ही कृष्णावर रुसून दिंडिरव वनांत लोहदंडक्षेत्रीं जाऊन तेथें तपश्चर्या करीत बसल्याची हकीगत सांगितली. हें ऐकतां च गिरिजेनें त्या वनाला दिंडिरव वन कां ह्मणतात व त्या क्षेत्राला लोहदंड. क्षेत्र हें नांव कशामुळें पडलें तें विचारलें. हें सांगतांना शंकरानीं मल्लिकार्जुनाच्या वगैरे कथा प्रसन्न मनानें सांगितल्या. शंकराचें मन प्रसन्न पाहून स्त्रीस्वभावानुसार पुन्हां 'श्रीकृष्णाचा तुह्मी कोणत्या नावानें जप करता' असा प्रश्न पार्वतीनें शंकराला पुन्हा केला. तेव्हां मी 'विठ्ठल' नामानें जप करतों असें कैलासपतीनी तीस सांगितलें. याबरोबर विष्णुला विठ्ठल हें नांव कधीं पडलें अशी शंका मनांत येऊन ती दूर करण्याविषयीं गिरिजेनें आपल्या रमणाची प्रार्थना केली. हें सांगण्याकरतां शंकरांनीं पुंडलिकाची हकीगत, त्याचा जीवनवृत्तांत व पुंडलिकाच्या भेटीस श्रीविष्णू आले असतां जवळ वीट होती ती च पुंडलिकानें पुढें केल्याचा आणि तेव्हांपासून विठ्ठल नांव धारण करून विटेवर विठ्ठल तेथें अक्षय उभे राहिल्याचा इतिहास ओघानें च सांगावा लागला. याच अनुसंधानांत वृत्रासुराची कथा व भागीरथीला या ठिकाणीं चंद्रभागा हें नांव कशानें प्राप्त झालें ही हि कथा अपर्णेनें ऐकून घेतली. पुढें सभोंवतालच्या क्षेत्रांचीं नांवें व त्यांच्या चित्तवेधक कथा सांगत सांगत कविनें द्वादश अध्यायात्मक असा हा आपला ग्रंथ पुरा केला. हे कीर्तन शके १६८८ मध्यें भाद्रपदमासीं संपलें.

यापूर्वीं च एक चरित्रात्मक व एक पौराणिक असें दोन ग्रंथ कवीनें लिहीले होते. परंतु त्या ग्रंथाचे धाटणीचे मानानें पाहतां या ग्रंथाची उभारणी नीटशी झालेली दिसत नाहीं. एकंदरींत पौराणिक कथाभागापेक्षां चरित्रात्मक ग्रंथ सांगतानांच महिपती बावांच्या वाणीला विशेष भरतें यतें असें दिसतें. भक्तचरित्रें हा त्यांचा आवडता विषय दिसतो. आणि ह्मणूनच इतकीं चरित्रें त्यांचे हातून लिहून झालीं.

यावेळीं बोवांची पन्नासी उलटून गेली होती. पण ग्रंथरचनेची हौस बिलकुल कमी झाली नव्हती. आणि भक्तविजय ग्रंथ रचिला तेव्हांपासून च 'भक्तस्तवनीं रमलें चित्त।

१ अध्याय ३६ ओंवी संख्या ६९७७.

यालागीं ' संतलीलामृत ' । दुसरा ग्रंथ आरंभिला. व ' भक्तविजयांत राहिली चरित्रें । तीं येथें ऐकावीं सविस्तर। बुद्धीचा दाता रुक्मिणीवर । सर्व भार तयावरी ॥' असें सांगून ग्रंथास सुरवात केली. संतलीलामृतांतील चरित्र कोणत्याही एका ग्रंथाच्या आधारें न लिहितां, निरनिराळे ग्रंथ व अनेक पुरुषांकडून कळलेली माहिती यांच्या आधारें ग्रंथ रचला आहे. कांहीं आधार असल्याशिवाय उगाच मनास मानेल तशी भाकडकथा ग्रंथांत सांगितली नाहीं. ' विकल्प ह्मणीं आणाल चित्तीं । तरी आधार टाकोनि आपुलें मतीं । बोलिलों नाहीं सर्वथा ' ॥ अशासारखीं अश्वासनें अनेक ठिकाणीं ग्रंथांत लिहिलीं आहेत. ग्रंथास सौरस्य येण्यासाठीं व विषय वाचकांचे मनांत नीट उतरण्यासाठीं ' दृष्टांत मात्र दिधले चार । तेणें चि ग्रंथ वाढला थोर' असें कवि ह्मणतो. आणि हे ठीकच आहे. हा ग्रंथ कवीनें १६८९ मध्यें पुरा केला.

यानंतर 'तुळसीमहात्म्य,' ' गणेश पुराण' 'दत्तात्रय चरित्र' यासारखीं लहान लहान प्रकरणें व 'मुक्ताभरण' 'ऋषिपंचमी' 'अनंतचतुर्दशी' सारख्या व्रतांच्या बारीकसारीक कथा कवीनें लिहील्या. परंतु पूर्वी रचलेल्या भक्तचरित्रांकडे महिपतिबावांचे मन पुन्हा वळलें. व आणखी एक चरित्रग्रंथ लिहावा अशी वासना महिपतीबुवांस उत्पन्न झाली.

पहिल्याप्रथम भक्तविजय लिहीलाच होता. त्यावर फिरून 'दुसरा' संतलीलामृत' सार । त्यांतहीं चरित्रें वर्णिलीं फार । परि आणिक कथा राहिल्या अपार । मग रुक्मिणीवर आज्ञापी मातें ॥ ह्मणोन ' भक्तलीलामृत जाण । ग्रंथ आरंभिला दुसऱ्याने ' असें हा ग्रंथ रचण्याचें कारण सांगितलें आहे. या भक्तलीलामृतांत पहिल्या दहा अध्यायांत, चांगदेवाच्या अवतार कृत्यांचें कीर्तन करूनें पुढें एक दोन अध्यायांत नानक व रोहिदास यांचीं चरित्रें सांगितलीं आहेत. तेराव्या नंतर अकरा अध्यायांत महासाधु एकनाथ महाराजांचें व त्यापुढें सोळा अध्यायांत सद्गुरु तुकारामबुवांचें चरित्र अशीं दोन चरित्रें वर्णन करून ग्रंथ चाळिसाव्या अध्यायापर्यंत आणला आहे. हे अकरा व सोळा मिळून सत्तावीस अध्याय शोधकपणानें माहिती मिळवून फार काळजीनें लिहीलेलें दिसतातें. भाषेच्या दृष्टीनें ही हे

१ संतलीलामृताचे कांहीं छापील पोथ्यांत ' शके सोळाशें एकोण ऐशीं ' असें छापलें असल्यामुळें कांहीं अधुनिक चरित्रकारानां थोडें घोटाळ्यांत पाडलें आहे. परंतु महिपतीबुवांच्या स्वदस्तुरच्या हस्तलिखीत प्रतींत ग्रंथ समाप्तीचा काल ' शके सोळाशें नव्यायशीं । सर्वजीत नाम संवत्सरासी । फाल्गुन वद्य चतुर्थीसी । ग्रंथ सिद्धी पावला ॥ असा दिला आहे. २ चांगदेवाचे चरित्र त्याचा वंशज शामजी याच्या ग्रंथाधारें लिहिलें आहे. मागें माणकोजी बोधल्याचेंही चरित्र असेंच त्याच्या वंशजानीं लिहिल्या लेखाअधारें लिहिल्याचा उल्लेख महिपतीनें केला आहे. यावरून महिपतीबोवा माहिती कीती काळजीनें मिळवीत तें स्पष्ट दिसतें. एके ठिकाणीं महिपतीबुवा ह्मणतात. स्वदेशामाजी निश्चित । प्रख्यात जाहले जे महासंत । त्यांच्या वंशीं सज्ञान महंत । त्यांचे वचनार्थ पाहिले ॥ आपुल्याच मतें वदलों जर । तरी सर्वज्ञ न मानिती उत्तर । यासी साक्ष रुक्मिणीवर । जाणे अंतर सकळांचें ॥

फारच सुरस व चित्तवेधक उतरले आहेत. आपला ग्रंथविस्तार बराच झाला, परंतु चरित्रें मात्र अवघीं सहाच आलीं असें पाहून कवीनें पुढील भागांत चरित्रांची गर्दी करून दिली आहे. पुढील दहा अध्यायांत सुमारें पन्नास चरित्रें कोंबलीं आहेत. यामुळे या शेवटील भागांत ग्रंथाची प्रथमची गोडी राहिली नाहीं. व या चरित्रांची माहिती ही पहिल्याप्रमाणें काळजीपूर्वक मिळवली गेली नाहीं. यांत महाराष्ट्राबाहेरील व भक्तमालेंतली बरीच चरित्रें आली आहेत. याप्रमाणें एकाव्वन अध्याय पुरे करून ग्रंथ संपविला आहे.

भक्तलीलामृत १६९६ च्या फाल्गुनांत पुरा केला. ह्मणजे यावेळीं महिपतिबावा साठ वर्षांचे वृद्ध झाले होते. तरी त्यांनीं राहिलेल्या आयुष्यांत पुन्हां आणखी नवा ग्रंथ रचण्याची जमवाजमव चालविली होती च असें दिसतें. रचलेला भाग हल्लीं 'संतविजय' या नांवानें प्रसिद्ध आहे. पण हा पुरा ग्रंथ नसून यांत एक रामदासस्वामींचें व दुसरें बावाजी गोसाव्यांचें अशीं दोन च चरित्रें आहेत. हीं सुटीं चरित्रें लिहून झालीं होतीं. असें दिसतें कीं महिपतीबावा एकेका संताची माहिती मिळवून मिळविलेल्या माहितीचें एक चरित्र पुरें करीत. 'संतांचीं चरित्रें संपूर्ण। एकदांचि नाकळती जाण। जेव्हां जी झाली आठवण। तीं चरित्रें लिहून ठेवलीं॥' असें महिपतीबुवा स्वतः च सांगतात. व अशीं बरीच चरित्रें झालीं ह्मणजे आदिअंतीचे अध्याय व मधील दुव्याच्या ओंव्या वगैरे घालून ग्रंथ पुरा करीत. संतविजय हा असा पुरा केलेला ग्रंथ नाहीं. यांत नेहमींप्रमाणें नमन, किंवा ग्रंथाप्तीचा काल नाहीं याचेंही कारण हेंच आहे. ग्रंथ पुरा होण्यापूर्वींच बोवांचे आयुष्याचे दिवस सरले. यामुळें ग्रंथ अपुरा राहिला. हा ग्रंथ चालू असतां वृद्धापकाळांत कवीनें इतर ही लहानसहान कथा व स्तोत्रें रचलेलीं दिसतात. यांपैकींच 'अपराध निवेदन स्तोत्र' या नांवाचें स्तोत्र आहे. 'आंगासि आलें वृद्धपण। क्षुधा न सोसे शीत उष्ण' अशा आयुष्याचे काळीं, वयाच्या उमेदींत घडलेले अपराध आठवून ते पांडुरंगाच्या चरणीं निवेदन करण्याकरितां लिहिलेलें हें स्तोत्र एका दृष्टीनें चित्तवेधक आहे[1]. पण यांत माहितीपेक्षां भक्तीरसच विशेष भरलेला आढळतो. आतां शेवटीं तुकाराममहाराजांप्रमाणेंच एके प्रसंगीं महिपती बावांनीं वारकऱ्यांबरोबर श्रीविठ्ठलास पाठविलेलें एक लहानसें पत्र देऊन ही हकीगत पुरी करूं.

जयजय क्षीराब्धीवासा अनंता। अनंतशायी मायातीता। भक्तवत्सल पंढरीनाथा। रुक्मिणीकांता श्रीविठला॥ १॥ सेवेसी विज्ञापना ऐसी। येत होतो पंढरीशी। पांच कोश प्रथम दिवशीं। नांदुरग्रामीं पातलो॥ २॥ एकरात्र करमोनि तेथ। प्रातःकाळीं उठलों त्वरित। तो अश्वावरोनिं अकस्मात। ग्रामद्वारांत पडियेलों॥ ३॥ तेणें देहदुःखें करून। विकळ मूर्छीत पडिलों जाण। तों नामधारक यात्रेंतून। आलें धांवून

१ आत्मचरित्र या दृष्टीनें पाहतां हा लेख वाटतो तितका महत्वाचा नाहीं. यांत कांहीं गोष्टींचा उल्लेख आहे पण एकंदर लेख विशेष महत्वाचा नाहीं.

सन्निध ॥ ४ ॥ त्यांनीं संबुखितां मजकारणें। यास्तव देहीं परतले प्राण । चित्तासी प्रतीती आली गहन । अगाध महिमान संताचे ॥ ५ ॥ मग इष्टमित्रआप्तविषयाहीं । डोली कष्टोनि आणिले गांवीं । परी चित्तवृत्तीं विठाबाई । तुझे पायीं लागली ॥ ६ ॥ त्रितापाचे विस्तार किती । पत्रीं लिहावें तुजप्रती । तरी शरीरीं नाहीं शक्ती । लेखणी हातीं धरवेना ॥ ७ ॥ अंतरसाक्ष चैतन्यघन । जाणशी जिवाची निजखूण । परी मी आर्ष ह्मणवोन । तुजकारणें लिहीलें ॥ ८ ॥ आतां शेवटील हेत आहे साचा । संबंध तोडी या देहाचा । ठाव इच्छितसे पायाचा । आणीक वाचा न बोले ॥ ९ ॥ मागें भक्तासि पावलासि अंतीं । तें यथार्थ करी रुक्मिणीपती । दासानुदास महिपती । सेवेसि विनंती करीत ॥ १० ॥

महिपतीबुवा आपल्या वयाचे ७५ वे वर्षी ह्मणजे शके १७१२ मध्यें श्रावण वद्य १२ स मरण पावले. यांचे मागें ' विठोबा ' व ' नारायण ' असे यांचे दोन पुत्र होते. यापैकीं विठोबांस पदें वगैरे रचण्याचा नाद फार असे. यांना श्रीमंत पेशव्यांचा आश्रय चांगला होता.

महिपतीबावांनीं मिळविलेल्या सामुग्रीचा उपयोग करून घेऊन व आणखी सामुग्री मिळवून विठोबादादानीं, आपल्या पित्यानें-महिपतीनें-आरंभिलेला संतविजय ग्रंथ पुरा केला असता तर बरें होतें. पण तसें झालेलें दिसत नाहीं.

असो. आतां महिपतीबावानंतर झालेल्या दोन भक्तचरित्र वर्णनात्मक ग्रंथाचा थोडा निर्देश करतो. वास्तविक पाहतां कालानुरोधानें ते यानंतर बरेच पुढें यावयास पाहिजेत. परंतु त्यांचा निर्देश येथें च थोडक्यांत आटोपणें थोडें सोयीचें पडेल, असें वाटल्यावरून तो येथें च करण्यास हरकत नाहीं. हे दोन ग्रंथ ह्मणजे एक भीमस्वामीकृत ' भक्तलीलामृत ' व दुसरा राजारामप्रासादीकृत ' भक्तमंजिरी ' हे होत.

' भक्तलीलामृत ' ग्रंथाचे कर्ते भीमस्वामी किंवा भिमाजीबुवा हे श्रीरामदासस्वामींच्या शिष्यपरंपरेपैकीं एक असून शिरगांव मठाचे अधिपती होते. शिरगांव हें चांफळ पासून दोन कोसांवर असून याठिकाणीं समर्थांचे शिष्य कल्याणस्वामी यांचे बंधु दत्तात्रयस्वामी यांचा वंश नांदला. दत्तात्रय स्वामीपासून पुत्रपरंपरेनें [ १ ] दत्तात्रय [ २ ] राघव ( ३ ] यशवंत व [४] भीमाजी अशी प्रस्तुत भक्तलीलामृतकार भीमाजीबोवा यांची चौथी पिढी येते. भीमाजी बुवानीं हा आपला ग्रंथ शके १७१९ त लि-

१ ताहराबाद गावाबाहेर महिपतीबुवांनीच केलेला एक चांगला बाग आहे. येथें च विठोबा, महिपती, नारायण, अशा दोहींकडे दोन मुलांच्या व मध्यें महिपतीबावांची अशा तीन समाधी आहेत. कीर्तनारंभी पुढील अभंग महिपतीबुवा ह्मणत. बुवांचे वंशजहि हा अभंग अजून प्रारंभीं ह्मणतात. चित्तीं धरली वासना । सिद्धी न्यावी नारायणा । मी तो अपंग अनाथ । तुह्मी अनाथाचे नाथ ॥ केला पण सिद्धी न्यावा । मज सांभाळावे देवा । महिपती निढळवाणा । याची येऊं द्या करुणा ॥

हिला. प्रथम यांत श्रीसमर्थांचें चरित्र सांगितलें असून पुढें निरनिराळीं सदतीस भक्तांचीं चरित्रें सांगितलीं आहेत. भक्तांची निवड कांहीं विशेष धोरणानें केली नसून साधारण जी मनांत आलीं तीं चरित्रें सांगितलीं आहेत. रामदासपंचायतनांतले प्रमुख साधुपुरुष किंवा रामदासीपंथांतील मुख्य मुख्य शिष्य यांचा हि समावेश या ग्रंथांत नाहीं. कथा सांगितल्या आहेत त्याही नीट चौकसपणानें सांगितल्यानसून यथातथा च आहेत भीमाजीबावानीं मनांत आणलें असतें तर एक अद्वितीय व बहुमोल ग्रंथ निर्माण करण्यासारखी सामुग्री त्यांस सहज स्वाधीन करून घेतां आली असती असें वाटतें. भीमाजीबोवांचा हा भक्तलीलामृत ग्रंथ ओवीबद्ध नसून अभंगमय आहे.

'भक्तमंजरी' हा ग्रंथ भक्तलीलामृतापेक्षां विस्तारानें फार मोठा असून जास्त व्यवस्थित आहे. हा ही रामदासी पंथांतील श्रीसिद्धेश्वरमहाराजांचा शिष्य राजारामप्रसादी यानीं रचला आहे. याचे एकंदर १०९ अध्याय आहेत. अष्टोत्तरशत अध्यायांची मणिमाला कल्पून १०९ वा अध्याय मेरुमणि म्हटला आहे. अर्थात् या १०९ व्या मेरु अध्यायांत रामदासी सांप्रदायाचे मेरुमणि श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचे च चरित्र सांगितलें आहे. ग्रंथारंभींच्या पहिल्या अकरा अध्यायांत ही रामदास चरित्र वर्णनच आहे. बाकी राहिलेल्या सत्याण्णव अध्यायांत कवीनें जवळ जवळ शेसव्वाशे साधूंची हकीकत सांगितली आहे. साधारणपणें महिपतीबावानीं वर्णिल्या नाहींत अशा साधुपुरुषांचीं चरित्रें गाण्याचा कविचा अभिप्राय दिसतो.

या ग्रंथांतील माहिती राजाराम प्रासादींनीं कशी कशी मिळवली हें नीटसें कळत नाहीं. पण ती बरीच प्रयासानें मिळवलेली दिसतें. ग्रंथांत परंपरा, समकालीन संत व जन्ममृत्यु वगैरे शक राजाराम बुवांनीं अनेक ठिकाणीं सांगितले आहेत. यामुळें या ग्रंथास एक तऱ्हेचें विशेष महत्व आले आहे. तथापि राजारामबुवांनीं दिलेली माहिती थोडी जपून व चौकशीनेंच घेतली पाहिजे असें सदर्हू ग्रंथाची तपासणी थोड्या बारकाईनें केली म्हणजे वाटूं लागतें. मात्र समजूनउमजून मनास मानेल ती खोटी माहिती राजारामबुवानीं आपल्या ग्रंथांत दिली नाहीं. माहिती त्यानीं आपल्या समजुतीप्रमाणें चौकसपणानें दिली आहे. राजारामबुवांचा ग्रंथ अनेक कारणानीं हल्लीं उपलब्ध अशा चरित्रग्रंथांत फार वरच्या दर्जाचा आहे. हा ग्रंथ कविनें शके १७५६ मध्यें पुरा केला असें शेवटीं त्यांत सांगितलें आहे.

नरहरी धुंडिराज मालु हा एक मोठा ग्रंथकार आहे. याचे कांहीं अभंग व पदें असून, 'मालुतारण' व 'भक्तिकथामृत' या नांवाचे दोन मोठाले ग्रंथ आहेत. यांपैकीं 'भक्तिकथासार' हा ग्रंथ भक्तचरित्रकथा सांगण्याच्या इरायानें लिहिला आहे. याचे एकंदर ६४ अध्याय असून यांत अनेक साधुपुरुषांचीं चरित्रें सांगितलीं आहेत.

१ राजारामप्रसादींची पुष्कळ पदें प्रसिद्ध आहेत. त्यापैकीं पुष्कळ चांगलीं व चमत्कृतीजनक आहेत. पैकीं एक पद देतों:—धुंदी झाली दरबारी

हा नरहरी धुंडिराज मालूचा ग्रंथ केवळ अलौकिक आहे. महाराष्ट्रभाषेंतल्या अफाट ग्रंथसागरांत या ग्रंथास दुसरी जोड नाहीं. यांतलीं सर्व चरित्रें पूर्ण आहेत. ह्मणजे कवीचा मातापिता, गुरु, स्थळ वगैरे माहिती यांत सूक्ष्मरीतीनें दिली आहे. व अशी ही माहिती एखाददुसऱ्या कवी संबंधीं सांगितली नसून ती बहुतेक सर्व कवींसंबंधीं सांगितली आहे. मात्र यांत एकच जरा व्यंग आहे. आणि तें असें कीं, नरहरी धुंडिराज मालूनें आपल्या 'भक्तिकथामृत' ग्रंथांत दिलेली माहिती त्याच्या काळीं सर्वतोमुखीं असलेल्या गोष्टी खेरीज करून इतर बाबतींत बहुतेक सर्व येथूनतेथून खोटी आहे. खोटी आहे ह्मणजे चुकीची आहे; व कवीनें नीट चौकशी केल्याशिवाय ती घेतली आहे असें नाहीं. तर ती समजूनउमजून खोटी दिली आहे. या बापुड्यास माहितीची अडचण ह्मणून पडलीच नाहीं. प्रत्येक गोष्ट यानें आपल्या कल्पनेनें सिद्ध करून वाचकांच्या व श्रोत्यांच्या तोंडावर टाकली आहे. चुकूनमाकून एखाददुसरी गोष्ट खरी आली असेल. पण तिची खोट्यापासून निवड करणें अवांतर माहितीच्या व प्रमाणांच्या अभावीं दुरापास्त आहे. ग्रंथास आधार नाभाजीचा व उद्धवचिद्धनाचा ह्मणून कवीनें सांगितलें आहे. वरील हकीगत सांगितल्यावर हें ही थोतांड आहे आणि उद्धवचिद्धनाची स्वतःची ही हकीकत यानें दिलेली खरी नाहीं हें फिरून निराळें सांगण्याची गरज नाहीं.

हा निबंध लिहितानां इतकी या ग्रंथकाराची योग्यता अलोट असेल असें मला वाटलें नाहीं. यामुळें याच्यावर भिस्त ठेवून कांहीं इतरत्र न आढळणारी माहिती मी याच्या आधारें निबंधांत घेतली पण मागाहून ती सर्व काढून टाकली आहे. पण कोठेंकोठें ती राहिली असेल असें समजून हें येथें जरा स्पष्ट सांगणें जरूर वाटलें.

माझें ह्मणणें सप्रमाण स्पष्टकरण्यासाठीं खालील कोष्टक देतों. वास्तविक पाहतां असें करण्याचें कारण नाहीं. पण ह. भ. प. भिंगारकरबुवांसारख्या अनेक विद्वानांनीं याचे उतारे आपल्या ग्रंथास आधार ह्मणून घेतले असल्यामुळें हा खटाटोप इष्ट दिसतो.

## कोष्टक

| कविनाम | प्रसंग | नरहरी मालूची चुकीची माहिती | खरी माहिती व आधार |
|---|---|---|---|
| १ जयरामस्वामी वडगांवकर | ५१ (२६० ते ३००) | माता अंबिका, पिता रामेश्वर अग्निहोत्री ... | माता काशीबाई ऊर्फ कृष्णाबाई, पिता भिकाजीपंत (आधार:-जयरामस्वामीचे शिष्य व बखरी) |
| २ रंगनाथ निगडीकर | ५१ ( १ ते १०० ) | माता जानकी: पिता भिवराव, स्त्री सुलोचना: श्वशुर श्रीधरपंत, गुरु केशवचैतन्य ... ... | पिता बोपाजीपंत, रंगनाथ आजन्म ब्रह्मचारी होते ! ! गुरु निजानंद ( आधार:-वंशज अनंत गणेश निगर्डीकर ) |
| ३ वामन पंडित | ६१ ... ... | माता कृष्णाबाई; पिता रंगनाथ ... ... | माता लक्ष्मी; पिता नृहरी (आधार:-वामनी ग्रंथ) |
| ४ गणेशनाथ | ६० ... ... | राहणार कडीवळ ... ... ... | रहाणार सारसी(उज्जन)-(आधार:-शिष्य विठ्ठलनाथ व महीपति भक्तविजय अ. ५५ ) |
| ५ तुकाराम | ५२ ... ... | पिता विठोबा;माता भिवरा,पुत्र नारायण(वडील) महादेव ( धाकटा ) ... ... ... | ( सुप्रसिद्ध ) |
| ६ बहिणाबाई | ५४ ... ... | पिता नारोपंत; माता जान्हवी; भ्रतार खंडोबा हा बाळाजी विश्वनाथ शिवाजीचा पेष्कार त्याचा आश्रित. | पिता आबाजी कुळकर्णी,माता जानकी—भ्रतार शिवपुरचा ज्योतिषी(आधार:-बहिणाबाईचें आत्मचरित्र) |
| ७ शेखमहंमद | ,, ... ... | पिता राजमहंमद; माता मौन्य ... ... | ( प्रसिद्ध ) |
| ८ दासोपंत | ,, ... ... | स्त्री सरस्वती; रामदास व दासोपंत यांची भेट.... | ,, |
| ९ एकनाथ | ,, ... ... | मूळ नांव रघुनाथ ... ... ... | ,, |

# पाठारे प्रभूंची मध्यकालीन परंपरा

थोडे दिवस झाले, सरदार अबासाहेब मुजुमदार यानीं एक उघडेंबोडकें बाड माझ्या स्वाधीन केलें. हें बाड त्यांना माझे मित्र हरिभक्तिपरायण लक्ष्मणराव पांगारकर यांज कडून मिळालें. पांगारकरांना तें मुंबई-प्रांतीं उपलब्ध झालें. बाड सुमार पांच इंच लांब व साडेतीन इंच रुंद असून, त्याचीं पाठपोठ पानें ५० आहेत. अथ पासून इति पर्यंत शाबूत आहे. दर पृष्टाला ओळी नऊ दहा आहेत. समाप्ति अशीः—

" संवत् १८५४ सकें १७२० काळ-युक्त नाम सवंत्सरे माहे आश्वीन वद्य १० दशमि शनिवारे संपुर्ण राजश्री नारणाजि याचें पुस्तक असे "

ह्या समाप्तीवरून दिसतें कीं हें बाड नारणजि नांवाच्या पाठाऱ्या प्रभूनें शके १७२० त ह्मणजे आजपासून नक्की ११७ वर्षां पूर्वीं लिहून ह्मणजे नकलून आपल्या मालकीचें केलें. शके १७२० च्या आश्विनांत पुण्यास बाजीरावाच्या कारकीर्दीस नुकतां च प्रारंभ होऊन नुकतें कोठें एक वर्ष संपलें असेल नसेल. अशा कालीं हें बाड नकलेलें आहे. आपल्या जातीची पूर्वपरंपरा ज्या जुन्या बाडांतून लिहिलेली होती तिची नक्कल आपल्याजवळ असावी ह्या सदिच्छेनें नाराणजीनें हें काम केलें आहे.

२ नाराणजी हा मोठासा वाकबगार नक्कलकार होता असें ह्मणवत नाहीं. ह्याला जुन्या लेखांची भाषा व तत्कालिन रूपें प्रायः बिलकुल कळत नव्हतीं. अगदीं उपायच नाहीं तेथें व चुकूनमाकून सहजगत्या मधेंमधें त्यानें जुनी भाषा व रूपें जशीची तशी उतरलीं आहेत. बाकी येथून तेथून सर्व ग्रंथभर भाषा स्वकालीन करण्याचा त्यानें प्रयत्न केला आहे. तो प्रयत्न ज्यांना जुने लेखांचा परिचय झालेला आहे, त्यांच्या लक्षांत वरवर वाचतांना हि येतो. भाषा व रूपें ह्यांच्या संबंधानें च तेव्हडा प्रमाद नारणजी करतो असें नाहीं; तर वारंवार शब्दामधलीं अक्षरें गाळण्याची खोड त्याच्या लिहिण्यांत मनस्वी आहे. ह्या अक्षरें गाळण्याच्या खोडीकडे हि एकवार काणा डोळा करितां येईल, परंतु य प व वगैरे अक्षरें हा एकासारखीं एक काढतो, ही याची अक्षम्य चूक आहे. तत्रापि जुनें बाड बहुतेक जसेचें तसें च यानें उतरून काढलेलें असलेमुळें याचे आपणावर फार उपकार आहेत. ज्या जुन्या बाडा वरून त्यानें ही नक्कल केली तीं जुनीं बाडें जोपर्यंत उपलब्ध झालेलीं नाहींत तोपर्यंत हें च बाड आपणास प्रमाण धरून चाललें पाहिजे.

३ ह्या बाडांत एकंदर पांच हकीगती दिलेल्या आहेत. पहिल्या हकीगतींत रामराजाचा महिमा व पाठार ज्ञातीच्या साहासष्ट कुळयांचा निर्देश केलेला आहे. ह्या हकीगतीला मूळबाडकार **श्रीराममहिमा** ह्मणून संज्ञा देतो. दुसऱ्या हकीगतीला **गावाची पाल** अशी संज्ञा आहे. तींत राजा बिंबाच्या अमलापासून मुसलमानी अमलाच्या प्रारंभापर्यंतची स्थूल संगती लाविलेली आहे. तिसऱ्या हकीगतींत सो-

पारे येथील वैतरणी तीर्थाचें माहात्म्य वर्णिलेलें आहे. चवथ्या हकीगतींत पाठारे ज्ञातीच्या आठरा कुळांची नामावळी दिली आहे. आणि पांचव्या हकीगतींत राजावळी दिलेली आहे. राजावळि ह्मणजे बिंब राजापासून मुसलमानी अमलापर्यंतच्या राजांची परंपरा व त्या राजांच्या कारकीर्दीतील कांहीं महत्वाच्या गोष्टी. हें पांचवें प्रकरण सर्वांत मोठें आहे. सबंद बाडाचीं पन्नास पानें आहेत, पैकीं चवतीस पानें ह्या राजावळीनें व्यापिलीं आहेत.

४ पहिलें प्रकरण संवत १४४४ नंतर केव्हां तरी लिहिलें. दुसरें प्रकरण संवत १६७० त लिहिलेलें आहे. तिसरें प्रकरण संवत १३६२ त लिहिलेलें आहे. चवथें प्रकरण संवत १७९४ त लिहिलें आहे आणि पांचवें प्रकरण मूळ केव्हां लिहिलें याचा आंकडा दिलेला नाहीं. तत्रापि मुसलमानी अमल झाल्यावर लवकरच पांचवें प्रकरणाचें लिखाण झालें असावें.

५ पहिल्या प्रकरणाचे प्रारंभीं राजा रामदेव ह्याच्या कुळीचें वर्णन करतांना पांच पैठणांचा उल्लेख केला आहे. तीं पैठणें हीं:—

१ चापानेर, २ हस्तनापूर, ३ नागाबाज, ४ मुंगीपैठण, व ५ पणाले. ह्या पांच हि शहरांना बाडकार पैठण ही संज्ञा देतो. पैठण हा शब्द प्रतिष्ठान या शब्दाचा अपभ्रंश समजतात. परंतु रा. राजवाडे यांस विचारतां प्रतिष्ठान याचा अपभ्रंश पइठाण—पठ्ठाण--पठाण असा व्हावा असें ते ह्मणतात. प्रति या शब्दाचें पडि असें अपभ्रष्ट रूप होतें. उदाहरणार्थ, प्रतिबिंब—पडबिंब, प्रतिछाया—पडछाया या दृष्टीनें पाहतां प्रतिष्ठान याचा अपभ्रंश पइठाण—पठाण असा व्हावा. आणि खरोखर च पठाण असें रूप या बाडांत आलेलें ही आहे. आकराव्या कुळीचा निर्देश करतांना “ राजपुरा कृष्ण रक्तिक ठुरो पठाण ” असे शब्द आलेले आहेत. ह्यावरून पठाण नांवाचें शहर उत्तर हिंदुस्तानांत कोठें तरी होतें व ते पैठण नांवाच्या शहराहून वेगळें होतें. पैठण हा शब्द पतिस्थान या संस्कृत शब्दापासून निघालेला आहे. पतिस्थान—पइठाण——पैठाण—पैठण. पैकीं पैठाण हें रूप या बाडांत अनेक वेळा येत असल्यामुळें त्याचा संदर्भ मी येथें दाखवीत नाहीं. चापानेर, हस्तनापूर, मुंगीपैठण व पन्हाळा, या चार स्थलीं मध्यकालीं ज्या राजवंशांनीं राज्यें केलीं ते वंश सुप्रसिद्ध आहेत नागाबाज ह्मणजे नागोर. ही प्रसिद्ध रजपूतांची राजधानी होती. चापानेर, हस्तनापूर व मुंगीपैठण येथील राजाचे वंश महशूर आहेत. पन्हाळा ही शिलाहारांची राजधानी होती. ह्या पांचा राजधान्याहून म्हणजे पैठणाहून, ह्मणजे पतिस्थानाहून ह्मणजे राजाच्या ठाण्याहून रामदेव राजा बिंब तळ कोकणांत आला असें बाडकाराचें ह्मणणें आहे. तळकोकणाला रामखंड अशी संज्ञा या बाडांत दिली आहे. रामखंड ह्मणजे परशुरामखंड. राजा बिंब कोण होता, कोणच्या वंशातील होता, वगैरे बाबींचा उहापोह इतरत्र केलेला आहे व करणार आहे, सबब त्या संबंधानें येथें कांहीं लिहीत नाहीं. ह्या प्रकरणांतील मुख्य बाब जी पाठारे प्रभु ज्ञातीची पूर्वपरंपरा तिची तेवढी वास्तपुस्त येथें करितों. राजा बिंब पांचा पैठणाहून

कोंकणांत आला, ह्या वाक्याचा अर्थ इतका च कीं, त्याच्या राजवंशाचा संबंध या पांच पैठणांच्या राजवंशासी होता व त्यानें आणिलेले पाठारे प्रभु ह्या पांच राज्यांत मूळ राहणारे होते.

६ पहिलें प्रकरण व चवथें प्रकरण मिळून एकंदर राजा, प्रधान व पाठारे प्रभू मिळून ९५ कुलांचा निर्देश केलेला आहे. पैकीं पैठणाहून अठ्ठावीस कुळें, नागाबाज नऊ, चापानेराहून तेरा, पन्हाळ्याहून सात, चेरणेरहून सात, दौलताबाजेहून तीन व अहिनळवाड्याहून दोन, अशी कुळें कोकणांत आलीं असें बाडकार ह्मणतो. हीं कुळें चेऊल, येकसार, कोंडिवटे, दइसार, चेंबूर, गोरेगांव, शींव, पसपौली, चेदवली, कल्याण, शाहार, फोजिवरे, अंधेरी, भाडुप, मरोळ, वानरे, निळापूर, पवळें, माजासा, सासवण, कळवें, कणेर, वगैरे माहीम–ठाणें या प्रांतांत येऊन कायमचे वतनदार झाली. ही पाठाऱ्यांचीं कुळें पन्हाळा, पैठण, चापानेर अहिनलवाडा, मारवाड इतक्या देशातून आलेलीं होती. कांहीं कुळें महाराष्ट्र देशांतून, कांहीं गुजराथेतून व राजपुतान्यातून आलीं होतीं. महाराष्ट्रातून देशावरून जीं कुळें आलीं व गुजराथ व राजपुतान्यातून जीं कुळें आलीं तीं त्या त्या देशातील भाषा व चालीरीती घेऊन आली हें सांगावयास नको च. पांचव्या प्रकरणांत असें विधान केलें आहे कीं ह्या कुळाचें आगमन कोकणांत संवत १२०० च्या सुमारास झालें. शिलाहारांच्या कारकीर्दींत पन्हाळा प्रांतांत कांहीं पाठारे प्रभूंचीं कुळें होतीं असें वरील विधानावरून ह्मणणें प्राप्त होतें. मुंगीपैठण प्रांतांत ह्मणजे देवगिरीकर यादव यांच्या राज्यांत ही कांहीं पाठारे प्रभु यांचीं कुळें होतीं. दक्षिणेंत पन्हाळा व मुंगीपैठण ह्या प्रांतांत पाठाऱ्यांचा आतां मागमूस हि राहिला नाहीं. गुजराथ व रजपुताना या प्रांतांत हि आतां मागमूस नाहीं. या वरून असें दिसतें कीं, पाठाऱ्यांचीं मूळ कुळें च त्या त्या प्रांतांत थोडीं होतीं. राजा बिंबाची भक्ति यांच्यावर विशेष असल्यामुळें त्यानें एकूणएक कुळें आपल्यावरोबर कोकणांत आणिली व त्यांचीं तेथें कायमची स्थापना करून दिली. असें दिसतें कीं, कायस्थ ह्मणून ज्याला धर्मशास्त्रकार ह्मणतात त्यांची च पाठारे ही एक पोट जात आहे. व ह्या पोटजातीला पाठारे हें नांव प्रांतावरून आलेलें आहे. मूळ हें इंद्रप्रस्थ प्रांतांतील राहणारे असावेत. प्रांत या शब्दाला हजार वर्षांपूर्वी ‘ आहार ’ हा पर्याय शब्द असें. इंद्रप्रस्थ प्रांत ह्मणजे च इंद्रप्रस्थाहार. एकशेष कार्य होऊन इंद्रप्रस्थाहार याचे प्रस्थाहार असें शेष राहिलें, प्रस्थाहारांत राहणारा जो तो प्रास्थाहारिक. प्रास्थाहारिक ह्याचा अपभ्रंश पाठारिआ. पाठारिआचें अपभ्रष्ट रूप पाठाऱ्या. पाठाऱ्याचें अनेकवचन पाठाऱ्ये. पाठाऱ्येचें पाठारे. अशा परंपरेनें पाठारे हें नांव प्रचलित झालेलें आहे. हे मूळचे इंद्रप्रस्थ प्रांतांत राहणारे, येथून रजपुताना, गुजराथ, मुंगीपैठण, व पन्हाळा या प्रांतांत या ज्ञातींचीं कांहीं कुळें पोटापाण्याच्या व धंद्यारोजगाराच्या निमित्तानें गेलीं व तेथून कोकणांत राजा बिंबाच्या आश्रयानें कोंकण प्रांतांत कायमची वस्ती करून हा कालपर्यंत राहिलीं. तात्पर्य, आजपर्यंत

जी अशी एक समजूत होती कीं, पाठारे प्रभू हे कोणत्या तरी एका प्रांतांतून ह्मणजे एकाद्या गुजराथेंतून किंवा एकाद्या रजपुतान्यातून किंवा एकाद्या पैठणातून एकाद्या गोदावरीचें तीरावरून किंवा एकाद्या पन्हाळा प्रांतांतून कोंकणांत आले असावे, ती समजूत प्रस्तुत बाडांतील हकीकतीवरून निराधार आहे असें दिसतें. कोंकणाभोंवतील उत्तरेच्या व पूर्वेच्या सर्व प्रांतांतूनं हे लोक कोंकणांत आलेले आहेत अशी माहिती प्रस्तुत बाडांत मिळते. बाड विश्वसनीय अहे हें प्रास्ताविक रकान्यांत आपण सिद्ध केलें च आहे.

७ हिंदुस्थानांत शक्तिसंप्रदाय सुरु झाल्यानंतर पाठारे प्रभू कोंकणांत आले असें विधान यांच्या कुलदेवता यांचे वरून करितां येते. प्रस्तुत बाडांत जीं पंचाणव कुळें नमूद केलीं आहेत त्या प्रत्येकाची कुलदेवता हि बाडकारानें मुद्दाम त्याच्या त्याच्या नावापुढें मुद्दाम लिहून ठेविलेली आहे. जोगेश्वरी, माहालक्ष्मी, पद्मावती, वज्रायणी, एकवीरा, चांपादेवी, हरडाई, चण्डिका, रामदेवी, कुमारिका, माहामाया, कालिका, . नायणी, ललिता, आद्येश्वरी, रक्तदंतिका, त्वरिता, मेघेश्वरी, चंद्रायणी, रुद्रायणी, सिताई, वीघ्नेश्वरी, गण्डिका, मणकेश्वरी, कोळांबिका, शर्णावती, गंगादेवी, दुर्गादेवी, शिवानी, संभावती; धानामती, कपिलावती, आर्यावती, धारावती, राणादेवी, कनकदेवी, भागीरथी, पिंगला, तारामती, सरस्वती, इंद्रायणी, इरायणी, लक्षेश्वरी, जम्रदेवी, सरलावती, यमावन्ती, सळपावन्ती, पाटलाई, ताम्रायणी, अम्रायणी, नामादेवी, डोलेश्वरी, साघलिका, पद्मा, वाढेश्वरी, रामेश्वरी, अंबाई, भोगावती, हडंबा, हंमाया, राळाई, धाटोबाई, माहाकाळी, यमुनावती, प्रल्हादेवी, बर्बादेवी, सभादेवी, सारजादेवी, पूर्णादेवी, प्रभावती, इत्यादि शक्तींचीं निरनिराळीं नांवें कुळदेवतांच्या सदरांत बाडकारानें दिलीं आहेत. त्यावरून उघड होत आहे कीं पाठारे प्रभू ज्या कोणत्या प्रांतांत पूर्वी राहात होते त्या प्रांतांत शक्तीची उपासना सुरू झाल्यानंतर ते कोंकण प्रांतांत उतरले.

८ बाडकारानें पाठाऱ्यांचीं गोत्रें ही दिलेलीं आहेत, त्यांत श्रीपति, रामळ, नागेश्वर, त्रिंबक, श्रीचंदल, जनार्दन, कासेश्वर, पदकर्षा, देवरुषी, श्रीगणेश, ईश्वर, केशव, दुर्म, श्रवण, दर्शन, तारक, कर्कुट, श्री शैल, शिवानंद, शिवालय, एकेश्वर, रणसोड, थलेश्वर, सालेश्वर, ठाणकेश्वर, श्रीपाद, अंकुश, नरकेश्वर, सुचिल, इत्यादि गोत्रांचीं नांवें आलेलीं आहेत. हीं नावें प्रचलित जे गोत्रप्रवरग्रंथ आहेत त्यांत सांपडत नाहींत. अर्थात हीं गोत्रें सदर गोत्रप्रवरग्रंथ झाल्यानंतर अस्तित्वांत आली असावी. गौतम, वसिष्ठ, पारस्कर, कौंडिन्य, दाल्भ्य, अंगिरा, विश्वामित्र, भृगु, भारद्वाज, अत्रि, कौशिक वगैरे गोत्रप्रवर ग्रंथांतील सर्व प्रसिद्ध गोत्रें हि बाडकारानें दिलीं आहेत. त्यावरून दिसतें कीं, आर्यांच्या इतर पोटजातीप्रमाणेंच याही ज्ञातीचे उगम फार पुरातन आहेत.

९ प्रस्तुत बाड शक १७२० त उतरलें गेले. अर्थात् ज्या जुन्या प्रतीवरून हें उतरलें गेलें, ती प्रत व तिच्या सारख्याच इतर प्रती पाठारे प्रभूंच्या कोंकणांत ह्मणजे वाळुकेश्वरापासून संजानपर्यंतच्या प्रदेशांत सांपड-

ण्याचा बहुत संभव आहे. कित्येक पाठारे देसले होते. कित्येक कर्णिक होते, कित्येक माहातारे हें पद उपभोगीत होते, त्यांचे वंशज सध्या मुंबई प्रांतांत आहेत ते हुडकून काढले पाहिजेत व त्यांचे जुनाट फाटके तुटके कागदपत्र तपासले पाहिजेत.

१० कित्येक वर्षांपूर्वी राजश्री राजवाडे यांनीं नागांव येथील मराठी शिलालेख प्रसिद्ध केला, त्यांत कित्येक विशेष नामांच्या पुढें प्रो हा शब्द येतो. तो शब्द प्रो, पुरो, या रूपांनीं ह्या बाडांत हि येतो. प्रो ह्या शब्दाचा अर्थ मला कळला नाहीं.

पुणें वैशाख वा। ३।१८३७.

**महादेव मोरेश्वर फडनीस.**

## शके १७१७ तील एक मराठी वैद्यक ग्रंथ

१ ह्या ग्रंथाचें नाव 'वैद्यचिंतामणी' असें असून त्याची हस्तलिखित पोथी मला इसलामपूर येथें माझ्या एका वैद्य मित्राचे घरीं मिळाली. पोथी पद्यमय असून त्यांत आर्या, सवाई व इतर अनेक वृत्तांचे श्लोक आहेत. तिची लांबी ११॥ इंच असून रुंदी ४ इंच आहे; व तिची पृष्ठ संख्या ४० आहे. पोथीचा प्रारंभ व शेवट अनुक्रमें खालील प्रमाणें आहे:—

। श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ अथ वैद्यचिंतामणी प्रारंभः ॥ श्रीसुरेश्वरपदांसि नमुनि श्रीसरस्वति हृदी अवतूनि । श्रीगुरुनिशिदिनि करि बोधा त्या कृपे करुनि ग्रंथिं प्रबंधा ॥ १ ॥ केले ग्रंथ समस्त साग्र पहिले सर्वज्ञ जे जाणति । हाही त्यांतिल भाव किंचित्त असे अज्ञान मूढागती । सामान्योषधसद्य येथप्रति आहे असे जाणुनि । केला केवल प्राकृतार्थ स्फुट हा ध्यानी बरा आणुनि ॥ २ ॥ अभ्यासूनि निघंटराज पहिलां नानाभिधानावली । ध्यानी आणुनि वल्लि वृक्ष तृणही सूतादिही केवली । पाकक्वाथसमस्त क्षार लवणें सूक्ष्मादिके माणिकें । विष्ठामूत्रगुणाश्मभेद सकलै आणूनि ध्यानी निके ॥ ३ ॥

शेवटः—

अष्टे श्रीमतिशालिवाहनशकेवारः शशी शैलभू संज्ञा राक्षस नाम वत्सर तथा मासाच्युतोनामभिः ॥ तिथ्या राम शशीदिनर्क्षरसभूत् लस्छितेचंद्रमायामद्धेरविवार रंध्र घटिकाग्रीष्मकृतौउत्तमः २५ ॥ केली प्राकृत वैद्यग्रंथरचना धार्वाड किल्यांत ही । ग्रंथांती दिनं शुद्धि संस्कृत वरा केला असे श्लोकही ॥ नाना वैद्यकशास्त्र संग्रह तसा हा ही तुवा जाणुनी । दीजे जो करि संग्रहासहि तया वोलोनियां कामिनी ॥ २६ ॥ रामाजी हरि गाढगील जधीपासोनि चंद्रासम । जाला उद्भव येशवंत गुरुनें केली कृपा उत्तम ॥ त्या योगेंच परोपकारक जगीं हा वैद्यचिंतामणी । केला प्राकृत रोगग्रासक पाहा वायूस जैसा फणी ॥ २७ ॥ इतिश्रीमद्रामसूनु येशवंतविरचिते वैद्यचिंतामणौ दशमःकल्पः ॥ १० ॥ संपूर्णमस्तु ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ आरोग्यमस्तु ॥ श्रीरामेश्वर प्रसंन् ॥

२ ग्रंथारंभीच्या अवतरणावरून त्यांतील विषयांचें स्थूल स्वरूप व अखेरच्या अवतरणावरून ग्रंथाचा काल, स्थल व ग्रंथकार यांचा बोध होण्याजोगा आहे.

३ ग्रंथकारानें ह्या ग्रंथास 'वैद्यचिंतामणी' असें जरी स्वतंत्र नांव दिलें असलें तरी सदर ग्रंथ केवळ स्वतंत्र नसून संस्कृ-

तांतील 'वैद्यविलास' नामक ग्रंथाच्या आधारें लिहिलेला किंबहुना त्याचेंच रूपांतर असलेला असा आहे असें येथील माझे मित्र वैद्यराज दत्तो बल्लाळ बोरकर यांचें मत आहे.

४ प्रस्तुत ग्रंथाची एक प्रत ८।१० वर्षापूर्वी कै. भि. शंकरशास्त्री पदे यांस मिळाली होती व ती छापण्याचा उपक्रमही त्यानीं केला होता. परंतु सुमारें ८ पृष्ठें छापून झाल्यावर पुढें तें काम तसेंच रेंगाळलें व अखेर बंद पडलें.

५ विषयाच्या दृष्टीनें तर हा ग्रंथ उपयुक्त ठरेल च परंतु भाषेच्या दृष्टीनेंही त्याचें आपणां संशोधकांस बरेंच महत्व वाटेल असें मला वाटतें.

६ इतकी प्रस्तावना करून मी सदरहू ग्रंथाची अस्सल पोथी आपणापुढें सादर करितों.

मु. इसलामपूर<br>मि. वैशाख शु. १२ } वा. दा. मुंडले<br>शके १८३७

# स्वराज्यांतील देशाधिकारी

१ छत्रपती शिवाजीमहाराजांनीं मराठी राज्याची स्थापना करण्यापूर्वी महाराष्ट्रांत विजापुरची अदिलशाही व अहमदनगरचे निजामशाहीचा अंमल सुरू होता. ते वेळीं राज्याचे सोईसाठीं मुसलमानी अमलाखालील प्रदेशाचे विभाग परगणे, सरकार व सुभा अशा प्रकारचे होते. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १५ लेखांक २७ यांतील एकच उदाहरण देतों. या लेखांत तपे मसूर सरकार रायबाग सुभे दारुलजफर उर्फ बिजापूर असा उल्लेख आहे. परगण्यास तपे अथवा संमत अथवा कर्यात याही संज्ञा होत्या. मराठी राज्याची स्थापना शिवाजी महाराजांनीं केल्यानंतर मुसलमानी पद्धतीची देशाची विभागणी रद्द करण्यांत येऊन त्याचे ऐवजी नवीन विभागणी करण्यांत आली. मौजा तर्फ आणि सुभा अशा तीन प्रकारचे विभाग करण्यांत आले. या पद्धतीचें ही एक उदाहरण देतों. समर्थसंप्रदायाचे कागदपत्रें लेखांक २८६ मध्यें मौजे कोंकिसरे तर्फ मरळी सुभा प्रांत कऱ्हाड असा उल्लेख आहे. या स्वरूपाची शिवाजीमहाराजांनीं संपादन केलेल्या मुलखाची विभागणी केल्यानंतर निरनिराळ्या विभागांची व्यवस्था करण्याकरितां त्या त्या विभागावर अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. तर्फाची व्यवस्था ज्या अधिकाऱ्याकडे सोंपविण्यांत आली त्या अधिकाऱ्यास हवलदार व कारकून व क्वचित प्रसंगी पारपत्यगार ही संज्ञा देण्यांत आली. सुभा अथवा प्रांत याची व्यवस्था ठेवण्याकरितां नेमलेल्या अधिकाऱ्यास सुभेदार व कारकून अथवा मुख्य देशाधिकारी व देशलेखक ही संज्ञा देण्यांत आली. एकाहून अधिक प्रांतांची व्यवस्था करण्यास नेमलेले अधिकाऱ्यास सरसुभेदार ही संज्ञा होती. जकाती वसुल करण्याकरितां नेमलेले अधिकाऱ्यास कमाविसदार ही संज्ञा होती. किल्यावरील मुख्य अधिकाऱ्यास मुद्राधारी, हवलदार व कारकून ही संज्ञा असे.

२ स्वराज्यांतील प्रदेशाचे विभाग करून त्याची व्यवस्था करण्याकरितां आतां दर्शविलेलें अधिकारी नेमल्या नंतर त्या अधि-

कार्‍यांची त्या त्या विभागावर कायमची नेमणूक होत असे. अगर त्यांच्या बदल्या होत असत हा प्रश्न विचार करण्यासारिखा आहे. प्रसिद्ध झालेल्या इतिहाससाधनांचें परिक्षण करितां आतां सांगितलेल्या सर्व अधिकार्‍यांच्या नेमणुका त्या त्या विभागावर कायमच्या वंशपरंपरा केल्या जात नसत. हल्लीं ज्याप्रमाणें रेव्हेन्यु अधिकार्‍यांच्या बदल्या एका तालुक्यावरून दुसर्‍या तालुक्यास अथवा एका जिल्ह्याहून दुसर्‍या जिल्ह्यास होतात त्याचप्रमाणें त्याही कालीं हवलदार व सुभेदार इत्यादी अधिकार्‍यांच्या बदल्या होत असत असे सिद्ध होते. कोणत्याही अधिकाराचे जागेवर अधिकार्‍याची कायम व वंशपरंपरा नेमणूक करणें हें राज्याचें हिताचे दृष्टीनें अत्यंत घातुक आहे. या पद्धतींत असा एक दोष आहे कीं कित्येक प्रसंगीं राज्यव्यवस्थेचें काम करण्यास नालायक असे लोकांचे हातांत अधिकाराचीं सूत्रें जातात व त्यामुळें राज्यव्यवस्थेंत दोष उत्पन्न होतात. हा प्रकार टाळण्याचा उपाय म्हटला म्हणजे कोणत्याही अधिकार्‍याची कायमची नेमणूक न करणे हा होय. कोणत्याही अधिकाराचे जागेवर एकाद्या अधिकार्‍याची नेमणूक होऊन तो त्या जागेवर फार दिवस राहिल्यास त्याचे अधिकारातील प्रदेशांतील लोकांशीं त्याचे जास्त संगठ्ठण होतें. यामुळें त्या अधिकार्‍याचे सत्तेचा दुरुपयोग त्याचे हातून होण्याचा संभव उत्पन्न होतो. ह्या ही दोषामुळें प्रजेस त्रास होत असतो. हा दोष टाळण्याचा उपाय म्हटला म्हणजे एका अधिकार्‍यास एके जागीं फार दिवस न ठेवितां त्याची एका अधिकाराचे जागेवरून दुसरे जागेवर बदली करणें हा होय. आतां दर्शविलेलें दोन्ही दोष टाळण्याकरितां हल्लींप्रमाणें स्वराज्याचें पूर्वार्धांतही तरफ प्रांत इत्यादी विभागणीवरील अधिकार्‍यांच्या बदल्या करीत असत. श्रीसमर्थ सांप्रदायाचीं कागदपत्रें व मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, शिवकालिन पत्रव्यवहाराचे खंड १५, १६, १७, १८, व २० याचे आधारानें निरनिराळे विभागांचे निरनिराळ्या कालीं कोण कोण अधिकारी होते हे ठरवितां येतें. या साधनसामुग्रीच्या साहायानें मराठी साम्राज्याचे पूर्वार्धांत म्हणजे शके १५९३ पासून शके १६८५ पावेतों हवलदार, सुभेदार, सरसुभेदार, कमाविसदार, मुद्राधारी कोण होते, ते आपणास निवेदन करितो. स्वराज्यातील सर्व तर्फा, प्रांत व किल्ले यांचेवरील अधिकार्‍यांचीं नांवें अद्याप उपलब्ध झालीं नाहींत. जेव्हडी उपलब्ध झाली आहेत तेव्हडी च दिलेली आहेत.

## हवलदार व कारकून

समत नींब

| साल | हवलदाराचें नाव |
|---|---|
| १६१८ | उधो बावाजी |
| | हवलदार |
| १५९८ | एसाजीराम |
| | तरफ सोनाट सोलसे |
| १६०७ | मुकुंद शंकर |
| | समत हवेली |
| १५९८ | अमाजी कान्हो |
| | समत कोरेगांव |
| १५९८ | भिमाजी मल्हार |

तरफ चिपळूण

१६२० रामाजी पंताजी

तरफ संगमेश्वर

१६३१ शिवाजी दामोदर

समत अथवा तरफ
बारामुऱ्हे

१६१९ खंडो आपाजी

तरफ सातारा

१५९७ कुकाजी बयाजी
१५९८ माहादाजी अनंत
१५९९ तुकाजी प्रभु

तरफ सुपे

१५९२ गंगाजी मुदगल

तरफ कऱ्हेपठार

१६०३ वेंकाजी जिवाजी

तरफ मेढे

१६१३ अपाजी अनंत

तरफ अथवा ठाणे वडगांव

१६५३ दुर्गो नरसिंह

## सुभेदार अथवा देशाधिकारी व कारकून

सुभा अथवा प्रांत वाई

सुभेदाराचें नांव

१५९८ येसाजी मल्हार
१६०१ ,,
१६०९ ,,
१६१२ ,,
१६१८ ,,
१६१९ अनाजी जनार्दन
१६२० ,, ,,
,, विठ्ठल लक्ष्मण
१६२५ मार्ग. व. १० जगजीवन नारायण
,, पौष व. ३ अनाजी जनार्दन



१६२८ अनाजी जनार्दन
१६३१ ,,

सुभा अथवा प्रांत सातारा

१५८६ परसोजीराजे माहाडिक
१५९७ कृष्णाजी भास्कर
१५९९ माहादाजी सामराज
१६०२ कोनेर रंगनाथ
१६०४ ,, ,,
१६०५ अंबाजी मोरदेउ
१६०७ ,, ,,
१६१२ माहादाजी सामराज
१६१६ तिमाजी यमाजी
१६२० ,, ,,
१६२१ ,, ,,
१६३२ कृष्णाजी बल्लाळ
१६३४ ,, ,,

जाउली

१५८६ विरोराम
१५९३ विठ्ठलदत्तो
१५९४ ,,
१५९८ अंबाजी मोरदेउ
१५९९ गोपाल रायाजी
१६०२ काशी रंगनाथ
१६०४ ,,
१६०७ गोविंद पुरशोत्तम
१६११ ,,
१६१३ विठ्ठल गोपाळ
१६१८ माहादाजी सामराज
१६१९ ,,
१६२० ,,
१६२२ विठ्ठल गोपाळ
१६२३ ,,
१६३० ,,

१६३१ विठ्ठल गोपाळ
१६३२ ,,
१६३६ ,,

मावळ

१६१२ माहादाजी सामराज
१६१५ मल्हार एसाजी
१६१६ ,,
१६२९ शामजी हरी

---

प्रांत कोल

१५९४ गणेश जोगदेउ
१५९९ वेंकाजी रुद्र

प्रांत मलकापूर

१६२० भानजी रघुनाथ

प्रांत व्याघ्रगड

१६१८ त्र्यंबक कृष्ण
१६२० ,,
१६३१ राघोजी विठ्ठल

प्रांत वारुण

१६३१ दादाजी बल्लाळ

प्रांत कऱ्हाड

१६११ खंडो बायदेउ
१६१८ भानजी गोपाळ
१६२० { भानजी गोपाळ / त्र्यंबक कृष्ण }
१६२३ त्र्यंबक कृष्ण
१६२४ श्रीनिवास नरसिंह
१६२५ नारो नरसिंह
१६२९ कृष्णाजी बल्लाळ
१६३० महिपतराउ अनंत

प्रांत जुन्नर

१६१४ दामाजी नारायण
१६१७ दामाजी नारायण
१६१८ नारो दामोदर

प्रांत पुणें

१६०१ त्र्यंबक गोपाळ
१६०३ विनायक उमार्जी

प्रांत पनाला

१६२५ नारो नरसिंह

प्रांत कुडाल

१६०२ } गणोराम
१६०३ }

## सर सुभेदार व कारकून

प्रांत कडेवळित

१६५० सिवाजी नारायण

सरसुभेदार व कारकून

प्रांत कऱ्हाड

१६२४ श्रीनिवास नरसिंह

प्रांत कऱ्हाड व सातारा

१६३१ कृष्णाजी बल्लाळ

प्रांत कऱ्हाड व मलाकापूर

१६२५ नारो नरसिंह

कमाविसदार

१६५६ उधो माधव

कमाविसदार जकाती मेडे

मुद्राधारी

किला सातारा

१६३१ अंताजी प्रयाग

किला गुणवंतगड

१६३८ आनंदराव सिरके

किला महिपतगड

१५९६ नरसाला

किला वसंतगड

१६१५ खंडोजी वाग

किला मनमोहनगड

१६४६ त्र्यंबकजी काकडे

किला पुरंदर

१६०७ वाजी घोलप

किल्ला सज्जनगड

१५९८ जिजोजी काटकर

१६०४ ,,

१६११ मकाजी काटकर

१६१४ बन्हानजी मोहिते

१६२१ ,,

१६३० गिरजोजी भोसले

१६३१ ,,

१६३१ फालगुन वद्य ११ येसाजी जाधव

१६३४ सटवाजी डवल

१६८० भवानजी जाधव

१६८५ ,,

हवलदार व कारकून ह्मणजे हल्लिचे मामलेदाराचे दर्जाचे अधिकारी असावे असें दिसते. निरनिराळ्या तर्फांचे हवालदारांची व कारकूनाचीं नावें जितकी उपलब्ध व्हावयास पाहिजेत तितकी उपलब्ध झालि नाहित. तथापी ह्या अधिकाऱ्याच्या बदल्या होत असत असे सातारा तर्फेचे १५९७, १५९८ व १५९९ सालचे तिन्ही अधिकाऱ्याची नावें निरनिराळी आहेत त्यावरुन सिद्ध होतें.

हवलदार व कारकून यांची नावें जेवढी उपलब्ध झाली आहेत त्यापेक्षा सुभेदार व देशाधिकाऱ्यांचीं नावें जास्त उपलब्ध झालि आहेत. वाई, सातारा, जावली, मावल, कोल, मलकापुर, व्याघ्रगड, वारुण, कऱ्हाड, जुन्नर, पुणे, पनाला, कुडाळ असे एकंदर तेरा प्रांताचे सुभेदार व देशाधिकारी यांचीं नावें शके १५९३ पासून १६८५ पावेतों कांहीं उपलब्ध झालि आहेत त्यावरुन ही वरिल सिद्धांत उत्तमरितीनें स्थापित होतो. आता निवेदन केलेल्या सुभेदारांच्या नावा पैकीं कांहींची नावे घेऊन कोण कोणत्या सालि कोण कोणत्या प्रांतावर अधिकारी होते याचे थोडक्यांत दिगदर्शन करितोः-- अंबाजी मोरदेउ हा १५९८ सालांत जाउली प्रांताचा देशाधिकारी होता. तोच शके १६०५ व १६०७ सालांत साताराप्रांताचा देशाधिकारी होता. माहादाजी शामराज हा शके १६१८ पासून १६२० पावेतों जाउलीचा देशाधिकारी होता. परंतु तोच १५९९ सालि साताराप्रांताचा व १६१२ साली मावल प्रांताचा देशाधिकारी होता. त्र्यंबक कृष्ण हा १६१८, १६२० सालांत व्याघ्रगड प्रांताचा सुभेदार होता परंतु १६२० व १६२३ सालांत हाच इसम कऱ्हाडचा देशाधिकारी होता. ह्यावरून अधिकाऱ्याच्या बदल्या करण्याचे तत्व मराठी स्वराज्याचे पूर्वार्धांत पूर्णपणें अमलात होते हें स्पष्ट होतें.

सज्जनगडचे मुद्राधारी व हवलदाराची जीं नांवें आतांच सांगितली त्यावरूनहि हीच गोष्ट सिद्ध होते.

अधिकाऱ्याचे नेमणुकीसंबंधी ह्या तत्वाचा त्याग करून अधिकाऱ्याची वंशपरंपरा नेमणूक करण्याचे तत्व मराठी साम-राज्याचे उत्तरार्धांत कधी अमलात आले ह्याचा उलगडा होणे जरूर आहे. हुयावरून अडनावें घेण्याची पद्धत अमलांत आल्यापासून आता दर्शविलेले व इतर अधिकारी वंशपरंपरा कायम झाले असावेत असा तर्क होतो.

भास्कर वामन भट

## प्रतिनिधींची वंशावळ

- यमदेव
  - नागु
    - शिवाजी
    - यमाजी
  - कृष्ण
    - अपा
    - त्र्यंबक
      - परशराम
        - कृष्णाजी
          - गंगाधर
            - श्रीनिवास
              - परशराम
                - श्रीनिवासराव
          - त्र्यंबक, (शिऊबाई)
            - भगवंत, (राजसबाई)
              - अबाजी
        - त्र्यंबक
        - श्रीनिवासराव
        - सदाशिव
          - (गंगाबाई)
            - अमृत
              - अपाजी (सकवारबाई)
                - अबाजी
                  - त्र्यंबक, आनंद, आपा
            - अबाजी
            - यशवंत.
        - जगजीवन
      - माधवराव

श्रीत्र्यंबकेश्वर येथें वेदमूर्ति राजश्री अनंतभट बीन अंबादास भट कुरुंभटी यांचे घरी सांपडलेल्या लेखावरून तयार केलेली प्रतिनिधी घराण्याची वंशावळ.

तयार करणार

वामन परशराम मेहेंदळे रा औंध.

## पिरंगुट येथील कुळकर्ण्याच्या हकलाजिम्याचा कागद

१. सदर कागद पुणें येथील रहिवासी रा. रा. केशव वामन खोले यांचे संग्रहांतून मिळाला. कागद पुण्यांतील कागदकुड्यांनीं केलेला आहे.

२. अक्षर तीनशें वर्षांच्या सुमाराचें मोडी आहे. 'श्री' तिरव्या रेघेनें फोडलेली आहे. 'ली,' 'भ,' 'फ,' 'तु,' 'जा,' 'स,' 'च,' हीं अक्षरें शिवकालाच्या पूर्वीचीं व एकनाथकालाच्या नंतरचीं आहेत. लेखक 'तू,' 'पू' व 'जू' हीं अक्षरें गफलतीनें एकसारखींच काढतो. बहुशः लेखक स्वतः रंगभट जगमैत्र पिरंगुटचा कुळकर्णी हाच असावा.

३. बाळाजी हरि मेंडजोगी हा तीनशें वर्षांपूर्वीं पिरंगुटचा कुळकर्णी झाला. हें कुळकर्ण त्याला रंगभट जगमईत्र यानें विकत दिलें. अर्थात्, तीनशें वर्षांपूर्वीं आणीक तीनशें वर्षें मागें जगमईत्र यांच्या कुळाकडे पिरंगुटचें कुळकर्ण असावें असा अंदाज करितां येतो. (ह्या अंदाजाला दुजोरा खुद्द रंगनाथ जगमित्राच्या प्रस्तुत लेखांत च मिळतो. तो ह्मणतो, "येणेंप्रमाणें (हकलाजिमे) आपले" वडील घेत आले," ह्या वरून उघड च आहे कीं जगमैत्रांकडे पिरंगुटचें कुळकर्ण कित्येक पिढ्या होतें) ह्मणजे मेंडजोगी याला कुळकर्ण शके १५८० चे सुमारास मिळालें असें धरल्यास, जगमईत्राच्या कुळाकडे कुळकरण शक १२८० च्या सुमारास होतें असें ह्मणणें रास्त होतें. शक १२८० च्या पूर्वीं जगमईत्रांना कुळकरण मिळालें असण्याचा संभव आहे.

४. जगमईत्र हे आडनांव देशस्थ ब्राह्मणांत फार पूर्वीपासूनचें आहे. जगमित्रनागा नांवाचा साधुपुरुष शक १२५२ चे सुमारास झाला असें रा. राजवाडे यांनीं 'सरस्वतीमंदिरांत' लिहिलें आहे, व हा काल निश्चित आहे. पिरंगुटच्या जगमित्र घराण्याच्या हयातीचा शके १२८० हा जो काळ आपण संभाव्य ह्मणून काढिला तो प्रसिद्ध जगमित्रनागाच्या शक १२५२ च्या काळाच्या शेजारचा च आहे. तेव्हां असें ह्मणतां येतें कीं, जगमित्रांचें घराणें महाराष्ट्रांत आज सहाशें सातशें वर्ष नांदत आहे. जगमित्रनागा ह्या दोन शब्दांपैकीं जगमित्र हा शब्द उपनामवाचक आहे. व नागा हा शब्द नागनाथ किंवा नागेश ह्या सबंध शब्दाचा एक शेष आहे. आडनांवानें जे कित्येक संत प्रसिद्ध आहेत त्यांपैकीं हा एक संत आहे. जगमित्रनागयाचें स्थल ठरविण्यास गोदातिरापासून सह्याद्रीपर्यंत जेथें जेथें जगमित्रांचीं घराणीं असतील तेथें तेथें शोध करावा लागेल.

५ प्रस्तुत लेखांत ऐसयास हा अपभ्रंश ऐसेयासि ह्या ज्ञानेश्वरकालीन रूपाचा आहे. हा अपभ्रंश एकनाथाच्या कालीं व नंतर प्रचारांत आला. तत्पूर्वीं मध्यंतरीं ऐसियासि असा एक अपभ्रंश होऊन गेला. लेहौनु, घेउनु, करुनु, वगैरे उकारान्त रूपें प्रस्तुत लेखांत आलीं आहेत. हीं रूपें राजाराम छत्रपतीच्या कारकीर्दीनंतर क्वचित् च पाहण्यांत येतात. अगदीं च येत नाहींत असें मात्र नाहीं. इतकें मात्र खरें

कीं, शक १६३० च्या नंतर हें रूप सार्वजनिक किंवा खासगी लेखांत बहुधा सांपडावयाचें नाहीं.

६ प्रस्तुत कागद पवलें, गोले, शहापूर व तुकाईची वाडी येथील ग्रामाधिकारी व वळुते यांच्या गोहीनिशीं तयार केलेला आहे व तो असल नाहीं; नकल आहे. अक्षराच्या वळणावरून स्पष्ट दिसतें कीं, पत्राचें लिखित असल पत्र लिहिलें गेल्यानंतर थोड्याच कालानें तयार झालेलें आहे. चिंचवडकरांचा पिरंगुट, पवले, गोले व तुकाईची वाडी ह्या गांवांशीं संबंध असल्यामुळें, व मेंडजोग्यांचा व देवांचा शरीरसंबंध असल्यामुळें मूळ पत्राची नकल मोरया देव यांना आपल्या दफ्तरीं ठेवणें भाग पडलें. प्रायः समकालींच नकल केली असल्या कारणानें मूळ कागदांतील रूपें जशींचीं तशींच नकलेंत उतरलीं असण्याचा संभव आहे.

७ प्रस्तुत पत्रांत एकंदर शब्द ४९० आहेत ; पैकीं १०० फारसी-आरबी आहेत ह्मणजे शेंकडा वीस २० शब्द फारसी आहेत. फारसी शब्दांपैकीं प्रत्येक शब्दाचा हेमाडपंताच्या कालीं संस्कृत प्रतिनिधी होता ; व तो व्यवहारांत जारीनें प्रचारांत होता. तत्रापि मुसुलमानी अंमल झाल्यावर संस्कृत शब्दांच्या ऐवजीं फारसी—अरबी शब्द व्यवहारांत प्रचलित झाले. याचा अर्थ असा होतो कीं, महाराष्ट्रांतील समाजांत जे कोणी लोक राज्ययंत्राचे चालक होतील त्यांचे शब्द घरचे योग्य शब्द असतांना खुशीनें किंवा जबरीनें स्वीकारण्यास महाराष्ट्रांतील कांहीं समाजाची तयारी असते. मुसुलमानांचें राज्य असतांना व्यवहारांत जे फारसी शब्द शिरले त्यांची हकालपटी शिवछत्रपतींनीं व छत्रपतींच्या मुत्सद्यांनीं ज्ञानतः केली ; व पूर्वीची हेमाडपंती भाषा प्रचारांत आणिली प्रस्तुत लेखांत जे शंभर फारसी शब्द आहेत त्यापैकीं ठळक ठळक शब्दांचें हेमाडपंती संस्कृत प्रतिनिधी देऊन वरील विधानाची सत्यता दाखवितों.

| फारसी | हेमाडपंती संस्कृत |
|---|---|
| १ विन | १ पिते |
| २ मौजे | २ ग्राम |
| ३ तर्फ | ३ विषय |
| ४ मजकूर | ४ उक्त |
| ५ मिरासी | ५ वडिलार्जित, पैत्रिक |
| ६ आल्हादा | ६ वेगळा |
| ७ महजर | ७ भाषापत्र |
| ८ मुशाहिरा | ८ वेतनम् |
| ९ सालिन्या | ९ वार्षिक |
| १० हरसाल | १० प्रतिवर्षी |
| ११ मुजेरी | ११ ग्रामपरिसर |
| १२ गल्ला | १२ धान्यसंहती |
| १३ मोहतर्फा | १३ व्यवसायी |
| १४ निसबत | १४ अंतःपाती |
| १५ हकलाजिमा | १५ धर्मः |
| १६ दुकान | १६ आपणः |
| १७ बाजार | १७ हाटः |
| १८ पेढारी | १८ पिंडारकारः |
| १९ बकाल | १९ क्षुद्र व्यवसायी |
| २० मोमीन | २० तंतु वायः |
| २१ जिनस | २१ वस्तु |
| २२ रुमाल | २२ वेष्टन वस्त्रम् |
| २३ खंडी | २३ खारी |
| २४ सुमार | २४ परिसंख्या |
| २५ उलफा | २५ भिक्षाधान्य |
| २६ माजना | २६ गणना |

| | |
|---|---|
| २७ कागद | २७ पत्र |
| २८ सही | २८ हस्तलेख |
| २९ गोही | २९ साक्ष |
| ३० मोकदम | ३० अधिकारी |
| ३१ अजहत | ३१ प्रतिनिधी |
| ३२ बलुते | ३२ कारवः |

तात्पर्य, प्रत्येक मुसलमानी अमलांतील फारसी व्यवहार पत्र हेमाडपंती पद्धतीचें भाषांतर आहे. मुसुलमानी अंमल समाप्त झाल्यावर ह्या हेमाडपंती पद्धती पाहून शिवछत्रपतींच्या पंडितांनीं मुसलमानी मायन्याच्या ऐवजीं संस्कृतोत्पन्न प्राकृत शब्द पुनः व्यवहारांत जारी केले. शिवकालीन व शाहुकालीन व्यवहाराची राजपत्रें व अधिकाऱ्यांचीं पत्रें पाहिलीं ह्मणजे वरील विधानाचें स्वारस्य कळून येईल.

८ प्रस्तुत पत्रांत ' ढवण ' हा शब्द आलेला आहे. तो असाः—' कोष्टे व साळी व ढवण. ' कोष्टी व साळी ह्यांच्या च पंक्तीला ढवण हा शब्द आलेला आहे. सध्यां साळी व कोष्टी ह्या शब्दांचा अर्थ आपल्या नित्याच्या परिचयाचा आहे; परंतु ढवण ह्या शब्दाचा अर्थ तितक्या परिचयाचा नाहीं. प्रस्तुत पत्र ज्या कालीं लिहिलें गेलें त्या कालीं गांवांतील साळी, कोष्टी वगैरे धंदेवाल्या जातींच्या शेजारीं च 'ढवण' ह्या जातीची प्रथा होत होती, हें उघड आहे. ही जात विणकाम करणाऱ्यांपैकीं च होती. कोष्टी पासोड्या बनवीत, साळी धोतरजोडे बनवीत; व ढवण रुमाल बनवीत. मनुस्मृतींत ' धिग्वण ' ह्या नांवानें एका संकरजातीचा उल्लेख केलेला आहे. ब्राह्मणबीजापासून आयोगवीक्षेत्रांत जो उत्पन्न झाला तो धिग्वण. धिग्वण ह्या संस्कृत शब्दाचें प्राकृत रूप ढिव्वण; ढिव्वण ह्या प्राकृत शब्दाचा अपभ्रंश ' ढिवण; ' ढिवण ह्या शब्दाचें रूपांतर ढवण. एकंदरींत असें दिसतें कीं, मनुस्मृतींत उल्लेखिलेली धिग्वण ही संकरजाती ढवण ह्या नांवानें महाराष्ट्रांत ओळखली जात असे. खुद्द धिग्वण हा शब्द शुद्ध संस्कृत आहे असें दिसत नाहीं. हा शब्द अपभ्रष्ट दिसतो; व हा अपभ्रष्ट मनुस्मृतीकालीं संकरजातीवाचक शब्द ह्मणून बरा च काल समाजांत प्रचलित होऊन राहिला होता. धिग्वण हा अपभ्रंश ' धिग्वर्ण ' ह्या संस्कृत शब्दापासून निघालेला असावा असा कित्येकांचा तर्क आहे. धिक् ह्मणजे निंद्य; व वर्ण ह्मणजे चातुर्वर्ण्यांतील एक अंश. दुष्ट जातीचा ह्मणजे संकरजातीचा जो तो धिग्वण. कांहीं असो, एवढें स्पष्ट आहे कीं, धिग्वण ही जात मनुस्मृतीकालापासून तो थेट आतांपर्यंत समाजांत नांदत आहे. व मनुस्मृतींत केवळ कल्पित नाहीं. मनुस्मृतीकालीन समाजाचें आपण वंशज च आहोंत तेंव्हां तत्कालीन जाती प्रस्तुत कालीं आपल्या समाजांत दिसाव्या हें साहजीक च आहे.

प्रस्तुत पत्रांत पेढारी असें एका व्यवसायाचें नांव आलेलें आहे. ज्याला सध्यां हलवाई ह्मणतात तो च तीनशें वर्षांपूर्वीचा पेढारी. गुजराथी दुकानदार पेढ्याला पेंडा ह्मणतात. अर्थात्, पेढा, पेंडा, हा शब्द पिंड या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे; व पेढारी हा शब्द पिंडकार ह्या शब्दाचा अपभ्रंश दिसतो.

९ पूर्ण ग्राम ह्मटलें ह्मणजे हेमाडपंताच्या कालीं ग्रामाधिकारी व कारु मिळून होत असे. ग्रामसंस्थेंतील समाजाचे हे जे

दोन भाग ते च मुसुलमानी अंमलांत हि चालू होते. फक्त संस्कृत व प्राकृत नांवें जाऊन क्वचित् फारसी व आरबी नांवें प्रचरित झालीं होतीं. पाटलाला मोकदम ह्मणत; अधिकाऱ्याला मोकाशी ह्मणत; व कारूंना अलुते-बलुते ह्मणत. अलुत्याबलुत्यांच्या यादी प्रांतपरत्वें भिन्न भिन्न असतात. अलुते व बलुते प्रत्येकीं बारा बारा असतात असा सामान्य समज आहे; परंतु कालस्थलादि भेदांनीं ही संख्या कमजास्त होते. प्रस्तुत पत्रांत १ जोसी, २ मुलाणा, ३ सुतार, ४ चांभार, ५ साळवी. ६ परीट, ७ न्हावी, ८ गुरव, ९ महार, १० तराळ, ११ पाडेवार व १२ मांग असे बारा बलुते सांगितलेले आहेत. अधिकाऱ्यांत १ देशमुख, २ मोकदम, व ३ शेटे ह्यांचा निर्देश केलेला आहे. ह्यांत च कुळकर्ण्याचा निर्देश व्हावयाचा; पण खुद्द वृत्तीपत्र च कुळकर्ण्यासंबंधाचें असल्यामुळें तो निर्देश झाला नाहीं.

१० प्रस्तुत पत्रांत 'गोही' च्या सदराखालीं पवळे, गोळे, व तुकाईची वाडी ह्या तिन्ही गांवच्या मोकदमांच्या साक्षी देतांना, तिघांच्या हि सह्यांखालीं नांगराच्या निशाण्या आहेत. मोकदम साक्षर असला तरी हि निशाण्या देण्याची तत्कालीं सार्वत्रिक पद्धत असे. खुद्द शाहुमहाराजापासून तो सामान्य मोकदमाच्या शिक्यांत हि नांगराची निशाणी सांपडते. शिवकालीन घराणीं, खंड २०, पृ. ५१ वर शाहुछत्रपतींचा देशमुखीचा शिक्का दिलेला आहे; त्यांत वर सांगितल्याप्रमाणें नांगराची निशाणी दिलेली आहे. त्या च खंडाच्या पृ. ८० वर एका मुसलमान देशमुखाचा शिक्का आहे. त्यांत व शके १८३५ च्या इतिवृत्तांतील पृ. २४८ वरील शिक्क्यांत ही च पद्धत उपयोजिलेली आहे. खुद्द शिवछत्रपतींच्या सरदेशमुखीच्या वगैरे शिक्यांत नांगराची निशाणी आढळली च तर त्यावरून शिवछत्रपती निरक्षर होते असें निगमन काढण्याचें कारण नाहीं. सांगण्याचा मुद्दा हा च कीं, शिक्यांतील निशाणीवरून निशाणीवाला निरक्षर होता च किंवा साक्षर होता च असें एकतर्फी विधान करण्याला बिलकुल आधार नाहीं.

११ प्रस्तुत कुळकर्ण्याला मिळकत दोन तऱ्हांनीं होत असे;—१ सालीना मुशाहिरा, व २ हकलाजिमा. ह्या दोन्ही तऱ्हांतील बाबी येणे प्रमाणें;—

### सालिना मुशाहिरा.

| | |
|---|---|
| १ दर खंडीस दीड टक्याप्रमाणें टके | १३८ |
| २ पेठ शहापूर टके | २५ |
| ३ मोहतर्फा टके | ३७ |
| | २०० |

### हकलाजिमा

| | | |
|---|---|---|
| १ धनगर | वार्षिक | चवाळीं दोन |
| २ चांभार | ,, | जुते वाहणाचें जोडा १ |
| ३ मोमीन | ,, | मुंडास १ |
| ४ तेली | दर दुकानास आठा दिसा | |
| | दर घाण्यास तेल नवटाक | |
| | ८८८९ | |
| ५ खाटीक | दर दुकानास आठा दिसा | |
| | रुका ८१ | |
| ६ तांबोळी | दर गुरास पानें २५ | |
| | बाजारांत आठा दिवसा | |
| | दर दुकानास पानें १३ | |
| ७ पेढारी | दर दुकानास आठा दिवस | |

अडका ८॥·

८ बकाल दुकानदार आठा दिवसा बाजारांत दर दुकानीं सुपारी १

९ पसकई हर जिनसास दर मोटेस पसा १

१० माळी माळत्र सेव बैल, टोणग्याचे भरीत, मोट व पाटी यांस माजना ( गणना ) पाहून घेणें ती

११ कोष्टी पासोडी १

१२ साळी धोतरजोडा १

१३ ढवण रुमाल १

येणेंप्रमाणें जिनसा प्रत्येकीं पवळें, गोळे व पेठ शाहापूर ह्या तिन्ही गांवांतून मिळावयाच्या

१४ कतबा अगर तकरीरा लिहिल्या नंतर वेव्हाऱ्यांपासून

अग्रवादी रुके ·।४

पश्चिमवादी ·।४

१५ गावामध्यें वऱ्हाड अगर पाट होतील त्यास भिक्षाधान्य

१६ कागद बाब दरसाल सालिना टके१२

१७ दसरा, दिवाळी, सिमगा व भावई ह्या सणांबद्दल प्रत्येक सणास

| | |
|---|---|
| तेली | दर दुकानास तेल ८८८९ |
| तांबोळी | दर दुकानास पानें २५ |
| गूळ | दर बैलास वजन ८८१।० |
| गूळ | दर पाटीस ८८।. |
| खारखंड | अडवार व बाजार दर दुकानास ८॥ |
| केळे | दर बैलास ५ |
| ,, | दर पाटीस १ |

प्रस्तुतचे पत्रांतील कुळकर्ण्यास मिळणाऱ्या मुशाहिराच्या बाबी तीन आहेत; व हकलाजिमाच्या १७ आहेत. टका ह्मणजे एक रुपया; रुका ह्मणजे एक पै; व अडका ह्मणजे अर्धी पै. ह्या तीन नाण्यांचा पत्रांत उल्लेख आहे. त्या कालीं अमुक ठिकाणच्या रुपयांत नेमकी अमुक च चांदी असे, किंवा रुपयाला अमुक च कृत्रिम किंमत दिलेली असे असा प्रकार नव्हता. प्रांतांत नाना ठिकाणच्या टांकसाळीच्या रुपयांचें चलन जारी असे, व प्रत्येक नाण्याची किंमत बाजरांतील सराफ वेळोवेळीं ठरवीत. तत्रापि असें ह्मणण्यास हरकत नाहीं कीं, सध्याच्या इंग्रजी रुपयाच्या बरी च आगेमागें तत्कालीन रुपयाची किंमत असे. हिशेबाच्या सोयीकरितां तत्कालिन रुपयाची किंमत इंग्रजी रुपयाच्या बरोबरीची होती, अशा दृष्टीनें पाहतां, प्रस्तुत पत्रांतील कुळकर्ण्याचा मुशाहिरा २०० टके होता असें दिसतें. ह्मणजे २०० टके ह्म० २०० रुपये होता असें दिसतें. त्या कालीं सध्यांचे पेक्षां पांच पट स्वस्ताई होती. ही बाब लक्षांत घेतली तर २०० रुपये पगार कुळकर्ण्याच्या दर्जाच्या मानानें फार दिसतो. टका हें नाणें त्या कालीं

चार पैशाचें हि असे. चार पैशाचा एक टका व १६ टक्यांचा एक रुपया असें कोष्टक धरल्यास २०० टक्यांचे सालिना १२॥ रुपये होतात; ह्मणजे या कुळकर्ण्याला वार्षिक मुशाहिरा १२॥ रुपये होता व हा च पक्ष बहुशः खरा असावा. हकलाजिम्याच्या ज्या सतरा बावी आहेत त्या बाबींचा सध्यांच्या इंग्रजी रुपयांत किंमती येणेप्रमाणें होतातः-

१—चवाळीं दोन दर १। प्रमाणें किंमत रु. २॥

२—जोडा एक दर २ प्रमाणें कि. रु. २

३—मुंडास एक किं. रु. १

४—तेल दर दुकानास आठा दिसा दर घाण्यास नवटाक ८८८९ ह्या हिशेबानें वर्षाचे ५२ आठवडे होतात. ह्म० दर दुकानचे एका घाण्याबद्दल वर्षाचे ६॥ शेर होतातः अशीं दहा दुकानें व प्रत्येकीं दोन घाणे धरल्यास एकंदर तेल पल्लयावर होतें. त्याची किंमत रु. ३० ते ६०.

५—खाटिकाकडून दर दुकानास आठा दिवसा एक रुका. ह्या हिशेबानें एका दुकानाबद्दल ५२ पया ह्म० ८४८४ होतात. अशीं पांच दुकानें धरल्यास रु. १। होतो.

६—तांबोळ्याकडून दर दुकानास बाजाराचे दिवशीं पानें १३ प्रों कमांत कमी चार ४ दुकानांकडून पानें २७०४ किंमत रु. १।. शिवाय दर गुरास पानें २५ अशीं वर्षातून कमांत कमी २५०० किंमत १।.

७—पेढाऱ्याचे दर दुकानास आठा दिवसा अडका ह्म० अर्ध पै या हिशेबानें पांच दुकानें धरल्यास किंमत ०॥=

८—बकाल दुकानदारांकडून दर बाजारी एक सुपारी या हिशेबानें दहा दुकानें धरिल्यास सु. ५२० किं. १

९—पसकई अदमासें किं. रु. १००

१०—माळीमाळव अदमासें किं. रु. २५

११—ते १३. कोष्टी, साळी व ढवण यांजकडून ३ पासोड्या, ३ धोतरजोडे ३ रुमाल ह्या सर्वांची किं. रु. २५.

| | |
|---|---|
| १४—वेव्हार | रु. ५० |
| १५—वन्हाड व पाट | रु. १० |
| १६—कागद | रु. १२ |
| १७—सणाबद्दल | रु. २५ |
| | ३५७॥= |
| एकंदर | ४२०।≈ |

मुशाहिऱ्याचे आण्याला टका धरून एकंदर रुपये १२॥ झाले होते; सध्यां तीनशें वर्षांचें अंतर पडल्यामुळें त्या कालांतील भावाच्या मानानें धान्याचे भाव पांचपट महागलेले आहेत असें धरल्यास सध्यांच्या भावांत मुशाहिऱ्याचा किंमत रु. ६२॥ होते. हक लवाजम्याच्या बावींच्या किंमती बाजारांत सध्यां जे भाव पुणें-प्रांतांत सरासरीनें चालू आहेत त्या धरिल्या आहेत. त्या धरल्यास, हकलाजिम्याची रकम रु. ३५७॥= होते. ह्मणजे मुशाहिरा व हकलाजिमा धरून ह्या कुळकर्ण्याचें एका गांवापुरतें हल्लींच्या मानानें रु. ४२०।≈ होतें. सालिना ४२० प्रमाणें महिन्यास ह्या कुळकर्ण्याला तीनशें वर्षांपूर्वी दरमहा रु. ३५ पगार पडे. असलें उत्पन्न ज्या वतनापासून मिळतें तें वतन कुळकर्ण्याला जिवाहूनी जास्त प्यारें वाटल्यास आश्चर्य नाहीं.

शिवाय, हीं वतनें कदीम आहेत. ह्यांचीं कदिमी केवळ तीनशें वर्षांचीं च नाहींत तर जेव्हांकेव्हांपासून गांवाची स्थापना झाली तेव्हांपासूनची आहे. प्रस्तुत पत्रांत उल्लेखिलेलें वतन ३०० वर्षांहून तर जुनें आहे च. ह्याहून हि जुनें कुळकर्णीवतनासंबंधाचे कागद वेळोवेळीं निरनिराळ्या खंडांत प्रसिद्ध केलेले आहेत; पैकीं, सगळ्यांत अत्यंत जुना कागद शक १३५० चे सुमारचा आहे ( म. इ. सा. खंड २० वा, लेखांक१ ). त्यांत सुप्याचा कुळकर्णी नागजोसी याची सही आहे. अस्सल लेखी दाखला ह्मटला ह्मणजे हा सर्वांत अत्यंत जुना शिवाय रामदासस्वामी, एकनाथस्वामी ज्ञानेश्वरमहाराज ह्यांचे पूर्वज कुळकर्णी होते हें सर्वश्रुत च आहे रामदासस्वामींचा मूळ पुरूष तर शके ९०० चे सुमारास हयात होता. तात्पर्य, कुळकर्णी वतन महाराष्ट्रांत फार पुरातन आहे. जेव्हां केव्हां महाराष्ट्रांत चातुर्वर्णिक आर्यांची वस्ती झाली, व गांवांची स्थापना झाली तेव्हां कुळांच्या बरोबर कुळकरणी हि अस्तित्वांत आले. कुळकरण ह्मणजे कुळांसंबंधीं लेखनव्यवहार करणारा गांवचा वतनदार हक्कदार. कुळें बाहेरून आणून गांवांत वसविणारा तो कुळकर्णी असा कित्येक अर्थ करितात तो अयुक्त आहे. हेमाडपंत श्रीकरणाधीप होता. श्रीकरण ह्मणजे सवंध दौलतीचें लिहिणें. श्रीकरणाधिप ह्मणजे पेशवाईचे वेळचा फडर्णीस. सवंध राज्याचा जसा श्रीकरणाधिप तसा सवंध गांवाचा कुळकरणाधिप ऊर्फ कुळकरणी. कुळकरणी याला च कोंकणांत कर्णिक ह्मणून संज्ञा असे. कर्णिक हें आडनांव कायस्थांत महशूर आहे.

## पिरंगुट येथील कुळकर्ण्याचा हकलाजिम्याचा कागद

( लेखांक १ )

राजेश्री बालाजी हार मेंडजोगी यांस रगभट बिन जगमईत्र पिरगुटकर मौजे पिरगुट ता मुठेखोरे लेहौनु दिधले ऐसें जे मौजेमजकुरीचे कुलकर्ण आपली मिरासी होती औसयास आपणास पुत्र नाहीं व दाईज गोत्रज हि नाही आपल्या माघाऱ्या व्रती खावयास कोण्ही नाही ह्मणउनु आपण मौजेमजकुरीचे कुलकर्ण तुह्मास पैके घेऊनु विकिले त्याचा कागद अल्हादा आपण तुह्मास लेहौनु दिधला आहे व महजर हि करुनु दिधला आहे येसयास तुह्मी आपणास पुसिले जे मौजेमजकुरी मुशाहिरा व हकलाजिमा काय चालिला आहे तो मोकदमाचे गोहीनसी लेहौनु देणे त्याप्रमाणे आपण घेत जाउनु ह्मणऊनु पुसिले तरी कुलकर्णास मुशाहिरा व हकलाजिमा मौजे मजकुरी सालाबाद एणे प्रमाणे आहे बितपसील

मुशाहिरा सालिन्या हरसाल

मुजेरी कास खडी ९२ दर खडीस मल्ता देखील गला टके १॥. येकूण टके १३८८.

पेठ शाहापूर टके पचवीस २५

नि॥ मोहतर्फा टके

१७।४॥ नि॥ पवले

१७।४॥ नि॥ गोले

२।३ वाडी तुकाई

३७८.

हकलाजिमा हरसाल

चवाले नि॥ धणगर सालिन्या चवाली दोनी २

नि॥ तेली तेल दर दुकानास आठा दिसा दर घाणियास वजन नव टाक ८८८९

खाटीक दर दुकानास आठा दिवसा बाजारात रुका येक ८१

नि॥ कोस्टे व साली व ढवण नि॥ मोहतर्फा व पेठ

मोहतर्फा नि॥ पवले

पासोडी येकी १ धोतरजोडा येक १ रुमाल १

मोहतर्फा नि॥ गोले

पासोडी येक १ धोतरजोडा येक १

नि॥ पेठ शाहापूर

पासोडी १ येक धोतरजोडा १ येक रुमाल १

वेव्हारे दोघे वादी सभेस वेव्हार सांगायास एतील त्याचे कतबे अगर तकरारी लिहिल्यावरि दोघा यासी घेणे रुके ·॥८

अग्रवादी ·।४ पचमवादी ·।४

गावामधे वराडें व पाट होतील त्यांस उलफा माजना घेणे

सुमार उंस व आंबे माजना पाहोनु घेणे

नि॥ चाभार

जुते वाहाणाचे जोडा येक १

नि॥ तावोली पाने

| | |
|---|---|
| दर गुरास | बाजारात आठा दिसा |
| सुमार पचवीस | दर दुकानास पाने |
| २५ | १३ |

नि॥ पेढारी दर दुकानास आठा दिवसा अडका ८॥०

नि॥ मोमीन मुडास येक १

नि॥ बकाल दुकानदार आठा दिवसा बाजारात दर दुकानास सुपारी येक १

पसकई बाजारात हर जिनसास दर मोटेस पसा येक १

नि॥ माली मालवे सेव बैल व टोणगियाचे भरीत व मोंट व पाटी ऐसे विकायास एईल त्यास माजना पाहोनु घेंणें

सण निसबतीवार

| तेली | तावोली |
|---|---|
| १ दसरा | १ दसरा |
| १ दिवाली | १ दिवाली |
| १ सिमघा | १ सिमघा |
| १ भावई | १ भावई |
| ४ | ४ |
| दर सणास | दर दुकानास |
| दर दुकानास | सदर सणास |
| तेल वजन | पाने पचवीस |
| नव टाक ८८९ | २५ |

गुल

दर बैलास वजन पटी ८१।

दर पाटीस ८८।·

खारखंड अडवार व बाजार दर दुकानास ८॥

केले

दर बैलास सु॥ ५ दर पाटीस येक १

कागद बाब हरसाल सालिन्या मख्ता पटीस घालून घेणे टके बारा १२

एणेप्रमाणे आपले वडील घेत आले व आपण हि घेत होतो. त्या च प्रमाणे तुह्मी घेऊनु सुखे कुलकर्ण खाणे हे लिहिले सही

गोही

रा चाहूजी गभिराऊ

मारणे देसमुख तपे मुठेखोरे

दादसेटी गोलासेटीया व बालावा मा

हाजन पेठ शाहापूर मौजे मा

दाद सेटी सेटिये

(निशाणी तराजू)

बालसेटी महाजन

(नि० तराजू)

बलुते मौजे मजकूर

जोसी अजहती

जोसी राइरकर

भिवा सुतार

(नि. किंकरे)

सोन सालवी कुंभार

(नि. चाक)

पिल माहाला न्हावी

(नि. आरसा)

माहार परस नाक

मुकाबला कौम आंवी

(नि. काठी)

पाडेवार माहार

बीर जुमाल मौजे मा

चांदभाई बिन फतुभाई मुलाणा

(नि. मनोरा)

कान्ह मेहतरी चांभार

(नि. विगा)

भिवा वरटा परीट

(नि. बडवणे)

सिव दरणा गुरव

(निशाणी जेंगट)

तराल भान नाक

(नि. काठी)

दाद नाईक मांग

(नि. भाली)

मोकदम मौजे मजकूर

रायाजी पवला भानजी मोकदम

मोकदम ता पवले ता गोले

नि॥ नांगर नि॥ नांगर

रायाजी बिन भिकाजी गोला

मोकदम वाडी तुकाई

नि॥ नांगर

बाबाजी सेटीगा हरसेटी सेटिये क॥

मौजे मजकूर बावधान पा वांई

मलसेटी पिरगुटकर नि॥ (तराजू)

बाला सेटी पाहाडी बाऊ सेटी कोस्टी

बावलिंग जंगम मेहतरीया ता

(नि॥ घंटा) गोले

(नि॥ धोटे)

विसाजी मोकदम मौजे भुकुम

(नि. नांगर)

**पां. न. पटवर्धन**

---

## तुकोबांचें लोहगांव कोणतें ?

१ रा. राजवाडे यांनीं 'पुणें शहराविषयीं कांहीं जुनी माहिती' हा लेख पूर्वी भा. इ सं. मंडळापुढें वाचलेला आहे (केसरी ता. १८।८।१५) त्यांत ते ह्मणतातः "पुणेवाडीच्या पूर्वेस कासारवाडी ह्मणून खेडें होतें आणि पुणेवाडी व कासारवाडी यामध्यें ओढा होता.......कासारवाडीच्या पलीकडे नागझरी आहे व नागझरीच्या कांठीं नागनाथाचें देवालय आहे. तेथें व त्या भोंवतीं लोहगांव ह्मणून लहानसें खेडें होतें. तुकारामबुवांची सासुरवाडी या लोहगांवास होती. तुकारामबुवांचीं कीर्तनें या लोहगांवीं नागनाथाच्या पवित्र व जुनाट देवालयांत होत असत." इ. इ.

२ माझ्या माहितीप्रमाणें ह्यांत थोडासा घोटाळा झालेला आहे. तुकोबा पुणवाडीस येत तेव्हां त्यांचीं कीर्तनें नागनाथाच्या देव-

ळांत होत हें खरें आहे व त्यांची सासुरवाडी पुण्यांत होती हें ही खरें आहे, तथापि तुकोबा ज्या लोहगांवीं कीर्तनांस नित्य जात असत तें लोहगांव हें पुणवाडी नजीकचें नसून पुण्याच्या ईशान्येस नऊ मैलांवर लोहगांव ह्मणून प्रसिद्ध खेडें आहे तें होय. नागनाथाच्या देवळाभोंवतील जागेस लोहगांव हें नांव होतें यास कांहीं आधार नाहीं व कदाचित् तसें नांव असलें तरी तुकोबांच्या कीर्तनाचें लोहगांव हें नसून पुण्याच्या ईशान्येस ( एरवड्याच्या पलीकडे ) नऊ मैलांवर असलेलें लोहगांवाच होय. असें ह्मणण्यास काय आधार आहे तो पाहूं.

३ तुकोबांचे आजोळ लोहगांवीं होतें व त्यांच्या १४ टाळकऱ्यांपैकीं ४ टाळकरी लोहगांवचे होते.

१ कोंड पाटील.
२ आंबाजीपंत
३ नावजी माळी
४ शिवबा कासार

लाहेगांवकरचे देहूकरांपेक्षांही तुकोबावर ज्यास्त प्रेम होतें. महिपतबावांनीं:—

मथुरेसी कृष्ण जन्मला पाही
परी गोकुळीच्या सुखासी पार नाहीं ।
तैसा तुकयाचा प्रेमा सर्वही
लोहगावीं लूटिला ॥ (भक्तलीलामृत ३६-१०४ )

असें मोठ्या सहृदयपणानें ह्मटलें आहे. तुकोबांचे अनेक नामसप्ताह 'तेथीचे जन अवघे भाविक। सप्रेम सुख भोगिती.' तुकोबांचीं कीर्तनें देहूस विठ्ठलमंदिरांत, पुणवाडीस नागनाथाच्या देवळांत व लोहगावीं ह्याप्रमाणें तीन ठिकाणीं मुख्यतः होत. ह्या सर्व ठिकाणांपैकीं लोहगांवकरांचा प्रेमा कांहीं विशेष होता.

४ ह्या लोहगावीं मी व ह. प. विष्णुबोवा जोग सहा महिन्यांपूर्वीं एकदा गेलों होतों व तेथील गांवकऱ्यांच्या मेळांत त्यांच्या घरचे जुने कागदपत्र पाहत पाहत आह्मीं एक रात्र काढली. तेव्हां परंपरेची माहिती, कागदपत्रांतील पुसट उल्लेख, गांवचीं रचना व महिपतीबावांचें वर्णन या सर्वांचा उत्कृष्ट मेळ पडून तुकोबांचें लोहगांव तें हें च याविषयीं शंका राहिली नाहीं. याचीं कारणें आतां सांगतों.

( १ ) तुकोबांचें आजोळ तेथें 'मोझे' आडनावाचें एक घराणें होतें तें होय. तुकोबांच्या आजोळच्या घरांत त्यांची बसायची एक शिळा आहे. तुकोबा लोहगावीं येत तेव्हां या शिळेवर बसून भजन करीत. ती शिळा तुकोबांचे पश्चात् एका सुंदर वृंदावनावर ठेवली असून वारकरी मंडळी तेथें हंमेष भजन करितें. पंढरीहून परत येतांना येथें त्यांचा मुक्काम कार्तिक वद्य ९ स होतो. मोझे यांचेकडे परवापर्यंत जमीन होती पण ती आतां त्यांचेकडून गेली. मोझे यांच्या घराण्यांतला कृष्णा मोझे हा मुंबईस फूटवाल्यांकडे असतो.

(२) नावजी माळी व शिवजी कासार यांची लोहगावीं वस्ती असून शिवबा तर मोठा मातबर होता. शिवबा कासाराचा वाडा मोठा असावा असें त्याच्या पडक्या भिंतींवरून हिं दिसते. वाडा पश्चिमाभिमुख होता. ह्या वाड्यासमोर महादेवाचें दगडी लहानसें देऊळ आहे त्या देवळांत तुकोबा अनेकवार शिवजी बरोबर बोलत बसत.

शिवजी जवळ ५०० बैल होता व कथील, शिशें, भांडीं, पत्रें वगैरेंचा त्याचा मोठा व्यापार होता. तुकोबांचे वेळीं पुणवाडी कसबे लोहगावाखालीं होती. लोहगावचीं अनेक पडकी घरें, तेथला विस्तृत महारवडा, तेथील माळी व कासार यांचीं घरें व एकंदर गांवाचा डौल पाहतां लोहगांव तुकोबांच्या काळीं मोठा कसब्याचा गांव होता असें वाटतें. लोहगावाहून पायवाटेनें आळंदी २॥ कोस, देहू ७ कोस व सासवड ९ कोस आहे. लोहगावीं कासार, खांदवे, मोझे व माळी यांची वस्ती पुरातन आहे. माळी लोकांचीं ४ बुडे ह्म० वेतनें आहेत. १ भालेकर २ घोरपडे ३ गरुड व ४ भुकण.

(३) दोनशें वर्षांपूर्वींच्या कागदपत्रांत भुकण माळी विशेष सांपडतात व नांवजी हें नांवही क्वचित् सांपडतें. एका गांवकीच्या पत्रांत 'सदरहु कान्होजी रायेगडास महाराजापाशीं चाकरीस होता तो मरावयास गावीं आला' असें वाक्य आढळलें. तात्पर्य काय कीं नावजी माळी व शिववा कासार यांच्याही पूर्वीपासून माळी, व कासार यांची गांवांत वस्ती असून तुकोबांचे आजोळ घराणें जें मोझे त्यांची ही येथें वस्ती जुनाट आहे.

(४) गांवांत तुकोबांचें देऊळ आहे. ह्या लोहगांवाशिवाय तुकोबांचें असें स्वतंत्र देऊळ अन्यत्र कोठेंही नाहीं. ह्या तुकाराम-मंदिराची स्थापना गुंडोजीबावांचे शिष्य दरप्पा यांनीं केली आहे.

(५) पुणवाडीच्या बाजूनें गांवांत शिरतांच कासारविहीर लागते. ती मोठी भव्य असून रमणीय आहे. तिचे पाणी आज पिण्यासारखें गांवकऱ्यांनीं ठेविलें नाहीं.

पूर्व, पश्चिम व दक्षिण ह्या तीनही बाजूस तीन तीन कोनाडे असून ४०।५० ब्राह्मण संध्या करावयास बसतील अशी सुंदर चौफेर जागा विहिरींतच आहे. विहिरींत दक्षिणच्या बाजूस शिलालेख कोरला आहे. तो शके १५३४ मधील आहे, शिलालेखावर तागडीचें निशाण आहे. मुख्य मधला शिलालेख सुवाच्य आहे. बाजूची कांहीं अक्षरें लागत नाहींत.

॥ श्रीगणेशायनमाग्रकाळीकायेन्म (फुटले)
श्रीशाळीवाहन शके १५३४ परीध ,,
वींशंवशरे कारतीक वदी तीज आत ,,
र तदींनी सीउजी व काळोजी पीता केशो
जी माता रंभाई वंश थींटे शोमवंशी
कासार कसभे लोहोगावं श्रीरस्तुः

ह्या शिलालेखावरून सदर गांव शके १५३४ मध्य 'कसबे लोहोगांव' होता व त्या सालीं सीउजी व काळोजी कासार यांनीं सदर विहीर बांधली हें उघड दिसतें. सदरचा शिलालेख येथें दिला आहे त्याचा विशेष विचार येथें करीत नाहीं. पण वरील सर्व कारणांवरून तुकोबांचे लोहगांव हें च होय असें सर्वमतें ठरावें असें वाटतें.

## व्यंकटेशस्तोत्राची कविसमकालीन प्रत.

व्यंकटेशस्तोत्र हें अत्यंत लोकप्रिय स्तोत्र सर्वांस माहीत आहेच. ह्या स्तोत्राच्या कर्त्यानें च रचलेलें दुसरें संतमालिकास्तोत्रही अलीकडे उपलब्ध झालें असून त्याचा काळही निश्चित झाला आहे. संतमालिकास्तोत्राच्या शेवटीं:—

क्षयसंवत्सर आषाढ मासीं
सोमवार तृतीयेचे दिवशीं ।
पूर्णता आली ग्रंथासी
श्रोतीं सावकासी भोगिजे ॥१४६॥

अशी ओवी आहे. क्षय संवत्सर, आषाढ मास, सोमवार, तृतीया यांचा नीट मेळ पाहून रा. राजवाडे यांनीं सदर मालिकेचा रचनाकाल शके १६०८ हा मुक्रर केला आहे. आणि तो बरोबर दिसतो. मला एक व्यंकटेशस्तोत्राची २५० वर्षांची प्रत सांपडली आहे. तीवर 'संवत् १७२० माघ शु॥ १३ रविवार' अशी मिति दिली आहे. ही बहुधा लेखनाची मिति असावी. रचनाकाल कवीला द्यायचा असता तर त्यानें एखादी ओवी ग्रंथांतच रचून घातली असती. संवत् १७२० ह्मणजे शके १५८५. अर्थात् माझी प्रत शके १५८५ मधली आहे. कवीचें संतमालिकास्तोत्र शके १६०८ मध्यें झालें व व्यंकटेशस्तोत्र १५८५ त किंवा त्याच्या पूर्वीं नुक्तेंच तयार झालें असलें पाहिजे हे हि उघड आहे. ह्मणजे सदर कवी शके १५८५–१६०८ ह्या काळांत हयात होता असें झालें.

२ कवीचें नांव देविदास असें प्रसिद्ध आहे, परंतु रा. राजवाडे यांच्या संतमालिकास्तोत्रांत हें नांव देवदास असें आहे व मला सांपडलेल्या ह्या व्यंकटेश स्तोत्रांत ही देवदास असेंच आहे. सदर कवि व्यंकटेशाचा–विष्णूचा–भक्त असल्यामुळें त्यानें आपणांस देवदासच ह्मणविलें असलें पाहिजे हें उघड आहे. एकंदरीत कविनाम देवदास असें मुक्रर समजावयास हरकत नाहीं.

३ आतां लोकप्रचारांत असलेल्या प्रतांत व माझ्या ह्या कविकालीन प्रतींत थोडेसे पाठभेद आहेत ते दाखवितों.

ओवी प्रचलित पाठ.

१ वंदन भावें करितसे ।
५ महादोषांसी दाहक
७ जननीपरि त्वां पाळिलें
पितयापरी सांभाळिले ।
८ हें अलोलिक जरी मानावें ।
तरी जग हें सृजिलें आघवें ।
९ दिनानाथा त्रिदासाठीं ।
भक्तांसी रक्षिलें संकटीं ।
१० आतां परिसावी विज्ञापना ।
१४ कुचलियाचीं वृक्षफळें ।
मधुर कोठोनी असतील ।

खरा पाठ.

वंदन भावें करि तुझें ।
महादोषांसि होय धाक ।
जननि परि तुवा पाळिलें
पितियापरि सांभाळिलें ।
हे आलोलिक जरि मानावें ।
जग हें सृजिलें तुवां चि अघवें ।
दिनानाथ या त्रिदासाठी ।
भक्तासी रक्षीसी संकटि ।
आतां परियेसा माझी विज्ञापना ।
कुचलियाचें वृक्षफळें मधुरें ।
कोठोनियां आसतिल ।

४ देवदासाच्या वाणीवर ज्ञानेश्वरांचा संस्कार झालेला उघड दिसतो.

(श्री) नीच रातली रायासी ।
तिस कोण ह्मणेल दासी ।

१ ऐसी प्रार्थना करुनि देवदासा ॥५६॥ देवदास विनविश्रोतयां चतुरां ॥१०७॥

लोहो लागलिया परिसासी ।
पूर्व स्थिति मग कैची ॥ २३ ॥

---

ज्ञानेश्वरी अ० १८।१४०२
अगा प्राकृताही राया ।
आंगीं पडे जे धनंजया ।
तें दासिरुही कीं तया ।
समान होय ॥
(रा) गांविचे होते लेंडवोहळ ।
गंगेसि मिळतां गंगाजळ ॥

---

ज्ञानेश्वरी अ० ९।४५८
जैस तंव चि वहाळवोहळ ।
जंव न पवती गंगाजळ ।
(म) समुद्रें अगिकारिला वडवानळ।...२४
... ... ... ...
अंतरीं सांठविला तयानें ॥

---

ज्ञानेश्वरी १८।१४०१
वांचूनि सागराच्या पोटीं ।
वडवानळ शरण आला किरीटी ।
५ देवदास ब्राह्मणेतर-शूद्र- होता काय ?
तैसा कुजाति मी अमंगळ ।
परि तुझा ह्मणवितों केवळ ।...॥३५

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर**

---

## रामशास्त्री व त्यांचे वंशज.

पेशवाईतील प्रख्यात न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे सातार्‍या नजीकच्या क्षेत्रमाहुलीचे राहणारे. रामशास्त्रयांच्या पित्याचें नांव त्यांच्या वंशजांस सांगता येत नाहीं. माहुलीस खुद्द रामशास्त्रयांचा वंश नसून त्यांच्या भावाचा वंश आहे. माहुली हा गांव तेथील ब्राह्मणांस अग्रहार आहे. तेथील रामशास्त्रयांच्या हिश्शाचें इनामी उत्पन्न त्यांच्या वंशजांच्या हातीं नसून त्यांच्या भावाचे वंशज खातात. रामशास्त्री हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण.

रघुनाथ बाजीराव पेशवे ह्यांस नारायणराव पेशव्यांच्या खुनाबद्दल देहान्ताची शिक्षा सांगून शास्त्रीबोवा पुणें सोडून जे निघाले ते वाईजवळ कृष्णानदीच्या तीरीं रङ्गी आचार्य ह्यांचा इनाम गांव मुगांव येथें जाऊन राहिले. तें आपला सर्वकाळ ब्रह्मकर्मांत व ईश्वर-चिंतनांत घालवीत. तेथें त्यांनीं नदीस एक घाट बांधून त्या शेजारीं एक शिवालय बांधिलें आहे. सवाई माधवराव यांच्या कारकीर्दीत शास्त्रीबोवा फिरून पुण्यांत आले, व आपलें काम पाहूं लागले. रामशास्त्री शके १७११ सौम्यनाम संवत्सरीं कार्तिक शु. ३ तृतीयेस परलोकवासी झाले.

शास्त्रीबोवाबद्दल भारतवर्ष—मासिकांत त्या वेळीं मला समजलेली माहिती "जुन्या ऐतिहासिक गोष्टी" ह्या प्रकरणांत म्या प्रसिद्ध केली आहे.

त्यांच्या वंशजांची जी हकिकत मी देत आहे ती त्यांचे निपणतु गोपाळ गणेश शास्त्री प्रभुणे पेन्शनर असि. डे. एजुकेशन इन्स्पेक्टर हल्लीं राहणार मौजे पुजदें तालुका उमरावती प्रांत वऱ्हाड यांनीं सांगितलेली आहे. ह्यांचें वय हल्लीं ६२ वर्षांचें आहे.

रामशास्त्रयास गोपाळ नांवाचा एकच मुलगा होता; त्यास लोक गोपाळशास्त्री ह्मणत. वडिलांच्या नांवावरून त्यास शास्त्री ह्मणत परंतु शास्त्राची व त्यांची मुळींच ओळख नव्हती. पेशवाईची अखेर झाल्या-

वर एल्फिन्स्टन साहेबांनीं हे रामशास्त्र्यांचे वंशज ह्मणून सालिना ३२०० तीन हजार दोनशें रुपयांची तहाहयात नेमणूक करून दिली. इ. स. १८५० त ते वारल्यावर ही नेमणूक बंद झाली.

गोपाळशास्त्र्यास रामशास्त्री नांवाचा एक मुलगा व बयाताई नांवाची एक मुलगी होती. गोपाळशास्त्र्यांची बायको ही वाई-कर देशपांडे पंतराजाज्ञा यांच्या घराण्यातली होती. हिच्याच पोटीं झालेली हीं अपत्यें होत. प्रसिद्ध रामशास्त्र्यांचे हे नातू रामशास्त्री आपल्या आजास शोभणार असे विद्वान होते. ह्यास बाबाशास्त्री असेही ह्मणत. रामशास्त्री ऊर्फ बाबाशास्त्री आणि भाऊसाहेब मुजुमदार-आपले इतिहास संशोधक श्री० आबासाहेब मुजुमदार यांचे आजे हे दोघे मावसभाऊ होते. बाबाशास्त्र्यांची बायको ही पुण्यांतील बापूसाहेब पारसनीस यांची कन्या होती. तिचे माहेरचें नांव साळूबाई व सासरचें नांव लक्ष्मीबाई. बाबाशास्त्र्यांची बहीण बयाताई ही निरा-नरसिंहपुरास जपे ह्यांच्या घरीं दिली होती. हे रामशास्त्री ऊर्फ बाबाशास्त्री आपल्या तीर्थरूपांच्या ह्मणजे गोपाळशास्त्र्यांच्या देखत परलोकवासी झाले. त्यांस गणेश (वडील) व नारायण असे दोन मुलगे होते. ह्या मुलांची आई लक्ष्मीबाई हिचें व सासरे गोपाळशास्त्री यांचें पटेना. हे आडनाडाचें शास्त्री अशिक्षित व आडदांड असत. ह्यांनीं श्रोत्री आडनावाचे एक कारभारी नेमले होते ते त्यांचे उत्तेजक होते. गोपाळशास्त्र्याच्या ह्या अशा गुणांनीं सुनेचे व तिच्या दोघां मुलांचे फार हाल होऊं लागले. शेवटीं हें सासऱ्या सुनेचें भांडण सरकारांत जाऊन, सुनेस सालीना ३०० रुपये नेमणूक सासऱ्याच्या पेनशनातून देण्याची ठरली. त्यावेळीं गोपाळशास्त्र्याची बायको वारली होती.

वर लिहिलेल्या ३०० रुपयांच्या नेमणुकी शिवाय ४०० रुपयांचे उत्पन्न तिच्या माहेरचें बाबाशास्त्र्यास वरदक्षिणा ह्मणून पारसनिसांनीं दिलेले होतें तें त्यावर व प्रसंगोपात आपले दागिने मोडून व रामशास्त्र्यांच्या वेळचे पोथ्या पुस्तकें व कागदपत्र विकून आपला निर्वाह चालविला होता. बाबाशास्त्री वारल्यावर पारसनिसांनी आपला कारकून दादा दातार नावाचा लक्ष्मीबाई व तिचीं मुलें ह्यांची व्यवस्था पाहण्या करितां दिला. त्याचें जेवणखाण राहणे वगैरे लक्ष्मीबाई कडेसच असे. इतके होई पर्यंत बाबाशास्त्र्यांचे दोघे मुलगे बरेच मोठे झाले होते. परंतु त्याना सुशिक्षित करण्याचा प्रयत्न कोणीच केला नव्हता त्या मुळें तें उनाड निघाले. ह्यांचे आजे गोपाळशास्त्री वारल्यावर मध्यंतरीचे त्यांच्या नेमणुकीचे पैसे ह्या दोघास मिळाले. व ह्या दोघा भावास तहाहयात प्रत्येकास ४४५ चारशें पंचेचाळीस रुपये नेमणूक सरकारांतून ठरली. हे दोघेही भाऊ काही काळ खेरीज करून मरेपर्यंत एकत्रच होते. वर लिहिल्या प्रमाणें नेमणुका मिळण्याच्या कामी तात्या भावे–भावेस्कूलच्या स्थापकांचे वडील-ह्मणून खटपट करणारे होते त्यांनीं २॥ हजार रुपये घेतले.

आईच्या माहेरचे उत्पन्न मिळालेले होते तेच लावून देऊन ह्यांनी आपल्या मामाकडून

कर्ज काढले. पुढें मामा पारसनीस ह्यांनीं दरसाल ५० रुपये देण्याचे ठरवून तें उत्पन्न खालसा केलें. उत्पन्नाची सनदही ह्यानी मामांच्या हवालीं केली पुढें पारसनिसांची ४ घरें झाली त्यांचे सरंजामी उत्पन्न ही कमी झाले. ५० रु. देण्यासही टाळाटाळ होऊं लागली मग ह्यानीं ही मागण्याचें टाकून दिले.

मागें सांगितलेली जप्यांचे घरी दिलेली ह्यांची मावळण ह्मणजे आत बयाताई व हे दोघे—'गणेश व नारायण' हे काशीयात्रेस गेले व तिकडे त्यानी खर्चही पुष्कळ केला.

गणेशास रामचंद्र व गोपाळराव—हल्लीं लिहिलेली सर्व हकीकत सांगणारे—असे दोन मुलगे झाले. व नारायणास केशव एकच मुलगा झाला. हे तिघे हल्लीं हयात आहेत.

बाबाशास्त्र्यांचे मुलगे गणेश व नारायण ह्यांनीं कर्ज फार केलें. त्यामुळें थोरले प्रख्यात रामशास्त्री ह्यास श्रीमंत पेशवे सरकारानी दिलेला वाडा होता तो त्यांनीं १०००० दहा हजार रुपयास सन १८६४ इसवीत विकून टाकला. हल्ली ज्याला कबूतरखाना ह्मणतात त्याच्या व ह्या वाड्याच्या हद्दीवर मोठें कुसू होते. हल्लीची रमणबाग व तिच्या जवळचीं घरें व जागा हीं त्या वाड्या पैकीं होत. वाडा तीन मजली तीन चौकाचा होता. कबूतर-खान्याच्या जागेत विहीर असून तेथें सर्व बागाईत होतें. वाड्याच्या विक्रीचे पैसे कर्जातच मोडून दिले.

असें कफल्लक झाल्यावर मौजे राक ता. पुरंदर येथें ह्या दोघास-गणेश व नारायण ह्यास-त्यांच्या मातुश्रीसह व बायकामुलांसह घेऊन आपल्या ही मुलाबाळांसह वर सांगितलेले दादा दातार गेले. हीं सर्व माणसें एका कुटुंबातल्या प्रमाणें होतीं. दातार ह्यास मुलगा मुळीच नव्हता मुलीच होत्या. त्याजकडे राक येथील पुरंदरच्या देशमुखाची शेती गहाण होती, तिचे उत्पन्न ह्या दोघांच्या नेमणुका व तेथें कांहीं मिरास जमीन घेतली तिचें उत्पन्न ह्यावर निर्वाह करून हो माणस तेथें होतीं. हल्लीं नारायणाचा मुलगा केशव हा मिराशीचें उत्पन्न खातो.

गणेश १८८४ इ त वारला. नारायण प्रपंच पाहूं लागला तो गणेशाच्या मुलाकडे पाहत नसे. लक्ष्मीबाई १८७० च्या सुमारास वारली. गणेशाच्या मुलाकडे लक्षपूर्वक पाहणार कोणी नव्हते त्यांच्या मनांत शिकण्याचे पुष्कळ होते पण काही जमेना शेवटीं तीं दोन्हीं मुलें राम व गोपाळ ही वऱ्हाडांत आजी मरण्यापूर्वी च एका आप्ताकडे गेलीं. तेथून नागपुरास गेलीं. तेव्हां थोरल्याचे वय २२ व धाकट्याचें २० होते. धाकट्याच्या इंग्रजी २ इयत्ता झाल्या होत्या. सांप्रतचे रा. ब. वामनराव कोल्हटकरांच्या आश्रयानें शेवटी धाकटे गोपाळराव म्याट्रिक इ. १८७४ त झालें. कॉलेजमध्ये ही कांहीं दिवस होते. अखेरीस नौकरी शाळाखात्यांत धरली व असिस्टंट डेपोटी झाले. हल्लीं पेन्शनर आहेत ह्यास एक मुलगी आहे पुत्र संतती नाही. ह्यांचे बंधूसही पुत्र संतती नाहीं व चुलत बंधु केशवराव ह्यास ही संतती नाहीं तात्पर्य रामशास्त्र्यांच्या वंशांत हल्लीं पुत्रसंतती मुळींच नाहीं. हल्लीच्या रामशास्त्र्यांच्या वंशजाजवळ जुना कागदाचा एक पुरजाही नाहीं!

अशा प्रकारच्या हकीकती पुष्कळांच्या असतील परंतु ह्या हकीकतीस ती रामशास्त्रयांच्या वंशजांची आहे ह्मणून महत्व आहे. त्यांचे आप्त सोयरेधायरे ह्यांची माहिती आपणास असल्यापासून इतिहाससंशोधनास ही मदत होण्यासारखी आहे.

हल्लींची हकीकत सांगणारे गोपाळराव ऊर्फ भाऊसाहेब हे सुस्वभावी निस्पृह व सत्यवक्ते असे आहेत. ह्यांचें दुसरें कुटुंब आहे. मुलगी आहे ती प्रथम कुटुंबाची आहे. दुसरें कुटुंब पुणें येथील आठघरे वैद्य यांच्या घराण्यांतील आहे. त्यांचे मेहुणे गोविंद माधव वैद्य ( आठघरे ) हे हल्लीं सिम्ल्यास ४०० रुपये पगारावर वॉर ऑफिसचे सुपरिंटेंडेंट आहेत.

गोपाळराव यांनीं ज्यास आईबाप नाहींत अशा एका गरीब मुलास आश्रय देऊन त्यास ग्राज्वेट केलें आहे. व आपली एकुलती एक सुशिक्षित कन्या त्यास दिली आहे.

वर लिहिलेली हकीकत कळण्याकरितां खालीं वंशावळ दिली आहे.

**रामशास्त्री न्यायाधीश**
जन्म...मृत्यु शके १७११
|
गोपाळशास्त्री
|
भयाताई (कन्या) रामशास्त्री ऊर्फ बाबाशास्त्री
|
गणेश (वडील) — नारायण(धाकटा)
नारायण(धाकटा) | केशव (विद्यमान)
गणेश (वडील) |
रामचंद्र (विद्यमान) — गोपाळ (विद्यमान)
|
जन्म १८५२ जुलई ता.९ पेनशन १९०९ जुलई १७

भारत इतिहास संशोधक मंडळा पुढें ठेविलें ता. मे १९१५.

**कृष्णाजी विष्णु आचार्य**
**कालगांवकर.**

---

## जगमित्र नागा

जगमित्र नागा हा कवि बहुतेक सर्व संतमालिकांत उल्लेखिला आहे. महिपति बावनीं याची कथा सांगतानां हा सर्वांस समभावानें लेखी व एके वेळीं तर यानें एका वाघास कान धरून वागवलें ह्मणून यास जगमित्र नागा अथवा ' नागा जगमित्र ' असें लोक ह्मणूं लागले असें वर्णन केलें आहे. या वरून या कविचें नांव ' नागा ' अथवा नागेश असावें; व त्याच्या आचरणावरून त्याला ' जगमित्र ' हें उपपद किंवा पदवी लोक लावूं लागले असें होतें.

पण खरा प्रकार असा आहे कीं या साधुपुरुषाचें मूळ नांव जगमित्र. हा ' जगमित्र राहे प्रतिष्ठानी । द्रव्याचा व्यवसाय करुनी ' इतकेच नव्हे तर त्याचा बोलबाला चांगला असून तो ' लक्षाधिपती होता धनी ' असें याचे एक चरित्रकार सांगतात. याची वाढती कमान असतां, यास एकाएकीं विपरीत काळ आला. जवळ माया होती ती सर्व गेली. याचे दिवाळें निघालें. व आप्त इष्ट होते ते पारके झाले तेव्हां हा देशोधडीस लागला. व संकटकाळीं सर्वांस समाधान देणारें असें जें ईश्वराचें भजन त्यांत दृढ

हळू आनंद पावता झाला. पुढें पंढरीची हा वारी करूं लागला व पांडुरंगाचा दृष्टांत झाल्यावरून हा 'नागेश' उर्फ 'नागस्वामी' स शरण गेला, अर्थात यानंतर यानें आपल्या नांवापुढें आपल्या गुरूचें नांव लावलें. व आपणास जगमित्र नागा असें ह्मणवूं लागला. याचीं पदें व अभंग अगदीं क्वचित् आढळतात. पण आढळणाऱ्या प्रत्येकांत कांहींतरी चमत्कृति असते. नमुन्यासाठीं दोन अभंग येथें देतों.

१ अग्नि जाळी तरी । न जळेचि प्रल्हादु ।
हृदयीं गोविंदु । ह्मणोनियां ।
अग्नि जाळी तरी । न जळती गोपाळू ।
हृदयीं देवकी बाळू । ह्मणोनियां ।
अग्नि जाळी तरी । न जळती पांडव ।
हृदयीं वसुदेव । ह्मणोनियां
अग्नि जाळी तरी । न जळे हनुमंतू ।
हृदयीं सीताकांतू । ह्मणोनियां ।
अग्निजाळी तरी । न जळे बिभीषणाचें घर ।
हृदयीं सीतावर । ह्मणोनियां ।
जगमित्र नागा न जळे । जरि अग्नि जाळी ।
हृदयीं वनमाळी । ह्मणोनियां ।
२ भीष्म भक्त पडला । भारतीये रणीं ।
गोविंदे निर्वाणीं । भेटी दिली ।
कर्ण वीदारला । अर्जुनाचे बाणी ।
गोविंदे निर्वाणी । भेटी दिली ।
हरिश्चंद्र वाहतां । डोंबाघरीं पाणी ।
गोविन्दें निर्वाणी । भेटी दिली ।
राजा परिक्षिती । मरणाचे आसनीं ।
गोविन्दें निर्वाणी । भेटी दिली ।
जगमित्र नागा ह्मणे । गोविंद धरा मनीं ।
तेणें तुह्मी त्रिभुवनी । सरते व्हाल ।

येथें एक प्रश्न असा कीं हे नागेश किंवा नागस्वामी ते कोण? प्रसिद्ध वडवाळ सिद्ध नागेश कीं काय? वडवाळ सिद्ध नागेशाचे सिद्धराम, हरिनारायण, वगैरे शिष्यमंडळ आपल्या थोड्या फार कृतीसह महाराष्ट्रास माहित आहेत.

जगमित्राचा समाधि काल ह. भ. प. भिंगारकरबुवा कथामृतसार या ग्रंथाचे आधारें शके १२५२ कार्तिक शु० ११ असा देतात.

**विनायक लक्ष्मण भावे.**

---

## बाळाजी विश्वनाथ भट सरसुभेदार.

शक १६२१.

चांवळीकर सरनाईक यांचे दफ्तरांत व पुणें येथील खोले यांचे दफ्तरांत पेशव्यांचे मूळ कर्ते पुरुष जे बाळाजी विश्वनाथ भट ऊर्फ बाळाजीपंतनाना यांच्या सरसुभेदारीसंबंधाचे चार कागद नुकतेच गेल्या वर्षींच्या संशोधनानें उपलब्ध झाले आहेत. त्यांत दोन पत्रें चांबळीकरांकडील आहेत; व दोन खोल्यांकडील आहेत. चांबळीकरांकडील पत्रें इहिदे मया अलफांतील आहेत; व खोल्यांचीं मया अलफांतील आहेत. खोल्यांचे पत्रांत उल्लेख येणें प्रमाणेः—

राजश्री बालाजी विश्वनाथ सरसुबेदार व कारकून वर्तमान व भावी सुबे प्रांत पुणें.

चांवळीकरांच्या एका पत्रांत असा उल्लेख आहेः—

राजश्री बालाजी विश्वनाथ
नामजाद सरसुबा पुणे

चांबळीकरांच्या दुसऱ्या पत्रांत असा उल्लेख आहे:—

राजश्री बालाजी विश्वनाथ
नामजाद सरसुभा पुणें

दुसरें पत्र निळकंठ मोरेश्वर प्रधान यानें लिहिलेलें आहे. ह्या चारी पत्रांचा अर्थ असा होतो कीं, शक १६२१ त बाळाजी विश्वनाथास पुण्याची सरसुभेदारी मिळून दोन चार वर्षे गेलेलीं असावीं. ह्मणजे शके १६१८ पासून केव्हां तरी बाळाजी विश्वनाथ पुण्याचा सरसुभेदार असावा[1]. शेखदार, सरफदार, कमावीसदार, सुभेदार, व सरसुभेदार अशी परंपरा त्या वेळेस होती. इतक्या पायऱ्या चढून जाण्यास बहुत वर्षे लागलेलीं असावीत. बाळाजी विश्वनाथ कोंकणांतून जो घांटावर आला तो एकदम सरसुभेदार झाला असलें गैरवाका विधान करण्यास कोणी हि मनुष्य धजणार नाहीं. ह्या पांची पायऱ्या चढून जाण्यास कमींत कमी २०।२५ वर्षे लागावींत ह्मणजे बाळाजी विश्वनाथ घांटावर शक १६०० च्या आगे मागें केव्हां तरी आलेला असावा ह्या संबंधीं पत्रें व उल्लेख रा. राजवाडे यांनीं 'मंडळा' पुढें मांडून दोन चार वर्षे झालेलीं आहेत. त्यांचा च अनुवाद प्रस्तुत पत्रांत हि आहे. बाळाजी विश्वनाथ प्रथम घाटावर आला त्यावेळीं त्याचें वय २५।३० वर्षांचें असावें. पुढें वीस पंचवीस वर्षे हुद्देदारी केल्यावर ५०।५५ च्या बेतांत तो सरसुभेदारीच्या पदास पोंचलेला असावा. तदनंतर पंधरा वर्षांनीं मुतालीक, सेनाकर्ता व मुख्य प्रधान ह्या तीन पदांचें आक्रमण बाळाजी विश्वनाथानें केलें. मुख्य प्रधानकी ज्या वर्षी मिळाली त्या वर्षी बाळाजी विश्वनाथाचें वय ६५ च्या खालती नसलें असलें पाहिजे. ह्मणजे प्रधानकी मिळण्याचे वेळेस बाळाजीपंतनाना बरे च वृद्ध व पोक्त झालेले होते. आख्यायिका सांगतात कीं, बाळाजीपंतनानांना घोड्यावर बसतांना दोहीकडे दोन हुजरे स्वारीचा तोल संभाळण्यास लागत असत. वार्धक्यामुळें व शरीराच्या स्थौल्यामुळें तोल संभाळण्यास हुजरे लागावेत ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. हुजऱ्यांच्या साहचर्यावरून बाळाजीपंतनानांना घोड्यावर बसतां येत नव्हतें असा जो सिद्धांत कित्येक लोक काढतात तो मात्र वाजवी दिसत नाहीं. तारुण्यांत बाळाजीपंतनाना चांगले घोडेस्वार असतील.

**पां. न. पटवर्धन.**

---

लेखांक १. अस्सल-मोडी

श्रीशंकर

अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य
राजश्री बाळाजी विस्वनाथ नामजाद
सरसुभा पुणे गोसावी यांसी

शेवक निळकंठ मोरेश्वर प्रधान नमस्कार सुा इहिदे मया अलफ राजश्री निळकंठराऊ पुरंधरकर यांचा इनाम मौजे चावळी ता कऱ्हेपठार कास टका एक आहे त्यास तुह्मी तिजाइचा तगादा लाऊन रा गणेश शंकर निळकंठराऊ याजपासून साडेसा रुपये घेतले पुढे तिशा रुपयाचा रोखा केला आहे ह्मणून वर्तमान विदित जाले ऐशास या लोकांचे चालवणे अगत्य लागते गुदस्ता हि तिजाई

[1] बाळाजी विश्वनाथांचा सरसुभेदारीचा शिक्का म. इ. सा. खं. १८, पृ० ८४ वर दिलेला आहे.

घेतली नाही कोणे हि गोस्टीचा उपसर्ग लागो दिल्हा नाही हे तुह्मास कळले आसोन हाली तीनशा रुपयाचा रोखा तुह्मी काये ह्मणून केला याउपरी रोखा केला असलि(या) तो मना करणे साडेसा रुपये घेतले ते फिरा-ऊन देणे मागती बोभाट येऊं न देणे साला-बादप्रमाणे चालवणे नवी कानू न करणे छ २० जमादिलावल आज्ञाप्रमाण

लेखन
सीमा समु
ल्लसति

सुरु सुद

लेखांक २ अस्सल–मोडी

श्री

अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री बाळाजी वीस्वनाथ नामजाद सरसुभा पुणें गोसावी यांसि

सेवक रामचंद्र नीलकंठ नमस्कार सुहूर सन इहिदे मया व अलफ राजश्री निलकंठ-राउ पुरंधरकर याचा इनाम मौजे चांबली ता। कन्हेपठार कास ठका एक आहे त्यास तुह्मी तिजाईचा तगादा लाऊन रा। गणेश शंकर नीलकंठराऊ याजपासून साडसा रुपये घेतले पुढे तिशां रुपयांचा रोखा केला आहे ह्मणून वर्तमान विदित जाले आशास या लोकांचे चालवावें लागतें गुदस्ताही तिजाई घेतली नाही कोणेही गोष्टीचा उपसर्ग लागो दिला नाहीं. हे तुह्मास कळले असोन हालि तिशा रुपयाचा रोखा तुह्मी काय ह्मणून केला याउपरी जो रोखा केला असेल ते मना करणे साडसा रुपये घेतले आहेत ते फिराउन देणे मागता बोभाट येऊ न देणे जाणीजे छ २० जमादिलावल साला बाद प्रमाणें चालविणें नवीन कानू न करणं निदेश समक्ष

लेखन
सीमा समु
ल्लसति

सुरु सुद

लेखांक ३ श्री अस्सल–मोडी

देव

राजश्री बालाजी विस्वनाथ सरसुवेदार व कारकुन व वर्तमान व भावी सुब प्रात पुणें गोसावीयांसि

छ। अखंडितलक्ष्मी आलकृत राजमान्य सेवक रामचंद्र निलकठ अमात्य नमस्कार सुहुर सन मया व अलफ श्री स्वामी वास्तव्य मौजे चिचवड यासी चिचवडा आसपास गाव प्रातमजकूरचे आहेत त्या गावीहून दरसाला पनास हजार गवत सीस्त करून देवविली आहें येविशीं राजश्री कैलासवासी छत्रपती स्वामींची सनद प्रात मजकुरास सादर आहें त्याप्रमाणें साला-बाद चालत आहे तेणेप्रमाणे चालवावयाची आज्ञा असे तरी सादरहू पंनास हजार गव-ताची सिस्त गावगना चिचवडा आसपास आहे तेथें करून देऊन चालवीत जाणें वर-कड इनाम आहे तैसे च इनाम दाखल हें हि असे दर हरसाला ताजा सनदेचा उजूर न करणें या पत्राची प्रती लेहोनु घे-उन असल पत्र परतून श्री स्वामीजवेली

देणें जाणीजे छ १० मोहरम निदेश समक्ष

लेखन
सीमासमु
ल्लसती

श्री रामचं
द्र चरण नील
कंठ सोनदे
व शरण

बार सुरु सुद बार

---

श्री

लेखांक ४ अस्सल-मोडी

देव

राजश्री बालाजी विस्वनाथ सर सुबेदार व कारकून वर्तमान व भावी सुबा प्रात पुणे गोसावी यांसी

छ अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक रामचंद्र निलकठ आमात्य नमस्कार सुा मया व अलफ श्री स्वामी वास्तव्य चिंचवड यांस इनाम नूतन मौजे रावेत ताा हवेली प्रांत मजकूर पैकी जमीन चावर १ एक राजश्री छत्रपती स्वामीने देऊन सनद सादर केली आहे त्या प्रमाणें सदरहू इनाम तुह्मास कुलबाव कुलकानू हाली पटी व पेस्तर पटी सहित चालवावयाची आज्ञा केली असे तरी उतरोतर यास व याचे अवलाद अफलाद चालवीत जाणे नवीन पत्राचा आक्षेप करीत नव जाणे या पत्राची प्रती लेहोनु घेऊन असल पत्र परतून भोगवटियास

देणे छ १० सावान निदेश समक्ष

लेखन
सीमा समु
ल्लसति

श्री रामचं
द्र चरण नील
कंठ सोनदे
व शरण

बार सुरु सुद बार

---

## ज्ञानेश्वरीचें अर्वाचीकरण

१ आपल्या मंडळाच्या व मंडळांतील सभासदांच्या संग्रहास ज्या पत्रास पाऊणशे ज्ञानेश्वरीच्या प्रती आहेत, त्यांची कालानुक्रमवार मांडणी केली ह्मणजे ज्ञानेश्वरी भाषेंतील रूपांचें उत्तरोत्तर होत चाललेलें अर्वाचीकरण दृष्ट्युत्पत्तीस येतें. रा. राजवाडे यांनीं संपादिलेली प्रत सर्वांत जुनी आहे. कारण तींतील रूपें चांगदेवाच्या शक ११२८ तील शिलालेखांतील किंवा पंढरपूर येथील शक ११८९ तील शिलालेखांतील रूपां सारखीं येथूनतेथून आहेत. तदनंतरच्या प्रतींत रूपांत आस्तेआस्ते फेरफार झाला असलेला दिसतो. प्रायः नक्कलकार स्वकालीन रूपें आपण केलेल्या प्रतींत ज्ञानतः किंवा अज्ञानतः नमूद करतो. अज्ञानतः जेथें अर्वाचीकरण झालेलें आहे, त्या संबंधानें आज विशेष कांहीं सांगत नाहीं. परंतु मुद्दाम, ज्ञानतः जेथें अर्वाचीकरण झालेलें आहे किंवा केलेलें आहे, अशा एका प्रतीकडे आपलें लक्ष्य जावें या करितां ती प्रत आपल्या पुढें ठेवितों. पैठणाजवळील

शेवगांवास तेथील जोश्यांच्या येथील पोथ्यांच्या ढिगांत ज्ञानेश्वरीच्या अकराव्या अध्यायाची एक त्रुटित प्रत सांपडली. तींत जुनीं रूपें मुद्दाम खोडून अर्वाचीन रूपें मुद्दाम घातलेलीं आहेत. जुनीं रूपें असलेल्या एका जुन्या पोथी वरून ही प्रत मूळ तयार झाली. नंतर ज्या मंडळांत हा प्रतवाला ज्ञानेश्वरीचा पाठ श्रवण करण्यास जाई, त्यांतील महंताच्या अर्वाचीन प्रतीतल्याहून आपल्या जुन्या पोथींतील पाठ जुनाट आहेत, असें प्रतवाल्या गृहस्थाला दिसलें व महंताच्या अर्वाचीन पोथी वरून आपल्या जुन्या पोथी वरून उतरलेल्या प्रतीतील जुने पाठ त्यानें महंताच्या अर्वाचीन पोथीतील अर्वाचीन पाठा प्रमाणें अर्वाचीन केले. पाठ अर्वाचीन करतांना, ह्या गृहस्थानें पिवडीचा उपयोग केला आहे. जेथें कान्हा, मात्रा, किंवा उकार काढावासा वाटला, तेथें तेथें पिवडी लावून महंताच्या पाठाच्या पोथींतल्या सारखे आपल्या जुन्या पोथी वरून उतरलेल्या प्रतीतील पाठ ह्या गृहस्थानें जाणूनबुजून मुद्दाम अर्वाचीन केले आहेत. पैकीं कांहीं पाठ उदाहरणार्थ, नमूद करतों. जुन्या पाठा करितां राजवाड्यांनीं संपादिलेली प्रत घेतली आहे व अर्वाचीन पाठाकरितां कुंट्यांची प्रत घेतली आहे व ह्या दोहोंतील पाठांशीं शेवगांव येथील प्रस्तुत प्रतींतील पाठ तोलून दाखविले आहेत.

| ओंवी | राजवाडेज्ञानेश्वरी | शेगावीप्रत | आधुनिक कुंटे साक्रे |
|---|---|---|---|
| १ | एया } | या | या |
| ,, | यया } | | |
| ,, | दोहीं | दोहिं | दोहिं |
| २ | जेथ | जेथें | जेथ |
| ,, | शांताचेया | शांताचिया | शांताचिया |
| ,, | पाहुणेरा | पाहुणरा | पाहुणेरा |
| ३ | वऱ्हाडियां हिं | हिं नाहीं गाळली आहे. | हि |
| ,, | सुखासनीं | सोकासनि | सुखासनीं |
| ४ | शांताद्भुत | शंतअद्भुत | शांताद्भुत |
| ,, | घेयावें | घयावे | घ्यावे |
| २३ | रानिचेयां | राणीचेयां | रानींचिया |
| २५ | तेयांतें | तयांतें | तयांतें |
| ४१ | तेयांतें ( चरण ३ ) | तेया | तयातें |
| ४६ | जेया | जया | जया |
| ७५ | उकलतेयां | उकलतया | उकलूनियां |

| | | | |
|---|---|---|---|
| ७६ | आड होती | आई होती | आडहोती |
| ८४ | जलसेनाचिया | जळशेंनाचया | जळशयनाचिया |
| १११ | किरू | कीर | कीर |
| ११५ | गाजौनि | गाजोनि | गाजोनि |
| १४६ | जेया | जया | जया |
| ,, | पहावेया | पहावया | पाहावया |
| ,, | धात्रेया | धात्रया | धातया |
| १५४ | येया | यया | यया |
| १६१ | बोवांतां | बोलतबोलता | बोलत (सा) |
| १९३ | वरिखाकालिं | वरुषाकालि | वर्षाकाळीं ( सा ) |
| २०७ | वेन्हीं | वेन्हि | वरी |
| २२३ | शयानु | —- | शयालु |
| २३५ | देशकु | दशकु ( २४० ) | दशकु ( २३९ सा) |
| | | | दशक ( कु ) |

एकंदर २७ उदाहरणें दिलीं आहेत, पैकीं दोन चार पाठां संबंधानें चार शब्द टीकेचे लिहितों.

( १ ) पहिल्या ओंवींत या व यया अशीं दोन रूपें प्रतकारानें दिलीं आहेत. जुनें रूप एया होतें. यया हि जुनें रूप आहे. एया हें एतत् पासून निघालें आहे व यया हें अदस् पासून निघालें आहे. संनिकृष्ट अर्थ दर्शवावयाचा असल्यामुळें एया हें रूप इष्ट व युक्त आहे. परंतु, प्रतकाराला एया, व यया यांतील भेद न कळल्या मुळें, त्यानें महंताच्या पोथींतील यया हा पाठ शुद्ध म्हणून घेतला आहे.

( २ ) तेया व जेया, हीं रूपें महंताच्या पोथींत नव्हतीं; सबब जेथें जेथें हीं रूपें मूळ जुन्या पोथींतून नकलेंत उतरलीं गेलीं तेथें तेथें तया व जया अशीं अर्वाचिन रूपें पिवडीनें एकार खोडून टाकून ठेविलीं आहेत. ही शुद्धि स्पष्ट दिसते.

( ३ ) चौथ्या ओंवींत जुना पाठ घेयावें असा आहे. त्याचें शेगावी पोथींत घयावें असें शुद्धीकरण केलेलें आहे व ह्या घयावें ह्या मध्यकालीन रूपावरून कुंटे व साकरे यांच्या प्रतींत घ्यावें असें अगदीं अर्वाचीन रूप साधलेलें आहे. घ वरील मात्रा पिवडीनें खोडलेली नामी दिसते.

(४) १४६ ओवींत पहावेया असें जुनें रूप आहे. तें खोडून व एकारावर पिवडी लावून पहावया असें अर्वाचीन रूप केलें आहे. कुंट्यांच्या प्रतींत हें च रूप आहे.

(५) १६१ व्या ओंवींत जुनें रूप बोवांतां हें पौनःपुन्यवाचक धातुरूप आहे. तें न आवडून बोलतबोलता असें रूप पोनःपुन्याकरितां योजिलेलें आहे. त्याचें पुढें कुंट्यांच्या प्रतींत बोलत असें अगदीं अर्वाचीन विपरिणमन झालेलें आहे.

(६) १९३ ओवींत जुनें रूप वरिखा होतें त्याचें शेगावीं प्रतींत वरुखा झालें व कुंट्यांच्या प्रतींत शुद्ध संस्कृत वर्षा झालें.

(७) २२२ व्या ओंवीचा मूळ जुना पाठ होता त्यांत शयानु असा शब्द होता. कुंटे व साकरे प्रतींत त्या शब्दा ऐवजीं शयालु असा शब्द घातलेला आहे. आतां सर्वांना माहीत च आहे कीं, शयानु व शंयालु या शब्दांच्या अर्थांत भेद आहे. शयानु हा शब्द शयान ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. शयान ह्मणजे निजणारा. आणि शयालु ह्मणजे झोपाळू. प्रस्तुत प्रकरणीं झोपाळू हा अर्थ अयुक्त आहे. नुसता निजणारा, निजलेला असा अर्थ विवक्षित आहे

( ८ ) २३५ व्या ओवींत मूळ पाठ देशकु असा लिहिलेला होता. तो खोडून गुरूच्या पोथींतील अर्वाचीन पाठ घेऊन द वरील मात्रा काढून दशकु असा बनविलेला आहे. देशक हा शब्द या असंस्कृतज्ञ गुरूला व शिष्यांना कळत नाहींसा झाला होता. दशक हा शब्द दहा या अर्थी या लोकांना माहीत होता; देशक या शब्दाचा अर्थ माहीत नव्हता. सबब दशक हा सहज समजण्या सारखा शब्द या बिचाऱ्यांनीं पसंत केला. देशक या शब्दाचा अर्थ सूर्य असा आहे. व तो च प्रस्तुत ओंवींत अत्यन्त समर्पक आहे.

असे रूपांचे अपभ्रंश व शब्दांचे अपभ्रंश आधुनिक ज्ञानेश्वरींत सहस्त्रावधि आहेत.

खं. चिं मेहेंदळे.

---

# शिकंदर व हिंदुस्थान.

मॅकेडोनिआच्या इतिहासप्रसिद्ध शिकंदर बादशहानें इ. स. पू. ३२६ व्या वर्षी पंजाब प्रांतावर वायव्येकडून स्वारी केली. असें आपणास ग्रीक इतिहासकार सांगतात या प्रसंगाचा आपल्या देशांत ब्राह्मण, बौद्ध अथवा जैन ग्रंथांत मुळीच उल्लेख सांपडत नाहीं, तेव्हां आपणास ग्रीक लोकांनीं लिहिलेल्या वृत्तांतावर व त्यांनीं जतन केलेल्या पुराव्यावर सर्वस्वीं अवलंबून रहावें लागते.

शिकंदराच्या स्वाऱ्यांचा व जीवनक्रमाचा वृत्तांत तत्कालीन लेखकांनीं लिहून ठेवलेला होता ह्याच्यापैकीं बहुतेक जण त्याच्या बरोबर स्वारींत फिरत असल्याकारणानें, त्यांनीं लिहिलेल्या गोष्टी त्यांच्या नजरेसमोर घडलेल्या होत्या. पण ह्यानीं वर्णिलेला अव्वल प्रतीचा तत्कालिन पुरावा सध्यां अस्तित्वांत नाहीं. शिकंदराविषयींची आपली माहिती दुय्यम प्रतीची आहे. व ही माहिती ज्या पांच लेखकांच्या आधारें जमविलेली आहे, ते लेखक व त्यांचे वृत्तांत शिकंदरानंतर ३०० पासून ६०० वर्षानंतर लिहिलेले आहेत. ह्या इतिहास साधनाविषयीं आपण हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, अस्तित्वांत असलेला पुरावा एकांगी व निकृष्टप्रतिचा आहे, तत्कालिन नाहीं. आतां ही, गोष्ट खरी आहे कीं, हा पुरावा तत्कालीन पुराव्यावरूनच लिहिलेला आहे, ह्मणून तो ठिकठिकाणीं विश्वसनीय आहे. पण तत्कालिन पुराव्यांत चुका, फुगवून लिहिलेलीं वर्णनें, व दंतकथा पुष्कळ होत्या असें स्ट्रॅबोच्या ह्मणण्यावरून खात्रिचें अनुमान निघते. तो तर त्या सर्वांना असत्यवादी, व ह्मणूनच अविश्वसनीय असें विशेषण देतो. आतां कालांतरानें आलेले लेखक व त्यांचे वृत्तांत, यांची विश्वसनीयता त्यांच्या चिकित्सक बुद्धिवर, ऐतिहासिक दृष्टीवर व सत्यशोधनावर अवलंबून राहील. शिकंदराच्या

तत्कालिन चरित्र लेखकांनीं त्याच्या सर्व स्वाऱ्यांत व युद्धांत भाग घेतला असल्या-कारणानें व ते त्याला पूज्य मानीत असल्यामुळें, त्यांचे वृत्तांत साहजिकच फुगवून लिहिलेले, व स्वशत्रु विषयीं थोड्या अधिक प्रमाणानें कलुषित झालेले आहेत. अशी मंडळी केव्हां केव्हां एखादा दुसरा अपजय मिळाला, किंवा एखादेवेळीं पिच्छेहाट झाली तरी त्या विषयीं लिहिणार नाहींत, हे मानवीं स्वभावास अनुसरूनच आहे. तेथें निःपक्षपात बुद्धि व अविकारीदृष्टी सर्वत्र सापडणें शक्य नाहीं.

आणखी ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखीं आहे कीं, सध्यांच्या प्रमाणें पूर्वीं सुद्धां युरोपीय पाश्चिमात्य लोक आशियातील पौर्वात्य लोकास कमीप्रतीचें, रानटी व गुलामगिरीस स्वभावतःच लायक, असें समजत असत, व आपली स्वतःची पायरी सर्वप्रकारें उच्च आहे, असें मानीत.( प्रो. जे. बी. बेरीचा ग्रीसचा इतिहास पान ७८५ पहा ) तेव्हां ह्या समजुतीमुळें त्यांच्यामध्यें उत्पन्न झालेलें दृष्टीदोष आपण विसरता कामा नये. वस्तुस्थितीचा विपर्यास करून, अथवा घडलेल्या गोष्टींचा पूर्ण विचार न करतां, आपल्या पूर्व दुराग्रहास अनुसरून काढलेले उद्गार आपणास ठिकठिकाणीं आढळतात. तरीपण त्यांनीं कांहीं आधारभूत माहिती आपल्या ग्रंथांत गोवलेली आढळते.

कांहीं इतिहासकारांच्या मतें शिकंदराची अशी प्रबळ इच्छा होती कीं, पौर्वात्य देशांत पाश्चात्यांचीं राज्यें व वसाहती स्थापून पाश्चात्य संस्कृती पसरावयाची व पौर्वात्य लोकांच्या आचारविचारांना नवें वळण द्यावयाचें. तेव्हां ही इच्छा सिद्धीस नेण्याकरितां, त्यानें त्याकाळीं माहित असलेले सर्व पौर्वात्य प्रदेश जिंकण्याचा निश्चय केला. पण पाश्चात्य संस्कृती पौर्वात्त्यास शिकविणें हा विचार खात्रीनें नंतरचा आहे. पाश्चात्त्यांच्या व पौर्वात्त्यांच्या परस्परसंबंधाचा आजपर्यंतच्या इतिहासांत पुढील परंपरा दिसून येते. प्रथम परदेशांत राज्य व वसाहत स्थापण्याची इच्छा व महत्वाकांक्षा व नंतर सोईस्कर वाटलेच तर स्वसंस्कृती पसरविण्याची इच्छा. शिकंदराचे हेतू अशाच आशयाचे होते असें दिसते. ( Cf प्रो. बेरीचा ग्रीकचा इतिहास पानें ७८५ व ७८६ ) पुन्हा हे लक्षांत ठेवलें पाहिजे कीं ग्रीक व मॅकेडोनिअन लोकांत पुष्कळ भेद होता. ग्रीक लोक मॅकेडोनिअनलोकांना इतराप्रमाणें रानटी ( barbarian ) समजत, व त्यांचा पूर्णपणें द्वेष करीत. ग्रीक लोकांची संस्कृती ही मॅकेडोनियनलोकांची संस्कृती मुळीं च नव्हती. ते त्या संस्कृतीस अगदी पारखे होते. मॅकेडोनिअनलोक शूर, युद्ध कलेंत पुढें गेलेले व एकीनें राहणारे असल्यामुळें, त्यांनीं ग्रीकांना पादाक्रांत केलें, व त्यांच्यावर आपली दहशत बसविली. शिकंदराचा बाप फिलीप यानें ग्रीकांचा परस्पर द्वेष, व अंतःकलह पाहून आपल्या कर्तृत्वानें मोठे साम्राज्य स्थापण्यास सुरवात केली, व पुढें तेंच कार्य त्याच्या मुलानें शेवटास नेलें.

इराणच्या साम्राज्याशी मॅकेडोनिअन व ग्रीक लोकांचे तंटे सुरू होते च. व पूर्वी इराणच्या राजानें युरोपांत येऊन जो धुमाकुळ माजविला होता, त्याबद्दलचा सूड घेण्याचे त्यांच्या मनांत वागत होते. तेव्हां इराणावर स्वारा करण्याचे अगोदर, मागें

युरोपमध्यें शांतता असावी, ग्रीकलोकांच्या इराणविषयीं द्वेषास उत्तेजन देऊन, त्यांचा युद्धांत उपयोग करून घ्यावा; त्यांच्या संस्कृतीचे गोडवें गाऊन त्यांना आपल्या बाजूचे करून घ्यावें; अशियांमध्यें त्यांच्या संस्कृतीच्या प्रसारास मदत करून, त्यांच्या मध्यें आशियांत येण्यास व तेथें वसाहत करण्यास इच्छा उत्पन्न करावी, अशाप्रकारचे शिकंदराचें धोरण असावेसें दिसतें. शिकंदर हा जरी लहानपणापासून अरिस्टॉटल ह्या प्रसिद्ध तत्ववेत्त्याच्या शिक्षणाखालीं ग्रीक संस्कृतींत वाढला होता, व त्याला जरी होमरची आवड होती, तरी तो त्या संस्कृतीच्या प्रसारार्थ एवढा खटाटोप करणारा नव्हता. त्याच्या मूळ महत्वाकांक्षा भिन्न होत्या. ग्रीक संस्कृतीचा प्रसार हें त्याचें मुख्य ध्येय मुळींच नव्हतें. (Cf. Plutarch's lives in Everyman series Vol. II P. 466 ) कोणत्याही परदेशावर स्वारी करणाराचे मूळ हेतू उच्च दुसऱ्यास सुसंस्कृत करण्याचे नसतात; व जगज्जेत्यांची पदवी धारण करणारांचे तर त्या प्रकारचे कधींहि नसतात. शिकंदरानें इराणमध्यें असतांना, विलाप करणाऱ्या व बंदींत ठेवलेल्या दारिअसच्या आईस व बायकोस असें सांगून पाठविलें कीं " that they need not fear any harm from Alexander who made war upon him (Darius) only for dominion " ( Plutarch's lives Vol. II P. 480 ) आणखि एका प्रसंगीं त्यानें पुढीलप्रमाणें उद्गार काढले असें प्लुटार्क आपणांस सांगतो " To do unto Persia what Persia under Xerxes had essayed to do unto Macedonia and the rest of Hellas. "

ह्यावरून असें दिसतें कीं एक तर त्याला पूर्वी दिलेल्या त्रासाबद्दल इराणचा सूड उगवावयाचा होता, व दुसरें तो स्वतः महत्वाकांक्षी, सत्ता व वैभवलोलुप असून, आपल्या इच्छा तडीस नेण्याइतकी त्याच्या अंगांत धमक, उत्साह, कर्तबगारी, व तेज होते. आपण पूर्वी कोणी झाला नाहीं असा सत्ताधिपती होऊन वैभवशिखरास पोंचावें, अशा आकांक्षेनें त्याच्या अंगात संचार केला. व ती पुरी करण्याकरतां ग्रीसचा व इतर युरोपीय देशाचा नेहमींचा त्या काळचा हाडवैरी जे इराणचें साम्राज्य–त्याला शासन करणें, त्याची पिच्छेहाट करणें, व त्याला सरतें शेवटीं आपल्या अंगच्या कर्तृत्वाच्या व युद्धकलेच्या जोरावर पादाक्रांत करणें, हा उद्देश त्यानें मनात धरला.

कोठें कोठें कांहीं इतिहासकार असें सुचवितात कीं, त्यानें जो हा इतके प्रदेश संकटें सोसून जिंकण्याचा खटाटोप केला, तो आशियाचा सर्व व्यापार आपल्या देखरेखेखालीं आपल्या हातून चालावा, ह्याकरतां केला. यूरोप व आशिया ह्यांचे दळणवळणाचे जुने व नवे मार्ग आपल्या सत्तेखालीं असावेत, व सर्व व्यापाराचा फायदा आपल्या लोकांस व्हावा, हा त्याचा ह्या मोहिमांत मुख्य उद्देश होता. (Cf. प्रो. जे. बी. बेरी ग्री. इ. पान ८०९ ) पण येथें असें म्हणणें भाग पडतें कीं, वरील प्रकारची वस्तुस्थिती असणें शक्य नाहीं. हा व्यापार-

विषयक विचार नंतरचा आहे. दळणवळणाचे हमरस्ते जेव्हां हातीं आले, तेव्हां व्यापाराचा ओघ आपल्या देशास कसा फायदेशीर होईल, ह्याविषयींचे विचार सुचले, व त्याच्या बंदोबस्ताचे मार्ग व उपाय योजण्यांत आले. पहिल्या प्रथम शिकंदराचे डोक्यांत व्यापार वाढविणें अथवा हस्तगत करणें हें मुळींच नव्हते, व त्याची पौर्वात्य मोहिम ह्या कारणाकरतां होती, असें म्हणण्यास सबळ पुरावा दिसत नाहीं. आपल्यामध्यें कांहीं दैविक शक्ति आहे, व आपण तिच्यायोगानें जगज्जेता व्हावें अशी त्याची समजूत व इच्छा होती. अशा व्यक्तीस सतत यश मिळत गेल्यास, आपल्या महत्वाकांक्षेपासून व ध्येयापासून सहजासहजीं कधिही परावृत होत नाहींत. जोंपर्यंत स्वसामर्थ्यांत व स्वकर्तृत्वांत त्यांचा दृढविश्वास आहे तोंपर्यंत ते माघार घेत नाहींत असें दिसतें. एखादा पराजयच किंवा एखादी पिच्छेहाटच त्यांचा आत्मविश्वास शिथील करूं शकेल. नाहींतर आपली इच्छा पूर्ण केल्यावांचून रहाणें त्यांना बहुधा शक्य नाहीं.

इराणचें साम्राज्य शिकंदरास सहज मिळण्याचें कारण, तें एकवटलेलें नव्हतें. त्याच्यामध्यें अनेक परलोकांचीं राज्यें मोडत असत. तीं एकमेकांस दृढबंधनानें बांधलेलीं नव्हती. तेथें राज्य करणारा त्यावेळचा बादशहा दुर्बळ व मवाळ होता. त्याच्या अंगीं कर्तृत्वशक्ति नव्हती. राज्यामध्यें बंडे व असंतोष माजला होता. निरनिराळ्या प्रांताचे अधिपती राजद्रोही बनत असत. आशियामायनरांतील ग्रीक वसाहती तर शिकंदर येण्याची वाट उत्सुकतेनें पाहात होत्या. देशांत पैसा, मनुष्यें, व इतर सामुग्री जरी मुबलक होती, तरी एखादा, शूर, कर्तृक व धोरणी नेता नसल्यामुळें, इराणच्या साम्राज्य देहांत प्राण नसल्याप्रमाणें झालें होते. उलट, शिकंदराची बाजू अनेक तऱ्हेनें बळकट होती. त्या काळामध्यें मॅकेडोनिअनलोक युद्धकलेंत पुढें गेलेलें होते. त्यांची सैन्याची व लढाईत व्यूहरचण्याची तऱ्हा, अधिक उपयुक्त होती. त्यांना शिकंदरासारखा धाडसी, शूर, युद्धकलाविशारद, धोरणी व मुत्सद्दी सेनानी मिळाला होता. त्या काळांत युद्धकलेंत त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. त्याचें क्षात्रतेज, त्याला मिळालेलें ग्रीक व थेसालिअनलोकांचें सहाय्य, ह्यांच्या मदतीनें त्यानें आपल्या विजिगीषेला प्रारंभ केला. तो पादाक्रांत केलेल्या लोकांच्या धार्मिक कल्पनांचा मान राखित असें. इराणच्या असहिष्णुतेच्या त्रासाला कंटाळलेल्या लोकांनीं त्याचें स्वागत केलें, व त्याला आपला उद्धारक समजूं लागले. त्यानें आपल्या सैनिकांना आपल्या कह्यांत पूर्णपणें ठेवले होते. त्याच्या धाकामुळें ते वाटेल तो अनाचार करूं शकत नसत. तो स्वतः आपल्या शत्रूस, शरण आला असतां उदारतेनें वागवित असे. स्वतःच्या लोकांच्या गुन्ह्याबद्दल त्यांना तो शिक्षा लावी. व यामुळें च जितलोकांचा त्याच्या विषयींचा द्वेष कमी होई. कांहीं ठिकाणीं त्यानें क्रौर्य दाखविलें व कांहीं ठिकाणीं विश्वासघात हि केला पण एकंदरींत त्याचें वर्तन त्याच्या नांवाला बरेच साजेसें होतें. तेव्हां इराणच्या अकेमेनीड घराण्याचा मोड होण्यास व विजयश्री शिकंदराकडे जाण्यास फारसा काळ लागला नाहीं.

शिकंदराची आकांक्षा जगज्जेत्याच्या व

पृथ्वीपतीच्या पदाला पोंचण्याची होती असें मागें ह्मटलें च आहे. व इराणच्या अवाढव्य साम्राज्याशीं झगडतांना त्याला जे सतत जय सहज मिळत गेले, त्यामुळें तर त्याची आकांक्षा—जरी यदाकदाचित् प्रथम संकुचित असली तरी—उत्तरोत्तर वाढत वाढत गेली. नुसता इराण व त्याचे सभोंवतालचे भाग न जिंकतां, त्या वेळेस जेवढा प्रदेश भूगोलज्ञांना माहित होता, तेवढा काबिज करावा असें त्यास वाटूं लागलें. कारण गंगेच्या मुखापर्यंतचे देश जिंकले ह्मणजे निदान पृथ्वीची पूर्वेकडील समुद्रसीमा लागेल, अशी त्याची समजूत होती. (Cf.प्रो. बेरी ग्री. इ. पान ८०९; अरिअन व जास्टिन (पान ३२१ +कुर्टीअस२२५) त्याच्या ह्या महत्वाकांक्षेस अधिक प्रज्वलीत होण्यास मुळाशीं आणखि एक सबळ कारण होतें. ग्रीक लोकांत पुराण कालापासून अशा दंतकथा प्रचलित होत्या कीं डायोनिझस हेराक्लेस आणि सेमिरॅमिस ह्या वीरानीं हिंदुस्थानांत येऊन अनेक अद्भुत कृत्यें केलीं. तेंव्हा त्यांच्याहीपेक्षां मोठें कृत्य ह्मणजे हिंदुस्थान देश काबिज करून, आपल्या कृत्यानें व ऐश्वर्यानें आपण जगाचे डोळे दिपवावें, व सर्वांत श्रेष्ठ पद प्राप्त करून घ्यावें अशी शिकंदरास फार उत्कंठा लागली. (Cf. in Mc Crindle's Ancient India, its Invasion by Alexander the Great; Justin P. 322; Curtins P. 226, 235; and V. A. Smith Hist. Sec. Ed. P. 45.)

हिंदुस्थानचा व्यापार आपण चालवावा, व त्याचा फायदा आपल्या लोकास व्हावा, हा विचार त्याच्या मनांत पुढें आला. व जर यदाकदाचित् त्या व्यापाराचें महत्व त्याला पूर्वींच कळलें असलें, तर त्या गोष्टीनें त्यास हिंदुस्थानांत येण्यास अधिक प्रोत्साहन दिलें. तो स्वतः संपत्तीच्या अथवा लुटीच्या लालसेनें मुळीच प्रेरित झाला नव्हता. हिंदुस्थान ह्मणजे संपत्तीचें माहेरघर ही जी पाश्चात्यांची पूर्वापार चालत आलेली समजूत,— व ती त्या वेळेस जरी वस्तुस्थितीदर्शक होती तरी-त्या समजुतीमुळें त्याच्या राज्य व वैभवतृष्णेला अधिक जोर आला असें मात्र नाहीं. त्याचे शिपाई सैनिक हे धनतृष्णेनें प्रेरित होऊन त्याजबरोबर आले होते. हिमालयाचें उल्लंघन करून, सृष्टीनिर्मीत अडचणी सोसून हिंद भूपती होण्याच्या आकांक्षेला बळीपडून, त्या छंदी सेनानीनें हिंदुस्थानच्या शांततेवर नाहक आघात केला. ठिकठिकाणीं देशस्वातंत्र्यरक्षणार्थ नेटानें सामना देणाऱ्या हिंदी लोकांचा त्यानें रागाच्याभरांत भयंकर संहार केला. ही कुटिल व क्रूर कृत्यें त्यानें आपली राज्यतृष्णा शमन करण्याकरतां केली. त्यावेळची हिंदुस्थानची स्थिति विस्कळीत झालेली होती. सर्व देशावर एक शास्ता नव्हता. वायव्य सरहद्दीवर सध्यांप्रमाणें तेथील दऱ्याखोऱ्यांत व पर्वतावर भिन्न भिन्न लोकांची वस्ती होती. हे लोक शूर, धाडसी, व धष्टपुष्ट असत. पण त्यांच्यामध्यें एकी नसल्यामुळें, तें तुटकपणानें रहात. त्यांना युद्धकलेचें विशेष ज्ञान नव्हते. त्यांच्यामध्यें व्यूहरचना, व सेनेच्या हालचालींचे डांवपेच, यांची

फारच अल्प माहिती होती. त्यांचीं शस्त्रास्त्रें पुरातन तऱ्हेची असत. ह्या कारणामुळें शिकंदराच्या क्षात्रकले पुढें त्यांचा टिकाव लागला नाहीं. शिकंदराची चपलता, धाडस, शौर्य व अनुभव, आणि त्याच्या सेनेचीं शस्त्रास्त्रें, शिस्त, व डांवपेंच, ह्या सर्व गोष्टी त्याच्या जयास कारण झाल्या. खुद्द हिंदुस्थान देशांत एकछत्री राज्य नव्हतें. अनेक राज्यें, भिन्न भिन्न राज्यपद्धतीनें चाललेलीं, त्याकाळीं जिकडें तिकडें पसरलेलीं होतीं. कांहीं फार लहान तर कांहीं फार मोठीं व अफाट अशीं होतीं. जें तें राज्य, व जें तें लोक आपल्या प्रदेशापुरता विचार करीत असत. परचक्राला एकजुटीनें सर्वांनीं मिळून तोंड द्यावें, व आपल्या देशाची अब्रू व स्वातंत्र्य हीं कायम राखावीत, अशी व्यापक भावना त्यांच्यात खास नव्हती तरी पण या लोकांत क्षात्रतेज पूर्णपणें वसत होतें. ( Cf. Mc Crindle's Ancient India, its Invasion by Alex-ander the Great. Introduction P. 4. ). युद्धांत पळ काढणाऱ्यांचा व देशद्रोह्यांची संख्या फारच कमी. नुसता शिपाईगिरीचा धंदा करून उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांत सुद्धां स्वदेशाभिमान जागृत असे. एका प्रसंगीं तर शिकंदराच्या तैनातींत न शिरतां ह्या पेषाचे लोक स्वदेशासाठीं लढत लढत मेले. ( Cf. Plutarch's lives P. 516 & V. A. Smith. Early Hist. of India, P. 51 ) शिकंदरास सामना दिल्यावाचून बहुतेकांनीं माघार घेतली नाहीं. नुसत्या तक्षशिलेच्या राजानें—त्याचें पुरू राजाशीं वैर असल्यामुळें—जो स्वजनद्रोह दाखविला अथवा कोता स्वार्थ साधला, तो साधारणपणें अपवादकारक होता.

सिंधु व झेलम ह्या नद्यामध्यें त्या वेळीं आंभी राजाचें राज्य होतें. तो पहिल्या पासूनच शिकंदराच्या बाजूस मिळाला होता. झेलम व चिनाब ह्या नद्यामध्यें पुरूचें राज्य होतें. त्यानें मात्र आपली व आपल्या देशाची अब्रू व स्वातंत्र्य कायम राखली. अभिसाराचें राज्य सिंधु व चिनाब ह्या नद्यामध्यें हिमालयाच्या बाजूला काश्मीरला लागून हाते. त्या राजानें तटस्थवृत्ती धारण करून कोणची बाजू जिंकते हें पहात राहिला. सिंधु नदीच्या पश्चिम काठीं जीं कांहीं लहान संस्थानें होती, तीं शिकंदरास मिळालीं. तेव्हां हीं संस्थानें व आंभीचें राज्य खेरिज करून, बाकीच्यांशी शिकंदरास झगडावें लागलें; व त्याच्या प्रत्ययास आलें कीं, सर्व आशियांत हिंदुस्थानातलें लोक अधिक शूर आहेत. त्यांचे कडे शिकंदराच्या तोडीचा सेनापती, व देशांत एकी नसल्यामुळें त्यांना रणांगणांत तात्पुरता कां होईना पण ह्मणण्या सारखा जय प्राप्त झाला नाहीं. चपल घोडे स्वारांचें महत्व व उपयोग, जलद हालचालीचा फायदा, शत्रूंच्या डांवपेंचाची माहिती हिंदी आर्यांना कमी होती. व्यूह रचणें, फोडणें, व पुन्हा रचणें वगैरे गोष्टी त्यांच्याकडे चपलेतेनें होत नसत. शस्त्रास्त्रांत व शिस्तित त्यांची श्रेष्ठता नव्हती. ते शौर्यात, मनुष्य बलांत, व तुटक रितीनें देशरक्षणांत कमी नव्हते. त्यांनीं जर सर्व देशाची संघशक्ती एकव-

टली असती तर, शिकंदराच्या क्षुद्र सेनेस आपल्या मनुष्यबलानें चिरडून टाकलें असते. पण तो मान पुढें थोड्याच वर्षांनीं चंद्रगुप्तास मिळाला. हें देशाचें दुर्दैव समजावयाचे कीं, तो शिकंदराच्या वेळेस राज्यरहित होता.

शिकंदर हा १,२०,००० पायदळ, १५००० घोडेस्वार एवढ्या प्रचंड सैन्यासह हिंदुस्थानांत शिरला. (Cf. Plutarch's lives, Vol. II P. 522). त्या सैन्यांत जवळ जवळ निम्मे अधिक आशियांतील लढवय्ये लोक होते. शिवाय, हिंदुस्थानांत आल्यावर सिंधुनदीपर्यंत त्याला विशेष त्रास झाला नाहीं. सिंधुनदी उतरल्यावर तर, झेलमनदीपर्यंत आंभीराजानें त्याला सर्व प्रकारें मदत केली, व आपलें सैन्य सुद्धा दिलें. त्यास पहिला व सर्वांत मोठा प्रतिबंध पुरू राजानें केला. व पुढें जें युद्ध झालें, त्यामध्यें हिंदी आर्यांचें शौर्य शिकंदराच्या निदर्शनास स्पष्टपणें आलें. पुरूचें सैन्य ३०,००० पेक्षां थोडेसें कमी किंवा थोडेसें जास्ती होतें. शिकंदराच्या जवळ त्याच्या चौपट पांचपट होते. तेंव्हा एका लहान प्रदेशाचा राजा—पुरू—युद्धांत हरला, याचें विशेष नवल न वाटता, त्यानें जें शौर्य, व धमक दाखविली, त्याचें आश्चर्य वाटतें. त्यानें अभिमानी शिकंदरास आपल्या शौर्यानें व क्षात्रतेजानें खुप केलें. शिकंदराच्या सैन्यास मात्र वचक व दहशत बसली, व त्याचें मानसिक धैर्य हरण झालें. तें सैन्य जरी जय पावलें तरी त्याला तो जय अपजयासारखा भासला. तें पुढें जाण्यास कचरूं लागलें. तें बिआस पर्यंत गेलें याचें कारण तेथपावेतों फारच लहान लहान संस्थानें होतीं. पण ती नदी ओलांडून जाण्यास त्या सैन्यानें साफ नाकारलें. "So far, they said, the Gods had helped them, but who could tell how much longer they would be kind.." (Plutarch's lives, Vol. II Alexander). दुसऱ्या एकें ठिकाणीं शिकंदराच्या पत्राधारें प्लुटार्क ह्मणतो, "But the last combat with Poros took off the edge of the Macedonian's courage, and stanged their further progress into India For having found it hard enough to defeat an enemy who brought but 20,000 foot, and 2000 horse into the field they thought they had reason to oppose Alexander's design of leading them on to pass the Ganges" etc. (Plutareh's lives, Vol. II P. 518, Cf. also V. A. Smith Early Hist. of India see Ed. P. 109). तेंव्हां हें सहज स्पष्ट दिसून येतें कीं पुरूनें केलेली लढाई फार महत्वाची झाली. त्याचा जरी पराजय झाला तरी, त्या पराजयांतच त्यानें मॅकेडोनिअन लोकांना जिंकलें; व आपल्यापेक्षां अनेक पटींनीं मोठ्या सेनेस आपल्या अल्प सेनेच्या शौर्यानें नुसते चकितच करून सोडले नाहीं, तर त्यांच्या मनांत पूर्णपणें धास्ति बसविली,

व त्यांच्या वाढत्या आकांक्षेस व धाडसास आळा घातला. ( Cf. Mc Crindle's Alexander P. P. 4 & 346 ). या गोष्टीचा शिकंदरावर बराच परिणाम घडला, ह्मणूनच तो परतला. नाहींतर तो कधींहि परत फिरणारा मनुष्य नव्हता. स्वबांधवावर जरी तो प्रथम रागावला, तरी एकदोन दिवसांतच त्यांचें ह्मणणें त्यास व्यवहार्य वाटलें व त्यानें तें कबूल केलें. शिकंदराला जर गंगेकडील राज्यें काबिज करण्याची आपली इच्छा पूर्ण करणें शक्य दिसलें असतें, तर त्यानें थोड्याशा स्वबांधव शिपायांचें आग्रहाचें ह्मणणें एकाबाजूस सारून, व त्यांना तेथें च ठेऊन, इतर सैन्यासह व आंभी व पुरू यांच्या सहाय्यानें, आपला हट्ट पुरा केला असता, व त्याला तो पुरा करता आला असता. (Cf. the speech of Alexander acc. to curtins in Mc Crindle's Ancient India, its invasion by Alexander the Great P. 226). त्यानें इराणांत परत गेल्यावर दाखविलेच आहे कीं, तो स्वकीयांचे फाजील हट्ट व लाड चालून देणारा नव्हता. ते त्या प्रसंगीं त्याचें करणें मान्य करीनात ह्मणून त्यानें सर्वांना बडतर्फ केले होते. तेव्हां त्याला आपल्या भावी अपजयाचीं चिन्हें दिसूं लागलीं, ह्मणून त्यानें आपला हात आवरता घेतला, व आपल्या वाढत्या महत्वाकांक्षेस बळी पडला नाहीं. त्याच्या सैनिकांचें धैर्य पार गेलें होतें, याबद्दल तर मुळीच शंका नाहीं. "Here (the right bank of Beas) his further progress towards the Ganges was arrested by his own soldiers. They had had heard of a formidable Eastern power which was preparing to bar their progress." ( V. A. Smith Early Hist. of India P. ) ही तयारी मगधाचा नंदराजा Xandrammes or Angrammes यानें चालविली होती, असें एका 'भगल' नांवाच्या राजानें व पुरूनें शिकंदरास सांगितलें होतें. ह्या राजाजवळ २०,००० घोडेस्वार, २,००,००० पायदळ, २००० रथ, व ४००० हत्ती होते. ( V. A. Smith's Early Hist. of India, P. 36; Curtins P. 221-222 in Mc Crindle's Ancient India above mentioned; also Cf. Plutarch's lives Vol. P. 518). बिंबिसार व अजातशत्रु या मगधराजांच्या वेळेपासून मगध देशाची सत्ता व सैनिक बळ हीं वाढलीं होतीं व नंद राजानीं ती सत्ता व सैनिकबळ कायम ठेवलें होतें.

हिंदुस्थानची मोहिम इराणच्या मोहिमे प्रमाणें सोपी नसून, जिकडे तिकडे त्याला जोरानें प्रतिरोध होत आहे, असें शिकंदराच्या दृष्टोत्पत्तीस तेव्हां च आले असेल. इराणांत त्यानें दारिअसच्या सैन्याचा मोड केल्याबरोबर, दारिअसचें सर्व साम्राज्य त्याच्या हातीं आलें, व त्याच्या मरणानंतर त्याच्या अधिकाऱ्याकडे तें राहिलें. पण हिंदुस्थानांत मात्र चोहोंकडें त्याला सर्व लोकच आपल्या विरुद्ध आहेत

असें दिसलें, व तेथील लोकांमध्यें क्षात्रबळ पुष्कळ आहे, हें पुरूशी लढतांना त्याच्या चांगलेच निदर्शनास आलें. पंजाब व सिंध प्रांतांत जी कांहीं अवशेष सत्ता राहिली होती, ती त्याच्या मरणानंतर लागलीच नष्ट झाली. व जेव्हां पुढें सेलेऊकसनें हिंदुस्थान जिंकण्याचा पुन्हां प्रयत्न केला, तेव्हां तो पराभव पावला व चंद्रगुप्ताला आपली मुलगी व अफगाणीस्थान देश देऊन तह करून घेतला. (इ. स. पु. ३०५)

तेव्हां "Within reach of the world's end, and not to reach it-their was the disappointment which befel Alexander at the Hyphases" असें जें प्रो. बेरी आपल्या ग्रीसच्या इतिहासांत (पान ८०९) ह्मणतो, तें रास्त दिसतें. (also cf. Alexander's speech as reported by Curtins P. P. 225-226 Mc Crindle's Anciet India above mentioned.)

पुढें जाणें व्यर्थ आहे अशी जेव्हां शिकंदराची पक्की खात्री झाली तेव्हांच तो परतला. "To retreat now was plainly to confess himself vanquished." (Plt. Lives Vol. II 518) असें जरी त्याला वाटत होतें, तरी तें च करणें त्याला व्यवहार्य व हितकारक वाटलें. "I shall find men that will follow me though I be deserted by you. The scythians and Bactrians once our foemen but now our soldiers, there will still be with me", (Curtins P.226 in Mc Crindle) असें ह्मणणारा शिंकंदर एक दोन दिवसांतच मागें हटण्यास कबूल झाला.

त्याला जर आपलें विजिगीषेचे हेतू सफल होणें शक्य दिसलें असतें तर, चिनाबला तो परत जातांना, त्याला जी यूरोपांतून ३०,००० पायदळाची ६००० घोडेंस्वाराची, व २५००० चिलखताची कुमक येऊन पोंचली होती ती, (Curtins 230, Disdorvs 284 in Mc Crindle) व जवळ असलेल्या सैन्यातले आशियांतील व हिंदी शिपाई, यासह त्यानें गंगेकांठच्या मुलखावर स्वारी करण्यास कमी केलें नसतें. तेव्हां तो लढाई न करतां जो परतला, तो आपला पराभव कबूल करून परतला असें ह्मणणें निर्विवाद दिसतें.

हिंदुस्थानांतून शिकंदराच्या परतण्याला पराजयरूपी पिच्छेहाट हें च नांव शोभतें. त्याला पुढें येतांना, व मागें हटतांना, ह्या देशांत सतत लढावे लागलें. त्यानें आपला पाय हिंदुस्थानांतून काढल्यावर, त्याच्या सत्तेचा, नांवाचा, व संस्कृतीचा मागमूस ह्या देशांत मुळींच राहिला नाहीं. शिकंदराची मोहिम ह्मणजे हिंदुस्थानची एक निष्फळ आगळीक होती, व त्या मोहिमेंत त्याचा हेतु सफल न होतां, त्याचा पराजय च झाला. ज्या अनेक बुभुक्षित व सत्ताकांक्षी लोकांनीं आपल्या नीच मनोवृत्तीस अनुसरून हिंदुस्थानच्या शांततेत विघाड आणण्याचा प्रयत्न केला, त्या पैकीं च शिकंदर व त्याचे अनुयायी होत. पण त्यांच्या ह्या कुटिल आकांक्षेस मुळींच यश आलें नाहीं. एखाद्या पेंढारी लुटारु प्रमाणें तो आला व गेला. त्याच्या स्वारीचा हिंदुस्थानावर तिळमात्र

स्थायिक परिणाम घडला नाहीं. ह्या देशावर ज्या अनेक उत्तरेकडील लुटारूंच्या टोळधाडी आल्या, त्या पैकींच ही एक होय. शिकंदराची गणना महंमूद, तैमूरलंग, नादिरशहा ह्यांच्या मालिकेंत हिंदुस्थानच्या इतिहासकारास करावयास पाहिजे. त्यांच्या इतकीच क्रूरता त्यानें अनेक प्रसंगीं दर्शविली, पण त्यामुळें लोकांवर वचक कांहींच बसला नाहीं. राज्यसंपादन व राज्यसंघटनकलेंत त्याच्या पूर्वी 'सिरस'(cyrus) व डारिअस हे उच्चप्रतीचे, राजकार्यधुरंधर इराणचे राजे होऊन गेले. ते क्षात्रविद्येंतसुद्धां शिकंदरास मागें टाकणारे होते. आपल्या देशांत इतिहासप्रसिद्ध चंद्रगुप्त त्याच शतकांत उदयास आला. तोहि शिकंदरापेक्षां अनेक कृत्यांत श्रेष्ठ होता. त्यानें सर्व आर्यावर्त पादाक्रांत करून, एकछत्री राज्य स्थापन केलें व अनेक चिरस्मरणीय अशा व्यवस्थेशीर संस्था स्थापून, राज्यकारभार उत्तम प्रकारें चालविला. तेव्हां हिंदुस्थानच्या एकंदर इतिहासांत शिकंदराच्या स्वारीस मुळींच महत्व नाहीं, असें ह्मणणें सयुक्तिक दिसतें. (Cf. V. A. Smith Early Hist. of India P. P. 224-5, 110, also Mc Crindle's Ancient India, its Invasion by Alexander the Great P- 5)

**श्रीधर व्यंकटेश पुणतांबेकर.**

---

## मत्स्येंद्र आणि गोरक्ष यांचा एक उल्लेख.

श्रीमत् विद्यारण्यस्वामी, जे माधवाचार्य या नांवानें ही प्रसिद्ध आहेत, त्यांनीं शंकरदिग्विजय या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे, हें सर्वांना माहितच आहे. त्यांत मंडनमिश्राची स्त्री शारदा हिनें विचारलेल्या शृंगारविषयक प्रश्नांचीं उत्तरें देण्याकरितां अमरु राजाच्या मृतशरीरामध्यें प्रवेश करण्याचा आपला विचार शंकराचार्यांनीं जेव्हां आपला शिष्य पद्मपादाचार्य यास सांगितला, तेव्हां त्या शिष्याला हें आपल्या गुरूचें करणें योग्य न वाटून त्यानें त्याविषयीं जें भाषण केलें तें पुढील श्लोकांमध्यें दिलेलें आहे.

इत्यूचिवांसं यतितल्लजं तं
सनन्दनः प्राह ससान्त्वमेनम् ।
सर्वज्ञ नैवाविदितं तवास्ति
तथापि भक्तिर्मुखरं तनोति ॥ ७९ ॥

मत्स्येन्द्रनामा हि पुरा महात्मा
गोरक्षमादिश्य निजाङ्गगुप्त्यै ।
नृपस्य कस्यापि तनुं परासोः
प्रविश्य तत्पत्तनमाससाद ॥ ८० ॥

भद्रासनाध्यासिनि योगिवर्ये
भद्राण्यनिद्राण्य भवन्प्रजानाम् ।
ववर्ष कालेषु बलाहकोऽपि
सस्यानि चाऽऽशास्य फलान्यभूवन् ॥ ८१

विज्ञाय विज्ञाः सचिवा नृपस्य
काये प्रविष्टं कमपीह दिव्यम् ।
समादिशन्राजसरोरुहाक्षीः
सर्वात्मना तस्य वशीक्रियायै ॥ ८२ ॥

संगीतलास्याभिनयादिकेषु
संसक्तचेता ललितेषु तासाम् ।
स एष विस्मृत्य मुनिः समाधिं
सर्वात्मना प्राकृतवद्बभूव ॥ ८३ ॥

गोरक्ष एषोऽथ गुरोः प्रवृत्तिं

विज्ञाय रक्षन्बहुधाऽस्य देहम् ।
निशान्तकान्तानटनोपदेष्टा
नितान्तमस्या भवदन्तरङ्गः ॥ ८४ ॥
तत्रैकदा तत्त्वनिबोधनेन
निवृत्तरागं निजदेशिकं सः ॥
योगानुपूर्वीमुपदिश्य निन्ये
यथापुरं प्राक्तनमेव देहं ॥ ८५ ॥

आपल्या शरीराचें संरक्षण करण्याविषयींची आपला शिष्य गोरक्षनाथ यास आज्ञा करून मत्स्येंद्रनाथ हे अशाच कोणा एका मृतराजाचे शरीरामध्यें प्रवेश करिते झाले. आणि पुढें तेथील सुखोपभोगांमध्यें ते इतके निमग्न झाले कीं, गोरक्षनाथानें मोठ्या कष्टानें राजमंदिरांत आपला प्रवेश करवून घेऊन आणि पूर्वीची आठवण देऊन त्यांना पूर्व देहावर आणलें. अशी पूर्वी गोष्ट झालेली आहे, ह्मणून आपण ह्या कामांत पडूं नये, असें पद्मपादाचार्यांनीं आपल्या गुरूला सुचविल्याचा कथाभाग या वर दिलेल्या श्लोकांमध्यें आहे.

याठिकाणीं माधवाचार्यांच्या शंकरदिग्विजयामध्यें मत्स्येंद्रनाथ आणि गोरक्ष यांचा जो उल्लेख आलेला आहे त्यावरून त्यांच्या कालासंबंधानें आपल्याला कांहीं निश्चय करतां येईल किंवा कसें, यावद्दल आपण विचार करूं.

श्री ज्ञानेश्वरमहाराजांच्या परंपरेमध्यें मत्स्येंद्रनाथाचें नांव येतें. तेव्हां ज्ञानेश्वरांच्या पूर्वी पुष्कळ वर्षें ते होऊन गेलेले असले पाहिजेत, हें उघड आहे. तेव्हां चवदाव्या शतकांत होऊन गेलेल्या माधवाचार्यांनीं मत्स्येंद्रनाथाचा उल्लेख केला, या गोष्टीवरून मत्स्येंद्रनाथाच्या कालनिर्णयाच्या प्रश्नावर कांहींच जास्त प्रकाश पडत नाहीं, हें खरें आहे. तथापि "मत्स्येंद्र नामा हि पुरा महात्मा" या श्लोकांतील पदयोजनेवरून कांहीं जास्त अर्थ काढतां येणार नाहींच, असें नाहीं. पद्मपादाचार्य शंकराचार्यांना सांगत आहेत कीं, "तुमच्या पूर्वीं ( पुरा ) मत्स्येंद्रनाथ या नांवाचे कोणी एक योगी होऊन गेले इत्यादि." येथें माधवाचार्यांनीं जो 'पुरा' हा शब्द घातलेला आहे तो मत्स्येंद्रनाथ आपल्या स्वतःच्या आधीं होऊन गेले याअर्थी घातलेला नसून ते शंकराचार्यांच्याही आधीं होऊन गेलेले होते, अशा अर्थीच त्यांनीं तो शब्द घातलेला असला पाहिजे, असें स्पष्ट दिसत आहे. जर मत्स्येंद्रनाथ हे शंकराचार्यांचे आधीं होऊन गेलेले नसते, तर माधवाचार्यांच्या सारख्या चिकित्सक बुद्धीच्या ग्रंथकारानें 'मत्स्येंद्रनामाहि पुरा महात्मा' इत्यदि शब्द पद्मपादाचार्यांच्या तोंडांत कधींही घातले नसते. शंकराचार्यांच्या पाठीमागून मत्स्येंद्रनाथ ( माधवाचार्यांच्या माहितीप्रमाणें ) झालेले असते, तर माधवाचार्यांच्या हातून "मत्स्येंद्रनामाहि पुरा महात्मा" असा चरण लिहिण्याची ही कालविपर्याची चूक होणें शक्य नव्हतें. परंतु त्यांच्यासारख्या काटेतोल लेखकानें ज्या अर्थी असा चरण घातला आहे, त्या अर्थीं मत्स्येंद्रनाथ हे शंकराचार्यांच्या पूर्वीं ह्मणजे सुमारें ७ व्या ८ व्या शतकाचे पूर्वीं होऊन गेलेले असावे, असें दिसतें.

'मत्स्येंद्रनामाहि पुरा महात्मा' या श्लोकावर जी टीका आहे ती येणें प्रमाणें:-

एवं पुरावृत्तं वृत्तान्तं श्रावयितुमभिमुखी कृत्य तं श्रावयति। हि प्रसिद्धं पुर

मत्स्येंद्रनामा महात्मा स्वशरीररक्षणाय गोरक्षसंज्ञं शिष्यमाज्ञाप्य कस्यचिन्मृतकस्य राज्ञः शरीरं प्रविश्य तस्य नगरं प्राप्तवान् ॥

यावरून या टीकाकाराच्या माहितीप्रमाणेंही हा मत्स्येंद्रनाथांचा वृत्तांत शंकराचार्यांच्या वेळेच्या पूर्वी होऊन गेलेला असला पाहिजे, असें दिसतें. तसें नसतें, तर ही विद्यारण्यांची कालविपर्ययाची चूक आहे, असें त्या टीकाकारानें लिहिलें असतें. परंतु तो तसे कांहींएक न लिहितां उलट 'पुरावृत्तं वृत्तांतं' इत्यादि लिहितो. यावरून ही मत्स्येंद्र हे शंकराचार्यांच्या पूर्वी झालेले असावेत, असें दिसतें.

शंकराचार्यांच्या चरित्राचा दुसरा एक 'शंकरविजय' या नांवाचा ग्रंथ शंकराचार्यांचे शिष्य आनंदगिरी यांनीं लिहिलेला आहे. परंतु प्रकृतस्थळीं त्या चरित्रांत मत्स्येंद्रनाथाच्या दृष्टांताचा उल्लेख केलेला नाहीं. तेथेंही तो उल्लेख असता, तर वरील अनुमानाला जास्त बळकटी आली असती, हें खरें आहे. परंतु आनंदगिरीनें तो दृष्टांत दिला नाहीं, म्हणून माधवाचार्यांच्या माहितींतील सत्यता कांहीं कमी होते, असें मुळ्च नाहीं.

आतां मत्स्येन्द्रनाथ हे शंकराचार्यांच्य पूर्वी होऊन गेले असें मानलें असतां मत्स्येंद्रनाथ आणि ज्ञानेश्वर महाराज ह्यांच्यामध्यें निदान ४।५ शतकांचें तरी अंतर पडतें. परंतु आदिनाथ, मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वरमहाराज या पांच सहा पुरुषांच्या गुरुपरंपरेमध्यें ४।५ शतकें लोटणें अशक्य आहे. परंतु कदाचित् या गुरुपरंपरेच्या यादींत सगळ्या गुरूंचीं कालक्रमानुपूर्वक कांहीं नांवें दिलेलीं नसून त्यांतील मुख्य मुख्य पुरुषांचीं तेवढीं हीं नांवें निवडलेलीं असतील, असाही संभव आहे. या बाबतींत अशी कल्पना करणें शक्य आहे. परंतु माधवाचार्यांनीं मत्स्येंद्राचा जो उल्लेख केलेला आहे त्याच्यावर दुसरी कांहीं कल्पना बसूं शकत नसल्याकारणानें मत्स्येंद्रनाथ आणि त्यांचे शिष्य गोरक्षनाथ हे शंकराचार्यांच्यापूर्वी होऊन गेलेले असावेत, हीच गोष्ट सिद्ध होते.

**शिवराम महादेव परांजपे**

---

श्रीराम

## श्रीशिवछत्रपतींचा एक कौलनामा

श्रीशिवछत्रपतींच्या पत्रांचा परिचय महाराष्ट्रास नव्यानें व्हावयाचा आहे, असें नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ८, १५, १६, १७, १८, व नुकता च आपल्या मंडळामार्फत प्रसिद्ध झालेला खंड २० वा, या खंडांत सरासरीं पन्नास पत्रें व श्रीसमर्थसंप्रदायाच्या कागदपत्रांत आलेलीं सहा पत्रें, मिळून एकंदर सुमारें ५६ पत्रें प्रत्यक्ष श्रीशिवछत्रपतींचीं आजपर्यंत प्रसिद्ध झालेलीं आहेत. परंतु ज्यांत श्रीशिवछत्रपतींचा संबंध आहे किंवा जीं त्यांच्या अधिकाऱ्यांनीं लिहिलेलीं आहेत, अशीं पत्रें जमेस धरलीं तर सरासरीं ५००।६०० पत्रें होतील. याशिवाय अप्रकाशित पण उपलब्ध अशीं कांहीं पत्रें रा. पांडोबा पटवर्धन यांचे जवळ आहेत व कांहीं धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहीं आहेत.

खुद्द श्रीशिवछत्रपतींचा पत्रव्यवहार मिळविण्याविषयीं महाराष्ट्राकडून जो प्रयत्न झाला त्याचें फल हें असें आहे. झालें हें कार्य मनाला आनंद देणारें असलें तरी व्हावयाच्या कार्यांच्या मानानें तें फार थोडें आहे. श्रीशिवछत्रपतींचा ज्या प्रांतांत विशेष व्याप होता त्या प्रांतांत सबंध वर्ष संशोधनाचें काम केल्यास, आतांपर्यंत आपण प्रसिद्ध केलीं किंवा मिळविलीं इतकीं पत्रें आपण प्रतिवर्षी मिळवूं शकूं असा माझा अदमास आहे; असो.

श्री शिवछत्रपतींचा एक कौलनामा नुकताच मिळाला आहे, तो आजच्या प्रसंगीं आपणांस सादर करितों. हा कौलनामा अस्सल असून मोडी लिपींत आहे. त्यावरील श्रीकार फाटण्यांत गेला आहे. कौलनाम्याचा शक १५७३ आहे. तो कौलनामा असाः—

प्रतिपच्चंद्र
लेखेव वर्धिष्णुर्वि
श्ववंदिता ॥ शाहसू
नोः शिवस्यैषा मुद्रा
भद्राय राजते

ई[1] कौलनामा अजर[2]ख्तखाने राजश्री सीवाजी राजे दामदौलै[3]त हू बें[4]जांनेबु

श्री शिवन
रपति हर्ष
निदान साम
राज मतिम
त प्रधान

माल पाटील व बाजी पाटील व अदिकारी तपे बीरवाडी सु॥ इसने खमसैन अलफ बा[5]दे कौलनांमा ऐसा जें बीरवाडी खालील देह चंदरराउ खात होते तेथील अदिकारपण आपलें आहे यैस्यास चंदररायामधें व आपंणामधें बरेपणा नाही ह्मणौउनु सदरहु गांवीचें अदिकारपण चंदरराउ खात असेति त्यांसीं जरी आपण कुसु[6]र करावा तरी ते सबल आपण कंमजोर या करितां आपण गै करित गेलो हाली सदरहु गांव चंदररायें किले कैं[7]गोरी खाले दिधले आहेति हे खबर आपण आइकोनु साहेबांचे सेवेसी आळों आहो तरी आपण मिरासीदार नफ[8]र आंहो साहेबीं आपणास हाती धरुनु आपला अदिकारपण आपणासै देउनु मिरासीवरी बैसविले पाहिजे सालाबाद हक लाजिमा[9] जो गांवगना असेली त्याप्रमाणे आपण खाउनु चाकरी अदिकारपणाची करुनु जे वख्तीं साहेबांस मसलतीचें कांम पडेळ ते वख्ती जैसे मावले देसमुख आपले लोक घेउनु मसलतीस साहेबांपासीं येताहेती ते च हर[10] निसबतीन जे वख्ती मसलतीचे काम साहेबास पडेल ते वख्ती आपण दाहा १० लोक बरावरी घेउनु साहेबांचे सेवेसी येउनु दरोज रोजमुराबदल अ[11]डसेरी रु[12]के

१ ई= हा. २ अज= तून. रख्तखाना= फरासखाना. ३ लक्ष्म्यालंकृत. ४ यांसी ५ कारणें. ६ कथळा. ७ हा किल्ला बीरवाडीच्या दक्षिणेस आहे. ८ मनुष्य. ९ जबाबदारी. १० स्वतः जातीनिशी. ११ अर्धा शेर. १२ रुका= आण्याचा बारावा भाग.

८६ सी दर नफरे घेउनु मसलती जो वरी असेली तोंवरी साहेबकांम करुनु मसलतीचें कांम जालियावरी साहेब रजा देतील तेधवा गांवांस जाउनु ह्मणौउनु मालूम केले बरोंये मालुमौति खोतिरेसी आणौउनु साहेब तुह्मांवरी मेहरवान होउनु सदरहु गांवांचें अदिकारपण तुमची मिरासी तुह्मास दिल्ही असे तुह्मी आदिकारपण खाउनु अदिकारपणाची चाकरी करणे हक लाजिमा व गांव खंडी व किरकोली हक नि॥ बलुते व बाजे हक खाउनु लेंकराचें लेंकरीं खाणे व जे वख्तीं मसलतीचें काम पडेल ते वख्ती तुह्मी दाहा लोक १० बराबरी घेउनु साहेबापासीं येत जाणे जोंवरी मसलतीचें कांम असेल तोंवरी दाहा लोकांनसी चाकरी करुनु दरोज रोज रोजमुरा दर नफरे रुके ८६ प्रमाणें साहेबांपासुनु घेत जाणे मसलती जालियावरी साहेबाची रजा घेउनु गांवांस जात जाणे ये बाबे कौल असे

मर्या
देयं विरा
जते

येणें प्रमाणें हा कौलनामा आहे. त्याचा अर्थ उघड आहे. बीरवाडीच्या तप्याखालीं बाजी पाटील व माल पाटील यांचीं कांहीं गांवें अधिकारपणाचीं होतीं. पाटलांना हुसकावून देऊन तीं गांवें चंद्रराव मोरे खात होता. चंद्ररावानें तीं गांवें बीरवाडीच्या तप्याखालून काढून कांगोरीच्या किल्याखालीं वर्ग केलीं होतीं. या सुमारास कांगोरीचा किल्ला छत्रपतींनीं हस्तगत केला असावा, असें दिसतें. असें असेल तर शिवाजी महाराजांनीं कांगोरी किल्ला घेतल्याचा जो सन ग्रँट डफनें दिला आहे, तो चुकीचा ठरतो. कांगोरी किल्ला छत्रपतींनीं जिंकल्यामुळें त्यांचे पाशीं दाद मागण्यासाठीं उभयता पाटील गेले. आपलीं गांवें आपणांस परत दिल्यास आपण, जरूर पडेल तेव्हां महाराजांची सेवा करण्यास दहा लोकांनिशीं येत जाऊं, असें त्यांनीं कबूल केले. हें पाटलांचें ह्मणणें मान्य करून छत्रपतींनीं त्यांचीं गांवें त्यांस दिल्हीं व जरूर पडेल तेव्हां दहा लोकांनिशीं चाकरीस येत जावें, असा त्यांच्याशीं करार केला.

या कौलनाम्यावरून पुढील अनुमानें काढतां येतातः—

(१) पुढारीं माणसें तेवढीं छत्रपति हातीं धरीत, ह्मणजे त्यांच्या मागोमाग बाजारी सहज च येऊन त्यांना मिळत.

(२) मसलतीच्या वेळीं कोणत्या पुढाऱ्यानें किती माणसें आणावीत हें ठरलेलें असे.

(३) मावळे देशमुख याप्रमाणें वेळेवर माणसें घेऊन येत असत.

(४) या लोकांना दर नफर अर्धा आणा किंवा अच्छेर धान्य रोजमुरा मिळत असे. मीठ, मिरची, तेल वगैरेसाठीं आणखी अर्धा आणा धरला तर दर माणसीं अवघां एक च आणा फार तर खर्च येई.

(५) या शिवाय छत्रपतींचें खडें सैन्य असे, तें निराळें.

(६) चंद्रराव मोऱ्याचे राज्याचा विस्तार किती असावा याचा अंदाज होतो.

१ सहा रुके ह्मणजे अर्धा आणा. २ प्रमाणें. ३ हकिकत. ४ मनास.

(७) आपल्या सर्व दुःखाचें परिमार्जन करण्याचें स्थान म्हणजे श्रीशिवछत्रपतींचे चरण होत, असा विश्वास एकंदर समाजांत १५७३ त किंवा तत्पूर्वीच उत्पन्न झाला होता.

वैशाख वद्य ३ शके १८३७ } शंकर श्रीकृष्ण देव

श्री

# श्री एकनाथांच्या नांवाची चोरी

शके १६८८ व्यय संवत्सर कार्तिक शु॥ १ इंदुवार तिसरा प्रहर हा या पोथीचा सामाप्ति काल आहे. इचा कागद बराच आधुनिक दिसतो. लिपि अर्थात आधुनिकच आहे. पोथी ११ बोटें लांब असून ८ बोटें रुंद आहे; अध्याय ३० असून पानें २५५ आहेत, एकूण ओवी लेखकानें दिल्यावरून ३३४२ आहेत, आंतील काव्यासंबंधें पुढें देणारच असल्यानें, सध्या इतकेंच लिहीतों कीं, तें अत्यंत नीरस आहे. कवि स्वतःस " जनार्दनाचा एका " म्हणून प्रत्येक अध्यायाचें शेवटीं म्हणवीत आहे. परंतु हा कवि खरोखरच पैठणचे श्री एकनाथ हेच कीं काय, याचा निर्णय पुढें केलेलें विवेचन ऐकून श्रोत्यांनींच करावयाचा. हा प्रस्तुतचा प्रतिपाद्य विषय आहे. माझ्या मतें सदरहूचा कवि श्रीएकनाथ नाहीं. हा कोणी तरी अशिक्षित, मूढ व असंस्कृत मनाचा मनुष्य असून त्यानें श्रीनाथांचें नांव घेऊन, प्रस्तुत ग्रंथ प्रचलित करण्याचा निंदास्पद प्रयत्न केलेला आहे.

ग्रंथ श्रीकृष्णचरित्राचा आहे. कांहीं अध्यायांचे शेवटीं कर्तानें समाप्तिलेख दिला आहे तो असाः—



" इति श्रीमन्महाभागवते दशमस्कंधे हरिवंश संहितायां एकाकार टीकायाम्"— इत्यादिः—

येथें कवीनें महाभागवत व हरिवंश संहिता यांची घातलेली ही जोडी विलक्षणच दिसते. महाभारताचा हरिवंश हा एक भाग आहे, अशी आजपावेतोंची समजूत आहे. प्रसिद्ध असलेल्या हरिवंशाचे प्रत्येक अध्यायाचे शेवटीं—

" इति श्रीमहाभारते खिलेषु हरिवंशे"— असें स्पष्ट आहे. " महाभारतांतील खिल संज्ञक हरीवंश असा याचा अर्थ असून " महाभागवतांतर्गत हरिवंश संहिता " प्रस्तुत ग्रंथकर्त्यानें कोठील आणली हें कळत नाहीं. ही मोठी ढोबळ चूक अथवा ही असंबद्धता श्री नाथांनीं केली असें भावण्यास ही बुद्धि धजत नाहीं. तथापि ही रचनाकाराची नसून लेखकाची चुकी कदाचित् असेल असें समजून यावरून कांहीं एक अनुमान न काढतां, ज्या ग्रंथाचा आपण आधार घेतला आहे असें कविच स्वतः म्हणतो, त्या हरिवंशाच्याच दृष्टीनें दोहों ग्रंथांच्या अंतर्गत पुराव्याचा तौलनिक असा विचार करूं.

## कंसोत्पत्ति

(१) कंस हा कोणाचा अवतार व कोणापासून याची उत्पत्ति यासंबंधीं हरिवंशांत असें वर्णन आहे—

" तस्य ( उग्रसेनस्य ) पुत्रत्वमापन्नो योऽसौ विष्णोस्त्वया हतः । कालनेमि र्महादैत्यः संग्रामे तारकामये ॥ ६४ ॥

कंसो नाम......॥ ५४×६४–६५

यावरून कंस हा ' कालनेमी ' राक्षसा-

चा अवतार होता हें स्पष्ट दिसतें; त्याची उत्पत्ति हरिवंश अशी देतोः—

सुयामुनं नाम नगं तवमाता रजस्वला ।
प्रेक्षितुं सहिता स्त्रीभिर्गतावै सकुतुहलात् ।
अथ सौभपतिः श्रीमान् द्रुमिलोनाम दानवः।
भविष्यत् दैव योगेन विधात्रा तत्र नीयते ।

तेथें उग्रसेनाचा वेश घेऊन द्रुमिलानें कंसमातेशीं संभोग केला व त्यामुळें कंसाची उत्पत्ति झाली. ही आधारभूत ग्रंथांतील ह्मणजे हरिवंशांतील कथा झाली; आतां या कथेहून अत्यंत भिन्न व चमत्कारिक अशी जी कंसोत्पत्तीची कथा हा कवी आपल्या ग्रंथांत देत आहे. ती अशीः—

रामावतारीं विरंची व मरीचि असें दोन राक्षस होते; त्यांनीं कौंडिण्यऋषीचा नंदन जो हरिश्चंद्र ( १ ) त्याची पत्नि चंद्रानना आणली; आपण टाकलेला बाण फुकट गेल्यावर श्रीराम विरंची राक्षसानें मायेनें निर्माण केलेल्या आश्रमांत आले; तेथें त्यांची व चंद्राननेची गांठ पडली; तिनें श्रीरामास आश्रमाचें सत्य स्वरूप सांगितल्यावर, त्यांनीं बाणांनीं मरीचि (विरंची?) स ठार मारलें. मरीचीनें, चंद्राननेसंबंधीची राहिलेली आपली भोगेच्छा व्यक्त करून ती आपण पुढील जन्मीं तृप्त करून घेऊं असें ह्मणून प्राण सोडिला. चंद्रानना ही पुढील जन्मीं उग्रसेनपत्नि झाली. मरीचि कोण झाला हें स्पष्ट सांगितलेलें नाहीं, परंतु—

तोचि मरीचि राक्षस हा तत्वता ।
दैत्यवंशीं जन्मला ॥

एवढेंच मोघम ह्मटलें आहे. या मरीचीचा व चंद्राननाअवतार जी उग्रसेनाची भार्या तिचा नगरांतील राजवाड्यांत समागम झाला व त्या समागमापासून कंस जन्मला असा येथें उल्लेख आहे.

ह्या वर्णनावरून हा कथाभाग हरिवंशांतील वर दिलेल्या कथेला धरून नाहीं हें सहजच ध्यानांत येईल. कौंडिण्याचा पुत्र हरिश्चंद्र, मरीचीचा भाऊ विरंची इत्यादि कथाभाग अश्रुतपूर्व आहेत. असो.

## पूतनावध

( २ ) यानंतर या ग्रंथांत हरिवंशास सोडून जी दुसरी कथा दिलेली आहे, ती पूतनेसंबंधीं होय. पूतनेचे उत्पत्तीचा हरिवंशांत उल्लेख नाहीं जो आहे तो इतकाच. " कस्यचित्त्वथं कालस्यशकुनींवेषधारिणी । धात्री कंसस्य भोजस्य पूतनेति परिश्रुता ॥ "

ही कंसाची धात्री पूतना पक्षीवेष धारण करून श्रीकृष्णाकडे गेली. तिचे उत्पत्तिविषयक आतां हे आमचे कवि काय ह्मणतात तें पहा—

उग्रसेनाच्या पत्नीवर मरीचीनें केलेल्या बलात्कारानें कंसोत्पत्ति झाल्यानंतर द्रमिल राक्षसानें, पक्ष्याचें रूप धारण करून, भारद्वाजाची सून जी विरोचना तिजवर बलात्कार केला असतां तें वीर्य तिनें काढून टाकिलें तें एका जांभळाच्या फळावर पडलें; तें जांभूळ उग्रसेनाच्या पत्नीनें भक्षिल्यामुळें तिला गर्भ राहिला व पुढें मुलगी झाली. तीच ही पूतना. ( ब्राह्मण पत्नीवर बलात्कार केल्याचें वर्णन करण्याचा या कवीचा विशेष कटाक्ष दिसतो.) या आपल्या कथेस आधार ह्मणून कवीनें महारामायण दिलें आहे. श्रीवाल्मिकी रामायण हें च महारामायण मानल्यास त्यांत ही कथा नाहीं.

तेव्हां हें महारामायण कोठील हें कळत नाहीं, याचें नांव ही कधीं ऐकलेंसें स्मरत नाहीं. तेव्हां या कथेस आधार कोणता हें एक गूढ च आहे. असो.

उग्रसेनाची देवकी ही कन्या आजपावेतों सर्वश्रुत आहे. परंतु त्यास आणखी यशोदा ही कन्या होती व ती त्यानें नंदास अर्पण केली; हा कथाभाग अश्रुतपूर्व आहे. या कवीनें या दोघींस बहिणी बहिणी करून एक वसुदेवास व दुसरी नंदास दिली होती असा उल्लेख केला आहे.

उग्रसेन देखुनि कन्या उपवरा ।
येक नंदा येक वसुदेवा अवधारा ।
करिता झाला लग्नविचारा ।
अर्पिल्या दोघी दोघांसी ॥ ३×३१ ॥

या कथेस हरिवंशांत आधार नाहीं.

आतां आपण

## योगमाये

कडे वळूं. जिला कृष्णाकरितां ह्मणून बळी दिला, ती देवी गगनांत गेली असतां कंसास उद्देशून हरिवंशांत फक्त इतकें च ह्मणते.

तस्मात् तवान्तकालेऽहं कृष्यमाणस्य शत्रुणा।
पाटयित्वा करैर्देहं उष्णं पास्यामि शोणितम् ।

भागवतांत

किं मयाहतया मंद जातः खलु तवान्तकृत् ।
यत्र क्व वा पूर्वशत्रुः माहिंसीः कृपणान्वृथा ।

असा उल्लेख आहे. परंतु हा ग्रंथकार तर—

अरेरे मूर्खा मथुरेनाथा ।
कां नेणशी रे भ्रमसी चित्ता ।
तुझ्या जिवांलागीं तो तत्वता ।
गोकुळीं श्रीकृष्ण वाढतसे ।

असें वर्णन करितो; ह्मणजे कंसास त्याचा शत्रु उत्पन्न झाला आहे. इतकें सांगूनच ही देवी स्वस्थ बसत नाहीं तर त्याचा वास कोठें आहे तेंही तिनें सांगून टाकिलें आहे. या सकृतदर्शनी क्षुल्लक दिसणाऱ्या भेदामुळें पुढें जो घोटाळा उडाला आहे तो असाः हरिवंशांत केशी नामक दैत्यावांचून इतर कोणतींही अरिष्टें कंसानें श्री कृष्णावर आणिलेली नाहींत. तीं गोकुळांत स्वतःसिद्धच उत्पन्न झालेलीं आहेत; कारण तों पावें तों त्याला श्रीकृष्ण हा आपला वैरी असून तो गोकुळांत अगर व्रजांत वास करित आहे, हें माहीत नव्हतें. या कवीनें मात्र सर्व राक्षस कंसानें च श्रीकृष्णावर पाठविले. असें वर्णन केलें आहे. आतां हीं जीं संकटें श्रीकृष्णावर आलीं अथवा कवीच्या ह्मणण्या प्रमाणें कंसानें आणिलीं त्याच्या संबंधी ही आधारभूत हरिवंशांत व प्रस्तुत ग्रंथांत एकवाक्यता नाहीं. हरिवंशांत जे प्रसंग वर्णित आहेत. ते या क्रमानेंः—

१ शकटासुर, २ पूतना, ३ कालिया, ४ धेनुक, ५ प्रलंब, ६ अरिष्ट, ७ केशी व ८ कंस

यांत शकटासुर गाड्याचे रूपानें, पूतना पक्ष्याचे रूपानें, अरिष्ट बैलाच्या रूपानें, व केशी घोड्याच्या रूपानें श्रीकृष्णावर चालून आले. या वरील आठ दैत्यांपैकीं धेनुक व प्रलंब यांस बलरामानें मारिलें आहे. परंतु बलरामांचा हा उत्कर्ष या कवीस सहन झालेला दिसत नाहीं इतके च नाहीं तर त्यानें एकेप्रसंगीं बलरामास ह्मणजे जेष्ठ बंधूस श्रीकृष्णाचे पायीं नमन करण्यास लाविलें आहे. ( हें वर्णन पुढें येईलच ) इतका हा कृष्णभक्त कवि कोण पंथी होता? असो, या कवीनें श्रीकृष्णावर आलेल्या प्रसंगाचा

निर्देश प्रस्तुत ग्रंथांत खालीं दिल्याप्रमाणें केलेला आहे:—

| | | |
|---|---|---|
| १ (अ) रिष्टासुर | ४ वत्सासुर | ७ केशी |
| २ पूतना | ५ कालिया | ८ बकासुर |
| ३ महाबलभट | ६ शकटासुर | |

हा भेद, यांच्या परस्पर वर्णनांत अधिक स्पष्टतेनें दृग्गोचर होतो, म्हणून त्यांचे थोडक्यांत वर्णन करितों:—

( १ ) रिष्टासुर—यानें गळ्यांत वांधण्याचें दोऱ्याचें रूप घेतलें होतें, व तो दोरा दूताबरोबर कंसानें पाठविला होता. रिष्टासुराचा नाश झाल्यावर दूत अंधळे झाले, त्यांस कृष्णस्मरणानें पुन्हा नेत्र आले असें येथें वर्णन आहे. तसेंच (२) पूतनेनें पक्षिणीचें रूप घेतलेलें नाहीं. ( ३ ) महाबळभटाची कथा येथें जास्त आहे. ( ४ ) वत्सासुराचेवेळीं श्रीकृष्ण स्वतः वत्स होतात यास मूळांत आधार नाहीं. (५) कालीयाचे बाबतींत तर या ग्रंथकारानें फारच मौज केली आहे. श्रीकृष्णास नागस्त्रियांनीं कालियाच्या शक्तीचा धाक घातला असतां श्रीकृष्णांनीं आपले सहस्रफणांचें अनंतरूप प्रकट केलें व नागस्त्रियांचा गर्व हरण केला. वस्तुतः बलराम हे अनंताचे अवतार होत व असेंच वर्णन आधारभूत ग्रंथांत आहे; प्रलंबवधाचेवेळीं श्रीकृष्णांनीं बलरामाची अनंत या नांवानें स्तुति केली आहे.

देवैर्न दृष्टश्चान्तस्तेतेनानंत इति स्मृतः
॥ १४×४३

असो. श्रीकृष्णांनीं कालियास पराभूत करून त्याचे नाकांत वेसण घालून त्यास यमुनेबाहेर आणलें असें येथें वर्णन आहे. ही वेसण घातलेली कालिया सर्पाची मूर्ति या ग्रन्थकारानें कोठें पाहिली अगर वाचली असेल कोणास ठाऊक !

मग अश्व करूनि हृषिकेशी ।
वरिता वसे जगदात्मा परियेसी ।
विसणी घालोनि नाकासी ।
मग वरुता जी निघाला ॥ १०×१६२॥
यशोदानंद अवलोकी नयनीं ।
कालियाते अश्व करूनि ।
यमुनेमाजी घोळतसे ॥ १०×१६५

सर्पाचें नाकांत वेसण कशी घालावयाची? अथवा श्रीकृष्णप्रभूस अशक्य काय ? किंवा या ग्रन्थकारास दुर्बोध काय ? वरील उतारा लक्ष्यपूर्वक वाचला तर असें दिसून येईल कीं पूर्वीचे ओवींत व नंतरचे ओवींत आपण काय विधानें केलेलीं आहेत व तीं कशीं परस्परविरोधी आहेत, याचें कवीस भानही राहिलेलें दिसत नाहीं. १६२ वें ओवींत ‘ वरुता निघाला ’ व १६५ वींत ‘ यमुनेमाजी खेळत ’ हा परस्पर विरोध कवीचे नजरेतून निसटलेला दिसतो परंतु असला विरोध हा एवढा च या ग्रंथांत आहे असें मुळीं च नाहीं त्यांची येथें समृद्धि आहे; असो.

हे कालियाचें अख्यान झालें; पुढें (६) शकटासुरास कंसानें पाठविलें आहे परंतु त्यास आपले च रूपांत पाठविण्यांत कवित्व काय ? असें जाणून च कीं काय कवीनें त्यास

वेष पालटूनि परम सूक्ष्म निका ।
जाला चित्रविचित्र पांखरू पा ॥१८५॥

पक्ष्याचे रूपांत पाठविलें आहे.

‘ जि ’ व ‘ पा ’ यांची या ग्रंथांत इतकी रेलचेल आहे कीं कोणास जरूर लागल्यास त्यानें या काव्यांतून आपली गरज खुशाल भागवून घ्यावी, व इतकें करूनही

या काव्याचें स्वारस्य–असल्यास–कायम राखतां येतें

हरिवंशांत अगर भागवतांत या शकटासुरानें गाड्याचें रूप घेतलें आहे, व पूतनाही हरिवंशांत पक्षिणीरूपानें आली आहे. येथें कवीनें शकटासुरास प्रथम पक्षी केलें व पूतनेची पक्षीस्वरूपाची उणीव भरून काढिली, पण शेवटीं त्यास श्रीकृष्णाकडून जो मारविला आहे तो असा:

मग मकर तोंडीं धरिला ।
उचलूनी धरणी वरि आपटिलां ।
शतचुर्ण करुनी भंगिला ।
जाळा मृत्य शकटाचा ॥ १०×१९८

ह्मणजे येथें या राक्षसाचें पहिलें पक्षीरूप जाऊन त्यांस गाड्याचें रूप आलें आहे. अशा रितीनें कवीनें हरिवंशाची पुन्हां तोंडमिळवणी केली आहे. येथें विरोधात्मक वर्णनाचें कौतुक करावें, कां,ही अगाध कल्पकता ह्मणून साश्चर्य व्हावें ! असो. शकटाचे वधानंतर (७) इंद्रानें आपला करभार मागण्या करितां दूत पाठविले असें येथें वर्णन आहे. हरिवंशांत अगर भागवतांत इंद्रास संतुष्ट करण्या करितां हे गोपमहोत्सव करित असत इतकाच उल्लेख आहे.

प्रासंशक्रमहं वीरौगोपांश्चोत्सव लालसान् ।

परंतु करभार घेण्या करितां इंद्रानें आपले दूत पाठविले हें वर्णन कोठें ही नाहीं; यांत कदाचित् कविकल्पनेंचा उत्कर्षच असेल असें या कवीस भावलें असल्यास न कळे; या पुढील प्रसंग— केशी राक्षस कृष्णास मारण्यास आल्याचा आहे. त्यास श्रीकृष्णानीं निवळे असें वर्णन हरिवंशांत आहे.

द्विपाद् पृष्ठ पुच्छार्धे श्रवणैकाक्षिनासिके ।
केशिनस्त द्विधाभूते द्वेचार्धे रेजतुः क्षितौ ॥
२४×४९

परंतु ते या कवीस न पटून धेनुकास ज्या तऱ्हेनें बलरामानें मारिलें आहे तसें वर्णन त्यानें केशीचे मरणा संबंधीं दिलेलें आहे. कदाचित् धेनुकरूपी गर्दभ व केशीरूपि अश्व यांतील भेद त्यास दृग्गोचर झाला नसावा ! यापुढें बकासुराचें जें वर्णन दिलें आहे. तें तर फारच मौजेचें व अश्रुतपूर्व आहे.

बकासुराचा हरिवंशांत मागमूस नाहीं; भागवतात त्यानें गाई, गोप, व वत्सें यांस गिळील्याचें वर्णन आहे. येथें भागवतकारावर या कवीनें तोड केली आहे ती अशी: —

श्रीकृष्णांनीं आपल्या संवगड्यासह यमुनेचे तीरीं जें सहभोजन केलें त्याचा प्रसाद आपल्यास मिळावा ह्मणून देवांनीं मत्स्यरूप धारण केलें होतें, हें श्रीकृष्णांनीं जाणून यमुनेंत हातच धुवूं नका ह्मणून गोपाळांस आज्ञा केली व अशा तऱ्हेनें देवांस निराश केलें, असें भागवतांत एके ठिकाणीं वर्णन आहे. याचा फायदा आमचे कवीनें घेऊन, बकासुरानें जे गाई, गोपाळ गिळंकृत केले ते एकीकडे सारून त्या कल्पनेची जोड वरिल देवरूप मत्स्यांस दिली आणि त्या बकाकडून ते मत्स्यरूपी देव गिळविले. अशा रितीनें या कवीनें त्या दोन्ही कल्पनांचा समुच्चय केलेला आहे. देव बकासुराच्या पोटांत गेल्यावर इन्द्रपत्नि ‘ शचि ’ श्रीकृष्णास शरण आली; तव्हां भगवंतांनीं त्या असुराचा निःपात केला. या दोन कल्पनांचें एकीकरण कर-

ण्यांत दोष एवढाच कीं त्यास आधार कोठे ही नाहीं. नवीन पुराण रचण्याचा अधिकार या कवींनीं आपणांकडे घेतला होता कीं काय नकळे? तसें करणें हि एका दृष्टीनें इष्टच आहे; परंतु मग ' हरिवंश संहितायां ' असला हवाला देणें अनिष्ट होतें.

तेव्हां अशा ह्या विषयमांडणीवरून एक गोष्ट सिद्ध होते, ती ही कीं, या कवीस श्रीकृष्ण चरित्राची रूपरेखा मात्र माहित होती; क्रम, कालपरंपरा अथवा विशेष वर्णन त्यांचा त्यास मुळींच परिचय नव्हता व तोंडी माहिती अथवा आठवण यांच्या आधारानें त्यानें हें भारूड रचिलें असावें. त्यांतही परस्पर विरोधाची समृद्धि केलेली आहे. तेव्हां असला विरोध आणि आधार ग्रंथास सोडून केलेलें हें वर्णन ही नाथांच्या लेखणीतून उतरली आहेत, कीं काय याचा विचार आपणच करावा. परंतु हा सामान्य विचार सोडून देऊन, श्री नाथांच्या इतर ग्रंथांची व या ग्रंथाची तुलना केल्यास एक विशेष नजरेस येतो तो असा–नाथांचा कोणताही ग्रंथ उघडून पाहिला असतां श्रीज्ञानेश्वरीतील रचनेच्या थाटाचें प्रतिबिंब त्या त्या ग्रन्थांत स्पष्ट दृग्गोचर होतें. नाथांचे विचार व त्या विचारांची मांडणी ही, श्रीज्ञानेश्वरांच्या धर्तीवर बहुतेक गेलेली आहे, असें या दोन्ही संतश्रेष्ठांच्या ग्रन्थांचें जो परिशीलन करिल त्याच्या नजरेस सहज येईल. वस्तुतः श्रीज्ञानेश्वरानंतर झालेल्या सर्व मराठी कवींच्या ग्रंथांत श्रीज्ञानेश्वरींतील विचारांची छटा कमी अधिक प्रमाणानें दृग्गोचर होते. त्यांत नाथांचें ग्रन्थांत तर ती अधिक स्पष्टतेनें नजरेस येते, असा माझे ह्मणण्याचा भाव आहे. प्रस्तुत ग्रंथ जर नाथांचा मानावा तर त्या ग्रन्थांत श्रीज्ञानेश्वरांच्या विचारांचें किंचित तरी प्रतिबिंबि दिसावयास पाहिजे होतें, परंतु त्याचा येथें मागमूस हि दिसत नाहीं. या कवीचे विचार प्रगल्भ नाहींत, ओवी आटपशीर नाहीं, तींत कोणत्या हि रसाचा परिपोष नाहीं, उच्च कल्पना नाहीं अथवा शब्दचमत्कृति हि नाहीं. श्रीनाथांचा व्यवस्थितपणा व उत्कर्ष, वामनाचें पांडित्य, मुक्तेश्वरांचा प्रसाद अथवा समर्थांची भेदकता, यांचा तर पूर्णतेनें या कवित्वांत अभाव आहे च, परंतु श्रीधर, शिवकल्याण, अथवा महिपति, यांचें हि सरळ कवित्व या ओवींत दिसत नाहीं. येथें कोणतेहि रसाचा परिपोष तर असोच परंतु तो करण्याचा प्रयत्नही दृग्गोचर होत नाहीं. गद्यांत सांगण्याऐवजीं वेडी वाकडी व आधाररहित अशी कथा वृत्तरूपानें सांगितली आहे, व त्या वृत्तानें ओंवीचें स्वरूप घेतलें आहे इतकेंच श्रीकृष्णचरित्रांत कंसहनना पावेतों कां होईना, कोणता रस उत्पन्न होत नाहीं.? गोपींचा सात्विक श्रृंगार, गोपाळांशीं केलेला विनोद, श्रीकृष्णवियोगकालीं देवकीचा व यामुनीयऱ्हदांत त्यांच्या पतनकाळीं यशोदेचा, आणि अक्रुरासह व्रजांतून प्रयाणकालीं गोपींचा, करुणविलाप, पूतनेचा व केशी आदी दानवांचा रौद्रनाश, कौंसाचे सभारंगीं केलेला वीररस, कालियाचे भयानक मर्दन, इत्यादी सर्व रसांचे पोषक असे अनेक प्रसंग, या गोड चरित्रांत ( व सर्वच इतर ईश चरित्रांत ) आहेत. त्यांचा उठाव करणें-स्वशक्त्यनुसार-हें कवीचें कर्तव्य आहे. तसा प्रयत्नहि ज्यानें केला नाहीं त्यानें लेखणी हातांत धरण्याचेंहि साहस करूं नये.

थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे या प्रस्तुत

कवीची कविता अत्यंत गचाळ आहे. या माझे ह्मणण्याचे समर्थनास कांहीं वेंचे देण्याचें कारण नाहीं; ग्रंथाचें कोणतें हि पान उघडून पहावें व त्यांतील वाटेल तो भाग वाचावा ह्मणजे माझे विधानाची प्रतीति येईल; पण असली रचना हा कदाचित् दोष ही ह्मणतां येणार नाहीं कारण सर्वच कवी नाथासारखे प्रतिभासंपन्न कोठून असावयाचे तेव्हां कदाचित हा दोषही नाहीं अथवा असल्यास तो क्षम्यही होईल. परंतु तसल्या रचनेनें हि जे विचार या कवीनें आपले कथानकांत प्रकट केले आहेत अथवा त्या कथेंतील श्रेष्ठ व्यक्तींच्या तोंडीं घातले आहेत ते सर्वथैव अनार्यास योग्य असे च असल्यानें या कवीनें फार मोठा अक्षम्य दोष केला आहे. त्या वरून या ग्रंथाचे रचनाकार श्रीनाथ तर नव्हेतच परंतु हा मुळीं राष्ट्रीय कवीच नाहीं असें दिसतें. हा दोषारोप फार महत्वाचा व ह्मणून विशेष जबाबदारीचा असल्यानें त्याचें सविस्तर विवेचन करणें जरूर आहे.

येथें राष्ट्रीय कवित्वाची माझी कल्पना काय आहे, तिचें प्रथम थोडक्यांत विवेचन करितों.

## मराठी कवितेचें स्वरूप.

शके १११० पासून तों तहत १७४० पावेतों उपलब्ध व प्रसिद्ध मराठी कवितेचा साकल्यानें जर विचार केला तर आपल्यास असें दिसून येईल कीं, तिचें कितीहि विविध रूप असो तिच्यांत वैयक्तिक व सामाजिक स्वरूपा आमच्या धर्माचें, नीतीचें, व व्यवहाराचें अत्युच्च जें ध्येय त्याचें कथानकरूपानें अथवा सूत्ररूपानें प्रतिबिंब स्पष्टतेनें पडलेलें असतें, नांव घेण्यासारखे सर्व मराठी कवि संस्कृतज्ञ होते ह्मणजे त्यांच्या मराठी कृतीस पूर्व परंपरा होती. जेथें राष्ट्रीय धेय प्रतिबिंबित आहे व जेथें पूर्व परंपरा आहे अशी कविता आणि तिचे रचनाकार कवी राष्ट्रीय होत. ह्या ह्मणण्यांत केवळ द्विरुक्ती मात्र होते. उदाहरणें देणें ह्मणजे स्वतंत्र भारत व रामायण उतरून काढणें आहे. वैय्यक्तिक गुण घ्या अथवा सामाजिक किंवा ज्यांस राष्ट्रीय ही ह्मणतां येईल असे गुण घ्या त्यांचा आपल्या स्पष्ट व अधिकार आणि प्रसादयुक्त वाणीनें धर्म, नीति अथवा व्यवहार, यांपैकीं एक अथवा या सर्व दृष्टींनीं उपदेश केला नाहीं, असा एकही कवि माझे वाचण्यांत नाहीं, अथवा प्रस्तुत ग्रन्थ वाचीपावेतों नव्हता, मराठी कवितेचा हाच विशेष आहे. ईश्वरकृपेनें अथवा यदृच्छेनें जी ही जीवयात्रा वाट्यांस आली आहे, तिला कांहीं प्राप्य आहे ह्मणजे प्रत्येकाचें कांहीं कर्तव्य आहे, अशा दृष्टीनें आह्मीं या मनुष्यादि योनीकडे पहातों. सृष्टि ही अहेतुक नाहीं, ह्मणजे तिच्या उत्पत्तींत कांहीं हेतू आहे, असा च याचा अर्थ होतो. तो हेतु कोणता एवढा च दाखवून आमचे कवी रहात नाहींत तर तो साध्य करण्याचें भिन्नभिन्न मार्ग कोणते, ते ही आपले प्रसादवाणीनें ते स्पष्ट करतात. हेतु स्पष्ट झाला व मार्ग ही कळले ह्मणजे प्रकृत्यनुरूप ज्यास जो योग्य मार्ग तो तो स्वीकारतो. इतकी कामगिरी करून ही आमची मराठी कविता थांबत नाहीं. त्या हेतूस विघातक जे गुणधर्म त्यांचा ही ती निर्देश करते. या दृष्टीनें

आमच्या कवितेस व कवींस मी 'राष्ट्रीय' ही संज्ञा देतों. या कवितेंत वैयक्तिक गुणांचा कथानकरूपानें अथवा राष्ट्रीय (सामाजिक) गुणांचा सूत्ररूपानें उपदेश केलेला असो तिचें ध्येय एक च आहे, मार्ग भिन्न इतकें च. सुख, संपत्ति, सत्ता आणि मान, हें ऐहिक ऐश्वर्य, त्या धेयास साधन ह्मणून जतन करणें च नव्हे, तर त्याचा लाभ करून घेणें, ही इष्ट आणि अवश्य आहे; परंतु हीं वर दिलेलीं ऐश्वर्याची अंगें सर्व अथवा या पैकीं कोणतेंही एखादें जरी त्या धेयाचे उपाधी ह्मणून आड येत असेल तरी ते सोडणेंच अधिक श्रेयस्कर आहे, अशी मराठी कवितेची शिकवण आहे. तसेंच ऐहीक ह्मणजे च परमार्थिक–कारण व्यवहार आणि परमार्थ यांची अशीच कांहीं गोड सांगड आमच्या मराठीं संत कवींनीं परंपरेस अनुसरून घातली आहे, कीं हे जरी दोन भिन्न शब्द आहेत तरि त्यांचा परिणाम अथवा त्यांचे स्वरूप एकच आहे—अभ्युदयास मूळ पाया प्रकृति गुणांचा असल्यानें, कायिक, वाचिक, आणि मानसिक, तप हें सर्व स्वार्थ—परमार्थास अधिष्ठान आहे, आणि ह्मणून कथानक रूपानें जी संतांची शिकवण आहे, तिच्यांत वैय्यक्तिक गुणांचा उत्कर्ष अधिक स्पष्टतेनें चित्रित आहे. परमेश्वरीलीला वर्णन करीत असतां सुद्धां आमचे मराठी कवि त्या मर्यादेचें उल्लंघन करीत नाहींत. परमेश्वरानें मनुष्यरूप धारण केलें कीं आपलें ईश्वरत्व विसरून त्यानें स्वधर्माप्रमाणें आचरण केलें च पाहिजे. प्रस्तुत प्रसंगीं श्रीकृष्णांचें च उदाहरण घ्या.

श्रीकृष्ण हे परमेश्वर होतें तरी त्यांनीं मनुष्यत्व अंगिकारिलें होतें, हें आमचा कोणताही मराठी कवी विसरला नाहीं. बाल, पौगंड, आणि यौवन या अवस्थांतील चरित्र वर्णनाचें मर्म त्यांतच आहे. पुत्र, बंधु, पिता, भर्ता, सुहृद, राजा, मंत्रि, आणि सेवक, या भिन्न भिन्न परिस्थितींतील भिन्न धर्म अवतारी पुरुषानेंहि यथायोग्य पाळीलेच पाहीजे असें चरित्रानें स्पष्ट करणे प्रत्येक कवीस आपलें कर्तव्य वाटलें आहे. व त्याप्रमाणें त्यानें वर्णन केलेंही आहे. तेव्हां वर दिलेल्या राष्ट्रीय कवित्वांचा विशेषाचें जेथें अवतार ह्मणून केलेल्या वर्णनांत सुद्धां (वर सांगितलेल्या धर्मांपैकीं एखाद्या धर्माचें कां होईना) उल्लंघन झालें आहे, तेथें 'राष्ट्रीय' या मानास तो कवि मुकला ह्मणून समजावें. ही चुकी आमच्या कोणत्याही मराठी कवीकडून झालेली अद्याप माझें वाचण्यांत आली नाहीं. तशांत श्री नाथांनीं तशी केली असेल, हा विचार हि मनास किळसवाणा वाटतो. परंतु हाच प्रमाद प्रस्तुत ग्रंथांत, 'जनार्दनाचा येका' ह्मणविणाऱ्यानें केलेला आहे, आणि तोहि पण एकदा नसून अनेकवेळां केलेला आहे; कसा तो पहा.

श्रीकृष्ण जन्मल्यावर त्यांस गोकुळांत घेऊन जाण्यास वसुदेव निघाला असतां वाटेंत यमुना अडवी आली; ती पाण्यानें तुडुंब भरली असल्यानें आपण सुखानें मुलास कसें पार घेऊन जाऊं अशी त्यास मोठी चिंता पडली. हरिवंशांत यासंबंधीं कांहींच उल्लेख नाहीं. भागवतांत सीतापति श्रीरामचंद्रास जशी सिंधूनें वाट दिली तद्वत यमुनेनेही दिली; इतकेंच लिहिलें आहे. इतरत्र वसुदेव धैर्यानें तसाच यमुनेंत शि-

रला असतां यमुनेचें पाणी वर चढूं लागलें, ह्मणून श्रीकृष्णानें आपले चरणां गुष्ठानें त्यास स्पर्श केला. यमुनेनें स्वतःस कृतार्थ मानून वसुदेवास वाट दिली, असा उल्लेख आहे. हा सर्व आधार तुच्छ करून प्रस्तुतचे कवीनें या प्रसंगाचें वर्णन असें केलें आहे.

कृष्णपक्षाच्या निबिड अंधकारांत पावसाची धार लागली असतां क्षणोक्षणीं चमकणाऱ्या विद्युल्लतांच्या प्रकाशानें वसुदेवास पुढें असलेली जलभरित यमुना दिसली.

मग चिंता परम वसुदेवासी ।
काय विचारु करावा यासी ।

अशी त्याची सचिंत स्थिति झाली व त्याचे तोंडून असे उद्गार निघालेः—

आतां आलें यथार्थ मरण ।
कैचें पहावया देवकीचें वदन ।
आमचा मूळ छेदावया श्रीकृष्ण ।
बरा पोटासी आला पां ।

जन्मतः दिव्य लक्षणांनीं युक्त, विशेषतः श्रीवत्सलांछन ज्यास आहे, अशा आपल्या बालकास पाहून ज्या वसुदेवानें त्याची

उवाच वसुदेवस्तु रूपं संहर वः प्रभो ।
भीतोऽहं देव कंसस्य तस्मादेवं ब्रवीम्यहम् ।

अशी प्रार्थना केली ह्मणून हरिवंश वर्णन करतो व इंद्रादि देवांसह निराळ्या शब्दांनीं स्तुति केली ह्मणून भागवतकार ह्मणतात, तसेंच देवकीनें वसुदेवासमक्ष श्रीभगवंताची पंचवर्षात्मक मूर्ति पाहून सविस्मय स्तुति केली व भगवंतांनीं तिला पूर्वजन्माचें स्मरण दिलें. तो च वसुदेव, यानें आपल्या कुलत येऊन त्याचा उच्छेद आरंभिला आहे, असा उद्गार काढील अथवा असला विचार तरी मनांत आणील काय? असे उद्गार काढले अथवा ते विचार हि मनांत आले असें वर्णन करणारा कवि आर्य संस्कृतींत वाढलेला नाहीं. त्यास हिंदुत्व नाहीं, कारण त्यास हिंदूंचे विचारांची परंपरा नाहीं. फार काय तें मन च हिंदूचें नाहीं. आश्चर्य पहा कीं, श्रीकृष्ण हा मुळावर जन्मला असा विचार येण्यास देवकीचें मुख आतां कसें दिसेल ही काळजी वसुदेवास उत्पन्न झाली, असें या कवीनें वर्णन केलेलें आहे. या वरून त्यास वसुदेवाची भूमिका फार चांगली अवगत झाली असें दिसतें. परंतु एवढ्यानेंच या ग्रंथकाराची परीक्षा होत नाहीं. पुढचा थोर चमत्कार पहा. हा वसुदेवाचा विचार चालला आहे, तों त्यास श्रीकृष्णांनीं उत्तर दिलें.

मग हास्य करूनि बोले त्यासी ।
निंद्य उत्तर बोलतां दोष आह्मांसी ।
परि देखिला असे मूर्ख दृष्टीसी ।
ज्ञानहीना मूर्ख पै ॥

ही बिनतोड बाजू झाली. श्रीकृष्ण हे परमेश्वराचे अवतार आहेत. तेव्हां तात्पुरत्या मानलेल्या बापास, एकदां नव्हे, दोनदां मूर्ख—ह्मणण्यास प्रत्यवाय काय? असा तर या कवीचा भाव नव्हे?

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।

तेव्हां क्वचित प्रसंगीं विचार पडला तर आपणांसही आपल्या पितरांस, चुकलों पित्यास, मूर्ख ह्मणण्याचा हा एक धडाच भगवंतानीं घालून दिला ह्मणावयाचा शिव! शिव! या तुटपुंज्या ज्ञानाच्या भिकारड्या ग्रंथकारानें जर ह्या ओव्या लिहिल्या नसत्या व त्या माझे पाहण्यांतच आल्या नसत्या तर असल्या क्षुद्र व पापमय शब्दांनीं माझी लेखणी कां विटाळली असती! तिला

आतां भगवत्स्तुतीनें प्रायश्चित्त देतों.

वसुदेव उवाच—

विदितोऽसि भवान् साक्षात् पुरुषःप्रकृतेःपरः॥
केवलानुभवानंदस्वरूपः सर्व बुद्धिदृक् ॥
सत्वं त्रिलोकस्थित ये स्वमायया ।
बिभर्षि शुक्लं खलु वर्णमात्मनः ॥
तथैव सर्गाय रजसोपबृंहितम् ।
कृष्णं च वर्णं तमसा जनात्यये॥
त्वमस्य लोकस्य विभोरिरक्षुः ।
गृहेज्वतीर्णोऽसि ममाखिलेश्वर ॥

असो.

या कवीचें हें "पितृदेवो भव" यावरील भाष्य झालें. आतां पतिपत्नीचे संबंधाचा एक मासला पहा.

माभळभटाची नेमणूक श्रीकृष्णावर झाली तेव्हां गोकुळास जाण्यास निघण्यापूर्वी तो स्वगृहीं गेला व पाहतो तों आपली स्त्री दुसरीकडे भिक्षेस जात आहे.

तंव त्याची कांता परगृहासी ।
मार्गी जात होती धान्यासी ।
येरें देखूनि "रंडे" परते घरासि ।
जाति कोठें जाण पां ॥ ६९॥

ओवी मासलेवाईक नाहीं असें कोण ह्मणेल. आपल्यास पतिराजांनीं 'रंडे' ह्मटल्यावर बाईनीं उत्तर दिलें, अथवा कवि च तिचेकडून उत्तर देववितो.

आतां इतुकें चि जी करणें ।
नापिकातें बोलावूं पाठविणें ।
केसांतें खंडण करणें ।
जावें अवलोकूनि स्वामिया ॥ ७४ ॥

येवढ्यानें या 'रंडेची' तृप्ति झाली नाहीं.

मीच बोलावीन त्या नापिका ।
दाखवीन माझी स्वरूपरेखा ।
मंगळसूत्र तोडूनि देखा ।
हातीं त्याच्या देतसे ॥ ७६ ॥

हा पतिपत्नीचा संवाद पैठणच्या श्रीएकनाथांचा आहे असें मूर्खही ह्मणणार नाहीं, मग ज्यांस बुद्धि आहे असे आपण त्या आपणांस तसें वाटतें काय ?

या कवीनें 'मातृदेवोभव' यावरील भाष्य या ग्रंथांत श्रीकृष्णानें केलेल्या आपल्या मातेच्या अधिक्षेपरूपानें (२२×७×१७) केलेलें आहे, बळिरामास श्रीकृष्णाचे पायां पडावयास लाविलें आहे, (२१×४०) उग्रसेन, नंद, यांची श्रीकृष्णांनीं निर्भर्त्सना केली आहे. (९×२२, २१×२२,) तेव्हां असला हा विपरीत भावनांचा, माता, पिता व सुहृद् या सर्वांसच मूर्ख ह्मणणारा, उन्मत्त, श्रीकृष्ण या ग्रंथकारानें कोठून आणिला ? हा आमचा हिंदूंचा खास दिसत नाहीं. हा मानभावांचा तर नाहींना? कारण असल्या विपरीत भावना त्यांनीं आपल्या 'लीला संवादांत' मोठ्या गोडीनें गायिलेल्या आहेत. असो.

या कवीचे कवितेचे मासले देण्याची जरूर नाहीं असें मी प्रथम ठरविलें होतें, परंतु प्रसाद ह्मणून ज्यांत ओतप्रोत भरलेला आहे, असें कांहीं वेंचे येथें दिल्यावांचून, या लेखाची पूर्तता करूं नये, असें वाटून त्याचे थोडेसे मासले खालीं देतों; त्यांवरून ही रचना श्रीनाथांचीच कीं कसें हें निश्चित करण्यास आपणांस फार सुलभ जाईल.

यशोदा प्रार्थी सटवीसी ।
गुप्तपणें बोलती जाली तिचेसी ।
सटविचा गे सटवा तुजपासी ।
त्यासी प्रार्थी पा ॥ ७×४६ ॥

गोकुळीचा मार्ग कोणता असें ।
'लेका' ब्राह्मणा तुज काय दिसे ।
आला गोकुळीहून मथुरेस ।
जासी फिरोनियां ॥ ८×९० ॥

काय हा प्रसाद! लेका हा शब्द या कवी-ला अत्यंत प्रिय आहे, असें या ग्रंथावरून दिसतें. कृष्णास त्याचे सर्व सवंगडे 'लेका कृष्णा' ह्मणून हांका मारतात; आणखी थोडे मासले पहा,

आर्धांच जातीचे ब्राह्मण ।
आह्मीं पाठविते शतमूर्ख जाण ।
येणें घेतला विशेष धाक ।
नागवेंच उभें असे ॥ ९×११ ॥
यास पुसावी काय वार्ता ।
बाहीर घाला लाता हाणोनि तत्वता ।
ऐसें निरोपिलें जी दूता ।
मग दूतीं ब्राह्मण घातला ॥९×१२॥

ही ब्राह्मणाची निंदा नाथांच्या लेखणींतूनच निघाली काय? नौकाक्रीडनाचे वेळीं श्रीकृष्ण गोपींस ह्मणतातः-

केला गे तुह्मीं माझा घात ।
ह्मणूनी शंख करी पा ॥ ९ × ५२ ॥

श्रीकृष्णांनीं पांचजन्य बराच वेळ आस्फुरिला असेल, परंतु या कवीनें त्यांचेकडून येथें हाताचा शंखनाद करविला आहे. कंस श्रीकृष्णास चुकवून बायकांत पळाला व तेथें त्यानें स्त्रीवेष धरला असें दिसतें तेव्हां श्रीकृष्णानीं—

मग धांवूनि मणगटीं धरिली ।
वोढोनि बाहेर काढिली ।
मामाची मामी कैसी झाली ।
लात हाणितली तिसी पां॥१७×१४१

या 'पा' नें तर मला कंटाळा आणिला. ही कंसहननाची हकीकत या कवीनें कोठून आणिली न कळे.

आतां गोपाळांचा वीररस पहाः—
मग गोवळ ह्मणति रे 'लेका'।
काय पुढें जाऊं सन्मुख ।
काय 'बेट्या' काय यौवनाचा देख ।
तोडूनि आणूं सीर 'पां' ॥२०×४८॥

या ग्रन्थांतील विचार, विकार, कवित्व अथवा शब्दचमत्कृती यांपैकीं कशाचें वर्णन करावें! वर दिलेल्या उताऱ्यांवरून कवीची प्रतिभा आपल्यापुढें मूर्तिमंत उभी राहिली असेल तेव्हां आधींचेंच असलेलें तिचें हिडिस स्वरूप आणखी स्पष्ट करण्याची काय अवश्यकता आहे ह्मणून आतां उतारे देत नाहीं.

हें काव्य नाथांचें आहे अशी शंका हि मनांत येत नाहीं, तेव्हां हें कोणाचें असावें! या प्रश्नाचें निश्चित उत्तर देणें थोडें कठीण आहे.

या कवीनें श्रीनाथांचें नांव चोरलें आहे यांत शंका नाहीं. श्रीज्ञानेश्वरांचे नांवावांचून मराठी वाङ्मयांत इतरत्र नांवाची अशी चोरी झालेली माझे पाहाण्यांत नाहीं कदाचित् हे दोन्ही ही तस्कर एकच सांप्रदायी असावेत.

शक १६९० तील जयरामानें श्रीदासबोधाची केवळ टीका करूनहि आपले ग्रंथांत त्याबद्दलचा उल्लेख केलेला नाहीं; तसेंच श्रीधरसमकालीन "रघु" कवीनें ब्रह्मांडपुराण रचून त्यांत श्रीधराच्या शिवलीलामृताचे अध्यायचे अध्याय घेतले आहेत. अथवा श्रीधरानें रघूचे घेतले असतील. (दोघेही समकालीन), परंतु परस्परांनीं

आपले ग्रंथांत परस्परांचा उल्लेख केलेला नाहीं. असे चमत्कार मराठी कवितेच्या प्रचंड प्रसारांत दृग्गोचर होतात, परंतु वाचकाचा बुद्धिभेद करावा या बुद्धीनें स्वतःस " जनार्दनाचा येका " ह्मणवून ग्रंथरचना करणारा असा चोर आजपावेतों या पवित्र वाङ्मयांत एकावांचून अधिक सांपडला नव्हता, आणि ह्मणून हे समधर्मी असावेत असा माझा तर्क आहे. असलें हें दुसरेंच उदाहरण उपलब्ध झाल्यानें मी या ग्रंथावर इतकें विस्तृत लिहिण्याचें साहस केलें आहे! एरवीं इतका काल व येवढे श्रम यांचा अपव्यय करण्याइतकी योग्यता या ग्रंथाची नाहीं हें उघड आहे; परंतु सविष सर्पाचे गुणदोष जाणण्यांत हि परिणाम हितकरच होतो ह्मणतात. असो.

या अंतररचनेवरून हा ग्रंथ नाथांचा नाहीं हें माझें मत निश्चित झालेंच आहे, परंतु त्या विधानास इतर हि प्रमाणें आहेत. तीं अशीं:—

या ग्रंथाचे शेवटीं असा एक उल्लेख आहे—

येथूनि रुक्मिणीस्वयंवर।
पाणिग्रहण अग्रधार ।
विटंबना रुक्मियासि निर्धार ।
पुढील रसप्रेम ऐकिजे ॥

या वरून हा ग्रंथ अपुरा आहे व रुक्मिणीस्वयंवर वर्णनात्मक पुढील अध्याय या ग्रंथकारानें रचिले आहेत हें उघड होतें. श्री नाथांनीं रचिलेलें—रुक्मिणीस्वयंवर हा एखाद्या ग्रंथाचा भाग आहे, असा त्या ग्रंथावरून मुळींच भास होत नाहीं, तेव्हां तें स्वतंत्र प्रकरण रचिल्यानंतर त्याच प्रकरणाची पुनरुक्ति करण्याची अवश्यकता नव्हती, अगर एकदां येथें तो कथाभाग आल्या नंतर पुन्हां त्याचें स्वतंत्र प्रकरण रचण्याची हि जरुरी नव्हती. कसें ही असो, श्री नाथांस हाच कथाभाग दोनदां रचण्याची अवश्यकता नव्हती. इतकें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. तेव्हां हा ग्रंथ रुक्मिणीस्वयंवरकार श्रीनाथांचा नाहीं.

पण याहून ही आणखी एक महत्वाचें प्रमाण या ग्रंथांत आहे. तें असें कीं कंसानें श्रीकृष्णाच्या बाल्यावस्थेंत जो राक्षस ' दोरा ' याचे रूपानें पाठविला होता त्या बरोबर ' गाठी ' पाठविली होती असें वर्णन प्रस्तुत ग्रंथांत आलेलें आहे. अंतर्गत—पुराव्यावरून ही कृति नाथांची नाहीं अशी ज्यांची अद्याप हि खात्री होत नाहीं, त्यांनीं " गाठी " ही अर्वाचीन वस्तु नाहीं, असें दाखविलें पाहिजे. असो.

या तऱ्हेनें विचार, विकार, प्रतिभा व कथानक, यांपैकीं प्रत्येक दृष्टीनें प्रस्तुत ग्रंथाचा विचार केला असतां हा ग्रंथ श्री नाथांचा नाहीं, असें माझें स्पष्ट मत आहे. हा कवि यास कवि ह्मणणें हि दुष्कर आहे. बहुधा हिंदुधर्मीय नसावा, मग तो मानभाव असो, किंवा ख्रिस्तानुयायी असो. अनार्यास योग्य व अवास्तव अशा श्रीकृष्णाच्या वर्णनानें हा ग्रंथकार मानभाव होता अशी मला दृढतर शंका येते व त्यानें श्री नाथांच्या नांवाची गर्हणीय चोरी केली आहे.

**गो. का. चांदोरकर.**

---

श्रीगजानन

## सटीक विवेकसिंधु

मला पुणें येथें माझे मित्र वो रा० लक्ष्मणभट्ट काळे यांचे जीर्णग्रंथाचे रुमालांत १ मुकुंदराजनिर्मित सटीक विवेकसिंधु ( संस्कृत व मराठी ), २ रतीरहस्य (सं.), ३ विश्वकोश खंडांत (सं.), ४ वैद्यकी संस्कृत मराठी कोश, ५ मंत्रसंग्रह व दुसरे चार

पांच मौल्यवान पोथीचे रूपांत असलेले ग्रंथ उपलब्ध जाहले. सदरहु ग्रंथ मंडळास सादर करण्याकरितां मंडळाचे सेक्रेटरी यांचे हवालीं केले आहेत. रा० काळे यांजकडे हे ग्रंथ कसे आले याचा तपास करतां, ते त्यांस श्री ॐकारेश्वराचे मंदिराजवळ पंचनदीकर नांवाचे भिक्षुक होते, त्यांजकडून मिळाले असें समजलें. पुढें पंचनदीकर यांचा शोध करितां अंतीं प्लेगमुळें त्यांची नक्कल होऊन घरदारही सर्व विल्हेस लागल्याचें समजलें. यामुळें जास्त ग्रंथ मिळण्याचें व मिळालेल्या ग्रंथासंबधें जास्त शोध करण्याचें, हीं दोन्हीं कामें ही खुंटलीं. असो. वाङ्मय व इतिहास या दोहोंचे दृष्टीनें पाहतां उपरिनिर्दिष्ट ग्रंथ बरेच महत्वाचे आहेत, हें सांगावयास नकोच. वैद्यकी कोश हा शंभर वर्षांपूर्वीचा असून हल्लींचे कोशाचे धर्तीवरच अ पासून ज्ञ पर्यंत वर्णानुक्रमवार लिहिलेला आहे. भावप्रकाश नामक वैद्यक ग्रंथांत येणारे वनस्पत्यादि सर्व वैद्यकी शब्दांचें स्पष्टीकरण यांत केलेलें आहे. शंभर वर्षांपूर्वीही मराठी भाषेच्या अभिवृध्यर्थ तत्कालीन ग्रंथकारांचे प्रयत्न नेटानें चालू होते, हें या कोशावरून स्पष्ट होत आहे. एकादे तज्ञ गृहस्थानें वाग्भट, सुश्रुत, चरक, वगैरे ग्रंथांतील शब्दांची टिपेच्या रूपानें यांत भर घालून हा कोश प्रसिद्ध केल्यास फारच चांगलें होणार आहे. असो; मला दोन शब्द आद्यकवि मुकुंदराज-निर्मित सटीक विवेकसिंधु संबंधें सांगावयाचे आहेत. सटीक विवेकसिंधु ह्मणजे हल्लीं प्रचलित असलेल्या विवेकसिंधूवर टीका नसून मूळ संस्कृत श्लोक व त्याजवर हल्लीं प्रसिद्ध असलेला विवेकसिंधु ही त्याची टीका अशा रूपाची ही पोथी आहे. मूळश्लोक संस्कृत देऊन त्या प्रत्येक श्लोकावर एक एक ओवी टीका ह्मणून दिलेली आहे थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे हा समश्लोकी विवेकसिंधु आहे. पोथीचे मुखपृष्ठावर चौकोनांत

श्री सटीक विवेकसिंधु प्रारंभ॥श्रीरामचंद्र॥
श्री मुकुंदराजविरचित जयतपाळ जयति ॥

असें दोन ओळींत लिहिलेलें आहे. ग्रंथारंभाचे ह्मणजे पूर्वार्धाचे पूर्वी तांबडे शाईनें ॥ श्रीगजाननायनमः ॥ असें लिहून नंतर संस्कृत श्लोक लिहिले आहेत. ते येणेंप्रमाणें आहेत.

( १ ) श्रीहरं जगदाधारं संविदक्षरमव्ययं ॥ अभिवंद्यात्मविज्ञानोऽपदेशविधिरुच्यते ॥ द्वितीय पाठ ॥ (२) श्रीहरं जगदाधारमरविंदाक्षमक्षरं ॥ अभिवंद्यात्मविज्ञानोऽपदेशविधिरुच्यते ॥ ( ३ ) नित्यमव्ययमनंतमक्षरं ॥ सच्चिदद्वय सुखैक विग्रहं ॥ तत्वमस्यादि वचनार्थमीश्वरं ॥ भावयाम्यहमहमहर्निशं गुरुं । ( ४ ) श्रीमुद्गलसमोपास्य गुरोः पादांबुजद्वयं ॥ नत्वा मुकुंदः ॥ कुरुते विवेकामृतमादरात् ॥ हे श्लोक जाहल्यानंतर 'मूळ श्लोक प्रारंभ' असें लाल शाईनें लिहून नंतर संस्कृत श्लोक दिला आहे व संस्कृत श्लोक जाहल्यानंतर टीका असें ह्मणून त्या श्लोकाखालीं हल्लीं प्रसिद्ध असलेल्या मराठी विवेक सिंधूंतील ओवी दिली आहे. हा क्रम सर्व पोथीभर पाळलेला आहे. या ग्रंथाचे उपलब्धीनें कांहीं वादग्रस्त प्रश्न उद्भवतील. श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत अमृतानुभव ग्रंथावर संस्कृत टीका आहे व मोरोपंतांचेहि कांहीं ग्रंथांवर संस्कृत टीका रचली आहे. त्याप्रमाणें मूळ मुकुंदराजकृत विवेकसिंधु मराठींत असून ही टीका दुसरे कोणींतरी केली असावी असें कांहींचें ह्मणणें पडेल, तर कांहीं मूळ संस्कृत श्लोक मुकुंदराजांचे असून प्रसिद्ध असलेला विवेकसिंधु त्यांच्या कोणातरी शिष्यानें अगर दुसरे कोणी मराठींत संस्कृताचे आधारानें लिहिला असें ह्मणतील व तिसरा पक्ष दोन्हीहि कृति मुकुंदराजनिर्मितच आहेत असें ह्मणणारा निघेल व मीहि या मताचाच आहे. प्रथमतः मूळ संस्कृत कृति मुकुंदराजांचीच आहे, असें माझें मत, या ग्रंथाचें परिशीलन केलें आहे त्यावरून, जाहलें आहे, जयतपाळराजाची आज्ञा जाहल्यानंतर विवे-

कसिंधु प्रथमतः महाभाष्याचे रूपानें गद्यांत मुकुंदराज मुनींनीं लिहिला. हिंदुस्थानांतील इतर भागाप्रमाणें महाराष्ट्रांतहीं विद्वान् ग्रंथकार आपलें विचार-प्रदर्शन संस्कृतांतच करीत होते, व हल्लींचेहि मोठमोठे पंडितांस आपले विचार संस्कृतवाणीनें च अलंकृत करावे असें वाटतें; इतकेंच नव्हे तर, ते हल्लीं करीतांहि आहेत. मुकुंदराजाचे काळीं ह्मणजे साडेसातशें वर्षांपूर्वी संस्कृतांत विचारप्रदर्शन करणें हें अगदीं स्वाभाविकच असलें पाहिजे आणि तदनुसार मुकुंदराजांनीं विवेकसिंधु प्रथमतः गद्यरूपानें लिहून नंतर पद्यांत लिहिला असावा व त्याचा लाभ अज्ञ व असंस्कृत जनतेस मिळावा हें मनांत आणून नंतर प्राकृतांत ओंवीबद्ध त्याचें रूपांतर केलें असावें. पुढें मुसलमानी अमलामुळें संस्कृताचा ऱ्हास होत गेला व ती भाषा अगदींच मृत होऊन गेली. त्यामुळें संस्कृत विवेकसिंधु मागें पडून मराठी तेवढाच अस्तित्वांत राहिला. संस्कृताची गरज नाहींशी झाल्यामुळें हस्तलेखकांनीं मराठी ग्रंथाचेच तेवढे तरजुमे करून घेण्याचा परिपाठ ठेवला व मूळ-संस्कृताचा लोप झाला. मूळ संस्कृत श्लोक मुकुंदराजांचेच असावेत यास या पोथींतच कांहीं प्रमाणें सांपडतात.

१ ग्रंथारंभीचे श्लोक वरती दिले आहेत, त्यांतील चवथा श्लोकः-श्रीमुद्गल समो-मुकुंदःकुरुते विवेकामृतमादरात ॥ यावरून मुकुंदराज हा च कर्ता होतो. तो श्लोक जाहल्यानंतर ‘ मूळ श्लोक प्रारंभ ’ असें ह्मणून संस्कृत श्लोक दिला आहे व त्यावरील टीका ह्मणून मराठी ओंवी दिली आहे. याप्रमाणें च ग्रन्थाचें उत्तरार्धाचे आरंभीं ह्मणजे आठवे प्रकर्णाचे प्रारंभास ग्रंथारंभापूर्वी सहा संस्कृत श्लोक दिले आहेत.

॥ ॐकारस्येहपादैस्त्रिभिरभिगहितो यः प्रपंचः समष्टिर्व्यष्टयात्मा तेन यत्नात्छबलमिह परं ब्रह्मतत्वं पदार्थः ॥ वाच्यैतावीशजीवौ श्रुतिगुरुवचनात्छोधितौ लक्ष्य संज्ञौ यश्चोंकारार्धमात्रा कथितमसिपदे नैक्यमाहुस्तयोज्ञाः ॥१॥ शिष्येष्वन्येषु सत्स्वप्यहमधिकक्रुपा प्राप्तवानस्मि जातो ग्रंथं सद्बोधसिद्धोः करोति सुगमं वेदवेदांतसारं ॥ एवं विज्ञापितः सूत्रवनंताशिरसा जैतपालेन धीमान् ॥ सद्यश्चक्रे मुकुंदो मुनिरतुलमहाराष्ट्रवाणिं विगुंफाम् ॥ २ ॥ सद्यः संजायते साक्ष्यादपरोक्षात्मवेदनम् ॥ यदाकर्ण्य विवेकाब्धेरुत्तरार्धतदुच्यते ॥ ३ ॥ ब्रह्माविष्णुमहेशादि लीलाविर्भावकारणं प्रकृत्याश्लिष्टेमनिशं पुरुषं भावयाम्यहम् ॥४॥ सच्चिदानंदपूर्णात्मवेदनं यन्निपाततः ॥ विवेकामृतसद्ग्रंथोत्तरार्थमधुनोच्यते॥५॥ अनाद्यविद्याभयतापहारी विशुद्ध विज्ञान विकाशकारी ॥ संसेव्यतात्मानु सुखानुभूत्यै विवेकसिंधोरितिरुत्तरार्धम् ॥ ६ ॥ हे श्लोकझाल्यानंतर ‘ मूळ श्लोक प्रारंभ ’ असें वाक्य लिहून संस्कृत श्लोक दिला आहे तो असाः कथितं ग्रंथपूर्वार्धमगाधोत्तरमर्थतः ॥ यत्र भाति परं ब्रह्म विशुद्धं विश्वरूपकम्॥१॥ या श्लोकावरून व वर श्लोक दिले आहेत त्यांवरून संस्कृत कृतीचा कर्ता मुकुंदराज मुनिच होय हें स्पष्ट होत आहे. सोळावे प्रकर्णाचे शेवटीं ह्मणजे या ग्रंथाचे शेवटचे प्रकर्णांत १२० वा श्लोक, एवं आचार्यबोधेन याथार्थ्यं कथितं मया मुकुंदराज योगेन वर्णितो ग्रंथ उत्तमः ॥ असा आहे यावरून हि मूळ संस्कृत मुकुंदराजांचेंच होय, हेंच दृढ होत आहे.

उत्तरार्धास आरंभ केला आहे तेथें हि मूळ श्लोक प्रारंभ ह्मणून, नंतर संस्कृत श्लोक दिला आहे व मराठी ओवी टीका ह्मणूनच दिलेली आहे, यावरून मूळ संस्कृत हें मुकुंदराजांचें च आहे, हें निर्विवाद ठरत आहे. मला विवेकसिंधूच्या हस्तलिखित दोन प्रती शक १११० देणाऱ्या मंडळाचे सेक्रेटरी यांनीं दिल्या आहेत, त्यांत रा. चांदोरकर यांस जोगाईचे अंबे येथें उपलब्ध जाहलेली एक प्रत आहे. ही प्रत शके १७१२ मध्यें लिहिलेली आहे. या पोथीचे पूर्वार्धाचे पहिले प्रकरणांत सोळावी ओवी जाहल्यानंतर दोन संस्कृत श्लोक दिले आहेत.

येतै रसैः परिचिता वाक्य मान्य वधूरिव ॥ अतो न विदुषां प्रीतिः तस्यां च स्वार्थहानितः ॥ १ ॥ यापुढें आणखी एक श्लोक दिला आहे. नंतर लालशाईनें टीका असें ह्मणून, येर नवरसाची उपलवण। ते तव उघडा वाचेसी नागवण ॥ ह्मणोनी न प्रवर्ते शाहणा ॥ तिये अर्थि विषयि ॥ हा श्लोक सटीक विवेकसिंधूंत ॥ रसैः श्लेषैः परिचिता वाक् सामान्य वधुरिव ॥ अतो न विदुषां प्रीतिस्तेषां स्वार्थस्य हानितः ॥ अशा पाठभेदानें दिलेला असून त्यावरील टीका ह्मणून वरील ओवीच दिलेली आहे. या पोथींत ह्मणजे जोगाईचे अंबे येथील प्रतींत आणखीहि अशीं च एक दोन स्थळें सांपडतात. सप्तप्रकरणात्मक पूर्वार्ध संपल्यानंतर उत्तरार्धास प्रारंभ केला आहे. उत्तरार्धाचे प्रारंभीं तीन संस्कृत श्लोक देऊन नंतर टीका हा शब्द लाल शाईत घालून पुढें ग्रंथास सुरवात केली आहे. टीका शब्द घालून सांघितलें ग्रंथाचें पूर्वार्ध ॥ जेथ अर्थ पाहतां आगाध। निरोपिलें विशुद्ध ब्रह्म विश्वाकारें ॥ ही व या पुढील सर्व ओव्या दिल्या आहेत; यावरून शके १७१२ मध्यें ही मराठी विवेकसिंधु होता तो मूळ नसून टीकारूपानेंच होता हें अगदीं जोगाईचे अंबेचे प्रतीवरून स्पष्ट होत आहे; यांत संशयास जागा विलकुल ही राहात नाहीं ह्मणजे संस्कृत कृति ही मूळची ह्मणजे मुकुंदराजमुनिर्मितच आहे, हें सिद्ध होत आहे. आतां मराठी रूपांतर मुकुंदराजांचेंच आहे हें ही थोडक्यांतच सिद्ध होण्यासारखें आहे. एकतर संतपरंपरा मुकुंदराजांस विवेकसिंधु व परमामृत वगैरे ग्रंथांवरून मराठीभाषेचे आद्यकवी ह्मणून मान देत आहेत व हा समज श्री ज्ञानेश्वरमहाराज, श्री एकनाथमहाराज, यांपासून तों आजचे पंढरपूर येथील साधुसंतांपर्यंत ही चालत आला आहे. ही मराठी कृतिहि मुकुंदराजांचीच आहे या ह्मणण्यास एक बळकट पुरावा आहे; शिवाय मूळ संस्कृत व त्यावरील मराठी ओवीबद्ध टीका यांची एकरूपता इतकी जाहलेली आहे कीं या दोन्ही कृति भिन्न कवींच्या आहेत हें ह्मणतांच यावयाचें नाहीं. जो रस, जें प्रेम, जो प्रसाद व जी स्फूर्ति संस्कृतांत आहे तोच रस, तेंच प्रेम, तोच प्रसाद व तीच स्फूर्ति मराठींत ही तंतोतंत उतरली आहे. हें संस्कृत श्लोक व त्यावरील मराठी टीका हीं जो कोणी एकदा ही वाचील त्यास वरवरती सहजच दिसून येणार आहे. उत्तरार्धाचे प्रारंभीं सटीक विवेकसिंधूंत व जोगाईचे अंबेचे प्रतींत प्रारंभीं कांहीं संस्कृत श्लोक दिले आहेत. त्यांत ॥ शिष्येष्वन्येषु सत्स्वप्यहमधि (क) कृपापात्रवानास्मि जातो ॥ ग्रंथं सद्बोधसिंधोः करोति सुगमं वेदवेदांतसारं ॥ एवं विज्ञापितः सन्नवनत शिरसा जैतपालेन धीमान् ॥ सद्यश्चक्रे मुकुंदो मुनिरतुल महाराष्ट्रवाणी विगुंफा ॥ हा श्लोक दिला आहे. यावरून कोणी संस्कृत विवेकसिंधु मुकुंदराजनिर्मित नसून मराठी मात्र मुकुंदराजांचीच कृति आहे असा तर्क काढतील. परंतु मराठी कृति मुकुंदराजांची आहे, एवढेंच यावरून ठरेल; परंतु संस्कृत कृति त्यांची नाहीं, असें मात्र या श्लोकावरून बिलकुल निघत नाहीं. वास्तवीक पाहतां हा श्लोक उत्तरार्धांत आला आहे हें अगदीं चुकीचें आहे. महाराष्ट्रवाणींत जर ग्रंथ रचावयाचा तर ग्रंथाचे प्रारंभींच ह्मणजे पूर्वार्धाचे प्रारंभीं त्याचें निदर्शन करावयास पाहिजे होतें. परंतु येथें तसें जाहलेलें नाहीं. शिवाय हा श्लोक अशुद्ध व असंस्कृत असा आहे व आहे याच ठिकाणीं त्याचा अर्थ कांहीं ही होत नाहीं. याच अर्थाचा श्लोक आपल्या मंडळानें मुकुंदराज-

प्राणित जें माहाभाष्य प्रसिद्ध केलें आहे त्याचे शेवटीं श्लोक दिला आहे तो हि थोडा अशुद्ध आहे. परंतु गुरुपरंपरा वगैरे तेथें दिली असल्यामुळें तेथें तो विसंगत स्थितींत दिसत नाहीं. तेव्हां या श्लोकांत कोणींतरी फेरफार करून अस्थानींच ह्मणजे उत्तरार्धात घुसडून दिला आहे. मुकुंदराजनिर्मितच हा श्लोक आहे असें ठरलें, तरी ही माझें च ह्मणण्यास बळकटी येत आहे. ह्मणजे मराठी कृति ही मुकुंदराजांचीच आहे संस्कृत कृति ही त्यांची नाहीं. असें अनुमान या श्लोकापासून बिलकुल निघत नाहीं या सटीक विवेकसिंधूंत व छापील मराठी विवेकसिंधूंत एक मोठा विशेष आहे. छापील प्रतींत पुर्वार्धाचीं प्रकरणें सात व रार्धाची अकरा मिळून आठरा आहेत व हस्त लिखित सटीक प्रतींत पूर्वार्धाचीं प्रकरणें सात व उत्तरार्धाची नऊ मिळून सोळा च प्रकरणें आहेत. दाहावें सच्चिदानंद पदत्रयविवरण व अकरावें गुरुप्रशंसा निरूपण हीं प्रकरणें नाहींत सोळावे प्रकरणीं ग्रंथ पुरा करून ॥ शालीवाहन शकोत्पत्ती। तैं ग्रंथाची समाप्ति जाली जयत्पाल संगती। श्रीगुरुप्रसादें ॥ अशी ओवी दिली आहे यावरून सोळावें प्रकरण लिहीपावेतों जयजयत्पाल राजा हयात होता हें सिद्ध होत आहे व पुढील दोन प्रकरणें नंतर लिहिलीं असावीं असें जोगाईचे अंबेचे प्रतींत अकरावे प्रकरणांत एकशे तेहेतिसावी ओवी दिली आहे तीवरून निष्पन्न होत आहे. ॥ वर्षे शके अकरा दाहोत्तरु। साधारण संवत्सरु। राजा शारंगधरु। राज्य करी ॥ या ओवीवरून जैतपाल राजाचे आज्ञेनें लिहिलेला ग्रंथ त्याचे हयातींत पुरा न होतां शारंगधराचे कारकीर्दीत तो पुरा जाहला असें निघत आहे. सटीक प्रतीवरून सोळा प्रकरणें जैतपालाचे हयातांत लिहीलीं गेलीं असें ठरत असल्यामुळें मूळ विवेकसिंधु सोळा प्रकरणाचा च असावा व दाहावें व अकरावें हीं प्रकरणें मुकुंदराजांनीं मागाहून ह्मणजे जयत्पालानंतर लिहिलेलीं असावीं असे निष्पन्न होत आहे. सटीक विवेकसिंधूच्या अंतर्गत उताऱ्यावरून संस्कृत कृति मुकंदराजांची च आहे व मराठी प्रसिद्ध असलेला ग्रंथ ही त्यावरील टीका होय; हें दाखविलें आहे. आतां बाहेरील पुरावे सांपडतात ते देतों.

जयत्पालासंबंधानें जी एक आख्यायिका प्रसिद्ध आहे ती निर्णयसागरमध्यें प्रसिद्ध जाहलेल्या सार्थ परमामृत ग्रंथाचे प्रारंभींच दिली आहे. त्यांत जैतपालाचे आज्ञेवरून मुकुंद राजांनीं परमामृत ग्रंथ लिहिला आहे असें ह्मटलें आहे तें चुकीचें आहे. कारण परमामृताचे चवदाही प्रकरणांत कोठें ही जयत्पालाचा नामनिर्देश केलेला नाहीं व ब्रह्मस्वरूपदर्शन समाधीनें कसें व्हावें हेंही विवेकसिंधूंतच सांगितलें आहे व विवेकसिंधूंत जागाजागीं जयत्पालाचा नामनिर्देश केलेला आहे. त्यावरून ही आख्यायिका विवेकसिंधुसंबंधाचीच आहे असें दिसतें सोळावे प्रकरणांत ब्रह्मस्वरूपदर्शन कसें होतें व ब्रह्मानंद ह्मणजे काय व तो कसा प्राप्त करून घ्यावा हें सांगितलें आहे. जयत्पालराजास घोड्यावर बसवून त्यास ब्रह्मनंदाचा साक्षात्कार चाबकाचे फटक्यासरसा करून दिला व नंतर त्यांची समाधी उतरविली व समाधी उतरल्यानंतर जयत्पाल राजांनीं ब्रह्मानंदाची प्राप्ति कशी व्हावी याविषयीं ग्रंथ लिहिण्यास मुनि मुकुंदमहाराज यांस आज्ञा केली व त्याप्रमाणें विवेकसिंधु ग्रंथ निर्माण केला. जयत्पालराजास ब्रह्मस्वरूपदर्शन पाहिजे होतें व तें १६ प्रकरणांत कसें प्राप्त करून घ्यावें हें प्रतिपादिलें आहे. यावरून मूळ विवेकसिंधु १६ प्रकरणाचाच असावा व १७ व १८ हीं प्रकरणें मागाहून लिहिलीं हें उघड होत आहे.

**स. म. दिवेकर.**

# धनगराच्या ओव्या

## नंबर ५

आजपर्यंत आपल्या ह्या मंडळास मी धनगराच्या ओव्या ४ सादर केल्या असून आज ही ५ वी ओवी सादर करीत आहे. ह्या ओवींत धनगराचा देव बिरोबा यानें आपल्या बहिणींचें माहेर करण्यासंबंधीं केलेली लीला वर्णिली आहे. कथाभाग व भाषा ह्या दोन्ही दृष्टीनें प्रस्तुत ओवी मागील ओव्यांप्रमाणेंच संशोधकांस उपयुक्त वाटण्यासारखी आहे.

मु. इसलामपूर
मि. वैशाख शुद्ध १२ } वा. दा. मुंडले.
शके १८३७

## ओवी

ह, सुंबराण मांडल । माळावैल्या धन्याच । सदरच्या स्वामीच । सुंबराण मांडल । धरतरी बा मातच । सुंबराण॰ मेघराया पिल्याच । गुरुकूळ स्वामीच । सुंबराण॰ । कैलासाच्या सांवाच । सुंबराण॰ । बिरोदेव बोलला । गोपाण्या बा बंदवाला । नंदी तुह्मी घेऊन । एकु माकु बहिणीला । आणायला वा जावाव । नंदी स्नान घेतला । चुति भाकरी बांधून । नंदीवर बसला । निघून वा चालला । चिचणी बा मार्गानं । नंदी मग निघाला । सुंबराण॰ ॥ १ ॥ चिचणी बा नगराच्या । सभागर्णी[1] मिळून । पाण्याला वा निघाल्या । तेव्या तांबुळ्या गडणी । वाण्या बामणा गडर्णी । सभागर्णी मिळून । हाताला बा धरून । दुध होळा निघाल्या । एकवा वा साकेवा । दोघीजणी भणीगा । बोलु तवा लागल्या । पापणी बा फरफरली । बंदु मुराळी येतोया । न्यायेला बा येतोया । पाण्याच्या बा घागरी । घागरी वा भरल्या । गोपागायो बंदुगा । नंदीवर बसून । दुध व्हाळा गेलाया । एकवा बा माकवा र । भैणी बोलु लागल्या । सखा बंदु नव्ह गा । मावसा यो बंदु की गा । घागरी बाइनी उचलील्या । हाताला बा धरून । निघून बा चालल्या । एकवा बा माकवा गा । देवळी बा रावळी गा । घागरी बाइनी नेल्यात गा । सुंबराण मांडल ॥ २ ॥ गोपाणा यो बंदु की गा । बंदु बोलु लागला । भणीला वा बोलला गा । नंदी कोठ बांदु गा । आका न्यायला आलोया । दादाच बा लगीन । लगीन बा केलया । एकवा बा माकवा । राग क्रोधान दाटली । माज्या गोपाण्या बंदवाला । भैणी बोलु बा लागल्या । नंदी बांध जा चावडीला । चावडीच्या गा पाराला । मग गोपाण्या बोलला । जातो चावडीच्या पाराला । आका चुति घे भाकरी । घरांत नेऊन ठेवावी । ( बहिणी ह्म॰ ) ठेव ह्मशीच्या बा ह्मोर । आका पाणी बा देवाव । ( उत्तर ) दुधहोळा वा भरलाया । भणिला बोलु वा लागला । आका न्यायेला आलोया । नाहीं आह्मी बा यायेच । माझा गोपाणा बंदु गा । नंदी माघारा फिरविला । माज्या बैरोजी देवाला । तेला अंतरी कळाल । नंदी रिकामा आलाया र । बैरो माज्या देवान । चहुचाकी वा रथ केला । रथ देवान काढीला । वाट बगीत बसला । माजा गोपाणा बंदु गा । नंदी घेऊन गेलाया । बैरो देव वा बोलला । नंदी रिकामा

[1] सौभाग्यवती स्त्रिया ।

आलाया। दादा तुज्या बा भैणी गा। तुझ्या भैणी बा हेकाड। येत नाही त्या झंडल्या। बैरो मग बा देवान। रथ देवान सजविला। बिरोगा देव सजला। रथामंदि बसला। चिचणी बा नगराच्या। वाटन बा सोडला। चौदा चाकी रथ गा। खेळवित बा पळवित। निघून बा चालला। सभा मग घडली। तेल्या तांबुळ्या गडणी। वाण्या बामणा गडणी। साळ्या माळ्या गडणी। गडणी बा मिळून। हाताला बा धरून। पाण्याला बा निघाल्या। मुरावळ चुंबळ। चित्रावळ घागर। घेऊन बा निघाल्या। दुधहोळा गेल्या त्या। बैरो माझा देव गा। रथ मग खेळवित बा पळवित। घेऊन बा निघाला। एकवा बा माकवा। बोलू तवा लागल्या। डावी भूज फरफरली। दादा मुराळी येतोया। रागाल्या बा कुधावल्या। मुराळा बा आलाया। घागरी बाइनी भरल्या। निघून बा चालल्या। एकवा बा माकवा। मग म्होर बगत्यात्या। रथ त्यानी पाहिला। एकु माकु बोलत्यात्या। बंदु गा मुराळी आलाया। घागरी बाइनी उतरील्या। पंचआरत्या घेतल्या। आरत्या बा पाजाळल्या। आडव्या बा निघाल्या। दादाला बा ववाळा। रस्त्याच्या बा आडव्या। बैरो मग देवान। आरत्या बा पाहिल्या। म्होरच तोंड माघार। माघार बा केलया। एकवा बा माकवा। ववाळाया गेल्या त्या। मागील बा तोंड गा। डाव्या अंगा केलया। डाव्या अंगाला गेल्या त्या। बैरो माजा देव की गा। उजव्या मग अंगाला। अंगाला बा केलया। सुंवराण मांडल ॥ ३ ॥ बैरो माजा देव की गा। अंतरीचा शाणा की गा। ववाळून घेतल गा। एकु माकु भणीला। रथ वारु सोडील। दावणीला बांदल। बैरो माज्या देवाला। देवाला बा बोलती। बुति भाकरी ठेवायला। ठेवतो बा आह्मी की गा। बिरो देव बोलला। म्हशीच्या बा म्होर गा। म्होर मग ठेवतो। रथाच बा वारुगा। चावडीच्या बा पाराला। पाराला बा बांदतो गा। दादा पाणी पेवाव। दुधहोळा भरलाया। तथ जाऊन पेतो गा। एकु माकु भणीन। पाट वसाय दिलाया। बस ना बा झालाया। एकु माकु भणी गा। भणी बोलु लागल्या। दादा आह्मी चुकलो। तुह्मी मग बसाव। बिरो देव बसला। एकु माकु भणीन। पाणी बाइन ठेवल। बैरो मग देवाला। हाळद बा काढायच। तेलान बा चोळला। आंगुळीला घातला। एकु माकु भणी गा। साठी उतरंडी गेल्या त्या। साळी डाळी काडिल्या। फेडा फेडा पाकडिल्या। साळी डाळी येळल्या। सैपाक बा केलाया। बैरो माज्या दादा र। जेवायाला उठाव। बैरो दादा उठला। जेवायाला बसला। आका दूध कशाच। दादा दुध गा गाइच। नाहीं मी गा जेवणार। गाइच बा दुद गा। वासरु बा पेत गा। दुद उष्ट हुत गा। दुद काढून घेतल। दुसर दुद वाढल। आका दुद कशाच। दादा दूद म्हशीच। नाहीं मी बा जेवणार। म्हसर बा इरडीला। इरडीला बा जात्यात। ते बा दूद काढल। दुसर दुद वाढल। आका दुद कशाच। दादा दुद मेंढ्याच। नाहीं मी बा जेवणार। मेंढ्या मग आळपान। आळपान बा घालत्यात। ते बा दुद काढल। दुसर दुद वाढल। आका दूद कशाच। दादा दुद शेळीच।

नाहीं मी बा जेवणार । शेरडीच करडु । तोंडावर बा मुतत । नाहीं मी बा जेवणार । —सुंबराण० ॥ ४ ॥

मग तुला कशाच दूध पाहिजे ह्मणून विचारल्यावर वाघिणीच दुध पाहिजे ह्मणून देवान सांगितल. तें दुध असल तर जेवीन नाहींतर जेवणार नाहीं अस देवानं सांगितलं.

सुंबराण मांडल ॥ ४ ॥ एकवा बा भणीन । पाण्यान बा डोळ गा । डोळ बाइन भरल । मांडी कासोटा घातला । ढाल तलवार घेतली । झारी तिन घेतली । निघून बा चाल्ली । आटिंग्या बा वनांत । गवता गाठी मारित । धोंड लगुऱ्या रचित । खुणा करीत निघाली । जंगलांत गेलीया । वाघणीच्या घळीत । एका मग वाघणीच । सात खोपा खाल्यात्या । सरपान खाल्यात्या त्या बा मग घळींत । पिली मग होती गा । सरप बा टपला व्हता । ती गा पिली खायाला । एकवा बा मग गा । झाडावर चडली । नदरन पाहिली । सरप बा टपलाया । एकवा त्या भणीन । तलवार बा उपसिली । सरपाची खांडोळी । खांडोळी बा केल्यात । घळीच्या बा तोंडाला । तोंडाला बा पडली । वाघीण बा चरून । चरून बा आलीया । पिली पाजाया आलीया । पिली गा पिनाति झाल्यात । वाघिणी बा बोलली । कार बाब्यानो पिनासा । काय होई बगाव । खांडोळी बां पाहिल्यात । पिली गा बोलतीं झाल्यात । कुठली एक बाई गा । बाई मग आलीया । तिन गा जीव वाचिवला । तिला खाउ नकस । का बा आली इच्यार । वाघीण बोलत । का ग बाइ आलीस । आमच्या बा बंदवाच । डोळ मग आल्यात । तुमच दुद पाहिजे । औषधाला पाहिजे । घेव बाइ काढून । एकवा त्या भणीन । झारी भरून घेतली । निघून बा चालली । पिली गा पिनाति झाल्यात । कार बाबानो पिनासा । पिली बोलु लागली । त्या बा मग बाईला । घालवून येवाव । वाघिण बा घालवायला । घालवायला बा गेलीया । लांबवर घालविली । एकवा बा भहिण । भैण बोलु लागली । जा ग बाइ माघारी । वाघीण बा गेलीया । सुंबराण मांडल ॥५॥ एकवा बा भण गा । देवळी बा रावळी । रावळांत गेलीया । दुद बाइन तापिवल । बंदवाला बोलली । भाऊ नव्ह वाघ्या र । दुद मग जेवाव । दुद तेला वाढल । बिरो गा देव बोलला । आका सर्व दुद ग । दुद मी गा जेवतो । गोपाण्या बा बंदवाला । बंदवाला बा कस गा । बंदवाला बा दमिवल । ह्मणून बा म्या अस केल । सुंबराण मांडल ॥ ६ ॥

मग देव जेवला. नंतर रथांत बसून दोघी बहिणीला आपल्या घरीं घेऊन गेला. तेथें त्यांस २ महिने ठेऊन घेतल्यावर मग त्यांची पाठवणी केली. ( पाठवणीचें कडवें पुढील प्रमाणें.) सुंबराण मांडल ॥ तवाच्या बा येळला । कामा ( देवाची बायको ) निघून चालली । ढालगांवच्या बाजारला । बाजारला गेलीया र । मग बाजारला गेलीया । चोळी पाताळ काढीत । हा । हा । चोळी पाताळ घेतल र । हा । हा । एका मग बा टक्याच । हा हा । चोळी पाताळ घेतल र । कामा आलीया निघून र । हा । हा । माघार त्यांच बा केलया र । हा । हा ॥७॥

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

# तृतीय संमेलनवृत्ताची

# सूची

## अ


अकोपंत ८२, ८३
अगारुजुवान ४०
अग्रदास १०८
अंगरेज ( इंग्रज पहा ) ६६
अंगापुर ६
अच्यप्पा नाईक ३३
अच्युत २४
अच्युतराव ३०
अजातशत्रु १६२
अण्णिगिरी २०
अतीत ६
अतोलाही देऊ १३
अदिलशाही १२७
अद्वय १११
अद्वयचैतन्य ११०
अद्वैतानंद १०७
अनाजी जनार्दन १२९
अनुभव शतक ११०
अनंत १०२, १२१
अनंदराव सिरके १३०
अंताजी तुक ९५
अंताजी तुकाजी प्रभु कलमुडीकर ९४
अंताजी त्रिंबक देसकुलकर्णी ९५, ९६
अंताजी प्रयाग १३०
अंद्रमुळ ७
अंधेरी १३४
अन्नपूर्णाबाई १०७
अपरादित्य २४
अपा १३२
अपाजी १३२
अपाजी अनंत १३२
अपाजी राम ९६
अफगाणिस्थान १६३
अबाजी १३२
अभ्यंकर ७
अमरनाथ ९४, ९६
अमाजी कान्हो १२८
अमीन बावी ३३, ६४
अमृत १३२
अमृतानुभव १८१
अमृतेश्वर ( देवस्थान ) ४२
अंबाजपंत १४२
अंबाजी मोरदेऊ १२९, १३१
अंबिका १२९
अयोध्या १०२
अरणी १०२
अरियन १५९
अरिस्टॉटल १५७
अलक्षनिधान १११
अलंदी ७५
अल्लूप २०

अवोष्ट्र रामायण ९८
अहमदनगर ५, ७, १२७
अहिनळवाडा १२४

## आ

आइडें ६
आउजी बापुजी ९४, ९५
आंगरे ९२, ९३
आच्यापा नाईक ६०
आतवणे ९५
आत्मा १११
आत्माराम ११०
आत्माराम चैतन्य ११०
आताजी शिवदेव ७५
आदित्यवर्मा २०
आदिनाथ १६६
आनंद १३२
आनंदगिरी १६६
आनंदतनय १०२
आनंदराव काशी ६
आनंदराव भिकाजी ३३,६०,६१,६४
आनंदराव रास्ते ६०
आनंदराव शिवाजी ७३
आनंदराव सुमंत ९१
आपटे १
आबाजी १२१
आबासो मुजुमदार १२२, १४६
आंबवली ९५
आंबे शिवथर ३
आमानसिंग ३१
आलिबहादर ७५
आशिआ १५६,१५७,१६३
आशिआ मायनर १५८
आळंदी १४३

## इ

इंग्रज ७६
इटावे ३१
इंदापुर ४०, ४८
इंदुलि २४
इंद्रप्रस्थ १२४
इराण १५६, १५७-१५९,१६२, १६४
इसलामपुर १२६, १८५

## ई

ईरकर पोवार ३०

## उ

उज्जन १२१
उडपी ७९
उतरोली ४१
उद्धत्र चिद्घन ११०-११४, १२०
उद्धत्र चैतन्य ११०
उद्धव स्वामी १०७
उद्बोधनाथ १०७
उधो बाबाजी १२८
उधो माधव १३०
उनको पटैलु बिन वासुदेऊ पटैलु १४
उंदरगाव ४५
उपाध्याय २५
उभरशेरेकर ३१
उमरावती १४५
उंबरे २८, ७२
उल्हास चैतन्य ११०

## ए

एकदेउ बिन रूपगुडी १४
एकनाथ १०५, १०७-१०९, ११६, १२१, १२३, १२९, १६९, १७४-१७६, १७८-१८०, १८३
एकोडी ३३

एरवडें १४२
एल्फिन्स्टन १४६
एसाजीराम १२८

## ओ

ओंकारेश्वर पुणें ७५
ॐकारेश्वर ( मंदिर ) १८१

## औ

औरंगजेब २९, ३०, ८६, ८७, ८९, ९०
औरंगाबाद ८६, ९०, ९१

## क

कडकोल ३३, ६३
कडीवळ १२१
कडेवळीत १३०
कणेर १२४
कण्वदेव चालुक्य २५
कथासारामृत ११४, १४९
कदम्ब २०, २४
कदलगी ३३
कनकदास ( महार ) १०७
कनोज २०
कन्हदेव यादव २५
कबीर १०६
कबूतरखाना १४७
कमळाकर १०६
कमलाजी पिलदेऊ १५
कमाल १०७
कमाली १०७
करकंब ३५, ४५, ७२
करकंबे ७२
करड ( करहड-कऱ्हाड ) १४, १५
कर्ण १९, २१–२३, १०३, १०४
कर्णाटका ९०
कर्णान्वय सोमेश्वर २१
कर्नाटक ३३, ३५, ७२, ७९, ८१
करनाळें ९५, ९६
करमानंद १०७
करवीर ३९
करूव १३
करुवें १४, १५
करोली ४३
कर्मध्वज १०६
कर्माबाई १०७
कऱ्हाड ८, १२, १३, २१, ३०, ५०, ९१–९४, ९६, ९७, १२७, १३०, १३१
कऱ्हाडकर ९२
कऱ्हेपठार ४४, १२९, १५०, १५१
कलघट्टी ३३, ६२
कलचूरी १९, २०
कलादगी २०
कलिंग २०
कल्याण ४२, ४४, १०२, १२४
कल्याणदास १०७
कल्याणपुर २०–२२, २७
कल्याण स्वामी ११८
कल्याणी २३
कवडे आंबाजी ३०
कविकाळ चैतन्य ११०
कवी कलश ४०
कवी जंग ७
कसबें शिवथर ३
कळवण ७
कळवें १२४
कांगोरी १६७, १६८
काजी अबदुल्ला बिन काजी महमद ४०

काजी इसाक ४०
काजी चांद बिन काशी मनसुर ४०
काण्व चालुक्य २४
कानो पाठक १०७
काजोजी बाबा मोहिते हंबीरराव ३६, ६८
कानोजी मरारचीं कोर्डे १३
कांदाटखोरें १२
कान्हु नयेक बिन एळूगुडी १४
कान्हु महैनरी १४१
कान्हा ( हलालखोर ) १०७
कान्हुर ७
कान्होजी १४३
कान्होजीराव ४६
कान्होजीराव शिर्के ४५
कांबदेव चालुक्य २२
कांबळे ११२
काम्बदेव २३
कायये्वी १४
कारवे १३, १५
कालगांव १२
कालगावकर ३०
काशी ८४, १११, १४७
काशीबाई उर्फ कृष्णाबाई १२१
काशी रंगनाथ १२९
काशीश्वर गोसावी १०७
काश्मीर १६०
कासारनाडी १४१
कासीराम ९६
कासीराम कल्याणकर ९४
कासी विश्वेश्वर ७१
कासेगाव २९
काळभोर ६
काळोजी १४३
कित्तूर ३३, ६५
कीर्तिवर्मा २०
कील्हदास १०८
कुकाजी बयाची १२९
कुरवपटैलु बिन नाकदेऊ १४
कुडाळ १, २, १३०, १३१
कुदलगी ६३
कुभारे ४४
कुमठे ६
कुवरबाई ७
कुशध्वज ९९
कुंवर साहेब ७५
कुंभ शिवथर ३
कुंभेर ३१
कूर्मदास १०७
कृष्ण २५, १०२, १०४, १३२
कृष्ण चैतन्य १०६, ११०
कृष्णदास १०६
कृष्णदास ( मुद्गल ) १०७
कृष्णदास ( पंडित ) १०७
कृष्णदास ( ब्रह्मचारी ) १०७
कृष्णदास ( सोनार ) १०७
कृष्णराव ३६
कृष्णा २०, ४५, ५०
कृष्णाजी १३२
कृष्णाजी फुलाजी ९४
कृष्णाजी बल्लाळ १२९, १३०
कृष्णाजी बिन नरसोजी बोडका ४२
कृष्णाजी भास्कर १२९
कृष्णाजी हरि ९५

कृष्णाजी हरि पालकर ९४
कृष्णातीर ४२
कृष्णानदी १, १४५
कृष्णा नापिक १०७
कृष्णाबाई १०७, १२१
कृष्णा मोझे १४२
केदारेश्वर ११, १८, १९, ३७
केरल २०
केरोजी ४५
केवळकुवा सेखाबत १०७
केवळराम १०७
केशव २८, १४७
केशव चैतन्य ११०, १२१
केशव भट १०६
केशव महाजनी २४
केशवराव १४७
केशव वामन खोले १३३
केशव स्वामी १०७
केशोजी १४३
केसरकर ६
केसरीनाथ १०७
कोकण १८, २०–२४, ४२, ८६, ८७, १२४, १३९, १५०
कोकिसरे १२७
कोकिळ ११०
कोडवली १४, १५
कोंडपाटील १४२
कोडिवटे १२४
कोडिवले १५
कोधु आलू १०७
कोनेर रंगनाथ १२९
कोपरगाव ७, ४४
कोरेगाव ६, ७, ११, १२८
कोल ११०, १३१
कोल्हापुर २०, ३१, ४०, ४६, ५०
कोसल २०
क्रिस्णाभट भवनभट गीजरे १४
क्रीस्णभट १४
क्रीस्णोबा नरसोबा सेणवी १४

## ख

खटाव ११, ४३
खंडभट १०७
खंडू जाधव ९२, ९४
खंडो अप्पाजी १२९
खंडोजी बाग १३०
खंडोपंत ८२
खंडो पीलदेऊ १३
खंडोबा ६, १२१
खंडोबा घाटे ९५
खंडोबा यदेऊ १३०
खंडो सोमनाथ ९७
खानदेश १२
खारेपाटण २१
खुपरसिंगी ६९
खेड ७
खेळो पाटैलु १३
खोजीजी १०७
खोपडे ४१, ४२, ४७
खोलेश्वर २४

## ग

गङ्ग २०
गंगा १४५, १५९, १६२, १६३
गंगाजी मुद्गल १२९
गंगाधर १३२

गंगाधर कोकिळ ११०
गंगाधर गोविंद ६९
गंगाधर जोसी १५
गंगाधर बल्लाळ ३२, ७४
गंगाबाई ११२, १३२
गंगी ९७
गणेश १४६
गणेश जगदेऊ १३०
गणेश दत्ताजी ४३, ४४
गणेशनाथ ११४, १२१
गणेशपुराण ११६
गणेश शंकर निळकंठराऊ १५०, १५१
गणो राम १३०
गंड २४
गदग ३३, ६४
गदाधर १०७
गदाधरदास १०७
गहिनीनाथ १६६
गाधिज ९९
गायकवाडी ६
गावाची पाल १२२
गिजरे ८, १२, १३, १५, ५०, ९१
गिरजोजी भोसले १३१
गिरिधर १०७
गिलज ७५
गीता १११
गीतार्थमंजिरी १११
गुजराथ ९, १२४, १२५
गुजाहरी १०७
गुंजणमावळ ४२
गुडो अंलोबा १३
गुणवंतगड १३०
गुंडोजी वोवा १४३
गुप्तनाथ १०७
गुर्जर २०
गुह १०२
गोकाक ३३, ६१
गोकुल १७८
गोदा ४४
गोदाजी १५
गोदातीर ४२, १३३
गोदावरी २०, १०१
गोदुजी बिन चगोजी १५
गोदोजी बिन देको १४
गोदो पटेल १५
गोंदा १०७
गोपाळ १११
गोपाळ गणेश प्रभुणे शास्त्री १४५
गोपाळ चैतन्य ११०
गोपाळ तुकदेऊ ४६
गोपाळदास १०७
गोपाळदे १९
गोपाळदेव २७
गोपाळनाथ (कृष्णदास)१०७
गोपाळ नेमाजी ९६
गोपाळ प्रभुणे १४५-१४७
गोपाळ बाजी पेणकर ९४
गोपाळभट १०६
गोपाळ रायाजी १२९
गोपाळराव ७५, १०२, १४७
गोपाळराव मिरजकर ७५
गोपीचंद १०७
गोरक्ष १६४
गोरक्षनाथ १०७, १६५, १६६
गोरा कुंभार १०६, १११, ११२
गोरेगांव १२४

गोवा ६, २१, २४
गोविंद क्रमैत २८
गोविंद खंडेराव ४९
गोविंददास १०७
गोविंदपंत बुंदेले २८, २९
गोविंद पुरुषोत्तम १२९
गोविंद भट १३
गोविंद माधव वैद्य १४८
गोविंदराव ७३
गोविंदराव गायकवाड ३४, ५९
गोविंदराव शिवदेव २९, ३१-३३, ५७, ७३, ७४
गोविंदराव शिवदेव मजमदार ५७, ५८
गोविंद हरी पटवर्धन ७५
गोहद ३१
गोळे १३४, १३६, १३७, १३९-१४१
गौतम २५
ग्रॅन्ट डफ ७७, १६८
ग्रीक लोक १५५
ग्रीसचा इतिहास १५६
ग्वालेर ३०, १०८
ग्वालेरी भाषा १०९, ११४

## घ

घट घटोत्कच १०१
घळशे २५
घाट १५०
घाटण ४५
घाटे ३०
घाशीराम ६
घेशास २५
घोरपडे १२

## च

चतुर्भुज राजा १०७
चतुर्भुज स्वामी १०७
चंदन मादा मादई १४
चंदराऊ १६७, १६८
चंद्रगुप्त १६१, १६३, १६४
चंद्रपुर ३१, ३२, ५७, ७४
चंद्रभागा २८, ११५
चंद्रराव मोरे ३, १२
चंद्रादित्य २०
चरक १८१
चऱ्होली ४८
चाकण ७
चांगदेव १३, ११६, १५२
चांदभाई बिन फतुभाई १४१
चापानेर १२३, १२४
चाफळ ७८, ७९, ११८
चांबळी ७, १४९—१५१
चालुक्य १८, १९, २१, २३, २४, २७
चाहूजी गभिराउ १४०
चाळिसगाव १३
चिंचणी १८५
चिंचवड १५१, १५२
चिंचवडकर १३४
चित्रकूट १००
चिद्घन ११०, १११
चिंतामणराव सांगलीकर ७५
चिनाब १६०, १६३
चिपळूण १९, १२९
चिमणाजी तान प्रभु ९४, ९६
चिळगुडी बिन कमळगुडी १५
चिळोदेऊ बिन कमालगुडी १४
चेऊल ९४, १२४
चेदवली १२४

चेदी २०
चेवाळि ३१
चेंबर १२४
चेर २०
चेरणी १२४
चैतन्य सांप्रदाय ११०
चोखामेळा १०६, ११२
चोल २०
चौडोबा नारोबा सराफु १४
चौरंगीनाथ १०७

छ

छत्रपती ७०, ७५
छत्रपती ( शिवराय ) १५१, १५२

ज

जगजीवन १३२
जगजीवन नारायण १२९
जगतराज ३१
जगन्नाथ १०६
जगन्नाथ शास्त्री ७२
जगमित्र नागा १३३, १४८
जगमित्र पिरंगुटकर १३९
जंजिरे ९३, ९५
जनजसवंत १०७
जन्हु १०२
जनाबाई १०६
जनार्दन १६९, १८०
जनार्दनपंत ९०, १०७
जनार्दनपंत कुळकर्णी २९
जनार्दन स्वामी १०७
जनी जनार्दन १०८
जमखेडी ३३, ६४
जयत्पाल १८४
जयदेव ११२
जयपाल १८१
जयपुर ११, १०८
जयमल्ल १०६
जयराम १७९
जयराम स्वामी १०७, १२१
जयसिंह २०
जरीपटका ६६
जसु स्वामी १०६
जाउली १२९, १३१
जाधव ८६
जानबा ७०
जानोजी ७०
जानोजी चोर ३४, ६६
जानोजी भोसले ३१, ३२, ५७
जामदग्नि २५
जांब ७७
जायनायेक हरिनायक सेटिया १४
जावलि १२, १३१
जावळीखोरे ३
जिऊबाई ४८
जिगणी ३१
जिजोजी काटकर १३१
जिवाजी अनंत फडके २९, ७१
जीवातत्वा माधवदास १०६
जुन्नर ४४, १३०, १३१
जैतपाल १८३
जैन ८१
जोगसेटि बावीसेट्टि १४
जोगाईचे अंबे १८२-१८४
जोगा परमानंद १०६
जोनोजी चोर ६७
जोर यावला ३१

जोशी १२, ४६

झ

झाशी ३१
झेलम १६०, १६१

ट

टोकें ३२

ठ

ठाणें १२४
ठाणें वडगांव १२९

ड

डाया बिन लखमण सुतार १४
डायोनिझस १५९
डारिअस १५७, १६२, १६४
डोंगरे ८५

ढ

ढमढेरे ७५
ढालगांव १८७

त

तडस ३३, ६३
तपे ९५
त्रिपुटी ६
त्रिपुर २०
त्रिपुरदास १०६
त्रिंबक भट ९७
त्रिलोक सोनार १०७
त्रिलोचन १०६, ११०
त्र्यंबक १०२, १०४, १३२
त्र्यंबक कृष्ण १३०, १३१
त्र्यंबक गोपाळ १३०
त्र्यंबकजी काकडे १३०
त्र्यंबकजी डेंगळे ७
तलवाड ४८
तळकोंकण १२३
तळें ९६
तळेगांव ७, १०४
ताजी मोहना १०७
ताटका ९९
तात्या भावे १४६
तांदुळज ३२
तानाजी आतमाजी ९४, ९५
तान्हा बिदू डोई १४
तांबवेकर ७३
तांभेर ११२
ताराबाई ७७
ताहराबाद ११२
तिमाजी नाईक १०६
तिमाजी यमाजी १२९
तिमाजी यमाजी देशाधिकारी ७६
तिमाजी रघुनाथ ७७
तीर्थरामायण ९८
तीर्थावळी ११४
तुकतेऊ १३
तुकाईची वाडी १३४, १३६, १४०, १४१
तुकाजी प्रभु १२९
तुका बिन साया गाव्हर १४
तुकाराम १०७, १०८, ११०, ११४, ११६, ११७, १२१
तुका विप्र ६
तुको धोंडदेव २
तुकोबा ११३, १४१
तुंगभद्रा २०
तुडल ९५
तुरुगवाडी ९५
तुवरभगवान १०७
तुळशी चैतन्य ११०
तुळशीदास १०७

तुळशीबाग ७५
तुळशीमाहात्म्य ११६
तुळसी १११
तेरदळ ३३, ६२
तेलंग २४, ९३
तेलंगण ९०
तैमूरलंग १६४
तैलंगण २०
तैलण २१
तैलण्ण २०
तोरगल ३३, ६५
तोरणा ३

थ

थेसालिअन १५८

द

दइसार १२४
दंडवत बुवा १०७
दत्त ११०, १११
दत्तात्रय चरित्र ११६
दत्तात्रय त्रिंबक आराध्ये ८
दत्तात्रय स्वामी ११८
दत्तो बल्लाण बोरकर १२७
दन्तिदुर्ग २०
द्रविड २४
दशरथ ९९—१०१
दक्षिण वाराणसी ९७
दाडवाडी ३३
दाडवाली ६१
दाद नाईक मांग १४१
दादसेटि गोला सेटिया १४०
दादसेटिये १४०
दादा ८४, ९८
दादाजी नरस ९३
दादाजी नरसिंह ९५
दादाजी बल्लाळ १३०
दादा दातार १४६, १४७
दादासाहेब ६८, ६९, ८४
दादोपंत ११२, ११३
दानकमलाकर ४९
दाभाडे ३०, १०४
दामाजी ११४
दामाजी कुरण कुलकर्णी ९४
दामाजी कृष्ण ९६
दामाजी त्रिंबक ९६
दामाजी नारायण १३०
दामाजीपंत १०६
दामोसेटी १४
दारुल जफर १२७
दावडी निंबगांव ७
दासबोध ८०, १७९
दासो दिगंबर १०६, ११०—११२
दासोपंत १०८, १२१
दिंडीरवन ११५
दिंडोरी ७
दिली ९०
दिल्ली ८६
दुर्गवाडी ९४
दुर्गा आईसाहेब २९, ३४, ५८, ६७
दुर्गो नरसिंह १२९
दुरुज ४३
दुसेरिये १४
देको पाटैलु १३
देमाजीराम कुळकर्णी १५
देवगिरी २०, १२४
देवजीराव शिर्के ४५
देवदार १४४, १४५

देवपंडित २४
देवपंज्या १०६
देवीदास १४४
देशवर्मा २४
देहू १४२, १४३
दौलत बाबुराव ३४, ५९
दौलतराव हिंदुराव ३३, ६०
दौलताबाज १२४

ध

धणीसाहेबी ६९, ७०
धना जाठ १०६
धन्यरामायण ९८, ९९
धर्मस्थापक ९३
धारवाड २०, ३३, ६०-६२, ६४, १२६
धारूर ११०
धावडशी ६
धुरिशा पोवार ३१
धोडप ७
धोंडोपंत कुलकर्णी ६
धोपेश्वर ९३

न

नगरकर ७
नंददास १०६, १०७
नंदराजा १६२
नंदिग्राम १००
नमादेऊ विन रमागुडी १४
नयनीस्वामी १०७
नरपाळ १०६
नरवर ३०, ३१
नरवाहन १०७
नरसाला १३०
नरसिंगराव ३६, ७०
नरसिंगराव गोविंद २८, २९, ३२-३५, ५८-६९, ७१-७४
नरसिंगरावजी ७०
नरसिंगराव देसाई ७१
नरसिंगराव शिवदेव ३०
नरसी भारती १०७
नरसीमपुर ७५
नरसी मेहेता १०७
नरसो मोरेश्वर ९४, ९५
नरसो विठल ९४
नरहरी २४, १०६
नरहरी गोज ९४, ९६
नरहरी धुंडिराज ११९, १२०
नसरापूर ९६
नागझरी १४१
नागजोसी १३९
नागनाथ १११, १३३, १४१
नागपूर १४७
नागा जगमित्र १०६
नागाबाज १२३, १२४
नागार्जुन ११
नागांव १२६
नागु १३२
नागेश १०६, १३३, १४९
नागेश्वर ७५
नागोर १२३
नाझरे १०६
नाणेगाव ९२, ९७
नादिरशहा १६४
नानकशा १०७, ११६
नाना ८३
नाना फडणीस ३५, ७४

नानासाहेब ३१, ७१, ८५
नानासाहेब मिरीकर ७
नानासाहेब पेशवे २८, ८२
नांदगाव ७
नांदुर ११७
नाभाजी १०८-११०, ११२-११४, १२०
नामदेव २८, १०६, १०८, १०९, ११२-११४
नारणजि १२२
नाराजी १५
नारायण १९, ७८, १०६, १०७, ११८, १२१, १४६
नारायण घैशास २८
नारायणदास १०७, १०८
नारायणभट १०६, १०७
नारायणराव ८४
नारायणाश्रम १०७
नारायण स्वामी २, १०७
नारूजी काळू साऊ माहाजन १५
नारो दामोदर १३०
नारो नरसिंह १३०
नारोपंत १२१
नारोराम ७०, ७१
नारो शंकर ७, ३१, ७५
नावजी १४३
नावजी माळी १४२
नाशिक ५, ७, १२, २०, २१, ५०
निगडी १२१
निजानंद १२१
निजाम ३४, ७५
निजामपूर ९६
निजामशाही १२७
निलानंद १०६
निनामपाडळी ६
निंबगांव जाळी ७
निरथडी ४३
निरानरसिंहपुर १४६
निवृत्तिनाथ १६६
निषाद १००
निळकंठ मोरेश्वर १५०
निळकंठराउ पुरंधरकर १५०, १५१
निळापूर १२४
नीलाजी मारादेऊ ९५
नृसिंह सरस्वति १०७
नृहरि १२१
नेगोपाटैलु १३
नेताजी पालकर ४०, ४१
नेताजी बिन धारोजी ४८
नेवरे ७
नेवासे ७, १२

प

पकछा ३१
पंचमाहाल ३०
पंचवटी १०१, १०२
पंजाब १५५, १६३
पटवर्धन ६, २५, २६, ८१
पटेल बिन लाहीगुडा १५
पठाण १२३
पंडु १०३, १०४
पंढरपुर ७, ८, २०, २८, ३०, ३५, ५७, ६६, ७२, ७५, १५२, १८३
पंढरी १११, ११२, ११५, ११७, १४२, १४९
पणवेल ९४—९६
पणाले १२३

पदुमोबा चौंडोबा १५
पद्मनाभ २७, १०६
पद्मपादाचार्य १६४, १६५
पंतप्रधान ६८
पंतराजाज्ञा १४६
पंतसचीव २
पन्हाळा २१, ४०, ४९, १२४, १२५
पन्हाळें १२३
पनाला १३०, १३१
परंतुरामायण ९८
परमामृत १८३, १८४
परवती ७५
परशराम १०७, १३२
परशरामपंत ७०
परशुराम बल्लाळ गणपुले २९, ३४, ७०
परशुराम रामचंद्र ७५
परशुराम खंड १२३
परशुराम त्र्यंबक ७५—७७
परसनाक १४१
परसोजी राजे १२९
पवले १२४, १३४, १३६, १३७, १३९-१४१
पसपौली १२४
पाटण १
पाटस ९७
पाटक २५
पाडळी ४६
पांड्य २०
पांडुरंग १०५
पांडुरंग माहात्म्य ११५
पांडुरंग रामचंद्र २९, ३६, ६९
पांडे पेडगाव ७
पांढर २९, ३०
पानपत ७५
पानवडी ४३
पानशे ७५
पानसी १२, १३
पानिपत ३२
पाबळ ७
पारनेर ११३
पाल ९५
पालपेंबर ६
पालि ६
पाशाणी ७५
पिंगळे ८८, ९०
पिपाजी १०६
पिंपरी ६
पिरंगुट १३३, १३९
पिल माहाला न्हावी १४१
पिलंभट १४
पिलाजी ९३
पिलाजी कृस्ण ९४, ९६
पिलोबा भानोबा कुळकर्णी १४
पिसाळ ६
पुजदे १४५
पुणतांबे ७
पुतलाजी श्रीरंग ९४, ९६
पुणें ५, ७, ३९, ४०, ४३, ७३, ७५, ८५, ८६, ९२, ९७, १३०, १३१, १३३, १३८, १४१, १४५, १४९-१५१
पुणेवाडी १४१—१४३
पुंडलीक ११५
पुरखादेऊ मोईगुडी १३
पुरंदर १३०, १४७
पुरी २०, २१

पुरू १६१, १६२
पुर्णानंद १०७
पुलकेशी २०
पुलदाडा हुतर ठाकूर २७
पुलुदाडा १८, १९
पृथ्वीराज १०७
पेशवाई ८४, ८५
पेशवे १, ६, २९-३२, ३५, ३६, ७०, ७२, ७५, ८१, ८२, ८४, ९०
पैठण ४८, १०६, १०७, ११४, १२३-१२५, १५२, १६९, १७८
पोईनाड ९४
पौडखोरे ९४
पोलातशाहा ४३
पोलातसैद ४३
पौडखोरे ९६
प्रतापगड ८४
प्रतापसिंह ३६, ४७
प्रतीनिधी ७५, १३२
प्रभु २५
प्रभु देसाई २५
प्रयाग ८४
प्रयाग अनंत ९४, ९६
प्रल्हाद निराजी ४०
प्रवरासंगम ३९, ४६
प्रालराज २०
प्रियादास १०९
प्रेमानिधि १०७
प्लुटार्क १५७, १६१

फ

फत्तेसिंग ३१
फत्तेसिंग गायकवाड ३४, ५९
फत्तेसिंग भोसले ४१
फत्तेसिंगमान ६
फत्यापुर ६
फिलिप १५६
फुलगावी ७५
फोजिवरे १२४

ब

बजाजी निंबाळकर ९३
बडवे ४७
बदलापुर ९४
बदामी २०, ३३
बनवाशी २०, २१
बप्पदेवराय १८, १९, २१, २२, २४, २७
बयाताई १४६, १४७
बर्वे ६, ७
बऱ्हानजी मोहिते १३१
बलक बुखार १०७
बल्लभाचार्य १०६
बसव २०
बहादुरगड ७
बहिणाबाई १२१
बहिरजी पाढेर ७५
बहिरंभट १११, ११४
बहिरा ( पिसा ) १०६
बहिरो चौगुला १४
बळवंतराव ४०
बळवंतराव सुभेदार ९७
ब्रह्म २१, २४
ब्रह्मपुरी ६
ब्रह्मांडपुराण १७९
ब्रह्मानंदस्वामी १०७
बाउसेटि १४१
बाका १०६

बागलाण ७
बाजी घोलप १३१
बाजी देशकुलकर्णी ९२, ९६
बाजी पाटील १६७, १६८
बाजीपंत ८२
बाजीबुवा २
बाजीराई ( राव बाजी ) ६
बाजीराव थोरले ३७, ४१, ९०
बाजीराव ( २ रे ) १२२
बाजीराव गोविंद २९, ३२, ३४, ६६, ७०, ७२
बाजी सूर्याजी ९४, ९६
बाबाजी गोविंद ९६
बाबाजी गोसावी ११७
बाबाजी चैतन्य ११०
बाबाजी सेटिगा १४१
बाबाशास्त्री १४१
बाबान इवान घोरी ४३
बाबासाहेब ७४
बापु ७३, ८२—८५
बापु गोखले ७
बाबू ७३
बाबूडोई गुडी १३
बाबूराव ७१
बारामुन्हे १२९
बालसेटि १४१
बालाजी ८८
बालाजी पंडित ५७
बालाजीपंत ८७–९०
बालाजीपंत पटवर्धन ७४
बालाजी बाजीराव ३२
बालाजी रुद्र ९५
बालाजी विश्वनाथ ७, ८६, ८७, ८९, ९०, १२१, १४९-१५२
बालाजी संभाजी ९४, ९५
बालाजी हर १२९
बालाजी हरि मेंडजोगी १३३
बाला १४१
बाला सेटि पहली १४१
बावलिंग जंगम १४१
बावाजी गोविंद ९५
बावाजी बाजी ९४
बासप्पा नाईक ३३, ६१
बाहादुरवाडी १२
बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर २१–२३
बाळाराम ८४
बाळासाहेब ७१
बिआस १६१
बिजापूर १२७
बिज्जल २०, २१
बिडो भास्कर १५
बिंब १२२, १२४
बिंबसार १६२
बिल्वमंगल १०६
बीर जुमाल १४१
बीरवाडी १६७, १६८
बुधसिंग सुभेदार ३१
बुंदेलखंड २९, ३०
बेंकाजी विठ्ठल ६५
बेंगपुर २९
बेटगिरी ३३, ६०
बेदर ६
बेरी १५६, १५७, १५९, १६३
बोकील ८३
बोगरसा १०७
बोडानाभक्त १०७
बोभलेमुग्धा ११४

बांधले २८, २९, ५७
बोपाजीपंत १२१
बोप्पदेव १९
बोरघाट ९५
बोहाटी ३३

भ

भक्तकथामृतसार १११
भक्तमंजिरी ११८, ११९
भक्तमाला १०९, ११४, ११७
भक्तमालिका १११
भक्तलीलामृत ११६, ११८, ११९, १४२
भक्तविजय ११३—११५, १२१
भक्तिकथामृत ११९, १२०
भक्तिकथासार ११९
भक्तिप्रेमामृत १०९
भक्तिरसबोधिनी १०९
भगल १६२
भगवंत १३२
भगवंतराव ८२
भगवंत शिवदेव ३०
भगवानदास १०६, १०७
भट उंबरे २८, २९
भरत ९९, १००, १०२
भरद्वाज १००, १०२
भर्तृहरि १०७
भवानजी जाधव १३१
भवानजी बिन रखमाजी ४३
भाई सेटी याई सेटी १३
भाऊ ३५, ७२
भाऊसाहेब ३०, ३१, १४६
भाऊसाहेब टांकसाळ ६
भाऊसाहेब पेशवे ७५
भांडुप १२४
भानजी गोपाळ १३०
भानजी मोकदम १४१
भानजी रघुनाथ १३०
भाननाक तराळ १४१
भानाभट १३
भानु २५, २७
भानुदास १०६, ११४
भारतवर्ष मासिक १४५
भारद्वाज २७
भार्गव २५
भावप्रकाश १८१
भास्कर १०२
भास्कर शंकर ३५, ६७
भास्कराचार्य १३
भिकाजीपंत १२१
भिमाजी मल्हार १२८
भिवंडी १०२
भिवरा १२१
भिवराव १२१
भिवा वरटा १४१
भिवा सुतार १४१
भीकुलाहीया १४
भीमसिंग ३१
भीमसेन ७८
भीमस्वामी ११८
भुकुम १४१
भुव( ख ? )न चव्हाण १०६
भूगर्भ गोसावी १०७
भैरोजी खेळजी १५
भोज २१, २२, २४
भोर ३
भोस ९८

भोसर ४५
भोसले ३१, ७३
भोसे ६८

## म

मकाजी काटकर १३१
मगध १६२
मगधदेश १६२
मंगलवेढे ७५
मंगलिश २०
मंडनमिश्र १६४
मत्स्येंद्र १६४
मत्स्येंद्रनाथ १६५, १६६
मथुरा ११०, १४२, १७९
मदनमोहन १०७
मद्रकी २९
मध्वाचार्य ७७, ७८, ८०
मधुकर शहा १०७
मधु गोसावी १०७
मनसुखदास १०७
मनमोहनगड १३०
मनुस्मृति ४७, ४८, १३९
मंत्रमय रामायण ९८
मंत्रसंग्रह १८०
मंत्री ७५
मंथरा १००
मंदोदरी १०१
मयूर १०२
मरळी १२७
मराठी ५०
मराठी भाषा ११०,१८१
मराठी रियासत ७६, ७७
मराठे २९, ७६
मरोळी १२८
मलकापूर १३०, १३१
मलबार २०
मलसेटि पिरगुटकर १४१
मलिक आबदला ९३
मलो पटेल १५
मल्लिकार्जुन ११५
मल्हार एसाजी १३०
मल्हारजी होळकर ३०
मल्हारराव ३१
मसूर १, ३०, ९६, १२७
महमदशाहा ९०
महंमूद १६४
महादाजीपंत बाबा पुरंदरे ८२
महादेव १२१
महाभाष्य १८४
महार ४८
महाराष्ट्र ३, ८–१०, १२, १७, १९, २०, २४, ३६, ३७, ४१, ४७, ५०, ७७–७९, ८१, ९८, १०२, १०४, १०५, १०८–११०, ११७, १२४, १२७, १३३, १३९, १४९, १६६, १६७, १८२
महाराष्ट्र भाषा ११२, १२०
महाराष्ट्र वाणी १८३
महिपतगड १३०
महिपतराऊ अनंत १३०
महिपति १०८, ११२, ११४, ११५, ११८, ११९, १२१, १४८
महिपति बाबा ११७, १४२
महिपति बुवा ११३
महेन्द्र १०१
मॅकेडोनिअन १६१
मॅकेडोनिआ १५५, १५६

माकवा १८५
मांगले ४९
माजासी १२४
माढे ६९
मांडके ४६
माणकोजी बोधला १०७, ११६
मातुलिंगी १८, २७
मादगुडी बिन डोईगुडी १४
मादपुजगुडी बिन ऐदुगुडी १४
मादाउदोबा सेटि १३
माधव २४
माधवदास १०६, १०७, ११०, १११
माधवराव ६-८, ३५, ७९, ८४, १३२,
माधवराव गोविंद ३२
माधवरावजी रानडे ९३
माधवराव नारायण २९, ६७
माधवसिंग उभरटी कढोलिवाला ३१
माधवाचार्य ३०, १६४, १६६
माध्व ७९, ८१
मानदेश ११४
मानसिंग राजे जाधवराव देऊलगावकर ८७
माने ६
मानोबा राघोबा १३
मायी नाईक १३
मारवाड १२४
मारीच ९९
मारुती ७८, १०२
मारुतीराय ८०
मार्तंडबुवा १०९
मालपाटील १६७, १६८
मालिक चंदन १३
मालुतारण ११९
मालेगाव ७
मालोजी घोरपडे ७५
मालोपंत १०६
मावजी ४५
मावजी भक्त १०७
मावल ९३, १३०, १३१
मावलिंग १८
मावले २
माहादाजी अनंत १२९
माहादाजी गोपजी ९४, ९५
माहादाजी सामराज १२९-१३१
माहादेव २८
माहीम १२४
माहुली ६, ४२, १४५,
माळदरणे बिन रीवा दरणे १४
माळदुदुमी सेटि १३
माळवा २०
मिताक्षरी ४७, ४८, ५०
मिथिला ९९
मिरज ७५
मिरजकर ३५, ७२
मिसरीकोट ३३, ६४
मीया आबास १४
मीराबाई १०७
मुकुंद कृष्ण ९४, ९६
मुकुंदराज १०, १०६, १८०-१८४
मुकुंद शंकर १२८
मुक्ताभरण ११६
मुक्तेश्वर १०३-१०६
मुगाव १४५
मुंगीपैठण १२३, १२४
मुठेखोरे १३९, १४०
मुंढवय ७२

मुद्गल १८१
मुद्गलभट १०६
मुद्गलभट मंडितराय ४०
मुधो(जी) ५७
मुधोजी भोसले २९, ३१, ३२, ५७, ५८, ७३
मुंबई ३५, ४९, ५८, ६५, ६६, ६९, १२२, ११६, १४२
मुरारदास १०५
मुरारराव हिंदुराव घोरपडे ३३, ६५
मुळगुद ३३, ६४
मुसलमानी अमल १८२
मुसेखोरे ९६
मूक २५
मृत्युंजय १११
मेढे १२९, १३०
मैत्रावरुण २५
मोगल ३२, ७५
मोरया गोसावी ७
मोरया देव १३४
मोरेश्वर भट ९७
मोरोपंत ११, ९८, १०५, १८१
मोरोबा ११२
मोशेखोरे ९५
मोहियाबाद ४०
मोहोरी वुद्रुक ४२
मौद्गलय २५
मौन्य १२१
मौर्य २०
म्हैसळे ४२

य

यदु २४
यमदेव ११२
यमाजी १३२
यमाजीपंत ८२
यमा बिन सुक माळी ९७
यमुना १७२, १७३, १७६, १७७
यशवंत ८२, ११८, १२६, १३२
यशवंतराव पोवार ३०
यशवंतराव शिंदे २९, ३४, ६६, ६७, ६९, ७०
यादव १९-२२, २४, १२४
यादव काकाजी ९४, ९६
यादव सोन ९४, ९६
याज्ञवल्क्यस्मृति ४९
येकसार १२४
येकोजी ६३
येवले ७
येशो पुरुषोत्तम पळसुरा ९३
येसाई मल्हार १२९
येसाजी जाधव १३१
येसूबाई ३९

र

रघु १७९
रघुजी केशव ९४, ९६
रघुजी विठल ९४, ९५
रघुनाथ १२१
रघुनाथ पंडित ५८, ६९
रघुनाथराव पंडित ६५
रघुनाथ बाजीराव २९, ५८—६६, ७२, १४५
रघुनाथभट्ट ९२, ९४
रघुनाथ राजा १०६
रघुनाथराव ७
रंगनाथ ६, १२१
रंगभट १३२, १३९

रड्डी आचार्य १४५
रणछोडदास १०७
रणदुल्लाखान ६
रतनभक्त १०७
रतनसिंह १०७
रतिरहस्य १८०
रत्नाकर गोसावी १०७
रमणबाग १४७
रमाबाई १०६, १०७
रंभाई १४३
रवळनयेक बिन काननयेक १४
रसिकमुरारी १०७
रहिमतपुर ६
राइर १४१
राक १४७
राका १०६
राघव ११८
राघवचैतन्य ११०
राघवदास १०७
राघवस्वामी ११०, १११
राघवेंद्रस्वामी ७९, ८०
राघो-एवतो १५
राघोजी विठ्ठल १३०
राघो तुकदेऊ १३
राघो नारायण ४४
राघोबादादा ८, २८, २९, ३१, ३३-३६
राजगड ३
राजपुताना १२४, १२५
राजापुर ९३, ९४
राजपुरा १२३
राजपुरी ९५, ९६
राजमहंमद १२१
राजसवाई १३२
राजाराम ६, ४९, ७६, ७७, १३३
राजारामपंत माने ६
राजारामप्रासादी ११८, ११९
राजावली १२३
रांजणगाव-मशिदीचें ४२, ४३
राणे भोसले ६
राणोजी शिंदे ३०
रामखंड १२३
रामगीर १०७
रामचंद्र १४७
रामचंद्र जाधव ७५
रामचंद्र निलकंठ ९८, १५१, १५२
रामचंद्र भट १०७
रामचंद्र यादव २४
रामचंद्र व्यंकाजी दसणेर ७५
रामचंद्र हरि पटवर्धन ३०
रामजी पटेलु बिन गोदजी १५
रामजोसी ११
रामदास १-३, ६, ७७-८०, १०६-१०८, ११७-११९, १२१, १३९
रामदासपंचायतन ११९
रामदासराजा १०७
रामदासी ७९
रामदासीपंथ ११९
रामदेव १२३
रामभद्राचल १०८
रामराजा ९०, १२२
रामरामायण ९८, ९९
रामराय १०६
रामशास्त्री ४०, १४५—१४८
रामाजी गोमाजी ९४, ९५
रामाजीपंत आपटे ७१
रामाजी पंताजी १२९

रामाजी बिन बाबाजी २
रामाजी महादेव ९५, ९६
रामाजी हरि आपटे ६९
रामाजी हरि गाडगीळ १२६
रामानंद कुडलीक १०७
रामानुजाचार्य ८०
रामीदेऊ १३
रामेश्वर १२१
रामेश्वरभट १४, १५
रायगड ३, १४३
रायबाग २३, १२७
रायबेट २७
रायरी ४५
रायाजी जनार्दन २९
रायाजी नरसी ९५
रायाजी बिन भिकाजी १४१
रायाजी मल्हार ९४, ९६
रायाजी रंगनाथ ९४, ९६
रायाबाईसाहेब ७
राये पाटण ९३
रावेत १५२
राष्ट्रकूट २०, २३
रास्ते ७५
राहूरी ११२
रुक्मिणीस्वयंवर १८०
रुद्रभट गिजरे १५
रुद्राई १०७
रुपाबाई १०६
रेटरे-पिपला देवीचें १५
रेटरे बुद्रुक १५
रोहिडखोरे ४१
रोहिदास १०६, ११६

ल

लखामण पटेल बिन कोया पटेल १५
लघुरामायण ९९
लक्ष्मणभट काळे १८०, १८१
लक्ष्मणराव ३५, ७४
लक्ष्मणराव नरसिंग २९
लक्ष्मणराव नरसिंह ७१
लक्ष्मी १२१
लक्ष्मीधरभट १५
लक्ष्मीबाई १४६, १४७
लाखाभक्त १०७
लाखुमण वाळे १३
लाडू १०७
लांबे साहसकर ३०
लिगाप्पा हणमत ३३, ६०, ६५
लिंगारतण ९४
लिंगायत ८१
लिंब १, ६
लिहियानेमदेऊ १४
लोकनाथ १०६
लोहगाव १४१-१४३
लोहदंड ११५

व

वज्रजोगिणी ४२, ४४
वटुगी २१
वडगाव १४, १०७, १२१
वडिगाऊ १५
वण ३२, ५८
वणी ७
वत्स २५
वनखल ९५
वंदनकिल्ला ८२
वरेडी ९४, ९६

वरंधा ३
वर्धमान १०६
वऱ्हाड ३२, ५७, १४५, १४७
वल्लभाचार्य ८०
वसई ३०
वसंतगड १३०
वाई ६, ५०, १२९, १३१, १४१, १४५
वाग्भट १८१
वाघोजी भिसा ४३
वाघोलि ७
वाटगुडि पिसाळ १३
वाड ४८, ४९
वाडिगागुडी १३
वानरे १२४
वामदेव ११०
वामन १२१, १७४
वामनराव गोविंद ३३, ६०, ६१
वामनराव पिंगले ८७
वायुदेव ७८
वारभद्र देसाई ६५
वारुण १३०, १३१
वावधन १४१
वासुदेव प्रभु १८, २७
वाळवे ११, १२
वाळिंबे ४६
वाळुकेश्वर १२५
विक्रमादित्य २०
विजयदुर्ग ९२, ९३
विजयादित्य २०
विजयार्क २०
विजापूर ९०, १२७
विठ्ठल १०६, १०७
विठ्ठल गोपाळ १२९, १३०
विठ्ठल दत्तो १२९
विठ्ठलदास १०७
विठ्ठल नरसी ९४
विठ्ठलनाथ १२१
विठ्ठल ह्माऊ ९५
विठ्ठल लक्ष्मण १२९
विठ्ठल शिवदेव २९—३१, ७३, ७५
विठा १०७
विठाबा ११०
विठा रेणुकानंदन १०७
विठोबा १०७, ११८, १२१
विदुला १०३, १०४
विदूर १०७
विद्यारण्य १६६
विद्यारण्यस्वामी १६४
विद्याशंकर ९६
विनयादित्य २०
विनाजी आऊजी ९४, ९५
विनाजी निलकंठ ९४, ९५
विनायक उमाजी १३०
विमलानंद १०७
विरभद्र देसाई ३३
विरो राम १२९
विवेकसिंधु १८०–१८४
विश्वकोश १८०
विश्वामित्र २५
विष्णु धैशास २७
विष्णु प्रभु ९९
विष्णुबुवा जोग १४२
विष्णुवर्धन २०, २५
विसाखेचर १०६
विसाजी मोकदम १४१
विसोबा १०७

विसोबा सराफ ११४
विज्ञानेश्वर ४१, ४७-५०
वेकोजी केशव ७५
वेंकाजी जिवाजी १२९
वेंकाजी दामोदर ९६
वेंकाजी रुद्र १३०
वेंगी २१
वेटगीदेव २२
वैतरणी १२३
वैद्यकी सं० मराठी कोश १८०
वैद्यचिंतामणि १२६
वैद्यविलास १२७
वैशंपायन १०३
व्यंकटपति नाईक ३३, ६५
व्यंकटेश स्तोत्र १४३, १४४
व्यंकाजी विठ्ठल २९
व्यवहारमयूख ४९
व्याघ्रगड १३०, १३१
व्यास १०३

## श

शंकर ११०
शंकरादिग्विजय १६४
शंकरराव लिंगोजी ३३, ६५
शंकरविजय १६६
शंकरशास्त्री पदे १२७
शंकराचार्य ३९, ४६, ४९, ८०, ९२, ९६, १६४—१६६
शंकराजी तावजी माहाडकर ९४, ९६
शनवारवाडा ८५
शंभुसिंग ८६
शंभुसिंग जाधव ८७
शहापूर १२४, १३६, १३७, १३९-१४१
शांकर ८१
शांडिल्य २५
शामजी ९५, ११६
शामजी गंगाधर ४६
शामजी हरि २, १३०
शामराव १०६
शामळ ९५
शारदा १६४
शारंगधर १८४
शाळुकर ६
शाह १६७
शाहार १२४
शाहू ८६, ८९, ९०
शाहूकालीन १३५
शाहू छत्रपति ६
शाहू नरपति ५९
शाहू माहाराज ३०, ८२, ८३, ८६, १३६
शिऊबाई १३२
शिकंदर १५५-१६४
शिक्रापुर ७
शिरकाणं ४५
शिरगांव ११८
शिरवळ २, ३, ४६
शिरूर ७
शिर्के ६
शिलाहार १९-२२, १२३, १२४
शिव १११, १२४
शिवकालीन १३५
शिवचैतन्य ११०
शिवछत्रपती ३, २९, ३४, ६५, ६६, १३४, १३५, १४३, १६६-१६९
शिवथरखोरे ३
शिवदिननाथ १०७

शिवपूर १२१
शिवबा कासार-१४२
शिवराव जनार्दन २९, ३०
शिवलीलामृत १७९
शिवाजी १२, ३९, ४५, ५०, ९०, ९१, ९३, १२१, १२७, १३२
शिवाजी दामोदर १२९
शिवाजीपंत ८३
शुकरंभासंवाद १११
शुक्रेश्वर ४४
शूर्पणखा १०१
शेख फरीद १०७
शेख महंमद १२१
शेगाव १२, १५३, १५४
शौनक २५
श्रीकराचार्य ४१, ४९
श्रीकृष्ण १११
श्रीगोंदे ७
श्रीधर १०६, ११२, १७९
श्रीधरपंत १२१
श्रीधरस्वामी १०४, १०५
श्रीनिवास १३२
श्रीनिवास नरसिंह १३०
श्रीनिवास परशराम ९२, ९६
श्रीनिवास वेंकठाद्री नाईक देशाई ६४
श्रीपतराव ९०
श्रुतकीर्ति ९९

स

सकवारबाई १३२
सकेश्वर २
सखाजी वैज ९४, ९५
सखारामपंत ८२
सखाराम बापु बोकील ८१
सखो विठ्ठल ४०
सगर २८, २९
सगाजी नरसिंह २९, ६८
संगमनेर ७
संगमेश्वर १८, २२, १२९
सचीव ७५
सच्चिदानंद १०८, ११४
सजणाजी खंडो ९५
सजणाजी रंगनाथ ९४, ९६
सजन कसाई १०७
सज्जनगड ७९, १३१
संजान १२५
सटवाजी डवले १३१
सटाणे ७
सदाशिव १३२
सदाशिव पंडित ४०
सदाशिव हरि ३२, ५८
सदू पटेल बिन काया पटेल १५
संतचरित्र ११४
संतमालिका १४३, १४४, १४८
संतराय १०६
संतलीलामृत ११६
संतविजय ११२, ११७
संताजी पवार १०७
संतोबा पवार ११४
संदेहहरण १११
सभो पटेल १५
समर्थसंप्रदाय ७६, १२७, १२८, १६६
संभाजी ८६-८९, ९३
संभु भटजी गिजरे १४
संस्कृत भाषा ११२
सरसुभेदार ७०

सरस्वति १२१
सवाई बाबूराव दाभाडे ३०
सवाई माधवराव ८, ३२, ३५, १४५
सहजराम १०७
सह्याद्रि १३३
साईगुडाखटिंग १५
साईदेपाटैलु १३
साकेत १०२
साधुरामायण ९८, ९९
सातारा १, ५, ६, ११, १२, २०, ३७, ४०, ४६, ७६, १२९–१३१, १४५
साबजी बिन सूर्याजी ४८
साबाजी शिंदे ३०
सायगाव १
सायालुयागाव्हरु १४
सारसी १२१
सावनूर ३१
सावरे ४९
सावित्री ९३
सांवतवाडी २०
सांवतामाळी १०६, ११२
साव्या अतार ९७
सासवड १४३
सासवण १२४
साळसे ४४
साळूबाई १४६
सिघंण २४
सिघंणयादव २१
सिद्धराम १४९
सिद्धेश्वर ११९
सिद्धेश्वरभट ३९
सिंध १६३
सिंधु १६०, १६१, १७६
सिंह्राजी १०७
सिरगांव ९४
सिवदरणा १४१
सिवाजी नारायण १३०
सीउजी १४३
सीदोजी बिन चगोजी १५
सींदे ७५
सुखरामायण ९९
सुखानंद १०६
सुगल १०२
सुदरकाकाजी ९६
सुधल ७४
सुंदर काकाजी टिपनीस ९५
सुपे ४०, १२९, १३९
सुब्रह्मण्य ८०
सुमेरासिंग ८४
सुरपरमानंद १०६
सुरराव बळवंत ३३, ६५
सुरसुरीबाई १०६
सुरापुर २९, ३३, ६५
सुलोचना १२१
सुश्रुत १८१
सूरदास १०७
सेडे १३
सेदादरण बिन पोमादरणे १४
सेना न्हावी १०६
सेमिरामिस १५९
सेरिये १४, १५
सेले उकस १६३
सैद अलि मुजावर ४२
सैवा ९०, ९१
सोनसावली १४१
सोनाद खोलसे १२८

सोनारी ३९
सोनुगुडी १३
सोनोरी ४४
सोपारे १२३
सोमण ३०
सोमदेव २१, २२
सोमाजी बिन बापूजी बोडका ४२
सोमेश्वर २१–२३
सोलापुरकर ६६
सौराष्ट्र २४
स्ट्रॅबो १५५
स्वामी १५१
स्वाहाक्षा १०७

ह

हनुमान ७८, ७९
हंबिरराव सगाजी नरसिंह ३६
हम्मीर २४
हरपनहाली ३३, ६१
हरसेटि १४१
हरि आनंद १०७
हरि गंगाधर १४
हरिजी कान्होजी यादव १४
हरिदास १०७
हरि नारायण १०७, १४९
हरिपंत १०६
हरिपाळ १०६
हरिभट १०६
हरि महिपाजी ९५, ९६
हरिहर २४, ३३, ६३
हरीगुडा १५
हरीगुडी बिन रमागुडी १५
हरीपंत फडके ७५
हरी व्यास १०६
हवेली ४६, ४८, ९५, १२८, १५२
हस्तनापूर १२३
हस्तामलक १०७
हारित २५
हावनुर ३३, ६०
हिंदुपद ३१
हिंदुस्थान ३ [illegible] ,१५९,
१६०, १६२–१६४ [illegible]
हिमालय १५९
हिरडस ९२, ९४
हिरडोशी ३
हिवरे ८२, ८३
हुबळी ३३, ६२
हुसेनखा ८९, ९०
हूंरामायण ९८
हेगराज ११२
हेमचंद्र ११
हेमाद्रि २४
हेमाडपंत १३४, १३९
हेमाडपंती पद्धत १३५
हेमाडपंती भाषा १३४
हेराक्लीस १५९
हेळवाक १
हैद्राबाद ३४
होनाजी अनंत ४०
होमर १५७
होळकर ३५, ७२, ७५

ज्ञ

ज्ञानदेव १०६, १०९, ११२
ज्ञानेश्वर १०, १०८–११०, ११४, १३३,
१३९, १६५, १६६, १७४, १७९,
१८१, १८३
ज्ञानेश्वरी १४४, १४५, १५२, १५३

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

## बहुमोल संधि

### रा. रा. वासुदेवशास्त्री खरे यांजकडून देणगी.

१ **हरिवंशाची बखर** अथवा पटवर्धन सरदारांच्या हकिकती-रा. खरे कृत किं ०/१०

२ **अधिकारयोग**—( रा. खरेकृत ) यांत प्रसिद्ध मुत्सद्दी नाना फडणीस यांस अधिकार कसा मिळाला, त्याचें अधिकारयुक्त व चटकदार विवेचन. किं. ०/१० आणे.

## राजवाडे यांचे दुर्मिळ ग्रंथ

**संकीर्ण लेखसंग्रह**—ले. रा. वि. का. राजवाडे. यांत कादंबरी, रामदास, इ. विषयांवर फार च विचारगंभीर व बिनमोल निबंध आहेत. पुनः मिळणार नाहींत. तूर्त किं. रु. ६. फक्त दहा च प्रती आहेत.

**मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १**-संपादक-रा. राजवाडे-यांत पानिपतच्या घनघोर रणसंग्रामाविषयीं अत्यंत महत्वाचा अस्सल पत्रव्यवहार आला आहे. खेरीज रा. राजवाडे यांनीं सुमारें १०० पानें प्रस्तावना लिहून विचिकित्सक पद्धतीनें महाराष्ट्रांतील या ऐतिहासिक प्रसंगाचें केलेलें नमुनेदार व बोधप्रद विवेचन सोबत जोडलें आहे. त्यानें पुस्तकाची उपयुक्तता वाढली आहे. एम्. ए च्या विद्यार्थ्यांस मुंबईविद्यापीठानें हें लाविलें आहे. मूळ किंमत रु. ३, हल्लींची किं. रु. २५ *प्रती फक्त २५.

## इतर

**मराठ्यांच्या इतिहासांचीं साधनें खंड ५**-संपादक रा. राजवाडे-ह्या खंडांत खर्ड्याच्या लढाई नंतर मराठे व निजाम ह्यांच्यामध्यें तत्प्रकरणीं जीं बोलणीं चालणीं झालीं त्यांचा वृत्तांत आहे. म्हणजे श्री. सवाई माधवराव साहेब पेशवे ह्यांचे हैदराबाद येथील वकील गोविंदराव कृष्ण काळे ह्यांचीं नानांस व पेशव्यांस आलेलीं महत्वाचीं पत्रें आहेत. किं. त्यांत रु. ३.

**मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें-खंड-७** यांत निजामदरबारांतील पेशव्यांचे वकील गोविंदराव काळे यांच्याकडील महत्वाचा पत्रव्यवहार छापला आहे. तो पेशवाईच्या इतिहासाचा अभ्यास करण्यास फार च उपयोगी आहे. किं. रु. ३.

**मराठ्यांच्या इतिहासांचीं साधनें खंड १०**-संपादक रा. राजवाडे-पानिपतच्या प्रसंगापासून दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंतचीं पत्रें ह्या खंडांत आहेत. पत्रें सुमारें ७०० आहेत. किं. रु. २०८.

**कविकाव्यसूचि**—धुळ्याचे रा. गो. का. चांदोरकर यांनीं तयार केलेली महाराष्ट्रीय कवींची बहुमोल सूचि. साहित्यभक्तांस अलभ्य लाभ ! महाराष्ट्रीयांचे संग्रहीं पाहिजे. हजारांवर मराठी कवींची माहिती यांत आहे. किं. रु. २

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ ग्रंथमाला

वि सू.—मंडळाचे ग्रंथांस मुंबईसरकाराकडून आश्रय मिळाला असून मे. डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांनीं ही *चिन्ह केलेले ग्रंथ प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयांसाठीं मंजूर केले आहेत.

| क्रमांक | | पृ. | कि. |
|---|---|---|---|
| १ | अहवाल शके १८३२ ... ... ... ... | १०३ | ३ |
| २ | ,, शके १८३३ ... ... ... ... | १६९ | ५ |
| ३ | सुबंत-विचार (रा. वि. का. राजवाडे) ... ... | ९० | २ |
| ४ | वार्षिक इतिवृत्त शके १८३४ ... ... ... | ३८३ | ५ |
| ५ | मराठ्यांच्या इति० साधनें, खंड १२ (राजवाडे) | २३७ | १०८ |
| *६ | प्रथम-संमेलन-वृत्त शके १८३५ ... ... ... | ८२ | ०१२ |
| *७ | वार्षिक इतिवृत्त शके १८३५ ... ... ... | ४७६ | ६ |
| *८ | द्वितीय-संमेलन-वृत्त शके १८३६ ... ... | ३१६ | ३ |
| *९ | वार्षिक इतिवृत्त शके १८३६ ... ... ... | २७२ | ३ |
| *१० | मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें (शिवकालीन घराणीं) खंड २० वा (राजवाडे) ... ... | ४३६ | २ |
| *११ | वार्षिक इतिवृत्त शके १८३७ ... ... ... | ३१४ | ६ |
| *१२ | तृतीय-संमेलन वृत्त शके १८३७ ... ... | १८७ | ३ |
| *१३ | मुकुंदमहाभाष्य (संस्कृत) ... महाराष्ट्र कवि व सारस्वत ... | ५४ | ०८ |
| *१४ | ग्रंथराज (दासोपंत) ,, ... ... | ९६ | ०८ |
| *१५ | स्फुट प्रकरणें, भाग १ ला ... ... | १७० | ०१२ |
| *१६ | स्फुट प्रकरणें, भाग २ रा ... ... | १७६ | ०१२ |
| *१७ | वार्षिक इतिवृत्त शके १८३८ ... ... | २४२ | ३ |
| १८ | चतुर्थ-संमेलन-वृत्त शके १८३८ ... | २२४ | ४ |
| १९ | राजवाडे-खंड-स्थलसूची १८३९ ... | २३६ | ४ |
| २० | पंचमसंमेलनवृत्त शके १८३९ ... ... | २३२ | ३ |
| +२१ | संशोधनसंग्रह शके १८३९ ... ... ... | | |

+ तयार होत आहे.

या पुस्तकाचीं पृष्ठें १ ते ४८ मुंबई येथें इंदुप्रकाश छापखान्यांत दामोदर सावळाराम यंदे यांनीं, व ४९ ते १८७ व अनुक्रमणिका, प्रस्तावना व सूची मिळून पृष्ठें ३४ हीं धुळें येथें आत्माराम छापखान्यांत शंकर श्रीकृष्ण देव यांनीं छापलीं व पुस्तक श्री. खंडेराव चिंतामण मेहेंदळे यांनीं ४५६, शनवार पेठ, पुणें येथें प्रसिद्ध केलें.

फक्त टायटल प्र. ३०० आ. भू. छा. छापिलें.